शिवशाहीचा असल

वि. गं. लेले

शिवशाहीचा अस्त

वि. गं. लेले

दर्पदमन-सामर्थ्यांची वृद्धि करणारा जो अग्नि त्याची भक्तजनांनीं वेदीवर संस्थापना केली आहे. त्यास हवि अर्पण करून आम्हींहि त्याला प्रकट व्हावयास लावूं. हे सत्प्रतिपालका अग्निदेवा, पराक्रमाच्या कृत्यांत आमचा तूं प्रसन्न अंतःकरणानें संरक्षणकर्ता हो. —ऋग्वेद

मङ्गल साहित्य प्रकाशन

१७९५ ते १८१८ इतिहास-ग्रंथ
प्रकाशन ४६ वें : प्रथम मुद्रण
मकर संक्रमण, १८६९ : जाने. १९४८
पृष्ठ संख्या ४५२ : मूल्य आठ रुपये

★

मङ्गल साहित्य प्रकाशन
संचालक : अमरेन्द्र गाडगीळ
अनुशासक : १ दि. वि. काळे, एम्. ए.
२ रा. त्र्यं. रानडे
प्रकाशिका :
सौ. मङ्गला अमरेन्द्र गाडगीळ
मङ्गल साहित्य प्रकाशनाकरितां
आनंदचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.
मुद्रक :
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ
अग्रणी मुद्रणालय
आनन्दचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.

उदारधी

श्रीमंत सरकार सर मेजर राजे

मालोजीराव मुधोजीराव

ऊर्फ

नानासाहेब नाईक निंबाळकर

राजेसाहेब सं. फलटण

यांचे चरणीं–

सादर सप्रेम समर्पण

–ग्रंथकार

संचालकीय

इंग्रजांनीं देशांत फूट पाडली, जातीयवाद निर्माण केला, कपटानें राज्य घेतलें—आणखीही कित्येक अनर्थ केले म्हणून बोटें मोडीत बसणाऱ्यांचें आश्चर्य वाटतें, कींव येते! शत्रु हा शत्रुसारखाच वागावयाचा; त्यानें मित्रत्वाचा केवढाही आव आणला तरी तो कांहीं खराखुरा मित्र बनूं शकणार नाहीं. तशी अपेक्षा करणें हा आपला बावळटपणा. जेता हा जेत्यासारखाच वर्तावयाचा; जिताच्या कल्याणासाठीं नि न्यायासाठीं तो जितांना जिंकता झाला असें मानणें हा शुद्ध भोंगळपणा, मूर्खपणाही. सनदशीर राजकारणाचें बीज यांतच सांपडेल. शत्रूशीं अगतिकता म्हणून पत्करलेलें तात्पुरतें बाह्यात्कारी मित्रत्व आणि कायमचें मनःपूर्वक सख्यत्व यांत पाताळांतराळाचा भेद आहे. पहिलें धोरण म्हणून, राजकारण म्हणून प्रसंगीं इष्ट असलें तरी दुसरें मात्र देशाशीं साक्षात् शत्रुत्व, उघड उघड देशद्रोह म्हणून सर्वथा निषेधार्हच. —जयचंदाची परंपरा या ना त्या स्वरूपांत आजही जिवंत आहे, यापरतें दुर्दैव कोणतें?—यास्तव स्वदेशाच्या शत्रु-मित्राची योग्य जाणीव नि तदनुरूप वर्तन हेंच यशस्वी राजकारणाचें सूत्र होऊं शकतें. कौटिल्याच्या राजकारणाचा ग्रंथ आपल्या देशांत लिहिला गेला आणि त्याचा व्यवहार मात्र परकीयांनीं केला व त्याला आपण बळी पडलों!—हा इतिहास तरी यावेगळें काय सांगणार?

आमचा पुणें-सातारा इंग्रजांनीं कां घेतला आणि त्यांचा मद्रास-कलकत्ता आम्ही कां घेऊं शकलों नाहीं? ....देशाभिमानशून्यता, समूहरूपानें कार्य करण्याची नालायखी, स्वार्थसाधनांची बेसुमार हांव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय, इत्यादि दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगीं जे खिळले आहेत तेच आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत. असल्या दुर्गुणांनीं खिळखिळें झालेलें कोणतेंहि पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्राशीं विरोध प्राप्त झाला असतां टिकाव धरूं शकत नाहीं. हिंदुस्थान जर इंग्रजांनीं घेतलें नसतें तर फ्रेंचांनीं घेतलेंच असतें. प्रवाहांत पडलेलीं भांडीं एकमेकांवर आदळलीं असतां त्यांतलें कोणतें फुटावयाचें, मातीचें कीं लोखंडाचें हें ठरलेलेंच आहे! हल्लींचा काळ असा आला आहे कीं, आम्हीं पाश्चात्त्यांची बरोबरी तरी करावी, नाहीं तर त्यांचे मजूर तरी होऊन रहावें! राजकारण, उद्योगधंदे, कलाकौशल्य, भौतिक शास्त्रांचा उपयोग, प्रत्येक गोष्टींत हीच स्थिति आहे. जर आम्हांस पाश्चात्त्यांची बरोबरी करण्याची हिंमत असेल तर या लेखांत वर्णिलेले आमचे दुर्गुण आम्ही टाकले पाहिजेत. पूर्वीं स्वराज्य होतें तें याच दुर्गुणांमुळें गेलें हें समजून जर आम्हीं सावध झालों नाहीं, तर नवीन स्वराज्य मिळून सुद्धां व्यर्थच आहे, हाच इतिहासडिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानीं घुमत राहिला पाहिजे!

—श्री. वासुदेवशास्त्री खरे

'मराठे व इंग्रज' प्रस्तावना.

निवेदन

दहा-बारा वर्षांपूर्वी लिहून पडलेलें 'शिवशाहीचा अस्त' हें माझें हस्तलिखित आज ग्रंथरूप धारण करून स्वातंत्र्याच्या दीप्तीनें झळाळणाऱ्या वातावरणांत प्रकाशित होतांना पाहून माझें मन अगदीं हरकून गेलें आहे आणि तसें होणें स्वाभाविक आहे.

आंग्लाईच्या अस्तानंतर 'शिवशाहीचा अस्त' प्रकाशांत येत आहे हेंही या पुस्तकाचें एक वैशिष्ट्यच आहे. आंग्लाईत हें प्रसिद्ध होतें तर तें प्रकाशांत किती दिवस राहिलें असतें हें सांगणें फार कठीण आहे.

'शिवशाहीचा अस्त' या माझ्या ग्रंथाचा ग्रंथच आटोपला; जणूं तें मी लिहिलेंच नाहीं असें धरून चाललों होतों. पण मला पितृस्थानीं असणारे फलटणचे साहित्यप्रेमी विद्वान दिवाण सौजन्यश्री बापूसाहेब गोडबोले यांजजवळ मी या पुस्तकासंबंधीं गोष्ट काढिली व त्यांनीं हें काम त्यांच्या नेहमींच्या गोडव्या स्वभावानुरूप इतकें मनावर घेतलें कीं, त्याचें वर्णन करण्यास मजजवळ शब्दच नाहींत. एके काळचा मी फलटणचा रहिवासी तेव्हां फलटणच्या महाराजांचा व माझा प्रत्यक्ष भेटीचा सुयोग श्री. बापूसाहेब गोडबोल्यांनीं जुळवून आणिला. त्या वेळीं या पुस्तकाची पूर्ण कल्पना महाराजांस मी दिली. तेव्हां हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास लागणारें आर्थिक साहाय्य त्यांनीं थोर अंतःकरणानें केलें म्हणूनच ही गोष्ट शक्य झाली. या त्यांच्या साहाय्याबद्दल मी त्यांचा सर्वथा ऋणी आहें.

'सन १८०२ सालच्या शेवटच्या दिवसानें स्वराज्याचा स्वातंत्र्याचा शेवट पाहिला. सर्व मराठी राज्यास पूर्वींपासून शिवशाही हें नांव चालत आलें आहे. या शिवशाहीला हुकमतींत वागवून तिचें स्वस्तिक्षेम संभाळण्याचा ज्याचा परंपरागत अधिकार त्या बाजीराव पेशव्यानें स. १८०२ च्या डिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस इंग्रजांशीं वसईचा तह करून त्याचा आश्रय व ताबेदारी संपादन केली. शिवशाहीच्या स्वातंत्र्यसौभाग्याचा कुंकमतिलक तिच्याच त्या नादान पोरानें त्या तहाच्या चिटोऱ्यानें

पुसून टाकिला. ' या एका दुःखद घटनेनें भारताचें नष्टवर्य ओढवलें. आणि त्याचा परिपाक म्हणून आपण गेलीं शें-सवाशें वर्षें गुलामगिरींत पार भरडून निघालों. दि. ३१ डिसेंबर स. १८०२ हा दिवस क्षितिजावरून मावळला, त्यानंतर स्वातंत्र्याचें क्षितिज दूर दूर जाऊं लागलें. किंबहुना स्वातंत्र्यसूर्य क्षितिजावर येणें अशक्यच वाटलें. परंतु भगवति भवितव्यतेच्या अघटित घटनापटुत्वामुळें ही अशक्यप्राय घटना शेवटीं घडून आलीच.

जन्मतांच सूर्यबिंबाला हात घालणाऱ्या बजरंगाप्रमाणें महाबली हेर हिटलरनें आपलें सर्व सामर्थ्य एकवटून भूगोलावर जबरदस्त धडक घेतली, त्याबरोबर आम दुनिया उलथीची पालथी झाली. आपल्या साम्राज्य-सामर्थ्याचे पाश टाकून जगताचें गचडें धरून बसलेल्या ' जॉन बुल'ची भारतावरील पक्कड ढिली पडली व त्याला हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देणें भाग पडलें. पण तो वृत्तीनें असा हैवान कीं, त्यानें जातां जातां भारताचीं खांडोळीं केलीं, नव्हे शिरच्छेद केला. आणि मस्तक एकास तर धड दुसऱ्यास अशी त्याची वांटणी केली. हिंदु–मुसलमानांतील हें भांडण फाल्गुन मासांतील पौर्णिमेच्या हुताशनीप्रमाणें साहेबानें हेतु-पुरःस्सर दि. १५ ऑगस्ट १९४७ ला शुक्रवारीं रात्रौ बारा वाजतां करकरीत अमावस्येच्या ' शुभ 'मुहूर्तावर चेतवून दिलें! त्याचे दूरगामी परिमाण काय होणार तें कोण जाणें!

मराठेशाही गाडण्याची घोर प्रतिज्ञा करून दक्षिणेंत दाखल झालेल्या ' औरंग्या 'चें थडगें मराठ्यांनीं बांधिलें हें खरें. पण मोंगलांनीं मुत्सद्दे-गिरीनें शाहूला सोडून सातारा आणि कोल्हापूर हीं शिवशाहीचीं दोन शकलें केलीं तीं शेवटपर्यंत वेगळींच राहिलीं आणि त्यांनीं मराठेशाहीचा विचका व्हावयाचा तो झाला. तोच प्रकार पाकिस्तान आणि शेष हिंदुस्थान यांचा मोठ्या प्रमाणांत चालू आहे.

दि. १७–११–१८१७ ला बाळाजीपंत नातूनें पेशव्यांच्या शनिवार-वाड्यावर इंग्रजांचें निशाण लाविलें. साहेबाची हिकमत अशी कांहीं अजब कीं त्यानें आपला बावटा पेशव्यांच्या वाड्यावर चढविला तो कोणा इंग्रज साहेबाच्या हातानें नव्हे तर बाळाजीपंत नातूच्या हातानें

—स्वकीयाविरुद्ध स्वकीय उठवून. पण काळ मोठा जबरदस्तपणें सूड घेतो म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. दि. १५ ऑगस्ट १९४७ ला रात्रीं बरोबर बारा वाजतां दिल्लीला हीच घटना घडून आली. लॉर्ड माउंटबॅटनसारख्या प्रथितयश सरसेनापतीनें स्वतःच्या राष्ट्राचें मानी निशाण आपल्याच हातानें खालीं खेंचून त्या ठिकाणीं स्वतंत्र भारताचा स्वतंत्र ध्वज उभारला. लक्षावधी लोकांच्या समोर हा देखावा झाला. एका इंग्रजानें आपलें निशाण खालीं खेचलें व त्या ठिकाणीं हिंदुस्थानाचें निशाण चढविलें. कालानें हा सूड घेतला. स्मितवदनानें ही गोष्ट करणाऱ्या माउंटबॅटनच्या अंतःकरणाचें काय झालें असेल तें त्याचें त्यालाच ठाऊक !

प्रस्तुत पुस्तकाचा विषय म्हणजे दुःखद घटनांची मालिकाची मालिकाच आहे. ती संकलित करतांना मनाला अत्यंत क्लेश झाले. यांत व्यक्तिदोष दर्शनापेक्षां आत्मनिरीक्षणाचा हेतुच प्रधान आहे. स्वतःतील दोष स्वतःला पूर्णपणें कळल्याशिवाय व त्यांचें पूर्णतया उच्चाटन झाल्याशिवाय आपल्या राष्ट्राचा सर्व बाजूंनीं भरघोंस भाग्योदय होणें शक्य नाहीं. म्हणूनच हें केलें आहे. बाळाजीपंत नातूचे छोटे मोठे अवतार प्रतापसिंहाच्या कालीं होते व आजही आहेत. आपल्या देशांतील एकंदर जनतेचा मनःपिंडच बदलून त्यांत राष्ट्रपोषक गुणांची पैदास व विकास झाला नाहीं तर मिळालेलें आजचें स्वातंत्र्यही टिकवितां येणें कठीण जाईल.

—वि. गं. लेले

आधार-ग्रंथ :

(१) नाना फडणीसांचें चरित्र—खरेशास्त्री
(२) इंग्रज व मराठे—न. चिं. केळकर
(३) काव्येतिहास संग्रह पत्रें यादी. (नवीन आ.)
धा. शा. चरित्र व चतुरासिंग चरित्र.
(४) इतिहास संग्रह पे. द. सनदापत्रें व सरंजाम
यादी ऐ. टि., ऐ. स्फू. लेख इत्यादि.
(५) इतिहास व ऐतिहासिक—नखर पेशवाईअखेर
(६) ऐतिहासिक लेखसंग्रह—खरे (भाग ९ ते १४)
(७) भारतवर्ष शकावली प. या. अखबार बखरी इ.
(८) मराठी दप्तर—भावे (रु. १–२–३)
(९) तह करार मदार कैफियत व यादी
(१०) होळकरी पत्रव्यवहार
(११) राजवाडे–खंड ४, १०, १५
(१२) पुरंदरे दप्तर–भा. १, २
(१३) मराठी रिसायत (उत्तर विभाग ३).
(१४) प्रभुरत्नमाला
(१५) ऐतिहासिक पोवाडे–य. न. केळकर
(१६) पेशवे दप्तर–भाग ४०, ४१, ४२
(१७) ग्रँट डफचा इतिहास
(१८) सगुणाबाईचें अपील
(१९) पारसनीसकृत महाबळेश्वर
(२०) ऐतिहासिक स्फुट लेख
(२१) पार्लमेंटाचे 'सातारा पेपर्स'
(२२) ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ३
(२३) चतुर्थ संमेलन-वृत्त
(२४) Satara Gazetteer
(२५) Story of Satara
(२६) Satara Maharaj case by Hume (vol I, II)
(२७) East India Company & Bajirao Peshwa
by P. C. Gupta. (vol I, II)
(२८) Mountstuart Elphinstone
by J. S. Cotton.

'अस्ता'च्या छाया :

भेदनीतीचें जहर : १

आघाडीनें चाल करून येणाऱ्या सिंहाच्या चिंधड्या चिंधड्या उडविणारी हत्तीची तुफान ताकत भेदनीतीनें खणून ठेवलेल्या खड्ड्यापुढें कवडीमोल ठरते आणि फितुरीच्या सरक फासांत गर्दन गवसलेला गजराज शिकारी हत्तीच्या नादानें खड्ड्यांत सांपडतो व स्वातंत्र्याला कायमचा आंचवतो. एखाद् वेळेस असेंही होतें कीं, शिकारी हत्ती हा रानांतील हत्तींच्या कळपाचा म्होरक्याही असूं शकेल, पण दैववशात् मानवाच्या तावडींत सांपडून चांगला शिकारी हत्ती म्हणून तयार होत असेल व मग तोच नेता नेता म्हणून गाजलेला गजराज आपल्याच कळपांतील इतर हत्तींना पकडून देण्यास कारणीभूत होत असेल; अशीच स्थिति साताऱ्च्या प्रतापसिंह महाराजांची झाली. कारण साताऱ्चें राज्य म्हणजे स्वातंत्र्याची गंगोत्री. या अत्यंत पवित्र ठिकाणीं स्वराज्याची गंगा उगम पावली. तिचा परमपावन प्रवाह अखिल भरतखंडांत पसरला व पारतंत्र्यामुळें कलंकित झालेल्या भारतवर्षास कांहीं थोडे सुखाचे दिवस दाखविता झाला. पण दैव फिरलें म्हणजे सर्वच फिरतें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. हा खोडकर दैवाचा खडतर अनुभव सर्वांनाच आहे. त्यांतलाच प्रकार येथेंही झाला. मराठी राज्याचा जन्म भोंसल्यांच्या पराक्रमानें झाला. त्याचें हिंदुपद्पाद्शाहींत रूपांतर त्यांच्याच पुण्याईनें व प्रोत्साहनानें

झालें व त्याच्या नाशाची तयारीहि पण याच ठिकाणीं झाली. दैवदुर्विलास असा कांहीं चमत्कारिक कीं, साताऱ्यास शककर्त्या शिवाजी महाराजांच्या खास वंशांत चालत आलेल्या सिंहासनावर अभिषिक्त राजे म्हणून राज्य करणारे खुद्द प्रतापसिंह महाराज हेच गुलामगिरीचें स्वागत करण्यास सिद्ध झाले !

इ. स. १६१२ पासून टोपीकर सुरतेस वखार काढून बसला होता. त्यानें जशी मुसलमानी रियासत पाहिली होती तसेंच मराठ्यांचें स्वराज्य व त्या स्वराज्याचें झालेलें साम्राज्य हेंही पण तो सावधान चित्तानें पाहात होता. त्या वेळेपासून या दोन्ही सत्ता व त्यांचें वैभव धुळीस कसें मिळवितां येईल आणि त्या ठिकाणीं आपणांस आपलें साम्राज्य कसें संस्थापितां येईल, या विवंचनेंत तो होता. तागडी तोलतां तोलतां त्यानें तलवारीस हात घातला होता आणि या सुवर्णसंधीची वाट पहात तो बसला होता. मुसलमानी सत्ता जवळ जवळ त्याच्या घशांत उतरली होती आणि मराठी साम्राज्य कसें नाहींसें करतां येईल यांतच त्याचें सर्व लक्ष्य गुंतलें होतें. मराठी साम्राज्याच्या टोलेजंग इमारती-भोंवती फिरंग्यानें भेदनीतीचे सुरुंग पेरले होते. स्वार्थाच्या भुयारांतून दारूगोळा ठासण्यांत आला होता आणि या कार्यांत साहेबाच्या हाताला यशही आलें होतें.

यावेळीं महाराष्ट्रास लागलेला साडेसातीचा तडाखा असा कांहीं अजब होता कीं, बोलावयाची सोय नाहीं. या साडेसातीस सुरुवात इ. स. १७९४ पासून झाली. यापुढील दोनपांच वर्षांत मराठी राज्यांतील बहुतेक कर्तीं मांणसें मृत्युमुखीं पडलीं. इ. स. १७९४ सालीं महादजी शिंदे वारले. त्यांच्या मरणानें एकाएक असा बहाद्दर सेनानी नाहींसा झाला. यामुळें मराठेशाहीस असह्य धक्का बसला. शिंद्यांच्या पाठोपाठ निर्दय काळानें हरिपंत फडक्यावर झडप घातली व तो पोटशूळाच्या विकारानें २० जून १७९४ रोजीं देवरूप झाला. डागल्या-वरतीच डाग द्यावा किंवा ठेंच लागल्या ठिकाणींच ठेंच लागावी त्याप्रमाणें १७९५ त सवाई माधवरावास अपमृत्यु आला ! त्याच्या मृत्यूनें नाना फडण-

घिसानें बसविलेली घडी पार विस्कळित झाली. यास वर्षे दोन वर्षे होतात न होतात तोंच इ. स. १७९७ मध्यें तुकोजीराव होळकर वारला. होळकरांच्या मरणानें शिंदे व होळकर यांच्यांतील यादवीस सुरुवात झाली. नवीन पिढींतील या दोन सरदारांत वैर होतें. त्यामुळें त्यांचें चांगलेंच युद्ध जुंपलें. याच सुमारास बडोद्यास गायकवाड घराण्यांत गृहकलह चालू होता. अशा अगदीं नाजुक परिस्थितींत सवाई माधवरावाच्या मृत्यूबरोबरच बलहीन झालेला पण फक्त देह संभाळून असलेला एकटा मुत्सद्दी नाना फडणवीस हाही इ.स. १८०० मध्यें निवर्तला ! त्यामुळें या एका खांबावर उभी असलेली महाराष्ट्र द्वारका पार कोसळून खालीं पडली. मराठ्यांच्या अकलेचें दिवाळें वाजलें व रावबाजीस वसईचा अपमानकारक तह करावा लागला. या तहानें नाखूष झालेले शिंदे, होळकर व नागपूरकर भोंसले या सर्व प्रमुख मराठे सरदारांस एक एकटे गांठून त्यांचा इंग्रजांनीं ठिकठिकाणीं पराभव केला व त्यांस निरनिराळ्या कावेबाज तहानें जागच्याजागीं जखडून टाकिलें. अशा तऱ्हेनें इंग्रजांनीं मराठी सत्तेस पायबंद घातला, पण हें करून सुद्धां त्यास समाधान नव्हतें. त्यांना रावबाजीची सत्ता संपुष्टांत आणून त्याची महाराष्ट्रांतून उचलबांगडी करावयाची होती. पेशव्यांची गादी पार निकालांत काढून त्यांच्या सत्तेचा ठावाठिकाणाही नाहींसा करण्याची इंग्रजाची मनीषा होती. हें करूनसुद्धां त्यांस संतोष नव्हता. तर मराठी साम्राज्याचें मूळ ठिकाण जी सातारची गादी ती गारद करून महाराष्ट्रांत आपली सत्ता अढळ करावयाची असा त्यांचा मानस होता. हा हेतु साधण्यासाठीं त्यानी नाना तऱ्हेचीं कपटकारस्थानें रचिलीं व आपल्या पाताळयंत्री बुद्धीचा मनास मानेल तसा उपयोग केला.

"फोडा व झोडा" हा इंग्रजाचा न्याय. या एकाच गुरुकिल्लीच्या जोरावर त्यानें आपलें साम्राज्य अखिल जगतावर संस्थापित केलें. त्या अमोघ शस्त्राचा उपयोग त्यानें या वेळींही केला. पेशव्यांची सत्ता वसईच्या तहानें जवळ जवळ संपुष्टांत आली होतीच. तसेंच इतर मराठे सरदारही इंग्रजांनीं नामोहरम केले होते. पण सातारकर व पेशवे यांचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा इंग्रजांचा बेत होता व त्याच उद्योगास ते लागले होते.

पेशव्यांची सत्ता मर्यादित करण्यासाठीं एल्फिन्स्टननें अनेक काळींवेरीं कारस्थानें सुरू केलीं. पेशव्यांना सातारकरांचें व इतर मराठे सरदारांचें पाठबळ मिळूं नये, त्यांच्या-त्यांच्यांत तंटे सुरू व्हावेत, परस्परांचीं मनें परस्परांविषयीं इतकीं कलुषित व्हावींत कीं एकमेकांनीं एकमेकांचीं तोंडें पाहण्याची सुद्धां सोय उरूं नये, इतक्या थराला गोष्टी आल्याशिवाय आपलें बस्तान नीट बसणार नाहीं हें एल्फिन्स्टन जाणून होता ! तेव्हां त्यानें अशा तऱ्हेनें भेदनीतीचें जहर पेरण्यास सुरुवात केली.

व्यक्तीला, कुटुंबाला किंवा राष्ट्राला एकदां का वाईट दिवस येऊं लागले म्हणजे 'छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति ।' या म्हणीप्रमाणें त्याच्यावर संकटें कोठून, कशीं व केव्हां कोसळूं लागतील याचा नेमच नसतो. अमृतवल्लीचें रूपान्तर विषवल्लींत होतें. राष्ट्राला ललामभूत होणारीं माणसें राष्ट्रविध्वंसक बनतात. महाराष्ट्राचा म्हणण्यापेक्षां भारतवर्षाचा हा काल असाच विपरीत असल्यामुळें आपणांस अशा मंडळींची मालिकाच मालिका पाहावयास मिळते. त्यांत अठरापगड जातींतील बुद्धिमान लोक स्वार्थाकरितां पागल बनलेले दृष्टीस पडतात. अशा व्यक्तींपैकीं एल्फिन्स्टनच्या हातीं लागलेल्या दोन प्रमुख व्यक्ती म्हणजे बाळाजीपंत नातू व बळवंत मल्हार चिटणीस या होत. एल्फिन्स्टननें आपलीं सर्व कारस्थानें या व्यक्तींच्या करवीं तडीस नेलीं.

इ. स. १८१०–१८११ पासून एल्फिन्स्टन हा आपला स्वार्थ साधण्यासाठीं सातारकरांशीं एक कावेबाजपणाचा डाव खेळत होता. पेशवे हे सातारकरांच्या अष्टप्रधानांपैकीं एक प्रधान असून त्यांनीं आपल्या धन्याशीं बेइमानी करून सर्व सत्तेचा व राज्याचा अपहार केला आहे, असा एक खोडसाळ आरोप कित्येक ठिकाणीं पेशव्यांच्यावर करण्यांत येतो. त्याचा फायदा एल्फिन्स्टननें या वेळीं घेतला. "पेशव्यांची सत्ता नष्ट करून सातारच्या छत्रपतींचें वर्चस्व पुनरपि मराठी साम्राज्यावर प्रस्थापित करावें व पेशव्यांनीं बळकाविलेला सर्व मुलूख सातारकरांचाच असल्यामुळें तो त्यांचा त्यांस परत द्यावा" या एकाच पवित्र हेतूनें प्रेरित होऊन कंपनी सरकार पेशव्यांशीं झगडत आहे. असा विलक्षण देखावा पेशवे व कंपनीसरकार यांच्यामध्यें पुढें मागें कटकटीस

प्रारंभ झाला असतां महाराष्ट्रांत दृष्टीस पडावा म्हणून एल्फिन्स्टनची एकसारखी खटपट चालू होती. असें दृश्य दाखवितां आलें कीं पेशवे व इंग्रज यांच्या लढाईतील यश कुंपणी सरकारच्या बाजूचें आहे. अशी त्याची खात्री होती व ती यथार्थ होती. त्या दृष्टीनें त्याच्या खटपटी चालू होत्या. पण या स्वार्थाच्या मंत्रानें भारलेल्यीं भेदनीतीच्या मुठीनें सातारकरांच्या मनावर अद्यापपर्यंत कांहीं एक परिणाम केला नव्हता; पण आतां मात्र महाराजांचें नष्टचर्य ओढवलें आणि साहेबानें टाकलेल्या फाशांत तो फशीं पडणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. कारण सातारच्या महाराजांची प्रभावळच्या प्रभावळ या म्हणण्याचा पुरस्कार करूं लागली. पुरस्कार करूं लागली असें म्हणण्यापेक्षां एल्फिस्टननें तयार केलेला हा मंत्र या प्रभावळीचाच होता. पण त्यांत खुद्द महाराज गुरफटले जाण्याचा योग मात्र आतां आला इतकेंच काय तें! या कारस्थानांत मंडळी फार मोठाली होती. सातारकर महाराजांचे परात्पर गुरु श्री स्वामी हनुमान बाबा चाफळकर महाराज, त्यांचे वंशपरंपरागत प्रधान बलवंत मल्हार चिटणीस, आणखी तिसरे एक इभ्रतदार गृहस्थ रंगो बापूजी गुप्ते व आणखीही पुष्कळ मंडळी होती.प्रथम प्रथम चाफळकर महाराजांनीं या कार्यांत विशेष उचल घेतलेली दिसते. पण पुढें मात्र ते बाजूला पडले व या राजकारणांत बलवंत मल्हार प्रमुख झाला. त्यानें हें कार्य स्वतःच्या जबाबदारीवर पार पाडण्याचें ठरविलें. ही कामगिरी स्वतःच्या शिरावर घेण्यांत त्याचा स्वार्थ होता. पेशव्यांनीं त्याचें कांहीं उत्पन्न जप्त केलें होतें. तेव्हां पेशव्यांच्या विषयीं तो मनांतून जळत होता. इंग्रजांच्या सहाय्यानें आपलें उत्पन्न सोडवावें, पेशव्यांचा सूड घ्यावा व महाराजांचेंही कल्याण करावें असें त्याच्या मनानें घेतलें; आणि त्यानें एल्फिन्स्टनशीं हें कारस्थान शिजविण्यास सुरुवात केली.

"पेशवा हा महाराजांचा एक सामान्य नोकर; पण लष्करी सत्तेच्या जोरावर तो महाराजांचे अधिकार व मुलूख बळकावून बसला आहे, इतकेंच नव्हे तर त्यानें महाराजांस कैदही पण केलें आहे. तेव्हां कंपनी सरकारनें महाराजांस पेशव्यांच्या कांचांतून सोडवावें आणि त्यांची सत्ता व मुलूख त्यांचा त्यांस द्यावा म्हणजे सातारकरांवर इंग्रजांचें फार मोठे उपकार होतील," अशी

सातारकर महाराजांची विनंति म्हणून बलवंत मल्हार चिटणिसांनीं रंगो बापूजीच्या साहाय्यानें एल्फिन्स्टनसाहेबास कळविली. एल्फिन्स्टनला ही विनंति म्हणजे भारद्वाजानें उजवी दिल्याप्रमाणें झालें. कारण तो जो डाव आज बरेच दिवस-पर्यंत मराठ्यांशी खेळत होता त्यांत त्याला यशाचा राजमार्ग अनपेक्षित तऱ्हेनें दिसला. त्याचें फावलें. इकडे एल्फिन्स्टनशीं असें संधान जुळविल्यानंतर बळवंत मल्हार चिटणिसांनीं सातारकर महाराजांचा असा समज करून दिला कीं, पेशव्यांच्या सत्तेखालीं असणाऱ्या मराठी राज्याचा-साम्राज्याचा सर्व मुलूख पेशव्यांची हकालपट्टी करून इंग्रज तो महाराजांचे ताब्यांत देणार आहेत. इंग्रज वचनाचे सच्चे. तेव्हां ते बोलल्याप्रमाणें करण्यास मागें घेणार नाहींत. त्यांच्याशीं संगनमत करण्यास कोणत्याही तऱ्हेची हरकत नाहीं असें परोपरीनें सांगून बळवंत मल्हार चिटणिसांनीं प्रतापसिंह महाराजांचें मन या कारस्थानास तयार केलें. बिचाऱ्या भोळ्याभाबड्या महाराजांस असें वाटलें कीं, आपलें भाग्य खास विनायासें उदयास येणार. इंग्रज हे आपल्या पूर्वजांच्या अपूर्व पुण्याईनें जणूं काय देवदूतच भेटले; आणि अशी महाराजांची कल्पना होणें अगदीं स्वाभाविक होतें व तशी ती झालीही.

बळवंतराव चिटणीस हा एल्फिन्स्टन वगैरे इंग्रज अधिकाऱ्यांच्या मोघम वचनास भाळला व त्यानें सातार दरबार इंग्रजांस अनुकूल असा तयार केला. पुढें मागें पेशवे व इंग्रज यांच्यांमध्यें कांहीं तंटा बखेडा उत्पन्न झाल्यास पेशव्यांस मदत करावयाची नाहीं अशी मानसिक तयारी सातारचे प्रतापसिंह महाराजांची झाली व हेंच इंग्रजांस हवें होतें. अशा रीतीनें इंग्रजांच्या उदरीं शनि आला व सातारचा सर्व दरबार व खुद्द महाराज हे पेशव्यांविरुद्ध आपणांस मदत करणार अशी एल्फिन्स्टनची खात्री झाली. अशा तऱ्हेनें सातारकर महाराजांचा मुख्य प्रधान बळवंत मल्हार चिटणीस हा साहेबानें टाकलेल्या गळास लागला ! आतां पेशव्यांची हकालपट्टी करून सातारच्या राज्याची वासलात लावणें फारसें कठीण जाणार नाहीं या उमेदीनें एल्फिन्स्टन आनंदित झाला. या आनंदांत सुद्धां त्याची बुद्धि शांत व शाबूत होती. त्याने या कारस्थानाचा यत्किंचितही सुगावा पुणें दरबारीं लागूं न देण्याबद्दल अत्यंत काळजी घेतली.

आतां पुणें दरबारीं बाजीरावाच्या पदरीं असा एकही मुत्सद्दी किंवा योद्धा नव्हता कीं, जो सातार दरबारचीं सर्व कारस्थानें आपल्या अकलेच्या जोरावर उमगून पराक्रमानें मारून टाकील. येथें परिस्थिति अगदीं उलट. रावबाजी-भोंवतीं स्वार्थानें पछाडलेल्या लोकांची भुतावळ जमा झालेली, ज्याच्या त्याच्या अकलेचें दिवाळें वाजलेलें. जो तो स्वराज्याची चिता चेत घेते केव्हां व आपणांस तिच्यांत स्वार्थाचीं कणसें भाजतां येतात केव्हां याच विवंचनेंत. येऊन जाऊन कांहीं थोडी आशा फक्त एका बापू गोखल्याविषयीं. पण तो तरी या फाटलेल्या आकाशास कोठें आणि कसें ठिगळ लावणार ? त्याची छाती शत्रूचे घाव पेलण्यांत तरबेज, पण कारस्थानांचे किल्लेकोट यशस्वी तऱ्हेनें लढविण्यांत बुद्धि इतकीशी पटाईत नव्हती. अशी अगदीं निःसहाय्य स्थिति असतांना प्रसंग मात्र फारच जबरदस्त आला होता. गांठ इंग्रजांशीं होती व तो मराठ्यांच्यापेक्षां बुद्धीनें आणि बलानें सर्वतोपरी श्रेष्ठ होता.

सातारचे प्रतापसिंह महाराज व त्यांचे हस्तक यांना कांहीं आमिष दाखवून एल्फिन्स्टननें आपल्याविरुद्ध फितवून ठेविलें हें जसें रावबाजीस व त्याचे सल्लागार मंडळींस माहीत नव्हतें तशीच स्थिति सातार दरबारचीही होती. इंग्रजावर विश्वास टाकून आपण रावबाजीविरुद्ध इंग्रजास मदत केली तर ते आपल्या वचनास न जागतां आपणांस फशी पाडतील अशी थोडी सुद्धां शंका सातारचे प्रतापसिंह महाराज व त्यांचे या कारस्थानांतील मुख्य सल्लागार बळवंत मल्हार चिटणीस यांना नव्हती. एल्फिन्स्टननें आपलें हें गुप्त कारस्थान इतक्या शिताफीनें रचिलें कीं, या कारस्थानाच्या जाळ्यांत पुण्याचे ब्राह्मण मुत्सद्दी व इतर सल्लागार तसेंच सातारचे मराठे व बळवंतराव चिटणिसादि प्रभू मुत्सद्दी एखाद्या भोळ्याभाबड्या माणसाप्रमाणें पूर्णपणें जखडून गेले व मग पुढें त्यांचेवर टाचा घासून मरण्याची पाळी आली. धन्य आहे इंग्रज बहाद्दुराची कीं, त्यांनीं मराठी साम्राज्यांतील मातब्बर मुत्सद्यांची दावणची दावण या कारस्थानांत अडकवून टाकिली !

खुद्द प्रतापसिंह महाराज मात्र इंग्रजांविषयीं थोडे साशंक होते. त्यांनीं बळवंतराव चिटणिसास इंग्रजांशीं फार जपून वागण्यासाठीं बजावून सांगितलें

होतें. इंग्रज कामापुरतें गोड बोलतील व पेशव्यांचा पराभव झाल्यानंतर आपणांस विचारावयाचे नाहींत. ठरल्याप्रमाणें पेशव्यांच्या ताब्यांतील मुलूख आपणांस देणार नाहींत तेव्हां त्यांच्याशीं या बाबतींत बोलणें चालणें स्पष्ट करावें, तसेंच आपण व इंग्रज यांच्यामध्यें चाललेलें हें कारस्थान पेशव्यांस न कळण्याबद्दल दक्षता बाळगावी असें बळवंतराव चिटणिसांस महाराजांनीं बजावून सांगितलें होतें. तरी सुद्धां तो एल्फिन्स्टनच्या भुलथापांस बळी पडला. त्यानें फक्त एकदांच साहेबाच्या कानांवर महाराजांची ही शंका घातली. छत्रपतींना दिलेलें वचन तुम्ही पाळाल किंवा नाहीं, म्हणजे रावबाजीचा पराभव झाल्यानंतर त्याच्या ताब्यांतील मुलूख हा छत्रपतींचा छत्रपतींना द्याल किंवा कसें याबद्दल महाराजांस संशय वाटतो. तेव्हां आपण एकदां छत्रपतींची गांठ घ्यावी असें बळवंत मल्हारनें एल्फिन्स्टनला सुचविलें. हें ऐकतांच "छे छे: असें कसें म्हणतां? आपण एवढा सुद्धां किन्तु मनांत आणूं नका. पेशव्यांचा मुलूख तो महाराजांचाच. तेव्हां तो त्यांचा त्यांना आम्ही बेषक देऊन टाकूं याबाबत महाराजांची आपण खातरजमा करून द्यावी" असें एल्फिन्स्टननें मिठ्ठास भाषेंत बळवंतराव चिटणिसांस सांगितलें. या वेळीं एल्फिन्स्टनच्या भरीस भर देण्याकरितां त्याचा हस्तक बाळाजीपंत नातू हा होताच. दोघांनीं मिळून हें नाटक असें झोंकदार वठविलें कीं, त्याचा परिणाम बावळ्या बळवंतराव चिटणिसाचे मनावर साहेबास पाहिजे होता तसाच झाला.

पेशव्यांच्या ताब्यांतील मुलूख आपणांस मिळणार म्हणजे आपण केवढ्या तरी मोठ्या मुलुखाचे मालक होणार; मग आपलें वैभव केवढें व ऐश्वर्यहि फार मोठें, अशा शेखमहंमदी मनोराज्यांत प्रतापसिंह महाराज व त्यांचे प्रधान बळवंत मल्हार चिटणीस मनांत मांडे खात होते. पण उभयतां राजे व प्रधानजी यांचे डोक्यांत एकदां सुद्धां असा विचार आला नाहीं कीं, पेशव्यांचें राज्य म्हणजे काय, त्यांच्या सरहद्दी कोणत्या, त्यांचा मुलूख कोणता, तो मुलूख आपल्या ताब्यांत इंग्रज देणार म्हणजे काय करणार, त्याबद्दल कांहीं लेख किंवा कंपनीच्या सही शिक्क्याचा लेखी करार वगैरे कांहीं पाहिजे का नको, तसेंच हें सर्व करण्याचा अधिकार एल्फिन्स्टनला आहे किंवा नाहीं, का हें सर्व

वाऱ्यावर वरात व भुशावर चिठ्ठी असेंच चालावयाचें ? बळवंत चिटणिसानें याबद्दल कांहीं एक खुलासा केला नाहीं किंवा कंपनीच्या सही शिक्क्याचा करार एल्फिन्स्टनला मागितला नाहीं. एल्फिन्स्टनहि असा बहाद्दर कीं त्यानें हें सर्व तोंडीं वचनांवर व लंब्या लंब्या गप्पांवर भागवून नेलें ! पण या बाबतींत त्याला दोष देण्यांत काय हंशील ? सर्व चूक आपल्या पदरीं आहे. अशा तऱ्हेनें नाळ न कापलेल्या पोरालाहि न शोभेल अशा भोळ्या भाबड्या वृत्तीनें प्रतापसिंह महाराज व बळवंतराव चिटणीस या उभयतांनीं एल्फिन्स्टनसारख्या धूर्त व कावेबाज मुत्सद्यांच्या तोंडीं वचनावर विश्वासून वागण्यास सुरुवात केली. आपण बाजीरावास मदत केली नाहीं म्हणजे त्याचा रणांगणावर पूर्ण मोड होईल व मग बाजीरावाच्या ताब्यांतील सर्व मुलूख इंग्रज परोपकार बुद्धीनें व औदार्यानें आपल्या हवालीं करील आणि दिलेल्या वचनास जागेल या कल्पनेनें प्रतापसिंह महाराज, बळवंतराव चिटणीस आणि त्यांचे हस्तक पेशव्यांच्याविरुद्ध संगनमत करण्यास सिद्ध झाले.

ही सातारदरबारची स्थिति झाली. आतां खुद्द कंपनी सरकारचें धोरण प्रस्तुतच्या राजकारणाविषयीं काय होतें तें पाहूं. साताऱ्च्या महाराजांचा विश्वासघात करून त्यांचें राज्य घशांत टाकणें हा एकच हेतु कंपनी सरकारचा होता त्यास पुरावा आहे. त्या वेळचे मद्रासचे गव्हर्नर सर टॉमस मन्रो व मुंबईचे गव्हर्नर एल्फिन्स्टन यांचे दरम्यान या राजकारणासंबंधीं झालेल्या पत्रव्यवहारावरून वरील म्हणण्यास पुष्टि मिळते. ता. २९ मार्च १८१८ रोजीं सर टॉमस मन्रो यांनीं एल्फिन्स्टनला लिहिलेलें पत्र खालील आशयाचें आहे :

"रावबाजी व त्याचें सरदार मंडळ आपल्या तंत्राप्रमाणें वागत नाहींत. त्यानें उगाच इंग्रज सरकारची कुरापत काढली आहे व तो लढत आहे. त्याच्या या कृत्यास सातारदरबारची संमति नाहीं. इतकेंच नव्हे तर तो हें कृत्य साताऱ्च्या प्रतापसिंह महाराजांच्या विरुद्ध करीत आहे. तेव्हां त्यास महाराष्ट्रांत कोणीहि मदत करूं नये" अशा अर्थाचा सातारकरांकडून जाहीरनामा काढवावा. तें नच जमल्यास पेशवा हा बंडखोर असून त्यानें सातारदरबाराविरुद्ध बंड पुकारलें आहे व तो इंग्रज सरकारास निष्कारण त्रास देत आहे, असा देखावा

तरी निदान महाराष्ट्रांत उत्पन्न करावा. यामुळें पेशव्यांची रसद मारण्यास फार सोपें जाईल; अशा तऱ्हेनें पेशव्यांचा नायनाट करण्यास सातारकरांचा पूर्णपणें उपयोग करून घ्यावा. आतां पेशव्यांच्याबद्दल हळहळणाऱ्या व त्यांच्याबद्दल मनांत आदर बाळगणाऱ्या मराठ्यांचें सांत्वन करण्याकरितां इंग्रजांनीं सातारकरांच्या पेशवाईचीं वस्त्रें व अधिकार धारण करण्याचें सोंग करण्यास सुद्धां मागें पुढें पाहूं नये ! अशा तऱ्हेनें पेशव्यांचा पूर्णपणें नायनाट झाल्यावर मग पूर्वीच्या वचनाप्रमाणें सातारकर पेशव्यांच्या ताब्यांतील मुलूख मागतील. तसें तें करूं लागले म्हणजे मग त्यांस नाना तऱ्हेच्या युक्त्या प्रयुक्त्या करून फसवावें व आपला कार्यभाग तडीस न्यावा. ”

वरील मन्रोच्या पत्रांत कोणत्याहि तऱ्हेचा आडपडदा नाहीं. नांदीपासून भरतवाक्यापर्यंत इत्थंभूत सर्व नाटक कसें रंगवावें याच्या सूचना मन्रोनें दिल्या आहेत. एल्फिन्स्टननें ही सर्व कामगिरी इतकी चोख बजाविली कीं, त्याचें हें सर्व कारस्थान तडीस जाईतोंपर्यंत त्याच्या वागणुकीबद्दल शंका किंवा कांहीं विकल्प असा कोणाच्याहि मनांत आला नाहीं. साताराचे महाराज व त्यांचे मंत्रिमंडळांनीं त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकला. इतकेंच काय; पण रावबाजीनें इंग्रजांशीं युद्ध पुकारल्यानंतर त्याच्याविरुद्ध एल्फिन्स्टनच्या सांगण्याप्रमाणें स्वतःच्या प्रजेस उद्देशून खालीलप्रमाणें जाहीरनामा काढला व सर्व मुलूखभर दवंड्या देण्यांत आल्या.

“ बाजीराव रघुनाथपंत पेशव्यास त्याच्या गैरवर्तनाबद्दल पेशवे पदावरून दूर करण्यांत आलें आहे. त्यानें इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारून मुलुखांत पुंडावा व धामधूम माजविली आहे. तरी त्यास सातारकरांच्या प्रजेनें अगर सरदार जहागिरदारांनीं कोणत्याही तऱ्हेची मदत करूं नये. याविरुद्ध जो कोणी पेशव्यांस मदत करील तो राजद्रोही समजला जाईल. त्याचें इनाम व उत्पन्न सरकारजमा करण्यांत येईल. ”

———

छत्रपति आणि पेशवे यांचे परस्पर संबंध : २

मराठी स्वराज्याचें साम्राज्यांत रूपान्तर करणारा पेशवा निमकहराम ठरला. त्यानें कंपनी सरकारशीं सामना चालू केल्यानें तो सातारकर छत्रपतींचा शत्रू ठरून त्यास मदत करणें हा राजद्रोह समजला गेला. इतकेंच नव्हे तर तसे जाहीरनामेही काढण्यांत आले. गोष्टी इतक्या थराला आल्या याचें कारण काय तर स्वार्थ. विनासायास ऐश्वर्य आणि आराम कोणास नको ? पोटांतील पाणी न हालवितां साम्राज्यांचे धनी म्हणून मिरवावें व मनास मानेल तशी दौलत उधळतां यावी असा सातारकर छत्रपतीचा (!) सातारकर छत्रपतिचा म्हणण्यापेक्षां त्याच्या भोंवतालीं वावरणाऱ्या जाणत्या मंडळींचा मुख्य हेतु होता. त्यांस तो कोणत्या ना कोणत्या उपायांनीं साधावयाचा होता. रणांगणांत समशेर शिकंदर केल्याशिवाय साम्राज्याचा धनी म्हणून मिरवितां येत नाहीं. तसेंच स्वतःच्या संपत्तीची चाहील तशी उधळपट्टी करूनही पण स्वतःचा दिमाख तेजस्वी दिसत नाहीं. त्यांत नाट्य दिसतें. या सर्वांस अतुल पराक्रमाची जोड लागते. म्हणजे मग सम्राटांचे मुजरे व इंद्राचें वैभव पायावर लोळण घेतें. हें कटु सत्यें सातार-दरबारच्या कानींही नव्हतें मग तें कृतींत कोठून उतरणार ?

साहेबांशीं सख्य करून सम्राटाची सत्ता व कुबेराची संपत्ति आपणास मिळेल असें महाराज मंडळास वाटलें आणि त्यांच्याशीं मैत्री करण्याचा घाट त्यांनीं घातला; पण हें करतांना आपण काय कमावतों व काय गमावतों याची

त्यांस कल्पना नव्हती. साहेबाचा एकंदर रुबाब, त्याची लाघवी भाषा, यांनीं सातारकरांस मोहून टाकलें. रंगो बापूजींच्या प्रत्येक भेटींत ' महाराज सबका धनी आहे ' ' महाराज सबका धनी आहे, ' म्हणणारा एल्फिन्स्टनसाहेब पोटांत एक आणि ओंठांवर दुसरेंच असें दुटप्पी वर्तन करीत आहे, याची जाणीव सातारकर मंडळी, खुद्द छत्रपति यांना झाली नाहीं. एल्फिन्स्टनशीं संधान बांधून स्वराज्य आणि स्वातंत्र्य कमविणें तर दूरच राहिलें; पण त्यांनीं त्याचे हातावर हिंदुपद-पादशाहीचें उदक सोडलें असेंच मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें आणि या दानाची सिद्धता रंगो बापूजी, बलवंत मल्हार व हनुमानस्वामी चाफळकर यांनीं केली.

सातारकर व पेशवे यांचे संबंध दरबारी थाटाचे होते. त्यांत राजकारण होतें; पण जिव्हाळा नव्हता. तरी पेशव्यांच्या मनांत सातारकरांसंबंधीं आपलेपणा होता, कृतज्ञता होती, म्हणून त्यांची मानमान्यता व योगक्षेम नीट चालावा याची ते काळजी घेत. पेशव्यांच्या भाग्याचा उगम छत्रपतींपासून होता. तें भाग्य पेशव्यांनीं आपल्या कर्तबगारीनें शिगेस पोंचविलें. तसेंच छत्रपति आपली कुवत जाणून होते. पेशव्यांचा आटोप आणि कर्तृत्व पाहून छत्रपतींसही धन्यता वाटे आणि तेही पेशव्यांबद्दल आपलेपणा दाखवीत. पण पुढें पुण्यास पेशव्यांच्या घराण्यांत भानगडी सुरू झाल्या त्याची झळ सातारकर छत्रपतींना बसूं लागली आणि हे संबंध दुरावत चालले.

माणसाची कर्तबगारी त्याला पिढ्यान् पिढ्या उपयोगी पडत नाहीं. वडिलांचीं कीर्ति सांगून स्वतःच्या मिशाला पीळ भरणें नेहमींच साधतें असें नाहीं. वाडवडिलांच्या पराक्रमाला स्वतःच्या पराक्रमानें उजळा द्यावा लागतो म्हणजे तें विभूतिमत्व झळाळत राहतें व मग कोणाचीहि छाती पायरीस पाय लावण्याची होत नाहीं. काळ्या कभिन्न रात्रीं आकाशांत एखादाच बाण सनाट्टन चमकावा म्हणंजे त्याच्या तेजोवलयानें डोळे दिपून जातात. तसेंच भोंसले कुलाचें झालें. शिवाजी महाराज शककर्ते झाले व त्यांच्यानंतर त्यांच्या कुलांत त्यांच्या तोडीला बसेल असा महापुरुष झाला नाहीं त्यामुळें सातारच्या गादीवर अभिषिक्त राजा म्हणून विराजमान होणाऱ्या व्यक्तीच्या नशीबीं कारागृहवास,तेजोभंग

व अपमान हे प्रसंग येऊं लागले. छत्रपतींना कैदखाना प्रथम ताराबाईनें दाखविला व हीच प्रथा कमीजास्त प्रमाणांत व प्रसंगानुरूप पुढें चालू झाली. तेव्हां सातारकरांचा अपमान किंवा कुचंबणा हा प्रकार नव्यानें नव्हता. तरीपण त्यांचा दरबारी मोठेपणा कायम होता. पेशव्यांना पेशवाईचीं वस्त्रें हीं छत्रपतींनींच देण्याचा राबता शेवटपर्यंत होता.

रावबाजी स. १८०७ मध्यें कार्तिक स्वामीचे यात्रेस गेला होता. तेव्हां माघारी येतांना सातार्‍यास छत्रपतींना भेटून निखालसता करावी या हेतूनें तो माहुलीस आला. आपण भेटीस आल्याचें "महाराजांस सांगून पाठविलें तेव्हां 'महाराजांची शरीरप्रकृति नीट नाहीं, आमचे भेटीचें कारण नाहीं' असें सांगून त्रिवर्गपुत्र व माईसाहेब यांस माहुलीस प्रधानाचे भेटीस रवाना केलें. ही भेट झाली व या भेटींत बाजीरावानें अधिक खर्चाचा बंदोबस्त करून दिला." अशा तर्‍हेनें छत्रपतींचें—दुसर्‍या शाहूचें—प्रतापसिंहाच्या पिताजींचें मन प्रसन्न करण्याचा प्रयत्न बाजीरावानें केला. त्यानंतर लौकरच ता. ४—५—१८०८ रोजीं शाहू दिवंगत झाला. त्याबरोबर दहन किल्ल्यावर करावें, माहुलीस नेऊं नये असें खुसपट कारभारी लोकांनीं काढिलें. कोठावळ्याचें पोट दुखतें म्हणतात तें असें. त्याबरोबर साहजिकच माईसाहेब व प्रतापसिंह यांना राग आला व त्यांनीं हट्टानें दहन माहुलीस केलें. तेराव्या दिवशीं प्रतापसिंहास राज्याभिषेक करण्यांत आला. आपला शिक्का फिरेल म्हणून प्रतापसिंहाचें नांव राजदरबारीं शाहू असेंच जबरदस्तीनें चालू ठेवण्यांत आलें. क्रांतीच्या वेळीं जबरदस्ताचा न्याय सारखाच चालू असतो. जो तो आपलें तट्टू सुक्तासुक्त विचार न करतां पुढें दामटत असतो. आपला शिक्का बदलण्याची आपत्ति टाळण्याकरितां बाजीरावानें नांवाची सक्ति छत्रपतींवर केली. शिक्का बदलेल म्हणून नांव न बदलण्याची ही सक्ति रावबाजींच्या बाबतींत नाना फडणिसानेंही पेशव्यांवर केली होती; पण राज्याभिषेकाचा समारंभ मात्र थाटाचा झाला. प्रतापसिंहास वयाचे सोळाव्या वर्षीं राज्याभिषेक झाला. या मंगल प्रसंगानिमित्त षोडशदानें ब्राह्मणवृद्धांस वांटण्यांत आली. गोरगरिबांस अन्नसंतर्पण करण्यांत येऊन मोठा दरबार भरविण्यांत आला. त्यांत छत्रपतींचे मोठमोठाले मानकरी, महाडीक, मोहिते, शिर्के वगैरे मंडळी जमा झांली होती. पेश-

त्यांच्याकडून त्रिंबकजी डेंगळा नजराणा घेऊन आला होता. नजराणे देण्या-घेण्याचा समारंभ झाला. यानंतर बाजीराव रघुनाथ पेशवा हा वांई मुक्कामीं होता. त्याजकडे शिक्के कट्यार, जरिपटका, पेशवाईचीं वस्त्रें व अलंकार हुजऱ्यांमार्फत पाठविण्यांत आले. नंतर पेशवा वांईहून निघून संगम माहुलीस डेरे घेऊन दाखल झाला. नंतर दुसऱ्या दिवशीं संगम माहुलीहून मोठ्या समारंभानें शाहूमहाराजांचें म्हणजेच प्रतापसिंह महाराजांचें दर्शन घेण्यासाठीं निघाला. या वेळीं छत्रपतींचा मान राखण्यासाठीं म्हणून पूर्वपरंपरेस अनुसरून बाजीरावानें नगारे, नौबदी बंद ठेवल्या होत्या व रुमालानें हात बांधले होते. तिकडून प्रतापसिंह महाराजांचीहि स्वारी निघाली. उभय स्वाऱ्या समोरासमोर येतांच पेशव्यांनीं छत्रपतींस नजराणा नजर करून पायावर मस्तक ठेविलें. नंतर महाराज सरकारांचें मोरचल हातांत घेऊन पेशवा अंबारींत पाठीमागें खवासखान्यांत बसला. स्वारी चालू झाली. सर्व मिरवणूक रंगमहालाचे वाड्यावरून निघून जुन्या राजवाड्यांत आली. तेथें मोठा दरबार भरविण्यांत येऊन छत्रपति प्रतापसिंह महाराजांस सिंहासनावर बसविण्यांत आलें. बाजीराव पेशवे मुख्य प्रधान व इतर अष्ट प्रधान, मानकरी, जहागिरदार व इनामदार, तसेंच फलटणकर, निंबाळकर, अक्कलकोटकर, भोंसले, डफळे, माने, थोरात वगैरे मानकऱ्यांनीं प्रतापसिंहांस मानाचे मुजरे केले. नाना तऱ्हेचे नजराणे अर्पण केले. नंतर ज्याचे त्यास भेटी व नजराणे अनुक्रमें परत करण्यांत आले. किल्ल्या किल्ल्यानिहाय खुशीच्या तोफा डागण्यांत आल्या. अशा तऱ्हेनें हा राज्यारोहणसमारंभ मोठ्या थाटानें पार पडला व तन्निमित्त जमा झालेली सर्व सरदार जहागिरदार मंडळी आपआपल्या ठिकाणीं निघून गेली.

मराठ्यांची दौलत या वेळीं सर्व बाजूंनी खिळखिळी झाली होती. मुख्य ठिकाणीं वावरणारे सत्ताधारी नरेश नालायक होते. नागपूरच्या गादीवर वेडा परसोजी होता तर होळकरांच्या गादीवर खुळा काशीराव नांदत होता. तसेंच साताऱ्याच्या गादीवर दुसऱ्या शाहूचें कळसूत्री बाहुलें होतें. पुण्यास विजवटा रावबाजी पेशवेपदास बदलौकिकाचा काजळी फांसत होता. सामर्थ्यवान् दौलतराव शिंदा नाच–तमाशांत दंग होता; पण या प्रमुख व्यक्तींच्या नंतर अप्पासाहेब भोसले

—नागपूरकर, यशवंतराव होळकर—इंदूरकर, चतुरसिंग भोसले—सातारकर, अमृतराव पेशवे—पुणेंकर हीं नांवें डोळ्यांत चटकन् भरतात व त्यांचे खटाटोप पाहिले म्हणजे वाईट वाटतें. ही मंडळी प्रमुख ठिकाणीं असती तर त्यांनीं मराठ्यांच्या इतिहासास खात्रीनें निराळें वळण लावलें असतें. हा विचार चित्तांत भरल्यावांचून रहात नाहीं. सातारकरांची गादी बाजीरावाच्या कारकीर्दींत गाजली त्याचें कारण चतुरसिंग भोंसले. या पुरुषाचा पराक्रम भोंसले कुलास सामान्यपणें शोभण्यासारखा आहे.

अपमानाच्या काठीनें डिवचल्याशिवाय स्वाभिमानींचा भुजंग जागा होत नाहीं आणि आपला फणा उभारीत नाहीं. चतुरसिंग भोंसले हा साताऱ्च्या वातावरणांत लहानाचा मोठा झाला. नांव मोठें व लक्षण खोटें अशी ती सातारकर छत्रपतींची स्थिति पाहून त्याच्या अतःकरणाचा तिळपापड होई. मराठ्यांच्या रियासतींत सातारकरांचा मान मोठा; पण त्याला मनगटाची जोड नसल्यामुळें त्यांची गळचेपी चालू होती व त्या असह्य यमयातनांत छत्रपति आपलें आयुष्य कंठीत होते. ही गोष्ट चतुरसिंगाच्या हृदयास सारखा पीळ पाडीत असे. तेव्हां त्यानें छत्रपतींच्या गादीस पूर्वीचें वैभव व सत्ता प्राप्त करून देण्याचा कृतनिश्चय केला. चतुरसिंग भोंसले हा विठोजी भोंसल्याचा वंशज. विठोजीच्या आठ मुलांपैकीं नागोजी हा एक होता. या नागोजीचा मुलगा रावजी ऊर्फ काकाजी हा वावी येथें राहात असे. काकाजीचा नातू त्रिंबकजी यास तीन मुलगे—विठोजी, परशुराम, आणि चतुरसिंग. यांपैकीं वडील विठोजी हा स. १७७७ त सातारकर छत्रपति राजाराम यांस दत्तक गेला व धाकटा शाहू या नांवानें साताऱ्च्या गादीवर विराजमान झाला. तेव्हां त्याच्याबरोबर चतुरसिंग हा साताऱ्यास राहूं लागला. मधला परशुराम याचा वंश हल्लीं वावीस नांदत आहे.

धाकटा शाहू तसा सामान्य व निर्बुद्ध गृहस्थ होता. त्याचें आयुष्य सातारा जिल्ह्यांत अटकेदाखल असेंच गेलें. पुण्यांत पेशव्यांचें गाडें नीट सुरळीत चाललें होतें तोंपर्यंत हा निर्धास्त होता व पेशव्याविरुद्ध उठण्याचें त्याच्या मनानें कधींच घेतलें नाहीं. सवाई माधवरावाच्या मुंजींत व लग्नांत तो पुण्यास स्वतः जातीनें गेला. त्यानें त्या समारंभांत मोठ्या उत्साहानें भाग घेतला.

पुढें सवाई माधवराव अपघाती मरणानें मेला आणि पुणें दरबारीं घटके घटकेला नवीन बनाव बनूं लागले. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर पेशवे घराण्यांत पेशवेपदास लायक मनुष्य राहिला नाहीं. दत्तकविधानांनीं दुसरा लायक पेशवा निर्माण करणें हेंही शक्य झालें नाहीं. कारण त्यासाठीं नानांनीं केलेल्या खटपटी खटपटीच ठरल्या व दिवटच्या रावबाजीस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. पेशवेपद हातीं येतांच रावबाजीचा आनंद गगनांत मावेना. त्यास आपण थोरल्या बाजीरावाप्रमाणें पराक्रम गाजवूं असें वाटूं लागलें. त्या आनंदाच्या भरांत त्यानें शाहू महाराजांस वचन दिलें कीं, 'आपणांस थोरल्या शाहूमहाराजा-प्रमाणें सर्व अधिकार देऊन मी थोरल्या बाजीरावाप्रमाणें पराक्रम व सेवा करून वैभव वाढवीन.' पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं वचन देणारा आणि वचन ऐकणारा हे दोघेही थोरले शाहू अगर थोरले बाजीराव नव्हते. ते दोघेही धाकटे होते आणि धाकटेच राहिले. गादीवर आल्याबरोबर नानास अधिकारावरून काढण्याचें शतकृत्य बाजीरावानें केलें व तसें छत्रपतीस कळविलें. त्या वेळीं सातारा, प्रतापगड, रायगड, लोहगड वगैरे किल्ल्यांवर नानाची हुकमत होती. ती नाहींशीं करून नानाचे हुकूम कोणीही मानूं नयेत अशी ताकीद बाजीरावानें दिली. सातारा किल्ला, शाहूनगर, खुद्द छत्रपति व त्यांचें कुटुंब यांच्यावर नानाची सक्त नजर होती व त्यांच्या बंदोबस्तासाठीं बाबुराव कृष्ण आपटे व सदाशिवपंत अभ्यंकर हीं दोन आपल्या विश्वासांतील माणसें नानांनीं ठेविलीं होतीं. त्या दोघांस कैद करून किल्ल्याचा बंदोबस्त आपणाकडे घेण्याबद्दल बाजीरावानें छत्रपतींस कळविलें. रावबाजीकडून ही सांगी येतांच छत्रपतीही या कामास तावडतोब उद्युक्त झाले. लगेच त्यांनीं सगेसोयरे व मानकरी मिळून शंभर लोक भोजनास किल्ल्यावर बोलाविलें. त्यास बरोबर घेऊन छत्रपतींनीं शहरांत बाबाराव आपट्यांचे वाड्यावर छापा घातला. त्या झटापटींत बाबारावांचा पुतण्या वामनराव यानें शिपाईगिरीची शर्थ केली. जखमा झाल्या, एक तलवार पडली तरी दुसरी आणून चाल केली तेव्हां महाराज बोलले, 'तुझी शिपाईगिरीची शर्थ झाली, या उपर मारला जाशील' तेव्हां त्यानें पायावर डोई ठेविली. महाराजांनीं बाबूराव व सदाशिवपंत यांस कैद

करून किल्ला व शहर ताब्यांत घेतलें आणि व्यंकोजी मोहिते याच्या हाताखालीं दोन हजार जमाव देऊन त्यास शहरच्या बंदोबस्तास ठेविलें. सातारकर छत्रपतींनीं एवढी उभारी दाखविली आणि शहरावर अंमल चालू केला; पण पैशावांचून ते हैराण झाले, बेजार गतीस आले. तरी सुद्धां धीर न सोडतां त्यांनीं तशीच जमवाजमव चालविली. या कामीं पुढाकार घेणारा चतुरसिंगच होता. त्यानें बापूजी महाडिक, भवानजी शिर्के व व्यंकोजी मोहिते वगैरे मंडळींच्या साहाय्यानें साताऱ्यास मोठें अनुकूल वातावरण निर्माण केलें.

साताऱ्यास छत्रपतींचा अंमल जारी झालेला पाहतांच बाजीराव अत्यंत चिंताक्रांत झाला. त्यानें शिवराम नारायण थत्ते यास साताऱ्यास पाठविलें; व त्याच्या स्वाधीन किल्ला करण्याबद्दल छत्रपतींना लिहिलें. पण छत्रपतींनीं त्यास जुमानलें नाहीं. तेव्हां बाजीरावानें माधवराव रास्ते यास या कामावर पाठविलें. इ. स. १७९८ च्या एप्रिलांत रास्ते साताऱ्यास पोहोंचला. वेण्णेच्या पलीकडे मुख्य फौज ठेवून माधवराव रास्ते शाहूनगरांत पेशव्यांच्या वाड्यांत उतरला. छत्रपतींची व रास्त्यांची भेट झाली; पण छत्रपतींनीं एकीकडे वाटाघाटींत कालहरण चालविलें व दुसरीकडे दौलतराव व सर्जेराव यांच्याकडून कुमक मागविली. सर्जेरावानें फौज पाठविण्याचें कबूल केलें आणि नेटानें लढण्याबद्दल छत्रपतींस सुचविलें. घाडग्यांकडून असें प्रोत्साहन मिळतांच छत्रपतींना जोर चढला व त्यांनीं रास्त्यांस साफच कळविलें कीं तुम्ही सातारा सोडून जा, नाहीं तर तलवारीला तलवार भिडेल. हा निरोप घेऊन थत्ते पुण्यास परतला. तेव्हां बाजीरावानें छत्रपतींशीं तडजोड करण्यासाठीं कृष्णराव तात्या जोशी यांस पाठविलें. पण ता. १६-६-१७९८ रोजीं हें प्रकरण हातघाईस आलें. छत्रपतींच्या लोकांनीं किल्ल्याखालीं येऊन चढाई केली व रास्त्यांच्या लोकांस शहरांतून हुसकून लाविलें. रास्ते चीजवस्त टाकून निघून गेला. शहरांत महाराजांनीं चौक्या बसविल्या. रास्त्यांनीं तोफा चालविल्या पण इलाज चालला नाहीं. सातारकरांचा जोर पाहून रास्त्यांनीं वेण्णेच्या कांठचा तळ उठवून मागें कृष्णेच्या अलीकडे आणिला व परशुरामभाऊंस फौजेसुद्धां धाडाल तरच हें अरिष्ट टळेल असें

बाजीरावास खडखडीत कळविलें. हें ऐकतांच बाजीरावाची घाबरगुंडी उडाली व काय करावें हेंच त्यास कळेना. या वेळीं भाऊ कैदेंत होता; पण त्याला सोडणें त्याच्या जिवावर आलें. कारण भाऊ त्याचा शत्रु होता. पण शिंदे, अमृतराव वगैरे लोक त्यास सोडण्यास अनुकूल होते. तेव्हां त्याचा नाइलाज झाला व ना हो करतां करतां असें ठरलें कीं, भाऊनें वीस लक्ष रुपये गुन्हेगारीबद्दल भरावे. रकमेचा भरणा होईपर्यंत कैदेंतच आहोंत असें समजावें. तूर्त सातार्‍यास जाऊन रास्त्यास मदत करावी, सातारचें काम आटोपल्यावर दंड न भरल्यास रास्त्यानें त्यास आणून श्रीमंतांसमोर हजर करावें. असा करार ठरून ता. १६-६-१७९८ रोजीं परशुरामभाऊ सातार्‍यास निघाला. २५ जून रोजीं परशुरामभाऊची व रास्त्यांची भेट वंदन किल्ल्याच्या खालीं झाली. त्या वेळीं उभयपक्षीं मोठी खुशाली झाली. भाऊ सुटल्याचीं पत्रें देशांत जातांच त्याची फौज त्याच्या भोंवतीं जमा झाली आणि फौजबंद भाऊची चाल सातार्‍यावर होण्याचा रंग दिसूं लागला. आतांपर्यंत पेशव्यास हतबल करण्याचा प्रयत्न छत्रपतींनीं चालविला होता. त्यांनीं त्या कामासाठीं बेरड लोक नोकरीवर ठेवून पेशव्यांच्या फौजेचा उच्छेद आरंभिला होता. असें जरी होतें तरी शिंद्यांची किंवा कोल्हापूरकरांची फौज आल्याशिवाय सातारकरांचा निभाव लागणें शक्य नव्हतें. तसेंच सातारकरांजवळ पैसा नव्हता व कसलेलें लष्करही नव्हतें. त्यांनीं बंडावा चालविला होता; पण तो केवळ देखावा होता. त्यांत तथ्य नव्हतें. ते जिकीरीस आले होते. मदत धाडण्याबद्दल त्यांनीं निर्वाणीचीं पत्रें कोल्हापुरास पाठविलीं होतीं. कोल्हापूरकरांनींही कुमक पाठविली होती, पण ती कर्‍हाडला अडकल्यामुळें पुढें येत नव्हती. याच सुमारास सर्जेरावांस कैद झाल्यानें शिंद्यांकडील मदतीची आशा संपली. अशा प्रकारें छत्रपतींची निराशा दुणावत गेली.

जुलै महिन्यांत भाऊ व रास्ते यांनीं आपली जमवाजमव केली आणि त्या उभयतांनीं मिळून ऑगस्टच्या प्रारंभीं सातार्‍यावर हल्ला चढविला. ता. ४ ऑगस्टला लढाईस तोंड लागलें. जोराची खणाखणी झाली. छत्रपतींच्या लोकांना ठोकून त्यांनीं शहरांत घातलें. या झटापटींत सातारकर छत्रपतींची भयंकर हानी झाली. तेव्हां त्यांनीं सलूखाचें बोलणें चालविलें. पण समेटाचें बोलणें चालूं करून करवीरकरांची

कुमक येईपर्यंत काल काढण्याचा त्यांचा बेत होता. पण तो साधला नाहीं. कारण ता. ९ ऑागस्टला तीन टोळ्या करून रात्रीं भाऊनें शहराची नाकेबंदी केली व चौक्या बसविल्या. त्याबरोबर महाराज निघून किल्ल्यावर गेले. व्यंकोजी मोहिते व चतुरसिंग भोसले चालून आले. लढाई झाली, त्यांत मोहिते पडले. चतुरसिंग व भवानजी शिर्के बचावून कोल्हापूरकडे जाऊं लागले. त्यांचा पाठलाग हरी परशुरामानें केला व वसंतगडाखालीं त्यांचे पुष्कळ लोक पाडाव केले. पण त्यांतून ते दोघे निसटले व कोल्हापुरास पळून गेले. परशुरामभाऊनें शाहूनगर लुटलें. तक्ताची अमर्यादा केली; किल्ल्याखालीं तळ दिला. आणि महाराजांशीं बोलणें लाविलें. इतक्यांत पुण्याच्या राजकारणास उलट रंग चढून शिंद्यांच्या कैदेंतून नानाची मुक्तता झाली. आणि पुन्हां साताऱ्याचा बंदोबस्त बाजीरावानें नाना फडणिसाकडे दिला. त्याबरोबर साताऱकरांच्या चढाईचा जोर संपला. रास्त्यांनीं किल्ला घेण्याचा सिद्धान्त केला. राजारामाची स्त्री (छत्रपतींची दत्तक आई) आईसाहेब हिनें महाराजांस न कळवितांच खालीं येऊन रास्त्यांशीं ठराव केला व त्यांचे लोक किल्ल्यांत घेतले. बरेच दिवस बोलाचालींत गेले. ता. ३१–८–१७९८ ला आईसाहेब भाऊंच्या भेटीस आल्या. बोलणें होऊन करार ठरला. महाराजांचे माणूस खालीं उतरून रास्त्यांनीं आपले वर चढविले. कोल्हापुरास पळून जाण्याचा महाराजांचा बेत होता तो भाऊनें हाणून पाडला. साताऱची व्यवस्था रास्त्यांकडे सोंपवून, बाजीरावाकडे दंडादाखल दहा लाख रुपये भरून भाऊ मुक्त झाला. अशा प्रकारें छत्रपतींचें प्रकरण निकालांत निघालें.

साताऱकरांनीं केलेला उठाव अशा तऱ्हेनें जागच्या जागीं जिरून गेला. त्यांचा सपशेल पराभव झाला तरी सुद्धां आपण केव्हां तरी पेशव्यांवर मात करूं असें साताऱकर छत्रपतींस वाटत होतें. त्याचें कारण चतुरसिंग भोंसले. तो मोठा कल्पक व धाडसी होता. रास्ते व पटवर्धन यांच्याशीं लढतां लढतां त्यांना चकवून चतुरसिंग भोंसले व भवानजी शिर्के बाहेर पडले. ते ऑगस्टांत कोयनेपार होऊन करवीरच्या फौजेंत मिळाले. तेथें त्यांनीं साताऱकरांसाठीं एकसारखी खटपट चालू ठेविली. चतुरसिंगाचा हा खटाटोप पाहून असें वाटतें कीं,

तो साताऱ्च्या खास गादीवर प्रत्यक्षपणें राज्य करीत असता तर त्याच्या या दीर्घोद्योगास निराळेंच तेज चढलें असतें.

तथापि यशवंतराव होळकराच्या मानानें चतुरसिंग फिका पडतो. कारण यशवंतरावाचा दर्जा चतुरसिंगाप्रमाणें दुय्यम असून सुद्धां त्यानें आपल्या पराक्रमानें इंग्रजांस दिपविलें. चतुरसिंगाची खटपट मात्र स्पृहणीय होती यांत शंका नाहीं. यानें आपल्या उमद्या स्वभावानें सातारकर मंडळींत नवचैतन्य निर्माण केलें. सातारा आणि करवीर येथील राजमंडळी व लहानमोठे लोक त्यास साहाय्य करूं लागले. व्यासराव गोपाळ डबीर, बापू कान्हो फडणीस, मल्हार रामराव चिटणीस, मुंगीकर मालोजी राजे, भवान राजे शिर्के व रघुनाथराव गुजर वगैरे मंडळी या चतुरसिंगाबरोबर तळहातावर शीर घेऊन वाटेल ते कष्ट उपसण्यास तयार झाली. चतुरसिंगाची ही कर्तबगारी पाहून सर्जेराव घाडग्यानें त्याला १८०१ त सरदारी देण्याचा प्रयत्न केला. बाजीराव व दौलतराव या उभयतांची व त्याची भेट झाली. चतुरसिंगाचा मुक्काम पुण्यांत चार महिने झाला. पण बाजीराव, दौलतराव व सर्जेराव यांच्या सैतानी लीलांचा त्याला वीट आला व तो दसऱ्याच्या सुमारास पुणें सोडून विजापुराकडे निघून गेला. हजार–पांचशेंचा जमाव त्याच्या बरोबर नेहमींच असे.

यानंतर एक मोठी चमत्कारिक घटना घडून आली. यशवंतराव होळकरानें पुण्यावर हल्ला करून हडपसरच्या लढाईंत शिंद्यांच्या फौजेचा मोड केला व पुण्याचा ताबा घेतला. त्याबरोबर बाजीराव घाबरला व त्यानें वसईस पळ काढला आणि साहेबाचा आश्रय केला. त्यानें त्या धांदलींत घाबरून वसईचा तह केला. या तहानें सर्व मराठी दौलतदारांना चपराक बसल्यासारखें झालें व जो तो ठणाणूं लागला. त्याचें वैषम्य सातारकरांनाही वाटलें; त्यांतल्या त्यांत चतुरसिंग अंधारांत जिवाणू पाहून मनुष्य जसा ताडकन् उठतो तसा उठला व क्षणाचाही विलंब न करतां उद्योगास लागला. त्यानें आपलीं मुलें माणसें महाराजांच्या हवालीं केलीं आणि सेवा करून यश मिळवून परत येऊं अगर मरून जाऊं असें सांगून छत्रपतींचा निरोप घेतला आणि खरोखर आपलें ईप्सित साधण्यासाठीं त्यानें समंध हिंदुस्थान पालथा घातला.

चतुरसिंगानें शिंदे–होळकरादि सर्व सरदारांच्या गांठी घेतल्या. त्यांच्याशीं प्रस्तुत संकटांतून मुक्त होण्यासाठीं कोणत्या मार्गाच्या अवलंब करावा याची मोकळ्या मनानें चर्चा केली. इ. स. १८०३ च्या उन्हाळ्यांत या कार्यासाठीं त्यानें सातारा सोडला. प्रथम शिंद्याची गांठ घेण्याचें त्यानें ठरविलें व आपला मोर्चा अजिंठ्याच्या घाटाकडे वळविला. तेथें दौलतराव व सर्जेराव यांच्या त्यानें गांठीं घेतल्या. दौलतराव आपण होऊन चतुरसिंगाच्या डेऱ्यास गेला व त्यास मोठ्या मानसन्मानानें भेटला. वसईच्या तहानंतर इंग्रजानें आपली चाल मोठ्या झपाट्यानें चालू केली. त्यानें आपले फांसे सर्व हिंदुस्थानभर पसरले होते. पेशव्यांचें सावज त्यांत अडकल्याबरोबर आपण बाकीच्यांना ताबडतोब आवळूं अशी त्यास खात्री होती. पेशवा अडकल्याबरोबर हें प्राणसंकट आतां शिंद्यांच्याही मागें लागलें होतें. चतुरसिंगाची आणि शिंद्यांची गांठ पडली त्याच्या आदल्याच दिवशीं इंग्रजांनीं शिंद्यांशीं युद्ध पुकारलें होतें. आसई, आडगांव वगैरेच्या लढायांत चतुरसिंगानें प्रत्यक्ष रणांगणावर जातीनें भाग घेऊन इंग्रजांचा पराभव करण्याची शिकस्त केली. परंतु या वेळीं मराठ्यांचे फांसे उलटे पडावयाचे हेंच विधिलिखित असल्यानें सर्वच दिङ्‌मूढ झाले व पराभव पदरीं आला. त्याबरोबर मराठी साम्राज्य बेचिराख झालें, त्याची राखरांगोळी झाली, आपण निर्माल्यवत् झालों असें वाटून प्रत्येक पराक्रमी सरदार हळहळूं लागला. त्याच्या डोळ्यांतून उद्वेगाच्या व संतापाच्या ठिणग्या बाहेर पडल्या. वसईच्या तहानें सर्वांचें वाटोळें झालें.

मराठी दौलतदारांमध्यें अतुल बलशाली व फौजबंद सरदार म्हणजे शिंदे व होळकर. पण त्यांना आकाबाई आठवली आणि त्यांनीं एकमेकांशीं प्राणान्तिक युद्धें करून स्वतःचें सामर्थ्य खलास केलें. मग साहजिकच या बलहीन सरदारांना इंग्रजांच्या अल्पसंख्यांक फौजेनें एकेका दमांत उखाड दिली. हा देखावा पाहून तर चतुरसिंगाचें अंतःकरण होरपळून निघालें. स्वतःच्या सामर्थ्याचा असा अपहार होऊं न देतां आम्ही जर इंग्रजांशीं एक-दिलानें धडक दिली तर एकादा मावळा नुसत्या टिकारण्यानें घरांत घुसलेलें वाघरूं हुसकून लावतो, त्याप्रमाणें टोपीकरांस आम्ही उधळून लावूं असें चतुर-

सिंगास यथार्थ वाटे. पण ही वाऱ्याची मोट बांधावी कशी हाच काय तो प्रश्न होता. आणि चतुरसिंग त्याला जमेल तसा हा निर्वाणीचा प्रयत्न करीत होता. युद्धाचें वातावरण जरा निवळल्यावर तो नागपुरास गेला. तेथें त्यानें रघूजी भोंसल्याची गांठ घेतली. रघूजीनेंही पण त्यास मोठ्या आदरानें वागविलें. त्याची महत्त्वाकांक्षा व थोर विचार पाहून रघूजींस मोठी धन्यता वाटली व त्यानें त्यास दरमहा पंधरा हजारांची नेमणूक देऊन ठेवून घेतलें. तेथें तो दहा महिने राहिला. त्या वेळीं दौलतराव शिंदे सागराकडे होता. दौलतरावानें चतुरसिंगास मुद्दाम निमंत्रण पाठवून बोलाविलें. तेव्हां चतुरसिंग दोन हजार फौजेनिशीं निघाला तो १८०५ च्या वैशाखांत जबलपूर–सागरावरून चंबळ नदीचे कांठीं यशवंतराव व दौलतराव या उभयतांचा मुक्काम एकत्र असतां त्या ठिकाणीं दाखल झाला. येथें पुढील धोरणांचा विचार करण्याकरितां बऱ्याच मोठमोठाल्या मंडळींचा जमाव जमला होता.

शिंदे–होळकर, अमीरखान व करीमखान वगैरे पेंढारी सरदारमंडळी पुढील बेतासाठीं जमा झाली होती. शिंदे व होळकर दोघेही चतुरसिंगाच्या गोटांत गेले व त्यांनीं त्याची सन्मानानें गांठ घेतली. सर्वांची खूपच मोकळ्या मनानें चर्चा झाली. सर्जेराव घाडगेही तेथें होताच. त्यास छत्रपतीस सोडविण्यासंबंधीं तुम्ही पूर्वीं करार काय केले आणि वर्तणूक कोणत्या प्रकारची झाली वगैरे खोंचक प्रश्न करून चतुरसिंगानें फजीत केलें. नंतर पुढील उद्योगाच्या हालचाली सुरू झाल्या. यशवंतराव, सर्जेराव व चतुरसिंग अजमिरास गेले. यशवंतराव होळकराच्या धाडसी वृत्तीबद्दल चतुरसिंगास फारच आदर वाटे. इंग्रज सेनापति लॉर्ड लेक हा त्या वेळीं दिल्लीस होता. त्याकडे आपले वकील चतुरसिंगानें पाठविले. भरतपूरच्या जाटाची गांठ घेतल्यानंतर तो स्वतः दिल्लीस दाखल झाला. तेथें लेक आणि माल्कम यांची मुलाखत झाली. या वेळीं इंग्रजांकडून सरदारी मिळण्याचा संभव होता; पण या मानी पुरुषानें त्या तऱ्हेची भाषाच केली नाहीं. तो दिल्लीहून इ. स. १८०६ च्या जुलै महिन्यांत परतला व पुष्करास यशवंतराव होळकराची त्यानें भेट घेतली. तेथें जोधपूरकर राजा मानसिंग यानें त्याची मुद्दाम गांठ घेतली. तेथून डिसेंबरांत जयपूरच्या जगत्सिंगानें मोठ्या प्रेमानें

त्याचा सत्कार केला. तेथें उदेपूरच्या राण्यानें त्यास नेण्यासाठीं मुद्दाम वकील पाठविले. पण असें फिरण्यानें आपलें कार्य दुरावेल म्हणून तो परत फिरला आणि उज्जैनीस आला व त्याचें दैव फिरलें.

सातारची राजलक्ष्मी बंधमुक्त करण्यासाठीं म्हणून चतुरसिंग वणवण करीत होता. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. शिंदे, होळकर, नागपूरकर भोंसले तसेंच जोधपूर-जयपूरच्या राजराजेश्वरांनीं त्याचा मानसन्मान केला. टोपीकरानेंही आदरातिथ्य केलें; पण या सर्व वणवणींत भरींव असें कार्य कांहींच झालें नाहीं. नुसत्याच चर्चा झाल्या. न जाणों कोठें कांहीं कार्यास प्रारंभ झाला असता, पण उज्जैनीस असतांना त्याचें धैर्य मुळापासून कोलमडून टाकणारी अत्यंत वाईट बातमी त्यास कळली. ती म्हणजे त्याचा भाऊ सातारकर छत्रपति शाहू याच्या मृत्यूची. शाहू कैलासवासी झाला व चतुरसिंगाचीं मुलें-माणसें बाजीरावानें कैद केलीं. या बातमीनें चतुरसिंगाचें पेंकाटच मोडलें. त्याचा सर्व उत्साह मावळला. या वेळीं प्रतापशाली यशवंतराव होळकराची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं. भांबुर्ड्याच्या मैदानावर शिंद्यांकडून मल्हारराव होळकर मारला गेला; त्याबरोबर यशवंतरावानें आपल्या करामतीस सुरुवात केली आणि विठोजीचा वध पेशव्यानें करतांच शिंद्यांसकट पेशव्यांस नरम पाडण्याची भीष्मप्रतिज्ञा त्यानें केली आणि बाहुबलानें ती तडीसही नेली. असें अद्वितीय धैर्य प्रत्येकास लाभतेंच असें नाहीं. अंतःकरणाचा पार खुर्दा झालेला आणि अशा स्थितींत चतुरसिंग इ. स. १८०९ मध्यें उज्जैनीस यशवंतरावास भेटण्यासाठींच म्हणून गेला. पण आतां चतुरसिंगाचें दुर्दैव पुरेंच ओढवलें होतें. तो यशवंतरावाचे गांठीस जातो तों यशवंतराव पूर्णपणें वेडा झालेला त्यास दिसला. त्याबरोबर चतुरसिंगाला जबरदस्त धक्का बसला. जणूं भारतवर्षाचें सौभाग्यच यशवंतरावाच्या रूपानें चिंध्या चिवडतांना आणि किंचाळतांना त्यानें पाहिलें! त्याबरोबर त्यानें आपल्या हतभागी कपाळावर हात मारून घेतला व मटकन् बैठक मारली. आतां या संकटांतून मुक्त होण्यासाठीं कोणता मार्ग योजावा या विचारांत तो असतांना त्याच्या कानावर आणखी एक वाईट बातमी आदळली. ती अशी कीं, बाजीरावानें प्रतापसिंहास राज्याभिषेक करून त्यास सुप्रसन्न करून

वतलें. या बातमीनें त्याच्या कानठळ्याच बसल्या व आतां पुढें काय करावें हेंच त्यास सुचेना. सातार्‍यास जाऊन आपली संभावना कोणत्या प्रकारानें होईल याचा अंदाज त्यास लागेना. चतुरसिंग आतां सर्व बाजूंनीं त्रस्त झाला.

बापू कान्हो, व्यासराव डबीर आणि मल्हारराव चिटणीस हे त्याचे साथीदार त्याच्याबरोबर फिरत होतेच. त्या सर्वांनीं असा विचार केला कीं, आपण पांच-सात वर्षें सर्व हिंदुस्थानभर फीर फीर फिरलों, पण छत्रपतींची मुक्तता होईल अशी कोणतीच गोष्ट आपल्या हातून झाली नाहीं. तेव्हां आतां देशीं जाऊन तेथेंच कांहीं योजना काढावी. हा विचार सर्वांस पटला व ही सर्व मंडळी इ. स. १८०९ च्या सुमारास धारेस आली. तों तेथें मोठीच धामधूम चालू होती. त्यामुळें चतुरसिंगाचीं दोन वर्षें वायां गेलीं. आतां सातार्‍यास सर्व रंग पालटला होता. प्रतापसिंहास राज्याभिषेक होऊन जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला होता. सातारच्या बंदोबस्तासाठीं बाजीरावानें त्रिंबकजीची नेमणूक केली होती. तो बाजीरावाचा मोठा साहाय्यकर्ता आणि खटपट्या होता. रोज नवी भानगड निर्माण करून बाजीरावाची मर्जी संपादणें हा त्याचा धंदा होता. त्यास अनुसरून तो आतां चतुरसिंगाच्या मागें लागला. सातारकरांच्या वतीनें उगीचच रान उठवीत सर्व देशभर हिंडणारा चतुरसिंग पेशव्यांच्या डोळ्यांत सलत होता. तेव्हां त्याचा कांटा काढण्याचा उद्योग त्रिंबकजीनें सुरू केला. प्रथम चतुरसिंगास गोडीगुलाबीचे आणि सामोपचाराचे निरोप धाडण्यांत आले. "बाजीरावाच्या मनांत आपल्याविषयीं कोणताच किंतु नाहीं. आपली सर्व व्यवस्था नीट करून द्यावी अशी श्रीमंतांची मनापासून इच्छा आहे. म्हणून एकदां प्रत्यक्ष भेटीनें निखालसता व्हावी अशी उत्कट इच्छा आहे" अशा अर्थाचे निरोप वरचेवर धाडून त्रिंबकजीनें साखर पेरण्यास सुरुवात केली, आणि या कार्यांत तो यशस्वी होणार अशीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं. कारण हा डाव ओळखण्याइतका चतुरसिंग चतुर नव्हता. तो त्रिंबकजीच्या भेटीसाठीं म्हणून उज्जैनीहून निघाला.

इ. स. १८१० च्या श्रावणांत तो बडोद्यास आला. तेथील परिस्थितीची कल्पना यावी म्हणून त्यानें गंगाधरशास्त्र्याची गांठ घेतली. पण बडोद्यांत

कंपनी सरकारच्या हुकुमाशिवाय झाडाचें पानही हालत नाहीं, तेव्हां तुमचा कांहीं एक फायदा होणार नाहीं, असा खडखडीत जबाब शास्त्र्यानें दिला तेव्हां चतुरसिंग आणखीच निराश झाला. या वेळीं त्याला पूर्णपणें घेरण्याचा त्रिंबकजीचा उद्योग चालू होताच. त्याचे तांतडीचे निरोप एकामागून एक येत होते. 'अत्यादरः शंकनीयः' या न्यायानें इतके साखरेच्या शब्दानें भरलेले त्रिंबकजीचे निरोप एकसारखे येत आहेत तेव्हां त्यांत कांहींतरी काळेंबेरें आहे कीं काय हा विचार चतुरसिंगास सुचावयास पाहिजे होता. पण तसें न होतां चतुरसिंग खानदेशांत दाखल झाला. कारण त्रिंबकजीचा मुक्काम मालेगांवास होता. निरोपानिरोपी होऊन भेटीचा दिवस ता. १०-२-१८११ हा ठरला. पण हा दिवस चतुरसिंगाच्या आयुष्यांत अत्यंत वाईट ठरला. हिंदुस्थानभर मानसन्मानानें हिंडणारा आणि शिंदे, होळकर, वगैरे मातबर लोकांशीं बरोबरीच्या नात्यानें बोलाचाली करणारा चतुरसिंग पेशव्यांचा कैदी झाला. तो प्रकार असा—गिरणेच्या कांठीं उत्तरेस चतुरसिंगाचा मुक्काम असून दक्षिणेस त्रिंबकजी होता. मेजवानीस ऐवज, शाकभाजी व फर्मास त्रिंबकजीनें पाठविला. रात्रौ सहा घटकास गोटाबाहेर खलबताची बैठक झाली. तेथें चतुरसिंगराजे, रघुनाथराव गुजर, बापू फडणीस, आप्पाजीराव इंगळे हे चार असामी, गोपाळराव न्यायाधीश, अप्पाभट पुणतांबेकर व त्याचे दोन बंधू, तसेच बाबाजी केशव पाडळीकर, लाडेखान जमादार व हवालदार–खिसमतगार वगैरे अकरा असामींस एकाएकीं गराडा घालून त्रिंबकजीनें अटक केली. प्रत्यक्ष वाटाघाटीसाठीं तर तो आलाच नाहीं. नंतर या सर्वांस लगोलग मालेगांवचे किल्ल्यांत कैदेंत ठेविलें.

विश्वासघात, दगाबाजी यांतून निर्माण होणारे प्राणघातक प्रसंग राजकारणी पुरुषावर नेहमींच येतात. पण त्या सर्वांची आगाऊ सूचना घेऊन जो त्यांतून पार पडतो तोच खरा धुरंधर ठरतो. सर्जेराव घाडग्यावर बाळाजी कुंजीरानें असाच प्रसंग आणिला होता पण त्यांतून तो मोठ्या हिकमतीनें निसटला. पण चतुरसिंग तितका समयसूचक नसल्यानें लटकला गेला आणि रायगडच्या कांगोरी किल्ल्यावर कैद भोगीत असतांनाच बिचाऱ्याचा ता. १५-४-१८१८ रोजीं अंत झाला.

शाहूनंतर छत्रपतीच्या घराण्यांत जबाबदारी जाणणारें वडीलधारें माणूसच कोणी शिल्लक राहिलें नाहीं. त्यामुळें तेथें बहुनायकी माजली आणि इंग्रजांना बोट शिरकविण्यास फार सोपें गेलें. शाहूची चवथी बायको शिर्के यांजकडील होती. तिचें नांव आनंदीबाई उर्फ माईसाहेब. हीच काय ती एक वयानें वडील व जहांबाज बाई शिल्लक राहिली. त्यामुळें साहाजिक सातारा दरबारचें नेतृत्व तिच्याकडे आलें. माईसाहेबाच्या पोटीं शाहूला तीन पुत्र झाले. प्रतापसिंह, भाऊसाहेब व अप्पासाहेब. त्यांपैकीं प्रतापसिंहाचा जन्म ता. १८–१–१७९३ रोजीं झाला. दुसरा मुलगा भाऊसाहेब १७९५ त जन्मला आणि पंचवीस–सव्वीस वर्षांचा होऊन वारला. आणि सर्वांत धाकटा आप्पासाहेब याचा जन्म सन १८०५ मध्यें झाला. हा सर्वांत लहान पण याच्याही नशीबीं गादीचा योग होता. तो प्रतापसिंहाच्या पदच्युतीनंतर सिंहासनावर आला व इ. सन १८४८ मध्यें मरण पावला.

सातारा व पुणें या ठिकाणीं राजवंशांत जन्मास आलेलीं हीं बाळं कोणत्या मुहूर्तावर जन्मलीं होतीं कोणास ठाऊक ! प्रत्येकाच्या नशीबीं राजपद व पेशवेपद होतें. प्रतापसिंहास तर तीनदां राज्याभिषेक झाला आणि बाजीरावास दोनदां झाला. प्रथम ता. १६–५–१८०८ रोजीं बाजीरावानें त्यास राज्याभिषेक केला. प्रत्येकानें आपलें कांहींतरी होकें चालवावयाचें व कोठें कांहींतरी लांडा कारभार करावयाचा हा जणूं त्या वेळच्या प्रमुख व्यक्तींचा शिरस्ताच होता. बाजीराव तर असल्या पांचटपणाचा सूत्रधारच. शिवाजी महाराजांपासून राज्याभिषेक होण्यापूर्वीं भावी छत्रपतींची मुंज करण्याचा शिरस्ता होता. पण या वेळीं श्रीमंतांची काय लहर लागली कोणास ठाऊक. त्यांनीं मौंजीबंधनाचा संस्कार न करतां छत्रपतीस राज्याभिषेक केला. आणि या किरकोळ गोष्टीनें सातारकरांचीं मनें नाखुष केलीं. बरें या वेळीं सातारकरांच्या पदरीं असा कोणीही बेडर वृत्तीचा गृहस्थ नव्हता कीं जो श्रीमंतांची कानउघाडणी करून त्यांस या गोष्टीपासून परावृत्त करील. सर्वांसच राज्याभिषेकाची बिजवरी घाई झाली. मग या गोष्टीकडे लक्ष देतो कोण आणि

कशासाठीं! यानंतर प्रतापसिंहास इंग्रजांनीं ता. ११-४-१८१८ रोजीं दुसऱ्यांदा राज्याभिषेक केला. शुष्क ब्राह्मण्याचा बडेजाव वाढविण्यांत बाजीरावानें लक्षावधी रुपयांची उधळपट्टी केली, आणि स्वतःचा व स्वदेशाचा घात केला. बरोबर तोच कित्ता प्रतापसिंहानें गिरविला. वर्धिष्णु आणि जयिष्णु क्षात्रधर्म प्रतापसिंहास मानवणारा नव्हता. जोधपूर, जयपूर व उदेपूर वगैरे ठिकाणच्या नामधारी मानसिंगाच्या शिंगांतून निर्माण होणाऱ्या व भारवाही शास्त्र्यांच्या पांडित्यांतून जन्म पावणाऱ्या क्षात्रियत्वाचें महत्त्व प्रतापसिंहास प्राणापलीकडे वाटलें. या शेंबडचा आणि शेळपट क्षात्रियत्वाचा मद प्रतापसिंहास इतका चढला कीं त्यानें शहाण्णव कुळींच्या मराठ्यांचा अपमान करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. आणि त्यानें हें असलें अस्सल क्षात्रियत्व फक्त पांच कुळींतच आहे असें फर्मान काढिलें. या क्षात्रियत्वाच्या रोगानें प्रतापसिंहास इतकें पछाडलें होतें कीं त्यानें वेदोक्त विधीचा नवीन ग्रंथ तयार केला व त्याप्रमाणें सन १८३८ मध्यें स्वतःस पुन्हां तिसऱ्यांदां राज्याभिषेक करवून घेतला. यानंतर एकच वर्षानें त्याच्यावर पदच्युत होण्याचा प्रसंग आला. पेशव्यांकडेही अशीच गंमत पाहावयास मिळते. राघोबानें पेशवाई मिळावी म्हणून नारायणरावाचा खून केला. पण तें पद त्यास लाभलें नाहीं. त्याचा सव्याज वचपा त्याच्या दोन्हीही औरसपुत्रांच्या बाबतींत निघाला. बाजीराव व चिमाजी अप्पा या दोघांसही पेशवेपदावर अधिष्ठित होण्याचा योग होता. बाजीरावास प्रथम ता. ५-१२-१७९६ ला पेशवाई मिळाली आणि दुसऱ्यांदा इंग्रजांच्या संरक्षणाखालीं ता. १३-५-१८०२ ला तो पेशवा झाला आणि त्याचा धाकटा भाऊ चिमाजी हा तर बाजीरावाच्या आधीं ता. २५-५-१७९६ ला पेशवेपदावर आरूढ झाला. अशा तऱ्हेनें या समारंभाच्या आवृत्यावर आवृत्या पुणें आणि सातारा येथें झाल्या आणि त्यांचा कायमचाच शेवट झाला.

प्रतापसिंह वयानें लहान असल्याकारणानें राज्यकारभार मातोश्री माईसाहेब या पाहात असत. तेव्हां मातोश्री माईसाहेब व बाजीराव यांच्यामध्यें झालेला पुष्कळसा

पत्रव्यवहार उपलब्ध आहे. त्यावरून पाहतां प्रतापसिंह व बाजीराव यांचे संबंध इ. स. १८१० पर्यंत चांगलेच सलोख्याचे व प्रेमाचे दिसतात. ता. १०–१२–१८१० चें माईसाहेबांचें पत्र असें आहे कीं, " श्री पंढरी, शंभुमहादेव, व जेजुरी येथें स्वारी गेली होती ती अश्विन शु॥ १५ भृगुवारीं सातारीं आली. यात्रेस जावें असें मनांत होतें त्याची गोष्ट तुम्हापाशीं काढतांच तुम्ही अगत्य धरून घडविलें त्याचा संतोष वारंवार होतो. त्याचा विस्तार पत्रीं कोठवर लिहावा ? आजवर घडलें नाहीं. पुढें घडण्यास अशक्य. ते राव तुम्ही आमचे वचनास अनुमोदन देऊन मनांत होतें, त्यापेक्षां खर्चवेचाचा बंदोबस्त यथास्थित करून देऊन त्रिंबकजीस पाठविला त्यांनीं कोणा गोष्टीचें कमी पडूं दिलें नाहीं. " यानंतरचीं पत्रें पाहिलीं म्हणजे मात्र त्यांचे संबंध जरा बिघडत चालल्याचें दिसतें. इ. स. १८१२ नंतर त्यांच्या तक्रारी वाढतच गेल्या व महाराजांच्या मागण्या बाजीरावास पुऱ्या करतां येईनात. त्याचा उल्लेख खालीलप्रमाणें आहे, " (१) डौलाकडून कापड व वार्षिक मोइनीबद्दल पेशजी नेमणूक पांच हजार आहे. त्यांत महाराजांची व माईसाहेबांची नेमणूक आहे. जास्ती खास मंडळींस नेमणूक नाहीं. सबब जास्ती नेमणूक बांधून द्यावी. (२) सेवा चाकरीचे माणसास रोजमुरा आहे तो कधींहि पुरत नाहीं. सबब इजाफा करावयास दरमहा नेमणूक पाहिजे. (३) जास्ती किरकोळ खर्च, धर्मादाय वगैरे खाजगी खर्चाबद्दल नेमणूक नाहीं. (४) सेवा चाकरीस माणसें पुरत नाहींत. सबब जास्ती माणसें पाहिजेत. याची याद अलाहिदा असे. (५) पागेकडे व गाई–म्हशींकडे मिळून साल बेगमीस, कुरणाचे बेगमीखेरीज कडबा वीस हजार खरेदी करावा लागतो त्याचे ऐवजाची नेमणूक व्हावी. "

यात्रमाणें छत्रपतींच्या मागण्या बाजीरावास पुऱ्या करतां येईनात तेव्हां त्यांच्यांत घासाघाशीला सुरुवात झाली. त्याचा शेवट छत्रपतींनीं इंग्रजांचा आश्रय करण्यांत झाला.

पांच मोहरांस स्वराज्याचा बयाणा : ३

दरबार, भेटी, परतभेटी, परस्परांनीं परस्पराचे कुशल प्रश्न विचारणें वगैरेचे खेळीमेळीचे प्रकार छत्रपति व पेशवे यांच्यामध्यें चालू होते तरी त्यांमध्यें चित्तशुद्धि नव्हती. इ स. १८०८ मध्यें प्रतापसिंहास राज्याभिषेक झाला. पण इ. स. १८०३ मध्यें प्रतापसिंहाचा चुलता चतुरसिंग भोसले यानें पेशव्यांच्या काचांतून सातारकर छत्रपतींस सोडविण्यासाठीं चालविलेल्या खटपटीमुळें व भ्रमन्तीमुळें छत्रपति व पेशवे यांचे संबंध बिघडण्यास प्रारंभ झाला. व हें प्रकरण असेंच धुमसत राहिलें, त्यास तोंड पडेना. चतुरसिंगाच्या बंडापासून महाराजांच्यावर बाजीरावानें करडी नजर ठेवली. तरी त्यांची बडदास्त नीट ठेवण्यांत येई. पण हें सुद्धां इ.स. १८१२ पासून सुटलें. तेव्हां छत्रपतींच्या हितचिंतकांनीं त्यांना पेशव्यांच्या काचांतून सोडविण्याचा प्रयत्न चालविला. सातारकरांना स्वतंत्र करण्याच्या बाबतींत चतुरसिंग भोसल्यांचे प्रयत्न खरोखरीच अभिनंदनीय होते; कारण त्यानें उघड्या मैदानांत सांगून सवरून युद्ध पुकारलें होतें. त्यांत त्यास यश आलें नाहीं हा दुर्दैवाचा भाग; पण प्रयत्न मात्र स्तुत्य होता. यानंतर चाफळच्या महाराजांनीं या बाबतींत खटपटी केल्या पण त्या घातक ठरल्या. त्यांनीं पेशव्यांविरुद्ध सर्व मराठे सरदार उठवावयाचे व त्यांस ठिकाणावर आणावयाचें; पण तसें न करितां त्यांनीं इंग्रजांशीं संधान बांधण्याचें ठरविलें आणि येथेंच सर्व बिघडलें.

या कार्यास सुरुवात झाली ती सन १८१४ सालापासून. ' ॐ भवति ' पक्षाच्या रक्षणाकरितां भिक्षेची दीक्षा घेणारी श्रीसमर्थ रामदासांची शिकवण आतां पार लयाला गेली होती. घरोघर भिक्षा मागावी व जनतेच्या अंतःकरणाचा भेद घ्यावा, त्यांचीं मनें स्वराज्यास अनुकूल करावीं, ' **धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।** ' म्हणून राजास उत्साह द्यावा असे साधुश्रेष्ठ श्रीसमर्थ रामदास एकटेच झाले. त्यांनीं श्रीशिवाजी महाराजांचें कार्य तडीस नेण्याकरितां आटोकाट प्रयत्न केले पण त्यांच्यानंतर समर्थांच्या गादीवर चाफळास येणारे सर्व महाराज महाराजच होते. समर्थांची परंपरा एकानेंहि चालविली नाहीं. मोठ-मोठाले चंदनाचे टिळे लावावेत, गळ्यांत माळांची गर्दी करावी, रामाच्या पूजेचा थाट करावा व महानैवेद्यावर यथेच्छ हात मारावा व अशा ऐदखाऊ वृत्तीनें काल काढावा हा त्यांचा नित्याचा कार्यक्रम. व अशाच मनाच्या ठेवणीचे महाराज चाफळाच्या गादीवर सध्याहि विराजमान होते. त्यांच्या डोक्यांत असा विचार चमकला कीं, पेशव्यांनीं छत्रपति प्रतापसिंह महाराजांस किल्ले सातारा येथें ठेवून त्यांवर जरा करडी नजर ठेविली आहे. अशा तऱ्हेनें छत्रपतींचा अपमान करून पेशव्यानें पायरीस पाय लाविला तेव्हां त्याचा कांहीं तरी बंदोबस्त करून छत्रपतींची सुटका केली पाहिजे.

स्वामींच्या ध्यानीं आलेला हा विचार खरोखरच परम भाग्याचा; पण त्यास त्यांनीं उपाययोजना केली ती मात्र अत्यंत घातुक. इतकी कीं त्यामुळें मराठ्यांचें साम्राज्य छत्रपतीसुद्धां धुळीस मिळालें. या कामासाठीं चाफळाहून स्वामी महाराज बोरगांवास आले, व **मल्हारराव दादासाहेब** व **बाळासाहेब** यांच्या गांठीभेटी घेऊन तिघांनीं असा विचार — विचार कसला, अविचार — केला कीं छत्रपति प्रतापसिंह महाराजांस बाजीराव रघुनाथ पेशवे यांनीं सातारा येथें किल्ल्यांत ठेवून त्यांवर नजर फार करडी ठेविली आहे. त्यांच्यावर देखरेखी-करितां काशिनाथपंत बापरे यांस ठेविलें असून फार त्रास करितात. तरी त्यास सोडविण्यासाठीं पुण्यास इंग्रजाकडे असें कांहीं राजकारण करावें कीं ज्याच्या-योगें महाराज मोकळे होऊन सर्व दौलत हातांत येईल. हा विचार सर्वांचे चित्तास बरा वाटला. तेव्हां चाफळकर महाराजांनीं परमेश्वरास कौल लाविला.

तेव्हां श्रीरामचंद्रांनींही हें राज्य आपल्या सैनिकांच्या पदरांत (कपींच्या पदरांत !) आयतें जावें म्हणून होकारार्थी कौल दिला हें तरी केवढें आश्चर्य ! श्री समर्थ रामदासांच्या वेळीं हेच श्रीरामचंद्र कौलाचीं उत्तरें याच्या अगदीं उलट देत होते.

बहुत लोक मेळवावे । एक विचारें भरावे ।
कष्टें करोनि घसरावें । म्लेच्छांवरी ॥
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मेळवावें ।
महाराष्ट्रराज्य करावें । जिकडे तिकडे ॥

वास्तविक असला उपदेश करणारे श्रीरामदास आणि त्यांस अनुसरून कौल देणारे श्रीरामचंद्र ! तर याच्या उलट या वेळीं आपलें राज्य शत्रूच्या घशांत घाला म्हणून सांगणारे परमभक्त व त्याप्रमाणें कौल देणारे प्रत्यक्ष परमेश्वर असा हा विचित्र योग महाराष्ट्राच्या दुर्दैवानें आतां आला होता ! झालें. श्रीरामचंद्राकडून होकारार्थी उत्तर येतांच या राजकारणास जोरांत सुरुवात झाली. पुण्यास टोपीकराचा वकील राहात होता त्यास भेटण्याचें, त्याचे निरोप चाफळचे महाराज वगैरे मंडळीस पोहोंचविण्याचें व त्यांच्या अनुमतीनें ते खुद्द छत्रपतींस कळविण्याचें जोखमीचें काम करण्यासाठीं एका हुषार, चणचणीत व तल्लख माणसाची जरूरी होती तीही पण भरून निघाली. हें अवघड काम विश्वासूपणानें आणि निष्ठेनें पार पाडणारा माणूस चाफळकर महाराजांस मिळाला. त्यानें मागितलेला मोबदला सुद्धां फार अल्प होता. पंतसचीवानें लुबाडलेलें वतन त्यांच्याकडून काढून त्याचें त्यास द्यावयाचें या मोबदल्यावर हा सौदा ठरला.

या कामगिरीवर नेमण्यांत आलेला गृहस्थ म्हणजे रंगो बापूजी गुप्ते. हा पंतसचीवाच्या हद्दींतील रोहिडखोऱ्याचा राहणारा. याचें वतन पंतसचीवानें हा अफलादीचा वंश म्हणून बळकाविलें होतें व तें परत मिळविण्याकरितां गेल्या दोन–तीन पिढ्या हे गुप्ते लोक एकसारखी खटपट करीत होते. पण त्यांत त्यांस कांहीं ना कांहीं अडचणी उत्पन्न होऊन यश येत नव्हतें. तीच खटपट पुढें रंगो बापूजींनींहि चालविली होती. तेव्हां माझें वतन मला माघारीं मिळवून

देण्याची व्यवस्था छत्रपतींचें राजकारण फत्ते होतांच आपण करीत असाल तर पुण्यास टोपीकरांचा वकील एल्फिन्स्टन आहे त्याच्याकडे सातारकरांचें राजकारण फत्ते करण्याचें काम मी करतों असें चाफळकर महाराजांच्याजवळ रंगो बापूजी बोलला व त्यास चाफळकरांची अनुमति मिळतांच रंगो बापूजी या कामास लागला. आंग्रे यांच्या कारभाऱ्याकडे एल्फिन्स्टनचा येण्याचा प्रघात होता. त्याकडे जाऊन त्यानें आंग्र्यांच्या मध्यस्थीनें एल्फिन्स्टनची गांठ घेतली व छत्रपति महाराजांस पेशव्यांचा जाच आहे, तेव्हां त्यांची या जाचांतून मुक्तता करावी अशी साहेबास रंगो बापूजीनें विनंती केली. सांहेबानें त्यांस विचारलें कीं छत्रपति महाराज मराठ्यांच्या राज्याचे धनी असतां त्यास पेशवा दमदाटी करतो व छळतो याचा अर्थ आम्हांस कळत नाहीं. तरी महाराजांनीं पेशव्यास राज्य व अधिकार केव्हां आणि कसे दिले याची तपशीलवार माहिती आम्हांस पाहिजे. तेव्हां रंगोबानें ती माहिती दिली. यानंतर त्यास सांगितलें कीं तुम्ही हें जें राजकारण आमच्याशीं करणार तें छत्रपति महाराजांच्या संमतीनें करावें व त्यांची तशी संमती आहे असें दाखविणारा लेख आम्हांस पाहिजे म्हणजे आम्ही या कामांत जास्त लक्ष घालूं. यावर रंगो बापूजीनें उत्तर केलें कीं, महाराजांस किल्ल्यावर फार अडचण आहे. त्यांचें दर्शन होणें मुष्कील; तेव्हां साहेब म्हणाला, हरप्रयत्नें त्यांस कळवून काय करणें तें करावें. यानंतर रंगो बापूजीनें साहेबाचा हा निरोप दादासाहेब चिटणीस, व चाफळचे महाराजांस सांगितला. जेव्हां जैतापुरास पुन्हा चाफळकर महाराज व दादासाहेब चिटणीस यांचे विचारें असें ठरलें कीं साहेबाच्या म्हणण्याप्रमाणें हें राजकारण छत्रपति महाराजांस गडावर कळवून करावें. तेव्हां मग गडावर महाराजांकडे कोण मंडळी जातात याचा तलास घेतला तों तात्या नारोळकर वैद्य, कृष्णाबाई, नरसू काकडे व खंडेरावमहाराज शिर्के ही मंडळी जातात असें कळलें. तेव्हां त्यांना या कार्यासाठीं वश करून घेण्यांत आलें. त्यांची व रंगो बापूजीची ओळख साताऱ्यास करून देण्यांत आली. हें ओळख करून देण्याचें काम रंगोपंतदादा नांवाच्या गृहस्थानें केलें. यानंतर दाजिबा उपाध्ये व तात्या नारोळकर यांजबरोबर छत्रपतींस ‘ उद्यां रंगो बापूजी येईल ’ असा सांगावा

धाडिला व तो येईल तेव्हां रंगो बापूजीस आपल्या हातची एक चिठ्ठी साहेबास खात्री पटावी म्हणून द्या असेंही पण महाराजांस कळविण्यांत आलें.

अशी पूर्वतयारी झाल्यानंतर रंगो बापूजीनें गोसाव्यांचा वेष घेऊन जावें असें चाफळकर महाराजांनीं मनाशीं योजिलें, व त्याप्रमाणें चाफळकरस्वामींनीं रंगो बापूजीस झोळी वगैरे देऊन गोसाव्याचें सोंग बेमालूम दिलें व बरोबर इंग्रजांशीं कसलें राजकारण आपण करीत आहोंत याची सर्व कल्पना देणारी चिठ्ठीही महाराजांस देण्यासाठीं दिली. ती चिठ्ठी घेऊन रंगो बापूजी सातान्यास दाखल झाला. तेथून गडावरील मंगळाई देवीचें दर्शन घेण्याचें मिष करून तो किल्ल्यावर गेला. तेथें वेळ साधून चाफळकरस्वामींची चिठ्ठी तात्या उपाध्ये नारोळकर यांजपाशीं दिली. त्यानंतर त्या चिठ्ठीस उत्तर म्हणून मिळालेली छत्रपतींची चिठ्ठी खालीं आणण्याचें अवघड काम रंगो बापूजीस करावयाचें होतें. वेळप्रसंगीं आपण पकडले जाऊन झाडा वगैरे देण्याचा प्रसंग आला तर चिठ्ठी सांपडूं नये म्हणून त्यानें आपल्या पायास भोंक पाडिलें व कुत्रें चावल्याचें सोंग करून त्या जखमेस चुना व इतर झाडपाला बांधला व त्यांतच त्यानें महाराजांची चिठ्ठी लपविली. बैराग्याचा वेष धारण करणारा रंगो बापूजी गडावरून खालीं येण्यास निघाला; तों छत्रपति प्रतापसिंह महाराजांवर देखरेख ठेवणारा काशिनाथपंत बापरे बेदराहून माघारीं किल्ल्यावर येत असतां त्याची व या बैराग्याची वाटेंतच गांठ पडली. त्याबरोबर काशिनाथपंतानें त्यास रोखिलें. त्यानें देवडीवरील पाहरेकऱ्यांची खरडपट्टी काढण्यास सुरुवात केली. हा गोसावडा येथें कसा आला, हा गोसावी नसून फितूर आहे, त्याला पकडा, त्याचा झाडा घ्या—एक ना दोन अनेक प्रकारें काशिनाथपंत बोलूं लागला. त्यानें रंगो बापूजीस अटक केली. लगेच समक्ष झाडा घेतला. नंतर त्यास डोलाच्या वाड्यांत पाठविलें. तेथेंही खूप जरब दाखवून चौकशी केली पण कांहीं थांग लागेना. तेव्हां चिंचेच्या फोकानें बेजरब मारूं, बेडी घालूं म्हणून धाक दाखविण्यांत आला. पण बैरागी कशास जुमानीना. तेव्हां दुसरे दिवशीं हा गोसावी वेडा आहे, त्याच्याजवळ कांहीं नाहीं,

असें समजून किल्ल्यावरील लोकांनीं त्यास सोडून दिलें. अशा तऱ्हेनें रंगो बापूजी चिठ्ठीसह या संकटांतून सुटला.

रंगो बापूजीस पकडल्याची वार्ता जैतापुरास चाफळचे स्वामीमहाराज, चिटणीस व रंगोपंत दादा यांस समजली. त्याबरोबर या सर्व मंडळींची पांचावर धारण बसली, सर्व घाबरून गेले. पूजा, अर्चा, स्नानादि सर्व विधी जागच्या जागींच थंडावले. ही सर्व मंडळी अन्नपाण्यावांचून सचिंत अशी दोन दिवस बसून होती. त्यांस काय करावें तें सुचेना. इतक्यांत रंगो बापूजी माहुलीहून जरंड्याचे डोंगराकडून संध्याकाळीं जैतापूरास दाखल झाला. रात्रीं रंगोपंत व चिटणीस यांस भेटल्यानंतर तो चाफळकर स्वामींना भेटण्यासाठीं गेला. उभयतांची नजरानजर होतांच स्वामींनीं रंगो बापूजीस पोटाशीं घट्ट धरिलें व त्याजवर प्रेमाश्रूंचा वर्षाव केला. ते फार श्रमी झाले आणि उद्गारले कीं, काशिनाथपंतानें तुला जरब दिली तरी कोणाचें नांव न सांगतां महाराजांची चिठ्ठी पायाच्या मनगटास बांधून आणलीस व सर्वांचा बचाव केलास याबद्दल धन्यता वाटते. श्रींनीं मोठी कृपा केली; व छत्रपतिसुद्धां आम्हां सर्वांस या महासंकटांतून सोडविलें. या कामाबद्दल तुला काय बक्षीस द्यावें हेंच समजत नाहीं. हें स्वामीचें बोलणें ऐकून रंगो बापूजी म्हणाला कीं माझें वतन मला द्या म्हणजे झालें. यानंतर श्रीस्वामींनीं श्रीरामाची पूजा करतेवेळीं शपथ वाहून तुळसी दिल्या आणि सांगितलें कीं, हें वचन आज महाराजांनींच दिलें असें समज. हें वचन महाराज चालवतील. तुझें वतन हरप्रयत्न करून देऊं. याशिवाय चिटणीसाकडून व बाबांकडून हें वचन रंगोपंत दादाचे साक्षीनें स्वामींनीं देवविलें.

स्वामींनीं यानंतर या कामासाठींच रंगो बापूजीस पुण्यास धाडिलें. बाळाजीपंत नातूस भेट पण चिठ्ठी वगैरेचा मजकूर त्यास सांगूं नको. तो फक्त साहेबास सांग, असेंही सांगितलें. त्याप्रमाणें रंगो बापूजी पुण्यास गेला. साहेबास भेटण्यासाठीं बंगल्यावर जातो तों तेथें बाळाजीपंत नातू दिसलाच. तेव्हां त्यास टाळण्यासाठीं म्हणून त्यानें साहेबाच्या पट्टेवाल्याशीं संधान बांधिलें. त्याच्यातर्फे साहेबास असा निरोप सांगितला कीं मला आपणास एकांतीं भेटावयाचें आहे,

तेव्हां बाळाजीपंतास जाण्यास सांगून मला थांबवून घ्यावें. रंगो बापूजीच्या या सूचनेप्रमाणें एल्फिन्स्टननें बाळाजीपंत नातूस खान्याची वेळ झाली म्हणून निरोप देऊन रंगो बापूजीस ठेवून घेतलें. त्यानंतर त्या दोघांची बोलाचाली झाली. रंगो बापूजीनें झाला वृत्तान्त सांगितला व पायाच्या मनगटास बांधून आणिलेली छत्रपति प्रतापसिंह महाराजांची चिठ्ठी एल्फिन्स्टनला दिली व महाराजांस पेशव्यांचा फार जाच आहे तरी त्यांची सुटका करा म्हणून पुन्हां परोपरीनें सांगितलें. रंगो बापूजीनें दिलेली चिठ्ठी पाहून साहेब फार खूष झाला. त्यानें रंगो बापूजीचें नांव बुकावर लिहून घेतलें व त्यास बक्षीस म्हणून पांच मोहरा दिल्या. मराठ्यांच्या इतिहासांत आपल्या कर्तृत्वानें व महनीय त्यागानें आपलें नांव उजळून काढणाऱ्या रंगो बापूजीस कल्पनाहि नसेल कीं, बाक्षिसादाखल पांच मोहरा देणारा हा साहेब सालोसाल कोट्यवधी रुपये देणाऱ्या भारतवर्षरूप कामधेनूचा अपहार करणार असून पांच मोहरा स्वीकारण्यांत आपण केलेल्या ह्या पातकाचें क्षालन साता समुद्रांपलीकडे जाऊन हाडाचीं काडें करूनही होणार नाहीं तर त्या पातकासाठीं एखाद्या क्षयरोग्याप्रमाणें तिळा तिळानें देह झिजवून कुत्र्याच्या मोतीनें अज्ञातवासांत मरावें लागेल म्हणून ! पण विधीलिखित तसें होतें खरें. त्यानंतर रंगो बापूजीनें एल्फिन्स्टनजवळ उलट चिठ्ठी मागितली तेव्हां त्यानें त्यास इंग्रजींत लिहिलेली एक चिठ्ठी दिली. इतर किरकोळ बोलणें चालणें झालें. साहेबानें चाफळचे महाराज कोण म्हणून विचारलें. ' महाराज छत्रपतींचे गुरू ' म्हणून रंगो बापूजीनें उत्तर देतांच ' आमचा पाद्री तसा ' असें म्हणून साहेबानें टोपी काढून त्यास सलाम सांगितला. इतर आणखी कांहीं मंडळींची माहिती विचारून " महाराज सबका धनी आहे " असें म्हणून एल्फिन्स्टननें रंगो बापूजीस निरोप दिला व जातां जातां चिठ्ठीची भानगड बाळाजीपंत नातूस न सांगण्याबद्दल रंगो बापूजीस सांगितलें. अशा तऱ्हेनें ही भेट संपली. एल्फिन्स्टनच्या सांगण्याप्रमाणें बाळाजीपंत नातूस चिठ्ठी वगैरेचा थांग लागूं न देतां इतर गप्पा मारून रंगो बापूजी पुण्याहून निघाला. त्यानें महाराजांची चिठ्ठी परत मागून घेतली होती ती व साहेबाची अशा दोन्ही चिठ्ठ्या तेलांत भिजवून त्या युक्तीनें पोकळ केलेल्या लाखेच्या गोळींत घालून ती गोळी चुनाळ्यांत ठेविली

व खालींवर चुना दडपला. अशा मोठ्या युक्तीनें चिठ्ठ्या ठेवून रंगो बापूजी झपाट्यानें रस्ता कापीत असतां शिरवळच्या नदीवर विसाव्यासाठीं थांबला. तेथें त्यास शिपायानें गांठलें. त्याबरोबर त्यानें चलाखीनें तंबाकू तोंडांत टाकल्याचा बहाणा केला व बाळाजीपंत नातूनें दिलेली एक चिठ्ठी वर बटव्यांत होती ती खाऊन टाकली. नंतर शिपायास झाडा दिला. पण त्याच्याजवळ कांहीं एक न सांपडल्यामुळें त्यानें त्यास सोडून दिलें. नंतर सातार्‍यास जाऊन त्यानें झालेली हकीगत चाफळकर महाराज वगैरे मंडळींस सांगितली. यानंतर झालेला वृत्तान्तही छत्रपतींच्या कानावर घालण्यांत आला. त्यावर छत्रपतींचा निरोप चाफळकरादि मंडळींस राजकारण तडीस नेण्याबद्दल आला. त्यास त्यांची पूर्ण: अनुमति आहे असेंही पण कळविण्यांत आलें. अशा तर्‍हेनें रंगो बापूजी, बळवंत मल्हार, विठ्ठलपंत फडणीस, चाफळकर महाराज यांनीं राजकारण चांगलेंच रंगांत आणिलें. आणि पुढें लवकरच पेशवे व इंग्रज यांच्यांत बिघाड होऊन युद्धास तोंड लागलें.

वसईचा तह : ४

सातारा दरबारीं कपटकारस्थानांची भट्टी कशी बनत चालली होती, त्यांत कोण कोण मंडळी प्रमुख होती, त्यांनीं शहाणपणाच्या म्हणून केलेल्या हालचाली कशा आत्मघातकी व मूर्खपणाच्या होत्या, प्रतापसिंह महाराजांचा बुद्धिभ्रंश कसा झाला व इंग्रजांचें कपटकारस्थान सिद्धीस जाण्यास अनुकूल परिस्थिति कशी निर्माण झाली याची कल्पना दिल्यानंतर पुणें दरबारीं रावबाजी कडे वळणें क्रमप्राप्त आहे.

मराठी राज्यांत इंग्रजांचें बोट शिरकूं द्यावयाचें नाहीं अशी काळजी मराठ्यांनीं फार दिवस घेतली. पण या त्यांच्या व्रताचा भंग प्रथम नानासाहेब पेशव्यांनीं केला. त्यांनीं कान्होजी आंग्र्याचें बंड मोडण्याकरितां टोपीकरांची मदत घेतली. या वेळीं पेशव्यांची सत्ता प्रबळ असल्यामुळें टोपीकरांचें कांहीं चाललें नाहीं. पण या वेळेपासून मात्र हें सावज आज नाहीं उद्यां आपल्या हातीं लागणार अशी आशा साहेबास वाटूं लागली. हा त्याचा कयास लवकरच खरा ठरला. कारण राघोबानें बंड केलें व इंग्रजांची मदत घेतली. इंग्रजांस हें पाहिजेच होतें. त्यांनीं राघोबास पेशवेपदावर अधिष्ठित करण्याचें अभिवचन दिलें. पण मराठ्यांची पुण्याई अजून संपुष्टांत आली नव्हती. नाना व महादजी हे दोन मोहोरे अद्याप शिल्लक होते. एक बृहस्पतीच्या बुद्धीचा तर दुसरा शिकंदर समशेरीचा, अशी ही जोडी असल्यामुळें मराठ्यांचा दरारा कायम होता.

हे होते तोंपर्यंत मराठ्यांच्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची ताकद इंग्रजांस नव्हती. असें असतांहि इंग्रजांनीं मराठ्यांची कुरापत काढिली. त्याबरोबर त्यांस चांगलाच मार मिळाला व वडगांवच्या लढाईंत त्यांचा सपशेल पराभव झाला. ' शरणागतास अभयदान देणें व त्याचा कार्यभाग तडीस नेणें हें आमचें कर्तव्य ' ही स्वाभिमानाची भाषा सोडून देऊन राघोबास मराठ्यांच्या स्वाधीन करणें इंग्रजांस भाग पडलें. तसेंच गुजराथेंत घेतलेला पेशव्यांचा मुलूख त्यांचा त्यांस माघारीं द्यावा लागला.

या वडगांवच्या तहानें इंग्रज जरा वचकून होते, पण हा काल फार दिवस टिकला नाहीं; कारण पुढें लवकरच नाना व महादजी कालवश झाले. त्याबरोबर आज बरेच दिवस धुमसत असलेल्या भाऊबंदकीच्या वणव्यानें फारच उग्र स्वरूप धारण केलें. तुकोजीराव होळकराच्या मृत्यूनंतर वेडगळ काशिरावास बगलेंत मारून होळकरांची दौलत घशांत टाकण्याचा घाट दौलत-रावानें घातला, आणि त्यानें यशवंतरावास छळण्यास सुरुवात केली. या दंगलींत भांबुड्यांच्या मैदानावर मल्हारराव होळकर ता. ४।९।१७९७ रोजीं मारला गेला. या वेळेपासून शिंदे होळकरांचीं मनें एकमेकांविषयीं फारच बिघडलीं व ते परस्परांस पाण्यांत पाहूं लागले. मल्हाररावाच्या वधानंतर विठोजी व यशवंतराव हे दोघेही वीर एकदमच बाहेर पडले. व दौलतरावाच्या आगलावे-पणास पायबंद घालून होळकरांच्या दौलतीस सुप्रतिष्ठित व स्थिर करण्याच्या उद्योगास ते लागले. हे दोघेही बंधु साहसी व शूर होते. त्यांच्या पराक्रमाची प्रभा लवकरच बाजीराव व दौलतराव या दोघांना दिपवूं लागली. आतां उत्तरेंत शिंदे व होळकर यांची चांगलीच जुंपली. उभयतांच्या चार पांच झटापटी झाल्या व त्यांत यशवंतरावानें शिंद्यास चांगलेंच नरम पाडिलें. आपण यशवंत-रावाचा सहज बंदोबस्त करूं अशी दौलतरावास घमेंड होती. ती जागच्या जागींच जिरली. उत्तरेंत यशवंतरावानें आपल्या पराक्रमानें शिंद्यास जेर केलें.

हिंदुस्थानांत यशवंतरावाचा हा उद्योग चालूं असतां विठोजी कांहीं स्वस्थ नव्हता. त्यानेंही फौज जमवून धामधूम चालूं केली. त्याच्या फौजेंत पेशवे व शिंदे यांच्या फौजेंतील बेकार शिलेदारांचा भरणा होता व लुटीच्या

आशेनें ते विठोजीभोंवतीं जमा झाले होते. त्यांनीं मंगळवेढें, करकंब व पंढरपूर या प्रांतांत लूटमार व चढाई सुरू केली. बाजीबा, यशवंतराव रामकृष्ण व कृष्णराव मोदी हे शिंद्यांचे तीन सरदार पगार वगैरे न मिळाल्यामुळें असंतुष्ट होऊन विठोजीस सामील झाले व असल्या लुटमारीच्या राक्षसी मार्गांनींच आपला निर्वाह करूं लागले. तसेंच खुद्द काशीराव होळकराचे सरदार जिवाजी यशवंत व मोत्याजी काळू गावडा हे सुद्धां खानदेशांत गोदावरीच्या तीरानें भयंकर जाळपोळ व लूटमार करीत होते. या फैलावणाऱ्या दंगलीस पायबंद घालण्यासाठीं म्हणून पेशव्यांनीं धाडलेला सरदार बाळकृष्ण गंगाधर बावनपागे हाच उलटला. त्यानें बंडखोरांचा बंदोबस्त तर केला नाहींच पण तोच विठोजीस सामील झाला, आणि त्याजबरोबर मुलखांत अत्याचार करूं लागला. अशा रीतीनें या विठोजीच्या बंडानें चांगलेंच उग्र स्वरूप धारण केलें. हे सर्व बंडखोर सरदार आपल्या पुंडाईस अमृतरावाच्या नांवाचा उजळा देत. मग या बंडास अमृतरावाचें खरोखरीच प्रोत्साहन होतें किंवा कसें हें समजण्यास आज तरी निदान कांहीं साधन नाहीं. पण हे सरदार मात्र असा दाबून डांगोरा पिटीत कीं बाजीराव नादान असल्यामुळें त्यास पेशवेपदावरून दूर करून आपण पेशवाई सांभाळणार अशा अर्थाच्या सनदा अमृतरावानें आम्हांस दिल्या आहेत. म्हणूनच आम्हीं समशेरी म्यानाबाहेर केल्या आहेत. विठोजी होळकर तर जे जे किल्ले व ठाणीं सर करी त्याच्यावर अमृतरावाचें निशाण लावी. विठोजीच्या बंडास इ. स. १८०० च्या नोव्हेंबरमध्यें जास्तच तेज चढलें. त्याचे उल्लेख खालीलप्रमाणें आढळतात. "होळकर व यशवंतराव रामकृष्ण मिळून वीस हजार फौज करकंबच्या शिवेस आली. तेव्हां तेथील मालक पटवर्धन यांनीं तेवीस हजार रुपये खंडणी कबूल केली. फौज अमृतरावाची आहे म्हणतात. पुढें बाळकृष्ण गंगाधराकडील सामान सोलापुरावर चालून आलें. पातशहाच्या फौजेचा पाडाव करून पेठ लुटली. वेशी मोडल्या. आतां परिणाम काय ? बाजीरावाचे सरदार बाळाजीपंत पटवर्धन पाडाव गेले. जिवाजी यशवंतानें गंगाथडीस मोठा प्रलय उडविला." थोडक्यांत होळकरबंधूंच्या बंडानें तापीपासून कृष्णेपर्यंतच्या प्रदेशांत कहर उसळून दिला. रयतेस 'त्राहि भगवान' केलें.

बाजीरावाची सत्ता पार लयास जाऊन त्या ठिकाणीं अमृतरावाच्या नांवाखालीं होळकरी सत्तेचा भास होऊं लागला.

आपल्या सत्तेची राखरांगोळी करणारे हे आगीचे लोट पाहून बाजीराव संतापानें लाल झाला. त्यास आतां आपलें पेशवेपद जातें असें वाटूं लागलें. अमृतरावाचें नांव या बंडांत सामील झालेलें पाहून त्याचा क्रोध अनावर झाला. या बंडाचे म्होरके विठोजी व यशवंतराव यांस खाऊं का गिळूं असें त्यास होऊन गेलें. या संतापाच्या भरांत त्यानें बापू गोखले, त्रिंबक महिपत ऊर्फ नाना पुरंदरे व गणपतराव पानसे वगैरे सरदारांस बंदोबस्तासाठीं पाठविलें. बंडवाल्यांचें पारिपत्य केल्याखेरीज तोंडें दाखवूं नका असें त्यांस निक्षून सांगितलें. तमाम सरदारांस हुकूम सोडिले कीं, 'विठोजी होळकर व बाळकृष्ण गंगाधर बावनपागे यांनीं महालोमहालीं खंडण्या घेऊन मनस्वी उपद्रव केला आहे. सरकारांतून पुरंदरे यांस सरंजाम देऊन रवाना केले आहेत. त्यांस सामील होऊन पारिपत्य करणें.' या कामांत पुरंदऱ्यास यश आलें व त्यानें इ. स. १८०१ च्या मार्चमध्यें बाळकृष्ण गंगाधर व जिवाजी यशवंत यांचें पारिपत्य केलें. या नंतर विठोजी होळकर निराळा फुटून मुलखांत दंगा करीत होता त्यास बापू गोखल्यानें कैद करून पुण्यास पाठविलें. विठोजीचा अमानुष वध श्रीमंत करविणार अशी कानगी नरसिंह खंडेराव विंचुरकर यास कळतांच तो तातडीनें बाजीरावाकडे गेला. विठोजीचा असा क्रूरपणानें वध करूं नये, त्याच्यापासून जबरदस्त दंड घ्यावा; पण असला मोहरा ठार करूं नये. त्यांत आपलें मनस्वी नुकसान आहे म्हणून परोपरीनें विनवूं लागला. दौलतीची कळकळ बाळगणाऱ्या सरदाराकडून करण्यांत येणाऱ्या विनंत्या व सूचना श्रीमंतांनीं मान्य करावयाच्या म्हणजे त्यांची श्रीमंती ती काय राहिली ! आपण फक्त दैवानें श्रीमंत व सर्वसत्ताधारी झालों म्हणजे परमेश्वरानें शहाणपणाचाही सर्व मक्ता आपणांकडेच दिला आहे असें त्यांस वाटत असतें व असल्या घमेंडींतच पुष्कळशा श्रीमंतांचा नाश होतो. त्यांतलाच प्रकार बाजीरावाचा झाला. विंचुरकरांची ही सल्ला श्रीमंतांस मानवली नाहीं. याच्या उलट बाळाजी कुंजराची मसलत त्यांस रुचली व बाजीरावानें विठोजीचा सूड घेण्याचें ठरविलें.

विठोजी सरकारवाड्यांत येतांच त्याच्या बेड्या काढण्यांत येऊन त्यास मारमार मारिलें. दोनशें कमचा मारून लगेच हत्तीच्या पायाशीं बांधून ओढविला. शनिवार वाड्याच्या पुढील चौकांत हा अत्यंत निंद्य व क्रूर प्रकार चालला होता व खुद्द श्रीमंतांची स्वारी बाळाजी कुंजरासमवेत गप्पा गोष्टी मारीत वरच्या दिवाणखान्यांत बसली होती. हत्तीचा पाय शरिरावर पडतांच विठोजीचा आत्मा बाजीरावास शिव्याशाप देत दुनियेपार झाला. विठोजीचा मुडदा चोवीस तास तसाच चौकांत ठेविला होता. हा दुष्टावा खरोखरीच माणुसकीस न शोभणारा झाला. दुसरे दिवशीं त्याचे कारभारी वाड्यांत आले व म्हणाले कीं, दहा–वीस लाख रुपये दंड घ्यावयाचा होता; पण श्रीमंतांनीं असला नीच प्रकार करावयास नको होता. मूठमाती द्यावयास परवानगी मागितल्यावरून ती देण्यांत आली. बायको सहगमन करणार होती; पण तिला मात्र तसें करण्यास अटकाव करण्यांत आला. अशा तऱ्हेनें विठोजीच्या प्रकरणाचा शेवट अत्यंत उद्वेगकारक झाला.

विठोजी मेला व त्याची चिता धडाडली हें पाहून बाजीरावास व बाळाजी कुंजरास आनंद झाला असेल; पण हा त्यांचा आनंद अगदीं फोल होता. विठोजीच्या वधानें पेशव्यांच्या दौलतीचें पेंकाट मोडलें व त्याच्या शेवटच्या अचक्यानें तिच्या मरणास आमंत्रण दिलें व शेवटीं तिचाहि नाश झाला. विठोजीनें कितीहि बंडखोरी व आगलावेपणा केला असला तरी त्यास बाजीरावानें देहान्ताची सजा द्यावयास नको होती. कारण त्या वेळीं बाजीरावाच्या सरदारांत बेदिली माजली होती. जो तो मनास मानेल तसें वागत होता व बाजीरावाचे हुकूम धाब्यावर बसवीत होता. दौलतराव व सर्जेराव यांचा तर बंडखोरी हा रोजचा व्यवसाय होता. सर्जेरावाच्या समशेरीनें अगणित लोकांचीं मुंडीं गगनांत उडविलीं होतीं. कित्येकांच्या पाठीची चामडी लोळविली होती. तेव्हां त्या वेळची एकंदर परिस्थिती लक्षांत घेतां विठोजीनें तसा फार मोठा गुन्हा केला होता अशांतला मुळींच प्रकार नव्हता. त्यांतून विठोजी होळकर म्हणजे कांहीं सामान्य पुरुष नव्हे, तर तो पेशव्यांचा खानदानी सरदार. मराठी साम्राज्याच्या दोन आधारस्तंभांपैकीं एक. तेव्हां होळकरांचे व पेशव्यांचे पूर्वापार संबंध लक्षांत घेतां शिंदे म्हणजे जिगर दोस्त व होळकर म्हणजे जन्मजन्मांतरींचा

शत्रु असा भेद करण्याचें कारण बाजीरावास तरी नव्हतें. यशवंतरावास व अमृतरावास वचक बसावा म्हणून त्यानें हें घोर कर्म केलें खरें पण त्यांत त्याचा तो हेतूहि साध्य झाला नाहीं. आपलीं माणसें प्रेमानें वश करावीं लागतात; त्यांस निर्वाणीच्या मार्गाचा उपयोग बहुधा होत नाहीं. तोच अनुभव येथेंहि आला. या वधानें यशवंतरावांस दहशत बसणें तर दूरच राहिलें उलट ही घोर वार्ता त्यास कळतांच तो संतापानें लाल झाला व त्यानें पुणें बेचिराख करून, विठोजीच्या वधाचा पुरेपूर सूड घेण्याची भीष्मप्रतिज्ञा केली. उत्तरेंत शिंद्यांशीं लढण्याचें सोडून तो पुण्यावर चालून येण्यासाठीं खानदेशांत उतरला. ही बातमी रावबाजीस कळतांच त्याचें धाबें दणाणलें आणि या संकटांतून निभावून जाण्यासाठीं इंग्रजांच्या व शिंद्यांच्या फौजेची मदत घेण्याचा घनघोर प्रसंग त्याच्यावर आला. या वेळीं इंग्रजांनीं जबरदस्त अटी घातल्यामुळें रावबाजीनें त्यांचा नाद सोडिला व एकट्या शिंद्याच्या फौजेवर आला प्रसंग निभावून नेण्याचें ठरविलें. शिंद्याचें सैन्य घोरपडींत आलें व शिंदे होळकर या उभयतांचें मोठें युद्ध होऊन त्यांत शिंद्यांचा पराभव झाला व त्याचा गोट लुटला गेला. त्याबरोबर रावबाजीनें आपल्याबरोबर स्वसंरक्षणार्थ सात हजार सैन्य घेऊन सिंहगडाकडे पळ काढला.

विठोजीच्या वधानें संतप्त झालेला होळकर फूत्कार सोडीत सोडीत पुण्यावर आला व त्यानें आजपर्यंत दिग्विजयी म्हणून गाजलेल्या शिंद्यांच्या सैन्याची राळ उडविली. मल्हाररावाच्या वधानंतर दोन वर्षे अज्ञातवासांत असतांना आपणांस नाना तऱ्हेनें छळणारा, काशिराव होळकरांचें खूळ बगलेंत मारून आपली दौलतच्या दौलत घशांत टाकणारा आणि मराठी रियासतीवर सर्जेराव घाडग्याचा सैतानी सोटा चालवून ती बेचिराख करूं पाहणारा दौलतराव शिंदा रेशमासारखा मऊ पाडण्याची त्याची मनीषा होती. ती अल्पांशानें सिद्धीस गेलेली पाहून यशवंतराव होळकर समाधान मानावयाच्या बेतांत होता तोंच त्यास त्याचा आनंद मातीस मिळविणारी कटु वार्ता कळली. ती अशी कीं, श्रीमंत बाजीरावसाहेब इंग्रजांच्या आश्रयास जाणार ! होळकरानें धारण केलेला नरसिंह अवतार शिंद्यांचा सूड घेण्यासाठीं होता. त्याचा दावा शिंद्याशीं होता. पण

त्याच्या अंतःकरणांत श्रीमंतांविषयीं कृतज्ञता होती व हृदयांत श्रीमंतांवरील प्रेमाची गंगा उचंबळून चालली होती. तेव्हां त्यास ही वार्ता ऐकून परम दुःख झालें.

असा गोंधळ होऊं नये म्हणून त्यानें पुण्यास येण्यापूर्वी बाजीरावास स्पष्ट कळविलें होतें कीं,

(१) आपण गादीवर बसल्यापासून शिंद्याचें बेसुमार वर्चस्व झालें आहे आणि आपण त्याच्या तंत्रानें वागत आहांत. आपण खाविंद आणि शिंदा हा आपला नोकर असें असतां आपण नोकराच्या आहारीं पडल्यामुळें राज्याचें वाटोळें झालें आणि शत्रू बळावले. शिंद्यानें आतांपर्यंत अमर्यादा करून आपला अपमान केला आहे. तेव्हां शिंद्याच्या वर्चस्वाचें जूं झुगारून देऊन त्याला वठणीवर आणण्याचें काम माझ्यावर सोंपवा म्हणजे त्यास बेजार गतीस आणतों व खाविंदाच्या पायांशीं उभा करितों. सेवकाची मर्यादा व कर्तव्यें याचा जन्मांत न विसर पडेसा धडा त्यास देतों.

(२) गोष्टी विकोपास जाऊन युद्धप्रसंग व्हावा अशी माझी इच्छा नाहीं. शिंद्याच्या चिथावणीवरून आपण होळकर घराण्याचें आजपर्यंत केलेलें सर्व नुकसान आणि अपमान मी मराठी दौलतीच्या कल्याणासाठीं विसरून जाण्यास तयार आहें. तेव्हां गोष्टी यापेक्षां विकोपास जाऊं न देतां आपण माझा व शिंद्यांचा सलोखा करून द्यावा. ही गोष्ट झाली तरच इंग्रजावर वचक बसून राज्याचा बचाव होईल. या सर्व भानगडी अगदीं शेवटच्या पल्ल्यास गेल्या आहेत. तेव्हां शिष्टाईसाठीं कोणी लुंगासुंगा मुत्सद्दी न धाडतां आपल्यातर्फे बाळाजी कुंजर, दाजी देशमुख, आणि शिंद्याच्या तर्फे निंबाजी भास्कर व बाबुराव आंगरे या चौघांना धाडावें. हे चौघे गृहस्थ हातीं आल्याशिवाय मी समेटाचा एकही शब्द बोलण्यास तयार नाहीं.

(३) शिष्टाईचा प्रयत्न फसून आम्हां दोघांत जरी लढाईस तोंड लागलें तरी आपण उगाच घाबरून पुणें सोडूं नये. आपण माझे धनी व मी आपला नोकर. तेव्हां माझ्याकडून आपणांस किंवा आपल्या कुटुंबांतील कोणासही उपसर्ग पोहोंचणार नाहीं. तेव्हां श्रीमंतांनीं निर्धास्त असावें.

याप्रमाणें आपलें गाऱ्हाणें श्रीमंतांच्या कानीं घालण्यासाठीं पाराशरपंत दादाजी नांवाचा वकील होळकरांनीं धाडिला. पण त्याचा हा सर्व खटाटोप व्यर्थ गेला. श्रीमंतांस हा निरोप व त्यांतील गर्भित धमकी लक्षांत येतांच त्यांचें चित्तस्वास्थ्य नाहींसें झालें. हातपाय लटपटूं लागले व सर्वांगास कांपरें भरलें. विठोजीच्या वधाचें घोर पातक त्यांस एकसारखें भेडसावूं लागलें. यशवंतराव होळकराचा स्वाभिमान, त्याचें श्रीमंतांवरील निस्सीम प्रेम व स्वामिनिष्ठा, त्याची स्वार्थत्यागाची तयारी, राजकल्याणाची धडपड व शिंद्याशीं समेट करण्यास पुढें केलेला दिलदार हात हीं सर्व " विठोजीच्या वधाचा सूड, विठोजीच्या वधाचा सूड " असा एकच टाहो फोडत आहेत असें त्यास वाटलें! विठोजी पडला आहे, त्याच्या डोक्यावर हत्तीनें पाय दिला आहे, कवटी फुटली आहे व तिच्यांतून उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्या आपणांस भेडसावीत आहेत असें एकच चित्र यशवंतरावाच्या निरोपांत रावबाजीस दिसूं लागलें! तो घाबरून इंग्रजांच्या आश्रयास निघाला.

हडपसरास झालेल्या भयंकर पराभवाची व श्रीमंतांच्या आकस्मिक पलायनाची वार्ता शिंद्याला समजली त्याबरोबर त्यास जबरदस्त धक्का बसला व तो खडबडून जागा झाला. लगेच त्यानें श्रीमंतांस पत्र धाडून कळविलें, " श्रीमंतांनीं महाडास जाऊन जिवाचा बचाव केला हें ठीकच केलें. पण इंग्रजांच्या आश्रयास जाण्याचा आपला विचार दिसतो तो मात्र अत्यंत घातुक आहे. तेव्हां तो प्राणांतींही अमलांत आणूं नये. एकदां का आपण इंग्रजांच्या जाळ्यांत गुरफटलांत म्हणजे मग त्यांतून सुटका नाहीं. त्यांतच गुदमरून मरावें लागेल. होळकरांच्या अरिष्टाची अशी काय मातब्बरी आहे कीं, त्याकरितां आपण सर्वस्वावर लाथ मारून इंग्रजांच्या आश्रयास जावें. श्रीमंतांनीं निर्धास्त असावें. मी स्वतः जातीनें होळकराचा बंदोबस्त करितों." शिंद्यानें असा खलिता धाडिला व तो त्या उद्योगास लागला. शिंदे–होळकरांच्या मनांत इंग्रजाविषयीं ज्वलन्त द्वेष होता. दोघांचाही जीव मराठी दौलतीची दुर्दशा पाहून तिळतिळ तुटत असे. पर्याय फक्त इतकाच कीं, शिंद्यास पेशवे दरबारां-

तील आपलें वर्चस्व कमी होणार म्हणून वाईट वाटत होतें व होळकर मराठी दौलत रसातळास जाणार म्हणून हळहळत होता.

शिंदे–होळकर हे मराठी राज्याचे दिग्पालं स्वार्थानें अंध होऊन एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यास उद्युक्त झाले. हे तुफान ताकदीचे आणि अचाट पराक्रमाचे मस्त गज स्वाभिमानाच्या मदानें धुंद होऊन एकमेकांपुढें उभे राहिले व धडका देऊं लागले. त्याबरोबर त्याचे धरणीकंपाप्रमाणें धक्के बसून मराठी दौलत खिळखिळी झाली. इकडे ही दंगल चालू होती व तिकडे ज्याच्या दृष्टिक्षेपाबरोबर लाखों समशेरी म्यानाबाहेर पडाव्या, ज्याच्या नौबदीच्या आवाजाबरोबर राजराजेश्वरांचीं सिंहासनें गदगदां हलावीं व ज्यानें माणिक मोतीं उधळून कुबेरासहि लाजवावें असा मराठी राज्याचा खावंद बाजीराव एकाद्या कोंकराप्रमाणें भयभीत होऊन बीरवाडीस एका भिक्षुकाचे घरीं बसला होता. होळकरांच्या भीतीचें वारें प्यालेलें हें वांसरूं धांवत धांवत आश्रयासाठीं करवंदाच्या जाळींत दबा धरून बसलेल्या इंग्रजी वाघाच्या जबड्यांत उडी घेण्याच्या बेतांत होतें.

श्रीमंत बाजीरावसाहेबास इतकें घाबरून जाण्याचें कांहींच कारण नव्हतें; पण श्रीमंत मुलखाविरहित भित्रे व धांदरट. त्यांच्या भेकड वृत्तीचा फायदा घेऊन आपली चामडी बचावण्यासाठीं विठोजीच्या वधास कारणीभूत झालेल्या बाळाजी कुंजीरानें इंग्रजांच्या आश्रयास जाण्याची सूचना दिली. बाळाजी कुंजीर हा श्रीमंतांच्या नाकांतील बाल व गळ्यांतील ताईत असल्यामुळें त्याचें वर्चस्व त्यांच्यावर फार. होळकराचें व अमृतरावाचें वर्चस्व झाल्यास तो आपली चामडी लोळवील; प्रसंगीं प्राणही घेऊन विठोजीच्या वधाचा सूड उगविल्याशिवाय राहणार नाहीं अशी त्यास धास्ती वाटत असल्यामुळें त्यानें इंग्रजांच्या आश्रयास जाण्याशिवाय आपली घडगत नाहीं अशी सल्ला श्रीमंतास दिली व ती त्यांस मानवली.

आपल्या विनवण्यास दाद न देतां श्रीमंत इंग्रजांच्या आश्रयास जाण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं तेव्हां होळकरानें त्यांस पकडून आणण्याकरितां

कोंकणांत फौजा धाडिल्या. ही बातमी रावबाजीस कळतांच तो जास्तच घाबरला व इंग्रजांकडून वसईस नेण्याकरितां मागविलेल्या जहाजांची व कुमकेची वाट न पाहतां तो वसईस जाण्यास निघणार तों त्याचा भाऊ चिमाजी अप्पा जवळ होता त्यानें त्यास इंग्रजांकडे न जाण्याविषयीं आग्रहाची विनंति केली व हट्टही धरला. त्याचें म्हणणें असें कीं, आपणांस अमृतरावाच्या किंवा इंग्रजांच्या कैदेंत जाण्याचा प्रसंग आला आहे तेव्हां इंग्रजाच्या कैदेपेक्षां अमृतरावाची कैद शतपटीनें बरी. कारण कीं, त्याच्या कैदेंत आपलें स्वातंत्र्य जाईल; पण अब्रू शाबूत राहील. पण इंग्रजांच्या कैदेंत मात्र आपण या दोहींसही मुकूं. चिमाजी अप्पाच्या विनंतीनें श्रीमंतांस जरा भुरळ पाडिली; पण आपल्या विषारी सल्ल्याचा शेवटचा वळसा देण्यास बाळाजी कुंजीर तेथें होताच. त्यानें इंग्रजांच्या आश्रयास जाण्याशिवाय आपणांस धडगत नाहीं असें निक्षून सांगितलें. त्याबरोबर श्रीमंत वसईस निघून गेले.

पुणें सोडण्यापूर्वींच पेशव्यांनें इंग्रजांशीं बोलणें सुरू केलें होतें. होळकरांच्या धमकीनें श्रीमंत इतके घाबरले असतांना सुद्धां त्यांस इंग्रजांचें सर्वच म्हणणें कबूल करवेना. त्यानें पहिल्यांदां बोलणें लाविलें कीं, आम्ही आमचें काम संपेपर्यंत तुमचें लष्कर नोकरीस ठेवूं व त्याचा खर्च रोखीनें देऊं. या मागणीस इंग्रजांकडून नकार येतांच बाजीराव नरम पडला व त्यानें इंग्रजी पलटणी कायमच्या ठेवूं, पण खर्चाकरितां मुलूख तोडून देणार नाहीं अशी मागणी केली. या मागणीसही इंग्रजांचें उत्तर आलें नाहीं. तेव्हां बाजीराव स्वतंत्र मुलूख तोडून देण्यासही तयार झाला. त्याच्या या मागणीस उत्तर आलें कीं, तुम्ही महाडास जावें. पुढील व्यवस्था आम्ही करूं. तेव्हां बाजीराव सिंहगडाहून महाडास गेला व महाडाहून वसईस जाऊन तेथें त्यानें अत्यंत अपमानकारक अशा वसईच्या तहावर ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजीं सही केली ! झालें, याच दिवशीं मराठ्यांचा स्वातंत्र्यसूर्य नाहींसा झाला !

या अत्यंत नादान व घातक तहाचीं कलमें खालीलप्रमाणें आहेत. (१) एकाचे शत्रु-मित्र ते दुसऱ्याचे शत्रु-मित्र मानणें (२) इंग्रजांनीं स्वतःच्या मुलुखाप्रमाणें बाजीरावाच्या मुलुखाचें संरक्षण करणें. (३) त्यासाठीं

सहा पलटणें व तोफा, युद्धोपयोगी सामानसुमानसुद्धां बाजीरावाच्या मुलुखांत ठेवणें (४) त्याच्या खर्चासाठीं सव्वीस लक्ष नक्त उत्पन्नाचा मुलूख बाजीरावानें इंग्रजांस कायम देणें. (५) इंग्रजांशिवाय दुसऱ्या टोपीकराशीं बाजीरावानें कोणत्याही तऱ्हेचा संबंध न ठेवणें (६) निजाम वगैरे कोणाशीं कांहीं तंटा असल्यास त्याचा निकाल इंग्रजबहादूर जो सांगतील तो मान्य करणें (७) गायकवाडानें इंग्रजाशीं तह केला होता त्यास बाजीरावानें मान्यता देणें. व गायकवाडासंबंधींच्या तंट्यांत इंग्रजांचा निकाल मान्य करणें (८) प्रसंग विशेषीं सहा पलटणापेक्षां जास्त पलटणें लागल्यास तीं त्यास इंग्रजानें देणें. (९) एकमेकांनीं आगाऊ कळविल्याशिवाय परदरबाराशीं सवाल जबाब न करणें. अशा प्रकारचें या तहाचें स्वरूप होतें. सुरत शहर व तथील आपले सर्व हक्क तहांत बाजीरावानें इंग्रजांस लिहून दिले. ' हा तहनामा चंद्रसूर्य आहे तोंपावेतों बहाल व बरकरार (कायम) राहील, मिति पौष शु. ७ शके १७२४. ' (ता. ३१।१२।१८०२) क्लोज व बाजीराव यांच्या सह्या होऊन तह ग. ज. कडे मंजुरीसाठीं गेला; आणि त्याची सही होऊन तहाचा कागद ता. १८।३।१८०३ रोजीं बाजीरावाचे हातीं आला.

वसई ते पुणें : ५

वसईच्या तहावर बाजीरावानें सही केली आणि हें दुःखद वृत्त सर्व ठिकाणीं पसरलें. मराठी साम्राज्याचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक माणसास खाडकन् तोंडांत बसावी आणि डोळ्यासमोर काजवे चमकावे तसें झालें. बायो-नटांच्या धुंदींत मस्त असणाऱ्या दौलतरावाची नशा उतरली. नागपूरकर भोस-ल्यास काय करावें तें कळेना आणि होळकरास डाव नासला असें वाटलें व जो तो आपआपल्या परी या पांढऱ्या संकटांतून निभावून निघण्यासाठीं धांवपळ करूं लागला. या वेळीं मराठ्यांची सर्वतोपरी नालायकी झाली होती. सुंदर समशेर असावी पण ती चालविणारें शिकंदर मनगट नसावें तसें झालें. मराठमंड-ळांत मुत्सद्दी होते, योद्धे होते, पैसा होता पण या सर्व साधनांचा उपयोग करून घेणारा महात्मा मात्र नव्हता. याच्या अगदीं उलट स्थिती इंग्रजांची होती. सबंध हिंदुस्थानभर कंपनी सरकारचें सामर्थ्य पसरलें होतें. हिंदु राज्याच्या राजवाड्याशेजारीं कंपनी सरकारचा एजंट आपलें बिऱ्हाड थाटून होता. तो मातबर दरबारांतून मानाचे मुजरे घेत होता. राजाशीं कानगोष्टी करणें व कान पिचक्या देणें हीं दोन्हींही कामें प्रसंगानुसार तो करीत होता. त्याच्या सैन्यांत व नोकरवर्गांत बेदली नव्हती. प्रत्येकाचा पगार, बढती, बदली प्रत्येक महि-न्याच्या पहिल्या तारखेस चुकती होत होती. त्यांमुळें कंपनी सरकाराची रयत

सुखी होती. त्यांचे अधिकारी एकापेक्षां एकेक सरस असे होते. त्यामुळें कामें बिनबोभाट होत व सिद्धी होतोहात हातीं लागे.

हडपसरच्या लढाईंत यशवंतराव होळकराची सरशी झाली व बाजीराव पुणें सोडून गेला त्या वेळीं कर्नल क्लोज रेसिडेंट होता. तो फार चांगला आणि अत्यंत सरळ मनुष्य होता. लॉर्ड वेलस्लीसारखा जहांबाज व करडा अधिकारी ग. ज. चे जागीं नसता तर कर्नल क्लोजनें आपल्या मध्यस्थीनें आणि गोडव्या स्वभावानुरूप शिंदे–होळकरांमधील तेढ नाहींशी करून पुण्याचा कारभार नीट सुरळीतपणें चालू केला असता. पण लॉर्ड वेलल्लीनें त्यास वर्तनस्वातंत्र्य अजिबात दिलें नव्हतें. त्यामुळें त्याचा नाइलाज झाला. हडपसरच्या लढाईंत यशवंतराव होळकरास जखमा झाल्याचें क. क्लोजला कळतांच त्यानें त्याच्या समाचारासाठीं माणसें पाठविलीं आणि मोठ्या स्नेहभावानें त्यास मेजवानीचें आमंत्रण दिलें. तें स्वीकारून यशवंतराव मेजवानीस गेला. त्या प्रसंगीं साहेबानें त्याचें उत्तम प्रकारें आदरातिथ्य करून सत्कार केला.सर्वांस पोशाख व इतर नजराणे नजर करून निरोप दिला. अशा प्रकारें त्यानें होळकरांचा स्नेहभाव संपादिला. एल्फिन्स्टननें क. क्लोजचें वर्णन फारच बहारीचें केलें आहे. क. क्लोजच्या ठिकाणीं अनेक मौल्यवान गुणांचा समुच्चय होता. धिप्पाड व सुदृढ शरीर, शांत वृत्ति, तल्लख बुद्धि, अतुल धैर्य, अढळ नीतिमत्ता, निस्सीम कर्तव्यनिष्ठा, अत्यंत साधी राहणी इत्यादि असामान्य गुणांचा क. क्लोज म्हणजे केवळ पुतळा होता. त्याच्यासारखा चतुरस्र गृहस्थ अलीकडच्या काळांत फारच विरळा.

पुण्यांत चाललेल्या हाणामारीच्या प्रसंगीं क. क्लोज फारच खुबीनें वागत होता. तो कोणाच्याही डोळ्यांत न सलतां आपला मार्ग मोठ्या शिताफीनें आक्रमीत होता. होळकर व अमृतराव यांनीं क. क्लोजला पुणें न सोडण्याविषयीं परोपरीनें सांगितलें. तेव्हां त्यांना न दुखवितां पुणें सोडण्यास त्यानें एक शक्कल लढविली. "पुणें सोडून तुम्ही ताबडतोब निघून या, तेथें राहूं नका असा वरिष्ठांचा हुकूम आला आहे. तेव्हां गेल्यावांचून मला गत्यंतर नाहीं."

असें सांगून तो निघून गेला. या वेळीं क. क्लोज पुण्यास राहता तर अमृतराव पेशवे व होळकर यांच्या उद्योगास इंग्रजांचा पाठिंबा आहे, असा देखावा दिसला असता. तेव्हां तें हाणून पाडण्यासाठीं म्हणून क. क्लोज मोठ्या तांतडीनें निघून गेला. त्याला सक्तीनें पुण्यांत डांबून ठेवणें होळकरास व अमृतरावास अशक्य होतें. बाजीराव पुण्याहून हालतांच होळकरानें पुण्याचा बंदोबस्त केला व अमृतरावास त्याच्या मर्जीविरुद्ध पुण्यास आणून डाव नीट मांडण्याची खटपट चालविली. मागें नारायणरावाच्या वधानंतर राघोबादादा पुणें सोडून निघून गेला त्या वेळीं असाच पेच निर्माण झाला होता. त्याच प्रसंगांची आतां ही पुनरावृत्ति झाली. फरक इतकाच कीं, त्या वेळीं आलेल्या बांक्या प्रसंगांतून पार पडणारे बारभाई होते व त्यांचा प्रमुख नाना हा इंग्रजास बरोबर अंतरावर ठेवून पाउलें टाकणारा मुरब्बी मुत्सद्दी जिवंत होता. पण या वेळीं इंग्रजास अनुकूल परिस्थिति निर्माण झाली. अमृतराव व होळकर यांना हाताशीं धरून साहेबाचें फारसें साधलें नसतें. तेव्हां त्यांनीं धांदरट बाजीरावास बगलेंत मारलें आणि त्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचें ठरविलें. हें करतांना क. क्लोजनें होळकरास यत्किंचितही दुखविलें नाहीं. आपल्या गुप्त बातम्या बाहेर फुटूं नयेत म्हणून बातमीदारांस सांकेतिक भाषेंत संदेश धाडण्याबद्दल त्यानें इशारा दिला. बाजीरावासही त्यानें शक्य तों आपली हद्द सोडून न जाण्याबद्दल आग्रहानें सांगितलें आणि तसें करतां करतां त्यानें इंग्रजांच्या आश्रयास येण्याबद्दल सूचना दिली. अशा तऱ्हेनें त्यानें आपली भूमिका फारच चांगली ठेविली.

श्रीमंत पळाले आणि महाडास गेले. त्याबरोबर होळकरानें आपला खास वकील भास्करराव यास बाजीरावाकडे धाडिलें आणि त्यानें निर्धास्तपणें पुण्यास यावें अशी खटपट चालविली. पण श्रीमंतांस तें मानवलें नाहीं. त्यांनीं चक्कच सांगितलें, "शिंद्यांशीं व तुमच्याशीं आम्हांस कांहींच कर्तव्य नाहीं. इंग्रज बहादूर आमच्या स्नेहाच्या शर्ती चांगल्या स्वच्छ अंतःकरणानें पाळीत आहेत. लवमात्र फरक करत नाहींत, तुम्ही मात्र आतां आपल्या संरक्षणाची काळजी घ्या.

"आमचें पागोटें साहेब संभाळील; पण तुमचा मंदील तुम्ही संभाळा" म्हणून बाजीराव सांगत होता, पण साहेबाच्या जबड्यांत आपण सांपडलों कीं, आपला कपाळमोक्ष झाला याची जाणीव त्याच्या अंतर्यामीं पुरेपूर होती. म्हणून तो महाडाहून जाण्याचें शक्य तों टाळीत होता. लांबणीवर टाकीत होता. पण त्याचें कृतकर्म इतकें जबरदस्त होतें कीं, त्याचा सोटा बाजीरावास एकसारखा ढोंशीत होता. तेव्हां हें उठवळीस आलेलें जनावर ठिकठिकाणीं बुदुक बुदुक पडत पडत शेवटीं नाइलाजानें साहेबाच्या कसाईखान्यांत दाखल झालें. आपणांस कोपऱ्यांत ठेवून यशवंतराव होळकर व अमृतराव राज्यकारभार रेटतील आणि आपण नामशेष होऊं अशी धास्ती बाजीरावास एकसारखी वाटत होती. या त्याच्या स्मशानगीतास त्याची नालायकी एकसारखी सांथ करीत होती. शेवटीं बाजीराव इंग्रजांचे साहाय्यास गेला तेव्हां त्याच्या दीर्घसूत्री मनास असें वाटत होतें कीं, हा प्रसंग निभावला म्हणजे आपण कोणत्या तरी क्लृप्तीनें इंग्रजांच्या पंजांतून सुटूं; पण ही त्याची आशा फोल होती.

सुवर्णदुर्ग अगर विजयदुर्ग यांच्या आश्रयानें कांहीं काल ढकलावा असा विचार नोव्हेंबरच्या आरंभीं बाजीरावाचा होता. "श्रीमंत महाडास आहेत, चार महागिऱ्या आणिल्या आहेत. चार रोजांनीं अमृतराव श्रीमंतांकडे बोलण्यास जाणार, यशोदाबाईस रायगडावरून पुण्यास आणण्याची योजना आहे. श्रीमंतांस हा बेत कळतांच स्वतः रायगडास जाऊन बाईसाहेबांचा बंदोबस्त त्यांनीं केला. माधवराव रास्ते यांस बरोबर घेतलें आहे. रास्ते यास सोडून वस्त्रें दिलीं आणि फौज जमा करून आपले लक्षांत वागावें असें ठरविलें. कप्तान केनडी इंग्रज बाणकोटास होता. तो महाडास येऊन श्रीमंतांस भेटला." होळकरांनीं पठाणाची फौज महाडास रवाना केली, ही बातमी श्रीमंतांस कळतांच त्यांनीं कार्तिक वद्य ३० ता. २५–११–१८०२ रोजीं महाडाहून पायवाटेनें सुवर्णदुर्ग गांठलें. खंडेराव रास्ते खर्चाची पुरवणी करीत बरोबर होते. बाणकोटवाले इंग्रजांचा विश्वास नये. यास्तव एक कोस जलमार्गें जाऊन तेथून पायमार्गें किल्ले हर्णैस गेले. जातांना पानसे, पुरंदरे, विंचुरकर, बिनीवाले व अलीबहादूरचा लेक वगैरे मंडळींस, तुम्हांस जिकडे समजेल तिकडे जावें असें सांगून महाडाहून

परत पाठविलें. बाजीराव सुवर्णदुर्गास गेल्यावर होळकरांची पठाणी फौज मढच्या घाटानें महाडास उतरली. हें वर्तमान बाजीरावास कळतांच तो जास्तच घाबरला व चिमाजी अप्पास घेऊन रास्त्याकडील वसईचे तरांडयांत बसून रेवदंड्यास गेला. तारवांत बसल्यामुळें अप्पासाहेबांस वाखा झाला. वाऱ्यानें तारूं हललें म्हणून रेवदंड्यास आले. येथें बाबुराव आंग्रे येऊन श्रीमंतांस भेटले. त्यांनीं होळकरांचें राजकारण आणलें; पण तें सोडून श्रीमंतांनीं इंग्रजांचें राजकारण पत्करलें.

होळकरानें बाजीरावाचा पाठलाग चालविला. होळकरांची फौज महाडास आली कीं, बाजीराव सुवर्णदुर्गास गेला. होळकराच्या विनंत्यांना मान देऊन तो पुण्यास माघारीं येण्याचें चिन्ह दिसेना. तो आपली हद्द सोडून इंग्रजांचे हद्दींत जाता तर तें होळकर व अमृतराव यांस पाहिजेच होतें. कारण जोंपर्यंत तो जरीपटका घेऊन आपल्या हद्दींत भटकत होता तोंपर्यंत पेशवाईवरील त्याचा हक्क नष्ट होत नव्हता. पण तो परहद्दींत गेल्याबरोबर पेशवाईस धनी नाहीं म्हणून पेशव्यांच्या गादीस धनी निर्माण करण्यास अमृतराव व होळकर हे मुखत्यार होते. हा डाव बाजीराव जाणून होता म्हणून त्यानेंही आपली हद्द सोडली नाहीं; आणि वसईस राहूनच इंग्रजांच्या आश्रयानें सर्व व्यवस्था चालविली. वसईचा तह ठरत असतां इंग्रजांस एकसारखी अशी धास्ती वाटे कीं, शिंदे, होळकर व नागपूरकर भोंसले हे तिघे नवा पेशवा गादीवर बसवितील आणि सर्व मराठमंडळ आपल्याशीं सामना देण्यास आल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां असल्या राजकारणास उठावणीच न मिळावी म्हणून कंपनी सरकारनें शक्य ती खबरदारी घेतली होती.

पुण्यास अमृतरावाचा कारभार चालू होता. इ. स. १७९६ च्या अखेरीस बाजीरावास पेशवाई मिळाली. तोंपर्यंत हे त्रिवर्ग बंधू फार प्रेमानें आणि एकोप्यानें वागत होते. बाजीराव वडील बंधूंचा मान अतोनात राखीत असे. पूर्वापार वहिवाटीस अनुसरून आपण पेशव्यांचा कारभार हाकावा आणि पेशवाईची इभ्रत वाढवावी अशी अमृतरावाची उत्कट इच्छा होती. पण बाजीरावास पेशवाई मिळाली आणि त्याचें सर्व लक्ष स्वेच्छाचार आणि ऐषआरामांतच पूर्णपणें गुंतलेलें दिसलें. आणि त्यापुढें त्याला कशाचीहि पर्वा वाटेना. हें पाहतांच अमृतराव निराश

झाला. तरी पण बाजीरावाच्या राज्यबुडव्या वृत्तीस आळा घालण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग आला तेव्हां तेव्हां त्यानें यत्किंचितही कसूर केली नाहीं. यामुळें दोघां बंधूचें अत्यंत बिनसलें व त्याचा कळस यशवंतराव पुण्यावर चाल करून आल्यावर झाला. पुणें सोडून बाजीराव महाडास गेला तेव्हां अमृतरावानें त्यास माघारीं येण्याविषयीं पत्रें व निरोप धाडिले. आणि भावी अनर्थांची सूचना दिली. या पत्रांना उत्तर म्हणून बाजीरावानें अमृतरावास कोकणांत भेटीसाठीं बोलाविलें. अमृतराव भेटीसाठीं येतांच त्यास अटक करून त्याची तुरुंगांत कायमची रवानगी करण्याचा त्याचा बेत होता. पण हें न जाणण्या-इतका अमृतराव खुळा नव्हता. त्यानें आपलें ठाण पुण्यासच मांडलें आणि यशवंतराव होळकराच्या व जुन्या मुत्सद्यांच्या साहाय्यानें तो राज्याची व्यवस्था करूं लागला.

राजकारणाचीं अनेक चक्रें फिरत होतीं. त्याच्यावर साहेबाचें लक्ष खिळलें होतें. कोणाची शक्ति किती, कोण आपल्याला घातक होईल, हें त्यानें पूर्णपणें हेरलें होतें. अमृतरावाच्या हातांत पेशवाईचीं सूत्रें गेलीं तर आपला निभाव लागणार नाहीं हें साहेब पूर्णपणें जाणून होता. तेव्हां बाजीरावानें या वेळीं इंग्रजाचे आश्रयास न जातां थेट पुण्यास जाऊन यशवंतराव व अमृतराव यांच्या मदतीनें राज्यकारभार चालविला असता तर त्याचे इतके धिंडवडे निघाले नसते व यदाकदाचित् स्वराज्याचा अपमृत्यु टळला असता, असें लॉर्ड वेलस्लीसारख्या मोठमोठ्या साहेबांचें सुद्धां मत होतें.

दौलतरावानें बाजीरावास धीर दिला कीं, ‘ तुम्ही थोडे दिवस निभाऊन न्या, मी आल्याबरोबर यशवंतरावाचा बंदोबस्त करतों.’ बाजीरावानें इंग्रजांच्या आश्रयास जाण्यापेक्षां यशवंतरावाचे आश्रयास जावें, त्यांत कांहीं फारसें बिघडत नाहीं असाच दौलतराव शिंद्याचा मानस होता. दौलतरावाच्या अनेक भानगडींमुळें व त्याच्या सुस्तपणामुळें तो तांतडीनें बाजीरावाच्या मदतीस येऊं शकला नाहीं. आणि बाजीरावाची गाळण उडाली नि वसईचा तह पुरा झाला. यशवंतराव, अमृतराव व पटवर्धन सरदारांचा बंडावा मोडण्यासाठीं त्यानें कंपनी

सरकारची मदत घेतली. पण शिंदे व नागपूरकर भोसले हे अद्यापीहि त्याचे दोस्तच होते.

अमृतराव व यशवंतराव एकदिलानें वागत होते. तरी या धामधुमीच्या काळांत त्या दोघांच्या मागें अनेक लचांडें होतीं. त्यामुळें दोघांचे खटके उडण्याचे प्रसंग वारंवार येत. आतां शनिवारवाड्यांत कारभारीमंडळ व अमृतराव यांच्या बैठकी एकसारख्या होऊं लागल्या. नाना प्रकारची चर्चा सुरू झाली. यशवंतराव होळकराची मुख्य अडचण पैशाची. प्रचंड अशा भुकेकंगाल फौजेचा हा मालक स्वतः कफल्लक झाला होता. फौजेच्या सहस्रावधी मुखांत चारा कसा घालावा याची विवंचना त्याच्या मागें लागली. तेव्हां त्यानें अमृतरावास कळविलें, "मी येऊन तुमचा बंदोबस्त करून दिला. शिंद्याचा पाडाव केला. आतां माझ्या खर्चाची वाट लावा. एक कोट रुपये तुम्ही कबूल केले आहेत ते ताबडतोब द्या." होळकराची मागणी पुरी करावयाची म्हणजे रयत झोडावयाची आणि पैशाची व्यवस्था व्हावयाची. त्याप्रमाणें पुण्यांतील लोकांवर पट्ट्या बसवून पंचवीस लाख रुपये वसूल करण्याचा करार कारभाऱ्यांनीं केला. वसुलीच्या कामावर हरिपंत भाव्याची नेमणूक झाली.

हरिपंत भाव्याच्या मदतीस होळकरानें आपले सरदार नागो जिवाजी, हरनाथसिंग व शेखजी असे दिले. पुण्यांत वसुलीचें काम सुरूं झालें. या सरदारांच्या पठाणांनीं शहरभर नुसती दंगल उडवून दिली. जिकडे तिकडे आरडाओरडा व हाहाःकार उडाला. पुण्यपुरीचें रूपान्तर यमपुरींत झालें. पुण्याच्या लोकांस काय करावें व कोठें जावें तें सुचेना. 'गांवांत एकच हांक झाली. कोणी तंब्या देऊन पैसा देत नाहीं असें झालें म्हणजे त्यास पठाणांचे हवालीं करितात. प्राणांशीं गांठ आहे. श्रीहरीचा कोप प्रजेवर झाला. होळकरांचे लोकांनीं तमाम शहर लुटून घरोघर खणत्या लावून द्रव्य, भांडें, सोनें, रूपें, जवाहिर, कापड यांची लूट केली. तोफखाना लुटला. सोन्याची अंबारी अमृतरावानें होळकरास दिली. पुढें राजकारण सिद्ध होत नाहीं असें अमृतरावास दिसूं लागलें तेव्हां त्यानेंही रात्रीस लोक व कारकून पाठवून लोकांच्या घरांत शिरून, घरें खणून चीजवस्तु जें सांपडलें तें आपल्या डेऱ्यांत नेत गेले. पुण्यांत कोणी नामांकित गृहस्थ पाहून

त्यावर पठाणास वरात देऊन पाठवावें. पठाणांनीं त्यास धरून मारहाण मनस्वी करावी, वीरेश्वरभट कर्वे, व जिवाजीपंत नेने मारतां मारतां मेले. याप्रमाणें शहर बेजार झालें. ' पैसा उकळण्याची ही अत्यंत घाणेरडी चाल त्या वेळीं होती. तीन महिने अशा प्रकारचा कहर करून होळकरानें पन्नास लक्ष रुपये वसूल केले. तरी आणखी पन्नास लाखांचा चरिंदा त्यास पाहिजे होता. तेव्हां या बकासुराची दृष्टी कर्नाटकाकडे वळली. प्रतिनिधीकडून दहा लक्ष रुपये वसूल करण्यासाठीं म्हणून मान्यास पाठविण्यांत आलें. प्रतिनिधींचा आणि मान्याचा संग्राम कैक दिवस चालला होता. पण लवकरच हे राजकारण थंडावलें आणि यशवंतराव पुणें सोडून गेला म्हणून तें सर्वच संपलें.

शिक्का कोणाच्या नांवानें करावयाचा हा मोठा बिकट प्रश्न उपस्थित झाला. पेशवाईला धनी कोण ? असा हा खडखडीत सवाल कारभारी मंडळाच्या पुढें उभा राहिला. होळकरांचें रास्त म्हणणें असें पडलें कीं आम्ही बाजीरावानें माघारीं यावें म्हणून शिकस्तीचे प्रयत्न केले, विनंत्या केल्या, वकील धाडले पण कशाचीहि पर्वा न करतां बाजीराव इंग्रजांच्या आश्रयास गेला. तेव्हां त्याचा नाद सोडून अमृतरावाचा मुलगा विनायकराव बापू यास यशोदा-बाईच्या मांडीवर दत्तक देऊन, त्यास बाळाजी माधवराव म्हणून वस्त्रें द्यावीं, आणि कारभार चालवावा. पण होळकराचा हा विचार अमृतरावास अगदीं पसंत नव्हता. त्याचें म्हणणें असें कीं, जोंपयत बाजीरावानें पदत्याग केला नाहीं तोंपर्यंत त्याला माघारीं आणावा आणि पेशवेपदाची धुरा हांकण्याची त्यास संधी द्यावी. आणि हें सिद्धीस जाईपर्यंत मराठे सरदारांचें एक मंडळ तयार करावें. शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन, रास्ते व नागपूरकर भोंसले एवढे महत्त्वाचे सरदार या वेळीं शिल्लक होते. गायकवाडाचा प्रश्नच नव्हता. कारण त्यानें पूर्वींच इंग्रजाचा आश्रय केला होता. पटवर्धन व रास्ते हे दोघेही अमृतरावास अनुकूल होते. भोसल्याची अनुकूलता होळकरानें मिळविली होती. आणि शिंद्यांशीं मिलाफी करण्याचा प्रयत्न त्यानें आतां चालविला होता. त्यानें शिंद्यांस लिहिलें "पेशवे इंग्रजांचा आश्रय करणार, एणें करून प्रसंग आणीबाणीचा आहे. तुमचा आमचा समेट या समयीं झाला तरच तरणोपाय आहे. तरी पेश-

त्यास परत आणून एकीचा प्रयत्न करावा. " या वेळीं दौलतरावाला होळकरांशीं स्नेह करण्याची सद्बुद्धी झाली नाहीं. दौलतराव आणि बाजीराव हे दोन राहूकेतू मराठी साम्राज्याच्या मार्गे लागले होते. त्यामुळें सर्व दौलतदारांची पुण्याई अपुरी पडत होती, आणि विचारवंतांचे विचार कुंठित होत होते.

बाजीराव निसटला तेव्हां यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन कारभार आटोपावा म्हणून खटपट सुरू झाली, पण यशोदाबाईस रायगडावरून सोडवून आणणें होळकरास साधलें नाहीं. तेव्हां होळकराचा सरदार शहामतखान ता. २०।१।१८०३ रोजीं बाजीराव व चिमाजी यांच्या स्त्रियांस घेऊन पुण्यास आला. त्या प्रसंगीं अमृतरावानें आपल्या भावजयांस सामोरे जाऊन त्यांस वाड्यांत आणिलें आणि त्यांची बरदास्त उत्तम प्रकारें ठेविली. या पूर्वींच विनायकरावाच्या नांवानें वस्त्रें आणण्यासाठीं माणसें सातार्‍यास रवाना झालीं होतीं. तेथें बाजीरावाचा वकील बाळाजी माणकेश्वर बंदोबस्तास होता. त्यानें या कामांत विघ्न घातला. तो अंतस्थपणें छत्रपतीस भिथरवूं लागला. कारण " आंगठीवरील हिरा नवीन बसवावयाचा " म्हणजे बाजीरावास काढण्याची आवई उठली होती व त्यांत थोडेंबहुत तथ्य होतें. तेव्हां बाळाजी माणकेश्वरानें छत्रपतीकडून वस्त्रें देण्यास हरकत घेववली. म्हणून होळकरांचा सरदार फत्तेसिंग माने यानें तोफखाना घेऊन सातार्‍यावर चाल केली. त्याबरोबर हे नामधारी छत्रपति गडबडले व त्यांनीं होळकरांस पाहिजे होती तशी उडी पटकन् टाकली व ता. २२।१२।१८०२ रोजीं वस्त्रें दिलीं. बाजीराव वसईस असतां पुण्यास नव्या पेशव्याचीं वस्त्रें दाखल झालीं. पण यशोदाबाईस आणण्याचें न साधल्यानें दत्तविधान होईना. आणि दत्तविधान नाहीं म्हणून बाळाजी माधवराव हें नांव धारण करतां येईना म्हणून हा घोळ तसाच पडला व तीं वस्त्रें पर्वतीवर तशींच पडून राहिलीं आणि इतःउत्तर छत्रपतींवर वस्त्रें देण्याचा प्रसंगच आला नाहीं.

वसईचा तहनामा झाला, तो बाजीरावानें मनापासून केला नाहीं. त्याचा पर्याय असा कीं, शिंदे–भोसले यांचा विचार घेऊन तह करावा. त्यावरून क. कलुष यांनीं धाक घातला कीं, अमृतराव व होळकर यांच्याशीं इंग्रजसरकारचा तहनामा झाल्यास मग आम्हांकडे शब्द नाहीं. असें बोलल्यावरून बाजीरावानें

तहनामा पुरा केला आणि शिंद्यांस लिहिलें कीं, तुमचा पल्ला दूर पडल्यानें वखत सक्त पाहून तहनामा केला. तहनाम्याची नक्कल पाहून भोसल्यांस चांगलें वाटलें नाहीं."

बाजीरावानें आपली मान इंग्रजांच्या हातीं दिल्याचें वृत्त पुण्यास ताबड-तोब कळलें. त्याबरोबर औदासीन्याची छटा पुण्याच्या कारभारी मंडळावर पसरली. लगेच २।१।१८०३ रोजीं पुण्यांत मंडळ बसलें. अमृतराव होळकर, त्याचा दिवाण गणपतराव, मीरखान, बाबा फडके, मोरोबादादा फडणवीस वगैरे मंडळी एकत्र जमून विचार करूं लागली. होळकर बोलला, " बाजीरावानें राज्य बुडविलें. इंग्रज आतां म्हैसूरचा प्रकार पुण्यास करणार. आपण प्रथम शिंद्यांस विचारावें कीं, तुमच्या सल्ल्यानें हा प्रकार झाला कीं काय ? शिंद्यांनीं त्यास कबुली दिली नसेल तर आपण सर्वांनीं एक होऊन इंग्रजांशीं सामना द्यावा. " हा विचार पसंत पडून त्याप्रमाणें अमृतरावानें इंग्रजांस व शिंद्यांस पत्रें लिहून रवाना केलीं आणि रायगडावर फौज पाठवून दत्तविधानासाठीं यशोदाबाईस आणण्याचा प्रयत्न सुरू केला.

पेशवे दरबारांत असे तेजस्वी विचारांचे निखारे नुसतेच रखरखत होते. पण त्यावर कृतीचा फुंकर मारून त्यांतून ज्वाला भडकवून त्यांत कंपनी सरकारच्या सामर्थ्याची राखरांगोळी करण्याची धमक कोणांतही दिसत नव्हती. पण तिकडे कंपनी-सरकारनें मात्र आतां मिशांस चांगलाच पीळ भरला होता. या वेळीं ग. ज. लॉर्ड वेलस्ली होता. त्याच्यासारखा जबरदस्त पुरुष ग.ज. च्या जागीं अद्यापपर्यंत आला नव्हता. आपल्या राष्ट्राच्या भाग्याची नौबद झडावी म्हणून अहर्निश झटणारा, वाटेल तसलें संकट अंगावर घेऊन त्यांतून पार पडण्याची पल्लेदार दूरदृष्टि अस-णारा, हातीं असणाऱ्या चतुरंग साधनांची गुंफण करून त्या आयुधांचा स्रोत योग्य ठिकाणीं चालू करण्याची अपूर्व कार्यकुशलता असणारा, कामाचा उरक, पराकाष्ठेचा आत्मविश्वास, जबाबदारी अंगावर घेण्याची उत्सुकता, दरक्षणीं बदलणाऱ्या परिस्थितीस तोंड देण्याची धमक, अकुंठित कल्पकता, विरोधकास नमविणारी लेखनशैली अशा अनेक सद्गुणाचा मुक्ताहार लॉर्ड वेलस्लीच्या गळ्यांत रुळत होता. तेव्हां हा हिंदुस्थानाच्या भवितव्यांत इंग्रजांचें भाग्य

उजळणार हें स्पष्ट होतें, आणि त्यानें अधिकाराचीं सूत्रें हातीं घेतल्यापासून कामाचा धडाकाही तसाच चालू केला होता. हिंदुस्थानांत माजलेल्या बजबज-पुरीस आळा कसा घालावा आणि त्याचें नेतृत्व आपणाकडे कसें आणावें हा एकच विचार इंग्रज मुत्सद्यांच्या पुढें होता. कोणीतरी सर्वांचीं हाडें मोकळीं करणारा असा जबरदस्त सत्ताधीश पाहिजे होता, व तोच ही परिस्थिति आंवाक्यांत आणील हें ठाम होतें. नाना होता तोंपर्यंत पेशव्यानें हें सामर्थ्य उपभोगिलें, तो दिवंगत होतांच तें सामर्थ्य आपल्या हातीं आणण्याचा उद्योग लॉर्ड वेलस्लीनें चालविला. त्यानें तैनाती फौजेची युक्ति काढली. बाजीराव इंग्रजाचे आश्रयास येतांच त्यानें तैनाती फौजेच्या सामान्य तहांत तुम्ही सामील व्हा असें पत्र शिंद्यांस धाडिलें, इतक्यांत बाजीरावानें वसईचा तह पुरा केला. त्याची नक्कल ता, ९।१।१८०३ ला दौलतरावाकडे धाडण्यांत आली. बंडखोरांचें पारिपत्य करून बाजीरावास पेशवाईवर स्थापण्यासाठीं इंग्रज फौज जाईल त्या वेळीं तुम्हीही आपली फौज बरोबर नेऊन हा कार्यभाग तडीस नेण्यासाठीं मदत करा अशी विनंति शिंद्यांस करण्यांत आली. या विनंतीस दौलतरावाकडून उत्तर आलें कीं, " इंग्रज सरकारची व आमची दोस्ती पूर्वापार आहे, आम्ही आपली फौज घेऊन लवकरच दाखल होतों, मग आपण बंडखोरांचे पारिपत्याचा विचार करूं. " यावरून बाजीरावाला पेशवेपदावर स्थापण्यास शिंद्यांचा विरोध नाहीं, हें साहेबानें ताडलें.

वसईच्या तहास तोंड काय द्यावी या विवंचनेंत सरदारमंडळाचे दोन महिने गेले. पुण्यांत होळकर व अमृतराव पेशवाईची नवी व्यवस्था करीत होते. पण तिकडे वसईस बाजीरावानें इंग्रजाच्या मागें निकड लाविली कीं मला पुण्यास पोंचवा; पण इंग्रजास हें लगोलग करतां येईना. कारण निकराचें युद्ध झाल्याशिवाय बाजीरावाची पुण्यास पेशवाईवर स्थापना होणें शक्य नव्हतें. म्हैसूर–कलकत्त्याहून इंग्रजाच्या फौजा पुण्यास येण्यास विलंब लागणार होतां तेव्हां पुण्यास जाण्यापूर्वीं कागदी घोडे नाचवून धाक निर्माण करण्याच्या उद्योगास इंग्रज लागला. असें होतें तरी बाजीराव शिंद्यांस लिहीतच होता कीं, " माझा नाइलाज झाला व मी इंग्रजाच्या स्वाधीन झालों तरी तुम्ही सत्वर येऊन

शत्रूचें निवारण करावें. " त्याप्रमाणें शिंदा फौजा घेऊन ता. ४।२।१८०३ ला नर्मदापार झाला. त्यानें बऱ्हाणपुरास ता. २३।२।१८०३ ला तळ टाकला व पुढील मोहिमेसाठीं नागपूरकर भोंसल्यांस सामील करून घेण्याकरितां खटपट चालविली.

इंग्रजाविरुद्ध जूट करून निकराचा सामना देण्याचें पुण्याच्या मंडळीचें मुक्रर झालें होतें. बाजीराव नादान, त्याच्या हातून राज्य संभाळणें नाहीं. त्यांतून साहेबाच्या घरांत तो शिरला म्हणून तर सर्वच त्याच्यावर नाखूष होते; पण शिंद्यास यशवंतरावाची भीति वाटे. सर्जेराव व बाळाजी कुंजीर हे दोघे यशवंतरावाच्या विरुद्ध शिंद्याकडे खटपट करीत होते. आपण आपल्या पलटणाच्या जोरावर इंग्रज व यशवंतराव या दोघांस मोडून काढूं असें दौलतरावास वाटत होतें म्हणून तो युद्धाची तयारी करीत बऱ्हाणपुरास थांबला; पण त्यांतच त्याचा व मराठमंडळाचा घात झाला आणि राजकारण नासलें, यापेक्षां शिंदा लगोलग पुण्यास येता व मराठमंडळाच्या जुटींत सामील होता तर इंग्रज टरकला असता, किंवा तडक बाजीरावाकडे जाऊन त्याची समजूत पाडून त्यास पुण्यास आणता तर हा सर्वच घोळ मिटला असता. पण यापैकीं त्यानें कांहीं एक केलें नाहीं. नुसतेंच होळकर व इंग्रज यांना आपण मोडून काढूं या खोट्या धुंदींत आणि नागपूरकर भोंसल्याला मिळवून घेण्याच्या नादांत त्यानें बऱ्हाणपुरास काळ काढला.

मराठ्यांच्या दिरंगाईचा आणि दीर्घसूत्रीपणाचा फायदा साहेबानें बरोबर घेतला. वसईचा तह होतांच इंग्रज बाजीरावास पेशवेपदावर स्थापन करण्याच्या तयारीस जोरानें लागले. आतां युद्धाच्या तयारीनें दक्षिणेचें वातावरण दुमदुमूं लागलें. पुण्यावर चाल करण्याची तयारी आज दोन वर्षे इंग्रज करीत होता. वीस हजार फौज हरिहर येथें ठेवून त्याची कडेकोट तयारी त्यानें केली होती. त्या फौजेचा सेनापति स्टुअर्ट हा होता. इंग्रजाची दुसरी फौज निजामाचे हद्दीवर पारिंड्यास जमली. ती एकंदर तेवीस हजार होती. या सेनेचा सेनापति स्टिव्हन्सन् होता. तिसरी फौज मुंबईस कॅ. मरेच्या हाताखालीं जमा झाली. ती तीन

हजार होती. चौथी फौज से. लेकच्या हाताखालीं कानपुरास तयार झाली. या वेळीं एकंदर इंग्रज फौज़ साठ हजारांवर होती. ता. ९·३-१८०३ रोजीं से. वेलस्लीनें हरिहर सोडलें. ता. १२ रोजीं तो तुंगभद्रापार झाला. ता. १५–४– १८०३ ला से. वेलस्ली व स्टीव्हनसन यांची अकलूज येथें भेट होऊन ते दोघे गारदौंडावर आले. आणि ता. २० एप्रिलला से. वेलस्ली पुण्यास येऊन दाखल झाला. पुण्यास वातावरण शांत आहे असें पाहिल्यावर त्यानें वसईला निरोप धाडला. त्याबरोबर बाजीराव ता. २७ एप्रिलला क. क्लोजसह वसईहून निघाला व ता. ६–५–१८०३ ला चिंचवडास दाखल झाला.

सेनापति वेलस्लीनें हें काम मोठ्या शिताफीनें पार पाडलें. पुण्याकडे येतांना मराठी हद्दींत प्रवेश करतांच त्यानें तमाम लोकांस जाहीर होण्यासाठीं एक जाहीरनामा काढला. “ता. १९–३–१८०३ सर्व लोकांस जाहीर व्हावें कीं, बाजीराव पेशवे यांनीं आपले दोस्त कंपनी बहाद्दर यांस आपले कुमकेस्तव बोलावूं पाठविलें. त्यावरून वरील बहाद्दर मराठ्यांचे मुलखांत दाखल होत आहेत. यांत ते कोणाच्या दुष्मनागिरीस अगर मुलूखगिरीस येत नाहींत. दोस्तासारखे येत असों. या कारणें तमाम लोकांनीं आपले ठिकाणीं बेफिकीर असावें. मामलेदार, पाटील, कुलकर्णी, देशमूख, देशपांडे वगैरेंनीं वेलस्ली साहेबाजवळ रुजूं व्हावें. गांवाजवळ लष्कर उतरल्यास रखवालीस अदमी देत असो. मागें तीन वर्षांखालीं वेलस्लीसाहेब आले, तेव्हां लष्करांत चहूंकडे कैशी ताकीद होती त्याची याद मराठियांस असेल. आतांही तसाच बंदोबस्त राहील. लष्करास धान्य, लकडी वगैरे जिन्नस लागेल तो किंमत घेऊन देणें जरूर आहे. कंपनीचे दस्तुर माफक मालास पुरी किंमत मिळेल. हर कोणासही इजा न होईल जाणिजे.” या जाहीरनाम्यानें रयतेचा विश्वास संपादन करण्याचा यशस्वी प्रयत्न साहेबानें केला. त्याच्या या चालीचा फायदा त्यास पुरेपूर झाला.

से. वेलस्लीनें आपला तळ संगमाजवळ टाकला. तेथें दारूगोळ्याचें दस्तान केलें. ‘ विठ्ठापा बदामीकर व वेलस्ली श्रीमंतांस आणण्यास चिंचवडास जात आहेत. ता. २२–४–१८०३ ला खासा वस्ती शनिवारवाड्यांत सायंकाळचे

येऊन दिवाणखान्यांत बैठक झाली. ता. ३१ मार्च रोजीं संजीवनी (अमृतराव) सर्व अजबाब घेऊन जुन्नराजवळ जोरवें येथें गेले, त्यामुळें वेलस्लीस पर्वतासारखें हास्य झालें. बाजीराव चिंचवडास आला होताच. तेथें से. वेलस्लीनें त्याची भेट घेतली व त्यास सन्मानानें पुण्यास आणून ता. १३–५–१८०३ रोजीं शनिवारवाड्यांत, हिज हायनेस बाजीराव पंडित प्रधान बहाद्दर यास पेशवाईपदावर प्रविष्ट केलें; आणि अधिकार धारण केल्याचा जाहिरनामा काढिला. या प्रकारानिमित्त वाड्यांत वस्तीच्या मुक्कामावर व मुंबई, सुरत, कलकत्ता, श्रीरंगपट्टण इत्यादि ठिकाणीं खुशालीच्या तोफांची प्रचंड सरबत्ती झडून हा एकंदर प्रकार तमाम हिंदुस्थानास जाहीर करण्यांत आला.'

पेशवा अमृतराव : ६

कंपनी सरकार आणि पेशवे यांचा तह झाला. तहाच्या खलित्यावर सह्या झाल्या. हस्तांदोलनें झालीं. खुशीच्या तोफा झाल्या. आतशबाजीचा तमाशा सुरू झाला. जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला; पण या आनंदाचें स्वरूप फार निराळें होतें. साहेब हांसत होता आणि पेशवाही हांसत होता. पण पेशव्याचें अंतःकरण मात्र ढसढसा रडत होतें; आणि साहेबाचें सर्वांग आनंदानें पुलकित होऊन खदखदा हांसत होतें. शनिवारवाड्यांत पेशवेपदावर पेशवा बसला, या प्रकाराबद्दल खुद्द वाड्यांत, वेलस्लीच्या मुक्कामावर व मुंबई, सुरत, कलकत्ता, मद्रास, श्रीरंगपट्टण या ठिकाणीं प्रचंड तोफांच्या सरबत्तीद्वारें साहेबानें आपलें हें विराट हास्य हिंदुस्थानभर प्रगट केलें.

मराठ्यांच्या दौलतीस व स्वराज्यास यदाकदाचित पर्वतासारखा आधार ज्या अमृतरावामधून निर्माण झाला असता तो अमृतराव ता. ३१ मार्च रोजीं सर्व अजबाब घेऊन जुन्नरचे जवळ जोरवे येथें पसार झाला हें पाहून वेलस्लीस पर्वतासारखें हास्य झालें हें मागें सांगितलेंच आहे. खरोखरीच डोंगरासारखें हास्य निर्माण होण्यासारखाच तो प्रसंग होता. कारण अमृतराव त्या तोलाचा इसम होता. त्याची बुद्धी होती त्यापेक्षां ती आणखी जास्त जरा पल्लेदार असती, एकदां बिनसलें कीं तेंच वासत बसण्याची आणि मरेतोंपर्यंत खुनशीपणानें सूड घेण्याची दुष्ट बुद्धि बाजीरावांत नसती, व वेलस्लीसारखा कर्तृत्ववान व व्यवहारचतुर

माणसाची व अमृतरावाची गांठ न पडती तर या अमृतरावानें मरणोन्मुख पडलेल्या मराठी दौलतीस संजीवन दिलें असतें असें म्हणण्या इतपत अमृतरावाचें कर्तृत्व होतें.

बाजीरावानें अमृतरावास प्रथम ता. १।१०।१७९८ रोजीं सात लाखांची जहागीर तोडून दिली. आणि त्या वेळीं झालेले इतर करारही पुरे केले. अशा स्थितींत चार दोन वर्षें जातात न जातात तोंच यशवंतरावाची चाल पुण्यावर झाली. आणि बाजीरावानें पुणें सोडलें त्याबरोबर विनायक अमृताचे नांवानें वस्त्रें आणिलीं आणि त्याच्या नांवानें पेशवाईचा कारभार चालू झाला; ही गोष्ट लक्षांत येतांच बाजीरावाचा राग पराकोटीस पोहोंचला व अमृतरावास खाऊं का गिळूं असें त्यास झालें. वसईच्या तहावर सह्या झाल्यानंतर बाजीरावास बरोबर घेऊन वेलस्ली पुण्यास दाखल झाला. त्याबरोबर अमृतराव आपली फौज घेऊन जुन्नरवरून नाशीकचे बाजूस लूटमार करीत काळ कंठूं लागला. तरी पण त्याचें मन वसईच्या तहांतून काय निर्माण होतें व त्यानंतर आपण कोणता मार्ग स्वीकारावा याचा विचार सावधान चित्तानें करीत असतां इंग्रजाविरुद्ध मराठमंडळाच्या जुटीचा बनाव बनूं लागला. आणि या वेळीं नेमकें जें घडावयास नको होतें तें घडलें. अमृतराव वेलस्लीच्या हातीं लागला आणि राजकारणाचें वाटोळें झालें.

इ. स. १८०३ चे जुलै व ऑगस्ट हे दोन महिने शिंदे व होळकर यांचा मुक्काम खानदेशच्या हद्दीवर दहा पांच कोसांच्या अंतरानें एकामेकानजीक होता. भारतवर्षातील सर्व दौलतदारांस ग्रासूं पाहणारें हें ताम्रमुखी अरिष्ट बळावतें कीं नाहींसें होतें या विचारांत विचारवन्तांचीं मनें गुंग असतां एकदम अशी आवई उठली कीं शिंदे–होळकरांच्या गांठी–भेटी होऊन दिलसफाई झाली. आणि अरिष्ट टळलें. पण ती आवईच ठरली. आणि इंग्रज बळावला. कारण या आणीबाणीच्या प्रसंगीं कंपनी सरकारचीं सूत्रें चालविणारा मुख्य सूत्रधार वेलस्ली होता. त्यानें युक्तीप्रयुक्तीनें अमृतरावाशीं सूत्र जमविलें व त्याच्या मार्फत मराठमंडळांतील तडफदार व बलशाली सरदार यशवंतराव होळकर

यास मोठ्या शिताफीनें अलग केलें. त्याबरोबर मराठमंडळाची जूट गडगडली आणि साहेब निर्धास्त झाला.

शिंदे आणि होळकरांचा समेट नागपूरकर भोंसल्यांनीं घडवून आणण्याचा घाट घातला. इतकेंच काय पण तो यशस्वी होण्याच्या मार्गास लागला होता. तीं दोन प्यादीं जवळ आलीं. दिलसफाई झाल्याची बातमी उठली; पण कोठें माशी शिंकली कोण जाणे! हा समेट न होतां होळकर माघारीं फिरला. याचें कारण अमृतराव. याची स्पष्टता मराठी कागदांत नाहीं; पण ती इंग्रजी पत्रांत दिसून येते. या प्रकरणांत अमृतरावाचा संबंध असेल अशी शंका सुद्धां कोणास येणार नाहीं. इ. स. १८०३ च्या जुलईंत होळकर तापी उतरून उत्तरेंत जात असतां त्यानें शिंद्यास मिळण्यासाठीं दक्षिणेकडे तोंड फिरविलें व तो एक–दोन मजला अलीकडे आलाही. पण एकाएकीं कानमंत्र मिळून तो झटकन् अंग झटकून तडाक्यानें उत्तरेकडे निघून गेला. तो कां व कसा गेला त्याची हकीकत अशी : होळकरांच्या साहाय्यानें पेशवेपदावरून आपली उचलबांगडी करणाऱ्या अमृतरावाचा पुरेपूर सूड घेण्याची इच्छा बाजीरावाची होती. पण ती कधींच तृप्त झाली नाहीं. कारण अमृतरावानें वेलस्लीचा आधार घेतला. अमृतरावासंबंधीं बाजीरावानें इंग्रजाकडे वारंवार तक्रारी केल्या. आकाशपातळ एक केलें आणि वेलस्लीनें सालीना आठ लाखांची नेमणूक अमृतरावास दिली ती बंद पाडण्यासाठीं जंग जंग पछाडले. हें प्रकरण इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या दरम्यान कैक वर्षें धुमसत होतें. बोर्ड ऑफ कंट्रोलनें या प्रकरणीं वेलस्लीस बरेंच छेडलें तेव्हां त्यानें त्यास ता. २७–३–१८०८ रोजीं खालील आशयाचा जबाब पाठविला.

‘अमृतराव हा बाजीरावाचा दत्तक बंधु. राज्यकारभारांत तो फार हुशार आणि परिस्थिति जाणणारा. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर पुण्यांत ज्या भानगडी झाल्या त्या वेळीं त्याचें वर्तन मोठें चाणाक्षपणाचें होतें. त्या वेळच्या मराठमंडळांत अमृतरावाच्या तोडींत बसेल असा कोणी इभ्रतदार गृहस्थ नव्हता. पूर्वी नाना फडणीसाचे बाजूस असलेली सर्व मंडळी हल्लीं अमृतरावाचे लगामीं आहेत आणि या मंडळांत व्यापारी, मुत्सद्दी, सावकार यांचाच भरणा आहे. बाजीरावाचे चाळे खुद्द अमृतरावास व इतर मंडळींस बिलकूल पसंत

नव्हतें. होळकरानें पुण्यावर चाल केली त्यांत त्यास यश मिळालें याला कारण अमृतरावाचा पाठिंबा. बाजीराव पुणें सोडून गेल्यावर मागें अल्प काळ पुण्याचा कारभार अमृतरावानें व्यवस्थित केला. अमृतरावाचा मुलगा विनायकराव बापू यास पेशवाईवर स्थापून नवीन कारभार रंगारूपास येणार तोंच बाजीरावानें वसईचा तह करून अमृतरावाचा बेत हाणून पाडला. बाजीरावास पेशवेपदावर अधिष्ठित करण्यासाठीं फौजा घेऊन मी पुण्याकडे चालून आलों तेव्हां इ स. १८०३ च्या एप्रिलांत यशवंतराव होळकर पुणें सोडून गेला आणि मागोमाग माझ्या फौजेपुढें निभाव लागेना म्हणून अमृतराव नाशिकच्या बाजूस पसार झाला.

' बाजीरावाची स्थापना पुण्यास झाली पण त्या वेळेपासून एकच विषय माझ्या चित्तास छेडीत होता. तो म्हणजे बाजीरावाचा कारभार आमच्या मदतीशिवाय सुरळीतपणें चालविणारी एकादी व्यवस्था निर्माण करून आपण निघून जाण्याचा. त्या वेळीं पुण्याचा रेसिडेन्ट कर्नल क्लोज होता. त्याच्या व माझ्या विचारानें असें ठरलें कीं अमृतरावाशीं वैर ठवण्यांत बाजीरावाचें नुकसान आहे. तेव्हां त्याची समजूत घालून या दोघां भावांत सलोखा निर्माण करावा व अमृतरावास परत कारभारांत घ्यावा, म्हणजे बाजीरावाच्या मार्गांतील मोठीच धोंड नाहींशी होईल व त्याचा जम चांगला बसेल. तेव्हां यासंबंधीं अमृतरावाशीं बोलाचाली करण्याचा प्रसंग लगोलग आला. कारण अमृतराव निघून गेला तेव्हां त्याची कांहीं जिनगी माझ्या लष्कराच्या हातीं लागली. ती माघारीं देण्याविषयीं अमृतरावानें माझ्याकडे मागणी केली. या प्रसंगानें माझें त्याच्याशीं दळणवळण व बोलणें-सवरणें चालूं झालें. मुख्य मुद्याचा विषय निघाला. पण आम्ही ठरविलेली योजना बाजीरावास एकदम अमान्य होती. अमृतराव म्हणतांच बाजीरावाच्या सर्वांगाचा भडका उडे ! त्याच्याविषयीं त्याच्या मनांत जहर द्वेष होता. एकंदर राज्यांत अमृतरावाची इभ्रत फार मोठी होती, ही एकच गोष्ट त्याचा द्वेष करण्यास बाजीरावास पुरेशी होती. बाजीरावाची समजूत घालण्याचा प्रयत्न आम्ही केला पण त्यांत यश आलें नाहीं. अमृतरावास कारभारांत घेणें नसेल तर त्याची नीट व्यवस्था लावून त्यास दूर ठेवावें असें आमचें बाजीरावास आग्रहाचें

म्हणणें होतें आणि तें रास्तही होतें. अमृतरावासंबंधीं ही खटपट चालू असतां मी त्यास विचारलें होतें कीं, त्यानें त्याचें म्हणणें स्पष्टपणें आम्हांस लेखी कळवावें, म्हणजे बाजीरावाशीं तडजोड करून निकाल लावूं.

'अमृतरावाचें मागणें रास्त होतें. वसईतहापूर्वीं त्याची जी व्यवस्था होती तीच कायम ठेवावी व तहानें झालेलें नुकसान त्याचें त्यास भरून मिळावें, हा मुद्दा ध्यानांत धरून तहाच्यापूर्वीं अमृतरावाची जी आदा होती ती त्याची त्यास बाजीरावाकडून ठरवून देण्याचा प्रयत्न आम्ही चालविला. ह्या संबंधीं झालेला पत्रव्यवहार कोर्टासमोर आहेच. याशिवाय आणखी कांहीं कागदपत्र पुण्याच्या रेसिडेन्सीच्या दप्तरांत असतील त्यावरून आपल्या लक्षांत येईल कीं, पूर्वीं बाजीरावानें गोदातीरीं अमृतरावास जहागीर नेमून दिली होती, तिचें सालीना उत्पन्न चार लाखाचें होतें. त्याशिवाय पुरंदर, सावनूर तालुका व सुरत येथें त्याचीं कांहीं उत्पन्नें होतीं. त्या सर्वांचा वसूल तीन लाखांचा होता. गोदावरीकडील प्रदेश त्याच्या ताब्यांत असून त्याचे भरीस आणखी चार लाखांची मागणी त्यानें पेशव्यास केली. पण या प्रकरणीं बाजीरावाचा बेत कांहीं निराळाच होता. अमृतरावास हिकमतीनें कैद करण्याचें त्याच्या मनांत होतें. तेव्हां तो त्याच्याकडे लक्ष देईना. असें जरी होतें तरी अमृतरावानें माझा नाद सोडला नाहीं. आणि माझ्याहि मनांत अमृतरावासारख्या इभ्रतदार माणसास ठाणबंद करण्याचं होतेंच. तेव्हां माझही वागणें त्या दृष्टीचें होतें. अशा स्थितींत शिंदे व भोसले यांच्याशीं आमचें युद्ध सुरू झालें. तेव्हां प्रथम अमृतरावाची व्यवस्था लावण्याची निकड उत्पन्न झाली. औरंगाबादेकडे अजिंठा घाटाचे उत्तरभागीं शिंदे-भोसले युद्धाच्या तयारीनें खडे होते. होळकराचा व त्यांचा समेट होऊन तोहि त्यांना सामील होण्याच्या बेतांत होता. गोदावरीच्या अलीकडे अहमदनगरचा मजबूत किल्ला शिंद्याचे ताब्यांत होता. तेथून पुण्यास येऊन बाजीरावास बगलेंत मारून पुन्हा आमच्याशीं सामना देण्याचा डाव शिंद्यास साधता तर त्यानें आम्हांस उखाड दिली असती. खुद्द बाजीराव त्यास आमचेवर गुप्तपणें उठवीत होताच. ता. १२ ऑगस्ट रोजीं अहमदनगरचा किल्ला आमचे हातीं पडला. त्याच्या दुसरेच दिवशीं आठ लाखांचा जहागिरीचा करार मी अमतरावास लिहून दिला.

आणि माझ्या पिछाडीवर हल्ला करणारा एक शत्रु नाहींसा केला. युद्ध होऊन गेल्यावर आतां या करारावर असा आक्षेप घेण्यांत येत आहे कीं, अमृतरावाजवळ अशी काय फौज होती कीं त्याची दहशत मला वाटावी ? यासंबंधीं मी वेळोवेळीं जी हकीगत लिहून ग. ज. व रेसिडेन्ट यांच्याकडे पाठविली आहे ती पाहावी. म्हणजे अमृतराव माझ पिछाडीस मोकळा राहिला असता तर आमच्या पुढील हालचालींस केवढा धोका होता याची चांगलीच कल्पना येईल, याखेरीज आणखी कित्येक मुद्दे आहेत ते या आक्षेपकांच्या लक्षांत आलेले नाहींत.

'इ. स. १८०३ च्या जुलै-ऑगस्टांत अमृतराव नाशीकचे बाजूस डोंगराळ व पावसाळी मुलुखांत दंगल करीत भटकत होता. मी नगरहून पुढें गोदावरीकडे चालून जात असतां मागून तो आमच्यावर केव्हां चालून येईल याचा नेम नव्हता. मुख्य मोहीम सोडून त्याचे पाठीस लागणें केवळ अशक्य होतें. शिंद्यावर चालून जाण्यांत एका क्षणाचा विलंब होता तर मोठीच फसगत झाली असती. शिंदे–भोसल्यांचे बेत पूर्णपणें सिद्ध होण्यास मी त्यांना सवड दिली नाहीं, म्हणूनच मला यश आलें. या बांक्या प्रसंगीं अमृतरावानें मागें राहून माझा पुण्याचा पाया केव्हांच ढांसळून टाकिला असता. या माझ्या पुणें-कारस्थानाच्या पायांतील शेवटचा दगड थेट म्हैसूरपर्यंत पोहोंचला होता. अमृतरावाच्या एका करणीनें तो सर्व व्यूह जमीनदोस्त झाला असता. पटवर्धन, रास्ते, निपाणकर वगैरे कर्नाटकांतील यच्चयावत् जहागिरदार मी कसेतरी तारून धरले होते म्हणूनच मला भोंसल्यावर निर्धास्तपणें चढाई करतां आली. या जहागिरदारांवर अमृतरावाचें मोठें वजन होतें आणि बाजीरावापेक्षां ते अमृतरावासच जास्त मान देत. अशा स्थितींत अमृतरावास टांगणीं ठेवून नाखूष ठवणें फारच धोक्याचें होतें. कारण दक्षिणेंतील तमाम जहागिरदारांस उठवून अमृतरावास आपल्याविरुद्ध हालचाली करण्याची संधी देण्यानें आम्ही आमची संधी कायमची गमाविली असती. अमृतरावाच्या प्रत्यक्ष फौजेपेक्षां मराठमंडळावरील त्याचें वजन आम्हांस फार जाचक होतें. या सर्व बाबी सोडून दिल्या तरी अमृतरावानें आमच्यासाठीं बजाविलेल्या एका कामगिरीची किंमत इतकी बिनमोल आहे कीं त्यास देण्यांत आलेली आठ लाखांची जहागिरी तिच्या पासंगालाही पुरणार नाहीं. ती कामगिरी येणेंप्रमाणें:

'यशवंतरावासारखा कल्पक व धाडसी सेनानी आपल्या बाजूस मिळवून घेण्याचे आटोकाट प्रयत्न सर्व जाणत्या सरदारांचे एकसारखे चालू होते. आणि तो जर शिंदे व भोसले यांस येऊन मिळाला असता तर त्या तिघांशीं सामना देण्याची ताकद माझ्या अंगांत नव्हती. या विवंचनेंत मी असतां कशाही प्रकारें होळकराची समजूत काढा अशा मतलबाचें एक महत्त्वाचें पत्र शिंद्यानें पुण्यास बाजीरावास लिहिलें होतें. तें मध्येंच अमृतरावानें पकडलें. अशीं आणखी पुष्कळ दौलतरावाचीं व बाजीरावाचीं पत्रें मध्येंच अमृतरावानें पकडून दिलीं. त्यांचा मला अत्यंत उपयोग झाला. याचमुळें बाजीरावाचा अमृतरावावर मोठा रोष झाला. त्या पत्रांत बाजीरावास शिंद्यानें असा मजकूर लिहिला होता कीं, तूर्त तुम्ही होस हो करून कशी तरी होळकरांची समजूत काढा म्हणजे प्रथम सर्व मिळून इंग्रजांचा धुव्वा उडवून वसईचा तह झुगारून देऊं. एकदां इंग्रज ठिकाणीं बसला कीं मग भोंसले व आम्ही मिळून होळकरास हलका करूं. त्यास तुमच्या चरणीं दाखल करूं म्हणजे मग तुम्हांस त्याची वाटेल ती गत करतां येईल. हें पकडलेलें पत्र अमृतरावानें माझ्या सांगण्यावरून होळकराकडे लगोलग धाडलें आणि त्याचा परिणाम माझ्या अपेक्षेप्रमाणें शेंकडा शंभर टक्के झाला. भोसले व शिंदे या उभयतांस मिळण्यासाठीं दोन मजला अलीकडे चालून आलेला होळकर हें पत्र हातीं पडतांच ताडकन् माघारीं फिरला व नर्मदेपलीकडे जाऊन शिंद्याचा मुलूख लुटीत राहिला. त्याच्या डोळ्यांत झणझणीत अंजनच पडलें. इतकेंच काय पण शिंद्याशीं आमचें युद्ध दोन–तीन महिने चालून त्याचा पाडाव होईपर्यंत तो आमच्याशीं मित्रत्वानें वागला. यावरून सहज लक्षांत येईल कीं, अमृतरावाशीं त्याच्या नेमणुकीचा करार मी केला तो अत्यंत योग्य व जरूर होता. त्यामुळेंच आमचा युद्धांत निभाव लागला.'

एरवीं लंब्या–चवड्या गप्पा मारणारे आम्ही ऐन वेळीं अवसानघातकी ठरतों हेंच खरें ! पेशवाईची किंवा मराठी दौलतीची गेलेली इभ्रत माघारीं आणण्यासाठीं धडपडणारा अमृतराव शेवटीं स्वार्थी बनला. पेशव्याची दौलत पेशव्यासकट इंग्रज लाटणार असें पाहतांच अमृतरावानें आपली पगडी फिरविली आणि स्वतःची सात लाखांची नेमणूक राखली इतकेंच. यापेक्षां त्यानें तरी

काय मिळविलें ? वेलस्लीच्या लाघवी वागणुकीस व भुलथापांस न जुमानतां तो स्वत: जातीनें होळकरास व भोंसल्यास भेटता आणि त्याच तर्फेनें शिंद्याकडे जाऊन या तिघांचा समेट घडवून आणता तर तें त्यास पेशवा–मराठी दौलतीचा धनी–म्हणून शक्य होतें. शिंदे, भोसले व होळकर हे एकत्र होऊन वेलस्लीच्या छातीवर ठासून उभे राहते तर वेलस्लीची पुढें येण्याची छाती नव्हती. बाजीराव कितीही दुष्ट व दीर्घद्वेषी असला तरी त्यास ठिकच्या ठिकाणीं आवळून टाकण्यास हा मोका ठीक होता. वसईच्या तहानें बाजीरावाची नालायकी सिद्ध झाली होती. अशा स्थितींत पटवर्धन, रास्ते, पानसे, निपाणकर, पुरंदरे, चतुरसिंग भोसले इत्यादि सर्व सरदार आसपास होतेच. त्या सर्वांशीं संगनमत करून या फुटीर पण सामर्थ्यवान् दुव्यांचा एक साखळदंड तयार करून त्याच्या योगानें अवघ्या भारतवर्षास ग्रासूं पाहणाऱ्या कंपनी सरकारच्या सामर्थ्यसिंहास ठाणबंद करणें अमृतरावास शक्य होतें. पण तें तसें झालें नाहीं त्याला कारण आमचा स्वार्थ. आमच्या पिंडांत राष्ट्रप्रेम नाहीं हेंच खरें काय ?

सर्व प्रकारचीं बोलणीं झाल्यानंतर ता. १२ नोव्हेंबर १८०३ ला अमृतराव वेलस्लीस सामील झाला. तो प्रथम इंग्रजांचे तळावर आला त्या वेळीं त्याचें स्वागत मोठ्या थाटाचें झालें. त्यास थाटदार लष्करी सलामी देण्यांत आली. त्याच्या आयुष्यांतील मानसन्मानाचा हा प्रसंग शेवटचाच ठरला. यापुढें इंग्रजांकडून खडी ताजीम घेण्याचा प्रसंग नाहींसा होऊन साहेबाच्या आवाजाबरोबर खडी ताजीम देण्याचा दुर्धर प्रसंग सकल भारतावर आला. राजकारणाच्या रंगभूमीवर लढाऊ राजकारणाचीं सूत्रें हलविणारा अमृतराव नाहींसा झाला. आतां त्याच्या इच्छेनुरूप त्यानें काशीची वाट धरली आणि राहिलेलें आयुष्य त्या ठिकाणीं काढलें. काशी येथें अमृतरावानें मोठा लौकिक मिळविला. घाट, देवालयें, अन्नछत्रें वगैरे गोष्टींत त्याचें नांव काशी प्रांतांत महशूर झालें. कांहीं काळपर्यंत ब्राह्मण संतर्पणाच्या कामीं पेशवाईनें पुणें सोडून काशी व ब्रह्मावर्त येथें वास्तव्य केलें अशी लोकांची भावना झाली. बिशप हेबर यानें आपल्या प्रवासवर्णनांत अमृतरावाच्या औदार्याचें वर्णन केलें आहे. अमृतराव दरवर्षी देकाराचा (दक्षिणेचा) समारंभ मोठ्या थाटानें पार पाडी. पुण्याच्या दक्षिणा

समारंभाचीच आवृत्ती त्यानें त्या ठिकाणीं चालू केली. वर्षांतून एक दिवस अमृतराव आपल्या आराध्य देवतेची पूजा मोठ्या भक्तिभावानें करी. त्या पूजेचा थाट मोठा दिमाखदार असे. त्या दिवशीं सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत प्रत्येक ब्राह्मणास एक शेर तांदूळ व एक रुपया दक्षिणा देण्यांत येई. तसेंच गोरगरीब, लुळ्यापांगळ्यास मोप धर्मादाय होत असे. या कामीं रु. ५०००० खर्च होत. राजकारणाच्या उलाढाली करणाऱ्या माणसानें हा लौकिक मिळविला, त्यांत फारसें भूषण नाहीं पण तो त्यानें कमाविला हें मात्र खरें. बाजीरावाची ब्रह्मावर्तास रवानगी झाल्यानंतर सहा वर्षांनीं अमृतराव ता. ६–९–१८२४ ला मरण पावला. तो शेवटपर्यंत इंग्रजांशीं निष्ठेनें वागला. इ स. १८१४ त ग. ज. लॉर्ड हेस्टिंग्ज काशीस गेला होता त्यानें अमृतरावाची भेट घेतली. त्याची मनोरंजक हकीगत त्यानें आपल्या रोजनिशींत लिहून ठेविली आहे. ती अशी:—

'ता. ३१–८–१८१४ रोजीं अमृतराव माझे भेटीस दाखल झाले. ते हत्ती-घोड्यांच्या रुबाबदार स्वारीनें प्रवेशद्वारापर्यंत येऊन तेथून पुढें पालखींतून बंगल्यांत आले. त्यांनीं धारण केलेल्या रत्नहारांतील मौल्यवान रत्नें चमकारे मारीत होतीं. मराठ्यांचें राज्य लवकर नाहींसें करण्याकरितां लॉर्ड वेलस्लीनें अमृतरावास सात लाखांची नेमणूक देऊन भावापासून फोडलें. मी अमृतरावास नवीन कृतीची बंदूक व त्याचा मुलगा विनायकराव यास दोन–नळी पिस्तुल नजर केलें. त्याबद्दल त्यास फार संतोष वाटला.

'ता. ५ सप्टेंबर रोजीं मी अमृतरावाचे वाड्यावर जाऊन त्यास परतभेट दिली. गाडीजवळ सामोरें येऊन बागेंतच उभारलेल्या सुंदर शामियान्यांत अमृतरावानें पाहुणेमंडळीस नेलें. पुढील बाजूस फवारे मारणारीं सुंदर कारंजीं चालू होतीं. त्यामुळें तेथील हवा मोठी रम्य व आल्हाददायक वाटली. लेडी हेस्टिंग्जनें बाईंची भेट आंतल्या बाजूस घेतली. या बायांना पडद्याची आडकाठी नसल्यानें मुसलमानी गोषासारखा त्रास झाला नाहीं. सात वर्षांची अमृतरावाची एक नात मोठी चलाख व रूपसंपन्न होती, ती धीटपणें पुरुषांत येऊन मला भेटली. ह्याबद्दल तिचें मला मोठें कौतुक वाटलें. अमृतरावानें कांहीं मौल्यवान रत्नें मला देण्याकरितां पुढें केलीं. बाहेर

दोन हत्ती व चार घोडे खडे होते. पण त्यांपैकीं मी किंवा माझी पत्नी कांहींही स्वीकारणार नाहीं असें मी निश्चयपूर्वक सांगतांच त्यास फार खेद झाला. एक घोडा तरी द्या, असा त्यानें पुन्हां आग्रह चालविला तरीपण मी कांहींच घेतलें नाहीं. अतिशय आग्रह झाला तेव्हां नाइलाजानें रत्नांच्या ताटांतील सरपाच तेवढा मी घेतला व अमृतरावाचे आभार मानले. आणि हा सरपोच तुमची आठवण माझे मनांत सदैव ठेवील असें मी त्यास सांगितलें. उठण्यापूर्वी गुलाबपाण्याचे आल्हाददायक तुषार एकदम शामियान्याच्या छतांतून सर्वांचे अंगावर सुरू झाल्यानें मंडळीस संतोष वाटला.'

इंग्रज हा आपणापेक्षां शहाणा असून त्याच्याविरुद्ध खटपटी करण्यांत अर्थ नाहीं असा बोध अमृतरावानें घेतला होता व त्याचें आयुष्य ठराविक चाकोरींतून चाललें होतें. तरी सुद्धां त्याचें लक्ष पुण्याच्या पेशवाईवर होतेंच. गंगाधरशास्त्र्याच्या खुनानंतर पुण्याचें राजकारण पुन्हां एकदां क्रांतीचे झटके खाऊं लागलें व बाजीरावाची उचलबांगडी होण्याचा रंग दिसूं लागला तेव्हां इ. स. १८१७ मध्यें अमृतरावानें उचल खाल्ली व पेशवेपदावर आपली निवड करण्या-बद्दल ग. ज. ला विनविलें. आणि आपण त्या पदास कसे लायक आहोंत हेंही पण त्यानें त्याच्या नजरेस आणिलें. पण त्याच्या या खटपटीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

इ. स. १७९२ त अमृतरावास एक पुत्र झाला त्याचें नांव विनायकराव. त्याचें लग्न ता. २३।४।१८०३ रोजीं संगमनेरास झालें. पेशवाईचा अंत झाला त्या वेळीं हा बावीस वर्षांचा होता. राजकारणाची उलाढाल साहेबानें पत्करल्या-कारणानें त्यास उद्योग असा उरला नव्हता. तेव्हां काशीस बापानें चालू केलेलें दानधर्माचें व अन्नसंतर्पणाचें काम तसेंच पुढें चालू ठेवण्यावांचून त्यास गती नव्हती. सात लाखांची नेपणूक नियमित पदरांत पडत असल्याकारणानें त्यानें द्रव्यसंचय चांगलाच केला. काशी येथील अमृतरावाचें गणपतिमंदिर व तेथील व्यवस्था उत्कृष्ट असे. पुण्यासारखी काशींतही त्यानें रमण्याची जागा तयार केली. दक्षणेच्या कामीं सालीना दीड लाखांवर खर्च होई. निष्फळ चैनबाजींत मात्र विनायकरावानें खर्च केला नाहीं. इ.स. १८२९ सालीं चित्रकूटजवळ करवी

येथें विनायकरावानें एक टोलेजंग प्रासाद बांधिला. तो थेट शनिवारवाड्यासारखा होता. तेथें विनायकराव सुखानें नांदत होता. करवी हें गांव बांद्यापासून ४५ मैलांवर पायोष्णि नदीजवळ आहे.

इ. स. १८३५ सालीं त्यानें ईस्ट इंडिया कंपनीस ३५ लाख रुपये कर्ज दिलें. तें परत येईना तेव्हां त्याच्या मुलांनीं पुष्कळ खटपट करून दाद लावून घेण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. विनायकरावास एक मुलगी होती ती त्यानें जोगांच्याकडे दिली. त्यास मुलगा झाला नाहीं म्हणून त्यानें एक मुलगा दत्तक घेतला व त्याचें नांव नारायणराव ठेविलें. त्यांच्याशीं त्याचें पटलें नाहीं म्हणून दुसरा दत्तक घेतला. त्याचें नांव माधवराव. त्याचा वंश अद्यापि हयात असून बरेलीस नांदत आहे. विनायकराव इ. स. १८५६ त मरण पावला. इ. स. १८५७ च्या उत्थानांत पेशवे कुटुंबावर कंपनी सरकारची इतराजी झाली आणि त्या तडाक्यांत करवी येथील वाडा व मिळकत लुटली गेली. यानंतर विनायकरावाच्या वंशजांस काशी येथें राहण्याची बंदी करण्यांत आली व त्यांस बरेली येथें छोटीशी नेमणूक देण्यांत येऊन सक्त देखरेखीखालीं ठेवण्यांत आलें. विनायकरावाचा दुसरा दत्तक माधवराव याची वंशवेल बरेलीस आजही जीव धरून आहे.

प्रसंगीं बाजीरावापेक्षांही डोईजड होणारा अमृतराव वेलस्लीनें कसा ठिकाणावर बसविला तें पाहिल्यानंतर सातारकरांविषयीं सांगावयाचें म्हणजे पेशव्याचे मगरमिठींतून सुटण्याचे प्रयत्न सातारकर छत्रपतींनीं केले ते योग्य झाले. पण ते त्यांनीं भलत्याच वेळीं केले. आणि सपशेल पराभव खाऊन छत्रपति जागच्या जागीं थंड बसले. त्याचा परिणाम मात्र फार वाईट झाला. बाजीरावानें त्यांच्यावरील निर्बंध फार कडक केले. ह्यापेक्षां त्यांनीं तो प्रयत्न इ. स. १७९८ च्या एप्रिल ते ऑगस्ट या चार-पांच महिन्यांत न करतां इ. स. १८०२ मध्यें करावयास पाहिजे होता. कारण त्या वेळीं यशवंतराव होळकराची चाल पुण्यावर होतांच रावबाजी पुण्यपुरास 'रामराम' ठोकून इंग्रजांच्या आश्रयास गेला व तो आतां इंग्रजी सत्तेचें जूं मानेवर घेणार असें दिसूं लागतांच त्याच्या नादानीचा डांगोरा जिकडे तिकडे पिटला जात होता. हीच वेळ पेशव्याला उखाड देण्यास फार

चांगली होती. या बांक्या प्रसंगीं सातारकर छत्रपतीनीं मालकपणाच्या दिमाखानें पुढें होऊन तडफेच्या हालचाली करावयास पाहिजे होत्या. वसईच्या तहावर सह्या झाल्यानंतर धांवपळ करणारा चतुरसिंगसुद्धां या वेळीं गहाळ न राहतां खटपटी करता तर मराठ्यांचें गोमटें झालें असतें. ही संधी चालूनही आली होती. यशवंतराव होळकरासारखा खंबीर मनगटाचा पुरुष व अमृतरावासारखा धड डोक्याचा महाभाग या महान् कार्यासाठीं उद्युक्त झाले होते. सातारकर छत्रपतींकडे विनायक अमृतरावाच्या नांवानें पेशवाईचीं वस्त्रें नेण्यासाठीं पुण्याची मंडळी शाहूनगरींत दाखल झाली होती, त्या वेळीं सदाशिव माणकेश्वराच्या बद्सल्ल्यानें पेशवाईचीं वस्त्रें मना करण्याऐवजीं होळकरांच्या वतीनें वस्त्रें नेण्यासाठीं साताऱ्यास दाखल झालेल्या फत्तेसिंग मान्याबरोबर सातारकर छत्रपति पुण्यास येते व पुढील कारभारांत होळकरादि मंडळींस धनीपणानें मदत करते तर सातारकरांची फत्ते झाली असती. आणि वसईच्या तहानें निर्माण झालेलें हें प्राणसंकट कदाचित निकालांत काढतां आलें असतें.

वसईच्या घातक तहानें मराठ्यांचें स्वातंत्र्य बुचाडलें जात होतें. तो तह बाजीरावानें स्वतःच्या जबाबदारीवर केला होता. त्यामुळें त्याची अंबारी उलटी झाली होती. तो बाजीरावाचा रावबाजी झाला होता. तेव्हां बाजीरावानें स्वतःच्या जबाबदारीवर केलेला हा वसईचा तह सातारकर महाराजांना फेटाळून लावतां आला असता. कारण इंग्रजांनीं कंपनी सरकारच्या सही–शिक्क्यांनीं आणि निशापाणी न करतां अक्कलहुशारीनें केलेला वडगांवचा तह असाच एका मुद्यावर उडवून लाविला होता. तो मुद्दा असा कीं, कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यास कैद करून त्याजकडून अडचणीच्या प्रसंगीं पेशव्यांनीं बळजबरीनें हा वडगांवचा अपमानकारक तह करून घेतला तेव्हां तो तह पाळण्यास कंपनी सरकारचे वरिष्ठ अधिकारी तयार नाहींत. बरोबर याच मुद्यावर छत्रपतींना पेशव्यांनीं केलेला हा वसईचा स्वराज्यघातक तह फेटाळून लावतां आला असता ! कारण सातारकर छत्रपतींचा अधिकार मोठा होता. पेशवा हा छत्रपतींचा सामान्य नोकर; तेव्हां त्यानें आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर केलेला वसईचा तह सातारकरांना मान्य नाहीं आणि तो सुद्धां बाजीरावानें

अडचणींत सांपडूनच केलेला असल्यामुळें तो आम्हांस रुजू नाहीं असा खडखडीत जबाब छत्रपतींना देतां आला असता. तसेंच पेशवेपदावरून बाजीरावास दूर करून दुसऱ्या कोणा लायक माणसास पेशवा म्हणून नेमतां आलें असतें. पण हें त्यांनीं केलें नाहीं. त्यांच्यांत आद्य छत्रपतींची कुवत असती तर त्यांना ही गोष्ट सहज करतां आली असती. कारण या वेळीं खुद्द रावबाजीची स्थिति चांगली नव्हती. तो प्रथमपासूनच मराठमंडळांत प्रिय नव्हता. तसेंच रास्ते, पटवर्धन वगैरे ब्राह्मण सरदार त्याच्यावर नाखूष होते. वसईच्या तहानें तर तो शिंदे–होळकरादि सरदारांच्या मनांतून पार उतरला होता. असें असल्याकारणानें बाजीरावास पेशवेपदावरून दूर केलें असतें तर फार मोठें बंड उपस्थित झालें असतें अशांतला मुळींच भाग नव्हता. बरें सातारकर छत्रपतींच्या दप्तरीं पेशव्यास पेशवेपदावरून दूर केल्याचा दाखला नव्हता असें नाहीं. कारण थोरल्या शाहू महाराजांनीं नानासाहेब पेशव्यास पेशवेपदावरून इ. स. १७४६ त दूर केलें होतें. पण दुर्दैवानें सातारकर मंडळींस तशी बुद्धी झाला नाहीं. त्यांनीं तसें न करतां इंग्रजाशीं राजकारण शिजविलें !

पेशवाईला शह : ७

वसईच्या तहानें एवढी मोठी अफाट क्रांति झाली कीं जो तो जाणता मनुष्य चकीत झाला. पण रावबाजीच्या मनाचा नादानपणा मोठा पाहण्यासारखा आहे. वसईच्या तहावर सही झाली आणि रावबाजीसकट श्रीमंतांची पालखी गळ्यांत अडकवून कंपनी सरकारचा उंट मराठी दौलतींत घुसून त्यानें मराठी दौलतदारांची दशा—दुर्दशा केली. या प्रसंगीं बाजीरावाचे उद्गार मोठे चमत्कारिक आहेत. त्यामुळें त्याचा विजवटेपणा भयानकपणें उजळून दिसतो. तो म्हणतो, " होळकर व नबाब, व शिंदे—भोसले एक झाले. चौघांचे विचारें इंग्रज घरांत आले, हें ठीक नाहीं. त्यास सर्वांनीं इंग्रजाचें पारिपत्य करून राज्याचा बंदोबस्त करूं. परंतु बाजीरावसाहेबांची मर्जी जे शिंदे—भोंसले आपलेच आहेत. परंतु बंडखोर होळकर याचें पारिपत्य करावयाचें याबद्दल राज्य इंग्रजांनीं घेतलें तरी हरकत नाहीं. " भारतवर्षाच्या दुर्दैवानें बाजीराव आणि दौलतराव ही दुक्कल अशी चमत्कारिक लाभली होती कीं, त्या दोघांनीं आपण होऊन कोणतीही राज्यहिताची गोष्ट केली नाहीं. इतकेंच काय, पण आपली कांतडीं बचाविण्यासाठीं होऊं घातलेल्या चांगल्या गोष्टी नासून टाकिल्या. गेल्या प्रकरणीं दिलेलें होळकरासंबंधीं दौलतरावाचें पत्र व बाजीरावाचे वरील उद्गार यांत फारसा फरक नाहीं. या प्रकरणासंबंधीं शिंदे व बाजीराव यांचे

उद्गार दिल्यानंतर यशवंतराव होळकराचे उद्गार पाहण्यासारखे आहेत. त्याची अपूर्वाई कांहीं न्यारी आहे. यशवंतराव प्रतिनिधीस म्हणाले,

" आजपर्यंत हिंदु राज्य सर्वांनीं एकदिल होऊन चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत गृहकलह होऊन राज्य विपर्यास पडोन हिंदु धर्म नाहींसा होण्यास मूळ जाहलें. त्याचें छेदन करण्यास सर्वांनीं एकदिल झालें पाहिजे तर हिंदूंची कायमी राहील. आम्ही जो क्रम इंग्रजांशीं लढण्याचा आरंभिला हाच यावद्देह चालावा असें मनांत आहे. यांत परमेश्वर अनुकूल होऊन जें घडवील तें खरें. परंतु एकानेंच असा प्रकार करून बाकीच्यांनीं तमाशा पाहून आपापली दौलत संभाळून असावें, यांतील परिणाम कसा हें चित्तीं विचारून ज्यांत हिंदुधर्माची कायमी व परिणामास नीट तें करावें. याचा विचार तुमच्यासारख्यांनीं न केला तर दुसरा कोण करील ? "

रावबाजी हा आत्यन्तिक सूडबुद्धीचा असल्यामुळें त्याच्या नाशांत भरच पडली. किंबहुना त्याचा नाश मुख्यत: त्याच्या या सूडबुद्धीनें केला. गादीवर येतांच त्यानें अनेक लोकांचा निकाल लावला व पुष्कळांना डांबून टाकिलें. त्याच्या राजवटीची हकीगत ऑर्थर वेलस्लीनें ग. ज. कडे पाठविली आहे त्यावरून कल्पना येते.

' बाजीरावानें जवळच्या खास तैनातींतील मंडळींची वाट कशी लाविली हें सोबतच्या यादीवरून दिसून येईल. याशिवाय आणखी पुष्कळांचे त्यानें हाल केले आहेत. अमृतरावानें त्यांची यादची याद माझ्याजवळ दिली आहे. अजूनही कितीतरी मंडळी निरनिराळ्या किल्ल्यांवर नाहक कुजत पडली आहे. या लोकांचा अपराध काय तर ते केवळ नानाच्या पक्षाचे म्हणून ! पण या सर्व मंडळींनीं आपलें खास आयुष्य राज्याच्या सेवेंत एकनिष्ठपणें व्यतीत केलें आहे. अमृतरावानें तर मला स्पष्टच शिफारस केली आहे कीं, कंपनी सरकारची मर्जी पेशव्याचें राज्य नीट चालावं अशी असेल तर त्यांनीं या मंडळींना या यातनांतून तात्काळ सोडवावें.

मी ही गोष्ट कर्नल क्लोज यासही कळविली आहे. खरें म्हणावयाचें म्हणजे पेशव्याचा कारभार नाममात्रच आहे. पुण्यापासून पांचच मैलांच्या अंतरावर येथें कांहीं राज्य किंवा शासनसंस्था आहे याची खूण सुद्धां मिळावयाची नाहीं. शेतें उध्वस्त होऊन जंगलें वाढलीं. चोरांचा सुळसुळाट झाला. कोणताही कारभार स्वत: जातीनें पाहण्याची अक्कल पेशव्यांत नाहीं. दुसऱ्यावर विश्वास नाहीं. भोवतालीं बेवकूब मंडळीचा गराडा आहे. अमृतरावास कारभार करण्याची अक्कल आहे पण त्याला बाजीराव पाण्यांत पाहतो. बाजीराव आपल्या भावाची दशा काय करील याची कल्पनाही करवत नाहीं. त्या दोघांत समजूत घाल-ण्याचा मी पराकाष्ठेचा प्रयत्न केला व हताश झालों. या भावाचें त्यास दर्शन नको. मग कारभारांत घेण्याची भाषाच कशाला ? तूर्त या जंजाळांतून बाहेर पडण्यास एकच मार्ग दिसतो तो हा कीं, कैदेंतील मंडळी बाजीरावापासून सोडवावी आणि त्यांस नोकरींत घेऊन त्यांजकडून वसूलाचा बंदोबस्त करावा. अमृतरावाची व त्याची गोडी नच झाली तर त्यास योग्य ती नेमणूक देऊन दूर ठेवावें आणि अशा तऱ्हेनें त्याचा कारभार सुधारण्यास शक्यतों मदत करावी.

'पेशव्यास आपण स्पष्टपणें असें कळविलें पाहिजे कीं, तुमचे राज्यांत लहानापासून थोरापर्यंत असा एकही मनुष्य नाहीं कीं ज्याचा तुमच्यावर विश्वास आहे. अथवा जो कंपनी सरकारच्या मध्यस्थीशिवाय तुमच्याशीं यत्किंचित्‌ही संबंध ठेवूं इच्छितो. कोणत्याही कामांत प्रत्येकजण कंपनी सरकारची जामी-नकी मागतो. मुख्यत: वसुलाची व न्यायनिवाड्याची व्यवस्था राज्यांत प्रथम झाली पाहिजे. ही व्यवस्था त्यानें सूडाची भावना काढून टाकिल्याशिवाय होणार नाहीं. न्यायाच्या मार्गानें चालण्याची इच्छा तो धरील तर मी त्याचा कारभार हां हां म्हणतां सुधारून देईन. नाहींतर चोहोंकडे बंडें होऊन मुलुखाची राखरांगोळी होईल आणि त्याचा परिणाम पुढें आपणासही भोगावा लागेल.

'त्यास मी वेड्यावांकड्या गोष्टी करून देत नाहीं म्हणून तो माझ्यावर अतिशय चिडला आहे. तोंडावर गोड बोलून तो माझी समजूत काढतो, पण माझी पाठ फिरतांच त्याच पावलीं उलट वागूं लागतो. कंपनी सरकारतर्फे त्याच्या पायांत सलणारा कांटा मीच काय तो आहें. बाजीरावाच्या कामांत

माझ्यामुळें अडथळा येत असेल तर शक्य तितक्या लवकर माझी बदली करा. म्हणजे तरी बाजीरावाचा मार्ग मोकळा होऊन त्याचा कारभार मार्गी लागो. बाजीरावाकडे मी शिफारस केल्यामुळें जर लोकांचें नुकसान होऊं लागलें तर मग कंपनी सरकारची इभ्रत ती काय राहिली ? कामाची निरवानिरव करून मी शक्यतों लवकर येथून हलावें यांतच उभयपक्षीं फायदा आहे. बाजीरावासंबंधीं माझें अत्यंत वाईट मत बनलें आहे यांत शंका नाहीं. त्याला शब्दाची किंमत नाहीं, जनाची लाज नाहीं. स्वभाव इतका दुष्ट व खुनशी आहे कीं बोलायची सोय नाहीं. कपटविद्येंत तर त्याच्यासारखा निष्णात् तोच. वसईचा करार केल्यादिवसापासून आजपर्यंत एका वर्षांत त्यानें स्वतःच्या हिताची अगर आम्ही सुचविलेली ती एकही गोष्ट केली असेल तर शपथ. मग असला नादान गृहस्थ राज्यावर ठेवणें युक्त कीं कसें हा मोठा प्रश्न आहे. पण त्याला उत्तर एकच कीं त्याला नाइलाज आहे. मला दुसरा मार्गच दिसत नाहीं. आतांच सर्व राज्य ताब्यांत घ्यावें तर भयंकर युद्ध माजून विश्वासघाताचें पाप माथीं घ्यावें लागेल. चिमाजी किंवा अमृतराव यांपैकीं कोणास तरी दिवाण नेमून त्याजकडून कारभार चालवितां येईल पण त्यामुळें बाजीरावाची ब्याद कशी नाहींशी होणार ?

'या तिघां बंधूंत अमृतरावच शहाणा व राज्य संभाळण्यास लायक आहे. त्यासच आपण पेशवाईवर आणावा. पण पुढें कधीं काळीं न जाणों तो आपल्यावर उलटला तर मात्र आपल्या राज्यास नवीनच कांटा निर्माण झाला असें होईल त्यापेक्षां हल्लींचा बाजीरावच शतपट बरा.'

मराठ्यांची राजलक्ष्मी जशीच्या तशी कंपनी सरकारच्या घशांत उतरण्याच्या दृष्टीनें रावबाजीनें पेशवेपदावर असणें फार इष्ट होतें म्हणून वेलस्लीनें बाजीरावास हात लावला नाहीं. आणि रावबाजीनें आपली आत्मघातकी चाल तशीच धडाक्यानें चालू ठेविली.

वसईच्या तहानंतर इ. स. १८०५ पर्यंतच्या कालांत कंपनी सरकारचें मराठ्यांशीं युद्ध जुंपलें. आणि त्यांत शिंदे–होळकरांसारखे बलशाली फौजबंद

दौलतदार कंपनी सरकारचे अंकित झाले. इकडे एवढा मोठा युद्धाचा डोम उसळला होता; पण बाजीराव आपल्या स्वैराचारांत आणि ऐषआरामांत दंग होता. त्याला कसलाच पत्ता नव्हता.

ता. १–७–१८०३ चें वर्तमान : 'नित्यश्री नित्यमंगलं' या न्यायें श्रीमंत सुखरूप आहेत. कोणती काळजी नाहीं. वसईहून अग्निहोत्रि आणिले. चातुर्मास्यें करविलीं. स्वत: अध्वर्युत्व केलें. प्रायश्चित्त न पडतां अनुष्ठान सिद्धीस नेल. रामचंद्र दिक्षीतासही आणविलें होतें. त्यांनीं सांगितलें जे आपण क्षात्रियधर्म करितां, आपणास अध्वर्युत्व करणें योग्य नाहीं. आपण यज्ञ करावे, भोजनसमयीं रांगोळ्या, वाजंत्रीं, याप्रमाणें नित्योत्साह आहे. मर्जी जाणे ती भोजन आमंत्रणें वगैरे बाबतींत, दरबार प्रकरणीं शांत वृत्ति ढळत नाहीं.

'श्रीमंतांस ज्वरांश झाला त्यावरून दुष्टदानें देत आहेत. शांतही चालली आहे. वसईहून ब्राह्मणाच्या पोरी दोघी बहुत खुपसुर्त्या लावण्या बहुत चांगल्या गातात अशा आणिल्या आहेत. बहुत पडदपोशीनें ठेवून नित्य दिवसा रात्रीं आपण व बळवंतराव नागनाथ व देवीदास सारंगीवाला येणेंप्रमाणें बसोन लावण्या ऐकत असतात. श्रीमंतांस गुदस्तापासून बदाचा उपद्रव झाला. त्यामुळें हल्लीं प्रकृती ठीक नाहीं. उदईक एकादशीस ज्ञानेश्वराचे दर्शनास आळंदीस जाणार. ××× सांप्रत जवाहिरी दागिने श्रीमंतांचे अंगावर असतात. मंगळवारीं रात्रीं पर्वतीस आतषबाजी झाली. अस्तमानीं स्वारी पर्वतीस गेली. उभयतां बाईही गेल्या हात्या. तेथें संध्या करून भोजन केलें. दहा घटका रात्रीस दारू उडावयास प्रारंभ झाला. दारूचा डेरा राहुटीसारखा केला. हल्लीं नवीन मुत्सद्दीयांकडे श्रीमंतांस मेजवान्या होत आहेत.'

बाजीरावाची एकंदर बदचाल पाहून वेलस्ली त्याच्यावर चिडला होता व त्याच मनात आलें कीं, 'बाजीराव दोस्तीच्या लायक नाहीं. याजकरितां धणी बाजीराव परंतु त्यास कारभारी अमृतराव करून देऊन घरचा द्वेष मोडावा. म्हणजे बाजीरावाचा व इंग्रजांचा स्नेह मोडूं पाहणार नाहीं. तें कर्नोल क्लोज याणीं होऊं दिलें नाहीं, असें श्रीमंतांस समजलें. त्यावरून क्लोजसाहेबावर श्रीमंतांचा मोठा इतबार झाला. हरएक गोष्ट त्यास कळवावी.

दरबारांतही स्नेहवृद्धीचीं बोलणीं बोलावीं कीं, “ माझें गेलेलें राज्य कर्नेलनीं मला दिलें. कोणाचा उपद्रव नाहींसे झाले. हें सारें करणें कर्नेल साहेबाचें. त्याचे भरंवशावर मी आनंद करतों. ”

‘ कर्नेल साहेबाच्या भरंवशावर मी आनंद करतों ’ असें म्हणत चाहिल त्या अनाचारांत आणि रंगढंगांत दिवस कंठणाऱ्या बाजीरावाकडे पाहून मनास उद्वेग येतो. दिल्लीच्या दिल्लीपतीला थरथरा कांपरें भरावयास लावणाऱ्या थोरल्या बाजी· रावाच्या स्वर्गस्थ थोर आत्म्यास या आपल्या विजवट्या नातवाचे शतशः तुकडे करावेत असें वाटलें असेल ! पण तें तसें होणार नव्हतें. दिगन्त कीर्ति गाज· विणाऱ्या पेशवाईचें सपशेल वाटोळें रावबाजी करणार होता. कर्नेल साहेबाच्या भरंवशावर आनंद करणाऱ्या रावबाजीचा आनंद चालू होता ! कारण इ. स. १८०५ सालीं इंग्रज व मराठे यांच्यामधील युद्धें संपलीं, तीं जवळजवळ कायमचींच. कोणत्याच वाटाघाटी उरल्या नाहींत. साहजिकच इंग्रजाविरुद्ध कारस्थानें करण्याचें प्रयोजन संपलें. ‘ वसईस तहनामा झाल्यावर राज्याचा बंदोबस्त, कंपनी सरकारचे दोस्तीमुळें बंडावा वगैरे मोडून मुलूख आबाद झाला. सालोसाल वसुलाची पैदास वाढत गेली. सारे सरदार हुकूम मानूं लागले. त्यावरून श्रीमंतांची मर्जी सुप्रसन्न होती. सदाशिव माणकेश्वरानें रेसिडंटाशीं रहस्य ठेवून श्रीमंतांचें हित साधलें. ’

कर्नेल साहेबाच्या भरंवशावर बाजीराव आनंद करीत होता खरा पण हा त्याचा आनंद निसटण्याचा प्रसंग लवकरच दाखल झाला. इ. स. १८१० साल उगवलें. आणि या सालीं एल्फिन्स्टन हा पुण्यास रेसिडेंट म्हणून आला. आणि बाजीरावाचा कर्नेलसाहेब बदलला. या एल्फिन्स्टनची कारकीर्द बाजीरावास चांगलीच भोंवली व त्यास पेशवाईवर उदक सोडण्याचा दुर्धर प्रसंग आला. एल्फिन्स्टन इ. स. १८०२ मध्यें पुण्यास आला होता. त्या वेळीं त्यानें एकंदर पेशवाईचा झोंक नोंक पाहिला होता. त्याला हिंदी भाषा चांगल्या येत असल्याकारणानें दुभाष्याची आवश्यकता नव्हती. पूर्वीं क्लोज व बाजीराव यांच्यामध्यें दुभाष्याचें काम खुरशेटजी मोदी करीत असे. त्याचें व सदाशिव माणकेश्वराचें रहस्य असल्याकारणानें तो मध्यस्थाचें काम सर्व धोरणें

सांभाळून नीट करी आणि बाजीरावाचें हित साधी. पण एल्फिन्स्टनच्या नेमणुकीमुळें खुरशेटजी मोदीचें कामच उरलें नाहीं. यामुळें बाजीराव व रेसिडेन्ट यांच्यामधील एक आडपडदा नाहींसा झाला. आणि हीं दोन्हीं चाकें एकमेकांवर घांसूं लागलीं. त्यांमध्यें सलोख्याचें वंगण घालणारा मध्यस्थ नाहींसा झाला. याच सुमारास आणखी एक अनिष्ट गोष्ट झाली ती अशी कीं, रावबाजीचें व त्रिंबकजी डेंगळ्याचें जास्त रहस्य जमलें. याचें कारण असें झालें कीं, सदाशिव माणकेश्वर हा इंग्रजांस सामील आहे ही गोष्ट त्रिंबकजीनें पुरा-पुराव्यानिशीं चवाठ्यावर आणल्यामुळें सदाशिव माणकेश्वर बाजीरावाच्या मर्जीतून उतरला व डेंगळ्याचें प्रस्थ पेशव्याच्या दरबारीं माजूं लागलें. त्याची चढती कमान सुरू झाली, तो राज्यकारभारांत लुडबुडूं लागला; इतकेंच काय पण रेसिडेन्टाशीं बोलणें-चालणें करण्याचें काम सुद्धां तोच करूं लागला. आणि हीच गोष्ट अत्यंत अनिष्ट झाली. कारण त्रिंबकजी रेसिडेन्टाशीं चढेल वृत्तीनें वागूं लागला; याचा साहाजिकच परिणाम असा झाला कीं, पेशवे व इंग्रज यांच्यामध्यें वितुष्ट येण्यास सुरुवात झाली व त्याचा शेवट पेशवाईच्या नाशांत झाला.

दरबार झुलविणें, शत्रूच्या गोटांत जाऊन त्याच्या अंतःकरणाचा भेद घेणें, जाबजबाब अशा तऱ्हेनें करणें कीं आपला मतलब तर सोळा आणे साधावा व शत्रूस तर तोंडावर प्रश्नोत्तर करतांच येऊं नये — अशा प्रकारच्या मुत्सद्देगिरीनें ओथंबलेली रसवन्ती ज्यांच्या वैखरीवर अवतीर्ण झाली असेल अशीं मधुभाषणी माणसें एकाद् वेळेस समशेरीसही न लाभणारें सुयश आपल्या वाक्सुमनांनीं मिळवितात. निदान आजचीं संकटें उद्यांवर तर खासच ढकलतांत. असा हा सामोपचारी धोरणाचा महिमा आहे; पण त्याचा गंधसुद्धां त्रिंबकजीस नव्हता. दौलतीच्या कामाचा त्यास अनुभव नव्हता. त्यामुळें त्याला कामाचें धोरण साधेना. पहिले सांप्रदाय मोडून त्यानें नवीन सांप्रदाय चालू गेले. आणि रेसि-डेन्टाशीं उन्मत्तपणाची भाषा बोलण्यास प्रारंभ केला. त्यामुळें एल्फिन्स्टन त्याच्यावर नाखूष झाला. जसजसा बाजीरावाचा लोभ त्रिंबकजीवर वाढत गेला

तसतसा तो एल्फिन्स्टनच्या मर्जीतून उतरूं लागलों. अशा तऱ्हेनें टोपीकर व पेशवे यांचें प्रकरण चिघळूं लागलें.

इंग्रजी लष्कराच्या संरक्षणाखालीं ता. १३।५।१८०३ ला बाजीरावाचे पाय पुण्यास लागले. त्या वेळीं आपल्याविषयीं निष्ठा बाळगणारे कोण कोण आहेत याची चांचणी घेण्यासाठीं बाजीरावानें सर्व सरदारांकडून राजनिष्ठेची शपथ घेण्याचा राबता चालू केला. ही युक्ती त्यास वेलस्लीनें सांगितली असावी. कारण पूर्वी कधीं असला प्रकार चालू असल्याचा दाखला नाहीं. त्यासंबंधीं रामचंद्र आप्पा लिहितो, 'सरकारांतून शपथ घ्यावयाचा मोठा आग्रह आहे. बुधवारीं रात्रीं वाड्यांत भोजनास गेलों होतों. श्रीमंतांस नक्के आहेत. भोजनापूर्वीं शपथेचा कारभार उरकला.' हा शपथेचा कारभार झाला पण त्यांत तथ्य नव्हतें. जो तो श्रीमंतांची किंमत जाणून होता.

ही गोष्ट बाजीरावास कळत नव्हती असें नाहीं पण इंग्रजाची समर्थ समशेर त्याचें संरक्षण करण्यास सिद्ध असल्याकारणानें त्याला त्याची पर्वा नव्हती. तशांत त्याचा लोभही अनावर झाला व त्यानें जहागिरदारांवर शस्त्र धरलें. पटवर्धन, रास्ते, निपाणकर, पानसे इत्यादिकांचे सरंजाम कसलाही विचार न करतां जप्त करण्याचा घाट त्यानें घातला. इतकेंच काय पण कोल्हापूरकर व सावंतवाडीकर यांच्यावर तो आपलें अधिराज्य सांगू लागला. तेव्हां या मंडळींनीं रेसिडेन्टाकडे कागाळ्या नेल्या. त्याबरोबर रेसिडेन्टनें त्यांत हात घातला. कारण दक्षिणी सरंजामदारांचें हें प्रकरण गेलीं सात–आठ वर्षें चालू होतें. नुसताच घोळ माजला होता व त्याचा निकाल लागत नव्हता. तेव्हां या प्रकरणाचा इत्थंभूत छडा लावून त्यानें या प्रकरणाचा एकदांचा निकाल लावला. एल्फिन्स्टननें हें प्रकरण हातीं घेतांच बाजीरावाचें व त्याचें वितुष्ट वाढीस लागलें. इ. स. १८१२ च्या जुलैला बाजीरावाचा मुक्काम पंढरपुरास असतां जहागिरदारांची नवीन व्यवस्था एल्फिन्स्टननें त्याच्याकडून कबूल करून घेतली. या व्यवस्थेनें श्रीमन्तांच्या सत्तेचा दाब आणखी एका आट्यानें कमी झाला. जहागिरदारांवरील त्याचा ताबा बहुतांशीं नष्ट झाला.

जहागिरदारांचें हें प्रकरण इतक्या हातघाईवर आलें होतें कीं इंग्रजांची तैनाती फौज बाजीरावाच्या पाठीशीं नसती तर त्याचे तीन-तेरा केव्हांच वाजले असते. एल्फिन्स्टनला या प्रकरणीं मोठा पेंच पडला. पेशव्याशीं व जहागिरदारांशीं यासंबंधीं पुष्कळच वाटाघाटी झाल्या. एकंदर वातावरण फारच गरम झालें होतें. भडका उडण्याचा संभव होता. इतकीं वर्षें राष्ट्राची सेवा निष्ठेनें करणाऱ्या प्रतापशाली खानदानी सरदारांचा नि:पात व्हावा ही गोष्ट एल्फिन्स्टनला मान्य नव्हती. तसेंच बाजीरावाशीं त्यांचा संबंध तोडून टाकणें हेंही पण गैर होतें. कसें झालें तरी ते पेशव्यांचे नोकर होते. यासाठीं तडजोडीचा मध्यम मार्ग एल्फिन्स्टननें काढिला. आणि त्यांत कंपनी सरकारचें वजन त्यानें वाढविलें. नवीन पराक्रम किंवा राज्यवृद्धि होत नसल्या-कारणानें द्रव्योत्पत्तीस मार्ग दिसेना. तेव्हां जुन्या डोईजड जहागिरदारांस पिळून काढण्याचें बाजीरावानें ठरविलें. पण एल्फिन्स्टननें त्यास सडकून हरकत घेतली व पुष्कळ वाटाघाटी व चर्चा केल्यानंतर जहागिरदारांस वागविण्या-संबंधींची खालील याद त्यानें पेशव्यांकडे धाडिली.

(१) जहागिरदारांविषयींचे पूर्वींचे द्वेषभाव सोडून द्यावे. (२) पूर्वींच्या सनदांस व रिवाजांस सोडून पेशव्यानें नवीन मागण्या कंपनी सरकारच्या परवानगीशिवाय करूं नयेत. (३) त्यांत ठरल्याप्रमाणें जहागिरदारांनीं तैनाती फौजा ठेवून पेशव्यांची नोकरी करावी. (४) इंग्रजांचे परवानगी शिवाय त्यांचे सरंजाम पेशव्यानें जप्त करूं नयेत. (५) भेटीच्या व इतर प्रसंगीं पेशव्यानें त्यांचा योग्य तो सन्मान ठेवावा. (६) सनदेबाहेर जे प्रदेश जहागिरदारांचे ताब्यांत असतील ते त्यांनीं पेशव्याचे हवालीं करावे. (७) उभयतांमधील तक्रारींचा निवाडा इंग्रज सांगतील त्याप्रमाणें उभयपक्षीं मान्य करावा. (८) जहागिरदारांशीं परभारें कोणताही करार करण्यास इंग्रज सरकार अधिकारी आहे. या शेवटच्या अटीनें कंपनी सरकारचा वरचष्मा कोणत्या पल्ल्याला एल्फिन्स्टननें नेला याची चांगलीच कल्पना येते. या करारानें बाजीरावाची जहागिरदारांवरील सत्ता पार नामशेष झाली. एल्फिन्स्टननें आपल्या कर्तृत्वाचा हा पहिला तडाका बाजीरावास दिला.

पिढ्यान् पिढ्या निष्ठेनें सेवा करणाऱ्या जहागिरदारांचा रोष पत्करून बाजीरावानें काय मिळविलें कोण जाणे. हातचें एवढें मोठें सामर्थ्य नाहींसें झाल्यानंतर त्याच्यावर तोड म्हणून श्रीमंतांनीं उपाय काढला तो तर बिन-तोडच होता. त्यांनीं एल्फिन्स्टनच्या मार्फत गोऱ्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं वागणारा एक कवाइती कंपू तयार केला. त्यावर कॅप्टन फोर्ड साहेबाची नेमणूक झाली. या लष्करांत दक्षिणचे मराठे फारसे नसून बहुतेक हिंदुस्थानी लोक होते. त्यांनीं ऐन वेळीं जें काय करावयाचें तेंच केलें. हा कंपूच्या कंपू लढाईच्या धुमश्चक्रींत बाजीरावास सोडून इंग्रजांस मिळाला !

छेलछबेल्यांच्या रंगढंगांत दंग असणें व दर्भानें पाणी उडवून यज्ञयागादि कर्में करणें हा बाजीरावाचा मुख्य मनोधर्म होता. तथापि साहेबानें टाकलेल्या सरकफासांतून निसटण्याची धडपड तो आपल्या कुवतीप्रमाणें करीत होता. वसई व पुणें या दोन ठिकाणीं झालेल्या तहानें त्याची सत्ता संपुष्टांत आली होती. तो इंग्रजांच्या सांपळ्यांत आतां पूर्णपणें सांपडला होता. पण—

हें गुलामगिरीचें पैंजण पायांत घालून साहेबाच्या दृष्टिक्षेपावर नजर ठेवून तो सांगेल त्याप्रमाणें नाच नाचण्याचा रावबाजीस कंटाळा आला होता. तेव्हां जिवाचा वाटेल तसा आटापिटा करून इंग्रजांशीं शेवटची झुंज खेळावी असें त्याच्या मनांत वारंवार येई. पण रावबाजीच्या भोंवतालचें वातावरण फारच भयंकर ! सध्या त्याची कल्पना येणें अशक्य. त्याच्या वेळीं भिंतीस कानच काय पण हातपाय सुद्धां फुटले होते व ते इंग्रजांस बित्तंबातमी विद्युत्वेगानें कळवीत होते ! बाजीरावाला जेवतांना अन्नांत सुद्धां साहेब दिसे. जिगरदोस्त म्हणून मिठी मारावी तों तो काळसर्प ठरून त्यानें झेंडू फुटेसा डंख मारावा. शत्रु म्हणून समशेरीनें वार करावा तर जखम मित्रासच व्हावी आणि त्यांतून इमानदारीचें रक्त टिपकतांना आढळावें व हातांतील सम-शेरीचा कोयता व्हावा ! धडाक्याबरोबर मोठमोठ्या किल्ल्यांचे दिल्लीदरवाजे सताड उघडणाऱ्या यशवन्ती तोफेंतून फुसका बारसुद्धां निघूं नये. अशी भयंकर परिस्थिति खडी असतां थोरल्या बाजीरावाची सुद्धां कंबर खचली असती, मग या रावबाजीची काय कथा !

त्यांतून रावबाजी हा सामान्यबुद्धीचा व जन्मतः दुर्दैवी. कारण हा राघोबाचा मुलगा म्हणूनच पुष्कळ लोक याच्यावर नाखूष होते. राघोबाचा कीर्तिध्वज नारायणरावाच्या खुनाच्या आरोपानें पार काळा ठिक्कर पडला होता. त्या पापाचें ग्रहण रावबाजीसही छेडीत होतेंच. त्याच्या क्षालनार्थ त्या वेळच्या धर्मसमजुतीप्रमाणें ब्राह्मणभोजनें वगैरे दानधर्म तो करीत असे. तो व्यसनी असल्यामुळें त्याच्या पापांत आणखी भर पडली. या सर्व गोष्टींनीं त्याचा घडा भरला व त्याच्याबरोबर मराठी सत्तेचाही पण नायनाट झाला.

वसई व पंढरपूर या दोन ठिकाणच्या तहांनीं रावबाजी इंग्रजांच्या हातांतील एक बाहुलें झाला. पण यांत इंग्रजांच्या अघोर तृष्णेस समाधान नव्हतें. त्यांस पेशव्यांचा कांटा अजिबात काढावयाचा होता. कारण त्या वेळीं इंग्रजांस प्रतिस्पर्धी किंबहुना डोईजड अशी फक्त मराठ्यांचीच सत्ता काय ती शिल्लक होती. तेव्हां ती त्यांस पार ढांसळून टाकावयाची होती. हें साधण्यासाठीं इंग्रजानें शाब्दिक विश्वासाच्या मांडीवर सातारच्या प्रतापसिंह महाराजांस निजवून त्यांस ते एका हातानें थोपटीत होते तर दुसऱ्या हातानें बाजीरावास डिंवचण्याचें काम चालू होतें. फांसेपारधी रानांत ठिकठिकाणीं फांसे व जाळीं टाकतात आणि मग शिकारी कुत्र्यांच्या साहाय्यानें हाका करून सर्व रानचें रान उठवतात. तद्वत् इंग्रजांनीं सर्व प्रमुख सरदारमंडळ निरनिराळ्या कावेबाज तहांनीं जखडून टाकिलें. तसेंच सातारकर महाराजांस वश करून घेतलें आणि आतां रावबाजीस युद्धास उठविण्याचेंच फक्त शिल्लक राहिलें होतें. आणि हें फारसें कठीण नव्हतें.

पेशवे व इंग्रज यांच्यामध्यें जो शेवटचा तंटा झाला तो गायकवाडांच्या बाबतींत. बडाद्याचे गायकवाड हे पेशव्यांचे अंकित. तेव्हां गुजराथवर दोघांचा अम्मल असे. पेशव्यांची गुजराथकडील बाकी बरेच दिवस थकली होती. ती चुकती करण्याबद्दल पेशव्यानें तगादा लाविला. या प्रकरणाचा निकाल लावण्याकरितां बडोदे दरबारनें गंगाधरशास्त्री पटवर्धनाची वकील म्हणून पुणें दरबारीं रवानगी केली. गंगाधरशास्त्री हा इंग्रजांचा हस्तक असल्यामुळें तो बडोदे दरबारांत उगाच लांडा कारभार करी. ही त्याची वागणूक बडोदें येथील स्थानिक अधिकाऱ्यांस बिलकूल पसंत नव्हती. गायकवाडांचा दिवाण होण्याची

महत्त्वाकांक्षा गंगाधरशास्त्र्यास होती. त्या बाबतींत तो खटपटही करीत होता व हा हिशोबाचा तंटा मिटल्यानंतर त्यास दिवाणगिरीचीं वस्त्रें मिळण्याचा बराच संभव होता. शास्त्र्याच्या खटपटीनें वंशपरंपरागत चालत आलेल्या दिवाणपदास मुकावें लागणार म्हणून गायकवाडांचा पूर्वींचा दिवाण रावजी आप्पाजी याचा मुलगा सीताराम रावजी यानें शास्त्र्याविरुद्ध जोराची खटपट चालविली. त्यानें आपल्या तर्फे खटपट करण्यासाठीं दोन माणसें पुण्यास पेशव्यांकडे धाडलीं. अशा तऱ्हेनें बडोद्यास व पुण्यास सीताराम रावजीच्या खटपटीनें शास्त्र्याविरुद्ध राजकारण शिजत होतें.

इंग्रजांनीं शास्त्र्याच्या जिवाची हमी घेतल्यावरून तो पुण्यास पेशव्यांशीं तडजोड करण्यासाठीं आला. खुद्द पेशवेसुद्धां या गृहस्थावर फारसे खूष नव्हते. पण त्यास जुलुमाचा रामराम करणें भाग होतें. अशी स्थिति असतांना सुद्धां बाजीरावानें शास्त्र्याशीं अत्यंत स्नेहभावाचें वर्तन ठेविलें. राजकारण म्हणून कां होईना तो शास्त्र्याशीं अत्यंत प्रेमानें वागत असे. इतकेंच काय पण रावबाजीनें आपल्या नात्यांतील एक मुलगी गंगाधरशास्त्र्याच्या मुलास देण्याचा घाट घातला होता. याशिवाय शास्त्र्यानें आपला कारभारी व्हावें म्हणूनही पण विचारिलें होतें. अशा तऱ्हेनें पहिल्यानें वकील, नंतर स्नेही—व्याही व दिवाण अशा एकापेक्षां एकेक सरस अशा भाग्याच्या पायऱ्या चढण्याचा योग गंगाधरशास्त्र्यास आला होता. पण विधिघटना फार विचित्र होती. कारण शास्त्र्यानें आपण पेशव्यांचा कारभारी होण्याबद्दल एल्फिन्स्टनला विचारतांच तो त्याच्यावर उसळला व त्यानें त्याची चांगलीच कानउघाडणी केली. शास्त्र्यानें पेशव्यांचा कारभारी होण्यांत इंग्रजांचें बडोदें दरबारांतील वर्चस्व कमी होणारें असल्यामुळें एल्फिन्स्टननें त्यास हरकत घेतली. त्याबरोबर राजकारणानें उलट खाल्ली व गंगाधरशास्त्र्याचे ग्रह फिरले.

यापुढें कांहीं दिवस लोटल्यानंतर गंगाधरशास्त्री बाजीरावाबरोबर पंढरपुरास गेला असतां तेथें त्याचा ता. २० जुलै १८१५ या दिवशीं खून झाला! तेव्हां या खुनाचा आरोप बाजीरावाचा परम स्नेही त्रिंबकजी डेंगळा याच्यावर करण्यांत आला. पण खरी वस्तुस्थिति अशी नसावी. बहुधा या खुनाची

उठावणी बडोद्यास शास्त्र्याच्या वाईटावर असलेल्या मंडळीकडून झाली असावी. पण प्रत्यक्ष खून मात्र पेशवे व डेंगळा यांच्या सान्निध्यांत झाला. यामुळें इंग्रजांचें मात्र फावलें व त्यांनीं या खुनाचें झेंगट बाजीरावाच्या मागें लाविलें.

गंगाधरशास्त्र्याच्या खुनापासून वास्तविक पाहतां बाजीरावास कांहींच लभ्यांश नव्हता. शिवाय बाजीराव अगोदरच आपल्या वडिलांच्या हातून झालेल्या ब्रह्महत्येनें हैराण झाला होता. त्यांतून मनास समाधान वाटावें म्हणून तो व्रतवैकल्यें करी. त्याचें अंतःकरण अशा तऱ्हेनें आगाऊच पोळलेले असल्यामुळें तो असलें घोर कर्म करण्याला पुन्हा प्रवृत्त झाला असेल असें वाटत नाहीं. याशिवाय त्याचा व गंगाधरशास्त्र्याचा स्नेह आतां चांगलाच जमला होता, व तो जगण्यांतच त्याचा फायदा होता. तो असा कीं, यदाकदाचित् गायकवाडाकडील राजकारण त्यानें शास्त्र्यामार्फत सिद्धीस नेलें असतें. य दोन–तीन गोष्टी लक्षांत घेतां पेशवे गंगाधरशास्त्र्याचा खून पंढरपूरसारख्य पवित्र ठिकाणीं आपल्या हस्तकांकडून करवील हें अगदीं असंभवनीय वाटतें. शिवाय पटवर्धन घराण्याच्या इतिहासांत या गोष्टीचा उल्लेख कोठेंच नाहीं. उलट या खुनास बाजीरावांइतकेंच किंबहुना जास्त जबाबदार इंग्रजांस धरिलें पाहिजे. कारण शास्त्र्याच्या जिवाची हमी इंग्रजांनीं घेतली होती, तेव्हां त्याचें जीवित सुरक्षित ठेवण्यासाठीं त्यांनीं कडेकोट बंदोबस्त करावयास पाहिजे होता. त्यांतून पेशवे, शास्त्री व एल्फिन्स्टन हे नाशिकच्या यात्रेस चालले असतां वाटेंत डेंगळ्यानें बोलण्याच्या ओघांत, "तुमचें–आमचें सख्य जमलें नसतें तर तुमचा खून करण्याचा आमचा बेत होता " असें शास्त्र्यास सांगितलें होतें ! ही गोष्ट शास्त्र्यानें एल्फिन्स्टनच्या नजरेस आणली होती. असें असतां एल्फिन्स्टनसारखा धूर्त व चाणाक्ष मुत्सद्दी नाशिकला बरोबर जातो व पंढरपुरास मात्र जाण्याचें टाळतो आणि याच वेळीं अजिंठ्याचीं लेणीं पाहण्याची लहर त्यास येते, इतकेंच काय पण तो आपल्या शिरावरील जबाबदारी न ओळखतां अजिंठ्यास निघूनही जातो व पंढरपुरास इंग्रजांच्या जबाबदारीवर आलेल्या शास्त्र्याचा खून होतो हें काय गौडबंगाल आहे ? इंग्रजांची जगांत कर्तव्यनिष्ठा मशहूर आहे. तेव्हां एल्फिन्स्टनच्या या हलगर्जीपणावरून असें कां म्हणूं नये कीं पेशव्यांनीं

टाकिलेल्या आमिषास बळी पडून शास्त्री पेशव्यांचा कारभारी झाला तर गायकवाडाकडील आपलें वर्चस्व कमी होईल व पेशव्यांचें बस्तान नीट बसेल म्हणून हा साप पाहुण्याच्या हातानें परस्पर मारला गेला तर फारच चांगलें अशा धूर्तपणानें एल्फिन्स्टन लेण्यास गेला असावा ? अशा तऱ्हेनें शास्त्र्याच्या जिवास केव्हांना केव्हां दगा आहे हें ठाऊक असून सुद्धां एल्फिन्स्टननें तिकडे हेतुपुरस्सर कानाडोळा केला व पेशव्याच्या सान्निध्यांत शास्त्र्याचा खून होतांच त्यानें हें सर्व लचांड पेशव्यांच्या गळ्यांत अडकवून दिलें आणि त्रिंबकजी डेंगळ्यास हवालीं करण्याबद्दल बाजीरावाकडे निकड लाविली.

या वेळीं बाजीरावाची स्थिति फारच वाईट होती. फितुरीचें पीक शब्दातीत पिकलें होतें. त्याच्या विषानें बाजीरावाचे वाडे, खलबतखाने अगदीं पारदर्शक झाले होते. रावबाजीची प्रत्येक कृति साहेबास अगदीं स्पष्ट दिसत होती. इतकेंच काय पण रावबाजी खातो काय, पितो काय, कोणता पोशाख केव्हां घालतो, त्याच्याकडे कोण कोण लोक येतात, केव्हां केव्हां येतात व त्यांचीं काय काय खलबतें चालतात याची सर्व इत्थंभूत बातमी एल्फिन्स्टनास लागत असे. त्यामुळें कोणावरही विश्वास ठेवण्याची सोय नव्हती. यशवंतराव घोरपड्यासारखे लोक इंग्रजाकडे फितुर करतों म्हणून बाजीरावाकडून पैसे उपटीत व इंग्रजांचें काम करीत ! अशा स्थितींत त्याच्या पूर्ण विश्वासांतील माणसें चार-दोनच होतीं. त्यांपैकीं त्रिंबकजी डेंगळा हा एक होता. त्याचा ताबा इंग्रज मागूं लागले पण हीही गोष्ट पेशव्यांनीं नाइलाजानें कबूल केली व त्रिंबकजीस एल्फिन्स्टनच्या ताब्यांत देण्यांत आलें. एल्फिन्स्टननें गोऱ्या सोल्जरांच्या कडेकोट बंदोबस्तांत ठाण्याच्या तुरुंगांत त्रिंबकजीस ठेविलें. पण तो इतका वस्ताद कीं, त्यानें असल्या कडेकोट बंदोबस्तांतून आपली सुटका करून घेतली व साहेबाच्या हातावर तुरी दिल्या. त्याबरोबर एल्फिन्स्टनचें माथें पार भडकलें. या गोष्टीस तो बाजीरावासच जबाबदार धरूं लागला आणि पुन्हा त्रिंबकजीचा ताबा मागूं लागला. जबरदस्ताचा न्याय म्हणतात तो हाच ! कारण आपल्या गाफिलगिरीमुळें मनुष्य निसटतो व त्याबद्दल शासन मात्र दुसऱ्यास. संन्याशयाला सुळीं देण्यांतलाच प्रकार. असो. ही साडेसाती बाजीरावाच्या मागें लागली.



पेशवे रावबाजी



मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन

त्रिंबकजीस ताब्यांत द्यावें नाहीं तर त्यास ताब्यांत देईपर्यंत गुजराथ प्रांत, पुरंदर, रायगड व सिंहगड हे किल्ले ओलीस म्हणून द्यावे, या एल्फिन्स्टनच्या मागणीबद्दल बाजीरावानें बरीच तक्रार केली. कारण गुजराथ प्रांत म्हणजे अत्यंत सुपीक, केवळ सोन्याचाच तुकडा. तसेंच सिंहगड, पुरंदर व रायगड हे किल्ले म्हणजे महाराष्ट्रांतील महत्त्वाचे किल्ले. तेव्हां त्यांचा ताबा मागणें म्हणजे शुद्ध अन्याय होता. त्यांतून, 'त्रिंबकजीच्या पळण्याशीं माझा काहीइतकाही संबंध नाहीं. तो तुमच्या निष्काळजीपणामुळें पळाला असें असतां तुम्ही मला जबाबदार धरतां व त्याबद्दल ओलीस म्हणून वरील मागणी मागतां यांत कांहींच तथ्य नाहीं' हें बाजीरावाचें म्हणणें रास्त होतें, पण जिताची केविलवाणी किंकाळी ऐकण्यास जेते तयार नसतात. अशा स्थितींत हक्काची मागणी मान्य कोण करणार? अखेर हें त्रिंबकजीचें प्रकरण चांगलेंच धसास लागलें व त्रिंबकजीस आपल्या ताब्यांत देण्याच्या बाबतींत बाजीराव मुद्दामच टाळाटाळ करीत आहे या संबंधीवर एल्फिन्स्टननें ता. ८ मे १८१७ ला पुण्यास इंग्रजी फौजेकडून गराडा घातला. त्यामुळें वरील अटी मान्य करण्यावांचून बाजीरावास गत्यंतरच उरलें नाहीं. म्हणून त्यानें एल्फिन्स्टनच्या मागणीस रुकार दिला. वर उल्लेखिलेले प्रांत व किल्ले इंग्रजांच्या ताब्यांत द्यावे लागले. या पुण्याच्या तहानें मात्र बाजीरावाच्या तळव्याची आग मस्तकास गेली. त्यानें इंग्रजांशीं शेवटचा सामना देण्याचें ठरविलें व तो त्या तयारीसही लागला.

———

रणसन्मुख पेशवा : ८

सर्कशींतील आंखीव रिंगणांत प्रदक्षिणा घालणाऱ्या गजराजाच्या गंडस्थलावर वनराज सिंह स्वारी करून बसलेला असावा, प्रदक्षिणा घालण्याचें काम संपावें व सिंहानें गंडस्थळावरून खालीं उतरावें म्हणून रिंगमास्तरनें चाबकाचे आवाजावर आवाज काढावेत, पिस्तुल रोखावें पण या साऱ्या धाक दपटशाला भीक न घालतां उलट सिंहानें गंडस्थलावर शेपटी आपटून गर्जना करावी, हट्टानें आरडा ओरड करावी, बेचैन व्हावें आणि शेवटीं चौदाव्या रत्नाचा प्रत्यक्ष प्रसाद मिळतांच नाइलाजानें गंडस्थल सोडून, मांजरासारखें मऊ होऊन जड अंतःकरणानें खालीं यावें नि पटकन् पिंजऱ्याची वाट धरावी, हा प्रकार सर्कस–प्रेक्षकांस परिचित आहे. खरेंच आहे ! पंजाखालीं आलेला तोंडचा घांस सोडून देऊन पिंजऱ्यांत शिरण्याचा प्रसंग त्या बिचाऱ्यावर–सर्कशींतील सिंहावर आलेला असतो ! किती भयानक व खेदजनक दृश्य हें ! अशीच स्थिति बाजीरावाची झाली. एल्फिन्स्टनच्या करड्या धोरणापुढें त्याचा नाइलाज झाला. त्या तहावर सही करतांना बाजीरावानें नाना तऱ्हेचे फरंगाडे फोडले, बतावण्या केल्या, चालढकल केली पण एल्फिन्स्टननें त्याच्या छाताडावर खुद्द पुण्यास फौजेचा गराडा घालून लष्करी सामर्थ्याचें पिस्तुल रोखलें तेव्हां मात्र तो घाबरला व आतां हें प्रकरण खास अंगाशीं येतें असें वाटून त्यानें पुण्याच्या तहावर मोठ्या जड अंतःकरणानें आणि अत्यंत नाखुषीनें सही केली. ही गोष्ट ता. १३ जून

१८१७ ला घडली व त्यास ता. ५–७–१८१७ रोजीं ग. ज. ची मान्यता मिळाली.

वसईच्या तहावर केलेली सही वाळते न वाळते तोंच बाजीरावावर पुण्याच्या तहावर सही करण्याचा घोर प्रसंग आला. दोन्ही कालांचा विचार केला असतां कंपनी सरकारच्या वृत्तींत जमीन–अस्मानाचें अंतर पडलें. यशवंतराव होळकराच्या दमदाटीस भिऊन प्रथम जेव्हां बाजीराव वसईस टोपीकराच्या आश्रयास गेला, त्या वेळीं त्याचें करण्यांत आलेलें स्वागत, त्याच्या सन्मानार्थ डागण्यांत आलेल्या तोफा आणि प्रदर्शित झालेला आनंद आतां कंपनी सरकारच्या स्वभावांत व वागणुकींत कोठेंच दिसत नव्हता. संगीन रोखून ' तहावर सही कर ' अशी साहेबाची उद्दाम आज्ञा आतां बाजीरावास बजावीत होती. तिच्या हुकमतीपुढें बाजीरावाचा नाइलाज झाला म्हणूनच त्यानें पुण्याच्या तहावर सही केली.

या तहानें बाजीरावाचें पेशवेपद नाहींसें झालें, आणि हिंदुस्थानांतील दौलतदारांचा धनी म्हणून वैभव भोगणारा पेशवा नामशेष झाला. महाराष्ट्रा बाहेरील पेशव्यांचा ३४ लाखांचा मुलूख इंग्रजांनीं खालसा केला. मराठे सरदारांचा व त्याचा संबंध कायमचा तोडून टाकिला. शिंदे–होळकर, गायकवाड व नागपूरकर भोसले यांच्या दरबारांतील बाजीरावाचे वकील काढून टाकण्यांत आले. तसेंच पेशव्यांच्या दरबारीं असणाऱ्या शिंदे–होळकरांच्या वकीलांस रजा देण्यांत आली आणि बाजीरावास सामान्य प्रतीचा मांडलीक करण्यांत आलें. या तहानें बाजीरावाची अंबारी उलटीच झाली. एकाद्या इरसाल सावकारानें चार–दोन व्यवहारांतच कुळाचा चट्टामट्टा करावा तसेंच झालें. एल्फिन्स्टननें नुसत्या लष्करी दमानें बाजीरावास रेशमाप्रमाणें मऊ केला. पेशव्याची सत्ता व वैभव नाहींसें करून तो राजदंड कंपनी सरकारनें आपल्या हातीं घेतला. गादीवर पाय ठेवल्यापासून अवघ्या वीस बावीस वर्षांत बाजीरावानें नादानपणानें आपली सत्ता व संपत्ति घालविली. पुण्याच्या तहावर सही करतांना त्याचा संताप व उद्रेक अनावर झाला; ' होतें काय आणि झालें काय ' याचें दुःख त्यास होरपळूं लागलें. चित्तास थोडा विरंगुळा वाटावा म्हणून पुण्याच्या

तहावर सही करून तो पंढरपुरास गेला. आषाढी एकादशीस पंढरपुरची यात्रा करून नंतर तो माहुलीस गेला. या सालीं अधिक श्रावण आल्याकारणानें कृष्णा–वेण्णाच्या संगमावर अधिक मासानिमित्त स्नानें, जपजाप्य वगैरे करण्याकरितां बाजीरावानें मोठा लवाजमा बरोबर घेतला होता. त्यानें हे तीन–चार महिने बाहेरच काढिले.

हिंदुस्थानांतील पेंढाऱ्यांचा सुळसुळाट बंद करावा असा कंपनी सरकारचा कृतसंकल्प याच वेळीं झाला. आणि त्यासाठीं हिंदी दौलतदारांचें साहाय्य व सहानुभूति मिळवावी व तसें करतांना कंपनी सरकारच्या धोरणास थोडी मुरड घालावी लागली तरी चालेल असें ठरवून त्या कामावर शिष्टाई करण्यासाठीं मालकमसाहेबाची नेमणूक करण्यांत आली. त्याप्रमाणें तो नागपूरकर भोसले व शिंदे यांच्या गांठी घेऊन पुण्यास आला, पण बाजीरावसाहेबांची स्वारी माहुलीस असल्यामुळें तो तेथें गेला. दसऱ्यानंतर या मोहिमेस ताबडतोब सुरुवात कराव-याची असल्यामुळें मालकमसाहेबास जरा धांदल होती म्हणून कात्रजच्या घाटाजवळ मेणा ठेवून तो डांकेच्या घोड्यावरून जलदीनें माहुलीस गेला. येथें त्यानें बाजीरावाची गांठ घेतली. या वेळीं बोलणें चालणें करण्यास बापू गोखले, रामचंद्र बापु करंदीकर, बाळोबा सलकडे, चिमणाजी नारायण वगैरे मंडळी होतीच. याशिवाय मालकमसाहेबानें आपल्याबरोबर मोरो दीक्षित व पोटसाहेब या दोघांस घेतलें होतें. मालकम माहुलीस पोहोंचला त्या वेळीं अधिक श्रावण व॥ ११ (ता. ८ ऑगष्ट १८१७) होती म्हणून त्या दिवशीं बाजीरावानें त्याच्याशीं कांहींच बोलणें केलें नाहीं. पण इतर मंडळींशीं मात्र वाटाघाट पुरेपूर झाली. दुसरे दिवशीं द्वादशीस बाजीरावानें मालकमसाहेबास जेवावयास बोलाविलें व भोजनोत्तर उभयतांत पुष्कळच बोलणें झालें. या भेटींत बाजीरावानें एल्फिन्स्टनबद्दल बरीच तक्रार केली, "साहेबाची माझ्यावर करडी नजर आहे. ते मला सारखे दरडावणीनें वागवितात, माझ्यावर त्यांची अहोरात्र टेहळणी आहे. त्यांनीं माझ्याभोंवतीं हेरांचें जाळें विणलें आहे. त्यांची टेहळणी माझ्यावर इतकी आहे कीं त्यांच्या टेहळणीच्या ससेमिऱ्यानें मी अगदीं अस्वस्थ झालों आहें."

अशा नाना प्रकारच्या तक्रारी बाजीरावानें मालकमसाहेबाच्या कानावर घातल्या. आपल्या भाषेच्या मोहिनीनें कोणासही मोहून टाकण्यांत बाजीराव पटाईत होता. त्याच्या बोलण्याचा इष्ट परिणाम मालकमच्या मनावर झाला व त्याचीं अनिष्ट फळें एल्फिन्स्टनला भोगावीं लागलीं. कारण या पुढच्या मोहिमेंत तो जरा बाजूला पडल्यासारखा झाला. दक्षिणेकडील सर्व कारभार ग. ज. नें मालकम व हिस्लॉप या दोघांना सांगितला. या धोरणानें एल्फिन्स्टन जरा कष्टी झाला. 'बाजीरावाला छेडण्यांत अर्थ नसून त्याच्याशीं सामोपचाराचें धोरण ठेवण्यांत इंग्रजांचें हित आहे' असा अभिप्राय मालकमनें ग. ज. ला कळविला. पुण्यास येतांच त्यानें एलफिन्स्टनलाही 'बाजीरावाशीं आपलें धोरण प्रेमाचें ठेवा, त्यास उगाच त्रास देऊं नका' असें बजाविलें. अशा तऱ्हेनें मालकम व बाजीराव यांची भेट यशस्वी झाली. 'पेंढाऱ्यांचें पारिपत्य करण्या-साठीं आम्हीं इंग्रजांस मदत करूं' असें श्रीमंतांनीं अभिवचन दिलें व फौज उघडपणें जमविण्यास प्रारंभ केला. झालें. ता. १० ऑगस्ट १८१७ ला मालकम पुण्यास आला. ता. १२ ला मोरो दीक्षित याजकडे मेजवानी घेऊन तो हैद्राबादेस रवाना झाला. मालकमची ही शिष्टाई बाजीरावास पथ्यकर अशीच झाली. पण एल्फिन्स्टनला मात्र मालकमच्या शिष्टाईची ही लुडबुड मनापासून नापसंत होती. त्यानें बाजीरावाच्या अंतःकरणाचा पुरा भेद घेतला होता. बाजीरावाच्या स्वभावाची त्यास पूर्ण माहिती होती. तो इंग्रजांविषयीं आतां मनांतून कसा जळत होता, हें त्यानें पाहिलें होतें. पेशवे व इंग्रज यांच्यामध्यें लवकरच कटकट सुरू होणार हें तो जाणून होता. म्हणून त्या दृष्टीनें इंग्रजांनीं आपलें धोरण ठेवावें अशी त्याची इच्छा होती. पण तूर्त तरी मालकम-साहेबाच्यापुढें त्याचें चालेना.

बाजीरावाचें मात्र आतां चांगलेंच फावलें. कारण पेंढाऱ्यांच्या निमित्तानें सैन्याची जमवाजमव करण्यास त्यास संधी मिळाली. वसईच्या तहापासून त्याच्या सत्तेस लागलेल्या घसरगुंडीचा पुण्याच्या तहानें कडेलोट केला होता. आपण पूर्वींचे सर्वसत्ताधारी पेशवे नसून कंपनी सरकारच्या कृपाछत्राखालीं वागणारे सामान्य मांडलीक झालों आहोंत, तेव्हां ही स्थिति बदलली पाहिजे आणि ही

स्थिति बदलावयाची म्हणजे कंपनी सरकारचा समरांगणावर समाचार घेतला पाहिजे, हा एकच उपाय शिल्लक असल्यामुळें तो आतां त्या तयारीस लागला होता. पण त्याची ही जागृती म्हणजे विझतांना दिवा मोठा व्हावा तशांतलीच! अशाही स्थितींत तो जर अधिक चतुराईनें वागता तर त्याची बाजू त्यास सांवरतां आली असती. पण अशा आणीबाणीच्या प्रसंगीं सुद्धां त्याच्या हातून घिसाडघाई झाली व त्याच्या प्रयत्नांचा विचका झाला आतां श्रीमंत उघड-उघड सैन्याची भरती करूं लागले. या कामावर त्यांनीं नरवीर बापू गोखले याची नेमणूक केली. बापू गोखले यास बाजीरावाचा चंचल स्वभाव माहीत होता. तेव्हां त्यानें श्रीमंतांस या कामीं चांगलें बांधून घेतलें. श्रीमंतांनींही कार्याचें महत्त्व ओळखून बापू गोखल्यास सर्व मुखत्यारी दिली.

बाजीरावानें आतां सुरू केलेला उद्योग पाहिला म्हणजे आतां तो खडबडून जागा झाला होता व कार्याची आंखणी त्याच्या मतानें त्यानें योग्य तऱ्हेनें चालविली होती असें म्हणतां येईल. 'आम्हांस कोणीतरी एकी एक नायक पाहिजे म्हणजे त्याच्या आज्ञेंत आम्हीं वागूं' अशी शिलेदारांची मागणी येतांच लष्कराचे सर्व अधिकार त्यानें बापू गोखल्यास दिले. 'तुमच्याशिवाय मी दुसऱ्या कोणाचीही सल्ला युद्ध—प्रकरणीं ऐकणार नाहीं. तुमच्याच सांगण्याप्रमाणें मी वागेन' असा स्वदस्तूरचा लेख बापू गोखल्यास त्यानें दिला व त्यास सर्व सत्ताधारी सरसेनापती नेमिलें. या वेळीं श्रावण मासांत माहुली येथें मोठी जत्रा जमे. त्या जत्रेचा फायदा घेऊन त्यानें कुस्त्यांच्या मोठमोठ्या दंगली केल्या. त्या दंगलींतून योग्य अशा मल्लांची निवड करून त्यांची लष्करांत भरती केली. बापू गोखल्यास खर्चासाठीं म्हणून एक कोट रुपये रोख दिले. या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रसंगीं सर्वांनीं मनोभावें साहाय्य करावें, म्हणून जप्त केलेल्या जहागिऱ्या व इनामें त्यांचीं त्यांस मोकळीं केलीं. अशा तऱ्हेनें रयतेचा दिल आपल्या विषयीं साफ राहावा म्हणून त्यानें खटपट सुरू केली. या वेळीं, "पुण्यांत तमाम सरदार जमा झाले. निपाणकर, अक्कलकोटवाले भोसले, निंबाळकर, घोरपडे, जाधव, विंचूरकर, पटवर्धन, बापू गोखले, राजे बहादूर भोईटे, पुरंधरे व किरकोळ सरंजामदार असे मिळून व नवीन ठेविलेली फौज मिळून लाख, सव्वा लाख घोडे

मिळाले. खेरीज पायदळ अरब, रोहिले, पठाण, सिद्दी, गोसावी, शिवाय रजपूत, रांगडे मुसलमान असे ५०००० पायींचे लोक नवे चाकर ठेविलेले असा सरंजाम तयार झाला." या सरंजामाविषयीं आणखी एक जरा अधिक तपशिलाचा उल्लेख असा आहे कीं, " नवे फौजेचें कलम जारी केली. अवघे सरदार रास्ते, आप्पा देसाई, पानसे, पटवर्धन, विंचूरकर वगैरे बोलावून ममतेंत घेऊन पुण्यास आणिले. दहा हजार आरब व तीन हजार नंगे गोसावी चाकरीस ठेविले. तोफखाना, नवीन बाण, दारूगोळा यांचा सरंजाम चालविला. फौजेचा भरणा सुमारें पन्नास हजार झाला. मुख्य बापू गोखले पंधरा हजार, आबा पुरंदरे तीन हजार, विंचूरकर दहा हजार, शिवाय नारो विष्णू आपटे, मिरजकर, पटवर्धन, रास्ते, थोरात, जाधव इत्यादिकांचे प्रत्येकीं सुमारें दोन हजार. "

अशा तऱ्हेनें बाजीरावानें सर्व बाजूंनीं उठावणी चालविली. बाजीरावाच्या एकंदर राज्याचा वसूल या वेळीं सवा कोट रुपयांचा होता. त्यांपैकीं तो दरसाल पन्नास लाख रुपये शिल्लक टाकी. अशा तऱ्हेनें इ. स. १८१५ त त्याच्याजवळ नगदी पांच कोट रुपये शिल्लक होते. वसईच्या तहानें झालेलें पातक कंपनी सरकारशीं खडा सामना दिल्याशिवाय नाहींसें होणार नाहीं अशी बाजीरावाची बालंबाल खात्री होती व त्याप्रमाणें त्याच्या बुद्धीस सुचेल त्याप्रमाणें तयारी चालू होती. पण आतां मात्र फारच चमत्कारिक स्थिति प्राप्त झाली होती. एक ठक तर दुसरा महाठक. बाजीराव आपलें गुपित बाहेर कळूं न देण्याचा मोठा आव आणी खरा, पण त्या कलेंत इंग्रज त्याच्याहीपेक्षां वरचढ होता. पेंढाऱ्यांच्या निमित्तानें सर्व देशभर सैन्याची हालचाल करून मराठी दौलतदारांस पायबंद घालण्याचा कंपनी सरकारचा अंतस्थ हेतु होता, पण त्याला टोपीकर इंग्रजानें असें कांहीं गोंडस रूप दिलें होतें कीं ज्याचें नांव तें ! ' काय करावें, या पेंढाऱ्यांनीं सर्व देशभर असा धुडगुस घातला आहे कीं, बोलावयाची सोय नाहीं. रात बेरात गांवावर छापा घालतात, मुलें—माणसें ठार करतात, गांवचे गांव लुटून फस्त करतात, कोणाचें वित्त ठिकाणावर राहात नाहीं का कोणाच्या सत्तेस ते जुमानीत नाहींत, तेव्हां त्यांस एकदां सर्व सत्ताधीशांनीं एक होऊन मोडून काढिलें पाहिजे. त्याशिवाय आपल्या सत्तेस स्थैर्य नाहीं व मत्तेस

सुरक्षितता नाहीं. म्हणून या महत्त्वाच्या कार्यांत सर्व हिंदी दौलतदारांनीं आम्हांस विनाविकल्प निखालसपणें साहाय्य करावें व जनतेचा दुवा घ्यावा.' असा पेंढाऱ्यांच्या मोहिमेबद्दलच्या उज्ज्वल ध्येयाचा ढोल बडविण्यास कंपनी सरकारनें सुरुवात केलीच होती व साहाय्य मिळविण्याचा उद्योग चालूच होता. मालकम त्यासाठींच तर पुण्यास येऊन गेला होता.

पुण्याच्या तहानें बाजीरावाची सत्ता सर्व बाजूंनींच कमी झाली होती. तो हतबल झाला होता. त्याचा महाराष्ट्राबाहेरील ३४ लाखांचा मुलूख इंग्रजांनीं हिसकला होता. तसेंच त्याचें सैन्यही पण कमी केलें होतें. आधींच खुळचटपणानें स्वतःस प्रसंगीं उपयोगी पडावें म्हणून कॅ. फोर्ड या परकीय मनुष्यास नोकरींत ठेवून तयार केलेलें सैन्य, इंग्रजांनीं मदतीच्या सोंगाखालीं आपल्या ताब्यांत घेतलें व त्यास 'पूना ऑक्झिलरी फोर्स' असें नांव ठेविलें. त्या सैन्यानें व माणसानें ऐन वेळीं घात करावयाचा तसा केलाच. 'मा बाप कंपनी सरकार' म्हणून ज्या टोपीकराची मनधरणी करण्यांत आणि लांगूलचालन करण्यांत बाजीरावानें आपल्या आयुष्यांतील ऐन उमेदीचीं उणींपुरीं पंधरा वर्षें घालविलीं त्याचा मोबदला कंपनी सरकारनें अशा रीतीनें चुकता करतांच बाजीरावास काय यातना झाल्या असतील याची कल्पनाच करावी! पेंढाऱ्याच्या मोहिमेंत साहाय्य करण्याबद्दल मालकम सांगून गेला व बाजीरावानें कंपनी सरकारास मदत करण्यासाठीं सैन्याची भरती सुरू केली. आतां ही त्याची तयारी इंग्रजाशीं लढण्याकरितां होती कीं पेंढाऱ्यांच्या मोहिमेंत मदत करण्याकरितां होती हें त्याचें त्यासच माहीत. पण असें म्हणण्यापेक्षां आतां त्याचें धोरण निश्चित झालें होतें व इंग्रजांच्या चालीस तो ह्या चालीनें उत्तर देत होता इतकेंच. इंग्रजांची तरी पेंढाऱ्यांवरील मोहीम कोठें शुद्ध हेतूची होती! या वेळेस बाजीरावास पडलेला पेंच मात्र फार विलक्षण होता. मालकमच्या सांगीप्रमाणें फौज न ठेविली तर पेंढाऱ्यांच्या मोहिमेंत मदत न केल्याबद्दलचा ठपका येणार व सैन्य ठेवावें तर एल्फिन्स्टन गुरगुरणार असा हा तिरपा तिढा होता.

पश्चिमेकडे दृष्टि ठेवून दक्षिणेकडे चालणारी कंपनी सरकारची संक्रान्त आतां पेंढाऱ्यांवर बसणार होती हें जगजाहीर झालें होतें. आणि त्या निमित्तानें शिष्टाई चालू असावयास पाहिजे होती व वरपांगीं ती तशी चालूही होती. हेस्टिंग्जच्या सांगण्यावरून मालकम या दौऱ्यावर निघाला होता. पेशव्यांची व त्याची गांठ झाली होती. पेंढाऱ्यांविरुद्ध फार मोठें सैन्य एके ठिकाणीं जमा करण्याच्या उद्योगांत टोपीकर होता, पण प्रत्येक सैन्याच्या हालचाली मात्र त्या धोरणानें नव्हत्या. कारण पेंढाऱ्यांचा उपद्रव मुख्यत: उत्तर हिंदुस्थानांत नर्मदेच्या पलीकडे विंध्याद्रीच्या डोंगरांत आणि त्यांच्या पारिपत्यार्थ उभारलेल्या सैन्यांपैकीं ब्रिगेडियर जनरल स्मिथ याच्या हाताखालील फोर्थ डिव्हिजनमधील लष्कर पुण्याच्या रोखानें अहमदनगरवर चाल करून येत होतें! तसेंच मुंबईची एक युरोपियन पलटण, मद्रास नेटिव्ह घोडेस्वारांची दुसरी पलटण, मद्रास नेटिव्ह इन्फन्ट्रि, पंधराव्या रेजिमेंटमधील दुसरी पलटण असें हें सैन्य मुंबईमधून निघून पुण्याकडे येत चाललें. अशा तऱ्हेनें कंपनी सरकारच्या सैन्याची संक्रान्त उत्तरेस पेंढाऱ्यांकडे न वळतां पुण्यावर आली.

पुण्याच्या आसपास इंग्रजांच्या फौजा जमा झाल्या आणि बाजीरावानेंही आपलें सैन्य पुण्यांत जमा केलें. त्याबरोबर मात्र एल्फिन्स्टनच्या नाकास मिरच्या झोंबल्या. लगेच त्यानें कॅ. फोर्डला बाजीरावाकडे धाडिलें व सांगावा पाठविला कीं, पेंढाऱ्यांच्या मोहिमेंत मदत करण्यासाठीं म्हणून जर तुम्ही आपलें सैन्य जमा केलें म्हणतां, तर त्याचा तळ पुण्यांत न ठेवितां त्याची रवानगी वऱ्हाडकडे करा. यावर बाजीरावानें रोखठोकच कळविलें कीं, पुण्याच्या आसपास जमा केलेलें तुम्ही आपलें सैन्य प्रथम हलवा म्हणजे मग मी माझा विचार पाहीन. या वेळीं कंपनी सरकारनें आपला डाव पुरा मांडिला होता. पेंढाऱ्यांच्या निमित्तानें कंपनी सरकारचें हें पेंढार हिंदी दौलतदारांना त्यांच्या सत्ता-संपत्तीसुद्धां पुरेपूर लुटणार होतें. या प्रसंगाचा फायदा घेऊन कंपनी सरकारनें शिंदे, होळकर, भोसले व पेशवे यांच्या छातीवर आपल्या फौजा आणून ठेविल्या आणि त्यांनीं प्रतिकाराची तयारी करतांच त्यांना जाब विचारण्यास सुरुवात केली. पेशव्यांचें राज्य जिंकून त्यांस नामशेष

करण्याचा ठराव ग. ज. नें ता. १६–५–१८१७ रोजीं केला व तसे हुकूम आपल्या ठिकठिकाणच्या रेसिडेंटांस धाडिले. त्या धोरणानें सर्व नाक्यांच्या ठिकाणीं त्यांनीं आपल्या फौजा ठासून उभ्या केल्या. हा प्रसंग इंग्रज आपणावर केव्हां तरी आणणारच हें बाजीराव जाणून होता व तसा तो त्यानें आणिला तेव्हां न डगमगतां त्यास तोंड देण्याची सिद्धता बाजीरावानें आपल्या अकलेप्रमाणें केली, या त्याच्या बाणेदारपणाबद्दल त्याचें कौतुक करावेसें वाटतें. नाहींतर सामान्य मांडलीक म्हणून त्यास शिंद्याप्रमाणें जगतां आलें असतें.

रणांगणावर रेसिडेन्टास समशेरीची सलामी ठोकण्यापूर्वीं बाजीरावाची आणि एल्फिन्स्टनची शेवटची भेट १८१७ च्या ऑक्टोबर महिन्यांत झाली. त्या वेळीं त्यानें मोठे मार्मिक उद्गार काढिले आहेत ते असे :

"तुमचे आमचे ऐक्यतेस किती संवत्सरें झालीं. आगम–निगम भूत–भविष्य पाहून तुम्हाशीं एकवाक्यता केली, ते समयीं करारमदार, कित्येक कामाच्या तजविजी करून रूपास आणावे त्याचा जिम्मा तुम्ही सर्व प्रकारें करितां. आजतागाइत काय झालें त्याचें स्मरण करावें. असें बहुता प्रकारचें करणें, त्याचे पुढें ठेवून कुंठित करून बोलणें बंद झालें. इतकें तुम्ही करत असतां तुमचें मानस मी कदापि तोडिलें नाहीं. येणें करून ऐश्वर्य अथवा जो पदार्थ माझे अंगीं होता तो तेजहीन झाला. **मी मूळ मंत्रावेगळा तुमचे कारणानीं झालों. जो मी होतों तो आज नाहीं. तुम्ही कशास पुसतां. तुमचे स्नेहाची जोड मात्र केली कीं जी कला अंगीं होती ती दवडून बसलों.**"

फितूर : ९

'मी मूळ मंत्रावेगळा तुमचे कारणानें झालों. जो मी होतों तो आज नाहीं. तुमच्या स्नेहाची जोड मात्र केली कीं जी कला अंगीं होती, ती दवडून बसलों.' —हे उद्‌गार बाजीरावानें एल्फिन्स्टनसमोर काढिले पण त्याचा परिणाम त्याच्या मनावर कितपत झाला असेल कोण जाणे. पेशव्यास आपण कसें बनविलें असें म्हणून तो मनांतल्या मनांत मिस्किलपणें हसलाही असेल. 'जो मी होतों तो आज नाहीं' हे हृदयाच्या तारा पिळवटून काढलेले उद्‌गार अंतःकरणाचा भेद करणारे आहेत. बाजीरावाच्या कपाळकरंटेपणाबद्दल कींव आल्यावांचून राहात नाहीं. कंपनी सरकार व पेशवे यांचे परस्पर संबंध त्यानंतर इतके विकोपास गेले कीं, आतां फक्त युद्धाचा वणवाच भडकण्याचा अवकाश राहिला. इंग्रजांनीं आपलें सैन्य बाजीरावाच्या उरावर ठासून उभें केलें व बाजीरावानें शहास शह म्हणून आपलेंही सैन्य इंग्रजांसमोर खडें केलें. वैमनस्याचा दारूगोळा तयारच होता. समशेरीच्या चकमकींतून ठिणगी केव्हां पडेल व भडका उडून आगीचे लोळ केव्हां उठतील याचा नेम नव्हता. मर्दांचे हात सुरसुरत होते आणि घोडे फुरफुरत होते. दोन्ही बाजूच्या तोफा आ वासून आग ओकण्याच्या आज्ञेचीच वाट पाहात होत्या. वातावरण तंग नि तापलेलें होतें. पण हाय! रावबाजीच्या दारूगोळ्यांत मात्र साहेबानें फितुरीची फुनकी वाळू पुरती ठांसून भरली होती. तोफांच्या तोंडांत बेइमानीच्या खुंट्या पक्क्या ठोकल्या होत्या. केरभऱ्यापासून कारभाऱ्यापर्यंत, शिले-

दारापासून सरदारापर्यंत, हुजऱ्यापासून हुजुरांपर्यंत साहेबाच्या फंदफितुरीनें भुरळ पाडली होती. आणि दुर्दैव असें कीं, श्रीमंत रावबाजीला मात्र या प्रकाराची तित-कीशी दादही नव्हती. त्यामुळें खास विश्वासु म्हणून एकाद्यास कानगोष्ट सांगावी तर तोच फितुर ठरावा, इमानी म्हणून एकाद्याला जवळ करावें तर तोच अस्तनींतला निखारा निघावा, कुणाच्या खांद्यावर विश्वासानें मान टेंकावी तर त्यानेंच केसानें गळा कापावा, इतकेंच काय, कमरेला नित्य लटकणारी तलवार तर खात्रीची ना !— पण प्रसंगीं ईर्षेनें ती उपसावी तों केवळ मूठच हातीं लागावी, असला प्रकार ऐनवेळीं झाला ! साहेबानें फितुरीचें पेंवच फोडलें.

—आणि इतकें करून इंग्रज इतिहासकार ओरडतातच कीं, केवळ रावबाजीनेंच इंग्रजी सैन्यांत फितुरीचा प्रयत्न केला ! पण ह्या ‘ चोराच्या उलट्या ’ आहेत हें पुढील सर्व प्रकारावरून ध्यानांत येईलच. लढाई सुरू झाल्याबरोबर जिवाला धोका आहे हें जाणून एल्फिन्स्टननें महत्त्वाचे कागदपत्र जाळून पोबारा केल्याचें इतिहासानें नमूद केलें आहे. आपलीं कृष्णकृत्यें जगापुढें येऊं नयेत म्हणून एल्फिन्स्टनसारख्या चतुर नि चाणाक्ष मुत्सद्यांनीं कितीही कसून काळजी घेतली तरी त्या बंदोबस्ताचा तुरुंग फोडून त्यांच्या कुटिल कारस्थानांचीं कुलंगडीं पुराव्यासकट बाहेर आलीं आहेत. त्यांतून आपल्या स्वतःच्याच घरांतील कुलंगडीं तिसऱ्यास सांगून आपलें घरचें घर तिसऱ्याच्या घशांत बेमालूम तऱ्हेनें कसें उतरेल याची काळजी आम्हां भारतवासीयांना फार ! आपलें गाठोडें दुसऱ्यानें गट्ट करून ढेंकर दिल्याखेरीज आम्हांस स्वस्थ झोंप कशी ती यावयाचीच नाहीं, या आमच्या गुणाबद्दल आम्ही मशहूर आहोंत. फितुरीनें स्वतःचा आत्मघात करून घेण्यांत आम्ही कोणासही हार जाणार नाहीं !

मराठ्यांचें स्वराज्य स्थापन झाल्यापासून तों तें नाहींसें होईपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या चेहऱ्यावर फितुरीच्या महारोगाची सूज अनेक वेळां उमटली आहे व त्यामुळें आपलें वाटोळेंही कांहीं कमी झालेलें नाहीं ! हा रोग आपल्या अंगांत भिनला आहे, मुरला आहे आणि आतां तर आपण त्यानेंच सडत चाललों आहोंत. आधींच आपला स्वभावधर्म असल्या प्रकारचा

आणि बाजीरावाच्या वेळीं तर इंग्रजांनीं त्यास सढळ हातानें प्रोत्साहन दिल्या-कारणानें आधींच उल्हास आणि त्यांत हा फितुरीचा फाल्गुन मास साजरा झाल्यानें मराठी साम्राज्याची होळी पुनव पाजळली !

या फितुरीचे उल्लेख बखरी, पोवाडे यांच्यांत तर आहेतच. पण एल्‌फिन्स्टनला धाडलेलीं व एल्फिन्स्टननें लिहिलेलीं अनेक अस्सल पत्रेंही पण आतां उपलब्ध झालीं आहेत. या फितुरीबद्दल सोहनीकृत पेशव्यांच्या बखरींत खालीलप्रमाणें उल्लेख आहे. “ श्रीमंतांनीं लढाईची तयारी केली. परंतु मसलतदार कोणी नाहीं. अवघें मंडळ नवेंच. त्यांत इंग्रजांचा फितुर सगळ्या सरदारांत झालेला. कोणी इंग्रजाचा पैका खाल्ल्याशिवाय राहिला असें नाहीं. ” “ सारे सरदार फितुर झालेले. इंग्रजांचा पैका खाल्लेला. तेव्हां ती फौज इंग्रजाशीं लढते असें घडत नाहीं. ” हा उल्लेख बखरींतील म्हणून प्रमाण मानण्याच्या दृष्टीनें जरा कमी प्रतीचा असला तरी पेशव्याची फौज या फितुरीनें किती ग्रासली होती याची त्यावरून चांगलीच कल्पना येते.

आतां अस्सल पत्रें काय बोलतात पहा. बाजीरावाचा रोजचा दिनक्रम व तो काय काय, केव्हां केव्हां करतो याची तपशीलवार हकीगत कळविण्या-बद्दल एल्फिन्स्टननें मोरो दीक्षित मराठे यास लिहिलेलें १८१६ मधील पत्र असें आहे :

(१) श्रीमंत महाराज प्रातःकाळापासून रात्रपर्यंत काय बोलतात, कोणाशीं खलबत करितात, हें झाडून वर्तमान रोजचे रोज कळवीत जावें.

(१) जातीनें सरकारचा कारभार करतील त्याची वरदी रोजचे रोज द्यावी.

(१) सरकार फौजेचे सरदार यांस महाराज आंतून बंदोबस्तास कोठें पाठवितात, व सरंजाम मोघम काय देतात, ही बातमी कळवावी.

(१) श्रीमंतांस पत्रें येतात त्याचीं उत्तरें काये देतात, हें तपशीलवार कळवीत जावें.

(१) महिन्याची हजरी लोकांची होत्ये त्यास ब्राह्मण व मराठे, व मुसलमान किती याची हजरी समजवावी व शिपाई यास दरमहा काय देतात, व देणगींत तोडजोड कशी करितात हें कळवावें.

(१) त्रिंबकजी श्रीमंतांस भेटला का नाहीं ही बातमी पक्की काढून सांगावी.

(१) पेंढारी उठले आहेत. यास आश्रय कोणाचे हें कळवावें.

(१) आमची खाजगत गोष्ट श्रीमंत काय बोलतील तें सांगावें.

(१) नागपूरवाले भोसले यांचे कारभाराविसीं महाराज काय बोलतात तें कळवावें.

सदरहू कलमें लिहिलीं आहेत, त्यांची बातमी खरी सांगावी; विद्यमान सदाशिवपंत भाऊ याप्रो ठरावाची याद जाहाल्यास सर्व बोलणीं बेताप्रो करार करून द्यावयासी येतील.

सदाशिव माणकेश्वर हा इंग्रजांस फितुर होतांच त्याची फितुरी त्रिंबकजीनें मुद्या–पुराव्यानिशीं उघडकीस आणिली होती. त्यानंतर सदाशिव माणकेश्वराच्या जागीं कारभार पाहाणारा मोरो दीक्षित मराठे हाही इंग्रजांस सामील झाला होता. त्याशिवाय त्यास एल्फिन्स्टन असें पत्रच लिहिता ना. मोरो दीक्षित मराठे म्हणजे कोणी सामान्य हुजऱ्या हुलकाऱ्या नव्हता, बाजीरावाचा मुख्य कारभारी होता. तेव्हां एवढ्या प्रमुख ठिकाणीं वावरणाऱ्या व्यक्तीशीं एल्फिन्स्टन इतक्या तपशीलाचें पत्र लिहितो आणि 'याप्रमाणें ठरावाची याद जाहाल्यास सर्व बोलणीं बेताप्रमाणें करार करून द्यावयासी येतील' अशी बातमीच्या महत्त्वाप्रमाणें सौद्याची भाषा सूचित करतो, यावरून बाजीरावाच्या काळजावर फितुरीचें गिरमिट कसें झपाट्यानें फिरत होतें, त्याच्या अंतःकरणास लागलेल्या फितुरीच्या पराण्या कशा जबरदस्त व भयंकर स्वरूपाच्या होत्या याची चांगलीच कल्पना येते! याच्याशिवाय बाजीरावाच्या हालचालींची वित्तंबातमी इंग्रजांस देणारे कितीतरी 'नरवीर' इंग्रजांनीं पेरले होते. त्या वेळीं फंदफितुरीच्या धंद्यांस चांगलेंच तेज चढलेलें दिसतें. बळवंतराव बापूजी, रावजी बाळाजी, यशवंत बाबुराव, रंगो वासुदेव वगैरे लोकांची इंग्रजांस बातम्या

पुरंविणारीं पुष्कळ पत्रें उपलब्ध आहेत. त्यांत बळवंतराव बापूजीनें इंग्रजांस बऱ्याच महत्त्वाच्या बातम्या सांगितल्या आहेत. त्यांत पंढरपुराहून ता. ९–८–१८१७ च्या पत्रांत कोणा कोणाला श्रीमंतांनीं पैसे वाटले व लष्कर जमा करण्यास सांगितलें त्याचें वर्णन आहे.

तो म्हणतो, “ दुसरा मा॥, पंत प्रधान यांनीं आंतून निपानकर याजकडे आकरा लक्षे रूा पो व रा चिंतामणराव आपा पटवर्धन मंडळीस आठ लक्षे रूा दिल्हे व रा बालासाहेब रास्ते याजला साहा लक्षे रूा दिल्हे. व राजा चेतसिंग यास च्यार लक्षे रूा दिल्हे. आणि सर्वत्रांस ताकीद केली कीं, दो महिने परियेंत स्वस्थ असावें. आंतून फौजेची खबरदारी करावी व क्षेत्र मुक्कामीं लोकांस बरतर्फी दिली म्हणून आवाई घातली, परंतु त्या निमे तलबा घरबसल्या द्यावी. जे दिवसीं चाकरीस बोलावूं तेव्हां हजर व्हावें ऐसा करार करून वाटीं लावलें.” त्यानंतर तो ता.२५–९–१७ च्या पत्रांत म्हणतो, “ काल अस्तमानीं माहोलीहून संतू वाणी क्षेत्रास आला त्याणें सांगितलें कीं, पंतप्रधान यांची स्वारी पुण्याकडे गेली. बरोबर पंचेवीस तीस हजार फौज होती. दुसरा मा॥र गड किले माघारीं दिल्हे, म्हणौन सांगत होता. तिसरा मा॥ गोखले याचें पत्र रा सिवाजीराव राजे टेंभुरणीकर यास आलें आहे कीं स्वार काय असतील ते घेऊन येणें. ” यानंतर ता. २८–९–१७ चें पत्र जरा जास्त महत्त्वाचें व तपशीलवार माहिती देणारें आहे. तो त्या पत्रांत म्हणतो,

“ काल येथें क्षेत्र मुकामीं रा धर्माजी प्रतापराव वंजोर बालेघाटकर बंड हे माहोलीस जाऊन पंतप्रधान यांची भेट घेतली. त्यावरून वस्त्र देऊन दाहा हजार फौज ठेवून दसरा दिवालीचे सुमार येऊन दाखल व्हावें म्हणौन हूकूम करून बरोबर गोखले याजकडील कारकून आसामी देऊन व रा दाजीबा ऐतोले बरोबर दिले आहेत. यास पंचेवीस तीस हजार रुपयाची हुंडी तूर्त दिली आहे. हाही बरोबर दाहा स्वार आहेत. उदईक येथून घाटावर जाणार. तिकडे जाऊन जमाव करणार प्रतेक्ष दुसरें बंडच आहे. कळावे. दुसरा मा॥ रा टेंभुरणीकर घाटगे सिवाजीराव यांनीं चार पाचशें स्वार जमा केले आहेत. दो चौ दिवसा निघोन पुण्याकडे जाणार, म्हणौन हलकारा टप्पावर गेला होता

तो सांगत होता. तिसरा म॥ धर्मजी प्रतापराव यानी येथूनच जेथे जेथे स्वाराचे लगे होते तिकडे पा–च्यार असामीस पत्र देऊन जासूद पुढें रवाना केले. चौथा म॥ हुंडी खर्चास रो गंगाधर लीलाधर यांचे दुकानची तीस हजार रुपयाची मुदत सतावीस दिवसांची आहे. त्याचे गुमास्ते येथें आहेत त्याजवर आणिली आहे." आणखी बरींच पत्रें आहेत पण एल्फिन्स्टनला बातम्या कशा एकसारख्या कळत होत्या याची कल्पना येण्यास आतांपर्यंत दिलेले उतारे पुरेसे आहेत. याच्याशिवाय बाळाजीपंत नातू, ही एक वल्ली त्याच्या हातीं होतीच. याशिवाय यशवंतराव घोरपडे व त्याचा सवाई बेटा दौलतराव घोरपडे या पिता–पुत्रांस पेशव्याची दौलत इंग्रजांकडे बिनघोर कशी जाईल याचा घोर पडला होताच! पेशव्याकडे फितुर करणारी ही ज्ञात मंडळी झाली; याच्याशिवाय अज्ञात आणि स्वयंस्फूर्तीनें हें परोपकाराचें व स्वार्थ आणि परमार्थ साधून देणारें पवित्र कार्य करणारी मंडळी पुष्कळच होती! या कामासाठीं प्रारंभीं प्रारंभीं कंपनी सरकारनें पुष्कळच बिंदागी देण्याचें अभिवचन अनेकांस दिलें होतें. ती न मिळाल्याबद्दल जरा स्थिरस्थावर झाल्यानंतर पुष्कळांनीं कुरबुर केलेली नमूद आहे. ही झाली इंग्रजांनीं पेशव्याच्या सैन्यांत फितुर केल्याबद्दलची हकीगत. आतां पेशव्यांनीं इग्रजाच्या सैन्यांत फितुर करून तें निकामी करण्याकरितां काय काय खटपटी केल्या तें पाहिलें पाहिजे.

पेशव्यांनीं नेमलेलीं माणसें व त्यांनीं केलेलें कार्य पाहिलें म्हणजे निराशा होते. पेशव्यांचे हेर रेसिडेन्सींत असत पण त्यांची संख्या फार अल्प असावी व ते सुद्धां मनापासून काम करीत नसावेत असें दिसतें. त्यांतून इंग्रज परका व परकी भाषा बोलणारा, तेव्हां त्याचे बेत फारच मर्यादित वातावरणांत कळत असतील. तेव्हां बाजीरावास कळणारें राजकारण खबरजीसारख्या सामान्य माणसापर्यंत कळणारें, अगदींच किरकोळ स्वरूपाचें असावें. बाजीरावानें या कामावर विनायक नाना श्रोत्री, वामन भट कर्वे व शंकराचार्य स्वामी या लोकांस नेमिलें होतें. या कामासाठीं या मंडळींस ऐवजही खूप देण्यांत आला होता. या कामांत बाजीरावाची मुख्य भिस्त यशवंतराव घोरपड्यावर होती. पण हा डाव सर्वस्वीं बाजीरावाच्या अंगावर

आला. यांचें कारण यशवंतरावानें त्याचा सपशेल विश्वासघात केला. कुंपणानेंच शेत खावें तसें झालें.

बाजीरावाची सर्व बाजूनें घसरगुंडी झाल्यानें त्याची लोकांत इतकी नापत झाली होती कीं बोलायची सोय नाहीं. ऐवज पेशव्यांकडून उपटावा व काम कंपनी सरकारचें करावें असें घडे. निदान या बाबतींत यशवंतराव घोरपड्याचें तर चांगलेंच फावलें होतें. सर्जे अंजनगांवच्या तहाचें महादान कंपनी सरकारास देवविल्याबद्दल कंपनी सरकारनें खूष होऊन या यशवंतराव घोरपड्यास दरमहा एक हजार रुपयाची नेमणूक करून दिली होती. याचा अगदीं सरळ अर्थ असा होता कीं, यशवंतराव घोरपडे हा दोहींकडे संधान ठेवून आपली तुंबडी यथेच्छ भरीत होता. त्यांतल्या त्यांत पेशव्यांची सत्ता संपुष्टांत येऊन कंपनी सरकार बळावणार असें धूर्त व धोरणी माणसास स्पष्ट दिसत होतें, म्हणून जरा जास्त कामगिरी करावयाचीच झाली तर ती कंपनी सरकारचीच करणें श्रेयस्कर व स्वार्थाच्या दृष्टीनें इष्ट होतें. त्याप्रमाणें यशवंतरावानें आपलें धोरण ठेविलें होतें. वास्तविक ही गोष्ट बाजीरावाच्या लक्षांत यावयास पाहिजे होती. पण एकदां का मनुष्य पेचांत येऊं लागला म्हणजे त्यास साध्या गोष्टी सुद्धां उमजत नाहींत व अस्सल विश्वासघातकी माणसास तो विश्वासाई समजूं लागतो व त्यांतच त्याचा सर्वस्वीं घात होतो. तसेंच रावबाजीचें झालें.

इंग्रजांच्या सैन्यांत फितूर करून त्यांच सैन्य निकामी करावें म्हणून यशवंतरावास बाजीरावानें हातीं धरिला; पण त्यानें त्यास चांगलाच दाखविला. यशवंतराव घोरपड्याकडे सोंडूर संस्थान होतें. पण त्याचा भाऊ खंडेराव हा त्याचा उपभोग घेत होता. तेव्हां त्याला काढून सोंडूर संस्थान आपणास द्यावें असा आग्रह यशवंतरावानें बाजीरावाजवळ चालविला. त्याच्याकडे सोंपविलेल्या कामाचें महत्त्व जाणून बाजीरावानें सोंडूर संस्थानावरून त्याच्या भावास दूर करून तें त्याच्या ताब्यांत द्यावें म्हणून एल्फिन्स्टनला गळ घातली व सैन्य पाठवून यशवंतराव घोरपड्याचा बंदोबस्त करून द्यावा म्हणून रेसिडेन्टाला आग्रहानें सांगितलें. बाजीरावानें खूप सांगितलें, पण तें रेसिडेन्ट एल्फिन्स्टननें ऐकलेंच पाहिजे असें थोडेंच होतें.

एल्फिन्स्टनला यशवंतरावाची दुटप्पी चाल चांगली परिचयाची होती. तेव्हां प्रथम त्यानें या सोंडूर प्रकरणीं जरा सोंड वांकडीच केली ! यशवंतरावास जरा चांचपून पाहिल्यानंतर, तो बोटचेपा कसला, आपलाच आहे अशी एल्फिन्स्टनची खात्री झाल्यानंतर बाजीरावानें जास्तच गळ घातल्यामुळें इ. स. १८१७ च्या ऑक्टोबरमध्यें सोंडूरवर सैन्य धाडून तें संस्थान खंडेरावापासून जिंकून घेऊन यशवंतरावास दिलें. याशिवाय यशवंतराव घोरपड्यानें इंग्रजी फौजेंत फितुर माजविण्यासाठीं ५०,००० रु. बाजीरावापासून लाटले ते निराळेच व काम मात्र अगदीं उलट केलें ! पेशव्याचा त्यानें सर्वस्वीं विश्वासघात केला व बाजीरावाचे सर्व बेत एल्फिन्स्टनला कळविण्याचा सपाटा चालविला. त्यामुळें बाजीरावाचा कोणताच पेंच यशस्वी झाला नाहीं. कारण त्याच्या प्रत्येक कानगोष्टीची कानगी एल्फिन्स्टनला आगाऊ लागे आणि त्यामुळें त्यास स्वतःचें धोरण ठरविण्यास फार सोपें जाई. बाजीरावाच्या डावास डाव आणि पेंचास पेंच तो सहज लढवी. या यशवंतराव घोरपड्यानें तर बाजीरावाचा घात केलाच; पण त्याच्या पोरानेंही बापाच्या पावलावर पावलें टाकिलीं आणि कंपनी सरकारची सेवा इमानें इतबारें केली. या दौलतराव घोरपड्यानें पुढें ता. २४।१२।१८३१ मध्यें लांबलचक कैफियतवजा एक पत्र कंपनी सरकारास लिहिलें आहे. त्यांत त्यानें आपण कंपनी सरकाराकरितां कशी बहुमोल कामगिरी केली त्याचें वर्णन केलें आहे. हें सगळेंच्या सगळें पत्र फार महत्त्वाचें आणि पुष्कळच गोष्टींवर प्रकाश टाकणारें आहे. पण स्थलसंकोचास्तव तें सर्वच्या सर्व देणें येथें अशक्य, पण त्यांतील महत्त्वाचा भाग खालीलप्रमाणें :

"पुढें पेशवे सरकारचा व कंपनी सरकारचा कांहीं बिघाड सुरू जाहला ते समईं अलपिष्टाणसाहेब व ग्रांटसाहेब याणी आम्हाला हूकूम दिला कीं पेशवे सरकारची बातमी आम्हास हरएक समजावीत जावी. × × × आम्ही खबर आलीपष्टणसाहेब यास दिल्ही की पेशवे याजकडील फौज आपल्यावर एकादशीचे दिवशीं येणार आणि आपल्यावर दगा करणार आहेत × × × कुंपणी सरकारची व पेशवे याचे फौजेनिसी लढाई लागली.

हें समजताच आम्ही रातोरात फौजेसुद्धां पद्दाटेस खडकीस येऊन पोहोचलो. नंतर अलीपष्टाणसाहेब यांची भेट जाहाली. ××× तीन रोज लष्करांत आनापाण्याची फार तंगचाई होती. साबब अलीपष्टाणसाहेब याणी हुकूम दिला की तुम्ही कोणाकडेही जाऊन आनाज अगर जनावरें जे मिळतील ते घेऊन येणें. हुकूमाप्रमाणें आम्ही जाऊन लमाणांचा तांडा व मोकली गुरें लस्करांत आणिलीं. साहेबानी पाहून बहुत खुषी होऊन बहुत मेहेरबानी केली. खुष होऊन बोलले कीं तुमचे स्वारास दरमहा साठ रुपये पगार मिळेल. आणि बडतर्फी कधीहि होणार नाहीं.

(१) पेशवे याणी आमचे बापास व अम्हास बोलणे लाविले कीं कुंपणी सरकारचे फौजेंत फितुर करून आम्हांकडे आणावे. या निमत्यें पैका पडेल तो आम्ही देऊ. आणि चार लाखांची जहागीर व चालीस हजार फौज या प्रा॥ तुम्हास करून देतो. या कामाकरितां पस्तीस हजार रुपये पाठविले. आणि बोलले की तुम्हांस जहागीर निखालस व सारे फौजेचे सरदार करून देतों. अमचे सरकारांत खैरखा तुम्ही करावी. आणि इंग्रजी सरकारचे फौजेंत फितुरी करून आम्हास मिलवावी. याप्रा॥ सारा हवाला आम्ही आलपिष्टणसाहेब यास जाहीर केला. त्या बा॥ हुकूम दिल्हा कीं तुमचे वाडिलाकडे रुपये पाठविले आहेत हे घ्यावे. व आम्हींहि पाठविले असतां घ्यावे; परंतु आमचे सरकारांत खैरखाने आसावे; तुम्हांस वीस हजार रुपये पाठविले आहेत हे घेऊं नका. तुम्हांवर कुंपणी सरकारची सरफराजी होईल. आणि मर्तबाहि मोठा होईल. ××× साहेबाचा हुकूम ऐकून एक पैसा आम्ही घेतला नाहीं. कुंपणी सरकारांत आजपर्यंत खैरखा करत आहों. ×××

(१) पेशवे सरकार याणी रसदगला वगैरे मदत सिंहगडास पाठविली होती. ते समईं किला इंग्रेजी फौजेसी लढत होता. ×××× त्या हुकमाप्रमाणें आम्ही जाऊन लढाई करून रसद झाडून लुट्टन फडशा करून टाकिली व किलाही लढाई करून घेतला.”

उतारे देण्याचा मोह येथेंच आवरता घेतला पाहिजे ! फौजा केव्हां निघणार, कोण कोण कसे कसे सरंजाम वाढविणार, कोणा कोणाला कसे कसे पैसे वाटले, लढाईंत पराक्रम कसा केला, रसद कशी मारली, फितुर करून सैन्य निकामी कसें केलें, साहेबाकरितां पेशास कसा शिवलों नाहीं. वगैरे बढाया मारणारीं अनेकांचीं अनेक पत्रें आहेत ! आणि हीं पत्रें लिहिणाऱ्या लोकांनीं त्याप्रमाणेंच करणी केली आहे, यांत बिलकूल संशय नाहीं. आतां जातां जातां महंमदखान जमादाराच्या फितुरीचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. "आम्ही बडेसाहेबाजवळ संगमावर होतों. तेथें बाजीराव याचे हुजरे होते ते फोडून आम्ही साहेबापाशीं घेऊन आलों. कारण आपली पलटण फितुर एक परभु करत होते. ते हुजऱ्यानें साहेबाजवळ लिहून दिल्हा. तेव्हां जे दिवशीं पुणें घेतलें ते दिवशीं साहेबानी त्या परभूस फाशी दिल्हा." येथवर दिलेल्या उताऱ्यांवरून पेशव्याच्या राज्यांत कसा अंतरबाह्य फितूर माजला याची चांगलीच कल्पना येते. फितुरीनें पेंकाट इतकें मोडलें असतांना सुद्धां बाजीराव समरांगणावर कंपनी सरकारशीं दोन हात करण्यास उभा राहिला याचेंच आश्चर्य वाटतें.

आतां मराठा ऑक्झिलरी फोर्स व कॅ. फोर्ड यांच्या फितुरीची विस्मयजनक हकीकत पहा. टोपीकर इंग्रज हा नेहमीं आपल्या देशाच हित कसें साधेल याची विवंचना करील. त्याचें मन नेहमीं स्वदेशप्रेमाच्या उज्ज्वलतर भावनेनें रसरसलेलें सांपडेल. टोपीकर इंग्रजाचें वैभव जगतावर एकसारखें फोफावलें त्याचें आदिकारण या त्याच्या मनाच्या ठेवणींत आहे. आमचें स्वराज्य होतें त्याचें साम्राज्यांत रूपांतर झालें हें जरी खरें, तरी समाजाच्या मनोभूमिकेंत फरक झाला नव्हता. अजूनही झालेला नाहीं. आजही शंभर—दीडशें वर्षांच्या पारतंत्र्यानें पाठ सडकून व सोलून निघाली असतांना सुद्धां हिंदु विरुद्ध हिंदु लढतो, आम्ही एकमेकांवर परकीयांच्या आज्ञेबरोबर गोळ्या झाडतों, आम्हांत स्वामिनिष्ठा आहे, पण दुर्दैव असें कीं, आम्हांला 'स्वामी' कोणताही चालतो ! आमचा खरा 'स्वामी' कोण एवढेंच फक्त आम्हांस कळत नाहीं. आमची स्वामिनिष्ठेची ही घातुक भावना नाहींशी होऊन तिची जागा जोंपर्यंत स्वत्वनिष्ठा आणि तत्त्व-

निष्ठा घेत नाहीं तोंपर्यंत आम्ही जरी स्वतंत्र झालों, आणि साम्राज्य जरी आमच्या पदरांत पडलें तरी आम्ही परक्यांचे दास आणि दासच होण्यास योग्य ठरूं! याच्या अगदीं उलट स्थिति इंग्रजांची आहे. तो आपल्या देश-बांधवांवर प्राण गेला तरी शस्त्र धरीत नाहीं, मग त्यासाठीं अलम दुनियेचें वैभवं जरी त्याच्या चरणीं लोळत आलें तरी तो त्याची पर्वा करणार नाहीं. त्याचेंच प्रत्यंतर पुढील गोष्टींत आलें.

कॅ. फोर्ड नांवाच्या एका इंग्रज अधिकाऱ्याच्या हाताखालीं जो कवाइती कंपू बाजीरावानें तयार केला, त्यास 'पूना ऑक्झिलरी फोर्स' असें नांव ठेविलें होतें हें मागें आलेंच आहे. या पलटणीची मोठी गंमत अशी कीं, त्यांतील सैनिक नोकरीवर रुजूं होतांना अशी शपथ घेई कीं, मी पेशव्यांशीं इमानानें वागेन व त्याच्या शत्रूशीं लढेन! या शपथविधीस इंग्रजांनीं मागाहून एक मोठी चमत्कारिक पुरती जोडिली, 'आम्ही पेशव्यांशीं इमानदारीनें वागूं, पण जोंपर्यंत तो इंग्रजांशीं युद्ध करणार नाहीं तोंपर्यंत.' सैनिकांनीं स्वयं-स्फूर्तीनेंच अशी शपथ घेतली होती असें जेव्हां इंग्रज लेखक लिहितात त्या वेळीं जास्तच अचंबा वाटतो. मराठा ऑक्झिलरी फोर्सच्या फितुरीचें समर्थन करण्यासाठीं ग्रँट डफ् वगैरेसारख्या इंग्रज लेखकांनीं काढिलेली ही शक्कल अगदींच क्षुद्र आहे. बाजीराव कितीही मूर्ख असला तरी तो असल्या आत्मघातकी शपथेच्या आधारानें आपली मान आपल्याच हातानें सफा उतरण्याकरितां असलें विचित्र लष्कर आपण होऊन तयार करवीलसें वाटत नाहीं. तसेंच महिन्याच्या महिन्याला बाजीरावाचा चारिंदा खाऊन त्यानें इंग्रजांशीं युद्ध पुकारतांच सैनिकांनीं त्याचा पक्ष काय म्हणून सोडावा हेंच कळत नाहीं. अन्न-पाण्याची सुखानें सोय होते म्हणून सैन्यांत शिरणाऱ्या आडमुठ्या सैनिकांनीं आपण होऊन, स्वयंस्फूर्तीनें ही शपथ घ्यावी हें सुद्धां न उकलणारें कोडें आहे.

खडकीच्या लढाईंत फोर्डसाहेब बाजीरावास सोडून इंग्रजांस मिळाला हा त्यानें उघड उघड विश्वासघात केला हेंच खरें. त्याच्या या विश्वासघाताचें इंग्रज लेखकांनीं केलेलें समर्थन मराठी कागदपत्रांवरून अगदीं लटकें पडतें.

फोर्डसाहेबाला नोकरींत घेऊन जो कवाइती कंपू तयार केला त्याचा संपूर्ण तपशील ता. २१-१-१८१३ च्या यादींत तमाम नांवनिशी, कामें व या चाकरीचे नियम खुलासेवार देऊन छापला आहे. (पे. द. सरंजाम यादी नं. ३५ पृ. ९३ ते १०१)

बाजीरावानें तयार केलेल्या या नवीन कवायती कंपूचा बैठा खर्च सालीना साडेतीन लाखांचा होता. लढाईचे वगैरे प्रसंगीं आणखी पाऊण लाख जादा द्यावयाचा करार होता. फोर्ड यास दरमहा जास्त पगार अडीच हजार रुपये होता. तसेंच कोणत्याही गोष्टीविषयीं कंपनी सरकारचा उज्र न करतां सर्व लोकांसह सांगूं तेव्हां व सांगूं तेथें एकनिष्ठपणें इमानेंइतबारें चाकरी करूं, फंद फितूर गैर मार्गाची वर्तणूक करणार नाहीं, कोणाशीं राजकारण करणार नाहीं, अशा महत्त्वपूर्ण अर्थाची व तपशीलाची स्पष्ट नोंद असणारीं २४ कलमें स्वहस्तानें सही करून फोर्डनें लिहून दिलीं होतीं. तेव्हां खडकीच्या लढाईत फोर्डनें केला तो विश्वासघातच केला यांत तिळमात्र शंका नाहीं.

ता. ५ नोव्हेंबर १८१७ ला प्रत्यक्ष लढाईला सुरुवात झाली. आणि १ नोव्हेंबर १८१७ ला कर्नल बर यांनी गारापीरावरील आपली छावणी सोडिली· त्याबरोबर मराठ्यांच्या लष्करानें ती छावणी व्यापिली व तेथें लुटालूट केली. मराठ्यांचें लष्कर सरकत सरकत रेसिडेन्सीजवळ चाललें. हा प्रकार काय आहे याचा खुलासा काढण्याकरितां एल्फिन्स्टननें मोठ्या योग्य माणसाची निवड केली. हा गृहस्थ म्हणजे पूर्वीं उल्लेखिलेला कॅ. फोर्ड हाच. या मराठा ऑक्झिलरी फोर्सच्या सेनानायकाचें आणि मोरो दीक्षित मराठे यांचें रहस्य! तेव्हां या खेटाखेटीच्या हालचालीचें रहस्य काय आहे तें बाहेर काढण्याकरितां कॅ. फोर्ड यास मोरो दीक्षित मराठ्याकडे धाडण्यांत आलें. तो ५ नोव्हेंबर १८१७ ला सकाळीं त्याच्याकडे बातमी काढण्यासाठीं गेला व सैन्याच्या हालचालीसंबंधीं खुलासा विचारूं लागला. तेव्हां मोरो दीक्षित मराठ्यानें त्यास सांगितलें कीं, बाजीराव साहेबांची स्वारी पर्वतीवर जाणार आहे म्हणून ही सर्व गडबड आहे. हें झालें सध्यांच्या गडबडीचें कारण; पण समजा, उद्यां पेशवे आणि इंग्रज यांच्यामध्यें युद्ध सुरू झालें तर कॅ. फोर्ड, तुम्ही आपल्या पलटणासुद्धां

पेशव्यांच्या बाजूला आलें पाहिजे, अशी मोरो दीक्षित मराठ्यानें त्यास गळ घातली व निदान त्यानें तटस्थ तरी राहावें म्हणून विनंति केली, या वेळीं कॅ. फोर्डनें दिलेलें उत्तर ऐकलें म्हणजे कौतुक वाटतें. असा दैदीप्यमान देशाभिमान आमच्यांत केव्हां निर्माण होईल? मोरो दीक्षिताच्या विनंतीस कॅ. फोर्डनें ताडकन् उत्तर दिलें कीं, माझ्या देशबांधवांच्या माना माझ्या देखत कापल्या जात असतांना मी त्या कापण्यास दुसऱ्यास मदत करणें कालत्रयीं शक्य नाहीं. त्यांच्या शरिरांतून रक्ताच्या चिळकांड्या उडत असतां माझें रक्त स्वस्थ राहणें शक्य नाहीं; तेव्हां तुम्हीं या बाबतींत मला भलतीच गळ घालूं नका. कॅ. फोर्ड व मोरो दीक्षित मराठे यांची ही मुलाखत सकाळीं झाली आणि दुपारींच युद्धास तोंड लागलें.

अमावास्येचा गडद अंधार पडावा, तारकांचा तुटपुंजा प्रकाश सुद्धां मेघांनीं ग्रासून टाकावा, पण मेघराजाच्या मोहजालांतून फटकून निघून बाजूला चमकणाऱ्या शुक्राच्या चांदणीचा प्रकाश चित्ताला आनंदही देतो व एकादे वेळीं उद्वेगही निर्माण करतो. पेशव्यांच्या सैन्यांत माजलेला फितुर इतका भयंकर होता कीं, त्यांतून इमानदारीचा सूर, विश्वासाचा चमकार एकादाच चमके; पण त्याचा काय उपयोग होता. कंपनी सरकारचा फितुरीचा गळ सर्वांभोंवतीं सारखा फिरत होता. पण नरवीर सेनापति बापू गोखले हा मात्र या कसोटीवर सुद्धां बावनकशी ठरला. मोरो दीक्षित मराठ्यास कॅ. फोर्डनें दिलेलें उत्तर जितकें तेजस्वी, तितकेच बापू गोखल्याच्या तोंडून खाड्दिशीं निघालेले उद्गार मोलाचे व कौतुकाचे आहेत. लढाई सुरू होण्यापूर्वीं त्याला पेशव्यापासून फोडण्यासाठीं कंपनी सरकारनें लिंगो भगवान नांवाच्या गृहस्थास धाडिलें व त्याच्या हातीं असा सांगावा धाडिला कीं, 'तुम्ही पेशव्यांचे नोकरीस लागला त्या वेळीं इंग्रजांनीं तुमच्यासंबंधीं खातरजमा दिली; तेव्हां ती गोष्ट न विसरतां आमची दोस्ती ओळखून या प्रसंगीं वागावें.' या फितुरीच्या निरोपास बापू गोखल्यानें ठणठणीत उत्तर दिलें कीं,

'तुम्ही खातरजमा दिली ही गोष्ट खरी, पण मी आतां तुमच्या म्हणण्या- प्रमाणें वागलों तर तुम्हांलाच बटा व कमीपणा येईल व माझ्या पदरींहि

निष्कारण निमकहरामी येईल. नोकरानें इमानानें वागलें पाहिजे. आपण मला दौलत द्याल; पण त्या दौलतीची मला काडीइतकीही किंमत नाहीं. स्वामिद्रोहाचें पातक पदरीं घेऊन मिळणारी दौलत मी विष्टेसमान मानतों. त्यांत माझा नैतिक अधःपात असून मी परमेश्वराजवळ गुन्हेगार ठरेन. स्वामिकार्यांत प्राण गेल्यास चिंता नाहीं. त्यांत माझें उजू आहे. तुम्ही म्हणतां तसें माझ्या हातून कालत्रयीं शक्य नाहीं."

या एकाच उज्ज्वल उत्तरानें बापू गोखल्याचें चरित्र उजळून निघालें आहे. तो शूर होता, तो वीर होता आणि तो प्रामाणिकही होता, नाहीं तर त्या वेळीं पेशव्यांच्या पदरीं अशीं कितीतरी नररत्नें होतीं कीं ज्यांची किंमत पृथ्वीच्या मोलानें करावी; पण स्वामिद्रोहाच्या पातकानें त्या सर्व गुणांची किंमत मातीमोल झाली. पेशव्यास परागंदा होण्याचा दुर्धर प्रसंग असल्याच करंट्यांच्या घोर करणीनें आला.

फितुरीच्या बाबतींत एका महत्त्वाच्या माणसाचा उल्लेख करावयाचा राहिला. त्याखेरीज हें प्रकरण पुरें करणें म्हणजे नवरदेवाशिवाय व्याह्याची दंगल उडवून देण्यासारखें आहे ! फितुरांच्या नामावलींत बाळाजीपंत नातूचें नांव नाहीं म्हणजे काय ? तो तर या फितुर मालिकेंतील मध्यमणी अशी लोकांची दृढ समजूत आहे. आणि ती खरीही आहे; पण पर्याय इतकाच कीं, तो कंपनी सरकारचा नोकर म्हणून उघड उघड वावरत होता. रेसिडेन्टाच्या गळ्यांतील ताईत आणि नाकांतील बाल म्हणून त्याची कीर्ति महशूर होती. तेव्हां त्यानें स्वामिनिष्ठेच्या आपल्या घातकी कल्पनेप्रमाणें आपलें कर्तव्य केलें असेंच म्हणावयास पाहिजे ! पण यशवंतराव घोरपडे वगैरे मंडळी बाजीरावाचे स्नेही म्हणून वावरली. त्यांनीं बाजीरावाकडून पैसे व जहागिऱ्या लाटल्या आणि काम मात्र कंपनी सरकारचें केलें. यामुळें त्यांचा स्वामिद्रोह नैतिक दृष्ट्या जास्त भयंकर स्वरूपाचा आहे. या प्रच्छन्न स्वामिद्रोह्यांनीं, अस्तनींतल्या निखाऱ्यांनीं मराठेशाहीचा अंत साधला.

———

खडकीची रणधुमाळी : १०

जो दुर्दिन उगवूं नये म्हणून मराठे अहोरात्र खटपट करीत होते, तो त्यांच्या यातायातीस दाद न देतां उगवणार, स्वातंत्र्याचे दिवस घालविणार हें स्पष्ट दिसत होतें. हें जसें खरें, तसेंच टोपीकर चातकाप्रमाणें ज्या दिवसाची वाट पाहात होता, जो दिवस उगवावा म्हणून त्यानें मराठ्यांविरुद्ध ज्ञात आणि अज्ञात अशा अनंत प्रयत्नांची शिकस्त केली होती, तो दिवस आतां क्षितिजावर येणार होता. पेशव्यांनीं शनिवारवाड्याचें वास्तुपूजन कोणत्या मुहूर्तावर केलें कोण जाणे ! चार पिढ्यांत त्यांचें भाग्य शिगेस पोंचलें खरें; पण आतां त्यांचा वास्तुपुरुष कोपला होता व त्यानें पेशव्यास त्याच्या भाग्यश्रीसुद्धां उखडून टाकण्याचें ठरविलें होतें.

'पळपुटा रावबाजी' 'पळपुटा रावबाजी' म्हणून ज्याच्याविषयीं डांगोरा पिटला जातो तो पळपुटा रावबाजी रणसन्मुख झाला. फितुरीची प्राणघातक कळ पोटांत एकसारखी निघत असतांना सुद्धां त्यानें टोपीकरांशीं दोन हात करण्याचें ठरविलें हें विशेष होय. पण एकंदर सर्व परिस्थितीचा विचार करतां बाजीरावांनें या वेळीं इंग्रजांशीं सामना देण्यांत घोडचूक केली असें म्हणण्यापेक्षां प्रस्तुत वेळीं युद्ध केल्यावांचून त्याला दुसरा मार्गच कंपनी सरकारनें शिल्लक ठेविला नव्हता असें म्हणणें जास्त युक्त होईल.

पुण्याच्या तहानें टोपीकर इंग्रजांनीं त्याला पाण्यापेक्षां पातळ केला व १६ मे १८१७ ला पेशव्याची सत्ता संपुष्टांत आणण्याचा कंपनी सरकारचा ठराव झाला. पुण्याच्या तहानेंच त्याची सत्ता नामशेष झाली होती आणि आतां या नवीन ठरावानें रावबाजींचे आणखी कोणते हक्क इंग्रज कमी करणार होते कोण जाणे! १६ मे १८१७ चा ठराव झाला आणि कंपनी सरकारचें बरेंच सैन्य पुण्याच्या रोखानें येऊं लागलें. विश्रामबागेंत बाजीराव व एल्फिन्स्टन यांची जी शेवटची मुलाखत झाली त्या वेळीं सुद्धां बाजीरावानें, इंग्रजानें पुण्यांत जमा केलेलें सैन्य हालवावें अशीच मागणी केली. ज्या दिवशीं प्रत्यक्ष खडकीच्या रणधुमाळीस सुरुवात झाली त्या दिवशीं दुपारीं दोन वाजतां विठोजी नायकास एल्फिन्स्टनकडे धाडलें, त्या वेळीं सुद्धां त्यानें पुन्हां हीच मागणी केली. 'पूर्वी मे महिन्यांत माझ्या उरावर फौजा उभ्या करून तुम्ही मला पेंचांत घातलेंत आणि पुण्याच्या तहावर सह्या करून घेतल्यात, तसाच कांहीं तरी काळाबेरा डाव तुमच्या मनांत असावा असा मला संशय येतो, तरी तुम्ही पुण्यांत जमा केलेल्या फौजा दूर न्या' या त्याच्या न्याय्य मागणीवरून त्याच्या पोटांत कोणत्या भीतीचा गोळा उभा राहिला होता यांची चांगलीच कल्पना येते. व इंग्रजांचें धोरण त्यानें जाणलें होतें हेंच खरें मानावें लागतें. टोपीकरानें सैन्याची पूर्ण तयारी केल्यानंतर व आपल्याला पूर्णपणें घेरल्यानंतर मग आधीं तरतूद केली असती तर फार चांगलें झालें असतें असें म्हणून पश्चात्ताप करीत बसण्यापेक्षां आधींच सावध असावें म्हणून बाजीरावानें तयारी केली व त्यास अखेर नाइलाजानें युद्ध करावें लागलें. पण त्या वेळीं त्यानें युद्धप्रसंग आणूं नये असें बऱ्याच सरदारांचें मत होतें व त्यांपैकीं विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे तर आपल्या सैन्यासह ब्रिगेडियर जनरल स्मिथ यांच्या लष्कराबरोबर होते. त्यामुळें त्यांना इंग्रजी सैन्याची बरोबर कल्पना होती; तेव्हां त्यांनीं बाजीरावास स्पष्ट सांगितलें कीं, इंग्रज सैन्याबरोबर आपला निभाव लागणार नाहीं; तरी युद्ध करूं नये. त्यांत आपणांस यश मिळणार नाहीं. विंचूरकरांचें हें सांगणें बाजीरावास पटलें नाहीं. विंचूरकरांच्या मर्जीविरुद्ध जरी हें युद्ध चाललें होतें तरी ते पेशव्यांचा हुकूम म्हणून रणभूमीवर सैन्यासह हजर होतेच. प्रस्तुत प्रकरणीं अत्यंत महत्त्वाचा सल्ला

देणारे दुसरे गृहस्थ म्हणजे बारामतीचे मुत्सद्दी सरदार गोविंदराव काळे हे होत. त्यांनीही असें सुचविलें होतें कीं,

" तूर्त इंग्रजांशीं लढाईचा प्रसंग घालूं नये. तुमचा सरंजाम अवघा नवा. काल चाकर ठेवलेला आज लढून मरतो असें घडत नाहीं. वर्षें दोन वर्षें अशी फौज बाळगावी, व इंग्रजांशीं सख्यत्व आहे तेंच चालवावें. दुसरें, लढाईचा प्रसंग शहरापाशीं करूं नये, एखादी मोहीम परराज्यांत सरकारची बाहेर काढावी. आणि इंग्रजांस समागमें घेऊन जावें व तिकडे गेल्यानंतर लढाईचा प्रसंग करावयाचा [तो] करतां येईल. सध्यां लढाई उभी केली असतां इंग्रज म्हणजे हटला जातो असें घडत नाहीं. "

काळे आणि विंचूरकर यांनीं दिलेला सल्ला बाजीरावसाहेबास पटला असता तर फार चांगलें झालें असतें. तथापि बाजीरावाला इंग्रजांनीं घातलेल्या पेंचांतून सुटण्यास लढाईवांचून दुसरा मार्ग दिसला नाहीं, हें महाराष्ट्राचें दुर्दैव. सरदार गोविंदराव काळे यांची मसलत तर लष्करी दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची व बहुमोल होती. ' काल चाकर ठेवलेला आज लढून मरतो असें घडत नाहीं ' हें तर खरेंच. तसेंच सैन्य चार–दोन वर्षें चाकरीस ठेवून त्याला चांगलें तयार करावयाचें, व मग सामना द्यावयाचा हेंही खरें. ' लढाईचा प्रसंग शहरापाशीं करूं नये ' हें सांगणें सुद्धां अत्यंत महत्त्वाचें आहे. समजा बाजीरावानें लढाईचा प्रसंग पुण्याशेजारीं न आणतां तो पुण्यापासून हजार–बाराशें मैल अंतरावर कोठेंही आणला असता व नंतर लढाईंत अपयश येतें असें लक्षांत येतांच इंग्रजास झुकपुरी देऊन हुलकावण्या देण्यास सुरुवात केली असती तर इंग्रज बराच जेरीस आला असता. यदा कदाचित् पुण्याच्या तहापासून गाडी माघारीं वसईच्या तहापर्यंत रेटीत नेतां आली असती. कारण ता. १७ नोव्हेंबर १८१७ ला दुर्दैवी बाजीरावास आपल्या राजधानीस — पुण्यपुरीस शेवटचा रामराम ठोकण्याचा अत्यंत दुर्धर प्रसंग आला व नंतर ता. ३ जून १८१८ रोजीं तो मालकमच्या स्वाधीन होईपर्यंत साडे सात महिने बाजीरावानें आपल्या गनिमी-काव्यानें इंग्रजांस बेजारगतीस आणिलें. त्याच्यापुढें इंग्रज फौजा हतप्रभ झाल्या. पळण्याच्या कामांत त्याच्याबरोबर कोणीही टिकेना. असाच जर हा

सर्व देशभर हुतूतू हमामा घालीत राहिला तर आपला निभाव लागणार नाहीं असें इंग्रजास वाटूं लागलें. " बाजीरावानें गनिमीकाव्यानें इंग्रजांस दमविलें " यांतच बाजीरावाचा विजय आहे. गनिमीकाव्याच्या झुकांड्या देण्यांत ज्यानें इतके पराभव खाल्ल्यानंतर सुद्धां असें अपूर्व यश संपादन केलें, तो रावबाजी धूळकोटाला, म्हणजे जेथें तो इंग्रजाचे स्वाधीन झाला, त्या ठिकाणीं, किंवा अन्य कोठेंही पुण्यापासून दूर अंतरावर लढाई सुरू करता व पुण्यापर्यंत झुकांड्या देत देत माघारीं येता तर तो रावबाजीचा बाजीराव झाला असता व महाराष्ट्राचा इतिहास खात्रीनें निराळाच रंगविण्याचा सुप्रसंग आला असता. पण हें सर्व झालें ' जर–तर ' चें मनोराज्य ! आपलें भाग्य तितकें थोर नव्हतें हेंच खरें.

लढाईस आज ना उद्यां तोंड लागणार असें ता. २८ ऑक्टोबर-पासून एकसारखें वाटत होतें. उभयपक्षांतील सैन्यें सुसज्ज होऊन एकमेकांसमोर खडीं होतीं. मराठ्यांच्या सैन्याची सर्व बाजूंनीं तयारी होती. तेव्हां इंग्रजांच्या छावणीवर जाऊन ताबडतोब हल्ला करावा असा बापू गोखल्याचा बेत होता व त्याप्रमाणें ता. २८ रोजीं तोफांच्या गाड्यांना बैल जुंपण्यांत आले. स्वारांनीं आपल्या घोड्यांवर खोगिरें चढविलीं. आणि पाय-दळांच्या पलटणी लढाईवर जाण्याकरितां सरसावून तयार झाल्या. त्या दिवशीं शहरांत मोठी धामधूम चालू होती. तोफांच्या रणगाड्यांचे व घोड्यांच्या टापांचे आवाज मोठ्यानें होऊं लागले व ते रेसिडेन्टच्या कानावर आदळूं लागले. त्याबरोबर रेसिडेन्ट एल्फिन्स्टनचें धाबें दणाणलें. त्यास झोंप येईना. त्या वेळीं एल्फिन्स्टनच्या जोडीला सुप्रसिद्ध इतिहासकार ग्रॅन्ट डफ हाही होता. दोघेही गच्चीवरून ही काय भानगड आहे म्हणून सचिंत मुद्रेनें रात्रभर कानोसा घेत होते. त्याच रात्रीं मेघांच्या गडगडाटानें आणि विजेच्या कडकडाटानें आकाशभर थैमान घातला व गगन कोसळून धरणीवर येतें कीं काय असा क्षणभर भास झाला ! असल्या अनुकूल स्थितींत पेशव्यांनीं जर इंग्रजांवर छापा घातला असता तर फार बरें झालें असतें. पण बापू गोखले जरी तडफेचा व

दृढनिश्चयी होता तरी बाजीरावाचा ठाम बेत ठरेना. म्हणून त्या वेळीं इंग्रजांवर चालून जाण्याचा बेत रहित होऊन सारी रात्र मसलतींत फुकट गेली!

ता. २९ ऑक्टोबर रोजीं एल्फिन्स्टननें पेशव्यांकडे निरोप धाडिला कीं, तुमचें सैन्य आमच्या सैन्याला अगदीं खेटून उभें आहे, तरी तें तेथून दूर हलवावें. या निरोपास बाजीरावाकडून कांहींच उत्तर आलें नाहीं. तेव्हां पेशव्यांकडून आपणावर लवकरच हल्ला होणार असा कयास एल्फिन्स्टननें बांधिला. या पूर्वींच मुंबईच्या आणि अहमदनगरच्या फौजेनें पुण्याकडे मदतीसाठीं ताबडतोब निघून यावें असे हुकूम गेले होते. त्यांपैकीं मुंबईचें गोरें लष्कर झपाट्यानें रान कापीत ता. ३० ऑक्टोबर रोजीं खडकीस येऊन पोहोंचलें. मग मात्र एल्फिन्स्टनला धीर आला. नंतर गारापीरावरील आपलें सैन्य तेथें ठेवणें धोक्याचें आहे असें वाटल्यावरून कर्नल बर याच्या हाताखालील लष्करास खडकीस नेण्याविषयीं त्यानें हुकूम दिला. त्याप्रमाणें गारापीराच्या छावणीचें व रेसिडेन्सीचें रक्षण करण्याकरितां कांहीं लोक ठेवून युरोपियन पायदळाचे ८०० लोक, नेटिव्ह इन्फन्ट्रीचे १२०० लोक व ६ तोफा इतकें सैन्य आपल्याबरोबर घेऊन कर्नल बर यानें मुठा नदी उतरून ता. १ नोव्हेंबर रोजीं खडकीस कूच केलें. एक—दोन नोव्हेंबरपर्यंत त्यानें आपल्या सैन्याची नीट व्यवस्था लाविली. पेशव्यांचा हल्ला आल्यास त्याच्याशीं सामना देण्याची व्यवस्था बरनें खडकीच्या मैदानावर केली. इंग्रजांची छावणी होळकर पुलापासून खडकी गांवापर्यंत पसरली होती. तिच्या पिछाडीस मुळा नदी वाहात होती. मुळा नदीच्या पलीकडे दापोडी गांवाजवळ कॅ. फोर्डची पलटण होती. नदीस त्या वेळीं आतांसारखा पूल नसल्यामुळें या पलटणीनें प्रसंग पडतांच झटकन् खडकीस येण्यासाठीं नदीचा उतार एल्फिन्स्टननें पाहून तपासून ठेविला होता. ता. २ नोव्हेंबरला एक आगळीक झाली, ले. 'शॉ' नांवाचा एक इंग्रज संगमावरून मुंबईस जात असतां गणेशखिंडीजवळ पेशव्याकडील स्वार विश्वाससिंग व दुसऱ्या दोघांनीं भाला मारून त्यास जखमी केलें. त्याचा जाब विचारण्यास बाळाजीपंत नातूस श्रीमंतांकडे पाठविण्यांत आलें. गारापीरावरील छावणी लुटणें, ले. शॉ नांवाच्या इंग्रजास भाल्यानें भोसकणें वगैरे कुरापती मराठ्यांकडून केल्या गेल्या असें इंग्रज

इतिहासकार म्हणतात. पण त्याच्या उलट टोपीकराचें सैन्य अगदीं अश्राप, तेव्हां त्यानें कोणत्याही तऱ्हेची कागाळी केली नसेल असें म्हणवत नाहीं. मस्तवाल सोजिरांचे दंगे आतां आपण कांहीं कमी पाहात नाहीं. त्यांतून मानवी स्वभाव सगळीकडे सारखाच. तेव्हां लढाईस सिद्ध झालेला सैनिक काय काय माकडचेष्टा करीत असेल याची कल्पना नव्यानें देण्याचें कारण नाहीं. मराठ्यांनीं केलेली आगळीक इंग्रज इतिहासकारांनीं लिहिली व इंग्रजांनीं काढलेली कुरापत लिहिण्याचें त्यांस यदा कदाचित् विस्मरणही झालें असेल. कांहीही गफलत असो. त्याची मात्र नोंद कोठेंही नाहीं, हें खरें.

एकदम जाऊन छापा घालावा, घालूं नये; लढाईस सुरुवात करावी, करूं नये; असल्या धरसोडीच्या संभ्रमांत व किरकोळ कुरापती काढीत ता. २८ ऑक्टोबरपासून ता. ५ नोव्हेंबरपर्यंतचा एक आठवडा गेला. ता. ५ ला दुपारीं दोन वाजतां पेशव्यांकडून विठोबा नाईक गायकवाड संगमावर रेसिडेंन्टाला भेटण्यासाठीं गेला व त्यानें एल्फिन्स्टनला रोख ठोक निरोप सांगितला कीं, तुम्हीं हल्लीं जें आपल्या भोंवतीं इंग्रज सैन्य जमा केलें आहे तें दूर कोठं तरी पाठवून द्यावें. तसेंच तुमच्याजवळ जें नेटिव्ह सैन्य आहे, तें श्रीमंत बाजीराव साहेब सांगतील तेथें नेऊन ठेवावें. या गोष्टी अर्थातच एल्फिन्स्टनला मान्य झाल्या नाहींत. त्याबरोबर, तुम्ही जर तसें करीत नसाल तर त्याचे परिणाम तुम्हांस भोगावे लागतील, असें जोरानें सांगून विठोजी नाईक रेसीडेन्सींतून तडक माघारीं आला. तो बेटावरून माघारीं आल्यानंतर एल्फिन्स्टन आपलें ऐकत नाहीं, असें ठाम झालें तेव्हां सेनापति बापू गोखले वगैरे मंडळींनीं श्रीमंतांच्या सल्ल्यानें लढाई देण्याचें ठरविलें.

त्याच्याबद्दलचा उल्लेख पुढीलप्रमाणें आहे : "आश्विन वद्य ११ स पुण्यांत हूल पडली कीं, फिरंगी तयार झाला. लोकांनीं आवई खाऊन दुकानें बाजार बंद केला. दोन प्रहरीं खासा स्वारी निघून पर्वतीस गेली. ते दिवशीं स्वारी घोड्यावर होती. मागून गोखले—पुरंदरे वगैरे सरदार जमून गेले. पायरीवर बापू गोखले घोड्यावरून उतरून पायांवर डोकी ठेविली; कीं मला आज्ञा असावी. आशीर्वाद दिला कीं, 'बाळाजी विश्वनाथाचें पुण्य तुम्हांस तारो' नंतर

सर्वांनीं पायावर डोई ठेवून आज्ञा घेऊन औंदचे मैदानांत गेले." दुपारीं तीनच्या सुमारास पेशव्यांचें सैन्य बाहेर पडलें. त्या वेळीं जरीपटक्याची काठी मोडली हा एक मोठा अपशकूनच झाला. पण रणदेवतेचा संचार अंगांत झाल्याकारणानें कोणीही तिकडे लक्ष दिलें नाहीं.

सर्व सैन्य समरांगणावर अवतीर्ण झालें. आतां उभय सैन्यें एकमेकांशीं भिडणार असें निश्चित झालें. तेव्हां रेसिडेन्सींत बंगल्यांत राहणें एल्फिन्स्टनला धोक्याचें वाटलें; म्हणून खडकीस कर्नल बर याच्या सैन्याचा तळ होता, तेथें जाण्याचें त्यानें ठरविलें. मडमा वगैरे आधीं पुढें पाठवून तो स्वतः पळून जाण्याच्या तयारीला लागला. कॅ. ग्रॅन्ट यास पेशव्याचें सैन्य कोठें आणि कसें जमा झालें आहे, होत आहे हें पाहण्यासाठीं गुप्तपणें धाडिलें होतें. त्यास पेशव्याचें सैन्य गणेशखिंडीच्या डोंगराच्या बाजूनें पसरत असलेलें दिसलें. त्यानें ही बातमी एल्फिन्स्टनला कळविली. पेशव्याचे स्वार रेसिडेन्सीच्या बाजूला वळले होते व थोड्या वेळांत संगमावरील रेसिडेन्सीला वेढा पडणार असें स्पष्टपणें दिसूं लागतांच एल्फिन्स्टन जास्तच घाबरला. त्याची गाळण उडाली व त्यास नीट व्यवस्था लावून पळ काढणें अशक्य झालें. तरीपण त्या धांदलींत सुद्धां त्यानें महत्त्वपूर्ण व गुप्त स्वरूपाचा पत्रव्यवहार पार जाळून टाकिला. या जळलेल्या कागदपत्रांच्याबरोबर किती कारस्थानें जळून खाक झालीं असतील ! असा चोख बंदोबस्त करून तो अंगावरील कपड्यानिशीं निघाला. या वेळीं त्याच्याजवळ जे कांहीं थोडे-बहुत शिपाई होते त्यांना बरोबर घेऊन रेसिडेन्सीच्या बंगल्यांतून तो बाहेर पडला. हल्लीं बंडगार्डनजवळ असलेला बंधारा त्या वेळीं नसल्याकारणानें मुळा नदीला पाणी बेताचेंच होतें. क्रीमंड नांवाच्या एका साहेबाच्या बंगल्यापाठीमागून नदीला उतार होता. त्या उतारानें नदी उतरून एल्फिन्स्टन आपल्या लोकांसह निसटला.

अशा तऱ्हेनें रेसिडेन्सींत संगमाच्या बाजूला एल्फिन्स्टन साहेबाची पळापळ चालू असतांना त्याच वेळीं खडकीवर इंग्रजांशीं सामना देण्याकरितां मराठ्यांचें झाडून सारें लष्कर लकडीपुलाच्या बाजूनें बाहेर पडलें. सेनापति बापू गोखले, मोरो दीक्षित मराठे, चिन्तामणराव अप्पा पटवर्धन, तासगांवकर,

आणि मिरजकर पटवर्धन, अप्पाजी पाटणकर, घोरपडे, पुरंदरे, राजे बहाद्दर अक्कलकोटवाले, वगैरे सर्व आपआपल्या फौजेसह गणेशखिंडीवर इंग्रज जेथें उतरला होता तेथें गेले व त्यास त्यांनीं वेढा दिला. मराठ्यांचें पायदळ, घोडेस्वार, तोफा, वगैरे लष्कर गणेशखिंडीच्या डोंगरापासून तों संगमावरील रेसिडेन्सी पर्यंतच्या अफाट मैदानांत समुद्राप्रमाणें पसरलें. एल्फिन्स्टन साहेबानें रेसिडेन्सींतून पळ काढल्याचें कळतांच हातचें सावज सुटलें म्हणून मराठे चिडले व रेसिडेन्सींत घुसून व त्यांनीं तेथील बंगला आंतील सामानासुद्धां जाळून टाकिला. धडाडलेल्या बंगल्याच्या धगधगत्या ज्वाला पाहात एल्फिन्स्टन आपला जीव घेऊन मुळा नदीच्या पलीकडच्या बाजूनें पळत होता. मुळा नदीच्या उजव्या बाजूनें पेशव्याचें सैन्य उभें होतें. त्यांना तो दिसतांच त्यांतील कांहीं सैनिकांनीं त्याच्यावर गोळ्या झाडिल्या, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. या वेळीं टोपीकराची सद्दी जोरांत होती, म्हणूनच गोळ्यांच्या तडाख्यांतून एल्फिन्स्टन सुटून बचावला.

" अलफिस्टनसाहेब मेण्यांत बसून निघाले. नंतर सरकारच्या फौजेनें बेट लुटलें व जाळलें. त्या वेळेस नदीच्या पलीकडून विंचूरकर यांच्या फौजेचा फरा उभा होता. साहेब मेण्यांत बसून त्या फऱ्यावरून चालला. एकटा असून त्यास कोणी अडविलें नाहीं. असा फितूर फौजेचा. एक बापू गोखले मात्र लढाईचे उद्योगांत. तेव्हां एकट्याचा निभाव कसा लागतो ?" या उताऱ्यावरून हें स्पष्ट होतें कीं एल्फिन्स्टन समोरून पळत असतांना त्याला रोखणें हें सहज शक्य असतांना फौजेंत माजलेल्या फितुरीमुळें ही साधी व सहजासहजीं साध्य होणारी महत्त्वपूर्ण गोष्ट होऊं शकली नाहीं! इतकेंच काय पण मराठ्यांचा सेनासागर भोवतालीं हेलकावत असतांना एल्फिन्स्टन बरोबर असलेल्या अवघ्या ५०० लोकांच्या जोरावर शीरसलामत इच्छित स्थळीं जाऊं शकला. ही गोष्ट जेथें सहज होऊं शकते तेथें यशाचा वांटा कितपत हातीं लागणार होता हें स्पष्टच होतें.

५ नोव्हेंबर रोजीं दुपारीं ३॥–४ च्या सुमारास एल्फिन्स्टन कर्नल बरच्या छावणींत सुखरूप पोहोंचला. लगेच उभयतांनीं मराठ्यांशीं सामना देण्याचें

ठरविलें. लढाई तांतडीनें सुरू करण्यांत इंग्रजांचे दोन फायदे झाले. जो प्रथम हल्ला करतो त्याला नेहमींच थोडाबहुत फायदा होतो. एक तर शत्रूचें अवसान कळतें, शत्रूस विचार करण्यास सवड राहात नाहीं व एकसारखे हल्ल्यामागून हल्ले करीत राहिल्यास शत्रूचा धीर खचतो व त्याला टिकाव धरणें जड जातें. नाहींतर या वेळीं मराठ्यांच्या मानानें इंग्रजांचें सैन्य कमीच होतें. साहेबाकडे फारसे घोडेस्वार नव्हतेच. पायदळाची संख्या २,८०० होती त्यांपैकीं ८०० काय ते युरोपियन होते. आणि ८ तोफा होत्या. कॅ. ग्रॅन्ट डफच्या समजुती-प्रमाणें २०,००० घोडेस्वार, ८,००० पायदळ, १४ तोफा इतकें पेशव्यांचें सैन्य प्रत्यक्ष खडकीच्या रणमैदानावर होतें. याशिवाय पर्वतीच्या आसपास ५,००० घोडेस्वार आणि २,००० पायदळ खुद्द बाजीरावाजवळ होतें. उभय पक्षांच्या सैन्यांत इतका अफाट फरक असतांना साहेबाच्या पडघमावर पहिल्यांदा टिपरी पडली व मराठ्यांवर त्यानें चालून घेतलें असें पाहिलें म्हणजे अचंबा वाटतो. अशा धोक्याच्या परिस्थितींत सुद्धां इंग्रजांची तोफ पहिल्यांदा आग ओकते याचा सरळ अर्थ असा कीं, फितुरीच्या भुंग्यानें आपण मराठ्यांचें सामर्थ्य किती पोखरलें आहे, याची साहेबास बरोबर कल्पना होती. हें जसें खरें तसेंच नेटिव्ह पलटणींत पेशव्यांनीं फितूर केल्याचा जबरदस्त संशय कंपनी सरकारास होताच. पण हा त्याचा संशय खरोखरीच अगदीं पोकळ होता. कारण मराठ्यांची नोकरी करणारे मोठमोठाले गोरे लष्करी अधिकारी प्रसंग येतांच काळ्यांच्या बाजूनें न लढतां गोऱ्यांच्याच बाजूनें लढले हें जितकें खरें, तितकेंच साहेबाशीं सख्य करून काळ्या माणसानें साहेबाचा हुकूम होतांच आपल्या रक्ताच्या आपल्याच भाईबंदांच्या बेधडक माना मारल्या व स्वतःचें पोट जाळलें हेंही खरें! पण साहेब हा ५,००० मैलांवरून येथें आला असल्याकारणानें त्याच्या डोक्यांत संशयाचें पिशाच्च एकसारखें पिंगा घालीत होतें. म्हणून एल्फिन्स्ट-नला नेटिव्ह पलटणीचा संशय आला व हा फितूर फळास येऊं नये म्हणून त्यानें एकदम धडाक्यानें हमला चढविण्यास सुरुवात केली.

कर्नल बरचें सैन्य खडकीस तयार होतेंच. त्याच्या जोडीला आणखी इतर सैन्याची जय्यत तयारी करून कंपनी सरकारच्या लष्करी हालचालींस

सुरुवात झाली. हें सैन्य खडकीहून एक मैल पुढें चालून आलें, तेव्हां या सैन्यास मिळण्याकरितां दापोडीहून कर्नल फोर्ड याच्या हाताखालील सैन्य निघालें. दोन्हीं सैन्यें जवळ येत चाललीं. या वेळीं संध्याकाळचा चार वाजण्याचा सुमार होता. कर्नल बर व कॅ.फोर्ड यांचीं सैन्यें एकमेकांस मिळण्याचा रंग दिसतांच पेशव्यांच्या घोडेस्वारांनीं कर्नल बरच्या सैन्यास मध्येंच कोंडण्याचा बेत केला. पेशव्यांच्या सैन्याच्या मध्यभागीं असलेल्या तोफांचीही सरबत्ती सुरू झाली. तसेंच मोरो दीक्षित मराठे वगैरे पेशव्यांचे सरदार खडकी गांवाच्या बाजूनें चालले होते, त्यांस असें आढळून आलें कीं, कर्नल फोर्ड हा खडकीस इंग्लिश लष्करास येऊन मिळण्याकरितां आपल्या सैन्यासह निघाला असून तो अवघ्या २,००० कदमांवर आला आहे. तेव्हां खडकीच्या व दापोडीच्या सैन्याचा मिलाफ होऊं देऊं नये म्हणून मोरो दीक्षित मराठे व सरदार रास्ते हे फोर्डला अडविण्यासाठीं आपल्या घोडेस्वारांनिशीं निघाले. कर्नल फोर्ड व मोरो दीक्षित मराठे यांचा स्नेह होता व मोरो दीक्षित इंग्रजांस फितुर असल्याची दाट वदंता होती व ती खरीही होती. पण कांहीं माणसें कच्च्या दिलाचीं असतात. कोणत्याही एका पक्षास शेवटपर्यंत व पुऱ्या दिलानें चिकटून राहण्याचें त्यांस साधत नाहीं. तसाच मोरो दीक्षित होता. आपण पेशव्याचे कारभारी आणि आपल्या फितुरीची लोकांत इतकी चर्चा व्हावी याचें त्यास वैषम्य वाटत होतें. तशांत बापू गोखलेंही कांहीं वर्मीं बोलले तेव्हां हा संशय दूर करण्यास हा मोका चांगला आहे असें त्यास वाटलें व त्यानें कॅ. फोर्डवर चालून घेतलें. रास्ते व मोरो दीक्षित मराठे आपणांवर चालून येत आहेत हें कॅ. फोर्डच्या लक्षांत येतांच त्यानें आपल्या सैन्यास माघारीं हटण्याचा हुकूम फर्माविला. त्याबरोबर त्याचें सैन्य माघारीं हटूं लागलें. तसेंच त्यानें आपल्या बटॅलियनला जवळच्या तीन तोफांनीं गोळ्यांची फैर झाडण्याचा हुकूम फर्माविला होता. ही कॅ. फोर्डची चाल पाहतांच त्याच्यावर हल्ला करण्याचा बेत मोरो दीक्षितानें रहित केला व तो खडकीच्या बाजूला वळला. तेथें इंग्लिशांच्या दोन तोफा तयार होत्या. त्यांनीं या सैन्यावर गोळे सोडण्यास सुरुवात केली. त्यांतील एक गोळा मोरो दीक्षितास लागून तो देवरूप झाला. अशा तऱ्हेनें शेवटल्या पेशव्यांच्या शेवटच्या कारभाऱ्यानें आपला देह धारातीर्थीं

ठेविला. मोरो दीक्षित मराठ्याच्या शेवटाबद्दलची हकीगत जरा निराळी अशी दिलेली आहे. भित्रा व फितुर म्हणून त्याची जास्तच हेटाळणी होऊं लागली तेव्हां तो मुद्दाम धीटपणानें स्वतः जरीपटका घेऊन मराठी फौजेच्या आघाडीवर ठांसून उभा राहिला, व इंग्रजांच्या गोळ्यास बळी पडला ! कसेंही असो. मोरो दीक्षिताचा अंत असा झाला खरा. तथापि त्याच्याविषयीं पसरलेल्या फितुरीच्या कंड्यांत कांहींच तथ्य नव्हतें असें नाहीं.

पेशव्याचा कारभारी खडकीच्या लढाईनें बळी घेतला हें पाहून त्याच्या सैन्यांत धांदल उडाली. त्याच्या शिपायांचा धीर सुटला व सैन्य माघारीं फिरलें. कॅ. फोर्ड लगेच कॅ. बरला येऊन मिळाला. या वेळीं इंग्लिश लाइनीच्या डाव्या बाजूवर पेशव्यांच्या लष्करानें हल्ला करून गर्दी उसळून दिली. तसेंच अरब आणि गोसावी यांनीं आपल्या लाईनीच्या मध्यभागांतून निघून सातव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन आणि सहाव्या रेजिमेंटची दुसरी बटॅलियन यांच्यावर जोराचा हल्ला चढविला. ह्या हल्ल्याचें नेतृत्व पेशव्यांच्या सैन्यांतील पोर्तुगीज सेनापति डी. पिंटो यानें स्वीकारलें होतें. हा हल्ला चालू असतांनाच दुर्दैवानें डी. पिंटो हा मरण पावला. पण त्याच्या ह्या हल्ल्यामुळें इंग्रजी सैन्याची लाईन तुटून त्यांत अंतर पडलें. शत्रूच्या या परिस्थितीचा पुरेपूर फायदा सर सेनापति बापू गोखले यानें घेतला. त्यानें लगेच जरीपटक्याचें निशाण हातांत घेऊन आपल्या सहा हजार निवडक घोडेस्वारांसह दुभंगलेल्या इंग्लिश सैन्याची फळी फोडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. पण या वेळींही मराठ्यांचें दैव त्यांना अनुकूल नव्हतें. कारण लढाई इतकी हातघाईवर आली असतांना, व सेनापति आपल्या युद्धकौशल्याची व शौर्याची शिकस्त करीत असतांना त्याच्या घोड्यास जिव्हारीं गोळी लागून तो निकामी झाला. पण असल्या किरकोळ अडचणीस न जुमानतां एकादे वेळेस त्या रणमर्द बापू गोखल्यानें आपला हल्ला पुढें चालविला असता. रात्र पडली असतांना सुद्धां त्यानें इंग्लिश सैन्याची पुष्कळच नासाडी केली असती.

या प्रसंगाचें वर्णन करतांना पेशव्यांच्या बखरींत खालीलप्रमाणें म्हटलें आहे. “ त्या समयीं इंग्रज यांचें बोलणें श्रीमंतांकडे आलें. एल्फिन्स्टनसाहेब फार घाबरले, त्या समयीं श्रीमंतांचीं बोलावणीं बापू गोखले यांस गेलीं. परंतु बापू

गोखले माघारीं न फिरत. इंग्रज कोंडला (असता) व इंग्रज याचे लोकांस खावयास कांहीं नाहीं. अशी निकड बसली असती म्हणजे इंग्रज कौलांत आले असते. परंतु बापू गोखले यांचा लढाईचा आग्रह मोठा. खावंदाचे मनांत इंग्रज मोडावयाचा नाहीं. तेव्हां बोलावण्यावर बोलावणीं बापू गोखले यांस श्रीमंतांचीं गेलीं. शेवटीं निदान श्रीमंतांनीं सांगून पाठविलें तेव्हां बापू गोखले शह सोडून माघारीं आले. ”

खडकीच्या लढाईंतही रावबाजीचा धांदरटपणा आणि घाबरटपणा भोंवलाच. शह सोडून माघारीं फिरण्याचा घातक प्रसंग बापू गोखल्यावर आला. खडकीची लढाई अंधकार पडल्यामुळें संपुष्टांत आली. पेशव्याचें सैन्य पुणें शहराकडे वळलें. तसेंच कॅ. फोर्ड दापोडीस व क. बर आपल्या सैन्यासह रात्रीं आठच्या सुमारास खडकीस येऊन पोहोंचला. इंग्लिश सैन्यानें मराठ्यांचा पाठलाग केला नाहीं, तसेंच मराठ्यांनींही इंग्लिशांना छेडलें नाहीं. तेव्हां या लढाईंत कोणाचा जय आणि कोणाचा पराजय झाला हें सांगतां येत नाहीं.

या लढाईंत पेशव्यांचा कारभारी मोरो दीक्षित व पोर्तुगीज सेनापति डी. पिंटो हीं दोन मोठालीं माणसें कामास आलीं. तसेंच पेशव्यांकडील मेलेल्यांची आणि जखमी झालेल्यांची संख्या ५०० पर्यंत गेली होती. इंग्लिशांचे एकंदर ८६ लोक जखमी झाले व मेले. त्यांपैकीं ५० नेटिव्ह शिपाई आणि एक युरोपियन ऑफिसर होता. क. बर याची फार मजेदार हकीगत आहे. त्याला अर्धांगवायूचा विकार होता. तरी या लंगड्या माणसानें खरोखरीच चांगला टिकाव धरला. लढाई ऐन रंगांत असतां त्याच्याजवळ दोन नोकर उभे होते. त्यांस गोळ्या लागून ते खालीं पडले. इतकेंच नव्हे तर क. बरच्या घोड्याच्या डोक्याला एक गोळी चाटून गेली. याच्याहीपेक्षां शर्थ म्हणजे एक गोळी जी सणकत आली ती या साहेबाच्या टोपीला लागली! तरीपण या लंगड्या टोपीकराचें आयुष्य इतकें भक्कम कीं त्यानें प्रत्यक्ष मृत्यूस टोपी घातली!

पेशव्यांच्या वाड्यावर इंग्रजांचें निशाण : ११

बाजीरावाच्या कारकीर्दीतील घटनांचा, एकंदरीनें पाहतां, विचका जर कोणी केला असेल तर दिरंगाईनें. त्याचें प्रत्येक काम दीर्घसूत्रीपणानें चालावयाचें, त्याला काळाचें बंधन नाहीं. कोणतीही गोष्ट करतांना मनांत शंका कुशंकांचा बुजबुजाट झालेला असावयाचा. 'करूं कीं नको करूं' 'कसं करूं आणि केव्हां करूं' 'माझ्या हातून तें होईल कीं नाहीं' असल्या नामर्द विचारांचा संभ्रम त्याच्या डोक्यांत नुसता हैदोस घालावयाचा. त्याच्या मनाची तऱ्हा अशा तऱ्हेची झाल्याकारणानें त्याला पुष्कळ ठिकाणीं विनाकारण अपयश आलें. २८ ऑक्टोबर १८१७ पासून ५ नोव्हेंबरपर्यंत एक आठवडा खडकीची लढाई सुरू करण्यांत गेला. पांच नोव्हेंबरला दुपारीं तीन–चार वाजल्यापासून रात्रीं आठपर्यंत ती कशीबशी चार तास चालली व उभय पक्षांच्या सैन्यांनीं आपआपला रस्ता सुधारला. टोपीकर खडकीस गेला, पेशवा पुण्यास आला. पुन्हां आपलें जिकडे तिकडे सामसूम. कोणी कोणावर चालून जाईना कीं कोणी कोणाचा पाठलाग करीना. टोपीकरानें स्वीकारलेली स्तब्धता पुढील वादळाची द्योतक होती. पण पेशव्याची दिरंगाई त्यास प्राणघातक ठरली. खडकीच्या लढाईंत बापू गोखल्यानें इंग्लिश सैन्याची फळी फोडण्याचा यशस्वी प्रयत्न करतांच एल्फिन्स्टनला ही लढाई आपल्याच अंगाशीं येणार असा जबरदस्त धाक उत्पन्न झाला. त्याबरोबर लगेच त्यानें 'अशुभस्य काल-

हरणं ' या न्यायानें बाजीरावाकडे पर्वतीस निरोपावर निरोप धाडण्यास प्रारंभ केला. त्याबरोबर बाजीराव ढिला पडला. इंग्रजांस पुरा मोडावयाचा नाहीं असें त्याच्या मनांत होतेंच. आणि एल्फिन्स्टनच्या निरोपांनीं त्याचा तो निश्चय ठाम झाला. याच्या अगदीं उलट बापू गोखल्याची मनीषा होती. इंग्रज आणि पेशवे यांच्या सैन्यांत दसपटीपेक्षां अधिक फरक असतांना व शत्रूची फळी यशस्वी तऱ्हेनें फोडण्याचें अजब साहस दाखविण्यांत यश आलें असतांना बापू गोखल्यासारखा बहादूर सेनानी शह टाकून येतो याचें कारण केवळ बाजीरावाचे निकडीचे निरोप !

५ नोव्हेंबरपासून १७ नोव्हेंबरपर्यंत इंग्रजाकडून कोणत्याही तऱ्हेची हालचाल झाली नाहीं; त्याचें इंगित असें होतें कीं, टोपीकर कुमकेची वाट पाहात होता. ब्रिगेडियर जनरल स्मिथ जालना येथें होता व त्याचें सैन्य पुण्यास येईपर्यंत इंग्रजास कसे बसे दिवस ढकलावयाचे होते. एल्फिन्स्टन व स्मिथ यांचा असा संकेत ठरला होता कीं, एल्फिन्स्टनकडून रोजची डाक जावयाची व ज्या दिवशीं डाक चुकेल त्या दिवशीं कांहींतरी धोका आहे असें स्मिथनें समजावयाचें व लगेच क्षणाचाही विलंब न करतां पुण्यास यावयाचें. या संकेताप्रमाणें ५ ता. चें टपाल चुकतांच स्मिथ जालन्याहून निघाला. तो १३ नोव्हेंबरला येरवड्याच्या शादिलबाबाच्या टेंकडीच्या पश्चिम अंगाला येऊन दाखल झाला. हें ठिकाण म्हणजे सध्यांचें डेक्कन कॉलेज व ठाकरसी हिल यांच्या दरम्यान असलेलें मैदान होय. तेथें त्यांचा तळ पडला. तत्पूर्वीं जालन्याहून स्मिथ निघाल्याचें कळतांच सरदार नारोपंत आपटे व अक्कलकोटकर आपल्या सैन्यासह त्याला अडविण्यासाठीं बरेच पुढें गेले. उभय सैन्यांची बारकीशी चकमक कोंडापूर मुक्कामीं झाली. त्यांत अक्कलकोटकर सरदार कामास आले. पेशव्यांच्या स्वारांनीं इंग्लिशाचे सामान–सुमानांनीं भरलेले दोन हजार बैल पळवून आणिले. पण त्याचा परिणाम इंग्रजी सैन्यावर फारसा झाला नाहीं. ज. स्मिथला अडविण्याचें काम त्यांच्यानें निभलें नाहीं. तो येरवड्यास येऊन दाखल झाला. आणि टोपीकर निरधास्त झाला. खडकीच्या लढाईनंतर लगोलग जर पेशव्यांचा हल्ला होता तर इंग्रजांचा निभाव लागला नसता. पण नुसत्या वाटाघाटींत आणि बाजीरावाचा

कोणताच ठाम निश्चय न होण्यांत तसेंच तोफा नदीच्या पलीकडे न्यावयासाठीं चांगली उताराची जागा शोधण्यांत ११ दिवस फुकट गेले! आमच्या प्रदेशांतील नदीला उतार कोठें हें आमच्यापेक्षां साहेबाला अधिक माहीत! पण केवळ नदीला उतार शोधण्यांत इतके दिवस गेले नसावेत; या विलंबाचें कारण कोणताही दृढनिश्चय न होणें हेंच असावें.

ज. स्मिथ येरवड्याच्या मैदानांत दाखल झाला व क. बरचेंही सैन्य त्या ठिकाणीं आलें. लगेच पेशव्यांवर हल्ला करण्याच्या वाटाघाटीस सुरुवात झाली. हल्लीं जेथें बंडगार्डनचा पूल आहे त्या ठिकाणीं कोठेंतरी आसपास नदीला उतार होता. या उतारानें पलीकडे जाऊन गारपिरावरील पेशव्याच्या सैन्यावर हल्ला करावा असा इंग्लिशांचा बेत होता व त्याप्रमाणें हालचालींस सुरुवात झाली. इंग्रज सैन्यानें शादिलबाबाची टेंकडी आपल्या ताब्यांत घेतली. शादिलबाबाच्या टेंकडीचें सध्यांचें नांव ठाकरसीची टेंकडी. या टेकडीवर एक महादेवाचें सुंदर देऊळ आहे. त्या देवळाच्या पायऱ्यांवर एक तोफ बसवण्यांत आली. तिचा उद्देश असा होता कीं, मुळा–मुठा नदीच्या उतारानें कोणी पेशव्यांचे लोक अडथळा करण्याकरितां येऊं लागतील तर त्यांना चांगल्या तऱ्हेनें प्रतिबंध करतां यावा. तसेंच दुसरी एक तोफ अशा तऱ्हेनें ठेवण्यांत आली होती कीं, तिचा मारा बरोबर गारपिराजवळील पेशव्यांच्या छावणीवर करतां यावा. अशा तऱ्हेनें या दोन तोफा रोंखल्यानंतर संगमाजवळील आणि येरवड्याजवळील नदीच्या उतारानें जाऊन पुण्यांतील पेशव्यांच्या सैन्यावर १४ नोव्हेंबरला रात्रीं एकदम हमला चढवावा असा इंग्रजांचा बेत होता. पण येरवड्याच्या पायउतारानें तोफा नेणें अशक्य झालें तेव्हां हा बेत रहित झाला. १५ नोव्हेंबरला पायउताराची वाट दुरुस्त करण्याचें काम सुरू झालें. ही बातमी पेशव्यांकडे कळली व १६ नोव्हेंबरला पेशव्यांचे लोक तेथें आले व ते या कामास आडकाठी करूं लागले. आरब घोडेस्वार त्यांना हरकत करूं लागले व त्यामुळें कुरबुरीस प्रारंभ झाला. तिसरे प्रहरीं त्यांच्या मदतीला पेशव्यांचे सैन्यांतील बरेच लोक धांवले. पेशव्यांच्या लोकांनीं या वेळीं चांगलाच जोर केला व कित्येक तासपर्यंत चांगलीच तलवार चालली. पेशव्यांचें सैन्य लढत लढत

व शत्रूला रेटीत रेटीत येरवड्याच्या बाजूच्या टेंकापर्यंत येऊन पोहोंचलें. ही लढाई रात्रीं अकरापर्यंत चालली होती; पण यशाच्या दृष्टीनें विचार करतां त्याचा कांहीं सुद्धां उपयोग झाला नाहीं. शेवटीं इंग्रजांचें सैन्य पेशव्यांच्या अडथळ्याला न जुमानतां येरवड्याच्या पायउतारानें नदी उतरून अलीकडच्या तीराला येऊन पोहोंचलें. हें सैन्य १६ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीनंतर नदीच्या अलीकडे आलें. त्यानंतर पहांटे तीन वाजतां ज. स्मिथ आपलें सैन्य सरसावून संगमाच्या पायउतारानें पुण्यावर हल्ला करण्याकरितां निघाला. संगमावरून गारापीराकडे ज. स्मिथ वळला व दुसरें सैन्य घोरपडी–वानवडीच्या बाजूनें निघालें. उभय सैन्यें गारापीरावर मिळावीत अशा बेतानें चाललीं. १७ नोव्हेंबरला सूर्य उगवण्याच्या सुमारास ठरल्याप्रमाणें ही सेना दाखल झाली. पण तेथें येऊन पाहतात तों त्यांना निराळाच चमत्कार दृष्टीस पडला. पेशव्यांच्या सैन्यानें रातोरात आपला तळ तेथून हालविला होता. या लढाईचें वर्णन बखरकारांनीं खालीलप्रमाणें केलें आहे :

“ कार्तिक शुद्ध अष्टमीचे दिवशीं दोन प्रहरीं गोखल्याचे आरब व सरकारचे गोसावी येरवडे गांव घेऊन आंत शिरले तेव्हां मोठे कलागतीस आरंभ झाला. ते दिवशीं पेशव्यांचा लढाईचा बेत नव्हता. परंतु इंग्रजांचा बेत पडला. गणपतराव पानशांनीं महाकाली तोफ आणून बार काढिले. आरब व गोसावी यांनीं लढाईची शर्थ केली. आवशीस प्रहररात्रपर्यंत लढाईची शर्थ झाली. पुढें गोखले व पुरंदरे याशीं कांहीं फितुर असें समजलें. तेव्हां श्रीमंतांनीं पळ काढिला. बापदेवाचे घाटांत जाऊन उभे राहिले. विंचूरकर पुरते फितूर असें समजण्यांत आलें. स्वारीबरोबर माधवराव रास्ते व चिंतामणराव आप्पा गेले. तेव्हां फौजेचा भणभणाट झाला. पानसे यांनीं तोफा काढून घेतल्या. मागील रात्र पांच घटका राहिली. तोंपर्यंत तोफांचे बार चालले. फिरंग्याकडील तोफेचा गोळा आबा पुरंदरे उभे होते त्यांच्या दाहा बारा हातावर पडला. तेव्हां गोखले व पुरंदरे स्वारीचे मागे सासवडाकडे गेले. लढाई सुरू होतांच बाजीरावानें ठासून फौजेंत पुढें यावें, निदान आपणांस तरी संग्रामास जाऊं द्यावें, परंतु पुण्यांतून पळ

काढूं नये अशी चिमाजीआप्पानें बाजीरावाशीं पुष्कळ हुजत घातली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. चिमाजीस घेऊनच तो निघून गेला."

प्रसंग ज्या मानानें जड, भारी येईल त्या मानानें धैर्याला तेज चढत जावें; कसल्याही प्रसंगावर मात करावी यांतच खरें अलौकिकत्व आहे. पण बाजीरावाच्या ठिकाणीं या गुणांचा अगदीं अभाव. तो बांका प्रसंग येतांच गांगरून जात असे. मग त्यांतून मुक्त होण्यासाठीं उपायांची योजना हें तर त्याच्या आवाक्याबाहेरचें खटलें. त्याला तें सुधारत नसे. याच्याहीपेक्षां दुसरा एक अत्यंत मोठा दुर्गुण त्याच्याजवळ होता; तो म्हणजे प्रसंगीं कोणी चांगली सल्ला दिल्यास तिचा तो उपयोग सुद्धां करीत नसे. त्याचा भाऊ चिमाजीआप्पा याच्यासंबंधीं जरी फारशी माहिती उपलब्ध नाहीं तरीपण त्यानें दोन प्रसंगीं दाखविलेलें धैर्य आणि आपल्या थोरल्या भावास दिलेली सल्ला फार धैर्यवान् व स्वाभिमानी माणसास शोभण्यासारखी आहे. इ. स. १८०२ सालीं यशवंतराव होळकरानें पुण्याचा कबजा घेतला व रावबाजी इंग्रजाचे आश्रयास जाण्यासाठीं म्हणून आतां जहाजांत पाय टाकणार तोंच या चिमखड्या चिमाजीआप्पानें रावबाजीस ताडकन् सांगितलें कीं, "स्वकीयांची कैद पुरवली; कारण आपली मानखंडणा झाली तर ती स्वकीयांकडून होईल. आपलें शीर धडावेगळें होण्याचा प्रसंग आला तरी तो स्वकीयांकडून होईल. त्यांत आपणास भूषण नसलें तरी दूषण खास नाहीं. पण टोपीकराच्या कृपाछत्राखालील सिंहासन आपणास नको." 'बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्' या न्यायानें बाजीराव चिमाजीआप्पाचें ऐकता तर त्याच्यावर वसईच्या तहावर सही करण्याचा दुर्धर प्रसंग आला नसता. तसेंच आतां या शेवटच्या आणीबाणीच्या प्रसंगीं सुद्धां, "मला रणांगणावर ठांसून उभा राहूं दे, विन्मुख होऊन चाललेल्या विजयश्रीला मी माघारीं खेचल्यावांचून राहणार नाहीं. मला जाऊं देत नसशील तर निदान तूं तरी तेथें जाऊन हिमालयासारखा ताठ उभा रहा व मग बघ रणाला पाठ दाखवून पळणारे तुझेच सैनिक कशी करामत करून दाखवितात तें! निदान राजधानी सोडून तरी पळून जाऊं नकोस." हें चिमाजीआप्पाचें सांगणें खरोखरीच योग्य होतें. पण यापैकीं कोणतीही गोष्ट बाजीरावास रुचली नाहीं हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय.

खडकीच्या लढाईनंतर दहा-बारा दिवस फुकट घालविल्याबद्दल त्या वेळचे बखरकार सुद्धां हळहळतांना दिसतात.

" खडकीच्या लढाईनंतर पेशव्यांच्या सैन्यानें कांहींएक न केल्यामुळें इंग्लिशांना जो अवकाश सांपडला त्या अवकाशांत इंग्रज यानें आपल्या पलटणांची तयारी केली. घोडनदीहून जनरेल स्मिथ हा सरदार मोठा लढवाई दोन चार पलटणें दारू गोळ्यासुद्धां तयारी करून पुण्यावर आला. इंग्रजाची लढाईची तयारी झाली. इकडे श्रीमंत दिवाळी होऊन बाहेर पडले ते डेऱ्यास येऊन दाखल झाले तेथें अवघी फौज जमा झाली. तोफखानाहि तयार होऊन तेथें आला.

" अशी तयारी होऊन कार्तिक शु॥ ८ स तिसरे प्रहरीं लढाईस प्रारंभ झाला. तेव्हां इंग्रज येऊन येरवड्यावर तयार होऊन उभा राहिला. इकडे बापू गोखले फौजेची तयारी करून लढाईच्या उद्देशानें निघाले. ते येरवड्यावर गेले तेथें गेल्यावर टेकडी येरवड्यानजीक आहे ती श्रीमंतांच्या फौजेनें आटोपली. त्या टेकडीवर आरब गोसावी चढले. असें होत असतां दिवेलावणीच्या संधींत लढाई सुरू झाली कांहीं लढाई होत आहे. महाकाळ तोफ पुरंदरास होती ती पुण्यास आणून तीच तोफखान्यांतन ओढून लढाईस नेली. अरब-गोसावी लढत होते. दारू-गोळ्याचा व खाण्यापिण्याचा कांहीं पुरवठा पाठीमागून झाला नाहीं. इंग्रजांची तोफेची मारगीर मोठी होऊं लागली. त्या समयीं रात्र दहाबारा घटका जाहली. त्या वेळेस श्रीमंत (याणी) स्वारी तयार करून, सगळा आपला आजबाब आटोपून दिव्याच्या घाटाचा रस्ता धरिला. घाटांत स्वारी गेली त्या वेळेस हजारों मशाली लाविल्या. असे पळाले. हें बापू गोखले यांनीं पाहून तेही त्याच रस्त्यानें चालले. सारी फौज उधळली. तो उजेड इंग्रज यानें पाहिला. तेव्हां त्यानें लढाईचा लगट भारी केला. अरब-गोसावी लढत होते. त्यांजजवळ दारूगोळा नाहींसा झाला. त्यांत बहुतेक माणसें ठार झालीं. अरब-गोसाव्यानीं पळ काढिला. टेकडी इंग्रजांनीं सही केली. आणि तेथून पुढें चाल केली. श्रीमंत पळतात हें पाहून इंग्रजांचीं पळटणें पाठीमागें लागलीं. तों पहांटेचा समय व्हावयास आला.

इंग्रज श्रीमंतांचे तळावर येऊन पोहोंचला. येऊन पाहतो तों डेरे राहुट्या उभ्या आहेत. "

खडकीच्या लढाईंत शह सोडून बापू गोखल्यास माघारीं बोलाविलें तर येरवड्याच्या लढाईंत चिमाजीआप्पा सांगत असतां लढाईंत ठासून उभें राहण्याचें तर दूरच राहिलें; पण स्वतःच राजधानी सोडून पळून जाण्याचा अजब चमत्कार बाजीरावानें केला. त्यामुळें प्राणसंकट त्याच्या जवळच उभें राहिलें; किंबहुना त्यानें ज्या वेळीं पुण्यांतून पोबारा केला त्या वेळींच त्याचें राज्य आणि राजेपण नाहींसें झालें. कारण राजधानींत शिरलेला शत्रु बाहेर काढणें आणि त्या ठिकाणीं आपलें सिंहासन पुन्हां स्थिर करणें महामुष्किलिचें. त्यांतून इंग्रजासारखा बलिष्ठ शत्रु म्हणजे कुराण व तलवार हातांत घेऊन उगीचच पृथ्वीवर घोडदौड करणारा दाढीवाला नव्हे. त्यानें प्रत्येक पाऊल हिकमतीनें टाकून मग हुकमत चालविलेली ! तेव्हां त्याच्यासारखा शत्रु एकदां का घरांत शिरला म्हणजे मग तो बाहेर निघणें कालत्रयीं शक्य नव्हतें आणि तसें झालेंही. तिकडे अरब आणि गोसावी शादिलबाबाच्या टेकडीवर निकराची लढाई करीत असतां त्यांची खाण्या-पिण्याची नीट व्यवस्था झाली नाहीं कीं त्यांना दारुगोळा नीटपणें पुरविण्यांत आला नाहीं. पुरंदरची महाकाळ तोफ सुद्धां फुसकी ठरली. सरदार पानशयांनीं तोफा काढून घेतल्या. काय करतील ? मालकच बिऱ्हाड-बाजलें घेऊन पळूं लागला; मग रक्षण कुणाचें करणार ? ' किल्ला हातीं लागत नसेल तर निदान माझें मुंडकें तोफेनें उडवून किल्ल्यांत पडूं द्या '-असें म्हणणारा तिखट चिमाजी आप्पा असला, म्हणजे वसईचा बेलाग किल्ला सर होतो ! केवळ कबंधानें लढणारा मुरार असला कीं वीरांना धीर येतो ! ' तुमचा बाप येथें मरून पडला आहे, पळतां कोठें ? '-असें पुकारून पळणाऱ्या मावळ्यांना परतविणारा सूर्याजी असला कीं सिंहगड सर होतो ! साध्या चाकू-सुऱ्यांच्या समशेरी होतात, दगड-धोंडे शत्रूचा कपाळमोक्ष करतात. पण नेत्याचाच धीर सुटला तर वीर काय करणार ?-मग वसई सर होण्याऐवजीं वसईचा अपमानकारक तह होतो ! मुंडकें शाबूत राहण्यासाठीं पाय पळतात ! गड गेला तरी चालेल पण गडी

वाचूं दे म्हणून पळापळ होते ! प्राणप्रिय पुण्यपुरीस रामराम ठोकून पळण्याच्या प्राणान्तिक वेदना देणारा प्रसंग येतो !

फौजेचा भणभणाट झाला. रावबाजीचा धीर सुटला. हिलाल—पलिते पाजळून त्यानें मध्यान्ह रात्रीस दिव्याच्या घाटाचा रस्ता सुधारला. रावबाजीनें अक्षरशः पळतां पळतां अकलेचे पालिते पाजळले ! छे ! रावबाजी कसला, मराठ्यांचें स्वातंत्र्यच ससेहोलपट होऊन मध्यान्हींच्या अशुभ वेळीं जें बाहेर पडलें तें कायमचेंच ! रावबाजी गेला नि पुणें पोरकें झालें. पेशव्यांची पुण्यपुरी साहेबाच्या हातीं पडली.

शनिवारवाड्यांतून प्रतिवर्षी विजयादशमीस दोन—दोन लाख लष्कर मुलूखगिरीसाठीं बाहेर पडत असे. ‘ आमचा रोख दिल्लीवर आहे, मोंगलांनीं हस्तगत केलेलें हस्तिनापूर आम्हांस हस्तगत करावयाचें आहे ’ अशी मनाची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्या पेशव्यानें आपल्या या राजवाड्याचें तोंड दिल्लीकडे ठेवून त्यास दिल्ली दरवाजा हें नांव दिलें. पिढ्यान् पिढ्या दिल्लीवर चालून जाण्याचा खटाटोप केला. तोच ‘पेशवा’ आज नामर्द ठरून परागंदा झाला. तेव्हां त्याच्या राज्यांत प्रवेश करणें टोपीकर इंग्रजास फार सोपें गेलें. इंग्रज फिरंग्यानें कोणत्या मुहूर्तावर हिंदुस्थानांत आपलें पहिलें पाऊल टाकिलें कोण जाणें ? पण ती वेळ त्यास भाग्यप्रद ठरली. त्याच्या पायाखालीं राजराजेश्वराचें सिंहासन तयार झालें. इंग्लंडचा राजा हिंदुस्थानाचा बादशहा झाला व त्याच्या राजदंडाचा बेजरब तडाखा बसूं नये म्हणून हिंदुस्थानांत डरकाळ्या फोडणारे नाना जातींचे आणि पंथांचे नरसिंह ग्रामसिंह बनले ! १६ नोव्हेंबर रोजीं पेशवा पुण्यांतून पळाला व १७ नोव्हेंबरला साहेबानें पुण्याचा ताबा घेतला. लगेच पेशव्याच्या वाड्यावर इंग्रजांनीं आपला बावटा चढविण्याचें मोठ्या मानाचें व विजयानंदाचें कृत्य केलें. हें काम बाळाजीपंत नातूच्याकरवीं करविण्यांत आलें ! पण हें काम करण्यास बाळाजीपंत नातूचें मन कचरत होतें अशांतला मुळींच प्रकार नव्हता. पेशव्यांच्या वाड्यावर बावटा चढविण्याचें काम रॉबिन्सन साहेबाकडे आलें. तेव्हां त्याच्याबरोबर बाळाजीपंत नातूस पाठविण्यांत आलें. प्रथम बाळाजी-पंत नातू जाण्यास तयार नव्हता, पण त्यास खिजविण्याकरतां म्हणून ‘ तुम्ही

बरोबर जाण्यास भितां कीं काय ? ' म्हणून साब लोक बोलूं लागले. त्यासरशीं बाळाजीपंतास इसळा आला व त्यानें रॉबिन्सनबरोबर जाऊन बावटा लाविला. साहेबाचे आपण विश्वासू नोकर हें जगास व साहेबास दाखविण्याच्या नशेंत त्यानें हें अत्यंत भाग्यहीनाचें नि कपाळकरंट्याचें घृणास्पद काम केलें खरें; पण ही गोष्ट त्यास शेवटपर्यंत जाणवत होती व तो पश्चात्तापानें जळत होता. कंपनी सरकारनें आपलें काम होतांच जरा हुंदाडल्याबरोबर बाळाजीपंत नातूनें लिहिलेल्या एका पत्रांत तो म्हणतो, " मी बावटा लावल्यामुळें बाजीरावसाहेब व त्यांचे राज्यांतील सारे लोकांची मजवर दुष्मानी—सारे लोक एकीकडे. मी एकटा कंपनीचे लष्करांत होतों......तत्राप त्या लोकांस वांईट न वाटावें असे गरिबीचे चालीनें सर्वांशीं दोस्तीनें वागतों. "

बाजीराव पुणें सोडून पळून गेल्यानंतर पुण्याची लूटमार होण्याचा प्रसंग आला होता. पण तो बाळाजीपंत नातूच्या मध्यस्थीनें चुकला. या वेळीं ज. स्मिथनें एल्फिन्स्टनला असें सांगितलें कीं, आम्ही शहरांत जाऊन वाड्यावर झेंडा लावतों; परंतु फौजेस लूट मिळाली पाहिजे. तेव्हां जवळ बाळाजीपंत नातू होते. त्यांनीं विनंति केली, ' शत्रू तर पळून गेले, आतां गरीब रयतेस लुटण्याचें प्रयोजन काय? सर्व लोक इंग्रजी अंमल होण्याचीच वाट पाहात आहेत. ' तेव्हां ज. स्मिथ बोलले, "दादा, तुम्ही झेंडा लावून याल काय ? " नातू म्हणाले, " मजबरोबर २५ स्वार द्या म्हणजे मी झेंडा चढवून येतों. " त्याप्रमाणें स्वार घेऊन बाळाजीपंत शहरांत जाऊन वाड्याचे दिल्ली दरवाज्यावर झेंडा लावून आले. तेव्हां पुढें शहराचा बंदोबस्त नातूंसच सांगण्यांत आला.

पुण्यपुरीस रामराम : १२

फौजेचा भणभणाट झाला व हिलाल पलिते पाजळून बाजीरावानें मध्यरात्रीस जेव्हां दिव्याच्या घाटाचा रस्ता धरला, तेव्हां त्याच्या मागोमाग बापू गोखले वगैरे मातब्बर सरदार व सेनानी श्रीमंतांच्या संरक्षणासाठीं म्हणून गेले. पेशव्यांनीं पुण्यास शेवटचा रामराम ठोकला खरा; पण तसें करतांना बाजीरावाच्या मनास कोण यातना झाल्या असतील, याची कल्पना सुद्धां करवत नाहीं! साडेतीन हात देहाची कुडी सोडून जातांना आत्म्याला प्रत्येक मर्मावर किती खडाजंगीचा सामना करावा लागतो! प्रत्येक मर्म हस्तगत करतांना कलिकालाची व त्याची कोण जिकीरीची ओढाओढ चालते! मनुष्याचा देह गार पडतां पडत नाहीं. कित्येक वेळीं प्राण निघून गेला तरी शरीर ऊब धरून असतें. सापाची तुटलेली शेपटी सुद्धां वळवळतांना दिसते. मग राजानें राजधानीवर उदक सोडून बाहेर पळावयाचें म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. कोण दुर्धर प्रसंग! पण वेळ आल्यावर मनुष्य कोणत्याही संकटास सामोरा जातो हेंच खरें. ज्या पुण्यपुरींत रावबाजीनें राजराजेश्वराची सत्ता गाजविली, नाना तऱ्हेचे विलास उपभोगले, ती त्याची परमप्रिय पुण्यपुरी सोडून जाण्याचा प्राणान्तिक प्रसंग दुर्दैवानें त्याच्यावर आणिला. ता. १६ नोव्हेंबरला रात्रीं बाजीराव बाहेर पडला व सतरा नोव्हेंबरला साहेबानें आपला बावटा पेशव्यांच्या वाड्यावर चढविला.

साहेबाचें फलित साहेबास मिळालें. पण पेशवा मात्र राजकारणाच्या द्यूतांत आपली दौलत गमावून बसला व पिसाटासारखा पळत सुटला. पण त्याचें

पळणें व सामान्य माणसाचें पळणें यांत जमीन–अस्मानाचें अंतर होतें. बाजीरावानें मारलेल्या घोडदौडीन इंग्रज गांगरला व हा असाच झुकपुऱ्या देत राहिला तर आपणांस पेशवाई पचणार नाहीं अशी साधार भीति टोपीकरास वाटूं लागली. पुण्याहून सासवड, सासवडाहून जेजुरी, जेजुरीहून घाट चढून देहूच्या आंबराईंत असा त्यानें मुक्काम केला. ता. १९ ला तुळशीचें लग्न लाविलें. नंतर स्वारी पुन्हां देहूचे मुक्कामास आली. ही सर्व धांदल चालूं असतां मध्यंतरीं बाजीरावास अशी बातमी लागली कीं, सातारचे महाराज इंग्रजांशीं मिलाफी झाले आहेत. ही बातमी ऐकतांच त्याचें धाबें दणाणलें व त्याला तोड काय करावी हेंच त्यास कळेना. सातारचे महाराज म्हणजे आपले खावंद; हेच इंग्रजास मिळणार म्हणजे कारभारच आटोपला ! असें जरी होतें तरी धीर न सोडतां तो सातारकरांना वश करण्याच्या उद्योगास लागला, त्यानें प्रथम माहुलीस जाऊन प्रत्यक्ष सातारकर महाराजांची जातीनें भेट घेतली व आजपर्यंत केलेल्या अपराधांची सपशेल माफी मागितली ! इंग्रजांशीं शेवटचा संग्राम करण्याची आपली इच्छा असून या निर्वाणीच्या युद्धप्रसंगीं महाराजांनीं निखालसपणें मदत करावी म्हणून त्यानें परोपरीनें विनंति केली. या युद्धांत महाराजांनीं मदत केल्यास आपली फत्ते होईल व तसें झाल्यावर महाराजांच्या ताब्यांत सर्व मुलूख व सत्ता देऊन बाजीरावानें एकाद्या सामान्य चाकराप्रमाणें राहण्याचें कबूल केलें. तसें अभिवचनही दिलें. प्रतापसिंह महाराजांनीं ही भेट कसें तरी मोघम बोलून वेळ मारून नेली. बाजीरावाचा मुक्काम माहुलीहून हलतांच महाराजांनीं बळवंतराव चिटणिसास बोलावून घेतलें व झाला वृत्तान्त सांगितला. तसेंच साहेबास आपल्या कामाबद्दल चांगला पक्का बांधून घेण्यास ही वेळ योग्य आहे तेव्हां पुण्यास जाऊन एल्फिन्स्टनशीं या कारस्थानाबद्दल पक्कें व शेवटचें बोलण्यास सांगितलें. बळवंत मल्हार पुणें मुक्कामीं आला व बाळाजीपंत नातूमार्फत त्यानें एल्फिन्स्टनशीं बोलणें सुरू केलें. " तुम्ही आमच्या वचनावर विश्वास ठेवा. आम्ही बोलल्याप्रमाणें वागण्यास कमी करणार नाहीं. आपण अगदीं निष्काळजी असा "–असें गोड भाषेंत नेहमींप्रमाणें एल्फिन्स्टननें सांगितलें. या वेळीं सुद्धां

बळवंत मल्हारानें वेंधळेपणा केला. आणि एल्फिन्स्टजवळ लेखी करार मागितला नाहीं !

पोटांत फितुरीची व स्वार्थाची आग उसळली असल्यामुळें पेशव्यांचें सैन्य टोपीकरांपुढें तग धरीना. त्याचा जागजागीं पराभव होऊं लागला. तेव्हां सरदारमंडळांत कुरकूर सुरू झाली. जो तो रावबाजीच्या नांवानें नाकें मुरडूं लागला. शेवटीं गोखले, निंबाळकर वगैरे सरदारांच्या मतें असें ठरलें कीं, बाजीराव हा नादान असल्यामुळें त्यास पेशवेपदावरून दूर करावें व आपल्या सैन्याचें नेतृत्व प्रतापसिंह महाराजांस द्यावें. त्यांच्या नेतृत्वाखालीं एकदांचा शेवटचा पण चुरशीचा सामना इंग्रजांशीं द्यावा. सरदार मंडळानें मोठ्या उमेदीनें आपलें म्हणणें महाराजांच्या पुढें मांडिलें. पण मराठ्यांच्या दुर्दैवानें महाराजांनीं अत्यंत नामुष्कीचें उत्तर दिलें. मारूं किंवा मरूं या उमेदीनें सेनासागर खडा असतां व शत्रु उरावर दीन दीन म्हणून नाचत असतां त्या क्षत्रियानें,—तो सुद्धां कोणी लुंगासुंगा नव्हे तर ज्यानें मोगल सत्तेचीं पाळेंमुळें मूठभर मावळ्यांच्या जोरावर गदगदां हालविलीं त्या शिवाजी महाराजांच्या वंशांतील एका क्षत्रियानें—असें उत्तर दिलें कीं, ‘ सरदार मंडळींचा आम्हांस नीटसा परिचय नाहीं. तेव्हां त्यांच्यावर विसंबून युद्धास सिद्ध होणें म्हणजे लगाम नसलेल्या घोड्यावर बसण्यासारखें आहे. हें आम्हांस कर्तव्य नाहीं. ’ प्रतापसिंह महाराजांचें उत्तर ऐकून फारच अचंबा वाटतो. कारण जो गृहस्थ सातासमुद्रापलीकडील गोऱ्या साहेबाचें तोंड सुद्धां न पाहतां त्याच्या प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवितो व स्वतःचेच भाईबंद, ‘ बाबारे, तूं आमचा मालक आहेस, तेव्हां आमचा नायक हो ’ असें विनवीत असतां त्यावर त्याचा विश्वास बसूं नये हें तरी केवढें दुर्दैव !

यानंतर बाजीरावानें दुसरी सूचना केली ती अशी कीं, महाराजांनीं त्यांस विश्वासाई वाटतील अशा कोणाही दहा—पांच सरदारांचीं नांवें सुचवावीं व तें सरदारमंडळ आपल्या नेतृत्वाखालीं घ्यावें. तसेंच पंचवीस हजार खडें सैन्य व पैशाची मदत इतकी जय्यत तयारी करून दिल्यानंतरच युद्धास प्रारंभ करावा. या सूचनेस मात्र महाराजांकडून ‘ जरा विचार करून सांगतों ’ असें उत्तर

मिळालें. पेशव्यांकडून आलेल्या या दुसऱ्या निरोपास हें उत्तर धाडल्यानंतर प्रतापसिंह महाराजांनीं बळवंत मल्हार यास बोलावून त्याची सल्ला या प्रकरणीं विचारली.

या वेळीं देशाचें दुर्दैव असें कांहीं ओढवलें होतें कीं, ज्या मंडळींचे वंशचे वंश प्रामाणिकपणा आणि दृढ विश्वास यांच्या उदाहरणांनीं ठांसून भरले आहेत, ती मंडळी आंगचोर व विश्वासघातकी बनली. कारण बळवंत मल्हार चिटणिसाचें घराणें म्हणजे केवढें खानदानीचें व इभ्रतदार ! पण तें सुद्धां स्वार्थाच्या मोहास बळी पडलें. आणि बळवंत मल्हारानें महाराजांस बदसल्ला दिली ती अशी कीं, “ पेशव्यावर विश्वासूं नये, मराठे सरदारमंडळ महाराजांचा विश्वासघात करील व मग पश्चात्तापाची पाळी आल्यावांचून राहणार नाहीं. कारण इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रूशीं गांठ पडली आहे, हेंही पण महाराजांनीं विसरूं नये. शिवाय महाराज इंग्रजांशीं वचनबद्ध झाले आहेत आणि आतां वचनभंग करून लांछन पदरीं घेऊं नये.” बळवंत मल्हाराचें हें सांगणें महाराजांस पटलें पण त्याचा त्यांस संशय आला. त्याबरोबर बळवंत मल्हारानें मोठ्या शिताफीनें चाफळकर महाराजांचा आश्रय घेतला. ‘ या प्रकरणीं हुजुरांनीं श्री सद्‌गुरु चाफळकर स्वामी महाराजांचीही सल्ला घ्यावी ’ असेंही सुचविलें.

प्रतापसिंह महाराजांस युद्धास सिद्ध होण्याच्या प्रकरणीं चाफळकर महाराजांची सल्ला घ्यावयाची आहे असें बाजीरावास कळतांच त्यानें चाफळकर स्वामींस आणविलें. पण चाफळकर स्वामी सुद्धां इंग्रजास मिलाफी असल्या-कारणानें स्वामींनीं प्रतापसिंह महाराजांस या भानगडींत न पडावें अशी सल्ला दिली. अर्थात् प्रतापसिंह महाराजांनीं नकारात्मक उत्तर दिलें.

इकडे या उभयतांची निरोपानिरोपी व बोलाचाली चालली असतां, साताराच प्रतापसिंह महाराज इंग्रजांस मिळणार असा पुकारा मराठ्यांच्या सर्व सैन्यभर झाला. तेव्हां मराठ्यांना लढण्यास त्वेष चढेना. बाजीरावाचें सैन्य ठिकठिकाणीं हार खाऊं लागलें. तेव्हां सैनिकांची खात्री पटविण्यासाठीं बाजीरावानें महाराजांच्या रागालोभाची फारशी पर्वा न करितां त्यांस प्रत्यक्ष समरभूमीवर आणण्या-साठीं म्हणून नारो विष्णु आपटे यास वासोट्यास धाडिलें. या वेळीं नारो विष्णु

आपटे याला महाराजांस व्यवस्थितपणें व काळजी—काटंचानें आणण्याबद्दल सक्तीचीं पत्रें आहेत.

"श्रीमंत राजश्री महाराज व भाऊसाहेब व आपासाहेब व माईसाहेब यांस आम्हाकडे यावयाचा बेत ठरवून आणावयाकरितां रा। नारो विष्णु व विसाजी देवराव यांस पाठविले आहेत. त्यांस माईसाहेब सुद्धां आली असतां जवाहीर व सोनें याज समागमें यावयाचें तें त्याचे मर्जी प्रो। अवघें यावें; व तुमच्याजवळ शिलक आहे ती चाळीस हजार असेल ती स्वारीजवळ आणावी. माईसाहेब व आपासाहेब न आलीं तर कांहीं शिलक तेथें राहावी व पांच-चार हजार रुपये माहाराजा समागमें स्वारींत यावे. महाराजांनीं आणिल्यास व माईसाहेब तेथें राहिल्यास रावोबा जोसी यास तेथें ठेऊन तुम्ही महाराजा समागमें यावें. माईसाहेब सुधा आल्यास तुम्ही व राघोबानें यावें. राणीसाहेब वगैरे तेथें राहिल्यास तुम्ही आपला कारकून ठेवावा. तेथील खर्चाची बेगमी ठेवावी. माईसाहेब तेथें राहून भाऊसाहेब व महाराज आले म्हणजे माईसाहेबाच्या व महाराजांच्या विचारें जवाहीर व सोनें वगैरे जें तेथें ठेवतील तें ठेवावें. जें आणतील तें आणावें जाणिजे."

वरील पत्र वाचल म्हणजे पेशवा महाराजांशीं उद्दामपणें वागत होता, त्याची त्यांच्यावर अगदीं करडी नजर होती असें वाटत नाहीं. पेशव्यामुळें महाराजांच्या प्राणावर बेतली होती असें कांहीं ऐकण्यांत येतें. पण त्यांत तथ्य दिसत नाहीं. त्या पेशव्याच्या हितशत्रूंनीं उठविलेल्या गप्पा असाव्यात.

सातारकर छत्रपतींचें प्रकरण अशा तऱ्हेनें निकालांत काढिल्यानंतर पेशवा पुढील उद्योगास लागण्याच्या विचारांत होता. तों त्यास असें कळलें कीं, ज. स्मिथ साळप्याच्या बाजूनें आपणांस अडविण्यासाठीं येत आहे. तेव्हां माहुली सोडून तो दक्षिणेकडे गेला. ता. २७ नोव्हेंबर रोजीं त्याचा मुक्काम पुसेसावळीस पडला. तेथें दोन दिवस मुक्काम करून ता. २९ नोव्हेंबर रोजीं पहांटेस निपाणकर व पटवर्धन यांजकडील पांच हजार स्वार बरोबर घेऊन पेशवा मिरजेकडे जाण्यास निघाला. मागें इंग्रज सैन्यास अडविण्यासाठीं बापू गोखले, विंचूरकर, घोरपडे यांना ठेविलें. मुख्य सैन्याचा भरणाही पण त्यांचेकडेच

होता. मिरजेहून येडूर, गोकाक पावेतों बाजीराव पोहोंचतो न पोहोंचतो तोंच त्याला असें कळलें कीं, दक्षिणेकडून इंग्रजी फौज आडवी येत आहे. त्याबरोबर त्यानें आपली दिशा बदलली व परत फिरून गलगलें, अथणीवरून पुन्हां माहुलीस येऊन तेथून पूर्वेकडे फलटण, नातेपुतेवरून पंढरपुराकडे आपला मोर्चा वळविला. नाहवीचा घाट चढून हिंगणगांव, कलेढोण, भालवणी, पंढरपूर, गुरसालें, करकंभ, कळासी, गजोरी, जिंती, बाभळगांवावरून पेशव्यांची स्वारी ता. १४ डिसेंबर रोजीं सिद्धटेकास मुक्कामासाठीं आली. तेथें छत्रपतीस घेऊन नारो विष्णु आपटे बाजीरावास मिळाला.

बाजीराव अशा तऱ्हेनें मार्ग आक्रमीत असतां मागें बापू गोखले इंग्रजांच्या पाळतीवर होताच. त्यानें लगोलग जाऊन इंग्रजांस गांठलें व इंग्रजांवर चालून घेतलें. उभयतां सेना घाटापर्यंत आल्या. दुसरे दिवशीं मातबर लढाई झाली. बापू गोखल्याची चिकाटी दांडगी. त्याची लगट सुटेना. पण श्रीमंत पंढरपुराकडे वळल्याचें कळतांच फौजा त्या बाजूस वळल्या. तरी बापू गोखले त्यांचा पिच्छा सोडीना. पुन्हां नाहवीच्या मैदानावर उभय सैन्यें एकमेकांस भिडलीं व चांगली मर्दामर्दी झाली. इंग्रज चांगलाच पेंचकटांत सांपडला. भीमातीरावर कुरी येथें मुक्काम असतां बापू गोखल्यावर पहांटेच्या पांच घटका रात्रीस इंग्रजांनीं छापा घातला. एकदम गर्दी उसळली. तरी धीर न सोडतां बापू गोखल्यानें इंग्रजाची आघाडी पिछाडी रेटींत रेटीत त्यास चांगलेंच सतावून सोडिलें. इकडे बापू गोखले व इंग्रज यांचा असा सामना चालू असतां बाजीराव नगरच्या बाजूस पीरगांवाकडे निघून गेला. तेथेंही इंग्रज पाठीवर आहे असें कळतांच तो संगमनराकडे गेला. बाजीरावानें आरंभिलेली सध्यांची पद्धत म्हणजे गनिमी काव्याचा उत्कृष्ट नमुना होय. आपण केव्हां निघतों, कोठें जातों व कोठें मुक्काम करतों याचा सागमूस सुद्धां शत्रूस लागू न देणें व त्यास आपल्या मागें पळतां पळतां भुई थोडी करून जेर करणें यांत कौशल्य आहे. आणि या वेळीं बाजीरावानें तें पूर्ण दाखविलें. यांत तिळमात्र शंका नाहीं. बाजीरावाच्या या झुकांड्यांस कंटाळून व त्याच्या मागें पळून ज. स्मिथ अगदीं जेर झाला, रडकुंडीस आला व आतां काय करावें हेंच त्यास उमजेना. शेवटीं त्यानें नाशिककडे बाजी-

रावाच्या पाठीवर जाण्याचें सोडून दिलें व शिरूर मुक्कामीं जवळचें अवजड सामान ठेवून दिलें व तो बाजीरावाच्या पाठीवर संगमनेराकडे गेला. पण हा प्रदेश डोंगराळ व अवघड. त्यांतून मजला मारणें म्हणजे महाकर्मकठीण. त्यांतच त्रिंबकजी डेंगळा हा बाजीरावाचा जिगर दोस्त, इंग्रजांस अडविण्यासाठीं म्हणून दबा धरून बसला होता. त्यानें इंग्रज सैन्यास सतावण्यास सुरुवात केली.

आतां बाजीरावानें फार झपाट्यानें अंतर कापण्यास सुरुवात केली. पारगांव, तळेगांव (ढमढेरे), लोणी, पाबळ, नारायणगांव, ओतुरावरून ब्राह्मण-वाड्याचे मुक्कामास स्वारी केली. या ठिकाणीं बापू गोखल्यावर एक मोठी आपत्ति आली. बापू गोखल्याचा मुलगा गोविंदराव बाबा हा एकाएकीं ज्वर येऊन मरण पावला. त्याची बायको अवघी बारा वर्षांची कोंवळी पोर होती. तिला पतिनिधनाचें दुःख असह्य झालें व ती लोकांच्या व वडीलधाऱ्या माणसांच्या सांगण्यास न जुमानतां सती गेली. बापू गोखल्यानें तिनें सती जाऊं नये म्हणून पुष्कळ गळ घातली; पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. या दुःखद गोष्टीनंतर या ठिकाणीं कोणासच करमेना. तेव्हां तेथून मुक्काम हालला व फुलगांव–आपटीस मुक्काम झाला. यानंतर बाजीरावानें आपला मोर्चा नाशीककडे न वळवितां ओझरचा घाट उतरून जुन्नर–खेडावरून ता. ३० डिसेंबर रोजीं चाकण येथें तो दाखल झाला. पूर्वीं बाजीरावाचा बेत असा होता कीं, कोंकणांत घुसून मुंबईकडून येणाऱ्या इंग्रजांच्या फौजेस रोंखून धरावें. किंवा पुण्यावर एकदम अचानक येऊन शहर हस्तगत करावें. या दोन्ही गोष्टी बाजीरावास शक्य होत्या. बाजीरावानें पुण्यानजीक चाकणास येऊन तें जवळ जवळ सिद्ध केलें असेंच म्हणावें लागतें.

१६ नोव्हेंबरपासून ३० डिसेंबरपर्यंतच्या सुमारें दीड महिन्याच्या अवधींत बाजीरावानें केलेल्या हालचाली लष्करी दृष्ट्या फारच महत्त्वाच्या आहेत. पुरंदर, सालप्याचा घाट, माहुली, पुसेसावळी, मिरज, पंढरपूर, पीरगांव, संगमनेर, ओझर, जुन्नर, खेड आणि चाकण इतक्या ठिकाणीं फिरून, एकदां या दिशेला तर एकदां त्या दिशेला, असें करीत करीत व साहेबास झुकपुरी देत देत बाजीराव पुन्हां पुण्यानजीक अवघ्या आठ–दहा कोसांवर येऊन दाखल

झाला. पुणें काबीज करण्याच्या बेतांतच तो होता. पण दुर्दैवानें ती गोष्ट सिद्धीस गेली नाहीं. दीड महिन्याच्या अवकाशांत सुमारें दहा—बारा ठिकाणीं बाजीरावाचे मुक्काम पडले व सुमारें ४०० मैलांच्या प्रवासांत ज. स्मिथसारखा बहाद्दूर सेनानी त्यास एकदां सुद्धां गांठूं शकला नाहीं ही त्यास अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे. हा पाठशिवणीचा खेळ दीड महिना चालू होता. पेशवा पुढें व इंग्रज मागें. पेशवा त्यास झुकांड्या देत होता व इंग्रज त्याचा मागोवा घेत हिंडत होता. पण तसें करतांना साहेबाची पुरी फजिती होत होती. चांदण्या रात्रीं रानांत सांपडलेल्या पांढरपेशा प्रवाशाप्रमाणें त्याची स्थिति होत होती. चांदणें पिठासारखें पडलेलें असावें व अमुक एका ठिकाणीं आपलें राहण्याचें ठिकाण आहे, असा पूर्ण कयास बांधून त्या ठिकाणीं धांवत जावें व पाहावें तों आपण भलत्याच ठिकाणीं आलें आहोंत, अशी खात्री व्हावी व फजीत होण्याचा प्रसंग यावा, तद्वत् ज. स्मिथ हा एकसारखा फजित होत होता. या सर्वांवर मात करणारी अशी अभिमानाची गोष्ट म्हणजे बाजीराव इंग्रजांच्या हातावर तुरी देत देत पुन्हां पुण्यानजीक आला. ही गोष्ट इंग्रजांनीं होऊं द्यावयास नको होती. पण बाजीराव आणि बापू गोखले यांनीं इंग्रजांचें सैन्य पाठीवर असतां त्याला खडे चारून त्यांच्या अटकावास कोणत्याही तऱ्हेनें न जुमानतां घडवून आणिली यांतच त्यांचा लष्करीदृष्ट्या फार मोठा विजय होता.

मेलें कोंबडें आगीला भीत नाहीं म्हणतात, तेंच खरें. पण बाजीरावाचें जागृत झालेलें शौर्य आणि राघोभरारीला शोभतीलशा त्यानें महाराष्ट्रभर मारलेल्या भराऱ्या यांचा आतां कोणत्याही प्रकारें उपयोग नव्हता. बैल गेला आणि झोपा केला अशी त्याची स्थिति झाली होती. वसईस जाण्यापूर्वीं त्यानें हें करावयास पाहिजे होतें. निदान पुणें सोडण्यापूर्वीं त्यानें हें धैर्य आणि कौशल्य दाखवावयास हवें होतें. म्हणजे त्याचा कांहींतरी उपयोग झाला असता. पण आतां पेशवा पुण्यपुरीहून परागंदा झाला होता. कुडींतून बाहेर पडलेला प्राण पुन्हां कुडींत जाणें शक्य आहे काय? बाजीरावाची आतांची धडपड म्हणजे समुद्राच्या वाळवंटांवर ओढून काढलेल्या अजस्र देवमाशाप्रमाणें झाली होती. त्याची तडफड चालू होती, पण तिचा कांहीं एक उपयोग

नव्हता. कारण मराठ्यांच्या सामर्थ्यसागराची भरती संपून त्यास ओहटी लागली होती!

या वेळीं बाजीराव आपली सर्व व्यवस्था कशी ठेवीत असे याचें मोठें मार्मिक वर्णन ज. स्मिथ यानें ज. डोव्हस्टन यास लिहिलेल्या एका पत्रांत आहे. तो म्हणतो, " एखाद्या गांवांत बाजीरावसाहेबाचा मुक्काम पडला म्हणजे तो तेथील पाटील वगैरे लोकांस बोलावून आणीत असे. आणि ज्या दिशेला जावयाचें नसेल त्या दिशेची चोकशी करीत असे. तेथील आडवाटा, चोरवाटा, घाट व रानें यांची तो बारकाईनें चौकशी करी व त्या ठिकाणासंबंधीं ऐसपैस गप्पा मारी. आणि मुक्काम हालवावयाचा झाला म्हणजे निराळ्याच कोणत्या तरी मार्गानें व कोणत्या तरी दिशेला निघून जाई! मात्र असें करतांना बाजीरावसाहेब इंग्लिशांना फसविण्यासाठीं आणखी एका गोष्टीचा अवलंब करीत असे. त्याच्या सैन्यांतील लोक कूच करण्याकरतां निघाले म्हणजे त्यांच्या निरनिराळ्या तुकड्या करून त्यांना निरनिराळ्या दिशेनें धाडण्यांत येत असे. सर्वांनीं शेवटीं एकाच ठिकाणीं जमावयाचें असें ठरलेलें असे. अशी टोळ्याटोळ्यांनीं घोडदौड चालण्याचा उपयोग शत्रूला बुचकळ्यांत पाडण्यासाठीं म्हणून चांगलाच होत असे. याशिवाय नक्की मुक्काम कोठें व्हावयाचा हें खुद्द बाजीरावाशिवाय त्यांच्या सैन्यांतील कोणासही ठाऊक नसे. बाजीरावसाहेब निघाले कीं, त्यांच्यामागें लष्कर निघावयाचें. त्या वेळीं व्यवस्था अशी असेः स्वारीचें सामानसुमान पुढें चालावयाचें. त्याच्यामागून हत्तीवर घातलेला खजिना चालावयाचा. त्या हत्तीच्या संरक्षणाकरितां कित्येक घोडेस्वार त्याच्या भोंवतीं चालावयाचे. त्याच्या पाठीमागें खुद्द बाजीरावसाहेब आणि त्यांच्या पाठीमागें निवडक, खास पायदळांतील कांहीं लोक. नंतर निपाणकर वगैरे सरदारांचे घोडेस्वार, आणि त्यांच्या पाठीमागें पिछाडीचें संरक्षण करण्याकरितां बापू गोखले व त्याचें लष्कर चालावयाचें. इंग्रजांचा हल्ला आलाच तर पेशवा दूरवर कोठें जाईपर्यंत शत्रूला रोखून धरण्याचें काम पिछाडीचें लष्कर करीत असे. नंतर तें कोठल्या तरी दिशेनें निघून जाई व पुन्हां पेशव्यास येऊन मिळे."

इंग्रजांना झुकांड्या देत देत बाजीरावानें दीड महिन्याच्या अवधींत ४०० मैलांचें रान कापलें व पुण्यापासून आठ–नऊ कोसांच्या अंतरावर चाकण येथें ता. ३० डिसेंबर रोजीं मुक्काम केला. श्रीमंतांची स्वारी इतक्या नजीक आल्याची बातमी कळतांच पुण्यांतील स्वाभिमानी लोकांचा आनंद गगनांत मावेना. आपला गेलेला धनी पुन्हां माघारीं येणार, हरपलेलें स्वातंत्र्य पुन्हा हातास लागणार, असा योग दिसतांच लोकांचे चेहेरे आनंदानें खुलूं लागले. जो तो, ‘ भले बहादूर बाजीरावसाहेब ’ व ‘भले बहादूर बापू गोखले’ म्हणून धन्योद्गार काढूं लागला; पण देशद्रोही व घरबुडव्या लोकांचें धाबें दणाणून गेलें. बाजीरावसाहेब माघारीं आल्यास आपल्या घरादारावरून नांगर फिरणार अशी त्यांस भीति वाटूं लागली. या वेळीं पुण्याच्या बंदोबस्ताचें काम क. बर यांजकडे होतें. तोही पण घाबरला. पेशवे पुण्यावर चालून आले तर त्याला तोंड देण्यासारखी त्याची परिस्थिति नव्हती. त्यांचें सैन्य फार अपुरें होतें. ज. स्मिथ पेशव्याच्या पाठीवर आहे एवढेंच क. बर यास माहीत होतें, पण तो कोठें आहे, किती अंतरावर आहे, पेशवा पुण्यावर आल्यास त्याचा आपणांस कितपत उपयोग होईल, याची कांहींच कल्पना त्यास येईना. अशा तऱ्हेनें क. बर याला फार मोठा पेंच पडला.

पुण्यावर पेशव्यांची चढाई झाल्यास आपणास कांहीं तरी हालचाल करितां यावी म्हणून क. बरनें शिरूर येथें असलेली नेटिव्ह पायदळाची एक पलटण आपल्या मदतीसाठीं म्हणून तातडतोब बोलाविली. क. बरचा निरोप पोहोचतांच बाँबे नेटिव्ह इन्फन्ट्रीपैकीं दुसरी बटॅलियन, दोन तोफा आणि अडीचशें घोडेस्वार इतकें सैन्य बरोबर घेऊन कॅ. स्टॉंटन हा ता. ३१ डिसेंबर १८१७ ला रात्रीं आठ वाजतां शिरूरहून निघाला. आणि सत्तावीस मैलांची मजल करून ता. १ जानेवारी १८१८ ला कोरेगांवनजीक एका टेकडीवर येऊन दाखल झाला. पण टेंकडीवर टेहेळतो तों त्यास भीमा नदीच्या उजव्या कांठानें पेशव्यांचें अफाट सैन्य पसरलेलें दिसलें, तेव्हां तो घाबरला व पेशव्याच्या सैन्यापुढें उघड्या मैदानांत आपला निभाव लागणार नाहीं, म्हणून लगेच झटदिशीं माघार खाऊन त्यानें कोरेगांवच्या तटबंदींत आपलें सैन्य नेऊन

घालण्याचा प्रयत्न चालविला. अशा तऱ्हेनें आलेल्या प्रसंगांतून निभावून निघण्याचें त्यानें ठरविलें. पण ही गोष्ट सेनापति बापू गोखले यांच्या लक्षांत आली व त्यांनीं आपला मोर्चा कॅ. स्टॉटनच्या सैन्यावर वळवून त्याला कोरेगांवच्या तटबंदींतून हुसकून देण्याचें ठरविलें.

इंग्रजांच्या सैन्याला रात्रभर चाल करावी लागल्याकारणानें तें अगदीं थकून गेलें होतें व त्याला विश्रांतीची जरूर होती. पण तसें न होतां पेशव्यांच्या हल्ल्यास तोंड देण्याची त्याच्यावर पाळी आली. या वेळीं पेशव्यांचें सैन्य इंग्रज इतिहासकाराच्या अदमासाप्रमाणें वीस हजार घोडेस्वार आणि आठ हजार पायदळ इतकें होतें. आणि बाजीरावानें बापू गोखल्यास आज्ञा केली कीं, आज लढाई करून आम्हांस पुढें जाण्यास मार्ग करून द्यावा. त्याप्रमाणें श्रीमंतांची आज्ञा घेऊन पेशव्याचें सैन्य इंग्लिशांना हटविण्याकरतां कोरेगांवांत शिरलें. ता. १ जानेवारी १८१८ रोजीं दुपारीं कोरेगांवांत एकच गर्दी उसळली. इंग्रजांचे घोडेस्वार, पायदळ, सामान—सुमानाचे बैल आणि बाजारबुणगे लोक यांनीं गांवांत शिरून आधींच गर्दी करून सोडली होती. त्यांच्यावर हल्ला करण्याकरतां पेशव्यांचे लोकही दुसऱ्या बाजूनें शिरले. पेशव्यांच्या सैन्याचा मार्ग रोंखण्याकरितां म्हणून इंग्रजांनीं त्यांच्याजवळील दोन तोफा भीमेच्या पायउताराच्या वाटेवर रोंखल्या होत्या पण पेशव्यांचें सैन्य दुसऱ्याच बाजूनें आंत घुसल्याकारणानें त्यांचा कांहींच उपयोग होईना; तेव्हां त्या तटबंदीच्या आंत आणून माऱ्याच्या जागीं ठेविल्या.

कोरेगांवच्या लहानशा तटबंदींत इंग्रजांचें सैन्य इतकें ठांसून भरलें होतें कीं, त्याला आजूबाजूला हिंडण्यास वावच मिळेना. आणि मराठ्यांच्या माऱ्याच्या भीतीनें तें इतकें गांगरून गेलें होतें कीं, काय करावें हें त्यास सुचेना. अशा स्थितींत त्याच्या हातून लढण्याचें काम होईना. अशा पेंचकटांत सांपडलेल्या या सैन्यावर पेशव्यांच्या एकेक हजारांच्या अरबांच्या तीन तुकड्यांनीं हल्ला केला. या ठिकाणीं बंदुकी आणि तोफा यांच्या साहाय्यानें युद्ध करणें शक्यच नव्हतें. त्यांतून इंग्रजांच्या दोन तोफांनीं मारा चालविला होता, पण त्यांच्या त्या दोन तोफांपैकीं एक तोफ पेशव्यांच्या सैन्यानें हल्ला करून

काबीज केली. त्या तोफेवरील मुख्य अधिकारी चिशोल्म यास ठार मारण्यांत आलें. पेशव्यांच्या लोकांना या वेळीं इतका रणमद चढला होता कीं, त्यांनीं त्या भरांत चिशोल्म यांचें शिर कापून तें पेशव्यांकडे विजयचिन्ह म्हणून धाडिलें. या लढाईंत इंग्रजांचे बरेच अधिकारी जखमी झाले, व कांहींना प्राणास मुकावें लागलें. ही लढाई संगिनी–तलवारींचीच झाली. इंग्रज शिकस्त झाले. हें युद्ध रात्रीं नऊपर्यंत चालून पेशव्यांचें सैन्य आपल्या छावणीकडे परतलें. या लढाईंत इंग्रजाचे ८०० पैकीं २७५ लोक मारले गेले. अशा तऱ्हेनें इंग्रजांचा बराच खराबा झाला. या ठिकाणीं इंग्रजांनीं एक जयस्तंभ उभारला आहे; त्याचा अर्थ इतकाच कीं, पेशव्यांच्या अवाढव्य सैन्यापुढें या लोकांनी टिकाव धरला. कोरेगांवला पराजित पावलेल्या कॅ. स्टॉन्टनला पुण्याहून क. बर-कडून मदत येण्याची आशा नव्हतीच व त्यांतून सुद्धां पेशव्यांचे सैन्याचा तळ लोणीकंद येथें पडला असल्यामुळें क. बर यास तसें करणेंच शक्य नव्हतें. ज. स्मिथचें सैन्य संगमनेराहून पेशव्यांचा पाठलाग करीत निघालें. पण तें ओझरच्या घाटांत येतांच त्रिंबकजी डेंगळ्याच्या तावडींत सांपडलें. त्यानें त्यास सतावून सोडलें. त्या डोंगरांतून येतां येतां ज. स्मिथचे बरेच दिवस मोडले. १ जानेवारीला कोरेगांवास इंग्रजांनीं मार खाल्ला व २ जानेवारीस ज. स्मिथचें कांहीं लष्कर–फोर्थ डिव्हिजन–जेमतेम चाकणास आलें. पण आतां त्याच्या येण्याचा कांहींच उपयोग नव्हता. तेव्हां कॅ. स्टॅांटन हा आपले जखमी लोक घेऊन आल्या वाटेनें शिरूरास निघून गेला. अशा तऱ्हेनें कोरेगांवचें हें युद्ध संपलें.

भगव्या झेंड्याची विटंबना : १३

कोरेगांवच्या लढाईंत इंग्रजांचा पराभव केल्यानंतर पेशव्यांच्या फौजेपैकीं दहा–पांच हजार फौज बरोबर घेऊन नारो विष्णु आपटे वाघोलीपावेतों आले. ही बातमी पुण्यास कळतांच इंग्रजांची हबेलंडी उडाली व त्यांनीं पुणें सोडून जाण्याची तयारी केली. पण तसा प्रसंग टोपीकरांच्या सुदैवानें आला नाहीं. पुण्यापासून वाघोली दोन–तीन कोसांवरच आहे. तेव्हां कोरेगांवास विजयी झालेलें मराठ्यांचें लष्कर नजीक आल्याचें कळतांच इंग्रजांनीं पुणें सोडण्याचा विचार करावा हें अगदीं साहजिक आहे, पण त्यांच्यावर तसा प्रत्यक्ष प्रसंग आला नाहीं; याचें कारण असें झालें कीं, पेशव्यांचें मुख्य सैन्य कोरेगांवाहून राजेवाडीच्या मुक्कामाकडे गेलें. तेथून पेशव्यांनीं आपला मोर्चा सातार्‍याकडे वळविला. त्याबरोबर पुण्यांतील इंग्रज निर्धास्त झाले. अगदीं पुण्याजवळ तीन–चार कोसांवर आलेला बाजीराव, पुणें हस्तगत करण्यासारखी परिस्थिति असतांना सातार्‍याकडे कां गेला याचा मोठा अचंबा वाटतो. पण पेशव्यास नुसतें पुणें सर करून समाधान नव्हतें. त्याला इंग्रजांशीं एकदां शेवटचा व निर्णायक मुकाबला द्यावयाचा होता. शिंदे, होळकर व नागपूरकर भोंसले यांवर बाजीरावाची मोठी भिस्त होती. गोदावरीपलीकडील या सरदारांच्या फौजा दाखल झाल्या म्हणजे त्यांत सामील व्हावें व मग इंग्रजांशीं सामना

द्यावा असा त्यांचा मानस होता व तसा मोका येईपर्यंत इंग्रजांस झुकांड्या देत दिवस काढावेत असें त्यानें ठरविलें होतें. पण झालें मात्र निराळेंच !

रावबाजीच्या एकंदर धोरणाचा पल्ला पाहिला म्हणजे तो अगदीं नादान आणि नालायक होता असें म्हणवत नाहीं. पण बिचाऱ्याच्या नशिबीं अपयश आल्यामुळें कोणीही उठावें आणि वाटेल तसें बेजबाबदारपणें बडबडत सुटावें असें झालें आहे. अपयश हाच जणूं अक्षम्य अपराध आहे ! त्यानें आंखलेलीं धोरणें आणि चालविलेली तयारी पूर्णपणें रंगारूपास येण्याचया अगोदरच त्यानें लढाईस सुरुवात केली व ती राजधानीशेजारीं केली, ही मात्र त्याच्या हातून फारच मोठी व अक्षम्य अशी चूक झाली. त्यानंतर इंग्रजास पुरा मोडून काढावा, काढूं नये असें द्विधा मन हें तर त्याला अधिकच घातुक झालें. लढाईंत ठांसून उभें राहणें हें तर त्याला शेवटपर्यंत न साधल्यानें त्याचा पूर्णपणें नायनाट झाला.

पेशव्यांच्या फौजा कोरेगांवापासून राजेवाडीपर्यंत गेल्या. या ठिकाणीं पेशव्यांच्या सैन्याच्या दोन टोळ्या करण्यांत आल्या. एक तोफखाना व पायदळ घेऊन बागलकोटावरून निपाणीच्या मैदानांत लढाई द्यावी अशा बेतानें गेली. आणि दुसरी एल्फिन्स्टन चालून येत आहे अशी बातमी होती म्हणून त्याची आघाडी–पिछाडी मारण्यासाठीं कवठ्यापर्यंत चालून गेली. तेथें अपेक्षेप्रमाणें एल्फिन्स्टनची व ह्या सैन्याची झटापट झाली. त्यांतून तो निसटला व साताऱ्याच्या रोखानें जाऊं लागला. एल्फिन्स्टनची व ज. स्मिथची गांठ रहिमतपुरास पडली. तेथून दोघे बोरगांव येथें गेले. ज. स्मिथ व एल्फिन्स्टन आपणांवर चालून येत आहेत अशी बातमी लागतांच बाजीरावानें आपली चाल बदलली; तो फलटणकडे वळला. ही बातमी ज. स्मिथला कळतांच तो बाजीरावावर चालून घेण्यासाठीं नांदगिरीपर्यंत गेला. पण तेथें त्याला बापू गोखल्यानें दोन प्रहरपर्यंत अडवून धरलें. त्यामुळें बाजीरावास पळून जाण्यास पूर्ण अवसर मिळाला. त्याच्यामागें पळण्याचा ज. स्मिथ व एल्फिन्स्टन या दोघांनाही कंटाळा आला होता. तसेंच त्याचा पाठलाग करण्यांत फारसें हंशीलही नव्हतें. पुण्याप्रमाणेंच

मराठ्यांचें दुसरें राजधानीचें ठिकाण जें सातारा तें सर करून मुलुखांत ग्वाही फिरवावी व कंपनी सरकारचा राज्यकारभार चालू करावा असें दोघांनीं ठरविलें. सातारा हस्तगत करण्यासाठीं म्हणून एल्फिन्स्टन साताऱ्याकडे गेला आणि ज. स्मिथ बाजीरावाचा पाठलाग करण्यासाठीं म्हणून त्याच्या मागें निघाला.

इ. स. १८१० पासून सातारकर छत्रपतींशीं आरंभिलेल्या कपट कारस्थानांचीं सूत्रें पुढें हालविण्यासाठीं म्हणून एल्फिन्स्टनची स्वारी साताऱ्यास दाखल झाली. आतां सुद्धां त्याच्याबरोबर बाळाजीपंत नातू होताच. साताऱ्यास येतांच त्यांनीं दोघांनीं सातारकर छत्रपतींच्या प्रमुख सरदारांचा एक दरबार भरविला. त्यांत विठ्ठलपंत फडणवीस, खंडेरावराजे शिर्के वगैरे सरदार हजर होते. त्यांच्याशीं त्यांनीं खलबतें सुरू केलीं. त्यांना हरतऱ्हेच्या थापा मारून त्यांच्या शंका–कुशंकांचें निरसन केलें. यानंतर बाजीरावाच्या हेऱ्यांतून प्रतापसिंह महाराजांस माघारीं बोलविण्याबद्दल तांतडीची विनंति करण्यांत आली. 'महाराजांनीं बाजीरावास सोडिल्याशिवाय आम्हांस त्याचा निकडीनें पाठलाग करतां येत नाहीं. सबब त्यांना माघारीं बोलवावें म्हणजे एकट्या बाजीरावास नामोहरम करण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. बाजीरावाचा नायनाट झाला कीं, त्याच्या ताब्यांतील महाराजांचें राज्य त्यांचें त्यांना देऊन टाकण्यास बरें पडेल. अशा तऱ्हेनें फार दिवस माजलेलें हें पेशव्यांचें बंड कायमचें निकालांत काढितां येईल. गेलीं पांच–सहा वर्षें तुम्हांस देत असलेल्या अभिवचनांतून आम्हीही एकदांचे मोकळे होऊं. बाजीरावाची बाजू सोडून साताऱ्यास माघारीं येणें प्रतापसिंह महाराजांस जमत नसेल तर महाराजांनीं आमच्या सैन्यांत येऊन दाखल व्हावें. हें करणें महाराजांस सोपें जाईल असें आम्हांस वाटतें. तेव्हां हें आमचें म्हणणें आपणांस पसंत असेल तर फारच छान. या गोष्टीस आपला होकार मिळाला कीं, लगेच आम्हीं तसें आमच्या सेनापतीस कळवितों. आपणही महाराजांस तसा निरोप धाडावा.'—हें शेवटचें एल्फिन्स्टनचें सांगणें सातारकर मंडळींस पटलें. व महाराजांनीं इंग्रजांच्या सैन्यांत येऊन दाखल होण्याचें ठरलें. अशी मसलत ठरल्यानंतर प्रमुख सरदारमंडळींचा पोशाख व महावस्त्रें देऊन एल्फिन्स्टननें

सन्मान केला. हा दरबार संपला आणि एल्फिन्स्टन व बाळाजीपंत नातू पुण्यास जाण्यासाठीं निघाले.

विठ्ठलपंत फडणविसानें नरसू काकडे याबरोबर महाराजांस निरोप धाडिला. नरसू काकड्यानें महाराजांस सोलापूर येथें गांठलें. महाराजांबरोबर बलवंत मल्हार हा होताच. नरसू काकड्यानें उभयतांची गांठ घेऊन विठ्ठलपंत फडणविसाचा निरोप सांगितला. लगेच बळवंत मल्हार चिटणिसानें जनरल स्मिथला आपलें कारस्थान कळविलें व असेंही सुचविलें कीं, बाजीरावाच्या सैन्यावर हल्ले दिवसाचेच करावे. कारण तसें केल्यानें महाराजांनीं इंग्रजांस किंवा इंग्रजांनीं महाराजांस केलेले सांकेतिक संदेश स्पष्टपणें कळण्यास बरें पडेल. बळवंत मल्हारची ही सूचना ज. स्मिथला पसंत पडली व तसें करण्याचें ठरलें. महाराजांचा हा निरोप जनरल स्मिथला ‘अकलूज’ येथें कळला.

यानंतर ज. स्मिथला अवसान चढलें. त्यानें तीन दिवस दम धरून आलेल्या सैन्याची नीट पाहाणी केली व मराठ्यांवर जोरानें हल्ले करण्यास सुरुवात केली. फितुरीच्या भुंग्यानें मराठ्यांची शक्ति अगदीं पोखरून ठिसूळ झाली होती. तिला फारशा तडाख्यांची जरूरीच नव्हती. फक्त एकच पण जोराचा तडाखा पुरा होता व तो देण्याचा कृतनिश्चय स्मिथनें केला.

बाजीरावानें सातार्‍याचा रोख सोडून सोलापूरच्या बाजूला आपला मोर्चा वळविला. बाजीरावास सोलापूर मुक्कामीं आप्पासाहेब भोसले नागपूरकर यांचा सरदार गणपतराव सुभेदार हा मिळाला. त्रिंबाजी देवराव पाच्छापूरकर देशपांड्यास सोलापूरचा बंदोबस्त सांगून बाजीराव परिंड्याच्या रोखानें अष्टीजवळ मुक्कामास आला. पूर्वीं निपाणीचे बाजूस लढाई देण्याचा बापू गोखले यांचा बेत होता तो बदलून आतां सोलापूरच्या बाजूस लढाई देण्याचा बेत ठरला. आतां बाजीरावाची स्थिति फारच केविलवाणी झाली होती. राजधानी अन्तरली. जोराची अशी लढाई कोठेंच झाली नाहीं. शिंदे व होळकर यांची मदत येईना व ती आल्याशिवाय जोराचा व शेवटचा निकाली सामना देण्यासाठीं उभें राहावें

असें त्यास वाटेना. तसेंच त्याच्या सरदारांची व लष्कराचीही फारच दुर्दशा झाली. तीन तीन महिने सारखी पळापळ चालली होती. त्यामुळें मराठी फौजा कंटाळून गेल्या. पानशांचा तोफखाना व पटवर्धन मंडळी बाजीरावाचे संरक्षणास धांवून गेली. गोसाव्यांची व अरबांची पलटणही तयार होती. पण बाजीरावाचा ठाम निश्चय होईना व त्याचा पाय कोठें ठरेना. ता. १९ फेब्रुवारी १८१८ ला रात्रीं तो गोपाळ अष्टीवर मुक्कामास आला असतां त्याच्या पाठीवर ज. स्मिथची फौज दोन–तीन कोसांवर वेळापुरास येऊन दाखल झाल्याची बातमी आली.

बापू गोखले, त्याचें कुटुंब यमुनाबाई, सातारकर मंडळी बाजीरावाजवळ होती. सकाळीं लवकरच भोजन उरकून पुढें निघण्याचा बाजीरावाचा बेत होता. पण इंग्रज इतका जवळ आल्याकारणानें बाजीरावानें आतां वेळ न गमावतां रातोरात कूच करावें असें बापू गोखल्याच्या मनांत होतें; पण निपाणकर देसाई सरलष्कर यांनीं दुसरे दिवशीं पौर्णिमेचें स्नान व भोजन करून जावें असा आग्रह केला आणि तोंपर्यंत हल्ला आल्यास आपण जातीनें रक्षण करूं असें सांगितलें. सरलष्करांचें हें म्हणणें बाजीरावास मानवलें. ही बातमी बापू गोखले यास कळताच तो चिंताग्रस्त झाला. त्याला या संकटांतून श्रीमंतांसुद्धां कसें पार पडावें हेंच कळेना. शत्रूची फळी फोडणारा बापू गोखल्यासारखा बहादुर सेनानी, पण त्याची सुद्धां एकोपा नसल्यानें व धनी अस्थिरबुद्धि असल्यानें गेले तीन महिने नुस्ती कुतरओढ चालली होती. शत्रूशीं जोराची झुंज घेतांना जरा अवसान चढावें, कोठें यशाची आशा दिसूं लागावी, तों ऐन रंगांत लढाई टाकून मालकानें माघारीं फिरावें, असा प्रकार घडे. हाताखालील सरदारमंडळी बापू गोखल्याचें नीटसें ऐकत तर नव्हतीच पण श्रीमंतांस बदसल्ला मात्र देत होती. तेव्हां अगदीं चिडून जाऊन आपल्यामागें लढाईचें कांहींही होवो असा विचार करून इंग्रजांशीं सामना देण्याचा कृतनिश्चय बापू गोखल्यांनें केला. बापू गोखल्याच्या कयासाप्रमाणें सूर्योदयीं श्रीमंत भोजनास बसले असतां शत्रूचा हल्ला आला. गोखल्यांनीं सरलष्करास बोलावणें पाठविलें व आपण श्रीमंतांकडे जाऊन छापा आल्याचें सांगितलें. मध्यरात्रीं कूच करण्याचा बेत निपाणकर सरलष्कराच्या सल्ल्यानें आपण रहित

केला; न जेवतां जावें तर अधीर व बेसावध म्हणतील, या विचारानें श्रीमंत त्रस्त झाले व कठोरपणें बोलले कीं, "आजपर्यंत तुम्ही लढाईची मसलत दिलीत आणि आतां आम्हांस जेवणाखाणाची देखील हरकत येते. असेंच तुम्ही आमचें संरक्षण करणार कीं काय?" आधींच त्रस्त झालेल्या बापू गोखल्यास श्रीमंतांच्या या उद्गारानें अधिकच राग आला. त्याच्या मनानें कृतनिश्चय केला व लगेच उत्तर दिलें कीं, "आपला हुकूम असो वा नसो मी आज लढाई देणार." इतकें बोलून गोटांत येऊन एकटाच इंग्रजांचे सामन्यास निघून गेला.

'सरदार मंडळींचें चित्त शुद्ध नव्हतें. कोणीहि सरकार कामास झटत नव्हता. आणि श्रीमंत आपल्या एकट्यालाच दोष देतात, यामुळें संताप होऊन मी रणमुख होणार, मागें काय पाहिजे तें होवो. असें अलीकडे गोखले बोलतच होते. आज रण सिद्धच आहे. सेवकजनांवर स्वामींचें चित्त असें विटल्यावर रणांगणीं स्वामिकार्यावर आल्यानें बहुमानच आहे. या उपरीं चरणदर्शन होईल तर उत्तम, नाहींपेक्षां हेंच शेवटचें असें बोलून नमस्कार करून इंग्रजाचे सन्मुख जाऊन उभे राहिले. पाठपुराव्यास आप्पासाहेब निपाणकर गेले नाहींत. इंग्रज चालून येतांच मुधोळकर, गोविंदराव घोरपडे व बहिरजी शितोळे गोखल्यांचे फौजेंतून त्यांजवर चालून गेले. त्यांजबरोबर गोखलेहि शिरून मारीत चालले. तेव्हां इंग्रजाची पहिली तुकडी माघारीं हटली. हें पाहून दुसऱ्या तुकडीनें गोखल्यांवर चाल केली. गोखले यास गोळी लागली. घोडा मोकळा झाला. गोखले गर्दींत मिसळून घाडक्यांच्या टापाखालीं तुडविले गेले.'

सेनापति नाहींसा होतांच मराठ्यांचें सैन्य चिडून इंग्रजांवर तुटून पडलें. योद्धे एकमेकांस भिडले. वीरश्रीचा संचार झाला. तोफांची सरबत्ती, टापांचा थयथयाट आणि तरवारींच्या खणखणाट यानें सर्व समरांगण निनादित झालें. गगन कोसळून खालीं पडतें कीं काय असें वाटलें. धुराच्या अलोट लोटांनीं आकाश कोंडून टाकलें. उभय सैन्यें मरे मरेतों लढलीं. रणचंडीनें उग्र स्वरूप धारण केलें. अशा वेळीं पंचप्राणांची तमा न करितां पेशव्यांचें सैन्य निकराच्या हालचाली करीत होतें. त्यास अपयशाचे रट्टे वारंवार बसत होते. आणि विविक्षित तऱ्हेची

पळापळ चालू होती ! अशा स्थितींत प्रतापसिंह महाराज, त्यांचा भाऊ अप्पा- साहेब व मातोश्री माईसाहेब आणि बळवंत मल्हार चिटणीस हे आपल्या निवडक चाकरमंडळींसह मागें मागें रेंगाळूं लागले. ही गोष्ट बाजीरावाच्या लक्षांत येतांच त्यानें सरदार शामराव रास्ते यांजबरोबर महाराजांस जलदी करण्याबद्दल निरोप धाडिला. त्यासरशीं बळवंत मल्हारनें, 'आम्ही घोडे भरधांव फेंकीतच आहों; यापेक्षां जलद तरी किती जाणार?' असें उत्तर दिलें. ही त्यांची बोलाचाली चालली होती तोंच इंग्रजांचा पुन्हां हल्ला त्यांच्यावरच आला. त्याबरोबर कत्तल झाली. बरींच माणसें कामास आलीं. या धामधुमींत एक गोळी जी सणकत आली ती महाराजांसच लागणार होती; पण दैवानें खैर केली. गोळी रिकीब फोडून पार झाली. पुन्हां पळापळ झाली. मोठी गर्दी उसळली. धुराळ्यानें आकाश–जमीन एक झालीं. कोणी कोणास ओळखेना. अशी अवस्था होतांच प्रतापसिंह महाराजांस बळवंत मल्हारनें सुचविलें कीं, ही संधी इंग्रजांस मिळण्यास फार चांगली आहे. तेव्हां आपण थोडें थांबूं या. त्याबरोबर प्रतापसिंह महाराज, अप्पासाहेब व माईसाहेब व त्यांचे विश्वासू व निवडक सरदारमंडळ थांबलें !

सभोंवारच्या रणभूमीवर चाललेलें कलिकालाचें तांडवनृत्य पाहून प्रताप- सिंह महाराज व त्यांची मंडळी घाबरली. महाराज बळवंत मल्हारास म्हणाले कीं, इंग्रजांनीं सर्व बाजूंनीं आपणांस वेढलें आहे. त्यानें सैतानी कत्तल चालविली आहे. तेव्हां आतां आपण जिवंत सुद्धां असें वाटत नाहीं. हें बोलणें ऐकतांच महाराजांच्या मातोश्री माईसाहेब जवळ होत्या त्या म्हणाल्या,

"प्रतापसिंहा, तूं क्षत्रियाचा बच्चा आहेस. कलिकालानें तुम्हांवर झडप घातली तर त्याची मला पर्वा नाहीं. पण प्राणापेक्षां अब्रूची किंमत मला जास्त आहे. तेव्हां हातांत तळपत असलेल्या समशेरीनें माझी गर्दन मार. तुला हें केलेंच पाहिजे. यांत मातृहत्येचें पातक लागणार नाहीं. कारण तें क्षात्रियाचें पवित्र कर्तव्य आहे. हें कर व मग आपल्या मार्गाला लाग." महाराज आतां माईसाहेबांवर वार करणार तोंच अप्पासाहेबांनीं त्यांस अडविलें व ते म्हणूं लागले, "महाराज, अजून तशी वेळ आली नाहीं.

: जरा सबूर. तसा कठीण प्रसंग येतांच हें कृत्य करण्यास कितीसा वेळ
: लागेल ? "

हा सर्व प्रकार बळवंत मल्हारनें आपल्या घोड्यावरून पाहिला व त्यानें लगेच खालीं उडी टाकली आणि महाराजांच्या हातांतील समशेर त्यानें फेंकून दिली. जणूं याच वेळीं क्षात्रियांनीं शस्त्रसंन्यास केला व हिंदुस्थानाचें नष्टश्चर्य ओढवलें ! लगेच बळवंत मल्हार ब्रिटिश सैन्याकडे पळत सुटला. त्याची ती धांदल पाहून इंग्रजास संशय आला व आतां बळवंत मल्हारावर तो गोळी रोंखणार तोंच हें उमजून बळवंत मल्हारनें सावकाशपणें चालण्यास सुरुवात केली. हौद्यांत बसून टोपीकर चालला होता. त्याच्या शेजारीं जाऊन बळवंत मल्हार मोठ्यानें ओरडला कीं, 'सातारचे महाराज आले.' खंडोजी शिंदे नांवाच्या हुजऱ्यानेंही महाराजांच्या सांगण्यावरून ते आल्याचा मोठ्यानें पुकारा केला. त्याबरोबर साहेबांनीं महाराज आल्याबद्दलची खात्री करून घेतली व लगेच एका टोपीकरानें आपल्या अंगाभोंवतीं तलवार फिरवून खूण केली. त्यासरशीं इंग्रजांनीं लढाई बंद केली. महाराजांच्या डोक्यावर इंग्रजांनीं टोळांच्या छायेप्रमाणें समशेरींची छाया केली. अशा तऱ्हेनें इंग्रजांच्या टोळधाडींत महाराज सांपडले. पण महाराजांस मात्र स्वर्ग हातीं आलासें झालें व तें एका अर्थानें खरेंही होतें !

या घटनेनें मात्र साहेबाचा आनंद गगनांत मावेना. कारण बाजीराव पळाला व सातारकर छत्रपति हातास लागला. त्याबरोबर मराठ्यांचें राज्य कंपनी सरकारच्या घशांत उतरलें. आतां कंपनी सरकारच्या प्रतिनिधींनीं सातारकर छत्रपतीचा जयजयकार केला. 'पुंड पेशवा पळाला. सातारकर छत्रपतींचा जय झाला' अशा आरोळ्या गोपाळ अष्ट्याच्या रणमैदानावर दुमदुमल्या. पण जग म्हणाले, 'मराठ्याचें राज्य संपलें. कंपनी सरकार सर झालें. यानंतर इंग्रजी सैन्यांतील मेजर होव्हटन हा महाराजांजवळ गेला व त्यानें त्यांस विचारलें, "छत्रपति आपणच का ?" त्यावर छत्रपतींनीं हास्य केलें व त्यास एक शाल बक्षिस दिली. त्यावर तो म्हणाला, "महाराज कुच डरना नहि, कुच फिकिर करना नहीं. सातारा तुमारा है, और गादी तुमारी है, हम तुमारा है." असें बोलून त्यानें दिलदिलासा दिला.

जनरल स्मिथ मेण्यांतून चालला होता. तोंच बळवंत मल्हारनें ज. स्मिथची व महाराजांची ओळख करून दिली. उभयतांचे मुजरे व हस्तांदोलनादि प्रकार झाले. परस्परांनीं कुशल प्रश्न विचारले. नंतर महाराजांचे दोन बंधु व मातोश्री यांचा परिचय करून देण्यांत आला. इतक्यांत ब्रिलॅमोर नांवाचा ज. स्मिथच्या हाताखालील एक अधिकारी आला. त्याचीहि ओळख करून देण्यांत आली. ही धांदल चालू होती तोंच बाजीरावाच्या सैन्यांतील अंबारीचे व निशाणाचे हत्ती ठाकून वळवून आणले. पेशव्यांचें सर्व खटलें लुटलें. त्याचा खराबा फार झाला.

महाराज एका घोड्यानिशीं होते. सामान कांहींहि नव्हतें. तेव्हां लुटून आणलेले सतरा उंट महाराजांना दिले. हें सर्व चाललें होतें तों समोरून कोणी तरी हत्तीवरून चालून येतांना दिसला. त्याबरोबर गोळी झाडण्यांत आली, ती माहुतास लागून तो एखाद्या पाकोळीप्रमाणें पटकन् चरफडत खालीं पडला ! पण मागें पाहतात तों महाराजांचा सरसेनापति बलवंतराव भोसले होता. त्यास उतरवून घेऊन घोड्यावर बसविलें आणि अंबारींत छत्रपतींच्या मातोश्री माई-साहेब व त्यांचे बंधु यांस बसविण्यांत आलें व स्वारी चालू झाली.

ही स्वारी थोडा वेळ चालल्यानंतर एका निवान्तशा ठिकाणीं थांबली. खुशीच्या तोफा झाल्या. साखरपाणी झालें; पण अजून जराशी मळमळ कायम होती. साहेबाचें मन असावें तसें ठिकाणावर नव्हतें. तो अंतर्यामीं कावराबावरा झाला होता. बापू गोखल्याच्या मृत्यूसंबंधीं अजून खात्री नव्हती. तेव्हां त्याचा मुडदा शोधण्यास मंडळी पाठविली होती, त्यांनीं बापू गोखल्याचा मुडदा डोलींत घालून आणला होता. पण तो गोखल्याचाच याची खात्री करून घेण्यासाठीं म्हणून बलवंत मल्हारला व महाराजांस दाखविण्यांत आला.

तों खरोखर बापू गोखल्याच्या देहाची दशा उडाली होती. अंगांत फाटका मलमलीचा अंगरखाच काय तो शिल्लक होता.[१] घोड्यांच्या टापाखालीं तुडविला गेल्यानें अंगाचें कातडें सोललें होतें. ठिकठिकाणीं लचके उडाले होते. दोन जबरदस्त जखमा झाल्या होत्या. एकीनें डोळा पार उडाला होता. अशा भयंकर स्थितींत मराठ्यांच्या सरसेनापतीचें तें कलेवर एक डोलींत पडलें होतें.

दैवगति विचित्र म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. मराठ्यांच्या इतिहासांतील हा प्रसंग म्हणजे मराठ्यांच्या तोंडाला काळिमा फासणारा आहे. कारण बापू गोखल्यासारख्या मातबर सरदाराचा अंत शिवाजीमहाराजांच्या अमदानींत अगर पहिल्या बाजीरावाच्या अमदानींत झाला असता तर अथपासून इतिपर्यंत सर्व मराठा उसळला असता आणि त्याचा बदला घेण्याकरितां त्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लाविलें असतें व भीमबलानें झुंज घेतली असती. पण आज बाजीचा रावबाजी होऊन पळत सुटला होता आणि छत्रपतींनीं साहेबांशीं दोस्ती केली होती, म्हणूनच महाराष्ट्राची उलटी अंबारी झाली व त्याच्या कपाळीं करंटेपण आलें.

मुडदा गोखल्याचाच म्हणून ओळखण्यांत आला. नंतर त्यास ओढ्याच्या कडेस भडाग्नि दिला गेला. अशा तऱ्हेनें ज्याच्या नुसत्या हुकुमाबरोबर हजारों समशेरी म्यानाबाहेर निघाल्या आणि शेकडों तोफा डागल्या गेल्या असा बहाद्दर सेनानी कुत्र्याच्या मोतानें मेला.

बापू गोखल्याची वासलात लागली. एकाद्या आठ चौकी भव्य वाड्यास आग लागावी, आगीचा नुसता डोंब उसळावा, चौकामागून चौक बेचिराख व्हावेत, भिंतीमागून भिंती धडाधड कोसळाव्यात, अत्यंत सुंदर व मौल्यवान् असे दिवाणखाने पार काळे ठिक्कर पडून मातींत मिळून जावेत, आग विझविण्यास आलेलीं माणसेंही जळावींत तशांतला प्रकार मराठ्यांचा झाला. रणकुंडांतील अग्निनारायणाचा प्रलय भोंवतालीं उसळला असतांही एकटा एक ठाण मांडून उभा असलेला उंच मनोरा म्हणजे बापू गोखलाच ! तोही आतां कोसळला. धनी शत्रुसैन्यांत सामील झाला. तेव्हां मात्र रावबाजीचा धीर खचला. नाहीं तर तो शेवटपर्यंत रणांगणावर खडा होता. त्याची बायकोही पुरुषवेषांत त्याच्याबरोबर होती. आकाश सर्व बाजूंनीं फाटलेलें असतांनासुद्धां रावबाजीनें इंग्रजांस सहा महिने खेळविलें. आतां मात्र तो उत्तरेकडे पळत सुटला. तिकडे शिंदे-होळकरांची मदत मिळेल अशी आशा त्यास वाटत होती.

इकडे प्रतापसिंह महाराज, जनरल स्मिथ वगैरे मंडळी महाराजांच्याच डेऱ्यांत बसली असून त्यांचें संभाषण चालू होतें. जनरल स्मिथ महाराजांस

म्हणाला, " आपण आम्हांला येऊन मिळालांत, फार चांगली गोष्ट झाली. महाराजांचा जय झाला. बंडखोर पेशवा फजीत झाला. याबद्दल आम्हां सर्वांस अत्यंत आनंद होत आहे. तरी महाराजांनीं आमच्या छावणींत चलावें व या आनंदप्रसंगीं खुशीच्या तोफांची सलामी घ्यावी." या जनरल स्मिथच्या विनंतीस महाराजांनीं होकार देतांच महाराजांना छावणींत नेण्यांत आलें. खुशीच्या तोफा उडविण्यांत आल्या !

हा सर्व देखावा झाला. महाराजांस तलवारी–तोफांचे मुजरे झडले. पण महाराज व बलवंत मल्हार हे उभयतांही मनानें अस्वस्थच होते. कारण ज्या साहेबाशीं त्यांचा करार झाला, त्याचें तोंडही दिसेना. मग गांठभेट लांबच राहिली. तेव्हां बलवंत मल्हार म्हणाला, " जनरल स्मिथसाहेब, आम्ही तुम्हांस एल्फिन्स्टनची गांठ पडण्यापूर्वींच येऊन मिळालों. तेव्हां आतां आपण महाराजांची व एल्फिन्स्टनची ओळख करून द्या. आपण पाहिलेंच कीं, पेशव्यांची मंडळी व मराठ्यांचें लष्कर फार झपाट्यानें चाललें होतें. पण आम्ही मात्र आपणांस सामील होण्यासाठीं रेंगाळत होतों व आपली फौज दिसतांच गुप्त रीतीनें ठरल्याप्रमाणें आम्ही हळू हळू बाजीरावाचें सैन्य सोडण्यास सुरुवात केली आणि संधी सांपडतांच तुम्हांस येऊन मिळालों व येथें येऊन पाहतों तों एल्फिन्स्टनसाहेब कोठेंच दिसत नाहींत, अशी आमची फसगत झाली आहे. तेव्हां आतां तुम्ही महाराजांची व एल्फिन्स्टनची ओळख करून द्यावी. दुसरें असें कीं, बाजीरावाचा आतां पूर्ण पराजय झाला आहे. तेव्हां अशा नामुष्कीच्या स्थितींत तो वाटेल त्या अटीवर तह करण्यास सिद्ध होईल. तेव्हां त्याच्याशीं तह करून महाराजांना त्याच्या ताब्यांत देऊं नका. या बाबतींत मात्र तुमचें आम्हांस अभिवचन पाहिजे. कारण ही गोष्ट पूर्वींच हडसून खडसून ठरली आहे. यानंतर तिसरी गोष्ट अशी कीं, पेशव्यांच्या ताब्यांतील मुलूखही आमच्या ताब्यांत देण्याबद्दल एल्फिन्स्टनला सांगावें. "

हें सर्व ऐकून जनरल स्मिथनें उत्तर दिलें कीं, " तुम्हांस दिलेलीं सर्व अभिवचनें अगदीं तंतोतंत पाळण्यांत येतील. आपण त्याची यत्किंचितही काळजी करूं नका. महाराजांना बाजीरावाच्या ताब्यांत प्राणान्तींही आम्ही

देणार नाहीं. (कारण मग इंग्रजांनीं कोणाचा प्राण घ्यावयाचा!) आतां एल्फि-न्स्टनच्या ओळखीविषयीं म्हणाल तर ती आम्ही आपण म्हणाल त्या वेळीं करून देण्यास तयार आहों. आतांच ओळख हवी असेल तर आपणांस पुण्यास यावें लागेल. कारण एल्फिन्स्टनसाहेब पुण्यास आहेत. ही तसदी आपण घेण्यास तयार असाल तर केव्हां म्हणाल तेव्हां आम्ही पुण्यास निघण्यास खुषी आहोंत. नाहींतर आपण साताऱ्यास जा. एल्फिन्स्टन आपली तिकडे गांठ घेतील. आम्ही मात्र आपली सर्व हकीकत त्यांना सांगूं. शिवाय आपणही पत्र द्या." यावर महाराज किंवा बलवंत मल्हार चिटणीस यांनीं एल्फिन्स्टनला केव्हांच पत्र लिहिलें नव्हतें. म्हणून त्यांनीं बाळाजीपंत नातूच्या मार्फत एल्फिन्स्टनला खुलासेवार पत्र लिहिलें.

या प्रसंगीं अष्ट्याच्या रणक्षेत्रावर खाश्यासुद्धां एकंदर बेचाळीस माणसें इंग्रजांच्या हस्तगत झालीं. या रणक्षेत्रावर इंग्रजांस एक कोट रुपयांचा विषय सांपडला. महाराजांबरोबर सामानसुमान कांहीं एक नव्हतें. स्वारी अगदीं सडी होती; म्हणून लुटालुटींत मिळालेले सामानाचे सतरा उंट महाराजांस देऊन डेरे उभे केले. यानंतर एल्फिन्स्टनची गांठ घेण्याकरतां म्हणून महाराज व इंग्रजी सैन्य पुण्याच्या रोंखानें चाललें. दुसरे दिवशीं कूच करून करकंभ, टेंभुर्णी वगैरे गांवांवरून ही मंडळी कूच करीत असतांच सातारकर महाराजांसाठीं एक भगवा झेंडा तयार करण्यांत आला व तो हत्तीवर चढवून हें सैन्य मोठ्या थाटानें मजल दरमजल करीत भीमातीरावर हिंगणगांवीं आलें. येथें नदीस पाणी मुबलक असल्याकारणानें बिल्यामोर महाराजांकडे आला व म्हणूं लागला कीं, नदीस पाणी पुष्कळ आहे. तेव्हां येथेंच मुक्काम टाकावा म्हणजे शिपाई व लोकांना आंघोळी वगैरे करण्यास सवड मिळून ते हुषार होतील. हा विचार महाराजांस पटला व तेथेंच मुक्काम झाला. या ठिकाणीं ता. २५।२।१८१८ ला एक झेंडावंदनाचा समारंभ करण्यांत आला! झेंडा मोठ्या थाटानें उभा करण्यांत आला होता. झेंड्याभोंवतीं सैन्य मंडलाकार उभें करण्यांत आलें होतें. कॅप्टन टोव्हे, कॅप्टन मेने, मि. बिल्यामोर, कॅ. हार्डकॅसल आणि शॉ, मेजर डोव्हटन आणि जनरल स्मिथ व इंग्रज सैन्यांतील विसाजी रामजी वगैरे मंडळी या

समारंभास आल्यानंतर प्रतापसिंह महाराज व बलवंत मल्हार चिटणीस हे दोघे आले. बलवंत मल्हारनें झेंड्याची पूजाअर्चा केली. यानंतर खुषीच्या २३ तोफा डागण्यांत आल्या व तलवारीचे मुजरे झाले.

या फडफडणाऱ्या भगव्या झेंड्याला जणूं कांपरें भरलें होतें. तो स्वातंत्र्याच्या दिमाखानें आज वाऱ्याबरोबर खेळत नसून त्याच्या पायांत पारतंत्र्याची शृंखला पडल्यानें तो तींतून सुटण्यासाठीं धडपडत होता. श्रीसमर्थ रामदासस्वामींची पुण्याई संपली होती. स्वराज्यसंस्थापक श्रीशिवाजीमहाराजांचा पराक्रम आज हतबल झाला होता. थोरल्या बाजीरावाची शिकंदर समशेर बोथट झाली होती. त्या उडालेल्या तोफेच्या तोंडीं या भगव्या झेंड्याचें स्वातंत्र्य देण्यांत आलें होतें. धुराच्या लोटांत त्याचा कोंडमारा होत होता. तो कसचा मान आणि कसचा उत्सव ! ती भगव्या झेंड्याची विटंबनाच चालली होती. बुधवार ता. २० फेब्रुवारी १८१८ रोजीं अस्ताचलास जाणारा मराठ्यांचा स्वातंत्र्यसूर्य जणूं रक्ताची गुळणी ओकून आकाशाच्या काळ्या घोंगडीवर उताणा पडला होता !

शरणागति : १४

रावबाजीच्या मर्मभेदक शब्दांनीं भडकलेल्या बापू गोखल्यानें अष्ट्याच्या रणमैदानावर प्राण पणास लावून शेवटची झुंज घेतली. मराठ्यांचा सर-सेनापति नाहींसा झाला आणि महाराष्ट्रांतील युद्ध संपलें. पण या सर्व धांदलींतून रावबाजी मात्र निसटला व चांद्याकडे मार्ग आक्रमूं लागला. रावबाजीची ती चाल पाहतांच साहेब घाबरला. त्याचें मन बेअंदाजी हेलकावे खाऊं लागलें. याची कल्पना पुढील उताऱ्यावरून चांगलीच येते. या राजकारणांतील साहेबाकडील मुख्य सूत्रधार एल्फिन्स्टन यासंबंधीं ता. १६।४।१८१८ ला म्हणतो, ' आम्ही राज्येचीं राज्यें घशांत टाकलीं. म्हैसूर, नागपूर आणि सातारा या ठिकाणीं नवीं राज्यें निर्माण केलीं. पण न जाणो शिंदा आपल्यावर उठला, होळकर त्यास सामील झाला व निजाम, शीख आणि गुरखे यांनीं समशेरीस हात घातले तर प्रसंग मोठा बांका येईल. नुसती एक ठिणगी पडण्याचा अवकाश कीं सगळीकडे भडका उडेल व पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें आम्हांला मिळालेलें राज्य कोसळून जमीनदोस्त होईल. अजीर्ण होईपर्यंत खाऊं नये हेंच खरें, या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे.'

गोपाळ अष्ट्यावर पराजित झालेल्या बाजीरावाची इच्छा खरोखरीच इतक्यांत युद्ध द्यावें अशी नव्हती. परंतु फौजा पळत राहिल्यानें बेहिम्मत झाल्या आणि बाजीरावाचें बूड कोठेंच टिकेना; तेव्हां कसा तरी एकदां सोक्ष-

मोक्ष करून द्यावा या हेतूनें चिडून गेलेल्या बापू गोखल्यानें झुंज घेतली आणि अष्टीची लढाई झाली इतकेंच. नाहींतर शिंदे—होळकर व नागपूरकर भोसल्यावर बाजीरावाची मोठी भिस्त होती. उत्तरेकडून या सरदारांच्या फौजा मदतीस आल्या म्हणजे मग त्यांस मिलाफी होऊन इंग्रजांशीं गांठ घालावी असा त्याचा मानस होता. पण झालें मात्र निराळेंच. त्याच्या घरसोडीच्या वर्तनानें त्याचें वेळापत्रक व योजना साफ फसल्या आणि डाव अंगावर आला. होळकराचा सरदार रामदिन हा दक्षिणेकडे निघाला होता. तसेंच नागपूरकर भोंसले अप्पा-साहेब हा जातीनें मदतीस येणार असें रावबाजीस वाटत होतें व बाजीराव रेटरेकराचा वंशज त्रिंबकराव हाही निष्ठेनें बाजीरावाचा पाठपुरावा करीत होता. अशा तऱ्हेनें वऱ्हाडकडे बाजीरावाच्या आशा उत्फुल्ल झाल्या होत्या. म्हणून अष्टीच्या लढाईनंतर पराजित बाजीराव वऱ्हाडकडे वळला. पण टोपीकरानें हे सर्व कयास पूर्वीच बांधिले होते. त्याप्रमाणें आंखणीही केली होती. नागपूरच्या आप्पासाहेबांस अटक झाली आणि महितपूर येथें होळकरांच्या लष्कराचा मोड करण्यांत आला. अशा प्रकारें उत्तरेकडील मराठ्यांचें सामर्थ्य खच्ची झालें. अष्टीच्या लढाईनंतर बाजीराव वऱ्हाडकडे गेल्यानें दक्षिणेंतील युद्धाचा मुख्य गंड मोडला आणि बाजीरावाच्या अनुपस्थितीनें त्याचे प्रान्त इंग्रजांस विनाआयास मिळाले. आणि साहेबाचें चांगलेंच फावलें.

रावबाजी उत्तरेकडे येत आहे असें पाहतांच हिस्लॉप त्याचे मुकाबलयास गेला. अष्टीच्या लढाईपूर्वी नागपूरकर भोंसल्याचा सरदार गणपतराव परांजपे बाजीरावाच्या साहाय्यार्थ धांवून आला. टेंभुर्णी मुक्कामीं बाजीरावाची व त्याची भेट झाली. गणपतराव परांजप्याबरोबरच नारो सखाराम नांवाचा एक गृहस्थ नागपूरकर अप्पासाहेबाचा एक खास निरोप घेऊन बाजीरावाच्या भेटीस आला होता. इतक्यांत गोपाळ अष्ट्याच्या रणमैदानावर ता. २० फेब्रुवारी १८१८ ला बाजीरावाचा पराभव झाला व तो परिंड्याचे बाजूस पळून गेला. त्या ठिकाणीं अप्पासाहेबांचे दोन हुजरे त्यास भेटले. त्यांच्या पाठोपाठ आणखी दोन हुजरे खुद्द अप्पासाहेबाचा खास लेख घेऊन आले. त्यांनीं त्यास असा निरोप आणिला कीं, मी अत्यंत संकटांत

आहे तेव्हां कसेंही करून मला साहाय्य करा. अप्पासाहेबाचे हे हुजरे बरोबर घेऊन बाजीराव नेवाशाला गेला. तेथून कोपरगांवांस जाऊन त्यानें पुणतांब्यास गोदावरी ओलांडली. पाठीवर कोणी नाहीं असें पाहतांच त्यानें नाशिक गांठलें. तेथें देवदर्शन करून त्यानें सप्तशृंगीस सात–आठ दिवस मुक्काम टाकिला. या ठिकाणीं महिदपूरच्या लढाईत फटाटलेलें कांहीं पेंढारी लष्कर बरोबर घेऊन होळकरांचा सरदार रामदिन बाजीरावास सामील झाला. ता. २ मार्चला बाजीरावानें नागपूरकरांच्या हुजऱ्यास जबाब देऊन परत पाठविलें. गणपतराव सुभेदार व सखारामपंत यांनीं बाजीरावास विनंति केली कीं, आम्हांस कांहीं पैसे देऊन नागपूराकडे पाठवा. म्हणजे आप्पासाहेबाच्या मदतीनें आम्ही तिकडे रान उठवितों आणि साहेबाची पकड ढिली पडेल असें करतों. पण बाजीरावानें त्यांचें म्हणणें न ऐकतां त्यांस आपल्याबरोबर घेतलें व इंग्रजांच्या फौजांची बातमी ठेवीत ठेवीत तो खानदेशाकडे चालला. आणवाई येथें त्याचा मुक्काम असतां त्यांस बातमी लागली कीं, सर टॉमस हिस्लॉपनें ब्रह्मणपूर रोंखून आपणांस अडविण्यासाठीं ठाण मांडलें आहे. या बातमीनें बाजीराव परत कोपरगांवांस आला. तेथून पीरी नदीवर आसी येथें त्यानें मुक्काम टाकिला. पण या ठिकाणीं दक्षिणेंतून ज. स्मिथ चाल करून येत असल्याची बातमी त्यास लागली. तेव्हां तो नागपूरचे आश्रयास जाण्यासाठीं पूर्वेस वळला.

बाजीरावाशीं गांठ घालण्यासाठीं म्हणून उत्तरेंतून निघालेला सर टॉमस हिस्लॉप हा ता. ११ मार्च रोजीं गोदावरीवर आला आणि बाजीराव निसटून पूर्वेकडे गेल्याची बातमी त्यास कळली. तेव्हां त्यानें आपली चाल बदलली व बाजीरावास पकडण्यासाठीं आपल्या लष्कराची नवीन आंखणी केली. पण इकडे बाजीराव राक्षसभुवनजवळ गोदावरी उतरून चांद्याकडे निघाला. त्याच्याबरोबर असणाऱ्या रामदीनच्या पेंढाऱ्यांनीं मार्गांतील मुलुखाची लूटमार करून भयंकर नासाडी केली. पाठीवर असणाऱ्या इंग्रज लष्करास चकविण्याचे शेंकडों उपाय बाजीरावानें योजिले. पण त्यांचा उपयोग झाला नाहीं. कारण

साहेबानें आतां त्याचा पुरा पिच्छा पुरविला होता. त्याचा निकाल लावल्या-शिवाय तो त्यास सोडणार नव्हता.

ज. स्मिथ सातारचें प्रकरण उरकून परत बाजीरावाचे पाठीवर आला. ता. १० मार्च रोजीं तो शिरूर येथें असतां त्यास पत्ता लागला कीं, बाजीराव चांद्याकडे सटकला असून त्याच्या पाठीवर हिस्लॉप व डोव्हटन आहेत. दरम्यान बाजीरावाची आघाडी ता. २ एप्रिलला वर्धा नदीवर वणी येथें आली. याच वेळीं नागपुराहून कर्नल स्कॉट बाजीरावावर चालून आला. त्याची व गणपतराव सुभेदाराची गांठ ता. ३ एप्रिलला वर्धा नदीवर पडली. उभयतांची चकमक उडाली व गणपतराव निसटला. या झटापटी चालू असतां एक अत्यन्त वाईट बातमी बाजीरावास कळली; ती म्हणजे अप्पासाहेब भोंसले नागपूरकर यास इंग्रजांनीं पकडून अलाहाबादेस रवाना केल्याची. ही बातमी ऐकून बाजी-रावाचें पेंकाटच मोडलें. त्याची मति कुंठित झाली. काय करावें आणि कोठें जावें हेंच त्यास कळेना. कारण साहेब सर्व बाजूनें प्रबळ झाला होता. ॲडम्स, स्मिथ व डोव्हटन या तिघांच्या तीन फौजा तीन बाजूंनीं बाजीरावावर चालून आल्यानें त्यांच्या तावडींतून निसटून जाणें अशक्य झालें. सर्व बाजूंनीं रान उठल्यानंतर फाड फाडून खाणाऱ्या शिकारी कुत्र्यांच्या तडाक्यांत सांपडलेल्या शिकारी-प्रमाणें बाजीराव बेजारगतीस आला. निसटण्यास जागा नव्हती म्हणून तो पांढरकवडा व वणी यांच्या दरम्यान घोंटाळत राहिला. नंतर इंग्रजांना चुकवीत चुकवीत तो आवंढ्या नागनाथाजवळ शिवणी येथें दाखल झाला. तेथें त्याच्या पाठीवर असलेल्या कर्नल ॲडम्सनें त्याच्यावर अचानकपणें झडप घातली. ता. १० एप्रिल रोजीं एकाएकीं इंग्रजाच्या गोळ्या अंगावर येऊं लागतांच बाजीराव स्वार झाला व त्यानें आपला मोर्चा पांढरकवड्याकडे वळविला. शिवणी येथें बाजीरावाचे आतांपर्यंत टिकून राहिलेलें लष्करी सामर्थ्य निकालांत निघालें. त्या ठिकाणीं चार पितळी तोफा, कांहीं दारूगोळा, तीन हत्ती, दोनशें उंट व कांहीं खजिना साहेबाच्या हातीं लागला. इतउत्तर बाजीरावाच्या सैन्यास झपाट्यानें गळती लागली व त्यानें इंग्रजाची शरणागति पत्करली. घोड्यांचा गव्हाडा झाला होता. त्यांचीं पोटें खपाटीं गेलीं होतीं व चालतांना पायांत पाय

चौंटाळत होते. तोच प्रकार शिलेदारांचा झाला होता. वस्त्रप्रावरणांच्या चिंधड्या उडाल्या होत्या. त्यांच्यांत त्राण नव्हतें. सामान्य माणसाच्या धमकावणीला टरकण्यापर्यंत त्यांच्या मनाची हीनावस्था झाली होती.

शिवणीच्या झटापटींतून निसटल्यानंतर बाजीरावानें आपला मोर्चा उत्तरेच्या बाजस वळविला आणि तापी उतरून शिंद्याकडे जाण्याच्या मार्गास तो लागला. या वेळीं अशिरगडचा किल्लेदार यशवंतराव लाड म्हणून होता. त्यास शिंद्यानें खालील पत्र लिहिलें होतें; ' तुम्हांस बातमी कळविण्याची कीं, आमचा व कंपनी सरकारचा स्नेह असून पेंढाऱ्यांच्या युद्धांत आम्ही त्यास मदत करण्याचें कबूल केलें आहे. हदी व हंडिया हीं दोन ठाणीं आम्ही त्यांचे स्वाधीन केलीं आहेत. परंतु तुम्ही अशिरगड बिलकूल स्वाधीन करूं नये. अखेरपर्यंत इंग्रजांशीं लढावें. अत्यंत सावधगिरी ठेवावी. बायकामुलें जवळ ठेवूं नयेत. बाहेर कोठें अगोदरच पाठवून द्यावीं. मग जें होणार असेल तें होईल. आम्ही तुमचा बचाव करूं याची खात्री असूं द्यावी. बहुत काय लिहिणें. (पुढील मजकूर स्वदस्तूरचा आहे) श्रीमंत पेशव्यांकडून मागणी येईल ती पुरवीत जावी. आमचा हुकूम नाहीं अशी सबब त्यास सांगूं नये. नाहीं तर आमचे पदरीं बदनामी येईल. येथून तुम्हांस संपूर्ण समजुतीचीं पत्रें जातच आहेत. त्यावरून सर्व कळून येईल. हें पत्र हजार पत्रांचे ठिकाणीं मानून त्याप्रमाणें वर्तन ठेवावें. "(मिलचा इतिहास भाग ८)

या पांच–सहा महिन्यांच्या पळापळींत खास बाजीरावाचे व त्याच्या बरोबर पळणाऱ्या लोकांचे अतोनात हाल झाले. त्यांचीं तीं वर्णनें गोंधळ्यांच्या कवनांत अमर झालीं आहेत. त्यांत करुणरसाचा आविष्कार पुरेपूर झाला आहे.

जे श्रीमंत सकुमार वनांतरीं ते भटकत फिरती ॥
कळेल तिकडे भर दिवसास प्रभु काटयांमधिं शिरती ॥
आपला घोडा आपण स्वहस्तें चुचकारून धरती ॥
खालीं पसरून उपवस्त्र दिलगिरींत वर निद्रा करती ॥
अस्तमानीं कधीं रात्रीं भात भक्षिति पाटावरती ॥
दरकूच दरमजलीस कृपेंतिल सेवक अंतरती ॥

(चाल) पेशव्यांच्या वंशांत नाहीं कोणी असा कहर पाहिला ॥
हत्ती घोडे उंट खजिना जेथील तेथें राहिला ॥
बाजीराव होय धन्य म्हणून यापरी आक्रान्त साहिला ॥
तुमची आमची हीच भेट आतां राव सर्वांना सांगती ॥
कृपा लोभ परिपूर्ण करित जा द्या दर्शन मागती ॥

—शाहीर प्रभाकर.

या वेळीं बाजीरावाबरोबर दहा हजारांहून जास्त लोक नव्हते. त्रिंबकजी डेंगळे, रामदिन, बाळोबा विंचूरकर व बापू गोखले यांची पत्नी यमुनाबाई एवढीच प्रमुख मंडळी त्याचे समवेत होती. बाकीचे सर्व सरदार माधवराव रास्ते, अप्पा देसाई निपाणकर, नारोपंत आपटे, चिमाजी नारायण व खुद्द चिमाजीआप्पा यांनीं बाजीरावास बोरी मुक्कामीं रामराम ठोकला व नांदेड या ठिकाणीं गोदावरी उतरून ते परत स्वदेशीं आले. येसाजीपंत गोखले व विठोबा नाईक हेही असेच परतले. आबा पुरंदरे व विठ्ठलराव विंचूरकर हे पुढें श्रीमंतांबरोबर गेले. येनकेन प्रकारेण शिंद्यांकडे जाणें ही एकच तोड आतां शिल्लक राहिली होती; पण त्यांत यश येण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां बाजीराव निराश झाला व त्याचे मनांत शरण जाण्याचे विचार घोळूं लागले. अशा मनस्थितींत तो ता. ५ मे रोजीं तापी उतरून चोपड्यास गेला. तेथून पुढें सेंधण्याहून इंदुरास जाण्याचा त्याचा बेत होता. पण सेंधण्याचें ठाणें यापूर्वींच इंग्रजांनीं हस्तगत केलें त्यामुळें तोही मार्ग खुंटला. आतां कोणत्याही प्रकारची हालचाल करणेंच अशक्य झालें. तेव्हां शरण जाण्याशिवाय गति दिसेना म्हणून त्यानें चोपड्याहून मालकमकडे बोलणें करण्यास माणसें पाठविलीं आणि आपण स्वतः पूर्वेस बऱ्हाणपूरचे बाजूस, अशिरगडचे उत्तरेस पांच मैलांवर असणाऱ्या धूळकोट येथें निघून गेला. अशिरगडचा किल्ला अद्याप शिंद्यांच्या ताब्यांत होता. तेथें आपणास साहाय्य मिळेल अशी बाजीरावाची अपेक्षा होती. त्याप्रमाणें अशिरगडचा किल्लेदार यशवंतराव लाड यानें त्यास थोडें बहुत साहाय्य केलेंही; पण बाजीरावाच्या या तडफडीचा आतां कांहींएक उपयोग नव्हता. तो उत्तरेकडे गेल्याची बातमी ठिकठिकाणच्या

इंग्रज अधिकाऱ्यांस पोहोंचतांच ते सर्व बाजीरावास घेरण्यासाठीं त्याच्या पाठीवर तांतडीनें निघून गेले. धुळकोटास त्याचा मुक्काम असतां इंग्रजांनीं आपणास पुरेपूर वेढल्याची खात्री होतांच बाजीरावानें मोठ्या नाखुषीनें आनंदराव यशवंत चंद्रावरकर (निसबत रघुनाथराव), हणमन्तराव लिमये व रामचंद्र भोजराज हे आपले वकील मालकमकडे पाठविले. ते ता. १६ मे रोजीं मोहू येथें पोहोंचले. त्यांच्याजवळ बाजीरावानें स्वदस्तूरचा लेख दिला होता. त्यांत मालकमची भरपूर स्तुति होती. ' माझे जुने ऋणानुबंधी तीन. त्यांपैकीं कर्नल क्लोज दिवंगत झाले. दुसरे जनरल वेल्स्ली हे स्वदेशीं आहेत. आणि तिसरे आपण. आजपर्यंत अनेकांचा सांभाळ करून त्यांना आपण पदरांत घेतलें आहे. शिंदे, होळकर वगैरे सरदारांवर मेहरनजर करून त्यांचें संरक्षण केलें आहे तेव्हां आतां या संकटसमयीं मला साहाय्य करून आपण माझा निभाव लावाल असा भरंवसा आहे '— असा त्या पत्राचा आशय होता.

या पत्रांत स्पष्ट असा खुलासा कांहींच नव्हता. पण बाजीराव तह करण्यास तयार आहे असा त्याचा मतितार्थ होता तो जाणून मालकम वागला. बाजीरावानें त्यास भेटीस बोलविलें होतें. पण मालकमनें तें नाकारिलें. त्यानें आपल्या हाताखालील लेफ्टनंट लो व लेफ्टनंट मॅक्डोनॉल्ड यांच्याजवळ जबाब देऊन बाजीरावाच्या भेटीस धाडिलें. लेफ्टनंट लो याला मालकमनें असें निक्षून सांगितलें होतें कीं, (१) बाजीरावानें सर्व राज्याची सोडचिठ्ठी द्यावी व ती त्याचे वारसासही लागू असावी. (२) त्यानें पुन्हां दक्षिणेंत जाऊं नये. (३) तळेगांवाजवळ दोन गोऱ्यांस ठार करणारे इसम व त्रिंबकजी डेंगळा यांस स्वाधीन करावें. या गोष्टी मान्य असल्यास मग बाजीरावास कळवावें कीं, (४) रामदिन व बाजीरावाजवळ असणाऱ्या इतर पेंढाऱ्यांस त्यानें रजा द्यावी. (५) तुम्ही खुद्द डोव्हटनचे स्वाधीन व्हावें. (६) असें केल्यास तुम्हांस कोणत्याही प्रकारचा धोका नाहीं. या अटी तुम्हीं मान्य केल्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत कोठेंही एकाद्या क्षेत्राच्या ठिकाणों शांतपणें राहण्याची परवानगी तुम्हांस देण्यांत येईल.

याप्रमाणें वाटाघाटी होऊन ता. १८ मे रोजीं ले. लो व आनंदराव यशवन्त वगैरे मंडळी निघाली. दुसऱ्या दिवशीं ही मंडळी मंडलेश्वरीं आली. तों तेथें त्यांस अप्पासाहेब भोसले नागपूरकर हा कैदेतून पळाल्याची वार्ता समजली. तेव्हां ले. लोनें बाजीरावाकडे जाण्याचा आपला बेत तहकूब केला. सय्यद हुसेन अली नांवाचा इंग्रज फौजेंतील एक सुभेदार त्याजबरोबर होता. त्यास त्यानें आनंदरावाबरोबर बाजीरावाकडे धाडिलें. बऱ्हाणपुरास दाखल झालेला डोव्हटन बाजीरावावर चाल करण्याच्या तयारींत होता. तोंच त्यास ता. २३ मेला कॅ. लोचें पत्र मिळालें. म्हणून डोव्हटन त्याच्यावर लगोलग चालून गेला नाहीं. दुसरीकडून स्मिथ भिकणगांवपर्यंत चालून आला होता. तोही तेथेंच थबकून राहिला. ता. ३० मेपर्यंत बाजीराव धूळकोटावर घोंटाळत होता. इतक्यांत खुद्द मालकम आपल्या लष्करासह भिकणगांवपर्यंत चालून आला. तसेंच इंग्रज फौज पिंपलोदापर्यंत चालून आली. अशा प्रकारें बाजीराव सर्व बाजूंनीं वेढला गेला व टोपीकराच्या स्वाधीन झाल्यावांचून त्यास गत्यंतर उरलें नाहीं. तेव्हां मोठ्या जड अंतःकरणानें त्यानें ता. ३१ मे रोजीं विंचूरकरांचा दिवाण बाळोबा यास मालकमकडे पाठविलें आणि १ जून रोजीं भेटीस येत असल्याचें कळविलें. ही भेट किरी येथें ता. १।६।१८१८ ला अस्तमानीं झाली.

या भेटींत मागच्याच अटी मान्य झाल्या व बाजीरावानें त्रिंबकजीस ताबडतोब इंग्रजांचे स्वाधीन करावें अशी निकड मालकमनें लाविली. तेव्हां, 'त्रिंबकजी फौजबंद असून त्याची छावणी निराळी आहे. तेव्हां त्याला आपल्या स्वाधीन करणें ही साधी गोष्ट आतां माझ्या आंवाक्याबाहेर आहे, म्हणून त्यास पकडण्याचें काम तुम्हीच करावें. त्यास माझी ना नाहीं' असें बाजीरावानें सांगितलें. ही गोष्ट मालकमनें मान्य केली. त्याबरोबर बाजीरावाचें काम झालें. त्यानें आपल्या स्नेह्यास—त्रिंबकजीस—धोक्याची सूचना दिली. त्याचा फायदा त्रिंबकजीनें घेतला व तो पळून गेला. त्याचा ताबा होण्यास आणखी कांहीं काळ लागला. रात्रीं दहापर्यंत सर्व बोलणें व वाटाघाटी होऊन बाजीरावानें मालकमचा निरोप घेतला व तो आपल्या छावणीस परतला.

ती रात्र रावबाजीनें कशी काढली असेल हें त्याचें त्यासच ठाऊक! सर्व सत्तेचा व वैभवाचा त्याग झाला आणि आतां फक्त पार्थिव देहानें इंग्रजाचे स्वाधीन होण्याचेंच फक्त शिल्लक राहिलें. ही गोष्ट करणें बाजीरावाच्या जिवावर आलें. त्यानें टंगळमंगळ चालविली. त्याबरोबर चोवीस तासाचे आंत स्वाधीन होण्याबद्दल साहेबाचा सक्त हुकूम झाला. तेव्हां बाजीरावानें आणखी तीन गोष्टी मागून घेतल्या (१) माझे बंधु अमृतराव यांची नेमणूक सालीना आठ लाखांची आहे त्यापेक्षां माझी कमी असूं नये (२) ज्या सेवकांनीं माझी नोकरी निष्ठेनें आणि प्रामाणिकपणें केली, त्यांच्यावर इंग्रजांनीं शस्त्र धरूं नये. (३) ब्राह्मणांचा व धार्मिक बाबींचा परामर्ष जसा पेशव्यांनीं घेतला तसा इंग्रजांनीं घ्यावा. यानंतरही टाळाटाळ करण्याचा प्रयत्न बाजीरावानें केला; पण आतां तें शक्य नव्हतें. इंग्रजाचा पाश घट्ट झाला होता आणि गुलामगिरीच्या पिंजऱ्यांत उडी टाकल्यावांचून गति नव्हती. तेव्हां ३ जूनला प्रातःकाळीं त्यानें मोठ्या सद्गदित अंतःकरणानें सर्वांचा निरोप घेतला! तो मेण्यांत बसून निघाला. अकराच्या सुमारास मालकमच्या छावणींत तो दाखल झाला. या वेळेपासून बाजीरावाची श्रीमंत ही पदवी नाहींशी झाली व फिरंगी लेखक त्यास महाराज म्हणूं लागले.

श्रीमंत रावबाजी पेशव्यास ‘ महाराज ’ बनविण्याचें काम मालकमनें स्वतःच्या जबाबदारीवर केलें, पण ही गोष्ट ग. ज. हेस्टिंग्जला मान्य झाली नाहीं. कारण रावबाजीशीं बोलणीं चालणीं झालीं त्या वेळीं मालकमला हें काम कसें करावें, तहाच्या अटी कशा असाव्यात यासंबंधीं कोणत्याच प्रकारच्या सूचना ग. ज. कडून नव्हत्या. तेव्हां त्यानें कंपनी सरकारच्या एकंदर धोरणा-प्रमाणें हा तह परस्पर घडवून आणिला. पण यासंबंधीं ग. ज. चें म्हणणें असें होतें कीं, बाजीरावानें भविष्यकालांत कोठें राहावयाचें हें ठरविण्याचा हक्क सर्वस्वीं कंपनी सरकारचा असावा. तसेंच बाजीरावाचा वार्षिक तनखा दोन लाखांपेक्षां अधिक असूं नये. ग. ज. नें या अटी ता. ३० मेला गोरखपूरहून पाठविल्या. पण त्या मालकमच्या हातीं पडण्याच्या आधींच मालकमचा रावबाजीशीं समेट घडून आला. ग. ज. च्या या पत्रास मालकमनें पुढील आशयाचें उत्तर दिलें.

'बाजीरावाजवळ ८००० लष्कर असून तो अजून धांवपळीचें युद्ध हा पावसाळा अखेर करूं शकला असता व देशांत अनेक ठिकाणीं नासधूस व अस्वस्थता माजली असती. अशिरगडच्या किल्लेदारानें त्यास खासच आश्रय दिला असता व मग हा गड काबीज करणें पावसाळ्यांत अशक्य झालें असतें. बाजीरावास देण्यांत आलेला आठ लाखांचा तनखा हाही पण फार नसून योग्य असाच आहे. अमृतरावापेक्षां त्याचा तनखा कमी असणें ही गोष्ट बाजी-रावाच्या इतमामास न शोभणारी आहे. हा तनखा त्याच्या वंशजांस मिळणार नसल्यानें तो यथायोग्यच आहे.' मालकमचें हें म्हणणें ग. ज. ला पटलें नाहीं. त्याचें म्हणणें असें कीं, बाजीरावास एवढा मोठा तनखा दिल्यास तो पैशाच्या जिवावर बळ बांधील आणि बंड पुकारील. तेव्हां त्यास जगण्यापुरताच, म्हणजे दोन लाखांचा तनखा देणें हेंच योग्य. ग. ज. ची व मालकमची पत्रापत्री होऊन शेवटीं मालकमचें म्हणणें ग. ज. नें मोठ्या नाखुषीनें मान्य केलें. अशा तऱ्हेनें बाजीराव स्वाधीन झाल्यानें इंग्रजांचें मोठें काम झालें. पुढील मोहिमेचा अवाढव्य खर्च वांचला. तसेंच पावसाळा तोंडावर आला होता. देशभर अंदाधुंदी माजली होती. अशा स्थितींत मराठी राज्याचा अधिपति हस्तगत झाल्यास फार मोठें काम होईल असें मालकमला वाटून त्यानें हा व्यवहार केला व तो एका ग. ज. शिवाय बाकीच्या सर्वांना फार मोठा हितावह आणि फायद्याचा वाटला व त्याची वाहवा झाली.

बाजीरावाशीं केलेल्या व्यवहाराबद्दल एल्फिन्स्टननें व मन्रोनें मालकमची पाठ थोपटली. मन्रो हा आपल्या पत्रांत म्हणतो कीं, 'श्रीमंतांचें तंगडें धरून त्याला ठिकाणावर बसविण्यांत तुम्हीं फार मोठें काम साधलें. हा मराठी राज्याचा धनी माझ्या हातीं लागला तर मीं त्याला आठच काय पण दहा लाखांचा तनखा दिला असता.' नागपूरचा रेसिडेन्ट जेंकिन्स याचेंही पण असेंच म्हणणें पडलें. अशा तऱ्हेनें बाजीरावाचा हा सौदा सुखाचा व फायद्याचा झाला असें सर्वांचें मत पडलें व त्याबद्दल मालकमची वाहवा होऊं लागली.

भाग्यशाली कंपनी सरकारचा प्रतिनिधि मालकम याच्याबरोबर हतभागी रावबाजी निघाला. ही स्वारी माळव्यांतून निघाली त्या वेळीं बाजीरावाचें

लष्कर आठ हजार होतें. त्यापैकीं अरब सैनिकांची संख्या दोन हजार होती. या अरब शिपायांनीं आपल्या थकबाकीबद्दल कुरबूर चालविली. ता. ८ जूनला या भांडणानें उग्र स्वरूप धारण केलें व अरबांच्या जोडीला रोहिले सामील झाले. त्यांनीं बाजीरावास व त्याच्या कुटुंबियांस गराडा घातला आणि पैशाची मागणी जोरांत चालविली. या बंडवाल्यांवर चाल करण्यासाठीं मालकमनें फौज मागविली व त्याच वेळीं या अरब लोकांशीं बोलणें चालविलें. त्यामुळें समेट झाला आणि दंगा शमला. ता. १० जूनला अरबांनीं बाजीरावाची छावणी सोडली. यानंतर मात्र कोणत्याच प्रकारचा त्रास झाला नाहीं व बिठूरपर्यंतचा प्रवास सुखाचा झाला.

बाजीरावाची स्वारी माळवा–बुंदेलखंडांतून पुष्कर, मथुरा, वृंदावन, इत्यादि तीर्थक्षेत्रांची यात्रा करीत ब्रह्मावर्तास दाखल झाली. हें पाहून सर्वांची खात्री झाली कीं, मराठ्यांचें राज्य संपलें. या वेळीं साहेबाची सद्दी जोरांत होती. त्याच्या उदार अन्तःकरणाची तारीफ चोहोंकडे होऊं लागली. शरण आलेल्याचा सूड घेऊं नये या इंग्रजी नीतीचा एकंदर जनतेच्या मनावर फार परिणाम झाला. अरब व रोहिले नाहींसे झाल्यानंतर बाजीरावाबरोबर तीन हजार पायदळ व दोन हजार स्वार होते. बाळोबा सलकडे व रामचंद्रपंत सुभेदार हे दोघे बाजीरावाबरोबर बिठूरला गेले. बाकीचे लोक हळू हळू आपआपल्या घरीं चालते झाले. नर्मदापार झाल्यावर सहाशें स्वार व दोनशें पायदळ इतकेंच लोक त्याच्याबरोबर होते !

शेवटपर्यंत बाजीरावाशीं निष्ठेनें राहिलेले सरदार म्हणजे विठ्ठल नरसिंह विंचूरकर. यांनीं बाजीरावाची सेवा मोठ्या प्रामाणिकपणें केली. बाजीरावाच्या पळांत ते इंग्रजांशीं लढले. त्यामुळें त्यांचें फार नुकसान झालें. त्यांचे बरेच महाल बुंदेलखंडांत होते; ते शिंद्यांनीं बळकाविले. धन्याशीं बेइमानी न केल्यानें सर्वस्वास मुकलेलें असें हें विंचूरकर घराणें आहे. पेशवेपदावर अधिष्ठित होऊन मराठी राज्यावर उदक सोडणारा रावबाजी कानपूरच्या उत्तरेस १० मैल असलेल्या गंगेच्या पश्चिम कांठावरील बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त येथें दाखल झाला. आणि राहिलेलें फार मोठें आयुष्य त्यानें अक्षरशः ' हरी हरी ' म्हणत कंठिलें !

———

"कर्नेल साहेबाच्या भरंवशावर आम्ही आनंद करतों" असें म्हणत ऐष-आरामांत दंग राहणारा रावबाजी शेवटीं आपल्या कृतकर्माचे झाडे देण्यासाठीं बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्ताला निघाला. धुळकोटाला त्याची धुळधाण झाली. त्याच्या भाग्याच्या व सत्तेच्या बघतां बघतां ठिकऱ्या उडाल्या. आपल्या एकंदर गोतावळ्याचा निरोप घेतांना त्याला गहिंवर आला.त्यांचे नेत्र कांठोकांठ भरून आले.कंठ दाटून आला,शब्द फुटेना. कोणाशीं काय बोलावें हेंच त्यास कळेना. तेव्हां 'आमुचा रामराम घ्यावा' म्हणून त्यानें सर्वांचें पेशवा म्हणून शेवटचें दर्शन घेतलें. बाजीराव झटकन मेण्यांत बसला आणि ता. ३–६–१८१८ ला मालकम साहेबाच्या छावणींत ११ वाजतां दाखल झाला. या वेळेपासून त्याच्या नांवाच्या मागची पेशवेपदाची उपाधी संपली. कंपनी सरकारनें टाकिलेल्या तुकड्यावर उपजीविका करणाऱ्या रावबाजीस महाराज म्हणूं लागले आणि खरोखरीच तो 'महाराज' मालिकेंत दाखल झाला. पेशवे घराण्यांत एकापेक्षां एक सरस अशीं कर्तृत्व-वान माणसें झालीं पण त्यांची आयुर्मर्यादा फार कमी. कोणी पन्नाशीची चाहूल घेतली नाहीं. साठीची सावली पाहिली नाहीं. पण त्या बाबतींत रावबाजी मात्र फार खंबीर निघाला! त्यानें सर्वांवर मात केली आणि पंचाहत्तर वर्षांचें प्रदीर्घ आयुष्य उपभोगिलें. चाळीस वर्षांच्या आंत आपल्या अतुल सामर्थ्यानें दिल्ली-पतीच्या तक्ताला धडका मारणारा थोरला बाजीराव कोठें व त्रेचाळीसाव्या वर्षीं

कंपनी सरकारच्या हातावर बापजाद्यांनीं रक्त सांडून कमाविलेल्या स्वराज्याचें उदक सोडणारा रावबाजी कोठें ! थोरला बाजीराव पेशवेकुलालाच काय पण अखिल भारताला ललामभूत झाला तर रावबाजी भूभार ठरला.

वसईच्या तहावर सही झाली त्या वेळीं कंपनी सरकारास केवढा आनंद झाला ! त्याचें हास्य पर्वताच्या ओठांनीं प्रगट झालें व तोफांच्या नगाऱ्यांनीं तमाम हिंदुस्थानास त्यानें तें जाहीर केलें. त्या वेळीं कंपनी सरकारास आलेला पेशव्यांविषयींचा उमाळा ओसंडून चालला होता पण आतां पेशव्याला दुःखाचे उमाळे येत होते ! सर जॉन मालकमच्या अटी रावबाजीनें मान्य केल्या व लगेच त्याच्या उत्तरेकडील प्रवासाची तयारी झाली. बाजीराव व मालकम यांच्यामध्यें मध्यस्थी करणारा जॉन नांवाचा जो लेफ्टनंट होता, तो आपल्या-बरोबर असावा म्हणून बाजीरावानें मालकमकडे मागणी केली. ती मान्य झाली. आणि तो बाजीरावाबरोबर प्रवास करूं लागला. बाजीरावाचा प्रवास राजपुतान्यां-तून अजमीरला व अजमीरहून दिल्लीला व्हावयाचा होता. दरम्यानच्या काळांत त्याचें निवासस्थान ठरविण्यांत येणार होतें.

बाजीरावानें कोठें राहावें याचा खल झाला. काशी, मथुरा, मोंगीर, गोरखपूर व बिठूर या ठिकाणांचा या दृष्टीनें विचार झाला व बाजीरावास यापुढें कोणत्याही व कसल्याही प्रकारच्या भानगडी करणें अशक्य होईल असें बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त हें ठिकाण शोधून काढण्यांत आलें. त्यास तेथें कायमचें राहण्याची परवानगी देण्यांत आली. बाजीराव इ. स. १८१९ च्या फेब्रुवारींत बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्ताला दाखल झाला आणि इ. स. १८५१ पर्यंत आयुष्यभर तो तेथें राहिला.

भाग्यहीन बाजीरावाचा प्रवास उत्तरेकडे चालू झाला त्या वेळीं त्याचा परिवार फारच बेताचा होता. मुक्कामा मुक्कामाला त्याचे लोक त्याला रामराम ठोकून निघून जात होते. त्याचा प्रवास माळव्यांतून चालू असतां १२ जून या एका दिवशीं ८००० लोक परवाने घेऊन देशाकडे निघून गेल्याचें मालकम ग. ज. ला लिहितो.

बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त येथील पेशव्यांच्या जहागिरींत इ. स. १८३७ मध्यें पोरांबाळांसुद्धां ७१३२ लोक होते. त्यांत ४५० शिपाई व ५०० स्वार होते. ब्रह्मावर्ताच्या बाहेर राहणाऱ्या बाजीरावाच्या आश्रितांची संख्या २२६५ होती. त्यांत १०० घोडेस्वार व ७५० शिपाई होते. व इ. स. १८४० त बाजीरावाच्या एकंदर जहागिरीची लोकसंख्या १५००० होती.

कंपनी सरकारच्या उदार धोरणाची सगळीकडे चर्चा होऊं लागली. शरणागतीवर सूड न उगविणाऱ्या इंग्रजांच्या अभिनव नीतीचा (!) लोकांच्या मनावर चांगला परिणाम झाला. बाजीरावाबरोबर ब्रह्मावर्तास दाखल होणाऱ्या त्याच्या आश्रितांत पांच लोक प्रमुख होते. रामचंद्रपंत सुभेदार, बापू गोडबोले, अण्णा देशमूख, बाळोबा बाबा सलकडे आणि भिकाजीपंत. या पांचांपैकीं तिघांचा तनखा खालीलप्रमाणें होता : रामचंद्रपंत सुभेदार दरमहा रु. ८ हजार, अण्णा देशमुख व बाळोबा बाबा सलकडे यांच्या नेमणुका प्रतिमास एक हजार होत्या, इतर किरकोळ असामींस रु. ५० ते ६० पगार असे; पण हा सर्व कागदी मेळ होता. बाजीरावाच्या आश्रितांची स्थिती एकंदरीनें फारच चमत्कारिक झाली होती. या सर्व लहान-थोर अधिकाऱ्यांचा चरितार्थ बाजीरावाकडून मिळणाऱ्या मासिक वेतनावर चाले; पण तें वेतन केव्हांच वक्तशीरपणानें मिळत नसल्याकारणानें त्यांचे फार हाल होत. जिनगी दक्षिणेंत व वास्तव्य ब्रह्मावर्तास, असें असल्यामुळें पैसा निर्माण करण्याचें दुसरें साधन त्यांच्याजवळ नव्हतें. अशा स्थितींत धन्याकडून केव्हां तरी मिळणाऱ्या प्रतिमास पांच-पन्नास रुपयांच्या हिशोबी-कसल्या गैरहिशेबी-वेतनांत गुजारा करणें मोठें प्राणसंकट झालें होतें. त्यांची कुतरओढ चालू होती. पण हे सर्व लोक ब्रह्मावर्तास डोकें टेंकून होते. धड ना अन्न ना वस्त्र, अशा स्थितींत पांच-सहा वर्षांचा काल गेला. व ता. ३० ऑक्टोबर १८२५ ला लोनें या सर्वांची नीट व्यवस्था लावण्याबद्दल कंपनी सरकारला लिहिलें. या सेवकांचें वर्गीकरण करण्यांत आलें. त्यानें रावबाजीकडे प्रतिमास रु. ८००० कमाविणाऱ्या रामचंद्रपंत सुभेदारास दर महिना रु. १००० तनखा देण्याची शिफारस केली. तसेंच अण्णा देशमुख व बापू गोडबोले यांस रु. ३५० व बाळोबा बाबा सलकडे आणि भिकाजीपंत

यास रु. २५० प्रमाणें तनखा देण्याची शिफारस केली. बाजीराव १८१९ च्या फेब्रुवारींत ब्रह्मावर्तास आला तेव्हांपासून त्यांचा हिशोब करून या सर्वांना त्यांचा हा पगार चुकता करावा असें कंपनी सरकारास सुचविण्यासही त्यानें कमी केलें नाहीं.

ब्रह्मावर्तास बाजीरावाबरोबर दिवस काढणाऱ्या व्यक्तींत रामचंद्रपंत सुभेदार हा प्रमुख होता. तो रावबाजीचा दिवाण म्हणून काम करी. बारक्या-सारक्या सर्व कामांवर त्याची नजर असे. हें दिवाणाचें काम त्यानें इ. स. १८५१ पर्यंत पेशवा जिवंत असेतोंपर्यंत केलें. पूर्वी पेशवाईंत तो कर्नाटकांत सुभेदार म्हणून होता व हा त्याचा सुभेदारीचा हुद्दा पेशवाई गेल्यानंतरही त्यास चिकटून होता. त्यानें साल्प्याच्या घाटांत इंग्रजांबरोबर ५००० स्वारांसह गांठ घातली होती. ब्रह्मावर्तास सुद्धां बाजीरावाची चाकरी मोठ्या निष्ठेनें आणि हिकमतीनें त्यानें केली. धन्याचें कल्याण आणि कंपनी सरकारचें समाधान या दोन्हीही प्राय: अशक्य गोष्टी त्यानें शक्य करून दाखविल्या, हा त्याचा विशेषच होता. रामचंद्रपंतांच्या मागणीवरून त्यास देण्यांत आलेल्या शिफारसपत्रांत लो म्हणतो, इतर राजेरजवाड्यांशीं राजकारणी उलाढाली करण्यापासून बाजीरावास अलिप्त ठेवण्यांत रामचंद्रपंताचा हातखंडा होता. त्यामुळें याबाबतींत कंपनी सरकारास चिंता करण्याचें कारणच उरलें नव्हतें. याहीपेक्षां त्याची करामत म्हणजे बाजीरावाकडून सहा लाख रुपयांचें कर्ज कंपनी सरकारास त्यानें बिनबोभाट मिळवून दिलें. कारण कर्ज देण्याच्या बाबतींत बाजीराव नाखूष होता. त्यानें हें कर्ज दिल्यानंतर लोला स्पष्टच कळविलें कीं, यापुढें कर्जाची तरतूद करणें त्याला तितकेंसें शक्य होणार नाहीं व त्याला कंपनी सरकारकडून तशी गळ घालण्यांत येऊं नये. लोनें ३१ ऑक्टोबर १८२५ ला तसें कंपनी सरकारास कळविलेंही होतें. पण या गोष्टीस एक-दोन वर्षें लोटतात न लोटतात तोंच कंपनी सरकारची तीन लक्ष रुपये कर्जाची मागणी आली. आणि या वेळीं मात्र बाजीरावाचें आणि रामचंद्रपंताचें बिघडलें. रामचंद्रपंत कंपनी सरकारची कड घेऊन वागतो असा त्याचा समज झाला व तो या बाबतींत खराही होता. बाजीराव रामचंद्रपंताचा धनी व तो त्याची मर्जी राखण्याचा प्रयत्न

आटोकाट करी; पण त्याची थोरली सासू कंपनी सरकार होती! तेव्हां बाजीराव व कंपनी सरकार या उभयतांची मर्जी राखण्याचा प्रयत्न योग्य त्या तरतम—भावानें तो करी. तें त्याचें करणें व्यावहारिक दृष्टीनें बरोबरही होतें. कर्ज प्रकरणानें बाजीरावाची गैरमर्जी झाली; पण त्याची फिकीर करण्याचें कारण रामचंद्र-पंतास नव्हतें. कारण कंपनी सरकार प्रसंगीं त्याचा पाठपुरावा करी व नडी भागवी. इ. स. १८२३ त रामचंद्रपंताचे घरीं कांहीं कार्य निघालें व त्यास नड लागली. त्या वेळीं कंपनी सरकारनें त्यास रु. २०,००० देणगीदाखल दिले! अडी नडीला अशा देणग्या त्यास मिळत व त्याचा मार्ग सुकर होई. पण कंपनी सरकारचा स्वार्थ संपत आला त्याबरोबर कंपनी सरकारची चाल बदलली व इ. स. १८२९ त रामचंद्रपंतानें अशी कांहीं मागणी करतांच त्यास कळविण्यांत आलें कीं, हा प्रकार यापुढें बंद करण्यांत आला आहे! या वेळीं लॉर्ड बेंटिंगची कारकीर्द चालू होती व त्याच्या काटकसरीच्या धोरणानें या सर्व गोष्टीस छाट बसली होती. एकंदरीनें रामचंद्रपंत सुभेदारानें आपलीं नोकरी मोठ्या धोरणानें केली. ब्रह्मावर्तास बाजीरावानें व्यतीत केलेल्या बत्तीस वर्षांच्या कारकीर्दींत त्याच्यावर देखरेख करणारे चार इंग्रज अधिकारी होऊन गेले. त्यांस कमिशनर म्हणत. ते सर्व रामचंद्रपंताविषयीं चांगला अभिप्राय देतात. कांहीं प्रसंगीं तो बाजीरावापेक्षां कंपनी सरकारशीं निष्ठेनें वागला! इ. स. १८३९ मध्यें बाजीरावाला ब्रह्मावर्ताहून पळवून नेऊन राजकारण उभें करणारा एक कट उघडकीस आला. त्या वेळीं या कटाशीं बाजीरावाचा संबंध दाखविणारे असें कांहींही निष्पन्न झालें नाहीं. या कटाची माहिती बाजीरावास असावी, पण त्यानें त्यांत प्रत्यक्षपणें कोणताही भाग घेतला नसावा असें मत मॅनसन कमिशनराचें पडलें व हाच सूर रामचंद्रपन्तानें ओढला. उभी हयात बाजीरावाच्या नोकरींत खर्च करणारा रामचंद्रपंत पेशव्याची बाजू न घेतां इंग्रजाची घेतो हें पाहून मॅन्सनला आश्चर्य वाटलें. पण यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींही नव्हतें! पेशव्यापेक्षां इंग्रज सामर्थ्यवान् होता आणि त्याची झांज वाजविण्यांत फायदा आहे हें व्यवहारचतुर रामचंद्रपंतानें जाणलें होतें. एकादे वेळेस

प्रामाणिकपणेंही रामचंद्रपंतास तसें वाटत असेल. या रामचंद्रपंत सुभेदारानंतर बाजीरावाच्या आश्रितांत बाळकोबा बाबा सलकडे याचा क्रम लागतो. तो खानदानी घराण्यांतील होता. एल्फिन्स्टनचें त्याच्याविषयींचें मत फार चांगलें होतें. तो आतां म्हातारा झाला होता. त्याचें प्रकृतिमान एकसारखें ढांसळत होतें. त्यानें ब्रह्मावर्तास न राहतां आपलें आयुष्य काशीस व्यतीत केलें; पण आपला एक कारकून व शंभर घोडे बाजीरावाच्या दिमतीस त्यानें ब्रह्मावर्तास ठेविले होते. भिकाजीपंत, अण्णा देशमुख व बापू गोडबोले ही मंडळी रामचंद्रपंत व बाळकोबा सलकड्याच्या खालोखाल प्रमुख होती. तीही पण मोठी उपयुक्त होती. त्यांनीं आपलें आयुष्य चांगल्या प्रकारें वेंचिलें.

ब्रह्मावर्तास बाजीरावानें आपलें तेहतीस' वर्षांचें आयुष्य कसें कंठिलें असेल यासंबंधींचा तपशील फारसा उपलब्ध नाहीं. पण त्याच्या आयुष्याचा एकंदर ढंग लक्षांत येण्यासारखा आहे. यज्ञ–याग, यजन–याजन, ब्राह्मण–संतर्पणें व तीर्थयात्रा करणें, उरलेला वेळ छेलछबेल्यांच्या रंगढंगांत घालविणें हा त्याच्या आयुष्याचा राबता अगदीं ठरलेला होता. तो तसाच त्यानें ब्रह्मावर्तास चालू केला होता. बाजीरावाच्या परमेश्वरानें कृपाळू होऊन राजकारणाच्या यातायातींतून त्याला मुक्त केलें होतें. आणि मालकम साहेबाला शरण गेल्यानें सालीना सात–आठ लाखांचें महादान त्याच्या पदरांत पडलें होतें. साहेब तसा व्यापारी दानतीचा असल्याकारणानें त्याचा तनखा त्याच्या पदरांत बिनबोभाट पडत होता. अवाढव्य पैशाचा चक्काचूर करणारीं राजकारणें संपुष्टांत आलीं होतीं. यज्ञयाग, संतर्पणें व काशी, गया, मथुरा या क्षेत्रीं यात्रा करण्यांत पैसा खर्च करून सुद्धां पुष्कळ शिल्लक राहात होती. त्याचा खर्च त्यानें ब्रह्मावर्त व इतर ठिकाणीं भव्य इमारती व घाटादि सार्वजनिक कामें करण्यांत खर्च केला. ब्रह्मावर्तास बाजीरावानें फार मोठा राजवाडा बांधिला होता. त्याची सजावट श्रीमंती थाटाची व अपूर्व होती. त्याचा उपयोग तो आपल्या युरोपिअन मित्रांना व इतर स्नेह्यांना मेजवान्या देण्यासाठीं करीत असे. इ. स. १८२७ च्या मार्चमध्यें मिर्झापुराहून ४०,००० दगड व पाटणाहून ५,००० रु. चें इमारतीचें लांकूड आणण्याची परवानगी कंपनी

सरकारनें त्यास दिली होती. या सामानाचा उपयोग काशीला एक मंदिर, घाट व पुजारी लोकांचीं वसतिस्थानें बांधण्यासाठीं होणार होता. तसेंच ब्रह्मावर्तास एक सुबक मंदिर बांधण्यासाठीं एक हजार रुपये किंमतीचा दगड त्यानें मिर्झापुराहून मागविला होता. बाजीरावास लागणाऱ्या सामानास जकात माफ होती. त्यानें कांहींही भानगडी न करितां आपला काळ असल्या निरुपद्रवी कामांत कंठावा अशीच कंपनी सरकारची इच्छा होती व त्याप्रमाणें रावबाजी वागतही होता.

ब्रह्मावर्त येथील बाजीरावाच्या ३२ वर्षांच्या कारकीर्दींत चार कमिशनर झाले. पहिला जॉन लो, दुसरा ई. जे. जॉनसन, तिसरा वुईलिअम कुक आणि चौथा जेम्स मॅनसन. या प्रत्येक कमिशनरला ब्रह्मावर्तास रावबाजी सन्निध राहावें लागे व पेशव्यावर देखरेख ठेवणें हें त्याचें मुख्य काम असून पेशव्यासंबंधींच्या सर्व गोष्टी त्याच्यामार्फत केल्या जात. या कमिशनरला स्वतंत्र कचेरी होती व त्याच्या हाताखालीं काम करणारास जरूर तेवढा नोकरवर्गही होता. एक इंग्रजी जाणणारा कारकून, एक खजिनदार, एक मराठी पंडित व एक मुनशी इतकेजण त्याच्या कचेरींत काम करीत. याशिवाय तेथें पेशवे व इतर आश्रित मंडळींसाठीं एका डॉक्टरचीही नेमणूक होती. पण इ. स. १८२८ सालीं हा डॉक्टर कमी करण्यांत आला व हें काम कानपूरच्या डॉक्टरकडे त्यास शंभर रुपये जादा भत्ता देण्यांत येऊन सोपविण्यांत आलें.

ब्रह्मावर्त येथें भागीरथीच्या कांठीं अदमासें सहा मैल परिघाची जागा बाजीरावाचे छावणीसाठीं नेमून देण्यांत आली होती. खुणेकरितां सोळा दगडी स्तंभ उभे करण्यांत आले होते. बाजीरावाबरोबर लवाजमाही बादशाही थाटाचा होता. बापू गोडबोले लष्करासह, हुजुरातीपैकीं पांच पागा, बापू गोखल्याचे हाताखालील रामचंद्र व्यंकटेश सुभेदार, बापू गोखल्याचे मामा बाळाजीपंत मराठे, बापू गोखल्याचे तैनातींतील भिकाप्पा जगताप, ढमढेऱ्यांच्या हाताखालील श्रीधर बापू दामले यांच्या पागा, बाळोबा दादा थलकाडे १५० स्वारांसह, याशिवाय घोडे, हत्ती, उंट, पालख्या, गाड्या वगैरे लवाजमा होताच.

बाजीरावावर देखरेख ठेवणाऱ्या कमिशनरच्या संरक्षणासाठीं म्हणून २५ त ३० घोडेस्वारांचा एक रिसाला व पोलिस पार्टी नेमण्यांत आली होती.

कानपुराहून डांक व तनखा आणण्यासाठीं त्यांचा उपयोग करण्यांत येई. समारंभाच्या वेळीं कमिशनर आपला थाट दाखविण्यासाठीं याच रिसाल्याचा उपयोग करी. कानपुराहून डांक व तनखा आणण्यासाठीं त्याचा उपयोग करण्यांत येईच व समारंभाच्या वेळींही हेंच लष्कर हजर असे. दोन दोन लाख सैन्याची फिरवाफिरव करणाऱ्या रावबाजीचें तें महनीय भाग्य नाहींसें झाल्यानंतर समारंभाच्या वेळीं असलें लष्कर उभें करण्यांत रावबाजीस काय वाटत असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी ! एकाद्या मानी पुरुषानें असले समारंभ केले नसते आणि आपल्या करंटेपणाची धिंड काढिली नसती.

उत्सवप्रसंगीं तोफांच्या सरबत्त्या उडवून रुबाब गाजाविण्यासाठीं म्हणून रावबाजीस दोन तोफा पाहिजे होत्या. त्यांची मागणी त्यानें ग. ज. कडे केली होती. त्या त्यास इ. स. १८२२ मध्यें देण्यांत आल्या. त्या जुनाट व कुच. कामाच्या होत्या. सरबत्ती चालू असतां त्या इतक्या गरम होत कीं ताडकन् फुटून केव्हां अपघात करतील याचा नेम नव्हता. एकदां तसें झालेंही. एक गोलंदाज तोफेंत दारूगोळा ठांसत असतां भयंकर स्फोटानें जागच्या जागीं मरण पावला. इ. स. १८३२ मध्यें बाजीरावानें ग. ज. कडे नवीन तोफांची मागणी केली. ती मागणी पाठवितांना पुढें दसऱ्यासारख्या व इतर शुभप्रसंगीं त्यांचा धुमधडाका चालू असतां स्फोटामुळें अपघात होऊन प्रसंगाचा विरस होऊं नये व धोका नसावा म्हणून कमिशनरनें दोनच्या ऐवजीं तीन पितळी तोफा देण्याची शिफारस केली. बाजीरावास खूष करण्यासाठीं म्हणून ही मागणी मान्य करण्यांत आली. कंपनी सरकारच्या तावडींतून बाजीरावास मुक्त करण्याचें एक राजकारण इ. स. १८३९ त जेव्हां उघडकीस आलें तेव्हां बाजीरावावर कंपनी सरकारचा रोष प्रत्यक्षपणें दाखविण्यासाठीं म्हणून त्या तोफा त्याच्यापासून काढून घ्याव्यात असें त्या वेळचा कमिशनर मॅनसन यानें सुचविलें होतें, पण तें ग. ज. नें मान्य केलें नाहीं. हें करण्यांत मोठा पुरुषार्थ आहे असें त्यास वाटलें नाहीं.

गोपाळ अष्ट्याच्या लढाईंत पराभव खाऊन पळत सुटणाऱ्या रावबाजीचें सामर्थ्य अचाट होतें. त्याचा तो पळ म्हणजे गनिमीकाव्याचा उत्कृष्ट नमुना होता. त्याच्यापुढें इंग्रज फौजा हतवीर्य झाल्या. त्याच्याबरोबर कोणासही टिकाव धरवेना. तो असाच देशभर भटकत राहिला तर निभाव लागणार नाहीं व राजकारणें कोणत्या पल्ल्यास जातील याचा अंदाज इंग्रजास लागेना. या चिंतेनें त्याला ग्रासलें तोंच बाजीरावानें धूळकोटास शरणागति पत्करली व तो मालकमचे स्वाधीन झाला. त्या वेळीं त्याची किंमत फार मोठी होती. स्वस्थ बसण्यासाठीं सालीना आठ लाख रुपयांचा तनखा देण्यास कंपनी सरकार तयार झालें. इतकेंच नव्हे तर पै पैची किंमत जाणणाऱ्या बनिया सरकारनें एवढ्या पैशांचें गाठोडें रावबाजीच्या पदरांत टाकलें. त्या वेळीं मालकमसाहेबाची कल्पनाही नसेल कीं, रावबाजी तेहतीस वर्षें जगणार आहे म्हणून. इ. स. १८१८ सालीं कंपनी सरकारच्या दरबारीं रावबाजीची किंमत फार मोठी होती. पण १८५० सालीं तो निर्माल्यवत् झाला होता व हें पाप केव्हां कटेल असें कंपनी सरकारास झालें होतें. ही गोष्ट बाजीरावाला कळत नव्हती असें नाहीं. कंपनी सरकारनें आपला मान राखावा, आपल्याला ' पंतप्रधान ' म्हणून संबोधावें असें रावबाजीस वाटे. पण हें त्याचें वाटणें फोल होतें. लॉर्ड ऑक्लंडच्या कारकीर्दींत ग. ज. ची व आपली मुलाखत आपण जणूं मराठ्यांचे पंतप्रधान आहोंत अशा थाटांत व्हावी अशी इच्छा त्यानें प्रदर्शित केली व तसें ग. ज. ला कळविलें. पण कंपनी सरकार कांहीं खुळें नव्हतें कीं, तें रावबाजीची ही इच्छा मान्य करील. लॉर्ड ऑक्लंडनें स्पष्टच कळविलें कीं, ही गोष्ट शक्य नाहीं. रुमालानें हात बांधून मोठ्या विनम्र भावानें पेशव्यांच्या दरबारीं दाखल होणारा आणि दिसण्यांत मामुली पण परिणामीं अत्यंत महत्त्वाच्या अशा सवलती मागणारा साहेब आतां भारताचा सम्राट झाला होता. आणि कंपनी सरकारनें टाकिलेला तुकडा चघळून दिवस कंठणाऱ्या रावबाजीचा इतमाम राखण्याचें त्यास आतां कारण नव्हतें !

रिकामें राजकारण : १६

मातीमोल झालेला पेशवा ब्रह्मावर्तास जगत होता. दिवसामागून दिवस जात होते. त्याच्यावर कंपनी सरकारची सक्त नजर होती. अशा स्थितींत छोटे-खानी राजकारणांचे फुगे फुगत होते व साहेबाच्या श्वासाबरोबर फटकन् फुटूनही जात होते. पहिला कमिशनर जॉन लो याची कारकीर्द चालू होती. त्याची व बाजीरावाची गांठ मोठ्या योगायोगानेंच पडली. इंग्रजांचा युरोपमधील दुसरा जबरदस्त शत्रु नेपोलियन याच्यावर देखरेख ठेवणाराचें नांवही लो हेंच होतें ! बाजीराव आणि लो यांचा स्नेह चांगलाच जमला. लोची कारकीर्द एकंदरीनें यशस्वी झाली असें म्हणतां येईल. तो इ. स. १८०४ मध्यें कंपनी सरकारच्या नोकरींत मद्रासकडे दाखल झाला. नंतर लवकरच तो फर्स्ट मद्रास नेटिव्ह इन्फंट्रीचा लेफ्टनन्ट झाला. इ. स. १८१८ त मराठ्यांशीं लढाई चालू असतां लो सर जॉन मालकमचा ए. डी. सी. होता. बाजीरावानें इंग्रजांस शरण यावें म्हणून लोनें मध्यस्थी केली. पुढें त्याचीच बाजीरावाबरोबर उत्तरेंत ब्रह्मावर्तास रवानगी झाली आणि तोच पुढें बाजीरावावर देखरेख करण्यासाठीं कमिशनर म्हणून नेमिला गेला. ही नेमणूक अतिशय योग्य अशीच झाली. कारण लो कोणत्याही गोष्टीकडे पेशव्याच्या हिताच्या दृष्टीनें पाही व विचार करीत असे. त्यामुळें लो हा आपणांवर देखरेख करण्यासाठीं कंपनी सरकारनें नेमलेला कोणी परका युरोपियन अधिकारी आहे असें बाजीरावास वाटत नव्हतें.

त्या उभयतांचा स्नेह जमला आणि बाजीरावाची बिठूर येथील वागणूक अत्यंत समाधानकारक असल्याचें लोनें इ. स. १८२२ त कंपनी सरकारास कळविलें. रावबाजी म्हणजे कांहीं मनाचा मानी आणि माथ्याचा संतापी पुरुष नव्हता कीं जो अपमानानें भडकेल किंवा कैदखान्याच्या कलंकित जीविताला कंटाळून जागच्या जागीं करपून, वाळून जाईल. त्याच्या स्वभावाचा पिंड कांहीं निराळाच होता. कैद्याचें जिणें तर त्याच्या चांगलेंच परिचयाचें होतें. आयुष्यांतील प्रारंभींचीं वीस–बावीस वर्षें त्यानें कैदेंतच काढिलीं व राजकारणांतले अपमान व चढउतार सोसणें हें कांहीं त्याला नवीन नव्हतें! राज्यप्राप्तीचीं सुखस्वप्नें त्याला पडत नव्हतीं असें नाहीं. अन्तर्यामीं त्याला तसें वाटत होतें. पण त्या वाटण्यांत फारसें तथ्य नव्हतें व तसला खटाटोप करण्याची त्याची लायकीही नव्हती. रावबाजीच्या जीवितनौकेचें सुकाणूं आतां मात्र एकाच्याच हातीं—कमिशनरच्या हातीं—असल्यानें तिची दिशा आतां ठरून गेली होती!

असें जरी होतें तरी रामावांचून रामायण रचलें जात होतें. रावबाजी-संबंधीं राजकारणें रचण्याचा सपाटा चालला होता. त्याचा सूत्रधार दक्षिणेचा कमिशनर चॅपलिन हा होता व तो त्याच्या प्रत्येक गोष्टीकडे व हाल-चालीकडे संशयानें पाही. बाजीराव कांहीं तरी राजकारण करील असें त्यास एकसारखें वाटे. बाजीरावानें कोणाही बाहेरच्या मंडळींशीं संबंध ठेवावयाचा नाहीं असा कडक निर्बंध होता. तरीपण बाजीराव बाहेरच्या लोकांना निरोप धाडी. लो सरळ वृत्तीचा असल्याकारणानें त्याला बाजीरावाच्या या कृत्यांत फारसें वेडेंवांकडें दिसत नसे. पण ही निरोपा निरोपीची बातमी मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन याला कळली. त्या वेळीं लगेच तो गुरगुरला. याहीपेक्षां राजकारण झडलें तें पेशव्याचा सरलष्कर नारोपंत आपटे यांच्याविषयीं. नारोपंत आपटे हा बाजीरावाच्या प्रमुख सरदारांपैकीं एक. त्यानें इ. स. १८१८ मधील पेशव्यांच्या लढाईंत चांगलाच भाग घेतला होता. पण बाजीरावानें उत्तरेस नर्मदेचा मार्ग स्वीकारला त्या वेळीं माधवराव रास्ते, अप्पा देसाई, निपाणकर, नारोपंत आपटे, चिमाजी नारायण व खुद्द चिमाजीआप्पा ही मंडळी बाजीरावास सोडून नांदेडवर गोदावरी उतरून स्वदेशीं परत आली. पण पुढें बाजीरावानें ब्रह्मावर्तास नारोपंत आपट्यास बोलाविलें. पण तेथें बाजीरावाचा

दिवाण रामचंद्रपंत सुभेदार याचें व त्याचें पटेना. बाजीरावाजवळ वावरणाऱ्या मंडळींत हाच काय तो बुद्धिवान आहे असें एल्फिन्स्टनचें मत असल्याकारणानें बाजीरावाच्या बोलावण्यावरून त्याचें ब्रह्मावर्तास जाणें म्हणजे चॅपलिन व एल्फिन्स्टनसारख्या शंकेखोर लोकांना फारच मोठें खाद्य झालें. पण प्रकार होता निराळा. फार मोठ्या पगाराची आशा दाखवून नारोपंत आपट्यास बाजीरावानें बोलाविलें होतें; पण ब्रह्मावर्तास गेल्यानंतर त्याची फसगत झाली. त्याला त्याच्या इतमामाप्रमाणें व अपेक्षेप्रमाणें पगार मिळेना. बाजीराव त्याचा कोणत्याच प्रकारें विचारही करीना. तेव्हां मात्र त्याची पंचाईत झाली. त्याचा स्वभाव फार बाणेदार होता व बाजीरावाच्या चौकडींत त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला स्थान नव्हतें. तेव्हां तो नाखूश झाला व त्याची कुचंबणा चालू झाली. त्यांतून निसटावें कसें या विचारांत तो होता. ब्रह्मावर्त येथील नारोपंत आपट्याचा मुक्काम एल्फिन्स्टनला मोठा संशयास्पद वाटूं लागला व कांहीं कारस्थान चालू असल्यावांचून आपटे तेथें जाणार नाहीं असें त्याच्या मनानें ठाम घेतलें. धनी विचारीना व साहेब संशयी दृष्टीनें पाहूं लागला, त्याबरोबर नारोपंत आपट्याची मोठीच पंचाईत झाली. तेव्हां यांतून मुक्त होण्यासाठीं म्हणून त्यानें तिसराच मार्ग काढिला. ग्वाल्हेरला व्यापार करून आपला चरितार्थ चालवावा असें त्यानें ठरविलें व ग्वाल्हेरचा त्या वेळचा रेसिडेन्ट कॅ. स्टुअर्ट यास लोकडे एक परिचयपत्र मागितलें. याला रामचंद्रपंतानें अतिशय विरोध केला. तो कृतघ्न आहे, त्यानें ब्रह्मावर्तासच राहिलें पाहिजे असें रामचंद्रपंताचें म्हणणें होतें व तो त्याच्या मार्गांत अडचणी निर्माण करीत होता. पण लो फारच उमदा गृहस्थ होता. त्यानें नारोपंत आपट्याला पुरें ओळखलें होतें. बाजीरावानें त्याचा दुरुपयोग केला व बिचाऱ्याची फसगत झाली हें त्यानें जाणलें व नारोपंतास लोनें एक अत्यंत नामी असें परिचयपत्र दिलें. तें असें : 'नारोपंत हा एक सज्जन गृहस्थ असून तो मोठा मातबर आहे. एखादें समान्ननीय स्थान भूषविण्याची त्याची योग्यता आहे, पण सध्या तसा काल नाहीं. बाजीरावाच्या पदरीं त्याच्या योग्यतेप्रमाणें नोकरी व तनखा न मिळाल्यानें तो तिकडे येत आहे. तरी त्यास योग्य तें साहाय्य करावें.' अशा अर्थाचें पत्र घेऊन नारोपंत आपटे ग्वाल्हेरीस गेला. तेथें त्यानें आपल्या योग्यतेप्रमाणें थाटदार

निवासस्थान बांधून रुबाबदारपणें राहण्यास प्रारंभ केला. पण हें त्याचें थाटदार राहणें दक्षिणेचा कमिशनर चॅपलिन याच्या डोळ्यांत खुपूं लागलें. मराठ्यांचा हा रुबाबदार सरदार ग्वाल्हेरला राहून रोशनबेग नांवाच्या एका गृहस्थामार्फत इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठीं सैन्याची जमवाजमव करीत आहे, असा आरोप नारोपंत आपटच्यावर चॅपलिननें केला होता. पण त्या आरोपांत कांहींच तथ्य नव्हतें. नारोपंतास हा दोन-तीन वर्षांचा काळ फार वाईट आला होता हेंच खरें. पण इ. स. १८२१ च्या सुमारांत हे सर्व ढग वितळून नारोपंताचा मार्ग सुकर झाला. त्यास इं. स. १८३० मध्यें शिंदशाहींत जहागिर मिळाली. बाजीरावाचे व त्याचे स्नेहसंबंध पुन्हां एकदां चागले झाले व त्याच्या नातवास – गणपतराव यास बाजीरावाची मुलगी बयाबाई दिली जाऊन पेशवे व आपटे यांचा शरीरसंबंधही झाला. हिच्याच मार्फत बाजीरावाच्या कुटुंबाची अखेरची इत्थंभूत माहिती महाराष्ट्रीयांस विदित झाली.

साप साप म्हणून जमीन धोपटण्याचा उद्योग दक्षिणचा कमिशनर चॅपलिन याचा चालूच होता. इ. स. १८३१ त रावबाजीच्या वतीनें महाराष्ट्रांत फार मोठें राजकारण चालूं असल्याचें त्यानें मुंबई सरकारास कळविलें व बाजीरावाचा हा चाळा थांबविण्यासाठीं योग्य ती तजवीज करण्याबद्दलही सुचविलें. तसेंच बाजीरावाच्या हालचालींची बित्तंबातमी काढण्यासाठीं एका गुप्त अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबद्दलही त्यानें शिफारस केली. या वेळीं ब्रह्मावर्तास बाजीरावावर देखरेख करण्याचें काम लो करीत नव्हता. तो रजेवर होता; पण त्याच्या जागीं रजेच्या मुदतींत कॅ. ब्लॅकर हा तें काम पाहात होता. त्यानें चॅपलिनच्या शिफारशींचा व बाजीरावाकडून निर्माण होऊं पाहणाऱ्या राजकारणाचा चांगलाच समाचार घेतला आहे. या राजकारणाचा धागा अगदीं क्षुल्लक आहे. या वेळीं संधिवाता-वर पुण्यांत एक नामांकित औषधी तेल मिळत होतें तें आणण्यासाठीं दोन माणसें ब्रह्मावर्ताहून मुद्दाम पुण्यास पाठविलीं होतीं, त्याबरोबर संगंळीकडे आरडा ओरडा झाला. हे लोक औषध घेण्याच्या मिषानें तेथें गेले आहेत; पण त्यांच्याबरोबर बाजीरावाच्या सरदार दरकदारांस खास निरोप असून इतर संस्थानिकांबरोबरही त्याचा पत्रव्यवहार चालू आहे, बाजीराव लवकरच पुण्यास येणार अशा

अफवा पुण्यांत उठल्या आहेत, अशा अर्थाची दवंडी चॅपलिनकडून पिटली गेली. पण ब्लॅकरनें आपलें मत ठणठणीतपणें दिलें. त्याचें म्हणणें असें कीं, या शंका-कुशंकांत कांहीं एक अर्थ नाहीं. औषधी तेल आणण्यासाठीं गेलेल्या लोकांनीं बाजीरावाची खुशाली तेथील मातबर लोकांस सांगितली असेल व बक्षिसेंही उपटलीं असतील. पण यापेक्षां त्यांत फारसें तथ्य नाहीं. तसेंच गुप्त अधिकारी नेमल्यानें फायद्याच्या ऐवजीं तोटाच होईल. कारण लफडीं कुलंगडीं निर्माण करणें हा त्या अधिकाऱ्याचा व्यवसायच होईल. तेव्हां तसला अधिकारी नेमूंच नये. ब्लॅकरचें म्हणणें ग. ज. ला पटलें व त्यानें मुद्दाम नेमण्यांत आलेल्या खास अधिकाऱ्याची नेमणूक बाद केली. आणि ब्रह्मावर्तास दाखल झालेल्या या नव्या अधिकाऱ्यास ब्लॅकरनें निरोप दिला. या सर्व आरडाओरडीचा परिणाम एकच झाला कीं, बाजीरावानें सर्व व्यवहार कमिशनर-मार्फत करांवेत असा कडक कायदा झाला.

एकंदरीनें जॉन लोची कारकीर्द फार चांगली झाली. मराठी सत्तेचें प्राणोत्क्रमण झालें त्या वेळीं लोची व बाजीरावाची गांठ पडली. आणि त्यानें ब्रह्मावर्त सोडलें तेव्हां क्रांतीची बारीकसारिक रटमट नाहींशी होऊन कंपनी सरकार स्थिरावलें, कायम झालें. हा संधिकाल त्यानें ब्रह्मावर्तास काढिला. त्याचें आणि बाजीरावाचें सूत चांगलेंच जमलें. बाजीरावाविषयीं लोला इतकी आत्मीयता वाटूं लागली कीं, बाजीरावाला सोडून जातांना दोघांची मुलाखत झाली त्या वेळीं उभयतांचे डोळे प्रेमाश्रूंनीं भरून आले. लोनें परमेश्वराची अशी प्रार्थना केली कीं, पुढच्या जन्मीं त्यास ब्राह्मणजन्म यावा व तशा स्थितींत त्याचें व परमात्म्याचें मीलन व्हावें !

जॉन लो नंतर जे. इ. जॉनसनची कारकीर्द सुरू झाली. जॉन लोच्या चातुर्यपूर्ण वागणुकीनें ब्रह्मावर्तास एकंदर खेळीमेळीचें वातावरण निर्माण झालें होतें. त्यामुळें जॉनसनचें काम सुखाचें झालें होतें. आतां बाजीरावावरील एकंदर निर्बंध जरा ढिले झाले होते. त्यास यात्रा करण्यास परवानगी देण्यांत आली होती. त्याप्रमाणें तो इ. स. १८२२, २३, २४ या तीन सालीं तीन वेळां मथुरेच्या यात्रेस गेला. यानंतर इ. स. १८२५ मध्यें सुद्धां मथुरेची

यात्रा करण्याचें बाजीरावाच्या मनांत होतें. पण कंपनी सरकारास त्याच्या प्रवासाची सोय करणें शक्य नव्हतें म्हणून त्यानें ती त्यास लांबणीवर टाकण्यास सांगितलें. तीर्थयात्रा करीत व 'हरी हरी' म्हणत बाजीरावानें आपलें आयुष्य कंठावें अशीच कंपनी सरकारची इच्छा होती व त्याप्रमाणें बाजीरावानें जीवन कंठणें चालू ठवलें होतें. पण किरकोळ खटक्यांचे प्रसंग निर्माण होत आणि कुरबुरी चालत. इ. स. १८२३ मध्यें असा प्रसंग झाला. त्या वेळीं अमृतरावाच्या मुलाचें लग्न निघालें तेव्हां अहेरादाखल कांहीं पोषाख धाडण्याचें बाजीरावाचे मनांत आलें. पण ग. ज. नें ही गोष्ट होऊं दिली नाहीं. त्यानें त्यास हरकत घेतली. यानंतर इ. स. १८२८ त बाजीरावाच्या दत्तक मुलाच्या मुंजीचा समारंभ झाला त्या वेळीं शिंदे, होळकर, गायकवाडादि मंडळींना निमंत्रणपत्रिका धाडण्याचें बाजीरावाच्या मनांत होतें. पण ग. ज. नें ही गोष्टसुद्धां होऊं दिली नाहीं. कारण त्यास असें वाटलें कीं, या निमंत्रणपत्रिकेंत बाजीराव आपली पूर्वींची बिरुदावली वापरील व तेणें करून आपल्या सरदार मंडळींना असें सूचित करील कीं, मी माझीं पूर्वींचीं नामाभिधानें कंपनी सरकारच्या परवानगीनें वापरलीं आहेत व कंपनी सरकारनें त्या गोष्टीस व हुद्यास मान्यता दिली आहे. आणि या त्याच्या एका कृतीचा परिणाम एका दृष्टीनें अनिष्ट होईल. अहेर पाठविणें काय किंवा निमंत्रणें पाठविणें काय, या गोष्टी सामान्य असल्या तरी पण त्यास एक प्रकारचें महत्त्व होतें व तें साहेब जाणत होता. म्हणून या गोष्टींस त्यानें परवानगी दिली नाहीं.

लॉर्ड ॲम्हर्स्टची कारकीर्द चालू असतां तो अलाहाबादला आला होता. तेथें त्याच्या भेटीसाठीं आलेल्या नरेंद्रमंडळांत बाजीराव होता, असें लॉर्ड ॲम्हर्स्टच्या चरित्रकाराचें म्हणणें आहे. या त्याच्या विधानास पुष्टि देण्यासाठीं हा चरित्रकार लेडी ॲम्हर्स्टच्या दैनंदिनींतील बाजीरावाच्या भाषणशैलीचे, चेहेरपट्टीचें व पोषाखाचें वर्णन करणारा असा एक उतारा देतो; पण चरित्रकाराचें हें विधान ग. ज. व कमिशनर यांच्यामध्यें यासंबंधीं झालेल्या पत्रव्यवहारावरून लटकें पडतें. ॲम्हर्स्ट बाजीरावाची भेट घेण्यास तयार नव्हता. एकाद वेळेस या लॉर्डाचा मुक्काम अलाहाबादेस असतांना कागदी घोडे न नाचतां ही गोष्ट घडून आली असेल असें वाटतें.

रामादिन नांवाच्या एका माणसानें ब्रह्मावर्तावर चाल करण्याचा कट केला. रामादिन हा कानपूर जिल्ह्यांतील एका गांवचा राहणारा. तो स्वतःस राजा म्हणवीत असे. त्याच्याजवळ थोडीबहुत फौजही होती. त्याला कंपनी सरकारांतून महिना रु. २५० चा तनखा मिळत होता, पण तो त्याला पुरत नव्हता. त्याची परिस्थिति नेहमींच ओढगस्त असे. तो ब्रह्मावर्तास जात येत असे. कमिशनरची व त्याची गांठ भेटही होई. तो शिस्तींत वागे म्हणून कमिशनरला कुरकुर करण्याचें कांहींच कारण नव्हतें. इ. स. १८२७ च्या जूनमध्यें त्यानें कमिशनरची मुद्दाम गांठ घेतली आणि आपली परिस्थिती त्याच्या कानीं घातली व आपल्या अडचणी ग. ज. च्या कानीं घालून त्या दूर करण्याबद्दल विनविलें. तसेंच मुंबईच्या गव्हर्नरला भेटण्याची आपली इच्छा असल्याचेंही त्यानें त्यास कळविलें. रामादिनचें सर्व म्हणणें कमिशनरनें ऐकून घेतलें व कानपूरच्या मॅजिस्ट्रेटला भेटून तुमच्या तक्रारी तुम्ही दूर करून घ्या असा त्यानें त्यास सल्ला दिला. कारण त्याच्या बाबतींत त्याला कांहींही करतां येत नव्हतें. यानंतर रामादिननें रामचंद्रामार्फत कांहीं सूत जमविण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. तेव्हां त्यानें ब्रह्मावर्ताहून कानपूरला प्रयाण केलें. रामादिन नाहींसा झाला आणि त्याच्यासंबंधीं जॉनसनला भलतीच बातमी समजली. ती अशी कीं, रामादिनच्या मनांतून रामचंद्रपंताचा खून करून ब्रह्मावर्तास गडबड माजवावयाची आहे व त्या धांदलींत बाजीरावाचा एक मुलगा लांबवावयाचा व त्याच्या जिवावर एखादें राजकारण उभें करावयाचें आहे. ही बातमी ऐकून जॉनसनला आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला व रामदिनला वेडबीड तर लागलें नाहींना असें त्यास वाटलें. यानंतर रामादिनला कानपूरच्या मॅजिस्ट्रेटपुढें उभें करण्यांत आलें व जाबजबान्या झाल्या. पण त्यांतून कांहींएक निष्पन्न झालें नाहीं. मॅजिस्ट्रेटनें रामादिनला समज दिली कीं, त्यानें आपल्या गांवीं शांतपणें राहावें व गडबड करूं नये. झालें, इतकेंच. यानंतर रामादिनाबद्दल कांहींच ऐकूं आलें नाहीं. तो जागच्या जागीं शांत झाला.

या घटनेनंतर फारसें कांहीं एक न होतां जे. इ. जॉनसनची कारकीर्द संपली व वुईल्यम पर्सी कुकची कारकीर्द सुरू झाली. ता. १६ जून १८३०ला

कुक आपल्या कमिशनरच्या जागीं दाखल झाला. पण त्या बिचाऱ्याची कारकीर्द सुखासमाधानांची झाली नाहीं. तो कामावर दाखल झाला त्याच वेळीं या कमिशनरच्या कचेरींतील इंग्रजी लेखनिक नाबाकिसन मित्र नांवाचा एक बंगाली गृहस्थ होता. हा चणचणीतपणें इंग्रजी बोले म्हणून त्याचा दिमाख ऑफिसमध्यें जास्तच वाढला होता. जॉनसननंतर कुक त्या जागेवर दाखल होण्याच्या दरम्यान आयर्विन नांवाचा एक गृहस्थ कमिशनरचें काम पाहात होता. तो कचेरीच्या कामांत कच्चा होता. त्याचा फायदा नाबाकिसन मित्रानें घेतला व कमिशनरच्या कचेरींतील एक हजार रुपये घेऊन तो पसार झाला. त्यास पकडण्यांत येऊन सात वर्षांची त्याला शिक्षा झाली. या मित्राच्या भानगडींत कचेरींतील कांहीं कागदपत्र नाहींसे झाले. त्यामुळें कांहीं प्रकरणांचें अनुसंधान जमेना. त्यामुळें कुकला फार त्रास झाला. यानंतर त्याला त्रास देणारा दुसरा एक प्रसंग घडून आला. त्यामुळें अधिकारीवर्गानें त्यास फारच छेडलें. तो प्रकार असा : कुक ब्रह्मावर्तास दाखल झाल्यानंतर त्यानें दिवाण रामचंद्रपंताचे घरास सहकुटुंब भेट दिली. या भेटीचे वेळीं रामचंद्रपंतानें कुकच्या कुटुंबास एक सोन्याच्या मोहरांची मोहनमाळ व त्याच्या मुलांना दोन दोन सोन्याच्या मोहरा बक्षीस दिल्या व आपलें स्मरण म्हणून त्या त्यांनीं आपल्याजवळ ठेवाव्यात असें विनविलें. रामचंद्रपंताची ही विनवणी कुकनें मान्य केली आणि त्या वस्तू त्यानें आपल्या संग्रहीं ठेविल्या व तसें ग. ज. ला कळविलें. त्याबरोबर ग. ज. उसळला व त्यानें कुकची चांगलीच खरडपट्टी काढिली. कोणीही असल्या देणग्या खाजगत म्हणून न ठेवतां त्या कंपनी सरकारांत ताबडतोब जमा करावयाच्या असा कंपनी सरकारचा कायदा होता व त्याविरुद्ध कुकचें हें वर्तन झाल्याकारणानें त्याची चांगलीच हजेरी घेतली गेली आणि ते जिन्नस कंपनी सरकारांत सुपूर्त करण्याबद्दल त्यास फर्मान आलें.

कंपनी सरकारच्या या वेड्यावांकड्या कायद्यानें या कमिशनरांची पंचाईत झाली होती. असा प्रसंग लोच्या वेळींही घडून आला. इ. स. १८२५ त लोची जयपूर येथें बदली झाली व तो तिकडे निघाला. त्या वेळीं बाजीरावानें त्यास आपलें एक स्मृतिचिन्ह म्हणून ५००० स किंमतीचा एक पोषाख

देण्याचें ठरविलें व तो त्यानें आपली खाजगी मालमत्ता म्हणून ठेवावा असें परोपरीनें विनविलें. लोला कंपनीचा कायदा माहीत होता व तो पोषाख आपणास स्वीकारतां येणार नाहीं हेंही पण तो जाणून होता. पण बाजीरावाचें मन दुखवूं नये म्हणून त्यानें एक युक्ती काढिली. आपण जयपूरला कायम झाल्यावर ब्रह्मावर्ताच्या कमिशनरनें या प्रकरणीं नकार द्यावा अशी योजना करून तो जयपूरला गेला. रामचंद्रपंतानें दिलेल्या देणगीचा मात्र त्यानें स्वीकार केला व त्या देणगीच्या मोबदल्यांत त्यानें त्यास एक सोन्याचें घड्याळ दिलें व हा सौदा मिटविला. लो नंतर ब्लॅकरला सुद्धां अशीच खिलात देण्याचा प्रयत्न झाला व कुकला तर ग. ज. ची चांगलीच थप्पड बसली. कंपनी सरकारच्या नोकरांनीं कोणत्याही प्रकारच्या देणगीचा स्वीकार करावयाचा नाहीं असा निर्बंध होता. पण कंपनी सरकारकडून बाजीरावाच्या नोकरवर्गास दरवर्षास खालीलप्रमाणें देणगीदाखल पैसे मिळत.

संक्रान्त रु. ७५; वसंतपंचमी रु. ५०; होळी रु. ९०; दसरा रु. ९५; दिवाळी रु. ८०; नाताळ रु. १७५. पुढें लॉर्ड बेंटिंकच्या कारकीर्दीत खर्चाची पुष्कळच काटाकाट झाली त्यांत हा देकार बंद करण्यांत आला.

इ. स. १८३० मध्याच्या सुमारास महावस्त्रांचें राजकारण सुरू झालें. आणि त्यापासून मोठा धोका निर्माण होण्याचा संभव साहेबास वाटूं लागला. श्रृंगेरीच्या शंकराचार्यांस २,२०० रुपये किंमतीचीं वीस महावस्त्रें शेषशास्त्र्यामार्फत दक्षिणेस पाठविण्याचें रावबाजीनें ठरविलें. त्यासाठीं योग्य तो परवाना काढण्यांत आला आणि शेषशास्त्र्यानें ब्रह्मावर्त सोडलें. त्या वेळेला लॉर्ड वुईल्यम बेंटिंकची कारकीर्द चालू होती. त्याला हातचा बाण सुटल्यासारखें वाटलें. हा शेषशास्त्री दक्षिणेंत जाऊन फार मोठें राजकारण करणार असें त्यास वाटलें. तेव्हां त्यानें त्याच्या जाण्यास बंदी केली व तसा हुकूम काढिला. दरम्यानच्या काळांत शास्त्री ब्रह्मावर्ताहून निसटला. तो काशीस दाखल झाला व तेथून दक्षिणेकडे निघालाही. शास्त्री पुढें व साहेबाचा हा हुजूरहुकूम मागें अशी ही धांवाधांव सुरू झाली. शेवटीं शास्त्र्यास बंदी झाली. शास्त्र्याची कसून तपासणी झाल्यानंतर तो निरुपद्रवी ठरला व नंतर त्याची शंकराचार्यांकडे रवानगी झाली.

कुक आपल्या कमिशनरच्या जागीं दाखल झाला. पण त्या बिचाऱ्याची कारकीर्द सुखासमाधानांची झाली नाहीं. तो कामावर दाखल झाला त्याच वेळीं या कमिशनरच्या कचेरींतील इंग्रजी लेखनिक नाबाकिसन मित्र नांवाचा एक बंगाली गृहस्थ होता. हा चणचणीतपणें इंग्रजी बोले म्हणून त्याचा दिमाख ऑफिसमध्यें जास्तच वाढला होता. जॉनसननंतर कुक त्या जागेवर दाखल होण्याच्या दरम्यान आयर्विन नांवाचा एक गृहस्थ कमिशनरचें काम पाहात होता. तो कचेरीच्या कामांत कच्चा होता. त्याचा फायदा नाबाकिसन मित्रानें घेतला व कमिशनरच्या कचेरींतील एक हजार रुपये घेऊन तो पसार झाला. त्यास पकडण्यांत येऊन सात वर्षांची त्याला शिक्षा झाली. या मित्राच्या भानगडींत कचेरींतील कांहीं कागदपत्र नाहींसे झाले. त्यामुळें कांहीं प्रकरणांचें अनुसंधान जमेना. त्यामुळें कुकला फार त्रास झाला. यानंतर त्याला त्रास देणारा दुसरा एक प्रसंग घडून आला. त्यामुळें अधिकारीवर्गानें त्यास फारच छेडलें. तो प्रकार असा : कुक ब्रह्मावर्तास दाखल झाल्यानंतर त्यानें दिवाण रामचंद्रपंताचे घरास सहकुटुंब भेट दिली. या भेटीचे वेळीं रामचंद्रपंतानें कुकच्या कुटुंबास एक सोन्याच्या मोहरांची मोहनमाळ व त्याच्या मुलांना दोन दोन सोन्याच्या मोहरा बक्षीस दिल्या व आपलें स्मरण म्हणून त्या त्यांनीं आपल्याजवळ ठेवाव्यात असें विनविलें. रामचंद्रपंताची ही विनवणी कुकनें मान्य केली आणि त्या वस्तू त्यानें आपल्या संग्रहीं ठेविल्या व तसें ग. ज. ला कळविलें. त्याबरोबर ग. ज. उसळला व त्यानें कुकची चांगलीच खरडपट्टी काढिली. कोणीही असल्या देणग्या खाजगत म्हणून न ठेवतां त्या कंपनी सरकारांत ताबडतोब जमा करावयाच्या असा कंपनी सरकारचा कायदा होता व त्याविरुद्ध कुकचें हें वर्तन झाल्याकारणानें त्याची चांगलीच हजेरी घेतली गेली आणि ते जिन्नस कंपनी सरकारांत सुपूर्त करण्याबद्दल त्यास फर्मान आलें.

कंपनी सरकारच्या या वेड्यावांकड्या कायद्यानें या कमिशनरांची पंचाईत झाली होती. असा प्रसंग लोच्या वेळींही घडून आला. इ. स. १८२५ त लोची जयपूर येथें बदली झाली व तो तिकडे निघाला. त्या वेळीं बाजीरावानें त्यास आपलें एक स्मृतिचिन्ह म्हणून ५००० स किंमतीचा एक पोषाख

देण्याचें ठरविलें व तो त्यानें आपली खाजगी मालमत्ता म्हणून ठेवावा असें परोपरीनें विनविलें. लोला कंपनीचा कायदा माहीत होता व तो पोषाख आपणास स्वीकारतां येणार नाहीं हेंही पण तो जाणून होता. पण बाजीरावाचें मन दुखवूं नये म्हणून त्यानें एक युक्ती काढिली. आपण जयपूरला कायम झाल्यावर ब्रह्मावर्ताच्या कमिशनरनें या प्रकरणीं नकार द्यावा अशी योजना करून तो जयपूरला गेला. रामचंद्रपंतानें दिलेल्या देणगीचा मात्र त्यानें स्वीकार केला व त्या देणगीच्या मोबदल्यांत त्यानें त्यास एक सोन्याचें घड्याळ दिलें व हा सौदा मिटविला. लो नंतर ब्लॅकरला सुद्धां अशीच खिलात देण्याचा प्रयत्न झाला व कुकला तर ग. ज. ची चांगलीच थप्पड बसली. कंपनी सरकारच्या नोकरांनीं कोणत्याही प्रकारच्या देणगीचा स्वीकार करावयाचा नाहीं असा निर्बंध होता. पण कंपनी सरकारकडून बाजीरावाच्या नोकरवर्गास दरवर्षास खालीलप्रमाणें देणगीदाखल पैसे मिळत.

संक्रान्त रु. ७५; वसंतपंचमी रु. ५०; होळी रु. ९०; दसरा रु. ९५; दिवाळी रु. ८०; नाताळ रु. १७५. पुढें लॉर्ड बेंटिंकच्या कारकीर्दींत खर्चाची पुष्कळच काटाकाट झाली त्यांत हा देकार बंद करण्यांत आला.

इ. स. १८३० मध्याच्या सुमारास महावस्त्रांचें राजकारण सुरू झालें. आणि त्यापासून मोठा धोका निर्माण होण्याचा संभव साहेबास वाटूं लागला. श्रृंगेरीच्या शंकराचार्यांस २,२०० रुपये किंमतीचीं वीस महावस्त्रें शेषशास्त्र्यामार्फत दाक्षिणेस पाठविण्याचें रावबाजीनें ठरविलें. त्यासाठीं योग्य तो परवाना काढण्यांत आला आणि शेषशास्त्र्यानें ब्रह्मावर्त सोडलें. त्या वेळेला लॉर्ड वुईल्यम बेंटिंकची कारकीर्द चालू होती. त्याला हातचा बाण सुटल्यासारखें वाटलें. हा शेषशास्त्री दाक्षिणेंत जाऊन फार मोठें राजकारण करणार असें त्यास वाटलें. तेव्हां त्यानें त्याच्या जाण्यास बंदी केली व तसा हुकूम काढिला. दरम्यानच्या काळांत शास्त्री ब्रह्मावर्ताहून निसटला. तो काशीस दाखल झाला व तेथून दक्षिणेकडे निघालाही. शास्त्री पुढें व साहेबाचा हा हुजूरहुकूम मागें अशी ही धांवाधांव सुरू झाली. शेवटीं शास्त्र्यास बंदी झाली. शास्त्र्याची कसून तपासणी झाल्यानंतर तो निरुपद्रवी ठरला व नंतर त्याची शंकराचार्यांकडे रवानगी झाली.

इकडे हें महावस्त्राचें राजकारण चालू असतां तिकडे एक दुसरेंच राजकारण उभें राहिलें. या राजकारणांतील मुख्य नायक हा सुरतेचा एक पतपेढीवाला सावकार होता. त्याचें नांव तुळशीराम मथाराम. त्याच्या तोंडावर देवीचे वण असून तो वर्णानें काळा व प्रकृतीनें दणकट होता. हा गृहस्थ चांगला श्रीमान असून त्याचा अलाहाबादला फार मोठा वाडा होता. तो मोठ्या थाटांत राहात असे; तो आठ–दहा नोकर व पालखी बाळगून होता. त्याची एक पेढी कलकत्त्याला होती व अलाहाबादला नवी पेढी उघडण्याचा त्याचा विचार होता. तो एकदां ब्रह्मावर्ताला गेला होता. त्याचा मुलगा माणिकचंद हा तर ब्रह्मावर्तासच राहात असे. अशा या तुळशीरामानें लिहिलेलीं पांच–सात पत्रें पकडण्यांत आलीं. त्यांतील दोन मराठींत होतीं, तीन गुजराथींत व दोन पर्शिअनमध्यें होतीं. त्यांतील मराठी पत्रें फारच मजेदार होतीं. एक खुद्द बाजीरावास होतें व दुसरें त्याची थोरली पत्नी वाराणशीबाई हिच्या नांवानें होतें. त्यांचा मतितार्थ असा कीं, मालकमसाहेबानें महाराजांचें काम बहुतांशीं केलें आहे व राहिलेलें लवकरच होईल. त्यासाठीं बाजीरावानें त्यास मुखत्यारपत्र द्यावें. तसेंच त्या कामासाठीं लागणारा पैसाही पाठवावा. याशिवाय राणीसाठीं व युवराजासाठीं मोतींही खरिदले असून ते संधी साधून पाठविण्यांत येतील. सुरतेहून हीं पत्रें आणणारास अटक झाली. धाकदपटशा झाला, जाब-जबान्या झाल्या. पण त्यांतून कांहींच निर्माण झालें नाहीं. बाजीरावानें या गोष्टींसंबंधीं कानावर हात ठेविले. त्याचें या प्रकरणीं कांहीं एक अंग नसावें असें सिद्धही झालें व ता. ३० जून १८३० ला तसें कुकनें ग. ज. ला लिहिलेंही. बाजीरावाच्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्याच्याकडून पैसे उकळण्यासाठीं या गोष्टी घडतात असेंही कुकनें कंपनी सरकारास कळविलें.

कुकच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं एक प्रकरण निष्कारण चिघळलें. इ. स. १८२७ त बाजीरावानें दोन मुलगे दत्तक घेतले. त्या प्रसंगानें ग. ज. नें एक खिलात (पोषाख) आपणांस नजर करावा व आपणांकडून जी परत-भेट होईल तिचा स्वीकार करावा असें त्या वेळचा कमिशनर जॉनसन याच्या-मार्फत विनविलें होतें. ही त्याची विनंति मान्यही झाली होती. कारण त्याला

कारणें तशींच झालीं होतीं. या वेळीं कंपनीला कर्ज पाहिजे होतें व तें मिळविण्यासाठीं ही साखरपेरणी चालू होती. बाजीरावाजवळ मराठींत लिहिलेलें ता. ९ सप्टेंबर १८२७ चें एक जॉनसनचें पत्र होतें. त्याचा आशय असा होता कीं, बाजीराव व कंपनी सरकार यांचा स्नेह दिवसानुदिवस वृद्धिंगत होत आहे. कंपनी सरकारनें दत्तविधानप्रसंगानें एक खिलात धाडण्याचें मान्य केलें आहे. महाराजांनीं कंपनी सरकारास सहा लाख रुपयांचें कर्ज पूर्वीं दिलें आहे व आतांही कांहीं कर्ज देण्याचा त्यांचा मानस आहे. पण यापुढें मात्र कंपनी सरकारनें त्यांच्याकडे कर्जाची मागणी करूं नये. या पत्राच्या आधारावर कंपनी सरकारकडे बाजीरावानें खिलातची मागणी इ. स. १८३१ त केली. या पत्राची पुष्कळ भवति न भवति झाली. त्यांतून निर्माण होणाऱ्या परिणामांचा व राजकारणांचा विचार झाला व कंपनी सरकारनें नकारात्मक उत्तर धाडिलें. लॉर्ड बेंटिंकचें असें म्हणणें पडलें कीं, इ. स. १८२७ त ही गोष्ट झाली त्या वेळीं लॉर्ड ॲम्हर्टची कारकीर्द चालू होती. तेव्हां ही गोष्ट बाजीरावानें त्याच्या राजवटींत करून घ्यावयास पाहिजे होती. आतां ती गोष्ट होणें शक्य नाहीं. लॉर्ड बेंटिंकच्या या उत्तरानें बाजीरावाची दारूण निराशा झाली. तो चिडला, चरफडला आणि जागच्या जागीं हात चोळीत बसला.

या प्रकरणानंतर फारसें कांहीं झालें नाहीं. कुकची कारकीर्द संपली व व जेम्स मॅनसनची सुरू झाली. मॅनसनची कारकीर्द म्हणजे एक विचित्र योगायोगच. मॅनसन स्वतःही नोकरी करण्यास नाखूष होता. तेथें मिळणारा पगार त्यास अपुरा वाटे. तो वाढवून घेण्याची खटपट त्यानें केली; पण त्यांत त्याला अपयश आलें. पण योगायोग असा कीं, पांच–सहा वर्षांच्या नोकरीनंतर आतांपर्यंतचे बाकीचे सर्व कमिशनर बदलले गेले पण हा मात्र तेथें वीस वर्षें रखडला! इ. स. १८५१ मध्यें बाजीरावाच्या मृत्यूनंतर तेथून त्याची सुटका झाली. या वीस वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दींत अनेक राजकारणें झालीं; पण त्यांत बाजीरावाचा कांहीएक संबंध नसे. पण त्याच्या नांवाचा नांवापुरता उपयोग होऊन हीं रामायणें रचलीं जात. त्यांत मराठे, उत्तर हिंदुस्थानी, युरोपिअन्स व ॲंग्लो इंडियन्स या सर्व लोकांचा भरणा असे. त्यांचा उद्योग म्हणजे वडाची साल पिंपळाला

लावून कांहीं तरी भानगड निर्माण करावयाची आणि बाजीराव किंवा रामचंद्रपंत दिवाण यांच्याकडून पैसे उपटण्याचा घाट घालावयाचा. त्यांत राजकारण फार थोडें असे; पण डोकेबाज फसवाफसवीचाच प्रकार फार.

इ. स. १८३३ मध्यें कृष्णदत्त नांवाच्या एका माणसानें बाजीरावाचा मेहुणा लक्ष्मणराव याच्याशीं संगनमत करून दसऱ्याच्या दिवशीं बाजीरावाला पकडून पुण्यास नेण्याचा कट केला होता व त्यासाठीं सशस्त्र लोकांची जमवाजमव केली होती. पण चौकशीअन्तीं असें आढळून आलें कीं, दसऱ्याच्या दिवशीं बाजीरावाला पकडून त्याच्या अंगावरील भारी किंमतीचें जडजवाहीर सोनें–नाणें व खजिना लांबविण्याचा कृष्णदत्ताचा तो बेत होता. आपण बाजीरावाला पुण्याला नेऊं, या एका वाक्यानें कृष्णदत्ताच्या तडाक्यांत बाजीरावाचा मेहुणा लक्ष्मणराव सांपडला इतकेंच. मॅनसनला त्यांत कांहींच तथ्य वाटलें नाहीं. त्यानें तसें ग. ज. ला कळविलें. यानंतर इ. स. १८३३ व ३६ त सरसेनापती बापू गोखले यांची पत्नी यमुनाबाई हिच्यामार्फत भोंसले व आनंदराव या दोन भानगडच्या गृहस्थांनीं बाजीरावाचा दिवाण रामचंद्रपंत याच्यावर कांहीं बाकी उकरून काढिली. मॅनसननें या गोष्टीची नीट चौकशी केली तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें कीं, रामचंद्रपंत हा बापू गोखल्याचा सरंजामदार होता हें खरें; पण हें बालंट सोळा–सतरा वर्षांनंतर उकरून काढण्यांत आलें आहे. इतके जुने हिशोब सांपडतही नाहींत. याशिवाय भोंसले काय किंवा आनंदराव काय हीं दोन्हीं माणसें पाताळयंत्री आहेत व त्यांच्या नादीं ही बाई लागल्यामुळें बाजीराव व रामचंद्रपंत हे दोघेही नाखूष आहेत; त्यामुळें हा तंटा उपस्थित झाला आहे. तेव्हां हें प्रकरण मॅनसननें फेटाळून लाविलें व या प्रकरणाचा निकाल लाविला. इ. स. १८३४ त एक गंमतीदार प्रसंग घडून आला. बाजीराव, त्याची विधवा भावजय म्हणजे चिमाजीअप्पाची बायको व तिची मुलगी यां तिघांवर फोर्ट वुइल्यम कोर्टांत हजर राहण्याबद्दल यशोदाबाईतर्फे समज देण्यांत आली. यशोदाबाई म्हणून सवाई माधवरावाच्या बायकोचें नांव धारण करणारी एक तोतया बाई निर्माण झाली. या बाईनें सुद्धां बाजीरावास बराच त्रास दिला. पण ही अभागी स्त्री इ. स. १८०१ पासून कैदेंत होती व

कैद भोगीत असतांच तिचा रायगडच्या किल्ल्यावर ता. १४–१–१८११ ला अन्त झाला होता. तेव्हां या प्रकरणांतही त्रासापलीकडे कांहीं निर्माण झालें नाहीं.

ब्रह्मावर्ताच्या ३३ वर्षांच्या दीर्घकालीन वास्तव्यांत लुटुपुटींचींच राजकारणें घडून आलीं. त्यांपैकीं दोन मात्र गंभीर स्वरूपाचीं होतीं. त्यांतील पहिलें हिअरसेचें. हिअरसे ही एक मोठी कर्तबगार व्यक्ति होती, अठराव्या शतकांत त्यानें अनेक संस्थानिकांच्या पदरीं नोकरी बजाविली होती. तो इ. स. १८०० मध्यें शिंद्यांच्या पदरीं होता. नंतर राजपुतान्यांत स्वत:साठीं एक संस्थान निर्माण करण्याचा त्याचा बेत होता. पण पुढें या अँग्लो इंडियनची व्यवस्था चांगल्या प्रकारें लागल्यामुळें त्यानें तो बेत सोडून दिला. नंतर त्यास कंपनी सरकारकडून ८०० रु. चें संतोषवेतन मिळालें. त्यावर तो गुजारा करूं लागला. दरम्यान इंग्रज–मराठ्यांची लढाई संपली तेव्हां या शिपाईगड्यानें एका मुसलमान स्त्रीशीं लग्न करून रोहिलखंडांत करेली येथें वास्तव्य केलें. पण त्याचें खटपटी मन त्यास स्वस्थ बसूं देईना. तो इ. स. १८०८ त गंगेची शास्त्रीय पद्धतीनें टेहळणी करणाऱ्या एका साहसी मंडळांत दाखल झाला. त्यानंतर तिबेट व मानससरोवराची पाहणी करण्यासाठीं एक मंडळ निघालें होतें त्यांतही त्याची उपस्थिति होतीच. इ. स. १८१४ त झालेल्या गुरख्यांच्या लढाईंत हिअरसेनें चांगलीच कामगिरी बजावली व पुढें बरेलीला झालेलें रोहिल्यांचें बंड मुरगळून काढण्यांत त्यानें सरकारास भरघोंसपणें मदत केली. या कामगिरीचें पारितोषिक म्हणून त्यास सरकारांतून एक समशेर बक्षीस देण्यांत आली आणि मेजर म्हणून त्याची नेमणूक झाली. यानंतर इ. स. १८२४ त भरतपूरच्या वेढ्यांत हा गृहस्थ चांगलाच चमकला. त्याच्या आयुष्यांतील ही त्याची कामगिरी शेवटचीच.

इ. स. १८३२ मध्यें ही व्यक्ति पुन्हां एकदां चमकली ती निराळ्याच प्रकारानें. त्यानें बाजीरावाला एक मराठींत पत्र लिहिलें व तें रामचंद्रपंताच्या नांवानें पाठविलें. पत्र मोठें डोकेबाज होतें व त्यानें सुचविलेला मार्गही सनदशीर व कायदेशीर होता. त्यानें तें पत्र दिवाणाकडे धाडिलें पण तें त्यानें स्वीकारलें नाहीं व तें तसेंच कमिशनरकडे सीलबंद धाडलें. त्या पत्रांतील मजकूर पुढीलप्रमाणें

होता. 'हिंदुस्थानाशीं व्यापार करणाऱ्या कंपनीचा करार इ.स.१८३२त संपत असून त्याची मुदत पुढें वाढविण्यांत येणार नाहीं व इंग्लंडचा राजा हिंदुस्थानचें राज्य आपल्या ताब्यांत घेईल. ग.ज.नें सरकारी नोकरांचे पगार प्रमाणाबाहेर कमी केले आहेत. तोच प्रसंग एकाद् वेळेस बाजीरावावर येईल व सर जॉन मालकमसाहेबानें चालू केलेली नेमणूक पुढें चालेल कीं नाहीं याची शंका आहे. तेव्हां बाजीरावानें बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे एक अर्ज करावा व सध्यां मिळणाऱ्या आठ लाख संतोषवेतनाच्या बद्दल्यांत दक्षिणेंत आपल्याकडे वंशपरंपरागत चालेल अशा एका संस्थानाची मागणी करावी. लढाई संपल्यानंतर पुण्याची लूट कंपनी सरकारनें इंग्लंडला पाठविली. त्याच्यासंबंधींही विचारणा करावी. कारण ती लूट लढाईच्या धामधुमींत झालेली नाहीं; तेव्हां तिच्यावर कंपनी सरकारचा हक्क नाहीं. तेव्हां या गोष्टी घडवून आणण्यासाठीं प्रथम बोर्ड ऑफ डायरेक्टर्सना अर्ज करावा व नंतर बोर्ड ऑफ कंट्रोलकडे दाद मागावी. या दोन ठिकाणीं दाद न लागल्यास मग राजाकडे अर्ज करण्यांत यावा. तो या गोष्टींची ताबडतोब दाद घेईल. त्याच्याकडून अनुकूल असें उत्तर येतांच त्यास एक चतुर्थांश किंवा एक द्वितीयांश खजिना देण्यांत यावा. हें दायतें मिळावें म्हणून राजा जहागिर देण्यास सिद्ध होईल.' याच्यापुढें हिअरसेनें असेंही सुचविलें होतें कीं, त्याचा एक स्नेही लवकरच इंग्लंडला जाणार असून तो या सर्व खटपटी करील. तो स्वत: तीन ठिकाणीं बाजीरावाचे तीन अर्ज घेऊन जाईल व बाजीरावाचा मुखत्यार म्हणून काम करील. हीअरसेचें हें म्हणणें रामचंद्रपंतास मान्य असल्यास तो ब्रह्मावर्तास उत्तमपैकीं इंग्रजी जाणणारा एक दक्षिणी ब्राह्मण धाडणार होता. त्या ब्राह्मणाच्या मार्फत सर्व बारीकसारीक ठरवाठरवी होणार होती.

हीअरसेचा हा खटाटोप खटाटोपच ठरला! त्यांत त्यानें कोणत्याही प्रकारचा गुप्तपणा राखला नाहीं. सर्व गोष्टी उघडाउघड केल्या. दिवाणाकडून हा अर्ज घेऊन हिअरसेचा पट्टेवाला कमिशनरपुढें उभा राहिला व तो त्या खलित्याचें उत्तर मागूं लागला! कंपनी सरकारकडून या प्रकरणीं हिअरसेला खुलासा विचारतां त्यानें ग. ज. ला स्पष्टच कळविलें कीं, बाजीरावानें तशी खटपट करावी म्हणून मीच त्यास तसें सुचविलें आहे. हिअरसेचें हें म्हणणें ऐकल्यानंतर ग. ज. नें त्याची

चांगलीच तासडपट्टी काढिली व पुन्हां त्यानें असल्या भानगडी केल्यास त्यास चांगलेंच शासन होईल किंवा त्याचें पेन्शन बंद करण्यांत येईल म्हणून त्यानें खडसाविलें.

इ. स. १८३८ च्या डिसेंबरांत लॉर्ड ऑकलंडनें मॅनसनजवळ विचारणा केली कीं, रावबाजी हा जनार्दन नारायण देशपांडे याच्यामार्फत साताऱ्च्या प्रतापसिंहाशीं कांहीं कारस्थान करीत असून दोघांचा पत्रव्यवहार चालू असल्याचें आमच्या निदर्शनास आलें आहे. तरी त्या बाबतींत त्यास जाब विचारावा व त्यास असें स्पष्टपणें बजावावें कीं, त्यानें असल्या गोष्टी करून कंपनी सरकारचा नाहक रोष पत्करूं नये, त्यांत त्याचें नुकसान आहे. लॉर्ड ऑक्लंडच्या पत्रावरून मॅनसनची व बाजीरावाची प्रत्यक्ष मुलाखत ता. २८।१२।१८३८ ला झाली. या प्रसंगीं बापू गोडबोले व रामचंद्रपंत दिवाण हे हजर होते. या प्रकरणीं बाजीरावाला विचारतांच त्यानें ही गोष्ट साफ नाकारली व जनार्दन नारायण देशपांडे नांवाचा कोणी मनुष्य प्रतापसिंहाशीं बोलणीं चालणीं करण्यासाठीं आपण कधींच नेमला नाहीं असेंही पण बाजीरावानें सांगितलें. ही मुलाखत झाली त्या वेळीं त्याचें मन खुलें होतें व त्याच्या चेहऱ्यावरून तो या भानगडींत मुळींच नसावा असें स्पष्ट वाटत होतें. या प्रकरणीं मॅनसननें असें कळविलें कीं, जनार्दन नारायण देशपांडे हा पूर्वीं ब्रह्मावर्तास राहात असे. स्वभावानें तो भानगड्या होता. त्यानें बाजीरावाच्या नांवाचा उपयोग सातारकर छत्रपतींकडून पैसे काढण्यासाठीं केला असावा व तसें केल्यास कैदेंत डांबून पडलेला बाजीराव हा आपलें काय करणार असें त्यास वाटत असावें इतकेंच. यापेक्षां या राजकारणांत फारसें तथ्य नाहीं. ही पत्रापत्री चालली होती तोंच तिकडे प्रतापसिंहाचा कारभार आटोपला. त्यास गादीवरून खालीं खेचण्यांत आलें व त्याची रवानगी काशीस झाली. त्यामुळें या राजकारणाचें महत्त्वच संपलें.

सातारकर छत्रपतींचें प्रकरण विझतें न विझतें तोंच दुसऱ्या एका राजकारणाचा मोठा स्फुलिंग बाहेर पडला. ता. २९ एप्रिल १८३९ ला

होता. 'हिंदुस्थानाशीं व्यापार करणाऱ्या कंपनीचा करार इ.स. १८३२त संपत असून त्याची मुदत पुढें वाढविण्यांत येणार नाहीं व इंग्लंडचा राजा हिंदुस्थानचें राज्य आपल्या ताब्यांत घेईल. ग.ज.नें सरकारी नोकरांचे पगार प्रमाणाबाहेर कमी केले आहेत. तोच प्रसंग एकाद् वेळेस बाजीरावावर येईल व सर जॉन मालकमसाहेबानें चालू केलेली नेमणूक पुढें चालेल कीं नाहीं याची शंका आहे. तेव्हां बाजीरावानें बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे एक अर्ज करावा व सध्यां मिळणाऱ्या आठ लाख संतोषवेतनाच्या बदल्यांत दक्षिणेंत आपल्याकडे वंशपरंपरागत चालेल अशा एका संस्थानाची मागणी करावी. लढाई संपल्यानंतर पुण्याची लूट कंपनी सरकारनें इंग्लंडला पाठविली. त्याच्यासंबंधींही विचारणा करावी. कारण ती लूट लढाईच्या धामधुमींत झालेली नाहीं; तेव्हां तिच्यावर कंपनी सरकारचा हक्क नाहीं. तेव्हां या गोष्टी घडवून आणण्यासाठीं प्रथम बोर्ड ऑफ डायरेक्टर्सना अर्ज करावा व नंतर बोर्ड ऑफ कंट्रोलकडे दाद् मागावी. या दोन ठिकाणीं दाद् न लागल्यास मग राजाकडे अर्ज करण्यांत यावा. तो या गोष्टींची ताबडतोब दाद घेईल. त्याच्याकडून अनुकूल असें उत्तर येतांच त्यास एक चतुर्थांश किंवा एक द्वितीयांश खजिना देण्यांत यावा. हें दायतें मिळावें म्हणून राजा जहागिर देण्यास सिद्ध होईल.' याच्यापुढें हिअरसेनें असेंही सुचविलें होतें कीं, त्याचा एक स्नेही लवकरच इंग्लंडला जाणार असून तो या सर्व खटपटी करील. तो स्वत: तीन ठिकाणीं बाजीरावाचे तीन अर्ज घेऊन जाईल व बाजीरावाचा मुखत्यार म्हणून काम करील. हीअरसेचें हें म्हणणें रामचंद्रपंतास मान्य असल्यास तो ब्रह्मावर्तास उत्तमपैकीं इंग्रजी जाणणारा एक दक्षिणी ब्राह्मण धाडणार होता. त्या ब्राह्मणाच्या मार्फत सर्व बारीकसारीक ठरवाठरवी होणार होती.

हीअरसेचा हा खटाटोप खटाटोपच ठरला! त्यांत त्यानें कोणत्याही प्रकारचा गुप्तपणा राखला नाहीं. सर्व गोष्टी उघडाउघड केल्या. दिवाणाकडून हा अर्ज घेऊन हिअरसेचा पट्टेवाला कमिशनरपुढें उभा राहिला व तो त्या खलित्याचें उत्तर मागूं लागला! कंपनी सरकारकडून या प्रकरणीं हिअरसेला खुलासा विचारतां त्यानें ग. ज. ला स्पष्टच कळविलें कीं, बाजीरावानें तशी खटपट करावी म्हणून मीच त्यास तसें सुचविलें आहे. हिअरसेचें हें म्हणणें ऐकल्यानंतर ग. ज. नें त्याची

चांगलीच तासडपट्टी काढिली व पुन्हां त्यानें असल्या भानगडी केल्यास त्यास चांगलेंच शासन होईल किंवा त्याचें पेन्शन बंद करण्यांत येईल म्हणून त्यानें खडसाविलें.

इ. स. १८३८ च्या डिसेंबरांत लॉर्ड ऑकलंडनें मॅनसनजवळ विचारणा केली कीं, रावबाजी हा जनार्दन नारायण देशपांडे याच्यामार्फत सातारच्या प्रतापसिंहाशीं कांहीं कारस्थान करीत असून दोघांचा पत्रव्यवहार चालू असल्याचें आमच्या निदर्शनास आलें आहे. तरी त्या बाबतींत त्यास जाब विचारावा व त्यास असें स्पष्टपणें बजावावें कीं, त्यानें असल्या गोष्टी करून कंपनी सरकारचा नाहक रोष पत्करूं नये, त्यांत त्याचें नुकसान आहे. लॉर्ड ऑक्लंडच्या पत्रावरून मॅनसनची व बाजीरावाची प्रत्यक्ष मुलाखत ता. २८।१२।१८३८ ला झाली. या प्रसंगीं बापू गोडबोले व रामचंद्रपंत दिवाण हे हजर होते. या प्रकरणीं बाजीरावाला विचारतांच त्यानें ही गोष्ट साफ नाकारली व जनार्दन नारायण देशपांडे नांवाचा कोणी मनुष्य प्रतापसिंहाशीं बोलणीं चालणीं करण्यासाठीं आपण कधींच नेमला नाहीं असेंही पण बाजीरावानें सांगितलें. ही मुलाखत झाली त्या वेळीं त्याचें मन खुलें होतें व त्याच्या चेहऱ्यावरून तो या भानगडींत मुळींच नसावा असें स्पष्ट वाटत होतें. या प्रकरणीं मॅनसननें असें कळविलें कीं, जनार्दन नारायण देशपांडे हा पूर्वीं ब्रह्मावर्तास राहात असे. स्वभावानें तो भानगडचा होता. त्यानें बाजीरावाच्या नांवाचा उपयोग सातारकर छत्रपतींकडून पैसे काढण्यासाठीं केला असावा व तसें केल्यास कैदेंत डांबून पडलेला बाजीराव हा आपलें काय करणार असें त्यास वाटत असावें इतकेंच. यापेक्षां या राजकारणांत फारसें तथ्य नाहीं. ही पत्रापत्री चालली होती तोंच तिकडे प्रतापसिंहाचा कारभार आटोपला. त्यास गादीवरून खालीं खेचण्यांत आलें व त्याची रवानगी काशीस झाली. त्यामुळें या राजकारणाचें महत्त्वच संपलें.

सातारकर छत्रपतींचें प्रकरण विझतें न विझतें तोंच दुसऱ्या एका राजकारणाचा मोठा स्फुलिंग बाहेर पडला. ता. २९ एप्रिल १८३९ ला

मॅनसननें ग. ज. ला कळविलें कीं, बाजीरावाला ग्वाल्हेरच्या बाजूनें दक्षिणेकडे पळवून नेण्याचा एक कट उघडकीस आला आहे. या कटाची कानगी मॅनसनला दोन–तीन महिने होती. अयोध्या प्रांतांत या कामासाठीं घोडदळाची उभारणी चालू होती व त्याची संख्या चार हजारांपासून दहा हजारांपर्यंत ऐकूं येत होती. या स्वारांचें वेतन दरमहा रु. ३० ठरलें होतें व गंगापार झाल्यावर दोन महिन्यांचा पगार आगाऊ मिळणार होता. या सर्व बातम्या मॅनसनला कळत होत्या; पण प्रत्यक्षपणें कांहींतरी घडण्याची वाट तो पाहात होता. इतक्यांत ता. २५ एप्रिलला बाजीरावानें आपल्या दिवाणास–रामचंद्रपंतांस कळविलें कीं, अयोध्या प्रांतांत माझा खजिना लुटण्याकरितां लोकांची जमवाजमव चालू आहे. तेव्हां योग्य तजवीज करावी. या कटाचा म्होरक्या पिराजी म्हणून होता. त्यास पकडण्यांत आलें. तो बाजीरावाच्या शरीरसंरक्षक स्वारांचा प्रमुख होता व बाजीरावाच्या मर्जींतील होता. त्याच्याबरोबर आणखी चार–पांच लोकांना अटक झाली. चौकश्या झाल्या, जाबजबाब झाले, धाकदपटशा झाला; पण त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. पण या कटाची कानगी बाजीरावास असावी असा ग्रह मॅनसनचा व रामचंद्रपंताचा झाला. पण या कटाची वर्दी बाजीरावानेंच दिल्यानें वरील ग्रहास बैठक मिळेना. तेव्हां ग. ज.कडून बाजीरावास कळविण्यांत आलें कीं, पुन्हां अशी भानगड झाल्यास कडक उपायांची योजना करावी लागेल तरी महाराजांनीं सावध असावें.

इकडे हें चालू होतें तोंच लखनौला एक मोठी गमतीदार गोष्ट घडून आली. ता. ६ मे १८३९ ला लखनौचा रेसिडेन्ट कॉजफील्ड याची श्रीनिवासराव नांवाच्या एका ब्राह्मणानें मुलाखत घेतली व एक गंभीर स्वरूपाची हकीगत सांगितली. त्यामुळें ग. ज. ला या प्रकरणीं जास्त लक्ष घालावें लागलें. ती हकीगत अशी कीं, हैद्राबाद येथें बाजीरावाचे दोन मध्यस्थ श्रीनिवासरावास भेटले. त्यांनीं कानपूरला दरमहा २५० रु. ची नोकरी देतों असें सांगून त्यास बिठूरला आणिलें. त्या ठिकाणीं बाजीरावाची व त्याची मुलाखत झाली. बाजीरावाच्या सांगण्यावरून श्रीनिवासराव दिवाणास भेटला व त्यानें त्यास सांगितलें कीं, मी एक ब्राह्मण असून मला वाटेंत चोरांनीं लुटलें. या थाटेखालीं दीनपणांत

त्यानें ब्रह्मावर्तास एक वर्ष काढिलें. त्यानंतर कलकत्त्यास जाऊन पोलिटिकल व सीक्रेट डिपार्टमेंटचा सेक्रेटरी सर वुइल्यम मॅक्नेथेन नांवाचा होता तेथें त्यास भेटून त्याच्याकडून मॅनसनची बदली करावयाची व रामचंद्रपंतास कैद करावयाचें या उद्देशानें तो तिकडे निघाला. त्या वेळीं त्याच्याबरोबर दोन माणसें देण्यांत आलीं आणि त्याचा पगार तीनशें रुपये ठरला. त्याला सांगितलेलीं कामें घडवून आणण्यासाठीं एक–दोन लाख रुपये खर्च झाला तरी चालेल असेंही पण त्यास सांगण्यांत आलें. त्याप्रमाणें तो मॅक्नेथेनला व इतर मंडळींना भेटला; पण त्याच्याजवळ कोणत्याही प्रकारचें अधिकारपत्र नसल्याकारणानें त्यास कांहींही करतां आलें नाहीं. त्या ठिकाणीं तो दहा महिने राहिला; पण बाजीरावाकडून त्यास कांहींच सूचना आल्या नाहींत म्हणून तो कलकत्त्याहून काशीस येऊन तेथें राहूं लागला. तेथें त्यानें आपल्या कुटुंबीयांसह राहावें म्हणून त्यास सांगण्यांत आलें, व त्याचा पगार चारशें रुपये ठरला. तीन महिन्यानंतर बाजीरावाकडून त्यास ब्रह्मावर्तास पाचारण झालें. पेशव्यांचा वकील म्हणून श्रीनिवासरावानें नेपाळला काम करावयाचें होतें. परशुराम बनिया नांवाच्या गृहस्थाबरोबर तेथें जावयाचें होतें. तेथें फार मोठें काम होतें. नेपाळच्या राजाबरोबर फार मोठें राजकारण चालू होतें व तें काम जोखमीचें होतें. नेपाळच्या व ब्रह्मदेशच्या राजांशीं असा करार झाला होता कीं, त्यांनीं पेशव्यास पेशवेपदावर पुन्हां स्थापन करावें व बाजीरावानें त्यांस या कामानिमित्त दोन कोट रुपये द्यावे. हा करार ठरला होता व पुढील उद्योगासाठीं श्रीनिवासरावानें नेपाळला जावयाचें होतें. त्याप्रमाणें श्रीनिवास पेशव्यांचा वकील म्हणून नेपाळला गेला. तेथें नेपाळ–नरेशांचा गुरु व दिवाण रघुनाथराव म्हणून होता त्याची व श्रीनिवासरावाची मुलाखत झाली. तेव्हां श्रीनिवासनें रघुनाथरावास सांगितलें कीं, तो बाजीरावाचा वकील असून ठरल्याप्रमाणें दोन कोटींपैकीं एक कोट रुपये आगाऊ विसार म्हणून लवकरच देण्यांत येतील व राहिलेले बाजीरावाची गादीवर स्थापना झाल्यानंतर दिले जातील, यानंतर खुद्द नेपाळनरेशांची व त्याची भेट झाली; तेव्हां एक लक्ष शस्त्रास्त्रें व चाळीस लष्करी तुकड्या जय्यत तयार असल्याचें नेपाळच्या महाराजांनीं त्यास सांगितलें व जरूर पडल्यास चिनी लष्कराचें साहाय्य आपणांस

मिळेल असेंही महाराज त्यास म्हणाले. त्यानंतर त्यांनीं पैशासंबंधीं चौकशी केली. तेव्हां परशुराम बनियानें त्यांस सांगितलें कीं, बाजीरावाकडून पैसे प्रथम काशीस धाडण्यांत येतील व तेथून ते नेपाळला आणविण्यांत येतील; इतक्या बोलाचालीनंतर ही मुलाखत संपली व मग परशुराम बनिया ब्रह्मदेशास गेला. यानंतर श्रीनिवासरावास नेपाळच्या महाराजांचा पैशांबद्दल तगादा सुरू झाला. तेव्हां पैसे लवकरच आदा होतील असें सांगून श्रीनिवासरावानें चौदा महिने काढिले. यापुढें थापा देणें व काल काढणें अशक्य झालें. तेव्हां राजाच्या परवानगीनें बाजीरावाकडे खटपट करण्यासाठीं म्हणून श्रीनिवासरावानें नेपाळ सोडलें व तो तडक लखनौला दाखल झाला व तेथें कॉजफील्ड या रेसिडेन्टास भेटून त्यानें ही सर्व हकीगत सांगितली व बाजीरावाकडून आपली थकबाकी वसूल करून देण्याबद्दल विनविलें. आपल्या विधानांच्या पुष्ट्यर्थ कागदी पुरावा आहे असें सांगण्यास तो चुकला नाहीं.

श्रीनिवासनें सांगितलेली ही हकीगत ऐकून कमिशनरचें माथें भडकून गेलें व काय करावें तें त्यास कळेना. श्रीनिवास असली एकादी कपोलकल्पित कथा निर्माण करण्याइतका कर्तबगार आहे अशी त्याची खात्री होती. पण तसेंच त्याच्या सांगण्यांत कांहीं तथ्यांश आहे असें त्यास निश्चयपूर्वक वाटत होतें. बाजीरावाचे व श्रीनिवासचे संबंध तितपत होते असेंही पण निदर्शनास आलें होतें. तसेंच काटमांडू व ब्रह्मावर्त येथें कांहींतरी राजकारण चालू असल्याच्या वार्ता होत्याच. मॅनसननें कानपूरचा रेसिडेन्ट काऊफील्ड यास श्रीनिवासला थांबवून धरण्याबद्दल लिहिलें. श्रीनिवास यास अनेक प्रश्नांनीं छेडल्यानंतर त्याची खात्री झाली कीं, तो नेपाळला गेला होता. पण तो बाजीरावाच्या सांगण्यावरून गेला होता कीं नाहीं हें सिद्ध होईना व त्यासाठीं पुरावा मिळेना.

यानंतर श्रीनिवासला ब्रह्मावर्तास आणण्यांत आलें. तेथें मॅनसननें त्याची उलटतपासणी केली, त्यावरून तर त्याची खात्रीच झाली कीं, श्रीनिवास हा एक ढोंगी मनुष्य आहे. त्याच्या नेपाळला जाण्याशीं बाजीरावाचा कांहींएक संबंध नाहीं. त्याप्रमाणें मॅनसननें ग. ज. ला लिहिलें कीं, श्रीनिवासच्या प्रकरणांत फारसें तथ्य दिसत नाहीं. त्याच्या कलकत्त्याच्या कामांत मात्र तथ्यांश वाटतो.

तो काटमांडूला गेला असावा हेंही खरें असेल. काटमांडूचा रेसिडेन्ट हॉगसनही माझ्याशीं सहमत आहे. नेपाळनरेश व बाजीराव यांच्यामध्यें कांहींतरी राजकारण चालू आहे खास. पण तें चालविणारी व्यक्ति म्हणून श्रीनिवासला मुद्दाम धाडण्यांत आलें असेल असें वाटत नाहीं. एकाद् वेळेस असें असेल कीं, नेपाळी राजकारणाची कानगी श्रीनिवासला असावी व त्याचा फायदा घेऊन तो काटमांडूला गेला असावा व तेथें बाजीरावाचा वकील म्हणून स्वतःचा फायदा करून घेण्यासाठीं त्यानें हा लांडा कारभार केला असावा. पण त्याचें हें पत्र ग. ज.कडे दाखल होण्यापूर्वींच तेथून खलिता आला कीं, श्रीनिवास हा एक लफंगा असून त्याच्यावर काहीइतकाही विश्वास ठेवूं नये. त्यास ब्रह्मावर्ताच्या बाहेर हुसकावून लावाव. अशा तऱ्हेनें या राजकारणाची तड लागली. पण बाजीरावावर या गोष्टीचा परिणाम झाला. बाजीरावाच्या भोंवतालीं वावरणाऱ्या लटपट्या लोकांना राजकारण करण्यास वाव मिळूं नये म्हणून त्याच्यावरील बंधनें कडक झालीं. पण त्यामुळें बाजीरावास एकंदरीनें सुखच झालें. त्याला होणारा निष्कारण त्रास टळला.

पेशवे घराण्याचा शेवट : १७

गप्प बसण्यासाठीं सालीना आठ लाख रुपयांचा सवाल रावबाजीनें साहेबास टाकला आणि तो त्यानें पुरा केला. कारण त्या वेळचा पेशवा सामान्य नव्हता. पळून पळून त्याची दमछाक झाली होती; तरी पण लक्षावधी समशेरींचें सामर्थ्य त्याच्यामागें खडें होतें. ग्वाल्हेरपासून ते थेट म्हैसूरपर्यंत त्याच्या सामर्थ्याचे पाश पसरले होते. पण त्या सर्वांना एका सूत्रांत गोवून त्यांची हुकमती-बरहुकूम चाळवाचाळव करण्याची ताकद व अक्कल रावबाजींत नव्हती. तरी सुद्धां रावबाजीस गप्प बसविण्यांत साहेबाच्या फार मोठ्या आकांक्षा फलित होणार होत्या. शें—दीडशें वर्षें उराशीं बाळगलेल्या महत्त्वाकांक्षा सिद्धीस जाणार होत्या. प्रत्यक्ष सिद्धीच त्याच्या हातीं येणार होती. म्हणून मालकमसाहेबानें करार पुरा केला. फार मोठी कटकट संपली म्हणून साहेबाचा जीव भांड्यांत पडला. मालकमनें केलेल्या या व्यवहाराबद्दल त्याची चहा झाली. पण एकंदरीनें हा व्यवहार साहेबाला फार तोट्यांत पडला. कारण प्रत्यक्ष करारावर सह्या करतांना मालकमसाहेबाला कल्पनाही नसेल कीं, पदाधिकारी झाल्यापासून वीस बावीस वर्षांच्या आंत मराठी साम्राज्याची धुळधाण करणारें हें उलट्या पावलांचें रावबाजीचें जिवंत पिशाच्च कंपनी सरकारच्या मानगुटीस तेहतीस वर्षें बसेल व कंपनी सरकारचा एवढा मोठा पैका हबकेल. कारण रावबाजी हतप्रभ झाला त्या वेळीं त्याचें वय ४२ वर्षांचें होतें. तो व्यसनी आणि विषयलंपट होता.

प्रकृतीही त्या मानानें ठणठणीत नव्हती. बाकीचे पेशवे अल्पायुषी होते. या सर्व अनुमानांवरून रावबाजीची जीवनयात्रा लवकर संपेल अशी कंपनी सरकारची कल्पना होती. पण ती कल्पनाच ठरली व व्यवहारांत मात्र निराळेंच झालें. बाजीराव पाऊणशें वर्षें जगला !

बिठर येथील सर्व कारभाराचा आढावा घेऊन त्याचें इतिवृत्त कंपनी सरकारास कळविण्याचा रावता होता. त्यांत बाजीरावाच्या प्रकृतीसंबंधींही कळविण्यांत येई. इ. स. १८३१ च्या इतिवृत्तांत फेथफुल नांवाचा एक हंगामी कमिशनर म्हणतो कीं, 'इ. स. १८२५ पासून बाजीरावाच्या प्रकृतींत कांहींएक बदल नाहीं. ती आहे तशीच आहे. पेशवा व्यायाम फार थाडा घेतो. घोडा व हत्ती यांच्यावर तो चुकूनसुद्धां स्वारी करीत नाहीं. स्वारीचे सर्व व्यवहार पालखींतून चालतात. दुसऱ्याची स्वारीसुद्धां पालखींतूनच निघते. इ. स. १८४० मध्यें रावबाजीची जीवनयात्रा संपत आल्याचा भास कंपनी सरकारास झला व त्याच्या मृत्यूसमयीं कमिशनरनें कसें वागावें याच्या सूचनाही धाडण्यांत आल्या ! बाजीरावाचा खजिना व जंगम जिनगी त्यांच्या भोंवतालचे लोक नाहींशी करतील असें कंपनी सरकारास वाटत होतें. तेव्हां बाजीरावानें आपल्या चीजवस्तूची बारकाव्यानें कागदोपत्रीं नोंद करावी व त्याची कशी काय विल्हेवाट लावावयाची याच्याही सूचना नोंदवून ठेवाव्यात. तसेंच कमिशनरनेंही बाजीरावाचें प्राणोत्क्रमण होतांच सर्व गोष्टींचा ताबा घेऊन त्यास मोहरा ठोकाव्या. या वेळीं मदतीसाठीं लष्करही जय्यद तयार ठेवावें व कानपूरच्या मॅजिस्ट्रेटनें त्याला या कामीं साहाय्य करावें. बाजीरावाच्या जिनगीचा कडेकोट बंदोबस्त व तपशीलवार नोंद त्याच्या परिवारांतील जवळच्या नोकरवर्गासमक्ष व त्याच्या जिनगीवर हक्क सांगणाऱ्या अस्सल वारसांदेखत करण्यांत यावी व तिच्यावर योग्य तो पहारा ठेवण्यांत यावा—पण कंपनी सरकाराच्या वरील सूचना जागच्या जागींच राहिल्या. पळपुट्या रावबाजीनें मृत्यूच्या हातावर तुरी दिल्या. बाजीरावाची प्रकृती ठीक होती. इतक्यांत आपली जीवनयात्रा संपविण्याचा त्याचा विचार नव्हता.

इ. स. १८४१ च्या मार्चमध्यें रावबाजीस अर्धांगाचा झटका आला पण

त्यांतून तो सहीसलामत निसटला व त्याची प्रकृति निकोप झाली. इ. स. १८४७ त बाजीराव ७३ वर्षांचा होता. या वेळीं तो जवळ जवळ आंधळा झाला होता. या व्यंगाशिवाय बाकी सर्व प्रकृति ठीक होती. इ. स. १८५० त रघुनाथराव विंचूरकर हा काशीयात्रेला जात असतां त्याचा मुक्काम कानपूरला होता व तेथून तो रावबाजीच्या भेटीस वारंवार जात असे. रघुनाथरावाचा मुक्काम दोन महिने होता. त्या वेळीं रघुनाथरावाच्या व बाजीरावाच्या खूप भेटी झाल्या. गप्पा गोष्टी झाल्या. त्या वेळीं बाजीरावाची प्रकृती ठीक होती. त्याची स्मरणशक्तीही तरल होती. त्या समयीं काशीयात्रेला जाण्याचें बाजीरावाच्या मनांत होतें. तो ती यात्रा केव्हांतरी लवकरच करणार होता पण शेवटीं ती गोष्ट तशीच राहिली व ता. २६ जानेवारी १८५१ चा दिवस उगवला. बाजीराव एकाएकीं आजारी झाला. त्याची स्थिती एकदम चिंताजनक झाली. डॉ. मॅकिनॉन व डॉ. चेक या उभयतांनीं बाजीरावाची नीट वैद्यकीय तपासणी केली व त्याची प्रकृती चिंताजनक आहे असें आपलें मत दिलें. पण न जाणों तो एकाद वेळेस सुधारेल असेंही सांगण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. पण ते मागच्या दाखल्या-वरून बोलले इतकेंच. बाजीरावाची जीवनयात्रा आतां संपत आली होती. त्या रात्रीं त्याची प्रकृती फारच बिघडली व त्याचा काल समीप आला आहे असें लोकांस वाटूं लागलें. त्यांनीं तातडतोब कमिशनरला बोलाविलें. दहा ते अकराच्या दरम्यान कमिशनर आला. त्याची व बाजीरावाची गांठ–भेट झाली व इतकें घाबरण्याचें कारण नाहीं, असें त्यास वाटून त्यानें बाजीरावास व इतर मंडळीस धीर दिला व असेंही सांगितलें कीं, कठीण वेळ आल्यास मला बोलवा. माझी उपस्थिती असावी असें बाजीरावास वाटल्यास तातडतोब पाचारण करा, अनमान करूं नका; असें सांगून कमिशनर मॅनसन आपल्या निवासस्थानीं गेला. रात्र संपली आणि दिवस उगवला पण बाजीरावाचा काल त्याच्याभोंवतीं घिरट्या घालतच होता. क्षणाक्षणांनीं त्याची घटका भरत होती. अशा स्थितींत २८ जानेवारी इ. स. १८५१ रोजीं मंगळवारीं सकाळीं आठ ते नऊच्या दरम्यान हा शेवटचा पेशवा दुनियेपार झाला! मराठी साम्राज्याचा शेवटचा दिवस पाहणाऱ्या रावबाजीनेंही आपला शेवटचा दिवस पाहिला.

तेहतीस वर्षांच्या प्रदीर्घ अमदानींत बाजीरावानें आपल्याभोंवतीं बराच गोतावळा निर्माण केला होता. तो मोठ्या थाटानें राही. तो तसा उदार असल्याकारणानें त्याच्या दानाची गंगा गोरगरिबांपर्यंत पोहोंचली होती. गोरगरिबांना अन्नदान आणि ब्राह्मणांना देकार हे तर त्याच्या आयुष्याचे विशेष होते. त्याच्या घातक आजाराची वार्ता हां हां म्हणतां सगळीकडे फैलावली. ब्रह्मावर्तांत सर्व रस्ते माणसांनीं फुलून गेले. जो तो बाजीरावाच्या प्रकृतीची चौकशी करीत होता. बाजीरावाचा अंत झाला आणि त्याची स्मशानयात्रा निघाली तों लोकांची तोबा गर्दी झाली. अशा तऱ्हेनें त्याचा अंतविधी झाला. त्याच्या मृत्यूनें अनेक लोक उघडे पडले व रोजगारहीन झाले. कमिशनरनें ब्रह्मावर्तास राहणाऱ्या बाजीरावाच्या आश्रितांची वर्गवारीनें यादी केली. त्यांत कांहींचा विचार करण्याचें कारण नव्हतें पण कांहींची स्थिति मात्र अत्यन्त केविलवाणी झाली होती. ते बाजीरावाचे समकालीन असल्याकारणानें वृद्धावस्थेनें जर्जर झाले होते. त्यांना काम करण्याची ताकद नव्हती. यांतील बहुतेक लोक दक्षिणी होते. त्यांतील कांहीं आपआपल्या गांवीं परतले व कांहींनीं बाजीरावाचा दत्तकपुत्र नानासाहेब याच्या आश्रयानें कसेबसे दिवस काढिले.

बाजीरावाच्या संपत्तिसंबंधीं फारच बभ्रा झाला होता पण त्यांत तथ्यांश नव्हता. बाजीरावाचा असा गैरसमज होता कीं, कंपनी सरकार आपल्या कुटुंबीयांची वंशपरंपरागत चालेल अशी कांहीं सोय करील. असा त्याचा दृढ विश्वास असल्यानें त्याची राहणी मोठी थाटदार व उदार असे. ज्यांचा स्वार्थ त्याच्या या उदार राहणीवर होता त्या लोकांनीं तोंडपुजेपणा करून श्रीमंतांस भर द्यावी व श्रीमंतांनीं उत्तेजी जादा असें वागावें असा हा जमाना जमला होता ! बाजीरावाचा मृत्यूपूर्वीं ४ वर्षें म्हणजे इ. स. १८४७ त, कमिशनरनें कंपनी सरकारास कळविलें होतें कीं, ' सांपत्तिक दृष्टीनें बाजीरावाची स्थिति समाधानकारक नाहीं. त्याचा आदा आणि व्यय जवळ जवळ सारखाच आहे. किंबहुना व्ययाचें पारडें जरा ढळतेंच दिसतें. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, त्याच्या कुटुंबीयांची तरतूद कांहींएक नाहीं. त्यांची हलाखी आहे. बाजीरावास चार लाख रुपयांचें कर्ज आहे.' या कमिशनरनें त्याच्या जिनगीचा

केलेला तपशील असा होता : त्यानें पांच टक्क्यानें कंपनी सरकारला सोळा लाख रुपये कर्जाऊ दिले होते. त्याचें उत्पन्न सालीना एशी हजार आहे, शिवाय, दहा लाख रुपये किंमतीचीं रत्नें, ऐशी हजारांचे सोन्याचे दागिने, वीस हजारांचीं चांदीचीं भांडीं व इतर सामान, याशिवाय सोन्याच्या मोहरा व इतर रोख नाणें तीस लाखांचें. सोन्याच्या नाण्यांपैकीं दोन तृतीयांश नाणीं कर्जनिवारणार्थ खर्च झालीं आहेत.

बाजीरावानें स्वत: निर्माण केलेला गोतावळा कांहीं कमी नव्हता. त्यानें एकंदर अकरा लग्नें केलीं. ब्रह्मावर्तास दाखल होण्यापूर्वीं सहा व ब्रह्मावर्तास पांच अशीं एकंदर अकरा लग्नें झालीं. पण त्याच्या सर्व बायका तरुणपणींच वारल्या. वाराणशीबाई व सरस्वतीबाई या दोघीच काय त्या ब्रह्मावर्तास आल्या. सरस्वतीबाई बाजीरावाची आवडती होती. तिचा मृत्यु ता. ३ जुलै १८२५ ला झाला. इ. स. १८१२ त बाजीरावाचें व सरस्वतीबाईचें लग्न झालें. तिला एक मुलगी झाली पण तीही लहानपणींच वारली. बाजीराव मालकमच्या स्वाधीन झाला त्या वेळीं वाराणशीबाई रायगडास होती. तो किल्ला इंग्रजांनीं मोर्चे लावून घेतला. तेव्हां बाईस खालीं उतरवून नवऱ्याकडे पोचविण्यांत आलें. त्या वेळच्या मारागिरींत शिवाजीचा राजवाडा व दप्तरखाना जळून गेला. वाराणशीबाई ही नाना रास्ते फाटक वांईकर यांची कन्या. हिचें व बाजीरावाचें लग्न ता. ११-६-१८०६ ला मेणवलीस नाना फडणविसाचे वाड्यांत झालें. तिच्या पोटीं ता. १०-१०-१८१० ला पुणें येथें एक पुत्र झाला. त्या प्रसंगीं बाजीरावानें मोठा उत्सव केला. त्याचा खर्च १७८६४१ रु. इतका झाला. शुकवारचे वाड्याजवळ पाण्याच्या घागरी ओतल्या तें पाणी नदीस जाऊन मिळालें! मुलाचें नांव वामनराव ठेविलें. परंतु हा मुलगाही पांच महिन्यांनीं ता. २७-३-१८११ ला शुक्रवारवाड्यांत मृत्यु पावला. बाजीरावाची पांचवी बायको वेणूबाई उर्फ कुसाबाई ही हरी रामचंद्र देवधर यांची कन्या. हिला बाईसाहेबही म्हणत. हिचें लग्न ता. ३-६-१८०८ ला झालें. हिला ता. १०-९-१८१६ रोजीं माहुलीस मुलगा झाला. पण तो दहावे दिवशींच निवर्तला व त्यानंतर अवघ्या दोन महिन्यांनींच कुसाबाई निवर्तली.

बाजीरावाच्या बायकांचीं नांवें : (१) भागीरथीबाई—ही धोंडभट भागवताची

कन्या. लग्न १६–७–१७८३,मृत्यु १७९३. (२) सत्यभामा किंवा सरस्वती–ही धोंडोपंत मंडलीकाची कन्या. हिचें लग्न १८–६–१७९३, मृत्यु ६–१–१७९७ मध्यें जांबगांवास शिंद्याच्या कैदेंत असतांना झाला व क्रिया मंढव्यास केली. (३) राधाबाई–ही चिंतामण हरी उर्फ दाजीबा फडके यांची कन्या. लग्न ता. १६–२–१७९७ व मृत्यू ता. ९–५–१८०६. (४) वाराणशीबाई व (५) वेणूबाई यांच्या हकीगती वर दिल्याच आहेत. (६) सरस्वतीबाई–बळवंतराव पेंडसे यांची कन्या. लग्न १८१२ त झालें. (७) सत्यभामाबाई–मुखरीकर अभ्यंकरांची कन्या. हिच्या भावाचें नांव परशुरामपंत. हिचें व बाजीरावाचें लग्न स. १८३० त झालें. यानंतर (८) गंगाबाई–बळवंतराव आठवले पाडळीकर यांची कन्या. हिला दोन मुली झाल्या. एक योगाबाई व दुसरी कुसुमाबाई. पहिली योगाबाई हिचा जन्म इ. स. १८४३ व लग्न इ. स. १८५५ त बापूसाहेब कुरुंदवाडकर पटवर्धन यांच्याशीं ब्रह्मावर्त येथें झालें. व पुढें तीनच वर्षांनीं म्हणजे इ. स. १८५८ त ती ब्रह्मावर्त येथें निधन पावली. दुसरी कुसुमाबाई उर्फ बयाबाई उर्फ सरस्वतीबाई आपटे हिचा जन्म इ. स. १६।१।१८४७ ब्रह्मावर्त येथें झाला व लग्नसमारंभ स. १८५५त इंदुरास ग्वाल्हेरचे बाबासाहेब आपटे यांचे चिरंजीव व बाजीरावाचा सरदार नारो विष्णु आपटे यांचे नातू गणपतराव उर्फ बापूसाहेब यांच्याशीं मोठ्या थाटानें झाला. बापूसाहेब इ. स. १८८३ त वारल्यावर बयाबाई काशीस जाऊन राहिली. तेथें तिच्या मालकीचा वाडा होता. इ. स. १९१३ मध्यें इतिहासकार राजवाड्यांनीं जाऊन तिची भेट घेतली व तिनें सांगितलेली सर्व हकीगत लिहून ठेविली आहे. ते म्हणतात, 'पेशव्यांच्या घराण्यांतील औरस संतती आज ही एकटी बाई आहे. ती निस्पृह, धैर्यशाली व अभिजात असून भटांच्या घराण्यांतिल सुखवट्याचीं ठेवण तिच्यांत दिसते. हिचा मृ. १९।६।१९१७ झाला. (९) मैनाबाई–ही गोखल्यांच्या घराण्यांतीलतिचा मृत्यु नेपाळांत सईबाईच्या पूर्वीं झाला (१०) सईबाई–ही रिसबूड यांच्या घराण्यांतील. तिचा मृत्यु इ. स. १८९६ त नेपाळांत झाला, व (११) ही अकरावी बायको चितळे घराण्यांतील होती.

अकरा बायकांचें लटांबर करूनही बाजीरावास औरस संतान लाभलें नाहीं. त्याची पुत्रसंततीच्या बाबतींत निराशा झाली. तेव्हां बाजीरावानें यावर तोड काढिली. त्यानें बोरघाटांतील माथेरानजवळच्या वेणगांव येथें राहणाऱ्या भट उपनांवाच्या एका सगोत्र कुटुंबास आपल्याजवळ आणिलें. त्या गृहस्थाचें नांव माधवराव भट व त्याच्या कुटुंबाचें नांव गंगाबाई. त्यांस धोंडू म्हणून एक मुलगा इ. स. १८२४ त झाला. हाच धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब पेशवे. यास बाजीरावानें ता. ७–६–१८२७ रोजीं दत्तक घेतलें व त्याचें नांव नानासाहेब ठेविलें. आपला वंश खंबीरपणें वाढत राहावा त्याला खंड पडूं नये म्हणून त्यानें आणखीही तरतूद केली. धोंडोपंताचा आणखी एक भाऊ व एक चुलतभाऊ यांसही दत्तक घेऊन टाकलें आणि एकाऐवजीं तीन वारस दत्तकपुत्र निर्माण केले. ते येणेंप्रमाणें: १ द. धोंडोपंत नानासाहेब. २ द. सदाशिवराव ऊर्फ दादासाहेब– या दादासाहेबास पांडुरंग रावसाहेब नांवाचा एक मुलगा होता. ३ द. गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब.

बाजीरावाच्या मृत्यूनें एक फार मोठा प्रश्न निर्माण झाला; तो म्हणजे सालीना आठ लाखांची देणगी त्याच्या वंशजाकडे चालू ठेवावयाची कीं नाहीं? वास्तविक बाजीराव मालकमच्या स्वाधीन झाला त्या वेळीं त्याचा व त्याच्या कुटुंबीयांचा योगक्षेम व्यवस्थितपणें चालेल असा भरपूर तनखा देण्याचें अभिवचन मालकमनें दिलें होतें. पण त्याचा तो तनखा अगदीं त्याच्या स्वतःपुरता होता. पण बाजीरावाची मनापासूनची उत्कट इच्छा अशी होती कीं, आपल्या कुटुंबाची वंशपरंपरागत अशी व्यवस्था ब्रिटिश सरकारनें करावी. शेवटीं शेवटीं त्याचा दत्तकपुत्र नानासाहेब याची व्यवस्था सरकारनें करावी म्हणून त्यास एकसारखी काळजी वाटे व ही गोष्ट तो मॅनसनजवळ बोले. तेव्हां मॅनसननें इ. स. १८३७ च्या डिसेंबरमध्यें कंपनी सरकारास या बाबतींत लिहिलें. तेव्हां मॅनसनला चक्कच उत्तर आलें कीं, हा तनखा फक्त बाजीरावापुरता होता. त्याचा त्याच्या वंशजांशीं कांहींएक संबंध नाहीं व बाजीरावाच्या कुटुंबीयांची व्यवस्था करण्यास सरकार बांधलेलें नाहीं. याशिवाय कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडेही या संबंधीं विचारणा करण्यांत आली. पण तेथेंही या गोष्टीसंबंधीं कांहीं विचार

करावा असें डायरेक्टरांना वाटलें नाहीं. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, आपल्या वारसासाठीं जिनगी जतन करून ठेवण्याचें साधन बाजीरावाजवळ मोप होतें. तेव्हां त्यानें अशी अपेक्षा करूं नये. पण या गोष्टीचा भुंगा बाजीरावानें व त्याचा दिवाण रामचंद्रपंत यानें कमिशनरच्या मागें एकसारखा लाविला. तेव्हां कमिशनरनें इं.स. १८४७त ग. ज. ला या प्रकरणीं विचारलें. इतकेंच काय पण या प्रकरणाची तड लावण्यासाठीं रामचंद्रपंताचा मुलगा नारायणराव यास इंग्लंडला पाठविण्याबद्दलचे विचारही बाजीराव व रामचंद्रपंत या दोघांच्या डोक्यांत घोळत होते. पण असें करून आपलें काम साधणार नाहीं, जर कांहीं साधलें तर तें ग. ज. च्या भलेपणानेंच साधेल अशी त्या दोघांची खात्री झाल्यामुळें तो नाद त्यांनीं सोडला.

बाजीरावाच्या नेमणुकीचें हें प्रकरण त्या वेळच्या वर्तमानपत्रांतूनही चांगलेंच गाजलें. 'दिल्ली गॅझिट'नें या प्रकरणीं सरकारवर चांगलाच हल्ला चढविला. नालायक श्रीमंतांना पोसणाऱ्या सरकारच्या धोरणासंबंधीं टीका करून गॅझिट म्हणतें कीं, 'पांच टक्क्यांनीं कर्ज काढणारें हें सरकार एकट्या बाजीरावासाठीं तीन कोट रुपये खर्च करतें, या मूर्खपणाला कोणतें नांव द्यावें हेंच कळत नाहीं. ज्यांचीं राज्यें आपण हिसकलीं त्यांना पोसण्याचें हें सरकारी धोरण मोठें जगावेगळें आहे. पदच्युत झालेला राजा इंग्लंडमध्यें भिक्षेवर आपली उपजीविका करतो. हिंदुस्थानांत सुद्धां राज्य बळकावणारे राजे पूर्वींच्या राजास ठार तरी करतात किंवा कोणी जिवंत राहिल्यास त्याच्या पोटापाण्याची काळजी ते करीत नाहींत. आमचें कंपनी सरकार मात्र मोठें मासलेवाईक आहे. तें असले नालायक राजे पोसतें इतकेंच नव्हे तर त्यांच्या दत्तकांस मान्यता देऊन त्यांची खंडित होऊं पाहणारी वंशवेला चालू करतें. बाजीरावास आतांपर्यंत देण्यांत आलेल्या पैशांत गंगेचें धरण किंवा दिल्ली ते कलकत्ता लोहमार्ग सहज झाला असता.' या शेवटच्या वाक्यानें दिल्ली गॅझिटनें या प्रकरणाचा शेवट केला आहे.

रावबाजीच्या मृत्यूनंतर लवकरच मॅनसननें ब्रह्मावर्त सोडलें व त्याच्या जागीं मोरलंड नांवाच्या गृहस्थाची कमिशनर म्हणून नेमणूक झाली. मॅनसननें जातांना १० फेब्रुवारी १८५१ मध्यें 'नानासाहेबास कांहींतरी तनखा चालू

ठेवावा, फार तर तो कांहीं काळांनीं कमी कमी होत जावा ' असें लिहिलें होतें. पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. सरकारकडून नकारच आला. मोरलंडनेंही या प्रकरणीं खटपट केली पण त्यालाही अपयशच आलें. आतां कोणालाही या बाबतींत यश येणार नव्हतें. पण या वेळीं नानासाहेबाची स्थिति फारच चमत्कारिक झाली होती. त्याच्याबद्दल मोरलंड लिहितो, ' निष्कारण डामडौल करण्याची वृत्ती नानासाहेबाची नाहीं. तो अगदीं साधा आहे, पण त्याच्या परिवाराचा खर्च इतका जबरदस्त आहे कीं, तो त्याच्या उत्पन्नांत बसविणेंच अशक्य. त्यानें आपल्याकडून खर्चास पुष्कळच काट मारली आहे, तरी सुद्धां त्याचा खर्च त्याच्या उत्पन्नाच्या दुप्पट आहे. हत्ती, घोडे व उंट यांच्या पागा शिल्लक आहेत. आणि हीं खातीं तोंडें सांभाळणें महाकर्म कठीण. नानासाहेब हीं सर्व जनावरें काढण्याच्या खटपटींत आहे. पण ही गोष्ट झटपट होणारी नाहीं. स्वतःच्या पदरचें जनावर विकण्यांत इकडच्या लोकांना मोठी मानहानी वाटते. आणि हें दुःख नानासाहेबास फार ताप देतें. तेव्हां या गोष्टींचा विचार करून नानासाहेबास तनखा चालू ठेवावा.' मोरलंडनें असें लिहिलें होतें पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं हें सांगणें नकोच.

रावबाजीनें इ. स. १८४१ त एक मृत्युपत्र तयार केलें होतें. त्यांत त्यानें आपल्या गादीचा वारसा नानासाहेब यास दिला होता. त्या मृत्युपत्रावर ता. ३० एप्रिल १८४१ ला सह्या झाल्या. त्यावर मॅनसन, रामचंद्रपंत व रामचंद्रपंताचा मुलगा नारायणराव यांच्या साक्षीदार म्हणून सह्या आहेत. बाजीरावाच्या मृत्यूनंतर यशोदाबाई नांवाच्या एका बाईनें बाजीरावाचें म्हणून एक मृत्युपत्र निर्माण केलें. पण तें बनावट होतें.

रावबाजीच्या निधनाबरोबर ब्रह्मावर्ताचा खेळ खलास झाला. नानासाहेबासाठीं तनखा चालू ठेवण्याचे सर्व प्रयत्न फसले. आणि बिठूर येथील कमिशनरची कचेरी बंद करण्याचें सरकारी फर्मान दि. ३।१०।१८५१ ला हंगामी कमिशनरला—मोरलंडला मिळालें. ३१ ऑक्टोबरच्या आंत

कमिशनरची कचेरी बंद करावयाची होती. कमिशनरच्या हाताखालील नोकर-वर्गाची खालीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली. खेमदेव नांवाचा खजिनदार होता व अशिकअली नांवाचा मुनशी होता; त्या दोघांना सहा महिन्याचा पगार देऊन रजा देण्यांत आली. मार्टिन डेल नांवाचा इंग्लिश रायटर होता त्यास कानपूरच्या मॅजिस्ट्रेटच्या कचेरींत पंचवीस रुपये जादा पगार देऊन घेण्यांत आलें. जे कांहीं थोडे शिपाई होते त्यांना कॅन्टोनमेंटला पाठविण्यांत आलें. समारंभाच्या प्रसंगीं वापरण्यांत येणाऱ्या अशा कांहीं वस्तू होत्या त्या आग्र्याच्या लेफ्टनंट गव्हर्नरकडे पाठविण्यांत आल्या. त्या वस्तू येणेंप्रमाणें : एक चांदीची छत्री, एक चांदीचें पानदान, अत्तरदान आणि गुलाबपोश. तसेंच बाजीरावाला देण्यांत आलेली राहण्याची जागा नानासाहेबास फुकट देण्यांत आली. याशिवाय नानासाहेबास कोणत्याही तऱ्हेचे अधिकार नव्हते. त्यास कंपनी सरकारनें एक सामान्य नागरीक करून टाकिलें होतें.

'दिल्लीश्वरोवा जगदीश्वरोवा' म्हणून माजविण्यांत आलेलें इंद्रप्रस्थाचें जबरदस्त प्रस्थ घणाचे घाव घालून ज्या पेशव्यानें निकालांत काढलें, दिल्लीची पातशाही खिशांत घालणारे शिंदे–होळकरांसारखे सरदार ज्याच्या मानस-शक्तीनें निर्माण केले, तो 'पेशवा' निर्माल्यवत् झाला. धोंडोपंत नानाला इंग्रजानें दिलेला हा हिसका भयंकर होता. तो त्याला असह्य झाला. त्याच्या छातडांत हें शल्य एकसारखें सलत होतें.प्रतिकारार्थ झुंज द्यावी असें नानास एकसारखें वाटत होतें. पण मोका येत नव्हता. साहेब महाबली झाला होता व त्याला उखाड देणें शक्य नव्हतें. तरी पण मोका आला. इ. स. १८५७ च्या उत्थानाच्या ज्वाला भडकल्या व नाना त्यांत सामील झाला. तो नाना गार्दी या नांवानें प्रसिद्धीस आला. उत्थानाची धामधूम जिकडे तिकडे चालू झाली होती. अशा स्थितींत इ. स. १८५७ च्या जुलै महिन्यांत नाना कानपूर सोडून परिवारासह अयोध्या प्रान्तांत गेला. हीच तात्या टोपे व त्याची शेवटची मुलाखत. आतां हिंदुस्थानांत राहणें धोक्याचें असल्याकारणानें लपत छपत व हालअपेष्टा भोगत भोगत नाना आपल्या परिवारासह नेपाळांत निसटला. त्याच्याबरोबर दोघी मातोश्री, स्वतःचें व बंधूचें कुटुंब, पुतण्याचें कुटुंब याशिवाय कुसुमाबाई आपटे. वगैरे बराचे

मोठा परिवार होता. बंडाच्या प्रारंभापासून नानासाहेबाची व झांशीच्या राणीची गांठ नव्हती. रावसाहेबाची व तिची मात्र ग्वाल्हेरीस गांठ पडली होती. नेपाळांत अज्ञातवासांत कांहीं दिवस काढिल्यानंतर नानासाहेबास दोषी ज्वरानें नेपाळांत ठडाजवळ देवखरी येथें बुधवार ता. ६–१०–१८५८ ला देवाज्ञा झाली. उत्तरकार्य ठडाला झालें. नानासाहेबा-बद्दलच्या गप्पा उगीचच पिकल्या होत्या. त्यांत तथ्य नव्हतें. नाना-साहेबाच्या आधीं तीन महिने ता. १०–७–१८५८ रोजीं बाळासाहेबही दोषी ज्वरानें मरण पावला. स्वतः रावसाहेब व त्याचें कुटुंब रमाबाई हीं दोघें मात्र नेपाळांतून परत आलीं. इतकेंच नव्हे तर रावसाहेब झांशीच्या राणीस सामील झाला व त्या उभयतांनीं चांगलीच धामधूम माजविली. पुढें रावसाहेब पकडला गेला. त्यास ब्रह्मावर्त येथें राजवाडे यांच्या घरासमोर ता. २०–८–१८६२ रोजीं फांशीं देण्यांत आलें. नानासाहेबाच्या पश्चात काटमांडू येथें जाऊन पेशव्यांच्या बायांनीं एक राजवाडा बांधिला. तीन–चार लाख रुपये खर्च करून उत्पन्नासाठीं कांहीं गांव खरेदी केले. तसेंच नेपाळ हद्दींतच राणीगंज गांवाचा एक गांव नवीन वसवून तेथें एक रामाचें व एक लक्ष्मीनारायणाचें अशीं दोन मंदिरें बांधिलीं. आणि त्यांत मराठ्यांचा भगवा झेंडा व पेशव्याची गादी ठेविली. ती अद्यापही तेथें पाहावयास मिळते. बाजीरावाची बायको सईबाई इ.स. १८९६ त वारली. त्यापूर्वींच बाजीरावाच्या सर्व बायका वारल्या होत्या. या सर्व बायकांनीं आपला सर्व काळ मोठ्या साधुवृत्तीनें आणि पवित्र चारित्र्यानें काढिला. कान-पूरच्या बाबतींत नानासाहेबाचा काडीइतकाही संबंध नव्हता. उलट त्यानें इंग्रजांचे जीव वांचविण्याचीच खटपट केली असें बयाबाई (बाजीरावाची मुलगी) सांगते. ही बाई बंडाचा उपशम झाल्यानंतर ग्वाल्हेरीस आली आणि वैधव्य प्राप्त झाल्यानंतर काशीस जाऊन राहिली ती कायमचीच. तिनेंही आपला काल मोठ्या पावित्र्यपणानें काढिला. ती आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षीं ता. १९।६।१९१७ रोजीं काशीस निवर्तली. सईबाईच्या मृत्यूनंतर नेपाळ सरकारनें पेशव्यांची जहागीर खालसा केली. देवस्थान मात्र चालू असून त्याची पूजा-अर्चा तांबे नांवाच्या कुटुंबांकडे आहे. अशा तऱ्हेनें मराठ्यांच्या इतिहासांत

उज्ज्वल कीर्ति मिळविणाऱ्या पेशवे घराण्याचा अन्त राघोबा आणि त्याचा मुलगा रावबाजी यांच्या नादानीमुळें मोठा विस्मयजनक झाला.

तोतया नानासाहेब पकडला गेल्याची हकीगत ता. २६ ऑक्टोबर १८७४ च्या 'ज्ञानप्रकाश' वर्ष २६, अंक ८५, पान २ वर खालीलप्रमाणें आली आहे :

'आमचे वाचकांस माहीत आहे कीं, १८५७ चे बंडांत हे (नानासाहेब) पुढारी होते व जरा बंड मोडल्यासारखें झालें, तेव्हांपासून या मनुष्याचा पत्ता नाहींसा झाला. कोणी म्हणतात कीं, हा नेपाळांत जाऊन वेष बदलून राहिला. कोणी म्हणतात कीं, मुसलमान होऊन काबूल इराणकडे गेला. कोणाचें म्हणणें होतें कीं, हा खाण्यापिण्याच्या ददातीनें मरून गेला. सारांश, त्याचें काय झालें हें बरोबर माहीत नसल्यामुळें ज्याला जसें वाटेल तसा तो तर्क चालवी. आजपर्यंत सुमारें सोळा असामी नानासाहेब म्हणून पकडले. त्यांपैकीं एकही खरा निघाला नाहीं. या पकडलेल्या लोकांपैकीं कितीएक हाल होऊन मेले. आतां शिंदे सरकारांनीं नानासाहेब व बाळाराव पकडले आहेत. ही गोष्ट आम्ही लिहिण्याचे पूर्वींच आमचे वाचकांस कळली असेल. कोणी दुसऱ्यानें पकडलें असतें तर नानासाहेब खोटा पकडला असें आम्ही लागलेंच म्हटलें असतें. पण शिंदे सरकारची व नानासाहेबांची जुनी ओळख असेल असें आम्हांस वाटतें. त्यांची खुद्द ओळख नसली तरी ओळखींत नानासाहेबास ओळखणारीं पुष्कळ मनुष्यें असतील. यामुळें ही गोष्ट खरी असेल, अशी शंका उत्पन्न होते. टाईम्स ऑफ् इंडिआंत ज्या तारा आल्या आहेत त्यावरून असें दिसतें कीं, नानासाहेबानें शिंद्यास चिठ्ठी लिहिली कीं, 'मी तुम्हांस शरण आलों आहें. माझा तुम्ही बचाव करा.' दुसऱ्याचे दिवशीं सरकारची स्वारी शिलंगणाहून सुमारें नऊ वाजतां रात्रीं परत आल्यावर शिंदे सरकारास एका गोसाव्यानें बातमी दिली कीं, नानासाहेब व बाळासाहेब प्रसिद्ध बंडवाले पुष्कळ लोक बरोबर घेऊन आपले शहरांत आले आहेत. नाना व बाळा यांनीं बैराग्याचे पोषाख केले आहेत. कोणी म्हणालें कीं, महाराजांस मारण्याकरितां आले आहेत. कांहींचें म्हणणें होतें कीं, शहरांत फिसाद करण्याकरितां आले आहेत. असेंही टाईम्सच्या एका

बातमीदारानें लिहिलें आहे. पण तोच म्हणतो कीं, ही गोष्ट खोटी आहे. नानासाहेबानें महाराजांस पत्र लिहिलें कीं, 'मी आतां सांपडलों आहे. आतां मला तारा किंवा मारा.' हें पत्र पोहोंचल्याबरोबर महाराज घोड्यावर स्वार होऊन आपले दिवाणास बोलावण्याकरितां गेले. नंतर दिवाणास जो काय हुकूम द्यावयाचा होता तो देऊन आपण एक पायदळाची पलटण व एक स्वारांची पलटण व एक तोफखाना बरोबर घेऊन नानासाहेब उतरले होते तिकडे गेले. तेथें जाऊन नानासाहेबास मुजरा करून त्यास पालखींत बसवून आपले वाड्यांत घेऊन आले. इकडे दिवाण व आपसनअल्ली वकील हे रेसिडेंटाकडे जाऊन त्यास सुमारें अकरा वाजतां रात्रीं राजवाड्यांत घेऊन आले. आणि नानासाहेबांची व त्यांची गांठ घातली. सर्व रात्रभर शहरांमध्यें एकच गर्दी होऊन गेली होती, आणि कोठें दंगा होऊं नये म्हणून महाराजांनीं बंदोबस्त चांगला ठेविला होता. मुख्य मुख्य रस्त्यावर लष्करी पहारे उभे केले होते. आणि बहुतेक लष्कर सर्व रात्रभर तयार होऊन बसलें होतें. रात्रीं महाराज पहारे बरोबर आहेत किंवा नाहींत हें पाहण्याकरितां आपण खुद्द फिरत होते. २२ सावे तारखेस सकाळीं या कैदी लोकांस मुराचे छावणींतील अधिकाऱ्याचे ताब्यांत दिलें. त्यांनीं त्यांस बिड्या घालून वर जबरदस्त युरोपियनांचा पहारा ठेविला. ज्या वेळेस यास पकडलें तेव्हां मी नानासाहेब आहे असें कबूल केलें. परंतु पुढें तो नाहीं म्हणूं लागला. ज्या डॉक्टर लोकांनीं त्यास पाहिलें त्यांस हा नानाच आहे. याविषयीं शंकाच वाटते. कारण त्याचें वय फार थोडें दिसतें. या डॉक्टरांच्या म्हणण्यावरून हा नानासाहेब असेल असें वाटत नाहीं. हा कोणी तोतया नाना असावा असें दिसतें. किंवा पूर्वीं जसे पंधरा–सोळा धरले गेले, त्यासारखाच हा असावा असें दिसतें. हा पकडलेला मनुष्य नानासाहेब खरोखर असो किंवा नसो, यानें वर्तमानपत्रकर्त्यांवर एक मोठा उपकार केला आहे. त्यांस कांहीं दिवसपर्यंत लिहिण्याकरितां विषय यथास्थित दिला आहे, असे मधून मधून नानासाहेब निघतात ते बंद होण्याविषयीं आम्हांस तजवीज एकच दिसते. अधिक न बाधते या न्यायाप्रमाणें सरकारनें अशी तजवीज करावी कीं, नानासाहेब म्हणून जो मनुष्य पकडला जाईल त्यास फांशी देऊन टाकावें; मग तो

नानासाहेब नसला तरी चिंता नाहीं. कदाचित खरा नानासाहेब सांपडता तर त्यास फांशी देण्यास आपण सिद्धच आहों. तात्या टोपी फांशी दिला त्याविषयीं आतां कोणी नांव देखील काढीत नाहीं. तसेंच नानासाहेब म्हणून एक दोन मनुष्यें फांशीं दिलीं म्हणजे लोकांचीं मनें शांत होऊन त्याजविषयीं फारशी आशा राहाणार नाहीं. असें न केलें तर हे नानासाहेब आणखी किती वर्षें पुरतील हें सांगवत नाहीं.

रावबाजीच्या चरित्राचा व त्याच्या वंशजाचा धागा शेवटपर्यंत पोहोंचविल्यानंतर त्याचा धाकटा भाऊ चिमाजी आप्पा यांच्याविषयीं सांगावयास पाहिजे. हा त्याचा धाकटा भाऊ बाजीरावापेक्षां स्वभावानें चांगला व समंजस होता. प्रसंगीं त्यानें बाजीरावाला सल्ला फार चांगली व यथायोग्य दिली होती. बाजीरावाचे एकंदर ढंग पाहून त्यास अतिशय संताप येई व प्रसंग साधून तो त्याच्या त्या गैरवर्तनाबद्दल त्याचा कडक शब्दांत निषेध करी. त्यामुळें उभयतांत रहस्य राहिलें नाहीं. त्यायोगें चिमाजी आप्पास बराच त्रास झाला. उभयतांमध्यें पुष्कळदां सडकून खडाजंगी होई. त्याचा साहजिकच परिणाम असा झाला कीं, त्याचे खर्चास सुद्धां जरूरीप्रमाणें व वेळेवर मिळेनासें झालें. तेव्हां त्याची कुचंबणा फारच होऊं लागली. म्हणून त्यानें आपली नेमणूक स्वतंत्रपणें तोडून मागितली पण ती बाजीराव देईना. तेव्हां चिमाजी आप्पानें सत्याग्रह चालविला. तो उपास करूं लागला; पण बाजीराव या उपासास दाद देईना. तेव्हां त्यानें आपली तक्रार रेसिडेन्टाकडे गुदरली. त्यानें मध्यस्थी करून त्यास इ.स. १८०६ च्या मार्गशीर्ष महिन्यांत सालीना दोन लाख रुपये नेमणूक तोडून दिली. तथापि दोघांमध्यें तक्रारी वाढतच गेल्या. चिमाजी आप्पा शनवारवाड्यांतच राहात होता. परंतु वाड्यावर त्रिंबकजी डेंगळ्याचा बंदोबस्त असल्याकारणानें चिमाजीच्या भेटीस कोणी येईना. त्यामुळें त्याचे सामाजिक संबंध दुरावले. चिमाजी कोठें फिरतीवर गेल्यास त्यास कोणी भेटूं नये व त्याचा इतमाम राखूं नये अशा सक्त ताकिदी ठिकठिकाणच्या मामलेदारांस बाजीरावानें पाठविल्या. चिमाजी आप्पाचीं घोडीं सरकारचे कुरणांत चराईस असत तीं हुसकावून लावण्यांत आलीं. पण चिमाजी आप्पानें त्यांची व्यवस्था कांहीं

एक केली नाहीं. तेव्हां तीं घोडीं एक महिनाभर शनिवारवाड्याजवळ मोकळीं होतीं. शेवटीं कांहीं वैरणीवांचून मेलीं व कांहींना बाजीरावानें अन्याबा रहातेकराकडे दिलीं. अशा पोरकट तक्रारी एकसारख्या चालू असत. फारच अडचण झाली म्हणजे रेसिडेंटामार्फत तक्रारीचा निकाल लावला जाई.

चिमाजीनें बाजीरावास दोन वेळेला मोठा नामी सल्ला दिला होता. त्या गोष्टीवरून त्याची योग्यता अजमावतां येते. होळकराची चाल पुण्यावर झाली, त्या वेळीं बाजीराव घाबरला व तो इंग्रजांच्या आश्रयास वसईस निघाला. त्या वेळीं बाजीरावानें तसें करूं नये म्हणून चिमाजी आप्पानें त्यास परोपरीनें सांगितलें होतें. तसेंच इ. स. १८१७ च्या नोव्हेंबरमध्यें घोरपडीची लढाई झाल्यावर बाजीराव आपला अजबाब घेऊन पुरंदरकडे निघाला. त्या दारुण प्रसंगीं सुद्धां चिमाजी आप्पानें त्याचा कडक शब्दांत निषेध केला व तुम्ही जातीनें फौजेंत जाऊन ठांसून उभें रहा म्हणजे जय खात्रीनें मिळेल असें परोपरीनें सांगितलें, पण बाजीराव ऐकेना. तेव्हां निदान मला तरी लष्करांत जाण्यास परवानगी द्या अशी त्यानें विनंती केली. पण हाय ! ती सुद्धां नादान रावबाजीनें नाकारली आणि हट्टानें चिमाजीस बरोबर घेऊन तो पुरंदरकडे निघून गेला. चिमाजी आप्पाच्या आयुष्यांतील वर नमूद करण्यांत आलेले दोन्ही प्रसंग चिरस्मरणीय आहेत.

चिमाची आप्पाची स्त्री सीताबाई (दामले) ओंकारेश्वराचे देवळांत वाती लावावयास गेली असतां लुगड्यास आग लागून जळून ता. २६–२–१८०९ रोजीं मरण पावली. चिमाजी आप्पाच्या दुसऱ्या लग्नासंबंधीं खालील उल्लेख आहे. “ चिमाजी रघुनाथ यास सालीना दोन लक्ष रुपयांची नेमणूक केली त्यांत लग्नकार्य वगैरेंचा खर्च त्यांनीं करावा; परंतु त्यांचें लग्न करण्याविषयीं अनुमान दिसून प्रपंचास उदास झाले. त्याजकरितां सरकारांतून एक वेळ लग्न करावें असें एल्फिन्स्टन वकील यांचे विद्यमानें ठरवून कोपरगांव येथें वैशाख शु० १० शके १७३४ (ता० २०–५–१८१२) रोजीं लग्न महादाजीपंत जोशी यांच्या कन्येशीं केलें.” याशिवाय सत्यभामाबाई म्हणून मेंहदळे घराण्यांतील

चिमाजी आप्पाची एक बायको असल्याचा उल्लेख आढळतो. ती त्याची तिसरी बायको असावी.

बाजीराव उत्तरेकडे पळत सुटल्यानंतर चिमाजी आप्पानें त्याची बोरी मुक्कामीं रजा घेतली व नांदेड या ठिकाणीं गोदावरी उतरून तो स्वदेशीं १८१८ च्या जून महिन्यांत परत आला व फुलगांवीं राहिला. तेथें एल्फिन्स्टननें त्याची भेट घेऊन काशीस राहण्याची त्याची सर्व व्यवस्था करून दिली. ग. ज. कडून मंजुरी येईपर्यंत चिमाजी आप्पा चार महिने वसईस राहिला होता. तेथून परत फुलगांवास येऊन साहेबाची रजा घेऊन पौष महिन्यांत काशीला निघून गेला व इ. स. १८१९ त तो काशीस दाखल झाला. तेथें १०–११ वर्षें आयुष्य कंठल्यानंतर ता. ९।६।१८३० रोजीं मरण पावला. त्याच्या काशी येथील जीवनासंबंधीं कांहींच हकीकत उपलब्ध नाहीं. त्यास मूलबाळ नव्हतें. पेशवाई बुडाल्यानंतर सुद्धां रावबाजीचें व त्याचें रहस्य नसावें. झांशीच्या राणी लक्ष्मीबाईचा बाप मोरोपंत तांबे हा चिमाजी आप्पाच्या आश्रयास होता. तो त्याच्या निधनानंतर बाजीरावाचे आश्रयास गेला. पुढें १८५७ च्या स्वातंत्र्यसमरांत झांशीच्या लढाईंत मोरोपंत जबर जखमी झाला. तो हातीं लागतांच सर ह्यू रोजनें त्यास झांशीच्या राजवाड्यापुढें भर दुपारीं दोन वाजतां फांशीं दिलें !

लटक्या लढाया व राज्यारोहण : १८

मराठ्यांचें राज्य घशांत टाकण्यासाठीं कंपनी सरकारनें एक विचित्र देखावा निर्माण केला. ' सातारकर छत्रपतींना पेशव्याचा फार जाच असून त्यानें त्यांचे फार हाल चालविले आहेत, छत्रपतींशीं बंड पुकारून पुंड पेशवा देशांत फार धामधूम माजवीत आहे, तरी त्यास कोणी मदत करूं नये. जो कोणी या विरुद्ध वागेल त्याचा जमीन-जुमला जप्त होईल, असल्या प्रकारचे जाहीरनामे काढून बाजीरावाच्या अपकीर्तीचा ढोल वाजवून त्याची रसद ठार करण्यांत आली. इंग्रजांनीं माजविलेल्या फितुरीनें पेशव्यांचें सामर्थ्य फोल झालें व बाजीरावाच्या मूर्खपणानें त्याच्यांत भर पडून गोपाळ अष्ट्याच्या रणमैदानावर त्याचा एकीएक इमानदार सरसेनापति बापू गोखला निकालांत निघाला. बाजीरावाचा पराभव होऊन तो उत्तरेकडे पळत सुटला. त्यास तिकडे शिंद्याच्या मदतीची आशा वाटत होती. पण या त्याच्या अपेक्षा मृगजळाप्रमाणें फोल ठरल्या. अशिरगडचा किल्लेदार यशवंतराव लाड यास शिंद्याची पेशव्यास साहाय्य करण्याबद्दलचीं पत्रेंही गेलीं होतीं. ' श्रीमंत पेशव्याकडून मागणी येईल ती पुरवीत जावी. आमचा हुकूम नाहीं अशी सबब सांगूं नये. नाहींतर आमचे पदरीं बदनामी येईल. हें पत्र हजार पत्रांचे ठिकाणीं मानून त्याप्रमाणें वर्तन ठेवावें. (मिळचा इ. भाग ८) ' याप्रमाणें पत्र धाडणारा शिंदा खरोखरीच बाजीरावाचा पाठपुरावा करीत असेल असें वाटतें. पण दौलतरावाची वर्तणूक तशी

नव्हती. इंग्रजांच्या मागणीवरून अशिरगडच्या किल्ल्याची सोडचिठी शिंद्यांनीं केव्हांच दिली होती. पण त्याचा ताबा झाला नव्हता. अशिरगडचा किल्लेदार यशवंतराव लाड हा सहजासहजीं किल्ला खालीं करून देईना. त्यानें दिरंगाई चालविली. तेव्हां इ. स. १८१९ च्या फेब्रुवारीच्या अखेरीस मालकमनें किल्ल्यावर हल्ला चढविला. कित्येक हल्ले यशवंतरावानें मोठ्या शिताफीनें माघारीं फिरविले. पण शेवटीं नाइलाज होऊन त्यास किल्ला खालीं करून द्यावा लागला. तेव्हां किल्ल्यांत एक गुप्त कागदाची पेटी मिळाली. तींत पेशवा, आप्पासाहेब व दौलतराव यांचा स्वदस्तुरचा पत्रव्यवहार मालकम् यास पुष्कळच मिळाला. त्यांत किल्लेदारास दौलतरावाच्या हातचीं पत्रें होतीं कीं, त्यानें किल्ला इंग्रजांच्या हातीं देऊं नये. याबद्दल साहेबानें शिंद्यास जाब विचारला. त्यानें हीं पत्रें आपलींच असें कबूल केलें, परंतु बाजीरावाच्या भिडेस्तव आपणांस तसें करावें लागलें असें सांगून तो मोकळा झाला व म्हणाला कीं, 'मी बाजीरावास ग्वाल्हेरीस बोलाविलें होतें. कारण बाजीराव इकडे आतां येऊं शकत नाहीं, अशी माझी खात्री होती, पण बुडत्या माणसास काढतां येत नाहीं तर नुसतें हात पुढें करून त्यास आश्वासन देण्याचा फुकटचा चांगुलपणा तरी कां घेऊं नये ?'

शिंद्यांचें हें वर्तन पाहून मनाला चीड आल्याशिवाय राहात नाहीं. खुद्द बाजीराव व दौलतराव यांचे परस्पर संबंध लक्षांत घेतां शिंद्याच्या या वागणुकीची भेसुरता काळ्याकभिन्न काळोखांत लकाकणाऱ्या व्याघ्राच्या डोळ्यांप्रमाणें आणखीच भेसूर वाटते. भारताचा एकमेव बलशाली सम्राट होत असलेल्या साहेबाचीं मर्जी सुप्रसन्न करण्याकरितां शिंद्यानें अशी बगल मारली असें म्हणतां येत नाहीं. त्याच्या तोंडांतून वरीलप्रमाणें गरळ बाहेर पडलें हेंच खरें. कारण जिवाची पर्वा न करतां शिंद्याची हुकमत राखण्यासाठीं अखेरची झुंज घेणाऱ्या यशवंतराव लाडाचाही परामर्ष शिंद्यानें घेतला नाहीं. इंग्रजाचा तर तो बोलून चालून उघड उघड शत्रु होता. इंग्रजांस त्याची कींव येण्याचें कारणच नव्हतें. पुढें तो अन्नास मोताद झाला आणि दैवदुर्विलास असा कांहीं चमत्कारिक कीं, अशिरगडचा किल्लेदार म्हणून मिशीला पीळ भरून मानाचे मुजरे घेत शिंद्याच्या दरबारीं वावरणारा हा मातबर सरदार, एखाद्या दिवाभीताप्रमाणें शिरवळजवळ वाठार

बुद्रुक या आपल्या गांवीं येऊन कष्टमय जीवित कंठूं लागला. शिंद्याला नाहीं पण काळपुरुषाला त्याची दया आली आणि तो इ. स. १८२० त मरण पावला. काळ बदलला म्हणजे मोतीं–मोल माणसें मातीमोलानें मरतात हेंच खरें !'

'दौलतराव निदान का दोस्त' म्हणून रावबाजी ग्वाल्हेरकडे पळाला, पण शिंदा त्याचा दोस्त कीं दुष्मन काय ठरावयाचा तो ठरला. शिंद्याचें तें भेसूर रूप पराजित रावबाजीच्या लक्षांत आलें असल्यास त्यानें आपल्या कपाळावर हात मारला असेल. त्याची कंबर खचून गेली असेल. मराठी राज्याचा 'बदोबा' लिहून देतांना त्याला जितकें वाईट वाटलें असेल त्याहीपेक्षां दौलतराव शिंद्याच्या या निमकहरामीनें जास्त वाईट वाटलें असेल. उभी हयात दौलतराव माझा दोस्त, दौलतराव माझा दोस्त, असें ज्याच्याविषयीं म्हणत घालविली, काळ्या रात्रीं उपयोगी पडेल म्हणून ज्याच्याकडे मोठ्या आशेनें त्यानें पाहिलें, तोच दौलतराव अनन्यगतिक रावबाजीवर झडप घालणारा काळपुरुष ठरला. पहिल्या बाजीरावाभोंवतीं पंचप्राणांचे तट उभारणारा स्वामिनिष्ठ राणोजी शिंदा कोठें आणि प्रसंग येतांच बगल झाडून पटकन् बाजूला होणारा दौलतराव शिंदा कोठें ! 'बचेंगे तो और बी लढेंगे' म्हणणारा तो दत्ताजी शिंदे कोठें व हा बांक्या प्रसंगीं निमकहरामी करणारा दौलतराव कोठें ! जयाप्पा, जनकोजी अन् महादजी—एकापेक्षां एक सरसच !— आणि हा दौलतराव ! कालानें घडवून आणिलेला शिंदे घराण्यांतील हा फरक जबरदस्त धक्का दिल्यावांचून राहात नाहीं. बाजीरावाचें करंटेपण शिगेला पोहोंचलें. इंग्रजांनीं सर्व बाजूंनीं त्यास वेढलें. सर्व मार्ग खुंटले. तथापि शिवनीला थोडीबहुत झटापट झाली. शेवटीं धुळकोटवर शरणागति पत्करून हा शेवटचा पेशवा मालकम साहेबाच्या स्वाधीन झाला. ब्रह्मावर्तास तेहतीस वर्षींचें आयुष्य काढल्यानंतर तो खलास झाला. त्याच्या वंशजांची वासलात साहेबानें आपल्या पद्धतीनें लाविली.

आतां या बाबतींत रावबाजीच्या पावलावर पाऊल टाकून चालणारे छत्रपति गोपाळ अष्टयाच्या रणमैदानावर साहेबाच्या स्वाधीन झाले. इंग्रजांची व महाराजांची दोस्ती जमली. खूष खबरीच्या तोफा उडाल्या. साखरपाणी झालें. झेंडावंदनाचे समारंभ थाटण्यांत आले. अशा मोठ्या थाटानें आणि आनंदानें महाराजांस घेऊन इंग्रज सैन्य साताऱ्याच्या रोखानें चाललें.

इंग्रज मराठ्यांच्या शेवटच्या घनघोर संग्रामांत इंग्रजांस हें जें मोठें अपूर्व यश मिळालें तें त्यांनीं समशेरीच्या जोरावर मिळविलें का कपट–कारस्थानाच्या बलावर कमाविलें, या प्रश्नांचा निकाल इंग्रजांनींच कागदोपत्रीं नमूद केला आहे—‘ दक्षिणेंत मराठ्यांशीं चाललेल्या युद्धाचा शेवट अष्ट्यास आपल्या-सारखा झाला, तो केवळ एका गोष्टीमुळेंच. ती म्हणजे सातारचे महाराज आपणांस येऊन मिळाले ही होय. मराठामंडळ पेशव्यांची सत्ता मानी ती पेशवे हे सातारा दरबारचे मुख्य अधिकारी, पंतप्रधान म्हणून. तेव्हां अष्ट्याच्या रण-भूमीवर आपण मोठी तलवार गाजविली, बेडरपणें शत्रूशीं झुंज घेतली म्हणून आपणांस यश मिळालें, किंवा मराठ्यांचा मुख्य सेनापति बापू गोखला धारातीर्थीं पडला म्हणून आपण विजयी झालों, अशा . .. ळींच भाग नाहीं. सुदैवानें आपणास हवी तशी फक्त एकच गोष्ट झाली ती म्हणजे सातारचे महाराज युद्धाच्या धुमःश्चक्रींत आपणास येऊन मिळाले.’ (The British Indian Advocate Vol. I Page 477)

या उताऱ्यास पुष्टी देणारा आणखी एक उतारा देऊं.–‘ आम्हीं सातारकर महाराजांशीं युद्ध केव्हांच केलें नाहीं. त्याच्या उलट त्यांच्या वतीनें पेशव्यांशीं लढलों. ‘सातारकरांशीं पेशव्यांनीं बंड पुकारलें, त्यांच्या राज्याचा चट्टामट्टा करून पुंड पेशवा उगीचच त्यांच्या मुलुखांत धामधूम करीत आहे.’ –अशा तऱ्हेच्या कंड्या पिकाविणें आपणांस शक्य झालें नसतें, वरील अर्थाचे जाहीरनामे प्रांतोप्रांतीं काढितां आले नसते, आणि पेशवा खरोखरच बंडखोर आहे असा लोकांचा समज होण्यापूर्वीं जर इंग्रज व मराठे यांच्यामधील या शेवटच्या संग्रामास तोंड लागलें असतें तर मात्र आमची धडगत नव्हती. कारण अशा स्थितींत सर्व मराठे सरदार एका छत्रपतींच्या झेंड्याखालीं जमा झाले असते व मग त्यांच्याशीं लढण्याचा प्रसंग जर आपणावर आला असता तर मात्र आम्हांस या युद्धांत जय मिळाला असता किंवा नाहीं याची जबर शंका आहे. अशा परिस्थितींत मात्र एका चौरस मैलावर तरी आमचें राज्य आम्हांस संस्थापितां आलें असत किंवा नसतें कोण जाणे ? हें मी एकटाच म्हणतों असें नाहीं तर त्या वेळीं समरभूमीवर असणारा प्रत्येक सेनानी ही गोष्ट मान्य करतो.’

(London Times of 23 November 1848 : Letter by Joseph Hume.)

वर दिलेल्या दोन उताऱ्यांवरून खात्री होते कीं, मराठ्यांची समशेर अजून शेरास सव्वाशेर होती. तिच्यांतील तेज कमी झालें नव्हतें. तसेंच सातारकर महाराजांच्या नांवांतील जादू अजून कायम होती. महाराजांसाठीं प्राणांची पर्वा न करितां शत्रूवर तुटून पडणारे सैनिकही सिद्ध होते. पण त्यांचा योग्य तो उपयोग करून घेण्याची अक्कल मात्र महाराजांत किंवा त्यांच्या मंत्रिमंडळांत नव्हती.

इंग्रज मराठ्यांच्या लढाईचा शेवट झाला व महाराज टोपीकरांच्या तडाख्यांत सांपडले. पण आतां त्यांची वाट कशी लावावयाची व मिळालेलें हें अवदान कसें पचवावयाचें हा मोठा प्रश्न होता; पण इंग्रजासारख्या महाचतुर माणसास हेंही फारसें कठीण नव्हतें. कारण राजकारण हा तर त्याचा अत्यंत आवडता खेळ व तो त्यानेंच यशस्वी तऱ्हेनें खेळावा, यांत तिळमात्र शंका नाहीं. मराठ्यांचा पराभव झाला, इंग्रजांचा जय झाला. पण पेशव्यांचा पराभव झाला व सातारकर छत्रपतींचा जय झाला असें इंग्रज बोलला ! जग मात्र समजलें कीं, हा जय साहेबाचा आहे व साहेबही अन्तर्यामीं तेंच समजला होता. पण तसें त्याला दाखवावयाचें नव्हतें. तें कालांतरानें हळू हळू दिसावयाचें होतें. आतां इंग्रजास असा देखावा निर्माण करावयाचा होता कीं, साताराचे महाराज पेशव्यांचे कैदेंत सडत पडले होते, त्यांना आम्हीं त्यांच्या कैदेंतून सोडविलें. त्यांचे प्रांत परत जिंकिले व मग त्यांस पुन्हां राज्यावर बसविलें, तेव्हां आतां महाराष्ट्राच्या रंगभूमीवर हें दृश्य दाखविण्यास सुरुवात झाली. पुंड पेशवा पळून गेला. त्याच्या सत्तेनें कलंकित झालेला मुलूख पुन्हां परत द्यावयाचा म्हणजे त्यास लढाईच्या दिव्यांतून तावून सुलाखून घेतलें पाहिजे म्हणून तो उद्योग सुरू झाला. गोपाळ अष्ट्याच्या लढाईंत सातारकर महाराज पूर्णपणें कार्‍ह्यांत येण्यापूर्वींच इंग्रजानीं त्यांच्याकरितां सातारा शहर व किल्ला जिंकिला होता. तो कसा जिंकिला याची हकीगत त्या स्वारींत साताऱ्यास जनरल स्मिथबरोबर गेलेल्या एका इंग्रज अधिकाऱ्यानें लिहून ठेविली आहे. ती अशी :

' जनरल स्मिथ पेशव्यांचा पाठलाग करीत करीत साल्प्याचा घाट उतरला. पण तेथें जातो तों त्यास अशी बातमी लागली कीं, पेशवा पूर्वेकडे पंढरपूरच्या बाजूस गेला आहे. तें पाहून जनरल स्मिथनें आपला बेत फिरविला. त्यानें पेशव्यांचा नाद सोडून दिला व आपला मोर्चा साताऱ्याकडे वळविला. तसें करणें त्यास राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट वाटलें. त्याची फौज कोरेगांवपर्यंत येते न येते तोंच त्यास कर्नल बोलस आपल्या सैन्यासह येऊन मिळाला. मग हें मोठें सैन्य मजल दरमजल करीत साताऱ्याकडे चाललें. आमच्या सैन्यानें ता. १०।२।१८१८ ला माहुली गांठली व कृष्णा नदी ओलांडून आम्हीं आपला तळ टाकिला. या वेळीं माहुली हें क्षेत्र फारच शोभिवंत दिसत होतें. ती कृष्णा नदी, तिचा तो भव्य व चिरेबंदी घाट कोणाही रसिकाचें मन आकर्षून घेत होता. त्याच्या त्या मोठमोठ्या पायऱ्या, एका मागून एक उतरत थेट गंगेच्या पाण्यापर्यंत पोंचल्या होत्या. त्यांपैकीं कांहीं कृष्णेच्या स्फटिकतुल्य जलानें झांकल्यानें फारच खुलून दिसत होत्या. कृष्णेच्या एका कांठास पेशव्यांचा ऐश्वर्यसंपन्न वाडा मोठ्या दिमाखानें उभा होता.

' माहुली हे पवित्र क्षेत्र असल्यामुळें घाटावरील स्त्री-पुरुष स्नानादि विधि मोठ्या भाविकपणें करीत होते. आमच्या येण्यानें नागरिक भयभीत झाले होते तरी सुद्धां थव्याथव्यांनीं लष्कर पाहण्यास कमी करीत नव्हते. आम्ही आपला तळ देण्याचें ठिकाण बदललें व तें सुमारें ४० यार्ड अलीकडे आणिलें. आणि आम्ही आपला ठिय्या एका सुपीक अशा मळ्यांत दिला. या वेळीं हा मळा सुद्धां मोठा रमणीय दिसत होता. केळीं, संत्रीं, मोसंबीं वगैरेंचीं झाडें फळांफुलांनीं कशीं लगडून गेलीं होतीं. याशिवाय ज्वारी, बाजरी, गहूं यांचीं पिकेंही पण फोफावतांना दिसत होतीं. अशा तऱ्हेनें वसुंधरा मोठ्या सुसंपन्न अशा स्थितींत त्या ठिकाणीं विहार करतांना दिसत होती. अशा वेळीं लष्कराचा तळ म्हणजे टोळधाडच. आमच्या मुक्कामानें बिचाऱ्या शेतकऱ्यांचें अतोनात नुकसान झालें असेल. ह्या ठिकाणाहून सातारचा किल्ला आमच्यापुढें भव्यपणें उभा होता. त्याच्यावर भगवा झेंडा फडकत होता. पण तो किल्ला पेशव्यांचे ताब्यांत होता. त्या ठिकाणीं किल्लेदार व पुष्कळसें लष्करही होतें; पण त्या किल्लेदारानें

किल्ला लढविण्याची थोडी सुद्धां तयारी दाखविली नाहीं. किंवा स्मिथचा आपण हातोहात धुव्वा उडवूं किंवा जनरल स्मिथनें किल्ला घेण्याचा प्रयत्न करणें म्हणजे केवळ पोरखेळ आहे, अशी सुद्धां एकादे वेळेस किल्लेदाराची कल्पना असेल. तें कांहीं असो; पण त्यानें किल्ला लढविण्याचा यत्किंचितहि प्रयत्न केला नाहीं हें खरें. प्रथम आमच्या लष्करानें चढाई केली, गोळीबार केला व तोफा डागल्या. पण त्याचा प्रतिकार म्हणून एकही आवाज किल्ल्यावर झाला नाहीं. जरा वेळानें आमच्या लष्करानें किल्ल्याचा ताबा घेतला. पहिल्यांदा आमचें निशाण उभें करण्यांत आलें. थोड्या वेळानें सातारकरांकरितां इंग्रजांनीं किल्ला काबीज केला.'

प्रतापसिंह महाराज बाजीरावाबरोबर भटकत असतां दयावन्त कंपनी सरकारनें त्यांच्याकरितां साताराचा किल्ला येणेंप्रमाणें जिंकला. आतां प्रत्यक्ष रणांगणावर बाजीरावाचा पराभव होऊन महाराज इंग्रजांच्या स्वाधीन झाले व जनरल स्मिथबरोबर मार्ग आक्रमूं लागले. महाराज इंग्रज सैन्यांत दाखल झाल्याचें वृत्त एल्फिन्स्टनसाहेबास कळविण्यांत आलें.

इंग्रज लष्कराबरोबर प्रवास चालू होता. बलवन्त मल्हार चिटणिसामुळें कंपनी सरकाराबरोबर चालू असलेलें राजकारण फत्ते झालें. बाजीरावाचा काच संपला, आतां आपण मुक्त झालों व छत्रपति म्हणून दिमाखानें वावरूं लागलों, म्हणून सातारकर छत्रपति फार आनंदांत होते. एवढें मोठें काम करणाऱ्या बलवन्त मल्हारला काय द्यावें असें त्यांस झालें होतें. तेव्हां त्यांनीं चिटणीसास 'निशाण-सूज्ञ' असा किताब व अष्टप्रधानाबरोबरी सत्कार मरातीब बक्षीस वचन दिल्हे.' बलवन्त मल्हारला 'निशाणसूज्ञ' ही पदवी देऊन सुद्धां सातारकर छत्रपतींचें समाधान झालें नाहीं. 'माघ व॥ द्वितीय रविवार ता. २२–२–१८१८ या दिवशीं करकंब येथें मुक्काम असतां प्रातःकाळीं उठोन मुखमार्जन झालें. भाऊसाहेब महाराज जवळ होते त्यांचे समक्ष बलवंतराव चिटणीस यांस आज्ञा केली कीं, तुम्हांस अष्टप्रधानांतील एक पद द्यावयाचें; बक्षीस त्यास कोणतें द्यावें, विवंचना चर्चा करितां, सुमंतपद याचे नकल जाले. रिकामें आहे तें तुम्हांस

दिलें. मर्जीजोगें होतांच करावयाचें तें करूं.' करकंब येथें एक दिवस मुक्काम झाल्यानंतर सोमवारीं प्रातःकाळीं कूच झालें.

करकंब येथें मुक्काम असतां जनरल स्मिथ याजकडून बिलॅमोर आला व म्हणूं लागला कीं, 'साहेबांचा मनोदय आहे कीं, ढाल आपली तयार करावी. बाहुटा आमचेत म्हणतात. मोठें महात्म्य बाहुटयाचें. त्यास लौकर तयार करवावें. आणि उभा करणें आम्हांस कळवून करावा. करवितो, असें उत्तर जालें.' साहेबाच्या मनोदयाप्रमाणें, 'हत्तीवरील निशाण करावें ऐसी योजना बोलून करकमचे बाजारांतून सेला पागोटें आणून भगवें रंगवून निशाण तयार केलें. शंभर रुपये खर्चास आले.' यानंतर 'माघ वद्य चतुर्थी मंगळवारीं प्रातःकाळीं कूच होऊन दहा घटका दिवसास हिंगणगांव भीमातिरीं मुक्काम झाला. बिलॅमोर येऊन विनंति केली कीं, नदी (स) पाणी आहे. त्यास उद्यां मुक्काम येथेंच व्हावा म्हणजे लस्करचे शिपाई लोक व सोजर लोक नाहातील, हुशार होतील. मग जसा हुकूम तसें करूं. त्याजवरून मुक्कामाचा बेत ठरला, याच ठिकाणीं करकंब येथें चार दिवसांपूर्वीं तयार करण्यांत आलेल्या निशाणाच्या वंदनाचा समारंभ करण्यांत आला.

त्या भगव्या ध्वजाचा तो समारंभ पाहून सातारकर छत्रपतींस व त्यांच्या बलवंतराव चिटणीसादि कारभारी मंडळींस फार आनंद झाला असेल. पेशव्याच्या काचांतून मुक्त करून मराठी राज्याची धनदौलत मराठी साम्राज्यांसुद्धां आपल्या हवालीं करणारा हा साहेब फार मोठा परमेश्वर असून त्याच्या अपूर्व दातृत्वानें हा परम भाग्याचा दिवस आपणांस दिसला. त्या ध्वजाची पूजा करण्याचा मान ज्या महाभाग बलवन्त मल्हार चिटणीसाला मिळाला त्याला तर गेल्या बेचाळीस कुळ्या उजाळून निघाल्यासारखें वाटलें असेल. त्या ध्वजाला मानाचा मुजरा करतांना छत्रपतींचें मन अगदीं हरकून गेलें असेल. कैदेंतून मुक्त झाल्यानें तर त्यांना सर्व जग क्षणाक्षणाला नवें नवें वाटत होतें. त्यांतून हा प्रसंग तर अगदींच अभिनव व जोमाचा असल्यानें आद्य छत्रपतींच्या नांवाला, थोरल्या शाहूनंतर आजपर्यंत खितपत पडलेल्या भोसले कुलाला, अगदीं नवी झिलई दिल्याचें भाग्य आपणास आपल्या पूर्वजांच्या पुण्याईनें लाभलें असें

वाटलें असेल. पण अगदीं निराळें घडलें होतें ! टोप्या काढून त्या भगव्या बावटयास मान देणाऱ्या साहेब लोकांस निरतिशय आनंद झाला होता. त्यांच्या मनःचक्षूंसमोर निराळाच देखावा दिसत होता. त्या भगव्या ध्वजानें त्यांच्या मनःसृष्टींत त्यांच्या त्या मानी युनिअन जॅकचें रूप धारण केलें होतें. एकोणीसशें मैल लांबीच्या आणि अठराशें मैल रुंदीच्या भारतवर्षाच्या अवाढव्य भूभागांत टीचभर लांबी–रुंदीच्या इंग्लंडहून आलेलें त्यांचें तें युनिअन जॅक आतां सम्राटाच्या वैभवानें डौलानें डोलतांना त्यांना दिसत होतें. अखिल भारत-वर्षभर अनन्वित अत्याचारांचा हैदोसधुल्ला घालणाऱ्या इस्लामी सत्तेस ठाणबंद करणाऱ्या, मोगलांच्या उद्दाम सिंहासनावर घणांचे घाव घालणाऱ्या, महापराक्रमी मराठ्यांचा मानी आद्य छत्रपतीच जणूं कांहीं प्रतापसिंहाच्या रूपानें आपल्या युनियन जॅकला मोठ्या अभिमानानें अभिवादन करीत आहे, असें रम्य स्वप्न साहेबाला जागेपणींच दिसत होतें ! ह्या छत्रपतीवर आपली सत्ता पूर्णपणें गाजणार असून कोणास छत्रपति करावें व कोणास करूं नये ही गोष्ट केवळ आपल्या मानसलहरींवर आतां अवलंबून आहे, याची सुखद संवेदना साहेबाला होत होती ! हा ध्वजावंदनाचा समारंभ झाल्यानंतर प्रतापसिंहासंबंधीं जनरल स्मिथ म्हणाला,

'आलपिष्टन साहेब यांचीं पत्रें बहुत खुसी जाली. आज आपलें निशाण उभें राहिलें. लाट साहेबासही बहुत खुसी होईल. (पत्रें) लिहलीं गेलीं आहेत. आलपिष्टन साहेब सामोरे येऊन भेटी समारंभ होईल.'

'आपण राज्य करितील तो आपला मुलुक. यांत बाजीराव याचा हात शिरूं देणार नाहीं. आपण खावंद याउपरीं आतां कांहीं फिकीर नाहीं. सातारियास जाऊन तक्तावर बसून राज्य करावें. बाजीराव याची कदापि आपणास इजा होणार नाहीं. तो राज्यांत येऊं पावणार नाहीं.'

'बाजीराव याचा तह या उपरीं होणार नाहीं. आपण काळजी तिळमात्र करूं नये.'

याप्रमाणें बोलणीं चालणीं करीत छत्रपतीसह साहेबाचें हें लटांबर साताऱ्याच्या रोखानें चाललें होतें. अशा स्थितींत छत्रपतींची ती गांवढळ चाल साहेबाच्या

लक्षांत आली होती. साहेबाकडील कोणी साहेबासह किंवा सडें बोलावयास आलें कीं,—"नित्य पाठ इंग्रजाकडील साहेब लोक अथवा कारकून बोलण्यास येणें तो सर्वत्र त्रिवर्ग खासे व मातोश्री बसली म्हणजे जें बोलणें तें बोलावें. उत्तरें प्रतिउत्तरें मातोश्रींनीं करावीं. × × × छत्रपति स्वामीस बोलतां नये. याजमुळें सर्व मुख्तियारपणा व बोलणें सावधगिरी याची पडूं लागली. तें पुढें चालीस नीट नव्हे. व इंग्रजामधीं धर्म जो प्रथम किता ती चाल चालणार. याजवरून बलवंतराव चिटणीस याणी आबाजीपंत नि॥ जर्नेल यास समवेत घेऊन बोलोन जें बोलणें कामाचें असेल तें महाराजासीं वेगळें बसून बोलणें होत जावें, वगैरे रिकामें बोलणें मांडवशोभार्थ तें सर्वत्रांत व्हावें. याप्रमाणेंच किता ठरावा. ऐसे ठराऊन बिलिमोर यासी बोलोन जर्नेल यासी बोलोन ठरविलें." असें ठरल्यानंतर त्याप्रमाणें होऊं लागलें. 'खलबतास राहुटी वेगळी नव्हती. पण बलवंतराव चिटणीस याचे राहुटींत बैठक, गादी नेहमीं नेहमीं असावी. साहेबाचें किंवा साहेबाकडील कोणा माणसाचें येणें झालें म्हणजे तेथें यावें. महाराजांनीं तेथें यावें, बोलणें होऊन मग सामोपचाराचें बोलणें थोरले कचेरींत डेऱ्यांत व्हावें याप्रमाणें होऊं लागलें. हें मातोश्रीस फार असाध्य झालें परंतु पुढें मागें नीट नव्हे. राजकारणास लोभ धरून फल काय. याजकरितां यजमानांनीं केलें व करविलें.'

याप्रमाणें साहेबाच्या शिस्तवार वागणुकीचा थोडा फार अनुभव घेत घेत सातारकर छत्रपति आपला मार्ग आक्रमीत होते. आतां मुक्काम हिंगणगांवाहून इंद्रापुरास झाला. या ठिकाणीं इंग्रजाकडून खर्चासाठीं म्हणून हजार रुपये आले. त्यानंतरचा मुक्काम बारामतीस झाला. 'डेरीयास स्वारी जाऊन नंतर श्रीसिद्धेश्वरास स्वारी गेली. देवालयांतच ब्राह्मणभोजनाची तरतूद करून स्नान देवालयांत झालें. श्री सांबाची पूजा करून काळे यांचे देवीचें दर्शन घेऊन श्री विठोबाचें व मोरोपंत याचे घराचें दर्शन करून दक्षणा देऊन स्वारी परत भोजनास डेरियास आली. ब्राह्मणभोजन शंभर पात्र झालें. खेरीज भूईसी शंभर रुपये दिले. यानंतर माघ वद्य छ २४ रोज सोमवार मार्च, इ. स. १८१८ या दिवशीं

मोरगांवीं मुक्काम झाला. डेरियास स्नानसंध्या*उरकून स्वारी गणपतीचे दर्शनास गेली. ब्राह्मणभोजनाची तरतूद अंताजी महादेव महाजनी यास सांगून तेथेंच करविली. ब्राह्मणांस दक्षणा पंचवीस रुपये देऊन भोजनास डेरियास आले. प्रसाद तेथेंच आणविला. इंग्रजाकडून खर्चास हजार रुपये आले. यानंतर माघ वद्य १२ छ २६ रोज बुधवार प्रातःकाळीं कूच होऊन मुक्काम बेलसरास झाला. या ठिकाणीं बाळाजीपंत नातू व एल्फिन्स्टन हे सिंहगडाहून महाराजांस भेटण्यासाठीं आले. त्यांच्या स्वागतार्थ तोफा डागण्यांत आल्या. नंतर दुपारीं भेटी झाल्या. सातारकर छत्रपति व एल्फिन्स्टन या उभयतांची ही प्रथम भेट असल्याकारणानें आपण पेशव्यांच्या सैन्यांतून इंग्रजाच्या लष्करांत कसे दाखल झालों या गोष्टीचा पुनरुच्चार झाला. त्या वेळीं साहेब म्हणाला, ' महाराजांचें नशीब थोर. लढाईचे समईचीं गर्दी असतां कोणा एकास न लागतां लष्करांत स्वारी आली. आतां काळजी नाहीं. आपलें वर्तमान सर्व लाटसाहेबास लिहून गेलें. त्याचींहि पत्रें येतच होतीं. त्यास फार खुसी होईल. हलीं रसुल (रसेल) साहेब लाटसाहेबाकडे रवाना करतो. सर्व तेथोन बंदोबस्त होऊन येईल. आपण निरोप पाठवावयाचे असल्यास पाठवावे. हे बोलतील. यावर उत्तर महाराजांनीं केलें जे ' आमचे लाट वगैरे सर्व तुम्हीच, मजकूर जर्नल यासी बोललों. तुम्ही पाहिजे तसें करावें. तुमचा सत्र भरवसा जाणोन घोडियास हात घालून तुम्हांस मिळालों. ' याप्रमाणें एल्फिन्स्टन व महाराज यांची प्रथम भेट झाली. येथपर्यंत सातारकर मंडळींना बरोबर घेऊन प्रवास करणाऱ्या जनरल स्मिथला फौजेसुद्धां बाजीरावाच्या पाठीवर जावयाचें होतें. तेव्हां तो निघाला. हें वृत्त प्रतापसिंहास कळलें त्या वेळीं ते म्हणाले कीं, 'जर्नेल यास मेजवानी झाली नाहीं. तेव्हां मेजवानीचें साहित्य साताऱ्याहून आणून मेजवानी द्यावी व निरोप द्यावा. ' ही बातमी ज. स्मिथ यास कळली तेव्हां बलवंतराव चिटणीस यास बोलावून

* प्रस्तुतचे साताराचे छत्रपति संध्या करीत असत. त्यांना स्नानसंध्या शिकविणाऱ्या गुरूस संध्यागुरु म्हणत. हें घराणें साताऱ्याकडे ' संध्यागुरु ' या उपनांवानें आहे.

नेऊन सांगितलें कीं, 'मी आतां वारंवार येईन. परस्परें सर्व मनोदय पूर्ण होतील. हें महाराजांचे मनांत आलें तेंच मेजवानी भरोन पावलें फार खुशी जाली.' त्यानंतर 'माघ वद्य त्रयोदशीस छ. २७ रोज गुरुवारीं (५ मार्च १८१८) त्रितीय प्रहरीं आलपिष्टन जनेॅल यास निरोप देववण्यास घेऊन महाराजाकडे आले. मिठाई व हारतुरे व विडे अत्तर गुलाब व आस्ते पदार्थी होते, तो समारंभ झाला. जनेॅल यास हिऱ्याची आंगठी व पाचेची पोंची मोत्यानें गांठली होती ती थोर ऐसे सरकारनें आपले हाते हातांत बांधिली. आंगठी बोटांत घातली. व बिलिमोर साहेब त्याचे कारभारी याजला माणकाची आंगठी दिली. बहुत खुसीचीं बोलणें परस्परें झालीं. जनेॅल फारच योग्य थोर माणूस बहुत सरकारचे मर्जीस जपले. तेणेकरून ममता फार पडली. जातात याजवरून कांहीं मर्जी खिन्न, परस्परेंहि झाली.' याप्रमाणें जनरल स्मिथला निरोप देण्याचा सभारंभ झाला.

जनरल स्मिथ बाजीरावाच्या पाठलागास गेल्यानंतर सरकारचा मुक्काम हलला. नंतरचा मुक्काम वीरला पडला. मार्गीं येतां येतां श्री जेजुरीस देवदर्शन केलें. शंभर रुपये देकार ब्राह्मणास दिला. याच वेळीं सातारकर छत्रपतींचे रेसिडेंट म्हणून ग्रान्टसाहेबाची नेमणूक झाली. वीर येथील कुलस्वामींचें दर्शन केलें.

यानंतर फाल्गुन शु॥ द्वितीया सोमवार छ. २ जमादिलावत ता. ९ मार्च १८१८ ला प्रातःकाळीं कूच होऊन माणकीवर मुक्काम झाला. येथें सिंहगड घेण्यास गेलेली इंग्रज फौज सिंहगड घेऊन दाखल झाली. त्या सेनेचा सेनापति प्रिट्झ्लर साहेब होता. त्याचे भेटीचा समारंभ, 'बहुत तारफीचा लयन बांधून तरतूदीनें जाला. मेंडवाद्य बाजा, तो बाजा फारच चांगला, तो बाजा करून दाखविला. तोफा २१ जाल्या. दोन घटका समारंभ जाला. नंतर डेरीयास स्वारी आली. दोन हजार रुपये खर्चास आले.'

यानंतर फाल्गुन शु॥ चतुर्थी बुधवार छ ३, ११ मार्च इ. १८१८ ला प्रातःकाळीं कूच होऊन भिवरीनजीक पुरंदर येथें मुक्काम जाला. आतां पुरंदरचा किल्ला घेण्याचें काम चालू झालें. पण तेथें आबा पुरंदरे याची शिबंदी होती. त्यांनीं गोळी चालविली तेव्हां इंग्रजांनीं किल्ल्यावर चाल केली. हल्ले

प्रतिहल्ले सुरू झाले. तेव्हां एखाद वेळेस महाराजांस लढाईपासून धोका पोहोंचेल म्हणून सुरक्षित स्थळीं त्यांनीं जावें म्हणून एल्फिन्स्टननें सुचविलें. तेव्हां महाराज म्हणाले कीं, 'चार घटका बसतों. लढाई पाहावयाची बहुत खुषी आहे.' महाराजांचा हा खंबीरपणा पाहून एल्फिन्स्टनला फार आनंद झाला, पण गोळ्यांच्या फैरी सारख्या चालू होत्या. तेव्हां एखाद वेळेस दगा होईल म्हणून एल्फिन्स्टनला फार काळजी वाटत होती. महाराजांनीं सुरक्षित स्थळीं जावें म्हणून तो तळमळत होता तों एक गोळा सरकारजवळ येऊन घोरपडे याजकडील स्वारास लागला. घोडेस्वार ठार झाला. दोन घटका स्वारी बसली होती. नंतर स्वारी सासवड उजवे टाकून लष्करांत आली. याप्रमाणें सातारकर छत्रपतींनीं पुरंदर किल्ल्याच्या लढाईचा तमाशा पाहिला. आबा पुरंदरे यांनीं हा किल्ला बुधवार ते रविवारपर्यंत चार पांच दिवस चांगलाच लढविला. 'इंग्रज बहादूर याणी पुरंदर व रुद्रमाळ या दोन्हीं किल्ल्यांवर दो बाजूंनीं शिस्त बांधून तोफा एकदांच सुरू केल्या. शर्थ केली. पुरंदरचे बालेकिल्ल्यावर थोरली तोफ चालू होती. तिजवर सिसा बांधून मार दिला. तोफ बंद केली. बालेकिल्ल्यावर कुलपी गोळे भालाभर उडून फुटून जे मोर्चे होते त्यांत पडून पांच-पंचवीस लोक जाया करूं लागले.' याप्रमाणें इंग्रजांच्या तोफांनीं कहर चालू केला. इंग्रज विजयी होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. कारण इंग्रजाची तोफ चालू होती; पण गडावरील तोफ बंद पडली होती. गोळी व बाण मात्र चालू होते. इतक्यांत फाल्गुन शु॥ अष्टमी छ ७ रविवार इ. स. १८१८ मार्च ता. १५ उजाडली व प्रातःकालचे प्रहर दिवसास वज्रगड ऊर्फ रुद्रमाळचें बोलणें आलें. दोन प्रहरीं लोक उतरून किल्ला इंग्रज यांनीं सर केला. लगेच एल्फिन्स्टनसाहेब यांनीं चोपदार पाठवून पुरंदर किल्ला सर झाल्याचें वृत्त सातारकर महाराजांस कळविलें. सातारकर छत्रपतींनीं हें आनंदी वृत्त आणल्याबद्दल चोपदारास रु. १० इनाम दिलें.

'फाल्गुण शुद्ध दशमी छ मंगलवार इ. स. १८१८ मार्च १७ रोजीं स्वारी पुरंदर किल्ला पाहावयास गेली. बरोबर ग्रांटसाहेब होते. किल्ला पाहून श्री केदारेश्वराचें दर्शन घेतलें. देवापुढें दक्षणा रु. १० ठेविली. नंतर सदरेस बसले. साखर बेदाणा तबकांत घालून इंग्रज याणीं नजर केली.' किल्ला सर

झाला म्हणजे तोफांची सरबत्ती करावयाची; पण दारू नव्हती म्हणून केली नाहीं असें इंग्रजांनीं सांगितलें. साहेबाची ही अदबीची वागणूक पाहून मोठा अचंबा वाटतो. साहेबाच्या या वागणुकीवरून इंग्रज आपणास पेशव्यांच्या राज्याचे धनी करणार असा दृढ समज छत्रपतींचा झाला असल्यास नवल नाहीं. साहेबानें आपलीं नखें अजून दाखविलीं नव्हतीं तोंवर छत्रपति खुशींत होते. मुक्कामा मुक्कामाला पैसे येत होते व हा विजयाचा थाट चालू होता. या ठिकाणाहून एल्फिन्स्टन पुण्यास गेला व त्यानें बाळाजीपंत नातू व ग्रांट यांस महाराजांसमवेत ठेविलें.

सातारकर छत्रपतींच्या भोंवतालीं प्रमुखपणें वावरणाऱ्या खटपट्या लोकांच्या डोळ्यांत बाळाजीपंत नातू सलत होता. कारण तो हुशार होता. ' बाळाजीपंताचा मनोधैर्य आपणांहून मोठा, मोठे डोकेचा माणूस. महाराजापाशीं शिरूं देऊं नये. कारण तो महाराजांजवळ राहिला तर त्यांच्यावर ताबडतोब छाप पाडील व महाराजांस कह्यांत घेईल व मग आपलें कांहीं चालणार नाहीं. कारण सध्यां तरी महाराज सर्वतोपरी गैरमाहित तेव्हां आपले तंत्रीं ठेवावे. आपली जरब ठेऊन, धोरण आपले हातीं राहून, याचें बोलणें इंग्रजापाशीं आपण बोलावें; परस्परें होऊं देऊं नये. यांत आपली प्रतिष्ठा. व सर्वाध्यक्षपणा आपला व्हावा. ' याशिवाय सातारकर छत्रपतींच्या कारभारी मंडळींत पूर्वींपासूनचा पेशव्यांविषयीं भयंकर द्वेष होता. कारण त्या बाबतींत ' सवत साहीना आणि पोर होईना ' अशांतला त्यांचा प्रकार झाला होता. पेशव्यांना शिव्या देणें फार सोपें होतें पण पेशव्यांची कर्तबगारी व आटोप त्यांच्याजवळ नव्हता. पेशवे आपल्या कर्तृत्वानें तळपत होते आणि हे मत्सरानें जळत होते. त्याचा नमुना येथेंही पाहावयास मिळतो. ' पेशवे यांची व बाळाजीपंत यांची एक-जात, पदरांनीं पदर नातेंही असेल. परंतु आमचें घर या जातीनें युगतीनें घरांत शिरोन घेतलें. व फारच फार इजा दिल्हि, ती काय बोलावी. आणि येथें तरी त्यासीच गाठ पडली. तेव्हां बोलणेस मळ राहतो. ' पण आतां सातारकर मंडळींना बाळाजीपंत अटळ होता. सातारकर छत्रपतींचे कान भरून त्यांनीं त्यास महाराजांपासून दूर केलें; पण साहेबापासून तो दूर होणें अशक्य होतें.

कांहीं महत्त्वाच्या प्रसंगीं ते त्याला टाळण्याचा आव आणीत व साहेब त्यांना तसें करूं देई इतकेंच. कारण आतां बाळाजीपंत नातूला न कळवितां करण्याजोगीं अशीं राजकारणेंच शिल्लक राहिलीं नव्हतीं.

बलवन्त मल्हारादि मुत्सद्दी मंडळानें जी जात सातारकर छत्रपतींच्या घरांत आतां मोठ्या शहाणपणानें सोडली होती ती पांढऱ्या पायाची जात मात्र महाभयंकर होती. ती आतां सातारकर छत्रपतींचीं हाडें खाणार होतीं व बहुत शर्तीनें हें राजकारण तडीस नेणाऱ्या त्या महान् मुत्सद्दी महाभागास तोंडीं लावून राजे व प्रधानजी या उभयतांचा अवघ्या वीस पंचवीस वर्षांच्या आंत पार चट्टामट्टा करणार होती, हें त्या बिचाऱ्यांना माहीत नव्हतें ! इतकेंच काय पण त्याच्याही पुढें जाऊन सातारकर छत्रपतींच्या वंशजांनीं, राज्याचा बदोवा लिहून दिल्यानंतर सुद्धां साधी, मामुली ' राजा ' ही पदवी त्यांनीं धारण करतां कामा नये असा हट्ट या पांढऱ्या जातीनें धरला.

प्रस्तुतच्या वेळेपुरतें साहेबाचें धोरण ठरलें होतें कीं, महाराजांनीं सांगावें व साहेबानें ऐकावें. असा जमाना असल्याकारणानें सातारकर छत्रपतींच्या करवीं बाळाजीपंत नातूस दूर करण्यांत आलें. यानंतर १८ व १९ मार्च १८१८ बुधवार—गुरुवार हे दोन दिवस सातारकर छत्रपतींचा मुक्काम भिवरीसच झाला. बाजीरावाचा ऐन्याचा मेणा पुरंदरावर होता, तो इंग्रजानें महाराजांस गुरुवारीं नजर केला.

अशा प्रकारें प्रवास चालू होता. यानंतरचा उल्लेखनीय मुक्काम फाल्गुन वद्य प्रतिपदा छ १५ रोज सोमवार २३ मार्च इ. स. १८१८ ला तांबवें येथें झाला. तृतीय प्रहरीं आलपिष्टनसाहेबांनीं बाळाजीपंत नातू याजकडून खर्चाबद्दल रुपये चार हजार देवविले ते नातू याणीं शामराव आवजी नि॥ चिटणीस याजबरोबर भोई देऊन अस्तमानीं पाठविले. याच वेळीं ग्रांटसाहेबाकडून कूच करण्याबद्दल सूचना आली. पण या कूच करण्याच्या सूचनांचा उल्लेख फार गंमतीदार आहे. ' ग्रांटसाहेब याणीं कारकून कुचाचे परवानगीस पाठविला, परवानगी घेऊन गेला. ' यानंतर ता. २४ मार्च १८१८ मंगळवारला मुक्काम वानवडीनजीक चंदनवंदन येथें झाला. या ठिकाणीं बाळाजीपंत नातू व ग्रान्ट

एक तासभर गप्पागोष्टी करून गेले व एल्फिन्स्टननें दिलेला वाजपक्षी ग्रान्टनें महाराजांस दिला. या ठिकाणीं महाराजांचे परिवारांत गोदाजी डेंगळे नांवाचा त्रिंबकजीचा नातेवाईक होता. त्याचा ताबा इंग्रजांनीं मागितला. तो देण्यांत आला. गोदाजी डेंगळे यास स्वाधीन केल्याबद्दल छत्रपतींच्या मातोश्री माईसाहेब यांस फार वाईट वाटलें. त्रिंबकजी डेंगळा सातारकरांचे देखरेखीवर होता तेव्हांपासून माईसाहेबांचा व त्याचा लोभ होता. बुधवार ता. २५ मार्च १८१८ला चंदनवंदन किल्ला सर झाल्याचें वृत्त आलें. या किल्ल्यावर बाजीरावानें जातां जातां टाकलेल्या बऱ्याच जिनसा इंग्रजांचे हातास लागल्या. त्यांत एक ऐन्याची अंबारी होती.

याच ठिकाणीं एल्फिन्स्टनसाहेब छत्रपतींचे भेटीसाठीं पुण्याहून आला. एल्फिन्स्टन, ग्रान्ट व बाळाजीपंत नातू या तिघांनीं महाराजांची गांठ घेतली. राजकारणाचीं बोलणीं फक्त महाराजांशीं त्यांना बाजूला घेऊन करावीं, हा साहेबाचा दंडक चालू झाला होता. त्याप्रमाणें मुलाखत झाली. या मुलाखतींत राजकारणाचीं बोलणीं निघालीं तेव्हां महाराजांच्या ताब्यांत कोणता मुलूख असावा, त्यांच्या सरहद्दी कोणत्या असाव्यात याची परिस्फुटता एल्फिन्स्टननें केली. तो म्हणाला, ' आपणांकडे निरेचे अलीकडे भीमा नदीचे हाद, व वारणेची हाद, कृष्णेचे व भीमेचे अलीकडे संगम झाला तेथपर्यंत मुलूख सह्याद्रीपर्यंत द्यावा असें मनांत आलें आहे. लाटसाहेबाकडे लिहिलें गेलें आहे. त्याचें उत्तरही येत आहे. ' असल्या प्रकारचीं व इतर महत्त्वाचीं बोलणीं बोलून साहेब नाहींसा झाला. पण त्याचें तें बोलणें ऐकल्यापासून महाराज-मंडळींस चैन पडेना. तुम्ही आम्हांस सामील व्हा, पेशव्याचा पराजय करून त्यांनीं उपटलेलें तुमचें राज्य आम्ही तुम्हांस देऊं म्हणून बलवंत मल्हारजवळ म्हणणारा साहेब असें कां बोलतो ? राज्याच्या सीमा ठरविण्याचें कारणच काय ? पेशव्यांच्या राज्याच्या सीमा त्याच आमच्या सीमा. कांहीं तरी गोंधळ आहे, साहेबाचा गैरसमज झाला आहे खास. किंवा त्याचें बोलणें तरी आपणांस कळलें नसेल. कारण त्याच वेळीं साहेब असेंही म्हणाला कीं, ' आजच किलेकोट स्वाधीन करावे तरी बैदा मिटणार नाहीं. बाजीराव तिकडे आहेतच, याजमुळें किले वगैरे बंदोबस्त आम्हीं

करतों. निशाणें आपलीं लावूं.' साहेबाचें हें दुसरें बोलणें ऐकून छत्रपतींस वाटलें कीं, साहेबास आपली भाषा येत नसल्यानें तो असें कांहीं तरी वेडेंवाकडें बोलला इतकेंच. 'पण निशाणें आपलीं लावूं' म्हणाला त्यावरून पेशव्याचें राज्य तो आपणांस देणार हेंच खरें. पण उगीचच संशय नको म्हणून बलवंत मल्हारला बाळाजीपंत नातूकडे धाडण्यांत आलें व खुलासा विचारण्यांत आला. तेव्हां बाळाजीपंत नातू व ग्रान्ट आले व खुलासा करून गेले कीं, 'महाराजांनीं आपल्या म्हणण्याच्या याद्या द्याव्या. म्हणजे विचार करण्यांत येईल. हद्दीचा मजकूर व रोजखर्चाचे अदमासांनीं महिना सालाचे आकाराचे खर्चाचे आदमासाचे खर्चाची याद द्यावी, म्हणजे आमचे समजुतीस येईल.'

बलवन्त मल्हार चिटणीसांनीं खुलासा विचारतांच, ग्रॅन्ट व बाळाजीपंत नातू येऊन खर्चाच्या याद्या द्या म्हणून सांगून गेले, तेव्हां महाराजासुद्धां महाराजमंडळ आणखीच बुचकळ्यांत पडलें. त्यांनीं खर्चाचे आदमासाच्या याद्या पाठविल्या नाहींत. तेव्हां एल्फिन्स्टनचा याद्या देण्याबद्दल लकडा आला. तेव्हां सांगितलें कीं, "वरचेवरी मंडळी पदरची व आप्त येत आहे. त्याचा अदमास कसा समजतो. × × × याचा आळा कसा होतो. तेव्हां जें तुम्ही द्याल त्यांत थोडें बहुत मानून खर्च करूं. या बोलण्याचा आदेशा काय याचा समज आम्हांस कळत नाहीं." महाराजांचीं हीं लाडकीं, खेडवळ व गैरहिशेबी बोलणीं साहेबास नको होतीं. त्याला हिशेबी बोलणीं हिशेबासाठीं पाहिजे होतीं. याचा समज आम्हांस पडत नाहीं, असें महाराजांनीं म्हणतांच साहेबानें, 'दोन यादी इंग्रजी चालीच्या करून पाठविल्या. त्यांत पंक्ती जेवणार, नांव, गांव, उमर उद्या काये, किती वर्षाचे नोकर, आप्त, सोयरे, पदरचे कारकून वगैरे एकंदर यैसे तरेची पाठविली. तेव्हां बहुत विचार पडला.' या याद्या पाहून महाराज मंडळींस मोठा विचार पडला. साहेबाच्या धोरणाचा पल्ला लक्षांत येऊन बहुधा छत्रपती गडबडले. लगेच त्यांनीं बलवन्त मल्हारला बोलावून बाळाजीपंताकडे धाडिल. छत्रपतींचे हे 'निशाणसूज्ञ' व 'सुमन्त' बलवन्त मल्हार, बाळाजीपंताकडे गेले च म्हणूं लागले कीं, 'या याद्या प्रकरणीं काय करावें त्याचा आम्हांस कांहींच उमज पडत नाहीं.' महाराजांच्या सुद्धां महाराज मंडळींनीं पांघरलेलें हें वेड पाहून

साहेब रागावला व त्यानें खडसाविलें कीं, 'आम्ही बोलतों हें सरकारचे बरेसाठीं बोलतों. साल मजकूर रयतेस उपद्रव फार. लुटीखालीं गेले पेस्तर सूट देऊन रयत शाबूद राखणें, तेव्हां दोन सालें गेलीं, तिसरे सालीं वसूल येणार तेव्हां खर्च पाहून करावा. किती लागतो हें समजलें पाहिजे. इंग्रज सरकारांतून आतां जो ऐवज खर्चास येतो तें कर्ज येतें. हें फिटून सरकारचें जमलें पाहिजे. वगैरे बोलोन गेले.' हीं जरा जरबेचीं व करारी बोलणीं ऐकून महाराज-मंडळ ठिकाणावर आलें. त्यांनीं ठरविलें कीं, 'सर्वत्र येक होऊन करणें तें करावें. परंतू त्याचे नेटे चाललें (हेंच खरें).' याप्रमाणें बोलणें चालणें चाललें होतें. केव्हां नरमाईचें तर केव्हां गरमाईचें असें वातावरण होत होतें व प्रवास चालू होता. महाराज-मंडळी इंग्रज सैन्यासुद्धां वासोटयाकडे निघाली. तेव्हां साहेब बोलला कीं, महाराजांस सातान्यास जावयाचें असल्यास जावें. आम्ही वासोटा घेऊन मग सातान्यास येऊं. साहेबाचें हें बोलणें ऐकतांच महाराज म्हणाले कीं, आम्हीही वासोटयास येतों. तुम्हांस घेतल्याशिवाय सातान्यास जावयाचें नाहीं. महाराजांचा हा मनोदय पाहून ही सर्व मंडळी निघाली. जातांना वाटेंत पांडवगड, कमलगड यांचा ताबा झाला. प्रवास करीत करीत मंडळीचा मुक्काम फाल्गुण वद्य त्रयोदशी छ २७ मंगळवार ता. ३१ मार्च १८१८ ला मेढखोरें येथून प्रातःकाळीं कूच करून तांबवीनजीक वासोटयास झाला. वासोटयाचा किल्लेदार भास्करपंत मराठे नि॥ बाजीराव हा होता. त्याकडे किल्ला खालीं करून देण्याबद्दल पत्रें गेलीं पण त्यानें मानलें नाहीं. तेव्हां साहजिकच किल्ला सर करण्याचें ठरलें. किल्ल्यावर प्रतापसिंहाची पत्नी व पुतण्या इत्यादि खाशीं माणसें होतीं. दोन-चार दिवस लष्कराच्या तयारीस गेले व ता. ५ एप्रिल १८१८ ला प्रातःकाळीं चढाईस प्रारंभ झाला. 'तोफा गर्नाला चढवून किल्ल्यावर मारा सुरू केला. प्रातःकालेच प्रहर दिवसापासून आस्तमानापर्यंत सातसें गोला कुलपी वरतीं पडला.' बरींच माणसें जाया झालीं. अस्तमानीं किल्ल्याचें वर्तमान आलें कीं, 'राजवाडयावर गोला पडला. चाकरीच्या बायकांस दोघीस छरे लागले. खांबास गोळा लागला खांब उडाला. खासी मंडळी खुशाल आहेत परंतु फार घाबरी झालीं आहेत.

आपले हातें आपलीं मुलें माणसें मारतां म्हणतात. भाऊसाहेबाचा मूल भितो. मोठा अनर्थ उसळला आहे. भास्करपंत चढी लागला आहे. हल्ला आल्यास खासीं माणसें पुढें करून मग मी मरेन येसे नाना प्रकारची बडबड करतो.'

भास्करपंत मराठ्याची वरीलप्रमाणें बडबड ऐकून इंग्रजास मोठा पेंच पडला. चढाई जोरानें करावी तर खासीं माणसें जाया होण्याचा संभव. तेव्हां महाराजांस विचारण्यांत आलें. एल्फिन्स्टनचा निरोप घेऊन कॅ. ग्रँट महाराजांकडे गेला. त्यानें किल्यासंबंधींची सर्व हकीगत महाराजांस सांगितली व चढाई करणें किंवा कसें म्हणून विचारलें. तेव्हां महाराजांनीं उत्तर केलें कीं, 'हमला चढवावा. काय व्हावयाचें असेल तें होईल. आमचीं मुलें—माणसें या धोक्यांतून वांचलीं तर आमची व त्यांची भेट होईल. नाहींपेक्षां ईश्वरी इच्छा म्हणून आम्ही समाधान मानूं. राजकीय व्यवहारास ममता सोडून केलें पाहिजे.' महाराजांच्या परवानगीनंतर चढाईस सुरुवात झाली. प्रत्यक्ष तोफेजवळ एल्फिन्स्टन होता. त्यानें एक गोळा शिस्त धरून वाड्याच्या भिंतीवर टाकला. त्याबरोबर भिंत कोसळली. या भिंतीच्या आश्रयानें सातारकर महाराजांची मंडळी जीवाचा बचाव करीत होती. त्यांस असें वाटलें कीं, आतां जीवावर बेतलें. तेव्हां ती फारच घाबरली व भास्करपंत मराठ्यासही वाटूं लागलें कीं, छत्रपतींनीं खाशा मंडळींची आशा सोडली व हल्ला चालू केला. तेव्हां आतां आपला निभाव लागत नाहीं या विचारानें भास्करपंत मराठ्यानें तहाचें बोलणें करण्याचें ठरविलें व स्वतःचा व स्वतःचे कुटुंबाचा चीजवस्तु सुद्धां बचाव करण्याचें वचन इंग्रजांनीं दिल्यास किल्ला खालीं करून देण्यास आपण सिद्ध आहोंत म्हणून इंग्रजांस कळविलें. इंग्रजांनीं या अटी मान्य केल्या. नंतर वासोट्यावर पांढरें निशाण उभें करण्यांत आलें. किल्ला ता. ६ एप्रिल १८१८ ला सर झाला. बलवंतराव चिटणीस व नरसू काकडे यांस खाशा स्वाऱ्या उतरून आणण्यासाठीं पाठविलें. महाराजांची मंडळी आल्यानंतर उभयतांच्या भेटी झाल्या. या किल्ल्यावर बाजीरावाच्या बऱ्याच जडजवाहिऱ्याच्या पेट्या व कागदाचे रुमाल साहेबाच्या हातीं लागले. त्या सर्व वस्तूंची किंमत अदमासें तीन लाखांची झाली. येथील वाडा वगैरे जाळून

इंग्रजांनीं बरीच नासाडी केली. या ठिकाणीं हंटर व मॉरिसन नांवाचे दोन इंग्रज कैदी होते त्यांस मुक्त करण्यांत आलें. अशा तऱ्हेनें वासोटा सर झाला.

वासोट्याचा किल्ला ताब्यांत आल्यानंतर सातारकर छत्रपतींचा मुक्काम चैत्र शु॥ द्वितिया छ १ रोज बुधवार जमादिलावर ता. ७ एप्रिल १८१८ ला तांभवीनजीक मेढें येथें झाला. अस्तमानीं बाळाजीपंत नातूनें बलवन्त मल्हार चिटणीसास बोलावून नेलें व सांगितलें कीं, 'आलपिष्टनसाहेब महाराजांस मेजवानी करणार आहेत (तेव्हां) त्यांस मंडळीची नांवनिसी व कोणास किती वस्त्रें ही याद लिहून विनंती करून ठरऊन देववावी.' यानंतर ग्रांटसाहेब महाराजांचे भेटीस आला व म्हणूं लागला कीं, 'उद्यांचा मुक्काम येथेंच व्हावयाचा आहे. कारण लस्करचे लोक घाट उतरून यावयाचे आहेत. तसेंच आलपिष्टनसाहेबाच्या मेजवानीसाठीं जागाजुगा व कचेरीची व्यवस्था करणें बद्दल सातान्यास डाक धाडावी.' इतकें सांगून ग्रान्ट गेला. दुसरे दिवशीं ता. ८ एप्रिल १८१८ चैत्र शु॥ चतुर्थी छ २ रोजीं मेजबानीची यादी तयार झाली. हुजूरची सर्व मंडळी लिहिली. त्यांनीं आलपिष्टन यास दाखविली. 'नंतर बोलणें पडलें जें वारंवार मेजवानी परस्परें होणार. दोनशें मंडली हें गैरशिस्त. कोणतेही दरबारीं येसे नाहीं. साहेबाकडील मंडली दहा बारा येणार. मेजवानीस इकडील फार तरी पंचवीसपर्यंत लिहावी. फार जालियास सिस्तवार योग्या योग्य होणार नाहीं. वगैरे बहुत पर्याय बोलले. सर्व मंडली योग्यच टाकावी. कोण मोठे परा॰ष्टे बालाजीपंत येऊन बोलोन चालीस असामी मेजवानीस यावी ठरविलें व बालाजीपंतानें असेंही सांगितलें कीं, उद्ईक कूच व्हावयाचें. सातान्यास जावयाचें. सर्वच साहेब कचेरीस येतील. कचेरीचा बेत चांगला राखावा इतके बोलोन गेले.'

ठरल्याप्रमाणें चैत्र शुद्ध पंचमी छ ३ रोज शुक्रवार ता. ९ एप्रिल १८१८ ला स्वारीचा मुक्काम प्रातःकाळीं हलला. 'मार्गांत स्वामी धावडशीकर आडवे आले. देवदर्शनास चलावें विनंति केली. मुहुर्तानीं लौकर जावयाचें, आणखी वेलेस येऊं उत्तर केलें. नंतर करंजापाशीं आंबराईत स्वारी उतरली. लस्कर करंजावर उतरलें. सरकारी ढाल ढेरा उभा केला. आंबराईत स्नान-संध्या भोजन

झालें. तृतिय प्रहरीं मुहूर्तानीं मोठे समारंभें, बराबर आलपिष्टन व सर्व साहेबलोक खासे त्रिवर्ग अंबारींत, अंबारींत खवासियात, महाराजाचे विठल बलाल महाजन व खंडेराव सिरके व भाऊसाहेबाचे खवासींत बलवंतराव भो॥ व बलवंतराव चिटणीस, येैसी स्वारी बहुतच तरतुदेनी वाड्यांत दाखल झाली. मंडपांत कचेरी बहूत तरतुदीनी केली, खासा सिंव्हासनारूढ झाले. डावे बाजूस सर्व साहेबलोक बसले. वरकड हुजूरची मंडळी व शहरांतील थोर थोर आले. नाच वगैरे समारंभ झाला. आलपिष्टन सुद्धां सर्वांस खुसी तोफा झाल्या.'

याप्रमाणें कंपनी सरकारच्या देखरेखीखालीं सातारकर छत्रपतींचा सिंहासनारोहण समारंभ झाला. नंतर दुसरे दिवशीं चैत्र शुद्ध षष्टी छ ४ रोज शनिवार ता. १० एप्रिल १८१८ ला आलपिष्टनसाहेबानें महाराजांस मेजवानी दिली. 'त्रितिय प्रहरीं स्वारी मेजवानीस, आलपिष्टन याचे लस्करांत डेऱ्यास गेली. आलपिष्टन सामोरे येऊन घेऊन गेले.' मेजवानी थाटाची झाली. अत्तर गुलाब झालें त्या वेळीं साहेबानें खाशा मंडळीस नजराणे नजर केले. खासा महाराज व महाराजाचे दोघे बंधू भाऊसाहेब व आप्पासाहेब यांस खालीलप्रमाणें नजराणे नजर करण्यांत आले.

(१) मंदील कोरदार (२) किनखाप गठी (३) मलमल्या (४) घड्याळ (५) दुर्भीण (६) सिरपेच हिरे (७) कारखाना हिरे (८) तुरा मोत्याचा (९) दंड पेट्या जोड हिरे (१०) शाल लाखी जाड पदरी बुटेदार (११) रुमाल शाल नामी (१२) पटका बादली कारचोपी (१३) पोची जोड हिऱ्याच्या (१४) कंठी मोती व पाच (१५) पुष्कराज (१६) चवरी पराची (१७) अल्फागीर बादली.

याप्रमाणें नजराणे खाशा स्वारीस देण्यांत आले व सौ. बाईसाहेब, सौ. जीजीसाहेब व मातोश्री माईसाहेब यांना खालीलप्रमाणें नजराणे नजर करण्यांत आले.

(१) बादेहार जडाव (२) आंगठी (३) शालजोडी (४) किनखाब (५) पैठणी (६) चोलखण.

याप्रमाणें राजघराण्यांतील खाशा मंडळीस साहेबानें नजराणे नजर दिले. याशिवाय सरकारास ' हाती घोडा दिल्हा. मोतदार व महात यांस इनाम दिल्हें. महाराजाकडील शागीर्द–पेशास इनाम एकंदर रुपये ५०० दिल्हें. रात्रौ बाळाजीपंत नातू पोषाख व जवाहीर घेऊन येऊन माईसाहेब व बाबासाहेब व सौ॥ राणीसाहेब व सौ. बाईसाहेब व सौ. जिजीसाहेब यांस प्रविष्ट करून गेले.'

याप्रमाणें मराठी साम्राज्याच्या दुधाळ गाईनें आपला पान्हा खुला करून भरपूर दूध द्यावें म्हणून आलपिष्टनसाहेबानें वरीलप्रमाणें तिच्या आचळांस दूध लाविलें. यानंतर 'चैत्र शु॥ सप्तमी छ ५ रोज रविवार मु॥ शाहूनगर या दिवशीं कुंपनी सरकारची व छत्रपती सरकारची दोस्ती जाली. खुलासा होऊन सिंहासनारूढ झाले, हें सर्वांस मशहूर व्हावें म्हणून शें–दोनशें जाहीरनामे कंपनीचे रीतीचे शिके मोर्तब निशाणें होऊन पत्रें चालावयास प्रारंभ जाला. जाहीरनामे ग्रान्ट याचे स्वाधीन केले.' याच वेळीं जर्नेल प्रछकसाहेब कर्नाटकांतून विलायतेस जाण्यासाठीं या मार्गानें आला. तेव्हां एलफिन्स्टननें त्याची व महाराजांची मुलाखत करविली. त्या दिवशीं प्रातःकाळीं ' कोरडी मेजवानी दिली व वस्त्रें जवाहीर देऊन त्यास निरोप दिल्हा.' चैत्र शु॥ अष्टमी रोज सोमवार या दिवशीं एलफिन्स्टनला ' बकरेची मेजवानी ' देण्याचें ठरलें. त्याप्रमाणें व्यवस्था करणेंत आली. त्या दिवशीं एलफिन्स्टनला देण्यासाठीं म्हणून बाळाजीपंतापाशीं ' बुटाची नामी थोर, शाल-जोडी होती ती खरेदी केली. '

ठरल्याप्रमाणें एलफिन्स्टन दोन प्रहरीं जेवणास आले. जामदारखान्यापुढें माडीवर जेवणाचा बेत केला होता. त्याजकडील जेवणाची बिलोरी भांडीं आणलीं होतीं. जेवणें झालीं व नंतर मंडपांत कचेरी झाली. विडे, आतर, गुलाब होऊन वस्त्रें जवाहीर दिल्हें. या वेळीं खुद्द आलपिस्टनसाहेब यांस खालील प्रमाणें वस्तू नजर करण्यांत आल्या.

(१) तिवट (२) शालजोडी (३) किनखाब (४) मद्दुद्या दोन (५) कंठी मोत्याची (६) शिरपेच (७) खाना (८) पोच्या दोन (९) घोडा (१०) हाती.

येथें वर नमूद केल्याप्रमाणें छत्रपतींनीं साहेबास व साहेबानीं छत्रपतींस वरीलप्रमाणें मेजवान्या व नजराणे नजर करण्याचा राबता चालू झाला.

येणेंप्रमाणें समारंभ होऊन एल्फिन्स्टन निरोप घेऊन निघाला तेव्हां 'तख्ताचे दिवाणखान्यांत माईसाहेब बसून विडे, आतर, लाब देऊन निरोप दिल्हा. निरोप समई आलपिष्टन यास हिऱ्याची आंगठी दिल्ही, निरोप घेऊन गेले.'

बाजीरावाचा दंगा मिटला नव्हता. अद्याप धामधूम चालू होती व महाराजांचे संरक्षणार्थ 'राहावयास पलटणें व स्वार येणार तोंपर्यंत स्वारी किल्ल्यावर असावी, असें म्हणणें फार दाट पडल्यावरून स्वारी किल्ल्यावर जावून राहावयाचें ठरलें.'

त्याप्रमाणें स्वारी किल्ल्यावर राहावयास गेली. त्या सालीं चैत्र शु॥ ९ छ ७ रोज मंगळवार या रामनवमीच्या दिवशीं अमात्यपंत सर्वोत्तमराव यांच्या घरीं रामनवमीचा उत्सव होता. पंत आमात्यांनीं बोलावल्यावरून किल्ल्यावरून महाराज आले. किर्तनसमारंभ झाला. खाशाचे भोजनाचा बेत झाला. बरोबरचे मुत्सद्दी मंडळीस फराळाचा बेत केला. नंतर त्रिवर्ग खाशांस पोशाख दिल्हे. व महाराजांस घोडी नजर केली. नंतर अस्तमानीं स्वारी किल्ल्यावर गेली. किल्ल्यावर स्वारी जातांना सलामीच्या एकवीस तोफा उडविण्याचा पायंडा इंग्रजानें सुरू केला.

चतुरसिंग भोसले कांगोरी किल्ल्यावर कैदेंत होते. तेथें जलोदर होऊन चैत्र शु॥ दशमी छ ८ रोज बुधवार ता. १५-४-१८१८ या दिवशीं मरण पावले. किल्ल्याखालीं आणून किल्लेदारानें दहन केलें. परंतु ही गोष्ट महाराजांस इंग्रजानें कळूं दिली नाहीं.

याच वेळीं श्री स्वामी हनुमंत बाबा चाफळकर यांचा अनुग्रह पूजा करून घेतला. महाराजांनीं चारशें रुपये रोख खर्च केले. मातोश्री माईसाहेब भाऊसो आपासो, राणी सो उभयतां, बळवंतराव भोसले कुटुंबासुद्धां व त्यांचे मातोश्री सुद्धां, घेतला, तसेंच माईसाहेबांचे दोघे बंधू शिर्के यांनीं घेतला. समारंभ मोठा थाटाचा केला. पितांबर शालजोडी, रुमाल, वगैरे उत्कृष्ट महावस्त्रें चाफळकर महाराजांस देण्यांत आलीं.

यामप्रमाणें महाराजांचे पाय भूमीस लागले होते. नुकताच राज्याभिषेक-समारंभ झाला होता. तेव्हां राजघराण्यांतील सर्व मंडळी मोठी खुषींत व आरामांत होती. वेळोवेळीं स्वाऱ्या निघत असत. स्वतः महाराज, राजमाता माईसाहेब वगैरे खासे लोक आपल्या ऐश्वर्याचें व संपत्तीचें प्रदर्शन आतां मोठ्या थाटानें थाटत होते. त्याचें वर्णन **Fifteen years in India** या पुस्तकांत मोठें बहारीचें केलें आहे. तें असें:

'या वेळीं सातारचे महाराज एखाद्या पौर्वात्य राजास शोभेल अशाच इतमामानं राहात होते. त्यांच्या स्वारीचा श्रृंगार राजराजेश्वराला शोभण्यासारखाच असे. उत्तम तऱ्हेनें सजविलेल्या हत्तीच्या पाठीवर अंबारी व त्या अंबारींत खुद्द प्रतापसिंह महाराज, धाकटे बंधु अप्पासाहेब व राजमाता वगैरे खाशा स्वाऱ्या बसत असत. माईसाहेबांच्या बरोबर इतर मानकरी बायकांचा परिवार मोठा असे. तो दुसऱ्या हौद्यांतून व पालख्यांतून महाराजांच्या हत्तीच्या मागोमाग चाले. आघाडीस इंग्रज सैन्य लष्करी शिस्तीनें चाले. भालदार ललकारत, हुजरे हलकारे महाराजांसाठीं रस्ता करीत. महाराजांवर चवऱ्या मोर्चेली वारल्या जात, त्या वेळची शोभा मोठी अपूर्व दिसे. तसेंच तुताऱ्या, शिंगें व नौबदी झडत. एकंदरींत स्वारीचा थाट मोठा नामी असे. प्रातःकाळीं खाश्यांच्या स्वाऱ्या किनखापी खोगिरानें शृंगारलेल्या घोड्यांवर बसून सहल करावयास जात. राजमाता पुरुषाप्रमाणें दोहों बाजूस पाय सोडून घोड्यावर बसे. ती घोड्यावर बसण्यांत चांगली पटाईत होती व आपला घोडा फारच सफाईनें फेकी. उन्हाचे वेळीं खाशा स्वाऱ्या फेरफटक्यास निघत. राजमाता माईसाहेब या उतारवयांत सुद्धां मोठ्या उमद्या व सौंदर्यसंपन्न दिसत. त्यावरून त्या तरुणपणीं चांगल्याच देखण्या असाव्या अशी कल्पना सहज होई. त्यांचा पोषाख किनखापी व भरजरीचा असे. त्या चार-दोनच पण ठसठशीत असे दागिने घालीत. त्यांनीं गोषाची पद्धती टाकली होती. आपला चेहरा उघडा ठेवून त्या खुशाल हिंडत. आपल्याशीं जास्त संबंध येणाऱ्या अधिकाऱ्याशीं त्या मोठ्या आपुलकीनें बोलत व वागत. स्वभावतः त्या बोलक्या होत्या. त्यांची शरीरयष्टी मध्यम होती. चेहऱ्याची ठेवण चांगली देखण्यांपैकीं. त्यांचें वय ४० ते ५० चे

दरम्यान होतें. सामान्य हिंदु स्त्रियांप्रमाणें त्या लाजाळू नसून चांगल्या बोलक्या होत्या. थोडक्यांत म्हणजे राजमाता चाणाक्ष, हजरजबाबी व मोठी कुशल बाई होती. ती छत्रपतीबरोबर नेहमीं असे. छत्रपतींचीं बहुतेक कामें ती करी. महाराजांस विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें सुचत नसत त्या वेळीं राजमाता मोठ्या चाणाक्षपणें तीं देई. महाराजांस जेव्हां गोंधळ पडे तेव्हां ते उत्तराच्या अपेक्षेनें मातोश्रीकडे पाहात. या वेळीं महाराजांचें वय सुमारें तेवीस वर्षांचें होतें. त्यांचे धाकटे भाऊ त्याच्यापेक्षां वयानें थोडे लहान असतील. पण उभयतां बंधूंची शरिराची ठेवण साधारणपणें सारखीच होती. ते दोघेही वर्णानें काळेसावळे होते. त्यांचे चेहेरे सौंदर्यसंपन्न नसून गांवढळांत जमा होतील असेच होते. हीं मुलें त्या रूपसंपन्न, हुशार व चाणाक्ष राणीचीं असतील असें त्यांच्याकडे पाहून कोणासच वाटत नसे. त्यांचा पोशाख अत्यंत मौल्यवान् कलावस्तूंचा असून त्यावर भरजरीचें सुंदर काम केलेलें असे. गळ्यांत हिऱ्यामोत्यांचा तीन पदरी कंठा, डोकीला मंदील व कानांत बाळी असा थाट असून पायांत सुरवार व खालीं पादत्राणेंही पण अशींच कलाकुसरींचीं असत. त्यावर सुद्धां हिरे, माणकें चमकतांना दिसत. राजेसाहेबांच्या स्वाऱ्या ज्या वेळीं एखाद्या गांवीं जात त्या वेळीं स्वारीबरोबर उंटावरील शिंगवाले शिंगें फुंकीत व मग गांवकरी मंडळी येत आणि महाराजांना अत्यंत अदबीनें व लवून मुजरे करीत.'

सातारकर छत्रपति गोपाळ अष्ट्याच्या दुर्धर प्रसंगांतून निसटून साताऱ्यास दाखल झाले आणि वरीलप्रमाणें सुखानें आपली कालक्रमणा करूं लागले. पण पुण्याच्या राज्यक्रान्तींत सर्व सूत्रें आपल्याला पाहिजेत तशीं धोरणाधोरणानें हलविणारा मुख्य सूत्रधार एल्फिन्स्टन हा एखाद्या वाऱ्यासारखा फिरत होता. पेशव्याचें राज्य गेलें व इंग्रजाचें राज्य आलें. पण हें इंग्रजी राज्य चिरस्थायी व्हावें व त्यानें कायमचें मूळ धरावें म्हणून त्याची धडपड चालू होती. इ. स. १८१८ पासून एल्फिन्स्टन हा डेक्कन कमिशनरच्या हुद्यावर दाखल झाला. गेलीं दहा–पांच वर्षें सगळीकडे ताम्रमुखी होतें असें म्हणतां म्हणतां सगळीकडे ताम्रमुखी झालें. त्यामुळें पेशव्याची रयत धास्तावली. तेव्हां प्रजेची धास्ती नाहींशी व्हावी म्हणून आपले हेतु आपण जाहीर करावेत असें एकदां एल्फिन्स्टनला

वांटले. पण हें करण्यांत धोका होता. पेशव्याची सत्ता अद्याप जोरांत असून, मराठे सरदारांत पेशव्याचें वजनही चांगलें होतें. शिवाय किल्ले वगैरे झाडून सारीं मजबूत स्थळें त्याच्या ताब्यांत असल्यामुळें एकदम राज्य हस्तगत करणें व तसें जाहीर करणें ही गोष्ट आपल्या आंवाक्याबाहेर आहे, इतकें सामर्थ्य आपल्या फौजेचें नाहीं हें ओळखून पेशव्यांचें राज्य हस्तगत केल्याबद्दलचा व तसें जाहीर करण्याबद्दलचा ग. ज. चा हुकूम एल्फिन्स्टनला मिळालेला असताना त्यानें तसें जाहीर केलें नाहीं. व हा हुकूम तूर्त गुप्तच ठेवा, असें हाताखालच्या अधिकाऱ्यांसही कळविलें. या वेळीं इंग्रज फौजांस मराठ्यांचा धांवता वेढाच पडला होता. यांतून मुक्त होऊन प्रथम बाजीरावावर मात करणें प्राप्त होतें. या वेळीं आपलीं पत्रें शत्रूच्या हातीं पडूं नयेत म्हणून एल्फिन्स्टन कागदाच्या तुकड्याच्या बारक्या वळकट्या करून त्या बारीक नळकंड्यांतून ठिकठिकाणीं पोचविण्याचें करी. हें धावाधावीचें युद्ध कसें चालवावें आणि एकाद्या वातचक्राप्रमाणें सर्व देशभर गरगरा फिरणाऱ्या या मराठी सैन्यास पायबंद कसा घालावा हा मोठा प्रश्न एल्फिन्स्टनला होता. तेव्हां त्यानें मन्रोचा सल्ला मागविला. आणि दूरवर विचार करून ता. ११-२-१८१८ रोजीं एक लांबलचक जाहीरनामा काढून त्याच्या प्रती महाराष्ट्रभर प्रसिद्ध केल्या. हा जाहीरनामा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याच्यांत बाजीरावाच्या नालायकीचें माप त्याच्या पदरांत भरपूर घातलें असून इंग्रजानें आपले उद्देश स्पष्टपणें जाहीर केले आहेत. तसेंच त्यांत इंग्रजाच्या भावी राज्यांत रयतेची व्यवस्था कोणत्या प्रकारानें होईल याची पूर्ण कल्पना दिली आहे. या जाहीरनाम्यानें लोकांच्या मनांतील किंतु नाहींसे झाले. बाजीरावास सोडून गेल्यास तो आपला सूड घेईल ही धास्ती पार नाहींशी झाली. आणि जो तो सरदार, जहागिरदार, इनामदार व सरंजामदार आपआपली व्यवस्था लावून घेण्याच्या नादीं लागला. आणि बाजीरावाचें हें बळ आपोआप खच्ची झालें. दोन महिन्यांत बाजीरावास सोडून जो घरीं बसेल त्याचीं वतन पूर्वीप्रमाणें चालू राहतील असें अभिवचन इंग्रजानें दिल्यामुळें बाजीराव उघडा पडला. शिवनीचा पराजय

आणि सोलापूरास पानशाचा पाडाव हे दोन पराभव होण्याचें कारण
एल्फिन्स्टनचा हा जाहिरनामाच होय. शिंदे–होळकरांच्या धांगडधिंग्यानें हैराण
झालेल्या जनतेस साहेबाचा जाहिरनामा म्हणजे एक उःशाप वाटला. त्या
जाहिरनाम्याच्या प्रती लोक भराभर घेऊन वाचूं लागले. या जाहीरनाम्यानंतर
बारा दिवसांनीं प्रतापसिंह इंग्रजांच्या सैन्यांत दाखल झाला. अष्टयाच्या लढाई-
नंतर पेशव्याचें राज्य संपून साहेबी अंमल सुरू झाला, अशी लोकांची भावना
झाली आणि जो तो आपली व्यवस्था त्या अनुसंधानानें लावूं लागला.
बाजीरावाच्या कारभाराचें, कारकीर्दीचें पुरेपूर ज्ञान एल्फिन्स्टनला होतें. बाजी-
रावाच्या राज्यांत लोकांच्या मनावर फक्त एकाच पवित्र अशा धार्मिक भावनेचें
चित्र उठावदारपणें उमटलें होतें. तें म्हणजे देवदेवतार्चनें, पूजाअर्चा, वेदघोष
आणि ब्राह्मणसंतर्पणें. तेव्हां या गोष्टींना आपण हात घातला असतां जनता
बिघडेल हें ओळखून एल्फिन्स्टननें धार्मिक बाबी आहेत तशा आम्ही पुढें
चालवूं असें आश्वासन दिलें. इतकेंच काय पण तसा जाहीरनामाही काढिला. तो
स्वतः ब्राह्मणांचा परामर्ष घेण्यासाठीं म्हणून वाईस गेला. तेथें प्रमुख शास्त्री–
पंडितांची सभा भरविली आणि जाहिरनाम्यांतील प्रत्येक बाब स्पष्ट करून
सांगितली. त्या सभेचा फायदा घेऊन सर्व विद्वान् शास्त्र्यांना बाजीरावाप्रमाणेंच
देणग्या व बक्षिसें दिलीं. पुण्याच्या ब्राह्मणांचाही पण अशाच प्रकारें सन्मान केला.
अशा तऱ्हेनें ब्राह्मण मंडळींचा संतोष मिळविल्यानंतर दुसरा मोठा वर्ग म्हणजे
मराठ्यांचा. त्यांचा मुख्य बाणा म्हणजे शिपाईगिरीचा. तेव्हां त्यांना राजा म्हणून
कुर्निसात करण्यास तक्त व राजा असावा म्हणून साताऱ्ची गादी निर्माण केली. हा
सर्व नाटकी देखावा निर्माण करून एल्फिन्स्टननें मरा ^ राज्याच्या भव्य इमारतीस
पार पायापासून उखाड दिली आणि इंग्रजांचें राज्य चिरस्थायी केलें. राजकार-
णांतील हा डाव एल्फिन्स्टननें मोठ्या मुत्सद्देगिरीनें तडीस नेला. एल्फिन्स्टननें
काढलेला कंपनी सरकारचा हा जाहिरनामा पुढीलप्रमाणें आहे :

कंपनी सरकारचा जाहीरनामा

शिक्का पार्टिंजर साहेबाची सही इंग्रजी

जाहीरनामा सरकार दौलत मदार कंपीणी इंग्रज बाहादूर सु ॥ समान अशर मयातैन व अलफ तमाम लोकानीं जाहीरनामा समजून त्याप्रमाणें वर्तणूक करावी. याजकरितां लिहिलें जातें जें बाजीराव साहेब राज्यावर आल्यापासून नाना प्रकारचे बखेडे व बंडे होत होती. राज्यांत व मुलुकावर हुकमत कधीं चालली नाहीं. पुढें होळकरांचा दंगा जाहाला तेव्हां राज्य सोडून पळून वसईस जाऊन खंडेराव रास्ते यांचे मदतीनें गुजराण करून राहिले नंतर कंपीणी सरकारची दोस्ती केली त्याजवरून कुंपीणी सरकारची फौज येऊन बाजीराव साहेब, यांसी गादीवर बसवून तमाम बंडे व बखेडे होते ते मोडून मुळुकांत बाजीराव साहेब यांचा हुकुम सुरळीत चालू करून दिल्हा. पहिल्या दंग्यामुळें व पुढें दुष्काळ पडल्यामुळें मुळूक बहुतेक उध्वस्त जाला होता तो कुंपीणी सरकारच्या भरवंशावर आबाद जाला बाजीराव साहेब याणीं मामलती मक्त्यानें लाविल्या ते मक्तेदार रयतेपासून जाजती ऐवज घेत गेले तत्रापि बहुत आबादी जाली जे मुलकाचा ऐवज जमा जाहला त्याजवर बाजीराव साहेब याणीं दौलतीचा खर्च व ऐषआराम करून खजिना बहुत जमा केला मराठे सरदार याजवर बाजीराव साहेब यांचा दाब बहुत दिवसापासून नवता तो लागू करावा असें कुंपीणी सरकारातून कबूल केलें नहोते जे वाजबी असेल तें चालतें करून द्यावें असें कंपीणी सरकारची खायष होती त्याजवरून गायकवाड यांजकडील जाब सालाचा ठरावयाकरितां गायकवाड याणीं आपले कारभारी गंगाधरशास्त्री कंपीणी सरकारचे बाहादरीवर पुण्यास पाठविले ते येऊन बहुतेक जाब साल लौकर उलगडावा असें जाहाले होते त्यांत बाजीराव साहेब यांची किफायत बहुत होती इतक्रियात गंगाधरशास्त्री यांस बाजीराव साहेब यांचे कारभारी याणीं पंढरपुरचे क्षेत्री मारिले त्या वेळेस तमाम रयत व यात्रेकरू वगैरे सर्व म्हणत होते कीं शास्त्री यांस त्रिंबकजीनें बाजीराव साहेब यांचे हुकुमासिवाय मारिलें नाहीं असें असतां बाजीराव साहेब दोस्त मोठे दौलतदार असें करवीतील हा

गुमान मनांत न आणता ज्या त्रिंबकजीनें मारिलें त्यास हवाली करून द्यावा असा कंपीणी सरकारचा विचार होऊन त्रिंबकजीस हवाली करावा असें बोलणें पडलें तेव्हांच हवाली करावा तो न केला याजकरितां कंपीणी सरकारची फौज बहुत जमा जाली नंतर त्रिंबकजी हवाली केला त्या समई कंपीणी सरकारास खर्च बहुत जाला तो दोस्तीवर नजर देऊन न मागतां त्रिंबकजीस हवाली करून घेतला आणि दोस्ती पहिली चालत होती त्याप्रें॥ कायम ठेविली नंतर बाजीराव साहेब याणीं बाहेरचे सरदार यांजकडे पत्रें पाठवून त्यांची फौज तयार करावी असी तजवीज केली व आपले राज्यांत बंडे उभी करून बंडाचे कुमके-करितां आपली फौज तयार करून कंपीणी सरकारासीं लढाइ पडावी आणि नुकसान व्हावें अशीं तजवीज करूं लागले. त्याजवरून बखेडा मोडावा याज-करितां कंपीणी सरकारची फौज तयार होऊन पुण्यास आली आणि बाजीराव साहेब यांसी शहराभोंवती तंबी केली त्याज वेळेस बाजीराव साहेब हातीं सापडले होते मुलुकाचा बंदोबस्त करावयाजोगी कंपीणी सरकारची फौज बहुत तयार होती परंतु तहनामा जालीयापासून हरवख्त बाजीराव साहेब यांचें बोलणें पडत होते जें आम्हांस राज्य प्राप्त जालें व आम्ही ऐषआराम करितों हें देणें सर्व कंपीणी सरकारचे आहे आमचा सुकर गुजारा कंपीणी सरकारचे भरवंशावर होत आहे असें बहुत तऱ्हेनें बोलत होते याजकरिसां गादी कायम ठेऊन पुढें त्यांचे हातून फिसाद न व्हावा याजकरितां वसईचा तहनामा कायम ठेऊन नवा तहनामा जाला पांच हजार स्वार व तीन हजार पायदळ मदतीस देत जावें असा बाजीराव साहेब यांचा पहिलाच करार होता ती फौज कंपीणी सरकारांतून ठेवावी असें होऊन फौजेचे खर्चास मुळूक लावून दिल्हा तेव्हांपासून दोस्ती पहिलेप्रों चालली नंतर पेंडारी चहोंकडे रयतास दरसाल उपद्रव करतात त्यांत बाजीराव साहेब यांचे मुळुकास बहुतच उपद्रव होतो याकरितां पेंडारी यांचा बंदोबस्त व्हावा ऐसी कंपीणी सरकारांतून तजवीज जाली तेव्हां बाजीराव साहेब यांचें बोलणें पडले जें पेंडारी यांचा बंदोबस्त जाल्यानें आमची बहुत किफायत आहे आम्ही ही फौज सामील देतों असें खातरजमेनें बोलून त्या बहाण्यानें कंपीणी सरकारचे आश्रयावर जो खजिना जमा केला होता तो ऐवज

बाहेरील सरदारांस पाठवून त्यांसी बिघाडविलें आपली फौज तयार केली कंपीणी सरकाराची फौज जवळ होती ती दूर जावी याजकरितां दोन हजार स्वार कंपीणी सरकारचे फौजेबरोबर देऊन फौज दूर गेली असी संधी पाहून येकायेकीं कांहीं कारण व जाब सालाची तक्रार नसतां फौज तयार करून चालून येऊन कंपीणी सरकारचे फौजेसी लढाई केली व कोणतेही मुलुकांत चाल नाहीं तसी चाल करून इंग्रजी वकीलांचे बंगले व छावणीची जागा लुटून जाळली व कंपनी सरकारची रयत व वाटसरू सलुच्याचा भरवंसा धरून येत होते त्यांस धरून कैद केले व कितेक लुटले. दोन इंग्रजी सरदार मुंबईकडून येत होते ते तळेगांवाजवळ चोरांचेंही पारपत्य करीत नाहींत त्या तऱ्हेनें मारिले ते मारणार अद्यापि चाकरीवर आहेत याजवरून बाजीराव साहेब यांचे हुकुमासिवाय मारिले नाहींत असा निश्चय होतो व ज्या त्रिंबकजीनें गंगाधरशास्त्री यांस मारिलें त्यास जवळ आणोन कारभारांत वागऊ लागले यावरून बाजीराव साहेब यांचे हुकुमासिवाय त्रिंबकजीनें शास्त्री यांस मारिलें नाहीं असे लोक पाहिल्यापासून बोलतात तो मुद्दा शाबूद करून घेतला व पेंडारी बलावून मुलूक लुटवावा असी तजवीज करूं लागले या तऱ्हेचे दौलतदारीचे सांप्रदाय सोडून वर्तणूक करून कंपीणी सरकार यासीं बुडवावें असें केले याजवरून कंपीणी सरकारांतून निश्चय जाला जे बाजीराव साहेब राज्याचे उपयोगी नाहींत त्याजकरितां त्यास बिलकुल राज्यांतून काहाडून कंपीणी सरकारांतून मुलूक व किल्ले काबीज करून अमल करावयाची तजवीज होऊन एक सडी फौज बाजीराव साहेब यांचें मागें रवाना करून एक फौज किले घ्यावयाकरितां जात आहेत दुसरी फौज अमदानगराजवळ येऊन पोंहचली आहे व येक मोठी फौज खानदेशांत आली आहे व जरनेल मंडरोल साहेब कर्नाटकाचा बंदोबस्त करीत आहेत व मुंबईकडून फौज येऊन कोंकणचे किल्ले घेऊन त्या प्रांताचा बंदोबस्त होत आहे आतां थोडे दिवसांत बाजीराव साहेब यांचा ठिकाण नाहीं असें होऊन माहाराज छत्रपती सातारकर बाजीराव साहेब यांचे कैदेत आहेत त्यांस सोडवून घेऊन मोकळें करून त्यांचे व त्यांचे मंडलीचे शानशोकतीकरितां कांहीं राज्य त्याजकडे चालेल अशी तजवीज कंपीणी सरकारची होऊन सातारे किल्यावर माहाराजांचा झेंडा कायम

करून त्यांचे तरफेचे लोक होते त्यांची खातरी केली आहे त्यांस जो मुळूक मोहाराजाकडे होईल त्यांत न्याय इन्साफ हुकमत व अमल ते करतील कंपीणी सरकारांत मुळूक राहील तेथे कंपीणी सरकारचा अमल होईल परंतु कोणाचे वतनास व इनामास व वर्षासनास व देवस्थानचे खर्चास व खैरातीस व कोणाचे ज्ञातीचे धर्मास खलेल न होता वाजबी असेल तें सुरळीत चालेल व बाजीराव साहेब मक्तेदारास मामलती देत होते ते महकूब होऊन कमाविसदार याजकडे मामलती सांगून जो वाजवी ऐवज असेल त्याची उगवणी होईल कोणावर जुलूम जाजती काही होणार नाही येविसी कोणीही आंदेशा घेऊ नये बाजीराव साहेब यांजकडे जे चाकरीस आसतील त्याणी चाकरी सोडून आज-पासून दोन महिन्यांत आपले घरी यावें जे कोणी न येतील त्याचे वतन जफ्त होऊन खराबी जाहाल्यासिवाय राहाणार नाहीं जमीदार याणी आपले परगण्यातील कोणी बाजीराव साहेब याजकडे चाकरीस आसतील त्यांची नांवनिसीवार याद तूर्त समजावावी चाकरी सोडून जसे घरास येतील ते वेळेस समजवीत जावे बाजीराव साहेब यांची कुमक करूं नये त्यांजकडे वसूल येकंदर देऊ नये दिल्ह्यास साल मजकुरी मुलकास उपद्रव लागला आहे त्याची फिर्यादीची दर्यात्फी होऊन सूट मिलेल बाजीराव साहेब यांजकडे वसूल दिल्ह्यास तो ऐवज मजुरा न देता दरोबस्त ऐवज घेतला जाईल व जे जमीदार कुमक करतील व ऐवज देतील त्याचीं वतनें व जमिनी त्यांजकडे चालणार नाहीं तेरीख छ ११ माहे फेबरीवारी सन १८१८ इसवी मु॥ छ ५ रबिलारवर.

भ्रमाचा भोपळा फुटला : : १९

' पेशवे पळाले व त्यांचें राज्य आम्हांस मिळालें. आतां आम्हीं केवढ्या तरी भाग्याचें धनी झालों ' अशा कल्पनेनें छत्रपती प्रतापसिंह महाराज व मातोश्री माईसाहेब आनंदांत दंग होत्या व आपला काल ऐषआरामांत बादशाही थाटानें काढीत होत्या. राज्यरक्षणाची जबाबदारी नाहीं, श्री शिवाजी महाराजांनीं राज्य संस्थापिलें, तें पेशव्यांनीं विस्तारिलें व इंग्रजांनीं आपल्या पदरांत आयतें टाकलें तेव्हां झालें तें लई बेस झालें, अशा सुखस्वप्नांत ते होते ! पण स्वतःकरितां कमाविलेल्या साम्राज्याची रखवाली करणाऱ्या साहेबाच्या बुटाच्या खाडखाड आवाजानें त्यांच्या या सुखस्वप्नाचा विरस करण्यास सुरुवात केली. राज्यारोहण—सभारंभ झाल्यानंतर ग्रँटडफ्ला साताराचा एजंट नेमण्यांत आलें व त्याच्या देखरेखीखालीं महाराजांनीं आपली बादशाही सत्ता चालवावयाची असें ठरलें. कॅ. जेम्स ग्रँटडफ्नें साताराचा एजंट म्हणून कसें काम करावें, कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावें व राजाशीं वागतांना आपलें धोरण काय ठेवावें, यासंबंधींचा खुलासा करणारें एक पत्र एल्फिन्स्टननें ता. ८ एप्रिल १८१८ ला लिहिलें आहे. त्या पत्रावरून पुष्कळच बोध होतो. तें पत्र खालील आशयाचें आहे.

' गव्हर्नर जनरलचा पुढील हुकूम येईपर्यंत तुम्हांला साताराचे पोलिटिकल एजन्ट म्हणून नेमण्यांत आलें आहे. तेव्हां हें काम करीत असतांना

तुम्हांस सातारच्या राज्यासंबंधीं कांहीं मूर्त कल्पना असणें जरूर आहे. हें सातारचें छोटेखानी राज्य निर्माण करण्यांत कंपनी सरकारचा असा मुख्य हेतु आहे कीं, पेशव्यांचें राज्य नष्ट झालें म्हणून हळहळणाऱ्या लोकांस या राज्याकडे पाहून समाधान वाटावें, तसेंच ब्राह्मणी राज्याबद्दल वाटणारा आदर व अभिमान या राज्याच्या योगानें कमी व्हावा. आणि एका पुरातन राजघराण्यांतील लोकांस व खुद्द राजांस आपला चरितार्थ योग्य तऱ्हेनें चालविण्याचें हें राज्य म्हणजे एक साधन व्हावें.

प्रस्तुत प्रसंगीं तुम्हांस फार चतुरपणानें वागावें लागेल. याकरितां राजेसाहेबांचें मन प्रसन्न ठेवून त्यांस आपल्या कह्यांत पूर्णपणें आणावा लागेल. असें झालें म्हणजे मग हें राज्ययंत्र नीट सुरळीतपणें मार्गास लागेल. नाहीं तर त्यांत जर का थोडा बिघाड झाला तर मात्र तेंच राज्ययंत्र आपल्या उरावर बसल्याखेरीज राहणार नाहीं. या वेळीं राजाची स्थिती अत्यंत केविलवाणी आहे. तो सर्वतोपरी आपल्या स्वाधीन आहे. तेव्हां त्याच्यावर आपला शह बसविण्याचें काम अत्यंत सोपें आहे. त्यास आपण नुकताच पेशव्यांच्या कैदेंतून सोडविला असून आतां त्यास राज्य व वैभव आपणच देणार आहोंत. त्यासाठीं त्यास कोणत्याच प्रकारचे कष्ट पडले नाहींत. तो अक्षरशः सर्व बाबतींत आपल्यावर अवलंबून आहे.

अशी अगदीं केविलवाणी परिस्थिति असतांना सुद्धां खुद्द राजेसाहेबांच्या व राजघराण्यांतील खाशा मंडळींच्या स्वतःबद्दलच्या कल्पना मात्र अत्यंत विचित्र आहेत. आपण राजराजेश्वर आहोंत, तेव्हां त्या इतमामानें व दिमाखानें आपण राहिलें पाहिजे, मग त्यास खर्चवेंच लागेल तितका लागो त्याची मुळींच आपणांस परवा नाहीं.

राजेसाहेबांस या सर्व फाजील कल्पनांच्या जंजाळांतून मुक्त करून त्यांस सत्य परिस्थितीची जाणीव देणें हें काम फारच कठीण आहे. तरी पण माझा तुमच्या बुद्धिमत्तेवर, चातुर्यावर व दीर्घोद्योगावर पूर्ण विश्वास आहे. आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणण्यासाठीं तुम्ही पहिल्यांदा सर्व राज्याचा ताबा घ्या. तसें करतांना आपणांस आपल्या सैन्याचा व पैशाचा उपयोग करावा

लागणार आहे. राज्यकारभार नीट सुरळीतपणें चालूं लागला, देशांत सगळीकडे शांतता प्रस्थापित झाली म्हणजे राजा जसा राज्यकारभारास लायक होईल तसतशीं त्याच्या हातांत राज्यकारभाराचीं सूत्रें द्यावयाचीं आहेत.

या सर्व गोष्टींची राजेसाहेबांस मीं पूर्णपणें जाणीव दिली आहे. त्यांस मीं असेंही सांगितलें आहे कीं, त्यांनीं छोट्या मोठ्या प्रत्येक बाबतींत तुमचा सल्ला घ्यावा. या घडामोडीच्या काळांत त्यांनीं अशा तऱ्हेनें वागणें हें त्यांच्याच हिताचें आहे.

सध्यां राजेसाहेबांची वागणूक चांगली आहे. ते सूज्ञ व समंजस आहेत. तेव्हां त्यांस त्यांच्या हिताहिताची कल्पना देऊन तुम्ही जें कांहीं करीत आहांत तें सर्व त्यांच्याच हिताकरितां व कल्याणाकरितां करीत आहांत अशी त्यांची खात्री पटवून द्या व त्यांचा दृढविश्वास संपादन करा. तसेंच त्यांस राज्यकारभाराचीही माहिती योग्य तऱ्हेनें देत जा. पण हें सर्व करतांना तुम्ही आपलें धोरण मात्र सोडूं नका.

राजेसाहेबांच्या राज्याच्या चतुःसीमा उत्तरेला नीरा नदी, दक्षिणेस कृष्णा-वारणा, पूर्वेस पेशव्याची सरहद्द व पश्चिमेस घाट अशा असाव्या असें मी गव्हर्नर जनरल साहेबांस सुचवीत आहें. '

अशा सूचनांचें पत्र एल्फिन्स्टननें ग्रँटडफला धाडिलें होतें. त्या सूचना जारी करण्याकरितां ग्रँटडफ हा महाराजांच्या गांठी-भेटी घेई. त्यांना 'तुम्ही असें करूं नका, तसें करणें बरें नाहीं, असें वागा, तसेंच हा खर्च वायफट होतो तो थांबवा' इत्यादि सूचना करी. प्रथम प्रथम महाराजांस हा अशी ढवळाढवळ कां करितो याचा नीट उलगडा होईना. कारण महाराजांस स्वतःच्या राज्याविषयींची व सत्तेविषयींची कल्पना अजून नव्हती. महाराजांच्या मंडळींत महाराजांची आईच काय ती हुशार व जहांबाज बायको होती. तिला वाटे कीं, आपला मुलगा आतां फार मोठ्या राज्याचा व वैभवाचा धनी झाला. तो मराठ्यांचा खरोखरीच सम्राट झाला. तेव्हां आतां आपल्या ऐश्वर्यास सीमाच नाहीं. पण त्या बाईचें हें अफाट मनोराज्य फार दिवस टिकलें नाहीं. तिच्या डोळ्यांत वस्तुस्थितीचें झणझणीत अंजन लवकरच पडलें. ती पुढें फारच पश्चात्ताप करूं लागली.

इंग्रजांना शिव्याशाप देऊं लागली. पण आतां त्याचा कांहीं एक उपयोग नव्हता. या पेंचांतून आतां सुटका नव्हती.

महाराष्ट्रांतून पेशव्यांची उचलबांगडी केल्यानंतर साहेबानें छत्रपतींस वर्षभर नुसतेंच लोंबत ठेविलें. त्यांस आपला बेत काय आहे याचा थांगच लागूं दिला नाहीं. त्यांच्या ताब्यांत कोणता मुलूख द्यावयाचा, त्यांचे हक्क कोणते, चतुःसीमा कोणत्या याची कांहींच कल्पना महाराजांस नव्हती. या वर्षांत छत्रपतींचा उद्योग म्हणजे जेवणें झोंपणें आणि ऐषआराम करणें एवढाच होता. या काळांत छत्रपति आरामांत होते; पण साहेबाचा आत्माराम मात्र थंड नव्हता. तो डोळ्यांत तेल घालून टेहळणी करीत होता. कोठें कांहीं बंडावा होतो कीं काय, याकडे त्यांचें लक्ष होतें. पण तसें कांहींहि झालें नाहीं. सगळीकडे थंड होतें. तेव्हां साहेबानें हेरलें कीं, महाराष्ट्रांत सातारकरांचें वजन कांहीं एक नाहीं. पेशवा पळाला व छत्रपति निर्बल ठरला तेव्हां आतां सर्व बलशाली आणि सत्ताधीश आपणच आहोंत. आतां महाराजांसंबंधींचा विचार करण्यास कांहींच हरकत नाहीं.

इ. स. १८१८ ते १८१९ या एका वर्षांत सातारा दरबारीं पोलिटिकल एजंट म्हणून काम करणारा कॅ. ग्रँटडफ यानें या वर्षांत केलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन एक खलिता ता. २३।३।१८१९ ला धाडिला आहे. त्यांत एल्फिन्स्टननें १८१८ मध्यें धाडलेल्या सूचना अमलांत आणतांना त्यास कसकशा अडचणी आल्या व त्यांतून तो कसा शिताफीनें पार पडला याचें वर्णन करतां करतां त्यानें महाराजांच्या कुटुंबांतील इतर मंडळींच्या स्वभावाचेंही सुंदर चित्रण केलें आहे. त्यावरून कॅ. ग्रँटडफनें आपली कामगिरी अत्यंत चोख तऱ्हेनें पार पाडली असें स्पष्ट दिसतें.

कॅ. ग्रँटडफ म्हणतो, ‘ राजाचें मन प्रसन्न ठेवणें व ब्रिटिशांचें वर्चस्व बसविणें, राजघराण्यांतील मंडळी खूष ठेवून त्यांच्या खर्चाचा आंकडा आवाक्या-बाहेर जाऊं न देणें, तसेंच खाशा स्वाऱ्यांच्या बादशाही कल्पनांस हळू हळू धक्का देऊन त्या खच्ची करणें हीं कामें अत्यंत कठीण होतीं. पण हीं सर्व कामें हळू हळू उत्तम तऱ्हेनें तडीस नेण्यांत आलीं. तीं करतांना किरकोळ भानगडीं

उपस्थित झाल्या. पण त्या मिटविणें फारसें कठीण नव्हतें. तरी सुद्धां तें काम अत्यंत नाजूक व जिकिरीचें होतें.' कॅप्टन ग्रँटडफूच्या या म्हणण्यांत फार तथ्य आहे. कारण राजघराण्यांतील मंडळींचा असा समज होता कीं, आतां आपण मराठी साम्राज्याचे अभिषिक्त सम्राट झालों. तेव्हां आपल्या इतमामास, इज्जतीस व दर्जास शोभेल असा आपला लवाजमा व इतर थाटमाट केवळ बादशाही थाटाचा व योग्यतेचा पाहिजे. कुबेरास कंगाल करणाऱ्या भलत्याच भ्रमाच्या या धुंदींतून महाराज मंडळीस ताळ्यावर आणून त्यांच्या खाजगी खर्चांत छाटाछाट करणें हें अत्यंत कटु कर्तव्य ग्रँटडफला पार पाडावयाचें होतें व हें काम करणें फारच कठीण होतें. सातारच्या छत्रपतींचा खाजगी खर्च कसा अगडबंब आहे याची पूर्ण कल्पना एल्फिन्स्टनला होती. कारण तो एकदां बोलतां बोलतां कॅ. ग्रँटडफला म्हणाला होता कीं, पेशव्यांच्या राज्याचा सर्व वसूल जरी खाजगी खर्चाप्रीत्यर्थ आपण सातारकर महाराजांच्या हवालीं केला तरी सुद्धां तो त्यांस पुरा पडणार नाहीं.

अशा तऱ्हेनें अवाच्या सवा खर्च करण्यास सवकलेल्या राजघराण्याच्या मंडळींना खाजगी खर्चाची छाटाछाट सुचविण्याचें काम अत्यंत जिकिरीचें होतें. या प्रसंगीं ग्रँटडफ पुढीलप्रमाणें वागला. पहिल्यांदा त्यानें एकट्या राजाचीच गांठ घेतली. त्यास सर्व सविस्तर हकीगत सांगून काय काय करावयाचें आहे याची हळू हळू कल्पना दिली. खर्च कसा आटोक्यांत आणावयाचा हेंही त्यास समजावून सांगितलें. यानंतर मात्र ग्रँटडफनें त्याची गांठ तीन दिवसपर्यंत घेतली नाहीं. हें करण्यांत त्याचा डाव होता तो असा कीं, यापुढें राजाशीं खर्चवेंच करण्याच्या बाबतींत बोलाचाली व्हावयाची म्हणजे एकमेकाचें म्हणणें एकमेकानें पुढें मांडावयाचें. अशा वेळीं जो तो आपलें म्हणणें जोरांत पुढें मांडणार व असें करतांना केव्हां तरी एकादा शब्द वेडावांकडा जाणार आणि भांडणास तोंड लागणार. तसें झालें तर महाराजांचा व आपला खटका उडेल व विनाकारण वितुष्ट येईल. तेव्हां तो प्रसंगच मोठ्या शहाणपणानें टाळावा असें ग्रँटडफनें योजिलें. या सर्व कारभारांत इंग्रजांच्या वतीनें बाळाजीपंत नातू हा हजर होता. ग्रँटडफनें छत्रपतींची गांठ भेट घेऊन बोलाचाली करावयास

या तीन दिवसांत त्यासच धाडिलें. त्याला सुद्धां सध्यां राजाची गांठ म्हणजे अत्यंत त्रासाची गोष्ट होऊन बसली होती. कारण एकट्या छत्रपतींना बाजूला घेऊन त्यांच्याशीं वाटाघाट करणें ही गोष्ट ग्रँटडफला सहज जमे पण बाळाजीपंत नातू हा इरसाल मनुष्य असल्यानें त्याला तें साधत नसे. कारण बाळाजीपंत जेव्हां जेव्हां महाराजांकडे जाई तेव्हां तेव्हां राजघराण्यांतील सर्वच खाशा स्वाऱ्यांचा पाळाचा पाळा राजाभोंवतीं जमा होत असे. कारण राजा जरा भोळा असल्यामुळें तो वाटेल त्या गोष्टींस मान्यता देईल या भीतीनें वाटाघाटीच्या वेळीं त्याची आई सर्वांचा पुढाकार घेऊन बोले आणि खर्च कमी करण्याची गोष्ट काढली कीं, ती बाई एकाद्या वाघिणीसारखी चवताळे व बाळाजीपंतावर वाटेल तसें तोंड सोडी. एकादे वेळेस तिच्या तोंडाचा पट्टा इतका जबरदस्त चाले कीं, बाळाजीपंत नातूस आपला तोल जाऊन आपणही कांहीं उणें दुणें बोलूं कीं काय, अशी भीति वाटे. या वेळीं त्याची स्थिति फारच चमत्कारिक झाली होती. कारण इंग्रजांबद्दल लंब्या लंब्या गोड गोड गप्पा मारणाऱ्या बळवंत मल्हार चिटणीसाबरोबर साथ करून त्यानेंच बाईस पेशव्याविरुद्ध तयार केलें होतें. हिच्या मार्फतच त्यानें पेशव्यांच्या विरुद्ध महाराजांच्या मनांत अढी निर्माण केली होती. तुम्ही खरोखरच राज्याचें कुलमुखत्यार धनी, पण पेशव्यानें तुम्हांस गुंडाळून ठेवून तुमच्या सत्तेचा व राज्याचा अपहार केला; तेव्हां इंग्रज त्यांचा नायनाट करून तुम्हांस मराठी राज्याचे धनी करणार आहेत; मग आपल्या वैभवास काय सीमा, अशीं सातारकर छत्रपतींच्या भविष्यकालीन वैभवाचीं चित्रें बाळाजीपंत मोठ्या भडक रंगांत बाईपुढें त्या वेळीं रंगवी. अशा तऱ्हेनें शब्दजालांत बाईस पकडून त्यानें तिच्याकरवीं सातारकरांस एल्फिन्स्टनच्या कपटकारस्थानाच्या चरकांत अडकवून दिलें; आणि आतां इंग्रजांचा कार्यभाग पूर्णपणें साधल्यानंतर साताऱ्चे महाराज व त्यांची आई या उभयतांना 'उगी' करण्याचें काम त्याच्यावरच आलें. पण बाळासाहेब एक नंबरचा हुच्या असल्याकारणानें त्यानें हेंही पतकरलें. पण त्याला सुद्धां ही गोष्ट अशक्य झाली. त्यानें बाईच्या बडबडण्यास कंटाळून एकदां ग्रँटडफकडे तक्रार केली. तेव्हां त्यानें त्या

जहांबाज बाईशीं उगीच जिकीर घालीत न बसतां खर्चासंबंधीं फक्त महाराजांशींच बोलत जा, त्यांची संमति घेतली कीं आपलें काम झालें, आपणांला बाईच्या बडबडण्याशीं कांहीं एक कर्तव्य नाहीं असें सांगितलें.

'सती गेलें असतें तर बरें झालें असतें, तटावरून उडी घेईन, विहिरींत जीव देईन, काशीयात्रेस निघून जाईन' अशी बडबड महाराजांच्या मातोश्रींची एकसारखी चाले. त्यांना असें वाटे कीं, इंग्रजांचा व आपला संबंध म्हणजे व्याही–विहिणीचा. त्यांत सुद्धां आपला वरपक्ष, तेव्हां इंग्रजांनीं आपल्या नाकधुऱ्या काढाव्यात व आपली मर्जी संपादावी. आपला दरबारी थाट कायम राहावा म्हणून ती एकसारखी फणाणत होती. पण राजकारणांत रुसवा–फुगवा चालू देण्याइतका साहेब ढिल्या तब्येतीचा नव्हता. त्यांतून आतां तर त्याचें आसन दृढ झालें होतें. आणि बाईनें कड्यावरून उडी घेतली असती, विहिरींत जीव दिला असता, तर बाळाजीपंत नातू, ग्रँटडफ व एल्फिन्स्टन या तिघांच्याहि डोळ्यांस पाण्याचा थेंब सुद्धां आला नसता. उलट औषधावांचून खोकला गेला म्हणून त्यांनीं पेढेच वाटले असते.

बाईचा इतमाम साहेब ठेवीत नाहीं म्हणून महाराष्ट्रांतील सर्व मराठे हातांत नंग्या समशेरी घेऊन इंग्रजाशीं झुंज घेणार होते अशांतला मुळींच प्रकार नव्हता. बाई काशीस निघून जाती तर बरें झालें, पीडा टळली म्हणून इंग्रजांस समाधान वाटलें असतें. पण आतां काशीस जाणें हें तरी तिच्या हातीं कोठें होतें! कारण आतां ती सर्वस्वीं इंग्रजांच्या स्वाधीन झाली होती. तेव्हां तिनें काशीस जावें किंवा न जावें ही गोष्ट साहेबाच्या मर्जीची होती. तिला तसें करण्यास साहेबानें परवानगी दिली असती किंवा नसती याची शंकाच. कारण बाई तेथें जाऊन स्वस्थ बसते कीं कांहीं कारस्थानें करते हेंही साहेबास पाहावें लागलें असतें. महाराजांच्या मातोश्रीस–माईसाहेबांस–नेहमीं असें वाटे कीं, कॅ. ग्रँटडफ व एल्फिन्स्टन हे दोन्हीही बडे साहेब आपली मर्जी संभाळण्याकरितां एका पायावर तयार आहेत. पण हा बाळाजी नातूच नष्ट आहे. तो जिथें तिथें आडवा पडतो व आपणांस त्रास देतो. कोठावळ्याचें पोट दुखतें तें असें. पण माईसाहेबांस हें उमजावयास पाहिजे होतें कीं, बाळाजीपंत हा सामान्य माणूस व

इंग्रजांचा एक हस्तक, तसेंच तो साहेबाच्या सांगण्यावरून आपणाकडे येतो व आपली समजूत घालण्याची पराकाष्ठा करतो. त्याच्याशीं हुज्जत घालण्यांत कांहींच तथ्य नाहीं. पण हा पोक्त विचार मनांत येण्याइतका बाईच्या बुद्धीचा पल्ला नव्हता व ती एकसारखी तणाणत होती. तेव्हां ग्रँटडफच्या सांगण्यावरून बाळाजीपंत नातूनें तिला स्पष्टच सांगितलें कीं, ' आपणांस काशीस जाणें सुखाचें वाटत असेल तर तशी परवानगी एल्फिन्स्टनकडून मी आणवितों. या बाबतींत जरूर ती सर्व खटपट मी मोठ्या आनंदानें करीन. पण खर्चास जास्त मागूं नका. तें आपणांस मिळणार नाहीं. आम्ही देऊं तेवढ्या पैशांतच भागविलें पाहिजे. बाळाजीपंतानें सांगितलेला हा साहेबाचा निरोप ऐकून बाईचे डोळे खाडकन् उघडले व ती चिरचिरत जागच्या जागीं बसली. तिच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला कीं, आपला मुलगा मराठी राज्याचा सम्राट नाहीं व आपण राजमाताही नाहीं. याच्या उलट आपण सर्वस्व गमावलें असून आपण इंग्रजांचे जवळ जवळ कैदीच आहोंत व त्यांतून सुटका होणें आतां शक्य नाहीं. तेव्हां उगाच बडबडण्यांत अर्थ नाहीं. ही उमज तिच्या मनानें घेतली व तिनें तोंडास कुलूप घातलें तें कायमचेंच.

स्वतःच्या परिस्थितींत पडलेला हा भयंकर फरक बाईस जाणवला. मनांत उभारलेलीं राजवैभवाचीं मंदिरें केवळ हवेंतील किल्ले ठरून त्याच्यावरून कडेलोट होण्याचा प्रसंग तिच्यावर आला. त्यामुळें तर तिला जबरदस्त धक्का बसला व ती गप्प झाली, आणि यापुढील आयुष्य मात्र तिनें अत्यंत उदासीन वृत्तीनें काढिलें. यानंतर ती दोन–तीन वर्षांपेक्षां जास्त दिवस जगली नाहीं. जतच्या जहागिरीचा बंडावा मोडण्यासाठीं प्रतापसिंह सहकुटुंब त्या बाजूला गेला असतां वाटेंत त्याचा धाकटा भाऊ भाऊसाहेब हा ता. २१–१–१८२१ रोजीं जतजवळ परलोकवासी झाला. या मुलाच्या मरणानें तिच्या दुःखांत आणखीच भर पडली व त्याच्या पाठोपाठ तिनेंही एक वर्षानें आपला देह ता. ३–१–१८२२ रोजीं तुळापुराहून माघारीं येतांना भीमातीरीं धुळखेड येथें ठेविला. तिच्या मृत्यूनें प्रतापसिंहाचें मात्र फार नुकसान झालें. त्याच्या कुटुंबांत मायेचें व थोर असें मनुष्य शिल्लक राहिलें नाहीं.

राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांतून प्रतापसिंहाची आई मुक्त झाली; पण प्रतापसिंहास मात्र या राज्यक्रान्तीचे बरेवाईट परिणाम अजून भोगावयाचे होते. आतां तर कोठें नुकती सुरुवात झाली होती. या वेळेपर्यंत नुसतें मोघम भाषेंत चाललें होतें; पण आतां प्रत्यक्ष आंकड्यांनीं बोलावयाचें होतें. या महाराज-मंडळींची स्वतःच्या ऐश्वर्याबद्दलची कल्पना फारच अफाट होती. तेव्हां अस्मानांत उडालेलें हें इभ्रतीचें विमान जमिनीवर आणणें उभयपक्षांस फार जड गेलें. ग्रँटडफनें प्रतापसिंहाकडून खाजगी खर्चाची यादी मागितली तेव्हां भोंवतालच्या मंडळींच्या सांगण्यावरून ती इतकी फुगविण्यांत आली कीं, तिचा आंकडा अर्ध्या कोटीवर गेला. ती पाहून ग्रँटडफनें महाराजांस एका क्षणांत फजीत केलें. नंतर खाजगी खर्चासाठीं फक्त वीस लाख रुपये बस्स झाले असें महाराज म्हणाले. याचाही पण ग्रँटडफला अचंबाच वाटला. खरें पाहिलें असतां तें खरेंही होतें. एल्फिन्स्टननें सुचविलेला आंकडा व महाराजांची मागणी यांत जबरदस्त अंतर होतें. पण ग्रँटडफला कोणतीच डर नव्हती. तो जेत्यांचा प्रतिनिधि होता. पण राजकारण नासूं न देतां त्यास हें कार्य करावयाचें होतें म्हणून त्यानें शेवटीं चुचकारत चुचकारत एल्फिन्स्टननें मंजूर केलेल्या आंकड्यापेक्षांही कमी आंकडा खाजगी खर्चासाठीं सांगितला. आणि आपल्या म्हणण्याचा महाराजांच्या मनावर योग्य तो परिणाम व्हावा म्हणून, " आपण गादीवर बसण्याच्या आधीं आपली स्थिति कशी होती याचा नीट विचार करून मग काय बोलावयाचें तें बोला. शिवाय तुमची ही नेमणूक कायमची नाहीं, तिच्यांत वाढ होईल; पण त्या गोष्टीस दिवस लागतील. तें सर्व तुम्हीं चांगल्या तऱ्हेनें वागलांत व मूर्ख लोकांच्या आहारीं जाऊन आपला नाश करून घेतला नाहींत तर होईल. "—हें बोलून ग्रँटडफ गेला !

सर्व मिळून एकंदर पंधरा—वीस लाखांचें संस्थान निर्माण करण्याचा बेत कंपनी सरकारचा होता तर प्रतापसिंहास खाजगी खर्चासाठीं वीस लाख रुपये पाहिजे होते. असा हा सगळाच चमत्कार होता. सर्वसत्ताधारी साहेबापुढें सातारकरांचें कांहीं एक चालणार नव्हतें हें देव बोलला होता. कंपनी सरकारनें मंजूर केलेला आंकडा प्रतापसिंहास सांगून ग्रँटडफ गेला व नंतर तीन दिवस

त्यानें राजाची गांठ घेतली नाहीं. दरम्यान बाळाजीपंत नातूनें जाऊन सर्व कांहीं कारभार उरकला; पण हें करतांना त्याला सुद्धां अत्यंत कटकट झाली. राजास खाजगी खर्चासाठीं सव्वीस हजार रुपये मंजूर केले. त्याचा तपशील खालीलप्रमाणें होता:—

खुद्द राजेसाहेब	१५,०७५ रु.
राणीसाहेब	१,१५० रु.
राजेसाहेबांचे दोन बंधू प्रत्येकीं ३७५० रु. मिळून—	७,५०० रु.
आईसाहेब महाराज	२,२७५ रु.
	२६,००० रु.

इ. स. १८१० च्या सुमारास प्रतापसिंह महाराजांनीं कांहीं कागदपत्रें विठ्ठल कोंडदेव यांच्या हस्तें इंग्रजांकडे पाठविलीं तीं त्यानें इंग्रजांस न देतां इंग्रजांचा दुभाष्या खुरशेटजी मोदी यास दिलीं. त्यामुळें छत्रपतींचें राजकारण उघडकीस येऊन त्यांचा बंदोबस्त कडेकोट झाला. त्या वेळीं सुद्धां छत्रपतींची नेमणूक खालीलप्रमाणें होती.

५,५०० रु.	अन्नखर्च.
३,००० रु.	महाराजांचा वाढदिवस.
२,००० रु.	कपडा—लत्ता वगैरे.
१,२०० रु.	नगरखाना.
२,४०० रु.	नोकर आश्रित.
९०० रु.	शिकारखाना वगैरे.
६,४०० रु.	हत्ती—घोडे.
२,१०० रु.	भुई.
२३,५००	

याशिवाय दसऱ्याचा पोशाख, पालख्या, मेणे, किनखाबी गाद्या, पडदे वगैरे गोष्टी पेशव्यांकडून पुरविल्या जात. यानंतर कारणा कारणांनीं लागणारा खर्च पेशवे देत. याशिवाय खाजगी खर्चास म्हणून पेशव्यांकडून पैसे येतच.

यावरून पेशव्याच्या वेळीं आणि कंपनी सरकारच्या वेळीं छत्रपतींचा खर्च जवळ जवळ सारखाच होता. कंपनी सरकारनें ठरविलेल्या खाजगी खर्चाच्या नेमणुकीचा आंकडा पेशव्यांच्या आंकड्यावरूनच ठरविलेला असावा असें म्हणण्यापेक्षां प्रतापसिंहानें पाठविलेल्या आंकड्यावरूनच ठरविलेला असावा असें दिसतें.

आगींतून फुफाट्यांत : : २०

सातारच्या महाराजाला वर्षभर इंग्रजानें नजरकैद्‌वजा ठेविला. त्याच्या-वर 'ग्रँटडफ'ची देखरेख होती. या अवधींत त्यास आपल्या आश्रितासारखा वागाविलें. सातारचा महाराज कांहीं गडबड करील, 'पेशवे गेले आतां ठरल्या-प्रमाणें त्यांचें राज्य मला द्या' असा लकडा मागें लावील, आपण टोलवाटोलवी करतों असें पाहतांच सैन्याची जमवाजमव करून आपणांशीं युद्ध देण्याच्या भरीस पडेल, अशी भीति एल्फिन्स्टनला वाटत होती. पण सातारचा महाराज आपण दाबावा तसा दाबला जातो, असें त्याच्या निदर्शनास आलें. कारण खाजगी खर्चाची छाटाछाट आपण पाहिजे तशी केली तरी महाराजानें फारशी कुरकुर केली नाहीं. राज्याचीं सर्व सूत्रें 'ग्रँटडफ'च्या हातीं दिलीं तरी महाराज आपले थंडच. हें पाहून मात्र एल्फिन्स्टनची पुरेपूर खात्री झाली कीं, महाराजांत कांहींच दम नाहीं. तेव्हां आतां त्यांच्याशीं आपणांस पाहिजे तसा तह केला तरी चालेल. तो त्यावर निमुटपणें सही करील. तेव्हां एल्फिन्स्टननें एक अकरा कलमी तहनामा तयार केला व तो सातार्‍यास छत्रपतींकडे सहीकारितां धाडिला. सदरहू तहनाम्यावर महाराजांनीं कोणत्याही प्रकारची कुरकुर न करतां मुकाट्यानें ता. २५ सप्टेंबर १८१९ रोजीं सही केली. हा तहनामा अकरा कलमी असून त्यांत सातारकर महाराजांच्या राज्यांत कोणकोणता मुलूख येतो व कोणकोणतीं विशिष्ट ठिकाणें येतात त्याच्याबद्दल खुलासेवार एक लांबलचक तख्ता जोडला आहे.

हा करार अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें व त्यांतील कलमांच्या शब्दांवर पुढें बरींच रणें माजून शब्दांचा कीस निघाला असल्यामुळें तीं अकरा कलमें स्थलसंकोचास्तव जशींच्या तशीं जरी देतां आलीं नाहींत तरी त्यांतील मुख्य व महत्त्वाच्या गोष्टींचा गोषवारा खालीं दिला आहे.

(१) ब्रिटिश सरकार सोबत जोडलेल्या तख्त्यांत वर्णन केलेले प्रांत सातारचे राजे व त्यांचे वारसवंशजास निरंतर सार्वभौमत्वाच्या हक्कानें उपभोगण्याकरितां देण्याचें कबूल करीत आहे.

या कलमांतील 'निरंतर सार्वभौमत्वाच्या हक्कानें' हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. कारण या कलमानें सातारकरांचे ताब्यांत परिशिष्टांत नमूद केलेल्या प्रांतांवर वंशपरंपरागत निरंतर सार्वभौमत्वाचा हक्क रहाणार होता.

(२) या कलमान्वयें सातारचे महाराज किंवा त्यांचे वंशज ब्रिटिश सरकारशीं मांडलिकत्वाचें नातें धारण करून सहकारिता करतील. या नात्यानेंच त्यांचा अंमल त्यांच्या प्रांतावर चालेल. शिवाय सातारच्या दरबारीं ब्रिटिश सरकारचा जो एजंट नेमला जाईल त्याच्या सल्ल्याप्रमाणें प्रत्येक बाबतींत सातारचे महाराज व त्यांचे वंशज वागतील. सातारचे छत्रपति स्वतःच्या वतीनें व आपल्या वारसांच्या वतीनें हें कबूल करीत आहेत.

(३) सातारच्या राज्याची व मुलुखाच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटिश सरकार आपल्या शिरावर घेत आहे व राजाला परचक्रापासून कोणत्याही प्रकारची इजा किंवा नुकसान होणार नाहीं अशी खबरदारी घेण्याची हमी देत आहे.

ब्रिटिश सरकार आपलें लष्कर किंवा सैन्य राजाचे मुलुखांत ठेवील किंवा तें त्याचे मुलुखांतून कूच करील त्याला लागणारा दाणावैरण किंवा इतर जिन्नस खरेदी करण्याची पूर्ण मोकळीक असली पाहिजे. तसेंच अशा सैन्याच्या जनावरांसाठीं लागणारा चारा भागणेसाठीं जीं कुरणें लागतील तीं सर्व चरण्यासाठीं कायमचीं देऊन टाकलीं पाहिजेत. या अटीनेंही सातारचे राजे व त्यांचे वंशज बांधले गेले आहेत.

(४) साताऱ्च्या संस्थानांत ठेवण्यांत येणारें लष्कर किंवा फौज ही सातारदरबारीं असणाऱ्या एजंटाच्या संमतीशिवाय कमी किंवा जास्त करण्याचा हक्क सातारचे महाराजांस किंवा त्यांचे वंशजास नाहीं.

(५) सातारचे छत्रपति व त्यांचे वंशज हे असा करार करीत आहेत कीं, ते कोणत्याही परकीय सरकारशीं--राजाशीं, सरदारांशीं, जहागिरदारांशीं संस्थानिकांशीं, अगर त्याचे प्रधान अशा खाजगी कारभारी यांशीं अथवा जो कोणी इसम खुद्द सातारकर महाराजांचा प्रजाजन नाहीं अशा कोणाही परकीय इसमाशीं— कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवणार नाहींत. किंवा त्यांच्याशीं कांहीं बोलणें चालणें करणार नाहींत, कसलाही पत्रव्यवहार करणार नाहींत. अशा परकीय इसमाचें व सातारकरांचें कामधाम उपस्थित झाल्यास त्यासंबंधींची सर्व वाटाघाट इंग्रज सरकारच्या मार्फत होईल.

साताऱ्च्या घराण्याशीं लग्नसंबंध, सोयरीक वगैरे संबंधांच्या बाबतींत जर बाहेरच्या कोणा मंडळींस बोलणें, चालणें करावयाचें असेल तर तें देखील साताऱ्च्या पोलिटिकल एजन्टामार्फतच केलें पाहिजे. (सांप्रतचा तहनामा व या कलमांतील अटी मूलभूत आहेत. तेव्हां या अटींचें अतिक्रमण राजाकडून किंवा त्याचे वंशजाकडून झाल्यास या तहाप्रमाणें राजाला किंवा त्याच्या वंशजाला प्राप्त होणाऱ्या सर्व सवलतींना मुकावें लागेल.)

(६) साताऱ्च्या महाराजांना जो मुलूख या तहानें देण्यांत येत आहे त्या सर्व मुलुखाचा कारभार कांहीं दिवसानंतर त्यांच्याकडेच सोंपविण्यांत येईल. परंतु हा मुलूख इंग्रजांनीं नुकताच जिंकून घेतला असल्यामुळें त्याचा कारभार व व्यवस्था दक्षतेनें करणें अतिशय जरूरीचें असल्यानें सध्यां त्या मुलुखाचा कारभार ब्रिटिश पोलिटिकल एजन्टाच्या हातीं राहील. पोलिटिकल एजन्ट हा राजाच्या वतीनें व त्याच्या नांवानेंच सर्व कारभार चालवील. छत्रपति व त्यांचे अम्मलदार यांना राज्यकारभार चालविण्याचा जसजसा अनुभव येत जाईल व ते आपली लायकी ज्या ज्या मानानें सिद्ध करतील त्या मानानें सर्व कारभार हळू हळू त्यांच्याकडे सोंपविण्यांत येईल. परंतु तेव्हांही शांततेच्या संरक्षणार्थ व

राज्याच्या हितासाठीं पोलिटिकल एजन्ट याच्या सल्ल्याप्रमाणेंच त्यांना पुढील कारभार चालवावा लागेल.

(७) साताऱ्च्या छत्रपतीचे जे जहागिरदार आहेत त्यांच्या जहागिरी बद्दल ब्रिटिश गव्हर्मेंट आपल्याकडे जिमेदारी घेत आहे आणि हे जहागिरदार आपापली कामगिरी पूर्वीप्रमाणें सातारकर महाराजांची बजावतील, अशी तजवीज ठेवण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकार घेत आहे.

(८) खून, राजद्रोह, दरवडे, चोऱ्या वगैरे करणारे गुन्हेगार किंवा इतर कोणताही घातपात करणारे बदमाष इसम इंग्रज सरकारच्या मुलुखांतून सातारकरांच्या हद्दींत पळून आल्यास सातारकर महाराज त्या गुन्हेगारांस पकडून ब्रिटिश सरकारचे हवालीं करतील. याशिवाय गुन्हेगाराचा पाठलाग करीत सातारकरांचे हद्दींत शिरण्याचा व गुन्हेगारास पकडण्याचा अधिकार ब्रिटिश अम्मलदारांना राहील.

(९) महाराजांच्या मुलुखाची सरहद्द कोंकणच्या बाजूला सह्याद्रीच्या घाटापर्यंत राहील.

(१०) साताऱचे महाराज व ईस्ट इंडिया कंपनी सरकार यांचे दरम्यान एकमेकांस सोईचा असा व्यापारविषयक तहनामा अलाहिदा होईल. परंतु दरम्यानच्या कालांत ब्रिटिश सरकारच्या मुलुखांत जकातीसंबंधीं जी व्यवस्था चालू आहे, तिच्याप्रमाणें सातारकरांच्या मुलुखांतही जकातीची पद्धत चालू राहील.

(११) हा अकरा कलमांचा तहनामा सातारा येथें करण्यांत आला. ब्रिटिश सरकारच्या वतीनें कॅप्टन जेम्स ग्रॅन्ट व महाराजांच्या वतीनें विठ्ठलपंत फडणीस हे वकील होते. कॅप्टन ग्रॅन्ट यानें या तहनाम्याच्या इंग्रजी, फारशी व मराठी अशा भाषांतील नकला आपल्या सही शिक्क्यानें प्रतापसिंह महाराजांच्या हवालीं केल्या आहेत व उलट तिन्ही भाषांतील तहनाम्याच्या नकला महाराजांच्या सहीशिक्क्यानें महाराजांनीं स्वतः कॅप्टन ग्रॅन्ट यांजला दिल्या आहेत.

असा हा अकरा कलमी तहनामा पुढें २७ नोव्हेंबर १८१९ रोजीं ग. ज. यांचे कौन्सिलांत त्यांच्या सहीशिक्क्यानिशीं मंजूर करण्यांत येऊन तो साताऱच्या महाराजांनीं पसंत केला. या वेळीं लॉर्ड हेस्टिंग्ज हा ग. ज. होता.

तहनाम्यांतील अकरा प्रमुख कलमें वर दिलीं आहेत. त्यांच्याबरोबर जोडण्यांत आलेल्या तख्त्यांत सातारच्या राज्याच्या चतुःसीमा दिलेल्या आहेत व इतरही सर्व माहिती तपशीलवार दिली आहे. याशिवाय कांहीं जहागिरदार हे सातारकर छत्रपतींचे मांडलिक व त्यांच्या हुकुमतीखालीं राहणारे जहागिरदार म्हणून मानण्यांत आले आहेत.

१८१९ च्या सप्टेंबरमध्यें हा तहनामा तयार झाला आणि सातारच्या छत्रपति प्रतापसिंह महाराजांची त्रिशंकू–अवस्था संपून त्यांचे पाय एकदा कसेतरी जमिनीस लागले.

या अकरा कलमी तहनाम्याच्या कांहीं महत्त्वाच्या शर्तींवर व कांहीं शब्दप्रयोगांवर थोडें स्पष्टीकरण करणें इष्ट आहे. हा तह करण्यांत आला, तो केवळ एकतर्फी झाला. एकानें आपल्या अटी सांगाव्या आणि दुसऱ्यानें त्या खालीं मान घालून ऐकाव्या. त्याला मत नाहीं, आपली बाजू मांडण्याचा हक्क नाहीं. अशा तऱ्हेनें हा तह जित आणि जेते यांमधील तह होय. कारण सातारकरांच्या वतीनें विठ्ठलपंत फडणीस नांवाचा एक इसम महाराजांचा वकील म्हणून उभा करण्यांत आला होता. पण त्याच्या म्हणण्याप्रमाणें तहनाम्यांतील एकादा शब्द तरी इंग्रजांनीं बदलला किंवा नाहीं याची शंकाच आहे. साधारणतः एल्फिन्स्टननें आपल्या मनाला वाटला तसा तहनामा तयार केला. तो साताऱ्यास पाठविला आणि साताऱ्यास फक्त त्या तहनाम्यावर शिक्का-मोर्तब करून घेण्याचा फार्स उरकण्यांत आला असावा. कारण इंग्रजानें तहाच्या अटी तयार केल्या, त्या सातारकरांनीं पाहिल्या, त्या त्यांना सगळ्याच्या सगळ्या मान्य न झाल्यामुळें त्यांनीं कांहीं फेरफार सुचविला, तो इंग्रजांनीं मान्य केला व मग हा तह झाला असें वाटत नाहीं. या तहांत कांहीं देवाण घेवाणाचा प्रकार झालाच नाहीं.

आज वर्ष दीडवर्ष सातारकर महाराज इंग्रजांच्या ताटाखालील मांजराप्रमाणें राहिला होता. इंग्रज वांकवील तसा तो वांकत होता. तेव्हां प्रस्तुतचा तह होण्याच्या वेळीं कोणी डोकें वर करून बोलला असेल असें वाटत नाहीं.

बलिष्ठानें म्हणावें कीं तुझें तें माझें व माझें तें माझ्या बापाचें, आणि या त्याच्या म्हणण्यास निर्बलानें संमति द्यावी असेंच या तहाचें वर्णन करतां येईल.

आतां तहांच्या कलमांचा विचार करावयाचा तर पहिल्या कलमानें इंग्रजांनीं कांहीं मुलूख साताऱ्च्या महाराजांस 'निरंतर सार्वभौमत्वाच्या हक्कानें' भोगवट्यास दिला आहे असे चक्क शब्द त्या कलमांत आहेत. पण लगेच पुढील कलमें पाहावीं तों त्यांतील अटींनीं पहिल्या कलमांत 'निरंतर सार्वभौमत्वाच्या हक्कानें' हे शब्द घातले असून सुद्धां त्यांस हरताळ फासला आहे. कारण जो मुलूख सार्वभौमत्वाच्या हक्कानें सातारकर उपभोगणार त्या प्रांतापुरती तरी सर्वसत्ताधारी शेवटची निर्णयशक्ति महाराजांच्या हातांत असावयास पाहिजे होती. तसेंच त्या प्रांतावर राज्यकारभार स्वतंत्रपणें चालविण्याची अखत्यारी महाराजांस हवी होती. कोणाही बाहेरच्या माणसास किंवा राजास वरिष्ठ या नात्यानें त्यांत हात घालतां येऊं नये, तसेंच महाराजांसही कोणा तिऱ्हाइतास वरिष्ठ म्हणून विचारण्याची जरूरी नसावी. अशी सत्ता ताब्यांत असेल तरच त्यास सार्वभौमत्वाचा हक्क असें म्हणतां येईल; पण हा हक्क नुसत्या शब्दांनींच महाराजांस दिलेला दिसतो. कारण पुढील सर्व कलमें त्या हक्कास मारक अशींच आहेत.

सध्यां हिंदुस्थानांत अनेक संस्थानिक आहेत. त्यांचीं उत्पन्नें कोट्यवधी रुपयांचीं आहेत. पण त्यांपैकीं कोणासही सार्वभौमत्वाचा हक्क नाहीं. उलट ते सर्व राजे प्रत्येक गोष्टींत इंग्रजांवर अवलंबून आहेत. ते त्यांचे दोस्त ऊर्फ कनिष्ठ सत्ताधारी मांडलिक आहेत. या सर्व संस्थानिकांचें वर्णन इंग्लिश राजकारणी लेखक 'पाळीव संस्थानिक' 'पाळीव राजे' म्हणून करितात. ह्या शब्दांनीं असा अर्थ ध्वनित होतो कीं, इंग्रजांनीं हिंदुस्थानांत चालविलेल्या राजकारणी सर्कशीच्या खेळांतील हिंस्र पशूंचा तांडा म्हणजेच जणूं हे संस्थानिक. जगाच्या रंगभूमीवर हिंदुस्थानाच्या नादानपणाचा खेळ करून दाखवितांना नाना तऱ्हेच्या पोशाखानें शृंगारलेल्या या मानवदेहधारी श्वापदांच्या डरकाळ्यांस न जुमानतां त्यांच्या पाठीवर चाबकाचे खडाखड आवाज काढून त्यांच्याकडून इंग्रज आपणांस हवीं तशीं अचाट कामें करून घेतों, अशीं या संस्थानिकांचीं वर्णनें नेहमींच करण्यांत येतात. पण या बड्या धेंडांपैकीं कोणासही सार्वभौम-

त्वाचा हक्क नाहीं. तेव्हां सातारकरांच्या तहांत घातलेल्या सार्वभौमत्वाचा हक्क या शब्दांस कांहींच अर्थ नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे. कारण त्या शब्दाबरहुकूम महाराजास हक्क केव्हांच मिळाले नव्हते. ही झाली पहिल्या कलमाची हकिकत.

आतां लगेच दुसऱ्या कलमांत, 'सातारचे राजे ब्रिटिश सरकारशीं मांडलिकत्वाचें नातें धारण करून सहकारिता करतील' याचा सरळ अर्थ अगदीं असा कीं, सातारचे महाराजांस कोणतीही गोष्ट स्वतंत्रपणें करतां येणार नाहीं. असें म्हटल्यानंतर सार्वभौमत्वाचा हक्क महाराजांस आहे या म्हणण्यास पुरा हरताळ फांसला जातो. या कलमांत पुढें येणाऱ्या वाक्यानें तर सातारचे महाराज व त्यांचे वंशज यांचें स्वातंत्र्य पूर्णपणें हिरावून घेण्यांत आलें आहे. तें वाक्य असें कीं, 'सातारचे राजांनीं व त्यांचे मागून येणाऱ्या वारसांनीं दरबारीं नेमलेल्या एजंटाच्या सल्ल्याप्रमाणेंच प्रत्येक बाबतींत वागलें पाहिजे.' या अटीनें तर सातारचे महाराज इंग्रजांचे एक बंदे नोकरच झाले. त्यांना स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचा हक्क कोणत्याच प्रकारें शिल्लक राहिला नाहीं. सार्वभौमत्वाचा हक्क या शब्दाच्या अर्थाचें वलय फार मोठें आहे. त्यांत राजसत्तेचे विविध प्रकार पूर्णपणें सत्ताधाऱ्यांच्या हातांत असतात. ज्यास दुसऱ्याच्या सत्तेपासून स्वतःचें संरक्षण करतां येईल त्यालाच सार्वभौम म्हणतां येईल. परचक्र आलें असतां जो आपल्या लष्कराच्या जोरावर स्वतःचें व स्वतःच्या प्रजेचें संरक्षण करू शकेल व ज्यास हें करण्याचा पूर्ण अधिकार व सामर्थ्य असेल त्यासच सार्वभौमत्वाचा अधिकार आहे असें म्हणतां येईल. सार्वभौमत्वाचा हक्क गाजवावयाचा म्हणजे पदरीं फार मोठा फौजफांटा पाहिजे. पण तिसऱ्या कलमान्वयें हीही गोष्ट सातारकरांस करतां येत नव्हती.

तिसऱ्या कलमाप्रमाणें सातारकरांचें परचक्रापासून अथवा बाहेरच्या कोणत्याही संकटापासून संरक्षण करण्याची हमी इंग्रज सरकारनें घेतली होती. याशिवाय सातारच्या राज्याच्या संरक्षणासाठीं जें कांहीं खडें सैन्य अथवा फौजफांटा ठेवावयाचा त्याचा सर्व खर्च सातारकरांनीं करावयाचा. त्याकरितां लागणारा दाणागोटा व वैरणीस लागणारीं कुरणें व गुरें चरावयाचीं रानें सातारकरांनीं इंग्रजांस द्यावयाचीं. तसेंच लष्करी हालचाली आपल्या प्रांतांतून करण्यास

मोकळीक ठेवावयाची. इतकेंच काय पण इंग्रजांचें सैन्य आपल्या प्रांतांतून चाललें असतां त्याच्या सुखसोईकडे महाराजांनीं पाहावयाचें. याशिवाय युद्ध-प्रसंगीं ब्रिटिश सरकारास महाराजांनीं हरएक प्रकारें मदत करावयाची. अशा भयंकर अटी या तिसऱ्या कलमानें लादण्यांत आल्या. हीं सर्व कलमें वाचलीं म्हणजे सार्वभौम या शब्दाची इंग्रजांनीं केवळ विटंबना चालविली आहे असेंच वाटतें. कारण सार्वभौम हा शब्द व त्याच्या भोंवतालीं उभें केलेलें हें अटींचें कोंडाळें पाहिलें म्हणजे असें एक कल्पनाचित्र मनापुढें उभें राहतें कीं, एकाद्या बादशहानें आपल्या उष्ट्यावर जगणाऱ्या शागिर्दास थट्टेनें सार्वभौमत्वाचीं किरीटकुंडलें चढवावींत व त्यास सिंहासनावर बसवावें, म्हणजे जसें त्यास मेल्यापेक्षां मेलें होईल, तद्वत् स्थिति महाराजांची झाली ! एकीकडे सार्वभौम राजाधिराज म्हणून भालदारानें ललकारावयाचें व त्यांच्या हातांत सत्ता काहीइतकीही नसावयाची.

चौथें कलम अगदीं स्पष्ट आहे. तेव्हां त्याच्याविषयीं फारसें न लिहितां पांचव्या कलमाकडे वळूं. या कलमांतील अटी म्हणजे ब्रिटिश सरकारच्या सैतानी वृत्तीचा अपूर्व मासला आहे. त्या वाचल्यावर एकाद्या शांत वृत्तीच्या माणसासही संताप आल्यावांचून राहणार नाहीं. कारण या अटीनें सातारचे महाराजांस व त्यांचे वंशजांस इंग्रज सरकारनें एकाद्या नजरकैद्याप्रमाणें जखडून टाकलें आहे. या पांचव्या कलमांतील अटी इतक्या अपमानास्पद व बेछूट आहेत कीं, तशा अटी कोणी खाजगी व्यक्तीवर सुद्धां लादणार नाहीं. असल्या अत्यंत नादान व अपमानास्पद अटी स्वीकारण्यास सातारचे महाराज व त्यांचें मुत्सद्दीमंडळ तयार झालें. यावरून त्यांचे अंगीं स्वाभिमान कितपत होता याची चांगलीच परीक्षा होते. स्वतःच्या राज्याशिवाय परकीय राज्याशीं कोणताही संबंध अथवा पत्रव्यवहार इंग्रज सरकारच्या संमतीशिवाय करावयाचा नाहीं, ही अट कदाचित् थोडीबहुत क्षम्य म्हणतां येईल. पण संस्थानाबाहेर कोणाही माणसाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवावयाचा नाहीं, ही अट मात्र राजा म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या माणसासच काय पण स्वातंत्र्याची किंमत जाणणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अपमानास्पद वाटेल. या खोडसाळ अटीवरही ताण करणारी,

किंबहुना माणसाला माणुसकींतून उठविणारी अशी किळसवाणी अट साताऱ्च्या महाराजांना व त्यांच्या वारसांना इंग्रजांनीं या पांचव्या कलमांत पुढें घातली आहे. ती अशी कीं, राजाच्या किंवा राजघराण्यांतील कोणा माणसाच्या लग्नासंबंधींच्या बाबतींत जर बाहेरच्या कोणा जहागिरदाराशीं किंवा अन्य कोणा माणसाशीं बोलणें चालणें करावयाचें असेल तर तें देखील इंग्रजांनीं नेमलेल्या एजंटामार्फत केलें पाहिजे ! (ही अट या तहनाम्यांतील मूलभूत अटींपैकीं एक आहे.)

या अटीनें तर सातारकरांचें स्वातंत्र्य पूर्ण नाहींसें झालें. त्यांस जागजागीं इतकें जखडून टाकलें आहे कीं, बोलावयाची सोय नाहीं. या तहाच्या अटी पाहिल्या म्हणजे इंग्रजांच्या सावकारी वृत्तीबद्दल कौतुक वाटतें तसेंच आपल्या नादानपणाबद्दल लाज वाटल्यावांचून राहात नाहीं. या तहामुळें राजानें साताऱ्यास आपल्या राजवाड्यांत राहावें, खावें–प्यावें व इंग्रजांकडून जो पैसा मिळेल त्यांत चैन करावी व त्याच्या नजरकैदेंत असावें असेंच ठरलें. अशा प्रकारच्या विलक्षण अटी साताऱ्च्या महाराजांवर लादण्यांत आल्या. 'आम्ही पेशव्याच्या कैदेंतून महाराजांस सोडविलें ' म्हणून घमेंड मारणाऱ्या साहेबानेंच ही सातारकरांची अवस्था केली. पण आतां छत्रपति हे पेशव्यांच्या कैदेंत होते कीं इंग्रजांच्या आहेत, याचा निकाल एकादें शेंबडें पोर सुद्धां सांगेल. कारण पेशव्यानें सातारकरांवर कोणत्याहि अटी लादल्या नव्हत्या. ते स्वतः मुखत्यार होते. म्हणूनच इंग्रजांचें फावलें व त्यांनीं सातारकरांस फितविलें. या उदाहरणावरून तर इंग्रज शहाणा झाला व त्यानें सातारकर आपल्या तावडींत पुरे सांपडतांच त्यानीं पुन्हां कोणाशीं गुप्त कारस्थान करूं नये म्हणून त्यांना या अटींच्या जाळ्यांत सर्व बाजूंनीं इतकें जखडून टाकलें कीं, लग्नकार्यासारख्या अगदीं खाजगी बाबतींतही त्यांचें वर्तनस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांस सुद्धां त्यांस मुकावें लागलें. महाराजांच्या तोंडांत आपल्या एजंटाचा कांटेरी लगाम घालून इंग्रजांनीं त्यांस चांगलाच इंगा दाखविला.

सातारकर महाराजांच्या भोंवतीं इंग्रजांच्या करारनाम्यानें कसें कांटेरी कुंपण उभें केलें होतें हें दाखविल्यानंतर आतां सातारकर महाराज पेशव्यांच्या कैदेंत होते, म्हणून जो एकसारखा डांगोरा पिटला जातो, त्यांत तरी तथ्य



छत्रपति प्रतापसिंह



शाहु राजे अप्पासाहेब

कितपत आहे हें पाहिलें पाहिजे. सामान्यतः थोरल्या शाहूनंतर शिवप्रभूंच्या गादीवर कर्तबगार असा पुरुष आलाच नाहीं. त्याउलट पेशव्यांच्या वंशांत बाळाजी विश्वनाथापासून एकापेक्षां एकेक सरस अशीं नररत्नें निर्माण झालीं. त्याचा साहजिकच परिणाम असा झाला कीं, मराठी रियासतीचें पुढारीपण पेशव्यांकडे गेलें. पण त्याचा अर्थ असा खास नाहीं कीं, पेशव्यांनीं तें सातारकरांपासून लुबाडून घेतलें. वास्तविक कोणत्याही राजकारणाचा अंतिम निर्णय देण्याचें सामर्थ्य सातारकरांच्या हातीं अगदीं शेवटपर्यंत होतें. शेवटच्या बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें सातारकरांपासून आणविण्यांत आलीं, ही गोष्ट वरील विधानाची साक्ष देते. याशिवाय महाराजांच्या हातांत सर्वव्यापी सत्ता कशी होती तें खालील मजकुरावरून सहज लक्षांत येईल.

* "युद्ध किंवा तह करणें, दौलतीचे अष्टप्रधानांसुद्धां सर्व अधिकारी नेमणें, त्यांना वस्त्रें किंवा शिक्कामोर्तब देणें, सरदार लोकांस स्वारीवर मुलुखगीरीवर पाठविणें, किंवा परत बोलाविणें, इनाम, इतमाम, सरंजाम, नेमणुकी, धर्मादाय, देणगी, वंशपरंपरागत कामगिरी, बहाली, बडतर्फी, तात्पर्य हरएक बाबतींत सनदा किंवा तसे महत्त्वाचे कागदपत्र देणें हीं सर्व सातारकर महाराजांच्या पूर्ण अखत्यारींत असत." आतां असें होत असे कीं, पेशवे या बाबतींत सातारकर महाराजांस सल्लामसलत देत व शिफारशी करीत, पण कोणतीही गोष्ट महाराजांस पटल्याशिवाय शेवटला हुकूम सुटत नसे. महाराजांस न पटणारी गोष्ट पेशव्यांनीं त्यांच्यावर लादली व जबरीनें शिक्कामोर्तब करून घेतली, असें घडल्याचें उदाहरण कोठेंही नाहीं. पेशव्यांना सातारकरांचे हक्क लुबाडावयाचेच असते तर त्यांनीं सातारकर महाराजांचा शिक्कामोर्तब साताऱ्याहून पुण्यासच नेला असता. तसेंच तहनामे पेशव्यानें स्वतःच्या नांवानें केले नाहींत. कागदपत्र व सनदा स्वतःच्या नांवानें व शिक्कामोर्तबीनें दिल्या असत्या; पण यांपैकीं कोणतीही गोष्ट पेशव्यांनीं केली नाहीं. सातारकरांच्या इतमामास कोणत्याही तऱ्हेचा कमीपणा येईल असें वर्तन त्यानें केलें नाहीं. १८१० सालीं सातारकर

* इंग्रज व मराठे, उत्तरार्ध, प्रकरण दुसरें, पृष्ठ ३१.

पुण्यास आले असतां बाजीरावानें त्यांची बरदास्त धन्यास शोभेशी ठेविली. आतां इतकें मात्र खरें कीं, सातारकर महाराज जरा भोळेभाबडे असल्यामुळें त्यांस कोणी फसवूं नये व राजकारणांत नसत्या भानगडी उत्पन्न होऊं नयेत म्हणून त्यांच्यावर पेशव्यांची नजर असे; पण ती ढिली झाल्यामुळेंच सातारकर इंग्रजांच्या मोहजालांत सांपडले व त्यांनीं स्वतःचा नाश करून घेतला. असो. या नवीन तहानें महाराजांस मिळालेल्या राज्याच्या चतुःसीमा दक्षिणेस कृष्णा व वारणा, उत्तरेस निरा व भीमा, पश्चिमेस सह्याद्री व पूर्वेस पंढरपूर व विजापूर ह्या झाल्या. या राज्याचें उत्पन्न सुमारें १५ लाखांचें होतें. असें हें छोटेखानी राज्य महाराजांना वंशपरंपरेनें देण्यांत आलें.

प्रतापसिंहाची कारकीर्द : २१

राज्यक्रान्तीच्या घातक चक्रांतून शीरसलामत सुटून प्रतापसिंह महाराजांच्या हातांत पंधरा–सोळा लाखांचा मुलूख आला आणि शाब्दिक सार्वभौमत्वाचे हक्क मिळाले. आतां ते सुखासमाधानानें नांदूं लागले. सुदैवानें ग्रँटडफसारखा सुस्वभावी रेसिडेन्ट लाभल्यानें प्रतापसिंहाच्या सुकरतेंत आणखीच भर पडली. प्रतापसिंह व ग्रँटडफ यांच्यांत तेढ येण्याचें आतां कांहींच कारण नव्हतें. राज्याच्या सीमा, उत्पन्न, काटकसर, नेमणुका वगैरे वादग्रस्त मुद्यांचा आतां निर्णय लागला होता. तंटयाच्या वेळीं सुद्धां ग्रँटडफनें मोठ्या चतुरपणानें तो प्रसंग टाळला होता. परस्पर बाळाजीपंत नातूच्यामार्फत हें कटकटीचें आणि जिकिरीचें काम त्यानें उरकलें होतें. तेव्हां आतां दोघांमध्यें स्नेहाची भूमिका निर्माण होण्यास कोणत्याही तऱ्हेचा प्रत्यवाय नव्हता. डफ व प्रतापसिंह साधारणपणें समवयस्क असल्याकारणानें दोघांचा स्नेह चांगलाच जमला. डफनें प्रतापसिंहास चांगलें वळण लावलें आणि प्रतापसिंहाची कारकीर्द–तिला सामाजिक भानगडींचें लागलेलें गालबोट सोडलें तर–खरोखरच नमुनेदार झाली.

महाराजांना राज्यकारभाराचा अनुभव नाहीं म्हणून प्रथम कांहीं वर्षें त्यांनीं ग्रॅन्टच्या हाताखालीं शिक्षण घ्यावयाचें व ते कामास लायक झाले कीं कंपनीनें कारभार त्यांच्या स्वाधीन करावयाचा असें ठरलें होतें. तेव्हां ग्रॅन्टडफ महाराजांना राज्यकारभाराची माहिती देई. तो महाराजांस धाकट्या भावाप्रमाणें

वागवी. त्याचा वाडा प्रतापसिंहाचे वाड्याशेजारीं असल्याकारणानें दोघांचें संघटण जास्तच वाढलें. दोघांत जिव्हाळा निर्माण झाला व त्यांचा स्नेह शेवटपर्यंत टिकला.

ग्रॅन्टडफ आणि प्रतापसिंह या दोन व्यक्ति एके ठिकाणीं कांहीं काल आल्या म्हणून जातां जातां दोघांच्या आयुष्याचा तुलनात्मक परामर्ष घेण्याचा मोह झाल्यावांचून राहात नाहीं. डफचा जन्म ता. ८।७।१७८९ त झाला. प्रतापसिंहाचा जन्म ता. १८।१।१७९२ ला झाला. दोघांत साडे तीन वर्षांचें अंतर होतें. डफ वयाचे पंधराव्या वर्षीं आपली मातृभूमि सोडून मुंबईस १८०५ मध्यें ग्रनेडियर पलटणींत नोकर म्हणून दाखल झाला. नंतर इ. स. १८०८ मध्यें गुजराथेंतील बंडावे मोडण्याचें काम त्यानें केलें. याच सालीं प्रतापसिंहास बाजीरावाच्या हस्तें राज्याभिषेक झाला. आपले इतर उद्योग संभाळून डफनें फारशी भाषेचा अभ्यास चांगलाच केला. तेव्हां त्यास फारशी दुभाष्याची जागा मिळाली. पुढें ग्रनेडियर पलटण पुण्यास आली. तेव्हां ग्रॅन्टही येथें आला आणि एल्फिन्स्टनची व ग्रॅन्टची गांठ पडली. नंतर इ. स. १८१८ त साताऱ्याचा रेसिडेन्ट म्हणून त्याची नेमणूक झाली. तेथें त्याचा तनखा दरमहा दोन हजार व कच्चा खर्च म्हणून आणखी दीड हजार असा एकूण साडेतीन हजार रुपये होता. प्रतापसिंह राजा म्हणून व ग्रॅन्टडफ रेसिडेन्ट म्हणून साताऱ्यास दाखल झाले तेव्हां प्रतापसिंह २५ वर्षांचा तर डफ २८॥ वर्षांचा होता. पण दोघांच्या कर्तबगारींत केवढें तरी अंतर होतें. ग्रॅंटडफनें पांच हजार कोसावरून दुसऱ्याच्या देशांत येऊन त्याचा राज्यशकट कसा हांकावा याचें शिक्षण त्यास यशस्वीपणानें दिलें. हें करीत असतांना तो स्वस्थ बसला नाहीं तर ज्यांचें राज्य आपण घेतलें त्या लोकांच्या स्वभावाचा ताळेबंद हिशोब आपल्या जवळ असावा म्हणून त्यांचा इतिहास लिहिण्याचें अत्यंत जिकिरीचें काम मोठ्या हौसेनें केलें. मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्य जमा करण्यासाठीं डफनें फार श्रम घेतले आणि सेवानिवृत्त होऊन स्वदेशीं गेल्यावर मराठ्यांचा इतिहास व्यवस्थितपणें लिहून त्यानें त्याची पाहिली आवृत्ति १८५६ त प्रसिद्ध केली. ग्रॅन्टडफच्या या पुस्तकानें त्याची कीर्ति सर्व युरोपभर केली. या इतिहासाच्या पुस्तकापायीं त्यास १७,००० रुपये कर्ज झालें. त्याचें मराठी भाषांतर करण्याचा प्रतापसिंहाचा बेत होता; पण तो

तसाच राहिला असें दिसतें. या इतिहासाची एक प्रत त्यानें प्रतापसिंहास धाडिली होती. ग्रॅन्टडफ एवढा कीर्तिमान झाला आणि प्रतापसिंहास मात्र आपलें राज्यही संभाळतां आलें नाहीं. प्रतापसिंहाची कर्तबगारी ग्रॅन्टडफच्या पासंगालाही पुरत नाहीं.

ग्रॅन्टडफला शिकारीचा शोक असल्याकारणानें तो महाराजांसही शिकारीस नेत असे. त्यामुळें घोड्यावरून प्रवास करणें, जंगलांत मोठमोठाल्या शिकारी करणें, तसेंच प्रान्तोप्रान्तीं हिंडून रयतेचा परामर्श घेणें वगैरे शूरास व राजास शोभणाऱ्या संवयी प्रतापसिंहास लागल्या. कोर्ट–दरबारीं स्वतः जातीनें बसून प्रत्येक गोष्ट पाहणें व योग्य तो निकाल देणें, तसेंच सर्व कामें वेळच्या वेळीं करणें, आदा पाहून खर्च करणें, कोणत्याही सबबीवर कर्ज न काढणें, वगैरे उत्तम गोष्टी डफनें त्याला शिकविल्या. त्याचा अवलंब प्रतापसिंहानें शेवटपर्यंत केला.

प्रतापसिंहास कंपनी सरकारच्या विद्यमानें ता. ५।४।१८२२ रोजीं मुखत्यारी मिळाली. त्या वेळीं पुण्याचा कमिशनर चॅपलीनसाहेब हा साताऱ्यास मुद्दाम आला आणि त्यानें मोठा दरबार भरवून महाराज आपल्या राज्याचे कुलमुखत्यार झाल्याचें मोठ्या सन्मानानें आणि समारंभानें जाहीर केलें. तो उल्लेख असा :

"त्यावरून उलियम चापलीन साहेब कमिशनर बाहादूर याणीं सातारेंयास येऊन महाराजाचे दरबारांत मोठे सरदार व जहागिरदार वगैरे सारे लोक जमा होऊन राज्याची वहिवाट महाराज याचे सरकारांत सुपूर्द केली असे. तरी सरदार व जहागिरदार लहान मोठे जे महाराजांच्या इलाख्यांत आहेत, त्याणीं व तमाम रयत वगैरे हरयेक लोकांनीं, महाराज यांचे सरकारचें लक्ष ठेऊन त्यांचे हुकुमांत वागत असावे. मोठे सरदार व जहागिरदार याणीं आपआपलाले यादीप्रमाणें वागावें."

सातारकर छत्रपतींना अधिकार मिळाला आणि त्यांस हायसें वाटलें. राज्ययंत्र त्यांच्या इच्छेप्रमाणें फिरूं लागलें. थाटमाटाची कल्पना त्यांच्या डोक्यांत होती आणि त्यांत फारसें वावगें असें कांहींच नव्हतें. मराठ्यांचा

मोठा मानाचा सण म्हणजे दसरा–विजयादशमी. विजयादशमीचा सण मराठी दौलतदारांत जोरकस गाजे. आणि खुद्द साताऱ्याला तर तो विशेष गाजे. दसऱ्याची सर्व कचेऱ्यांना सुट्टी असे आणि तो दिवस फारच गडबडीचा आणि धांदलीचा जात असे. त्या दिवशीं कारकून, मुत्सद्दी, सरदार, मानकरी, इनामदार जहागिरदार, शागीर्दपेशा, राजघराण्यांतील खाशी मंडळी वगैरे सर्व झाडून हजर असत. दसऱ्याचें सीमोल्लंघन मोठ्या दिमाखानें होत असे. " फौज स्वार १,५००, सिबंदी २,०००, किता घोडे १,००० पायदळ २,००० व शागीर्द-पेशा २,००० पालख्या २५, म्याने २५, हत्ती ३०, रयत लोक २५,००० अदमासे. इंग्रजी पलटणचे लोक ५००, तोफा २ व गव्हर्नर, आणि इंग्रजी वकील वगैरे "—एवढ्या मोठ्या सरंजामासुद्धां ही स्वारी झुलत झुलत चाले. प्रथम देवीदर्शन घेऊन रेडा मारला जाई, नंतर " स्वारी सीमाउलंगनास चालू जाहाली. लोक मुजरे जाले. व इंग्रजी वकील लाडविक साहेब सालाबादप्रमाणें सामोरे येऊन वगैरे साहेब लोक स्वारी परतली तेव्हां निरोप घेऊन गेले. इंग्रजा-कडील पलटणी लोक व तोफा सलामी केली. तोफाचे बार व छत्रपती इकडील तोफांचे बार व पायदळ लोकांचे बार स्वारी येतांना व जातांना (झाले) याप्रमाणें स्वारी सीमाउलंगनास जाऊन वाड्यांत आली. "

हे असले देखाव्यादाखल अतिशय शोभून दिसणारे समारंभ दरवर्षी कमी अधिक प्रमाणांत सुखरूप पार पडत. पण त्यांत चैतन्याचा विलास कोठेंच नसे. त्यांनीं स्वराज्याची सीमा कधींच उल्लंघिली नाहीं. स्वराज्याच्या मर्यादा कायमच राहिल्या. दसऱ्याच्या मिरवणुकीच्या दिवशीं कमरेस लटकलेल्या समशेरींनें शत्रूचें रक्त केव्हांच प्राशन केलें नाहीं. ती मुडद्यांचीं मनगटें होतीं आणि त्या मिरवणुकी म्हणजे स्वराज्याच्या प्रेतयात्रा होत्या. हें स्वराज्यकमल खुरटून गेलें होतें. त्याच्या पाकळ्या मिटल्या होत्या. आणि त्यांत तन्मयतेनें वास करणारे भ्रमर कमलाबाहेर जग नाहींच या भेसूर आनंदांत दंग होते. समशेरींच्या खणखणाटानें आणि तोफांच्या गडगडाटानें सिद्ध होणाऱ्या युयुत्सु क्षत्रियत्वाचा गंधही त्यांच्या ठिकाणीं नव्हता. उदेपूरच्या राण्याशीं एकताट करण्यांत आणि त्या घराण्याशीं बेटीव्यवहार करण्यांतच केवळ बावनकशी क्षात्रियत्व सांठविलें आहे, या नादान कल्पनेनें

प्रतापसिंहास भारलें होतें. आणि ती कल्पना सत्यसृष्टींत उतरविण्याचा त्यानें आटोकाट प्रयत्न चालविला होता.

छत्रपतींच्याकडून शिवानंद नांवाचा एक शास्त्री उदेपुरास वरसंशोधनार्थ धाडण्यांत आला होता. तो तीन मुलगे पाहून आला. एक राण्याचा भाचा, दुसरा मुलीचा मुलगा आणि तिसरा राण्याचा एक नातेवाईक. या तीन मुलांपैकीं कोणाशीं आपल्या मुलीचें लग्न ठरल्यास या लग्नाचा थाट कसा उठवून द्यावयाचा याचा आराखडा छत्रपतींनीं तयार केला होता. " सरकारांत लग्न जालें असतां मुलुखांत इनामदार वगैरे याजवर एक साल लग्नपटी करावी असी चाल होती. " पण या शिरस्त्यास गव्हर्नरची परवानगी मिळाल्यास, " आधीं लग्नपट्टी वसूल करावी आणि मग दुसऱ्या सालीं लग्न करावें म्हणजे कर्ज होणार नाहीं. तसें न झाल्यास मग आमच्या वसूलांतून तजवीज करून करावयास येईल."

उदेपूरचें ठरल्यास तेथील लोक येतील त्यांस व तंजावरचे स्वार–शिबंदी, लवाजमा येईल त्यास दस्तकें द्यावीं लागतील तीं कलमें.

गव्हर्नरच्या सल्ल्यानें तंजावरकर आल्यास त्यास ५००० मनुष्याचें दस्तक द्यावें लागेल. उदेपुराहून नवऱ्यासमागमें जमाव २०००, राणाजीचे आप्त, भाऊ वगैरे लोकांबरोबर येणारा लवाजमा १००० याप्रगाणें दस्तक द्यावें लागेल. देऊलगांवकर जाधवराव पवार हे गव्हर्नराचे परवानगीनें आल्यास त्यांस ६०० मनुष्याचें दस्तक द्यावें लागेल. याप्रमाणें दस्तकाचा अाजमास आहे. मुलीचे लग्नास कोणत्या साहेबांनीं यावें त्याची यादी आहे. गव्हर्नर जनरेल चीप, रसिदन्त, पुण्याचे कलेक्टर, सदरलन, म्यूनसाहेब, अंडरसन साहेब, कर्नल ड्यूक साहेब सोलापूरचे कमांडिंग वगैरे पंधरा साहेबाचीं नांवें आहेत. केवळ कागदोपत्रीं गाजलेलें हें प्रतापसिंहाच्या मुलीचें लग्न उदेपूरच्या रजपूत घराण्याशीं शेवटीं जाहलें नाहींच. प्रतापसिंहाच्या या मुलीचें नांव गोजराबाई – इचें लग्न ता. १०–१२–१८३४ ला सुप्रसिद्ध प्रतापराव गुजराच्या घराण्यांतील यशवंतराव गुजर यांच्याशीं झालें.

शिंदे, गायकवाड ही मंडळी पेशव्याच्या अमदानींत फार मोठी झाली. त्यांची सत्ता आणि संपत्ति छत्रपतींना खिशांत घालण्याच्या तोलाची असल्याकारणानें ते समाजकारण आपल्याला पाहिजे त्या वळणानें वळवीत. त्यासंबंधीं प्रतापसिंह तक्रार करतो. "बडोदेकर गायकवाड याणी मराठे ज्ञातीत फितूर करून कांही मंडळीशीं शरीरसंबंध करण्याबद्दल लोभ दाखून फितवून नेहले." पूर्वापार हिंदु धर्माप्रमाणें रोटी बेटी व्यवहार व्यवस्थित व्हावेत पण त्यांत भ्रष्टाकार होतो. गायकवाड खानदानी मराठ्यांच्या मुली पैशाच्या जोरावर उपटतात. शिंदेही तसेंच करतात. तेव्हां या गोष्टी न करण्याबद्दल कंपनी सरकारनें ताकीदी द्याव्यात व वर्णसंकर थांबवावा. पूर्वी "बाजीरायाच्या कारकीर्दीस सिर्के महाडिक यांत कांहीं खटले पडले तेव्हा आमचे आम्हीच आपले जातींत बंदोबस्त केला." पण आतां कंपनी सरकारच्या राज्यांत तशी स्थिती नाहीं. कंपनी सरकारनें या प्रकरणीं धारण केलेली उदासीनता आम्हांस बिलकूल मान्य नाहीं. साहेब लोक स्वतःच्या जातीबद्दल संकर होऊं नये म्हणून फार काळजी घेतात. "इंग्रजी राज्य मोठें, परंतु सारे साहेब लोक तालेवार असें नाहीं आपलाले दैवानें वगैरे गरीब तालेवार आहेत; परंतु ते साहेब लोक प्रो जातीचा कायदा सोडून करूं लागल्यास बंदोबस्त होतो. मडम लोकांनीं फिर्याद केल्यावरून, काले मडमेचे अवलादीचे लोकास मोठे काम मिळू नये, त्याजवरून त्यांचा बंदोबस्त केला." स्वतःच्या बाबतींत इंग्रज इतकें लक्ष घालतात तेव्हां त्यांनीं खालसांत मराठ्यांच्या बाबतींत तोच दंडक चालवावा, आणि गायकवाड व शिंदे यांस खरपूस ताकीदी द्याव्यात असें प्रतापसिंहानें कळकळीनें इंग्रजांस सांगितलें आहे. पण या बाबतींत साहेबाचें धोरण ठरलें असल्याकारणानें प्रतापसिंहाची कुचंबणा झाली. प्रतापसिंहाची तीन चतुर्थांश कर्तबगारी या ज्ञातिप्रकरणींच खर्ची पडलेली दिसते.

कांहीं कांहीं वेळेला प्रतापसिंह चांगलाच बाणेदारपणा दाखवी. एकदां एका गव्हर्नरानें विलायतेस जातांना आपले दोन रथ प्रतापसिंहानें विकत घ्यावेत म्हणून पृच्छा केली. पण पैशाच्या तंगीमुळें आपलें म्हणणें मला मान्य नाहीं

गव्हर्नरास कळविण्यास त्यानें मागें पाहिलें नाहीं. गव्हर्नरसाहेबाचें कुत्रें हजारों रुपयांस खरेदी करणारे सध्यांचे संस्थानिक पाहिले म्हणजे प्रतापसिंहाचें या बाबतींत कौतुक करावेंसें वाटतें.

सातारकर छत्रपतींना अधिकार मिळाले आणि डफ सेवानिवृत्त होऊन स्वदेशीं गेला. पण त्या उभयतांत स्नेह कायम होता. एकमेकांचा पत्रव्यवहार होत असे व एकमेक कुशल विचारीत. प्रतापसिंह इंग्लंडाहून पुष्कळ चिजा मागवी. डफही त्या मोठ्या आनंदानें पाठवी. तसेंच प्रतापसिंहानें पाठविलेल्या पैशांचा हिशेबही तो चोख ठेवीत असे. दोघांच्या पत्रव्यवहारावरून त्यांच्यांत जिव्हाळा होता असें दिसतें. या नव्या राज्याचा जम नीट बसविण्याचें मुख्य श्रेय ग्रँटडफ व एल्फिन्स्टन यांनाच आहे. ग्रँटडफच्या वेळेस साताराच्या राज्याचा वसूल १८ लक्षांचा होता. पण त्या मुलुखाच्या वसुलाचें प्रमाण पुढें घटलें व तें कधीं आठ तर कधीं दहा कधीं बारा तर कधीं चौदा लक्षांच्या दरम्यान घोंटाळत होतें. आणि इंग्रजांस सातारकरांजवळ भरपेट पैसा आहे असा संशय येत होता. तेव्हां वसुलाचें दप्तर जातीनें पाहून साहेब लोकं आपणांस पैसेवाला म्हणतात याचें प्रतापसिंहास वैषम्य वाटत होतें. प्रताप-सिंहाची ही तक्रार व आणखी कांहीं तक्रारी ग्रँटडफच्या कानावर गेल्या, तेव्हां त्यानें एका पत्रांत या गोष्टीचा उल्लेख करून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला आहे. पत्र ता. २५ ऑगस्ट १८३५ चें आहे. "उत्पन्नाला दर इतका लावून वसुलांत कमति पडली म्हणोन आपल्यास वाईट वाटलें त्याचें मी आश्चर्य केलें नाहीं. कारण कीं, हें गाऱ्हाणें पृथ्वीवर सारखेंच जाहलें आहे." प्रतापसिंहानें एल्फिन्स्टनजवळ बऱ्याच कागाळ्या केल्याचें जेव्हां त्याच्या लक्षांत आलें तेव्हां तर डफला फारच वैषम्य वाटलें. तेव्हां तो म्हणतो, "मला वास्तवीक वाईट वाटलें हें कीं, उगीच वृथा निंदा करावी या उद्देशानें सांगतों असं नाहीं. परंतु असें जाणोन कीं, सातारा देश माझा खाजगत असता तर इतके अगत्ये केलें नसतें, परंतू आपले देशाचे सर्वकाळ हित व्हावें म्हणोन इतकें लिहिलें आहे." यानंतर ग्रँटडफ म्हणतो कीं, "आपला माझ्यावर पूर्ण

आणि लेखणी निराळें बोलूं लागली. पेशव्यांचा पराभव झाल्यावर त्यांचें राज्य तुमचेंच असल्याकारणानें तें तुमचें तुम्हांस आम्ही देणार आहोंत ही भाषा बोलणारा साहेब स्वराज्याचें उदक प्रतापसिंहाच्या हातावर सोडण्यास तयार झाला. तेव्हां तें पवित्र उदक हजाऱ्यांतील पाण्याप्रमाणें सहस्रधाऱ्यांनीं हातावर अवतीर्ण व्हावयास पाहिजे होतें. पण तसें न होतां तें एकाद्या भिकार खानावळींतील तुपाच्या धारेप्रमाणें ' क्वचित् धारा, क्वचित् बिंदू ' असें पडूं लागले. त्याबरोबर प्रतापसिंह म्हणतो, " बाजीराव वसईस जाण्यापूर्वीं स्वतंत्रपणें वागत होते. तेथपर्यंत अलीकडे वसईहून आल्यावर इंग्रजी सरकारची जरब होती या भयामुळें इकडील वागणुकींत पहिली शिस्त राहिली नाहीं. सबब वसईपर्यंत इकडील सरकारचा मगदूर व वागणुकीचें व वहिवाटीचें कागदपत्र पाहून त्यांत व हल्लीं-च्यांत कम जाजती कोणते आहे ते पाहून—" काय करणें ते करावे. अशा अर्थाचे वरील उद्गार आहेत. नंतर १८३७ सालीं इंग्रजाचें स्वरूप पूर्णपणें कळलें आणि आपला सर्वस्वीं घात झाला हें स्पष्ट दिसतांच पेशव्यासंबंधीं निघालेले शब्द पाहण्यासारखे आहेत. " बाजीराव वगैरे लोक पुरे चालीचे रीतीचे भरवसा देत असतां त्याचा भरवसा धरिला नाहीं. " प्रतापसिंहाचें राज-कारण हें असें चाललें होतें; तरी त्यानें पुष्कळच कामगिरी करून सातारा राज्याची व शहराची सुधारणा केली.

सातारा शहराची सुधारणा प्रतापसिंहानें बरीच केली. त्याच्या पूर्वीचें सातारा शहर म्हणजे एक उजाड गांव होते. जिकडे तिकडे पडलेलीं घरें, दगडांचे गडगडे व केराचे ढिगारे. त्याला आकार ना रूप. अशा एका वेड्यावांकड्या गांवठाणाचें सुंदर व टुमदार अशा राजधानींत प्रतापसिंहानें रूपांतर केलें. मोठमोठाल्या इमारती बांधल्या. ठिकठिकाणीं बगीचे व सुंदर जलमंदिरें निर्माण केलीं. नळ बांधून आणून गांवांत पाणीच पाणी केलें. सडका व पेठा बांधिल्या. जुन्या देवालयांचा जीर्णोद्धार केला. प्रतापगड येथील देवीचें मंदिर, श्रीसमर्थ रामदास स्वामींचें देवालय व साताऱ्याच्या किल्ल्यावरील मंगळाईचें देवालय वगैरे किती तरी मंदिरें बांधिलीं. तसेंच खाजगी वाडा, नगारखाना, पागा, फरासखाना, डोंगरावरील दोन नजर बंगले, हुजूर पागा व रथखाना वगैरे अनेक इमारती बांधिल्या.

यवतेश्वराहून नळ बांधून गांवांत पाणी आणिल्यानें एक तऱ्हेचें नवजीवन निर्माण झालें. तसेंच महादरें येथें तलाव बांधिला. या दोन कार्यांस दोन लक्ष रुपये खर्च लागला. अशा इमारती व तलाव त्यानें अनेक बांधिले. याची विस्तारानें हकीगत पाहिजे असेल त्यानें मराठ्याचें दप्तर रुमाल पहिला–शेडगांवकर बखर यांत पाहावी. प्रतापसिंह महाराजांनीं आपल्या वीस वर्षांच्या कारकीर्दींत सुमारें तीस चाळीस लक्ष रुपये लोककल्याणार्थ खर्च केले व रयत सुखी केली.

सातारकर छत्रपतींस महाबळेश्वरामुळें विशेष महत्त्व आलें. महाबळेश्वरासारख्या रम्य व थंड ठिकाणीं हवा खाण्यास कंपनी सरकारचे गव्हर्नरासारखे मोठमोठाले अधिकारी लालचवल्यामुळें त्यांची वरदळ साताऱ्यास फार पडे. प्रतापसिंहही त्यांची बरदास्त व सरबराई नीट ठेवी. या वेळीं कंपनी सरकारचें अधिराज्य नुकतेंच सुरू झाल्यामुळें एल्फिन्स्टन, ग्रॅन्टडफ, ब्रिग्ज व रॉबर्टस वगैरे इंग्रज अधिकारी स्वतःची वागणूक जरा मवाळ ठेवीत. हातांतील राज्य व सत्ता या दोहींस मुकलेले मराठे राजेरजवाडे एखादे वेळेस आपल्या उद्दाम वागणुकीनें बिचकून बंडावा करतील व मग आपलें आसन डळमळीत होण्याचा घोर प्रसंग येईल अशी त्यांस पोटांतून भीती वाटत असल्यामुळें ते जिंकलेल्या लोकांशीं मोठ्या आदरानें वागले. पण त्यांच्यांतील तेज हळू हळू पण न कळत कमी करण्याचा उद्योग करीत. त्यांस गुलामगिरीचें शल्य न बोंचावें म्हणून अत्यंत काळजी घेत. या सर्व मंडळींनीं प्रतापसिंहाच्या राज्य-कारभाराची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. महाबळेश्वराचा टापू हा सातारकराच्या हद्दींत होता. तो त्याजकडून हवा खाण्याचें ठिकाण करण्यासाठीं म्हणून कंपनी सरकारनें मागून घेतला. व याच्या उलट प्रतापगडचा किल्ला व त्याच्याजवळ असणारें भवानीचें देवालय हें प्रतापसिंहाचे हद्दींत येत नव्हतें; पण छत्रपतींच्या मागण्यावरून तें इंग्रजांनीं त्याच्या हवालीं केलें. त्याबरोबर प्रतापसिंहानें श्री भवानीमातेचें देवालय व त्याच्या आसपासचा भाग रु. ४०,००० खर्च करून नीट बांधिला. इ. १८२४ त महाराजांनीं दोन हजार लव्याजम्यानिशीं मोठ्या

थाटानें प्रतापगडावर जाऊन देवीचें दर्शन घेतलें. अशा तऱ्हेनें श्रीभवानीमातेच्या मंदिराचा उद्धार केला.

महाबळेश्वरास सुद्धां प्रतापसिंह महाराजांनीं चांगली शोभा आणिली. साताऱ्याकडून महाबळेश्वरपर्यंत सुंदर गाडीरस्ता बांधिला व पुढें तोच महाडास नेण्यांत आला. इंग्रज सांगतील त्या सुधारणा सातारकरांनीं स्वतःच्या खर्चानें करून दिल्या. महाबळेश्वरास पहिला बंगला कर्नल ब्रिग्जनें बांधिला. उन्हाळ्यांत गव्हर्नर महाबळेश्वरीं हवा खाण्यास गेला असतां प्रतापसिंहानें त्याच्या भेटी घ्यावयाच्या व माघारीं मुंबईस जातांना गव्हर्नरनें साताऱ्यास उतरून छत्रपतीचा पाहुणचार घ्यावयाचा असा हा क्रम सतत सतरा–अठरा वर्षें चालू होता. एल्फिन्स्टन सेवानिवृत्त होऊन माघारीं देशीं चालला असतां त्यास मानपत्र देण्याचा समारंभ झाला. त्यांत मानाची म्हणून पहिली सही प्रतापसिंहाची आहे. त्याच्यानंतर मालकम् गव्हर्नर आला त्या वेळीं त्याच्या नांवानें मालकम् पेठ वसविली. सदरहू पेठेस मालकम् साहेबानें प्रतापसिंहाचें नांव द्यावें असें सुचविलें. पण ही सूचना छत्रपतींनीं अमान्य करून मालकम् साहेबाचेंच नांव त्या पेठेस दिलें. इ. स. १८२८ त महाबळेश्वराची प्राणप्रतिष्ठा केली. प्रतापसिंहानें तेथें स्वतःसाठीं एक बंगला बांधिला. अशा तऱ्हेनें महाबळेश्वराची भरभराट व्हावी म्हणून सातारकर महाराज सर्वतोपरी झटले. त्यांनीं महाबळेश्वराचा टापू स्वतंत्र तहानें इंग्रजांस ता. १६–५–१८२९ ला दिला.

ता. ६–१०–१८३३ रोजीं मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड क्लेअरनें साताऱ्यास भेट दिली. त्या वेळीं त्यानें त्या प्रसंगाची हकीगत खालीलप्रमाणें लिहून ठेविली आहे. "प्रतापसिंह तरुण, ठेंगू, लठ्ठ, व गौरवर्ण आहे. (Fifteen years in India या पुस्तकांत याच्या उलट वर्णन आहे. Dark complextion and vulgar aspect काळासांवळा वर्ण व खेडवळ अशी चेहऱ्याची ठेवण. एकाद वेळेस सुखांत व राज्योपभोगांत दहा बारा वर्षें गेल्यामुळें हा फरक झाला असेल). त्याचें कपाळ रुंद असून त्याचे डोळे पाणिदार आहेत. लोकांस साक्षर करण्याची व विद्यादान देण्याची त्यास फार हौस आहे. त्यासाठीं साताऱ्यास त्यानें पाठशाळा काढिली त्यांत इंग्लिश, पर्शियन व मराठी या भाषा

शिकविल्या जातात. राजा राममोहनराय या सुप्रसिद्ध सुधारकाची राजा मोठी चहा करतो."

गव्हर्नर लॉर्ड क्लेअर, एल्फिन्स्टन, ग्रॅन्ट, ब्रिग्ज, रॉबर्टसन् वगैरे इंग्रज अधिकाऱ्यांनीं प्रतापसिंहाच्या राज्यकारभाराची मनसोक्त स्तुति केली आहे. तसेंच मालकम् व रॉबर्टसन यांनीं छत्रपतींच्या कारभाराची व टापटिपीची वाखाणणी करून त्यांस कांहीं तरी चांगलें पारितोषिक देण्याची शिफारस इंग्लंडच्या सरकाराकडे केली.

प्रतापसिंह महाराजांनीं आपल्या प्रजेचा व राज्याचा कसा उत्कर्ष केला व त्यास भरभराटीस कसें आणिलें त्याची कल्पना देणारा त्या वेळच्या बखरींतील एक मोठा मार्मिक उतारा असा आहे:–

"त्याणी सर्वांचा जीरण उधार केला. व शेहेर सातारा येथील राहणारा क्षेत्री मराठे व आणखी इतर वगैरे लोक हे पूर्वी फार गरिबदारीत अनानगत घरोघर दारिद्र्याचा वास होऊन काळानें त्यांचे घरीं बिराड घेऊन राहिला होता. चुलीस व जात्यास द्वाही अशी अवस्था जाहाली होती. ते समई मुद्राधारीं प्रतापसिंह महाराज छत्रपति याणी सर्वांचे दारीद्र दूर करोन उर्जीत केले. आणि त्यास मोठ्या योग्यता व दौलती देऊन वाढविले. ते आपल्या घरोघर स्वस्थ राहिले."

पडदानशीन समशेर : २२

छत्रपति प्रतापसिंह महाराजांच्या एकंदर राज्यकारभाराचा विचार करतां त्यांच्यावर पदच्युत होण्याचा प्रसंग येईल असें स्वप्नांत सुद्धां वाटत नाहीं. कारण त्यांचा कारभार एकंदरीन चोख होता. जुलूम जबरदस्तीचा प्रकार फारसा नव्हता. ज्ञाति प्रकरणीं त्यानीं कोणाचीं उत्पन्नें खालसा केलीं असतील तर वेदोक्त प्रकरणीं कांहीं ब्राह्मणांना कैदखाना दाखविला असेल इतकेंच; पण त्यांचें राज्य खालसा होईल इतका कांहीं भयंकर गुन्हा त्यांच्या हातून झाला नव्हता. त्यांच्या राजधानीस महाबळेश्वरामुळें बरेंच महत्त्व आलें होतें. त्यामुळें महाबळेश्वराचे सीझन गाजविण्यासाठीं जाणारे गव्हर्नर जातां येतां साताऱ्यास भेट देत. त्या वेळीं त्यांची सरबराई नीट होत असल्या कारणानें महाराजांचे व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे संबंध जास्त सलगीचे असत. बरें, महाराज मानी असून तो इंग्रजांस बांकून वागणारा होता, इंग्रजाचें राज्य झालें, आपलें स्वातंत्र्य गेलें म्हणून त्यास मनस्ताप होत होता अशांतला मुळींच प्रकार नव्हता. उलट तो इंग्रजाची चहा करी. त्याची सरबराई नीट ठेवी. असें असतांना उभयतांचे संबंध फिसकटण्यास प्रारंभ झाला खरा. १८१९ मध्यें कंपनी सरकार व महाराज यांच्यांत तह झाला. १८२२ मध्यें महाराजांस मुखत्यारी मिळाली आणि पुढील पंधरा सोळा वर्षें प्रतापसिंह महाराजांनीं आपली कारकीर्द नमुनेदार अशीच केली. पण आढीला घातलेला चांगला कलमी आंबा पिकावा व

अकस्मात नासण्यास सुरवात होऊन तो लवकरच इतका नासून निरुपयोगी व्हावा कीं तो सडकेवर फेंकून देण्याचा प्रसंग यावा, तसें झालें. कंपनी सरकारचें प्रतापसिंहाबद्दलचें ओसंडून चाललेलें प्रेम एकदम आटावयास लागलें. आणि प्रतापसिंहाचा घात झाला.

प्रस्तुतचा काल हा संधिकाल होता. एक सत्ता पूर्णपणें मावळून दुसऱ्या सत्तेच्या नवीन युगास नुकताच प्रारंभ झाला होता. अशा तऱ्हेनें नवी विटी व नवें राज्य अशी सर्वच तऱ्हा नव्या रंगाची होती. इंग्रज राष्ट्रीय भावनेनें मुसमुसणारा तर मराठा त्याच पवित्र भावनेस पारखा झालेला. हिंदुस्थानांत आपले पाय स्थिरावले, कायम झाले ही केवढी मोठी गोष्ट झाली, आपल्या हातीं कुबेराचें भांडार आलें, या आनंदानें सर्व सत्ताधारी टोपीकर बेहोष झाला होता. पण त्याची बुद्धि मात्र स्थिर होती. हें मिळालेलें अवदान पार पचवून फस्त करण्याच्या उद्योगांत तो होता. तेव्हां त्यानें आपलें आसन कायमचें स्थिर करण्यासाठीं म्हणून राजे, राज्यें व राज्ययंत्रें निर्माण केलीं होतीं आणि तीं नीट सुरळीतपणें चालावींत म्हणून तो जागरूक होता. या खानदानी राजे लोकांशीं स्नेहसंबंध वृद्धिंगत व्हावेत म्हणून त्याची वागणूक लाघवी असे. ही साहेबी सत्ता कांहीं न्यारी आहे असें समजून व तिच्या तडाक्यांतून आपण आतां सुटत नाहीं हें समजून येथील राजे लोक मवाळीनेंच वागत. कित्येकांना तर हा गोरा साहेब म्हणजे प्रतिदेव वाटे.

सातार दरबारीं रेसिडेन्टामागून रेसिडेंट बदलले व महाबळेश्वरावर हवा खाण्यासाठीं येणाऱ्या प्रत्येक गव्हर्नरानें साताऱ्यास भेटी दिल्या वते सर्व महाराजांच्या राज्यकारभारावर खूष झाले आणि त्यांनीं महाराजांची मुक्त कंठानें स्तुति केली.

एल्फिन्स्टननें साताऱ्यास इ. स १८२२ मध्यें भेट दिली. त्या वेळीं महाराजांस इंग्रजांच्या कृपाछत्राखालीं राज्यकारभार पाहावयास लागून अवघीं तीनच वर्षें झालीं होतीं. त्या वेळीं एल्फिन्स्टननें आपल्या मित्रास धाडलेल्या एका पत्रांत सातारच्या राजाविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं, “सातारचा राजा हा एक अत्यंत सालसवृत्तीचा सदगृहस्थ आहे. माझ्या आगमनाप्रीत्यर्थ मुद्दाम भरविलेल्या दरबारांत आम्ही दोघे दोन तक्तांवर गंभीरपणें गप्प बसलों

होतों. दरबारांत राजाच्या चेहऱ्यावर माझ्याविषयीं पूर्णपणें आदरयुक्त भावना दृग्गोचर होत होत्या; पण दरबार संपतांच आम्ही खाजगी दिवाणखान्यांत गेल्याबरोबर राजानें दिवाणी व फौजदारी खटल्यांचे निकाल कसे न्यायास धरून दिले आहेत, हें मला दाखविण्याकरितां दप्तरें पुढें दाखल केलीं. तसेंच गेल्या तीन वर्षांतील जमा झालेला वसूल व खर्च यांचा ताळेबंद हिशेब मला दाखविला. याशिवाय काम करतांना काय काय उणीवा भासतात त्या अत्यंत नम्रपणें सांगून कांहीं नवीन मागण्या करावयाच्या होत्या त्याही पण केल्या. हें सर्व करीत असतांना राजाची उत्सुकता व उत्साह हीं एखाद्या तरण्याबांड कलेक्टराप्रमाणें दिसत होतीं.

"सातारचा राजा न्यायासनावर स्वतः जातीनें बसतो व न्यायदानाचें काम अत्यंत वक्तशीरपणें व निःपक्षपातानें करतो. माझ्या पाहण्यांत आजपर्यंत जे जे मराठे आले आहेत त्यांच्यामध्यें सातारचा राजा हा मला अत्यंत सुधारलेला व सुशिक्षित गृहस्थ वाटला. त्यानें आपल्या राज्याचा मुलूख फारच चांगल्या स्थितींत ठेविला असून रस्ते, कालवे व बंधारे या सर्व गोष्टी फारच व्यवस्थेशीर व नीटनेटक्या आहेत. सातारा सोडण्यापूर्वीं मी व सातारचे राजे शिकारीस गेलों होतों; आमच्याबरोबर सातारच्या एजंटाचा असिस्टंट मॉरिस हा तरुण गृहस्थ होता. तो एकदम माझ्या समोरच घोड्यावरून खालीं पडला व बेशुद्ध झाला. तों त्याला मदत करण्याकरितां एक तरुण गृहस्थ धांवत धांवत आला व त्यानें त्याचें डोकें नीट धरिलं आणि तो त्यास शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करूं लागला. तेव्हां साहजिकच हा एवढा परोपकारी इसम कोण म्हणून मी त्याकडे जरा न्याहाळून पाहूं लागलों तों चमत्कार असा कीं, तो गृहस्थ दुसरा कोणीहि नसून ते सातारचे राजे होते. ते आपल्या घोड्यास सोडून मॉरिसच्या मदतीस धांवले होते."

यानंतर चार वर्षांनीं एल्फिन्स्टननें पुन्हां एक पत्र आपल्या मित्रास लिहिलें आहे. त्यांत तो म्हणतो कीं, "सातारच्या महाराजांनीं आपला कारभार अत्यंत टापटिपीनें व वक्तशीर पद्धतीनें चालविला आहे. इतका कीं त्याकडे पाहून युरोपियन अधिकाऱ्यांनेंही धडा घ्यावा. महाराजांच्या खाजगी दिवाण-

खान्यांतील एका दृश्याचा परिणाम माझ्या कानावर फारच झाला. श्री शिवाजी महाराजांचे वंशज हे राजे आपल्या छोटेखानी दिवाणखान्यात अगदीं सडे खुर्चीवर बसत असत. त्यांच्यापुढें हिरव्यागार मखमालीनें झाकलेलें एक टेबल असे; व ते आपले दिवाणी व फौजदारी मुकद्म्याचे निकाल स्वतः लिहीत असत. अशा शांत स्वभावानें व गंभीरवृत्तीनें राजास काम करतांना पाहून त्याच्या पूर्वजास काय वाटत असेल याची कल्पनाच करणें अत्यंत मनोरंजक होणार आहे."

वर नमूद केलेलीं दोन प्रशंसापत्रकें वाचल्यानंतर एलिफन्स्टननें महाराजांविषयीं मत कसें चांगलें होतें हें तर निदर्शनास येतेंच, पण खुद्द महाराजही कसे सरल व सालस वृत्तीचे होते याचीही पण बालंबाल खात्री पटते.

साताराच्या महाराजास पेशव्यांच्या उचलबांगडीनंतर जें राज्य आतां प्राप्त झालें होतें तें सर्व एलिफन्स्टनच्याच कृपेमुळें. तेव्हां सातारचे महाराज त्याच्याशीं अत्यंत कृतज्ञताबुद्धीनें वागत असत. ते त्यास आपला निस्सीम हितकर्ता, जवळजवळ गुरुच समजत. तेव्हां महाराजांनीं आपल्या राज्यकारभाराचा अहवाल जेव्हां त्याच्या स्वाधीन केला, तेव्हां एल्फिन्स्टननें सातारकर महाराजांची हुशारी व तरतरी पाहून त्यास तरुण कलेक्टरचें प्रशंशापत्र दिलें. यावरून हें स्पष्ट होतें कीं, एल्फिन्स्टन व प्रतापसिंह यांचे परस्पर संबंध अत्यंत स्नेहभावाचे होते. जवळजवळ इ. स. १८२५–२६ पर्यंत ही स्थिति कायम होती. प्रतापसिंह महाराजांच्या कारकीर्दींत एकंदर पांच रेसिडेंट झाले. ते येणें-प्रमाणें (१) जेम्स ग्रँट.(२) जॉन ब्रिज.(३) कर्नल रॉबर्टसन.(४) कर्नल लॉडविक. आणि (५) कर्नल ओव्हान्स. या पांच रेसिडेन्टांपैकीं पहिल्या तिघांची अशी बालंबाल खात्री होती कीं, सातारचे महाराज फार सरळ व सीध्या वृत्तीचे असून त्यांचा राज्यकारभार एका ठरलेल्या चाकोरींतून चालावयाचा. कांहीं भानगडी उपस्थित होण्याची धास्तीच नको. हें त्यांचें मत खरें होतें. सातारच्या महाराजांसारखा सभ्य व सरळ मनुष्य, त्यांतून इंग्रजांवर पूर्ण निष्ठा ठेवणारा, त्यांच्याशीं आपला स्नेह दृढतर व्हावा म्हणून खटपट करणारा, असा हा महाराज इंग्रजांविरुद्ध कांहीं कपटकारस्थान करील, इंग्रजी सत्ताशिवाय दुसऱ्या

एकाद्या राजसत्तेशीं संधान बांधून इंग्रजांवर तुटून पडेल, असे विचार पहिल्या तीन रेसिडेंटांपैकीं कोणाच्याही स्वप्नीं आले नाहींत. तसें वाटण्याचें कारणही नव्हतें.

असें जरी होतें तरी, सातारच्या महाराजांचें नशीबच अत्यंत खडतर होतें. त्यांच्या ललाटीं संकटांची परंपरा लिहून ठेवलेली. तेव्हां विधिलिखितांपुढें महाराज तरी कोठें जाणार? पुढें पुढें सातारच्या महाराजांचे धाकटे बंधु आप्पासाहेब व बाळाजीपंत नातू या उभयतांस सातारच्या राज्यकारभारांत प्रमुख सत्ता आपले हातीं असावी, असा मोह उत्पन्न झाला. आप्पासाहेबास गादी बळकविण्याची इच्छा अनावर झाली, तर बाळाजीपंत नातूस सातारदरबारांतील दिवाणगिरीचीं वस्त्रें आपणांस मिळावीं अशी हाव सुटली. घरांतच सातारकराविरुद्ध असे दोन प्रबल शत्रु उत्पन्न झालें. तसेंच कंपनी सरकारच्या मुत्सद्यांना काय झालें असेल तें असो, त्यांनाही पण असें वाटूं लागलें कीं, सातारचें राज्य कांहींना कांहीं सबबीवर अजिबात खालसा करून टाकावें. अशा तऱ्हेनें सातारकरांविरुद्ध हे तीन वारे अत्यंत जोरानें वाहूं लागले. त्यामुळें वादळें उत्पन्न होऊन त्यांतच सातारच्या गादीचा अंत झाला.

पुढें येणाऱ्या अमंगल प्रसंगाची अंधुक कल्पना आतां वर दिलीच आहे. पण तत्पूर्वी महाराजांच्या नशिबीं एक शुभप्रसंगही लिहून ठेविला होता. त्याची माहिती महाराजास तरी शेवटपर्यंत होती कीं नव्हती, हें कळणें दुर्मिळ आहे. पण हा शुभप्रसंग महाराजांच्या नांवानें सातासमुद्रापलीकडे घडून आला!

सातारदरबारीं एके वेळीं रेसिडेंट असलेला रॉबर्टसन् हा आतां इंग्लंडांत माघारीं गेल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीचा डायरेक्टर झाला होता. एकदां डायरेक्टरांची सभा चालली असतां त्यानें भरसभेंत सातारकरांबद्दल अत्यंत उत्कृष्ट उद्गार काढिले. तो म्हणतो; "माझ्या हिंदुस्थानच्या प्रवासांत मी सातारच्या महाराजांसारखा सत्यप्रिय, निगर्वी आणि पापभीरू मनुष्य पाहिला नाहीं. इतकेंच काय पण महाराजांसारखा गुणसंपन्न मनुष्य इंग्रज लोकांतही क्वचितच आढळेल."

कंपनीसरकारच्या डायरेक्टरांचें मंडळ म्हणजे साळसूद मेंढपाळांची मजलस! त्यांना कोणताही हिंदुस्थानांतील राजा निर्दोष दिसावयाचा नाहीं.

कारण त्याखेरीज हिंदु राजेरजवाड्यांच्या भोंवतीं कांहीं कल्पित दुर्गुणांचें किंवा राजद्रोहाचें जंजाळ उपस्थित करणें त्यांना कसें शक्य होईल; पण असल्या नाठाळ डायरेक्टरांचें सुद्धां साताराच्या महाराजांविषयीं मन शुद्ध व चांगलें होतें. हा तरी खरोखरच कपिलाषष्ठीचा योग. अशी परिस्थिति डायरेक्टरांच्या बाबतींत तरी जवळजवळ इ. स. १८३५ पर्यंत होती. कारण त्यांनीं २९ डिसेंबर १८३५ ला एक सभा बोलावून तिच्यांत सातारकरांच्या राजनिष्ठेची म्हणजेच इंग्रजांविषयींच्या निस्सीम स्नेहाबद्दलची तारीफ केली आहे व त्यांच्या एकंदर राज्यकारभाराबद्दल स्तुतिस्तोत्रें गाइलीं आहेत. त्यांच्या या सद्गुणांवर लुब्ध होऊन डायरेक्टरांनीं एक तीन हजार पौंड किंमतीची रत्नजडीत समशेर महाराजांस नजर म्हणून धाडली व त्याबरोबर एक खलिताही धाडला तो असा:

ता. २९ डिसेंबर १८३५

महाराज,

आपणांस आपल्या पूर्वपुण्याईनें लाभलेल्या अत्यंत थोर व मानाच्या जागेबद्दल आम्हांस आदर वाटतो, आपण त्या पवित्र व महनीय ठिकाणीं विराजमान होऊन त्या जागेस शोभा आणिली आहे. त्या जागेचा लौकिक वाढेल अशीच आपली वर्तणूक आहे. आपण आपल्यावर पडणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडतांना जी निरपेक्ष बुद्धि व मनाचा दिलदारपणा दाखवितां त्याबद्दल आपली स्तुति करावी तितकी थोडीच आहे. पितृतुल्य वात्सल्यानें आपण आपल्या अखिल प्रजाजनांचें पालन करीत आहांत. त्यांचा उत्कर्ष कसा होईल, याबद्दल अहर्निश खटपट करीत आहांत. याशिवाय आपल्या राज्याची भरभराट कशी होईल, याबद्दल आपण चिंता वाहतां हीं सर्व आपल्या थोरपणास भूषणभूत आहेत. लोकोपयोगीं कार्यें आपण स्वतः झीज सोसून तडीस नेतां, याबद्दल आपलें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे. आपला उमदा स्वभाव, पवित्र चारित्र्य आपल्या वंशासच काय पण इतर हिंदी राजांस ललामभूत होईल असेंच आहे. येथवर नमूद केलेल्या गुणांबद्दल आपल्याविषयीं आमच्या मनांत पराकाष्ठेचा आदर वसत आहे.

आपले ठायीं वसत असलेल्या गुणांवर लुब्ध होऊनच आम्ही कंपनी सरकारचे डायरेक्टर्स एकमतानें आपणांस आपल्यावरील आमच्या प्रेमाचें एक स्मृतिचिन्ह म्हणून ही तलवार नजर करीत आहों. तरी तिचा स्वीकार करून उभयतांमधील स्नेहभाव वाढीस लावाल अशी आशा आहे. सदर तलवार आपणास मुंबई सरकारामार्फत देण्यांत येईल. परमेश्वर आपणांस आयुरारोग्य भरपूर देवो व आपली दिवसानुदिवस भराभराट करो.

आपले विश्वासू स्नेही

डब्ल्यू एस्. क्लार्क, चेअरमन्

जे. आर कन्यींक, डेप्युटि.

वर दिलेला खलिता व रत्नजडित समशेर यांचें हें महादान महाराजांकरितां इंग्रजांकडून सुटलें. तें सात समुद्र ओलांडून मुंबईच्या बंदरापर्यंत सुखरूप आलें. पण त्यास हिंदुस्थानची हवा लागतांच त्याचा सर्व वेग थंडावला; व त्यास मुंबईपासून साताऱ्यापर्यंतची सुद्धां मजल गांठवेना. हे आणि अशाच प्रकारचे सर्व स्नेहभावाच्या अमृतानें कांठोकाठ भरलेले अमृतकलश मुंबईपर्यंत येत, पण त्यास हिंदुस्थानची हवा लागतांच तें नासूं लागून त्यांचें रूपान्तर जहरांत होई. कारण प्रतापसिंह महाराजांस रागालोभाचीं पत्रें येत. तीं सर्व प्रथम मुंबईच्या गव्हर्नरास मिळत व मग त्याच्या मध्यस्थीनें तीं सातारच्या महाराजांस मिळावयाचीं असा शिरस्ता होता. सरासरी १८२९ पासून ते १८३५ पर्यंत कंपनीच्या डायरेक्टरांनीं महाराजांच्या कारभारावर त्यांनीं इंग्रजांशीं ठेवलेल्या धोरणावर खूष होऊन बरींच संतोषाचीं व समाधानाचीं पत्रें धाडिलीं. पण तीं सर्व मुंबईच्या मुंबईत गडप होत ! कारण या वेळचा मुंबईचा गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट हा होता. त्याचें व महाराजांचें सरळ नव्हतें. त्यामुळें साताऱ्यास कांहीं नवीन भानगडी सुरू झाल्या होत्या. म्हणून ग्रँटनें डायरेक्टर व महाराज यांच्यामधील सर्व पत्रव्यवहार मधल्यामध्यें दडपून टाकिला होता. इतकेंच काय पण महाराजांची चहा लोक तिकडे करतात व त्यांनीं महाराजांना तीन हजार पौंड किंमतीची एक रत्नजडित तलवार बक्षीस देण्याचें ठरविलें आहे, याचा

कांहीं एक सुगावा ग्रँटनें महाराजांस लागूं दिला नाहीं. म्हणून ही बिचारी दुर्दैवी समशेर पडदानशीनची पडदानशीनच राहिली. तिची व महाराजांची गांठ पडली नाहीं. असें तर झालें नसेल ना ? गोपाळ अष्ट्याच्या रणमैदानावर इंग्रजांना सामील होतांना फेंकून दिल्या गेलेल्या छत्रपतींच्या त्या अवमानित समशेरीनें महाराजांस शाप तर दिला नसेल ना ? ‘ प्रतापसिंहा, तूं क्षत्रियाचा बच्चा असून रणांगणावर तुझ्याच भाईबंदांच्या कत्तली होत असतां तूं माझा त्याग करून हंसतमुखानें शत्रूला जाऊन मिळाला आहेस. पण मी पुन्हां तुझ्या हातीं केव्हांही लागणार नाहीं व तुला जन्मभर पश्चात्ताप करीत मरावें लागेल. ’ एके वेळीं महाराष्ट्राचें मुख उज्ज्वल करणाऱ्या त्या भवानी समशेरीनें दिलेला हा शाप तर महाराजांस जाचक झाला नसेल ना ? काय झालें असेल तें असो. पण महाराजांची व ह्या समशेरीची गांठ शेवटपर्यंत पडली नाहीं ! प्रशंसापत्रें व खलितें हे तर जागच्या जागीं सडून गेलीं.

प्रतापसिंहाची दैनंदिनी : २३

अफझुलखानाचा कोथळा बाहेर काढला, शाहिस्त्याचीं बोटें छाटलीं, औरंगजेबाच्या हातावर तुरी दिली असे प्रतापशाली प्रसंग प्रतापसिंह महाराजांच्या दैनंदिनींत नाहींत ! छत्रपति शिवाजी महाराज आणि संभाजी या दोन पुरुषांनंतर स्वतः आगेजणीनें पराक्रम गाजविणें ही गोष्ट छत्रपतींच्या वंशांत संपली. मात्र राजाराम महाराजांनीं स्वतः जरी फारसा पराक्रम गाजविला नाहीं तरी आपल्या सरकारामार्फत व मुत्सद्यांच्या सल्ल्यानें पराक्रमाचीं सूत्रें चांगलींच हालविलीं. थोरल्या शाहू महाराजांनीं बादशाही ऐषआराम मराठेशाहींत आणिला आणि बैठ्या राजकारणास प्रारंभ झाला. येथपासून लढाऊ राजकाण संपुष्टांत आलें. थोरले शाहू महाराज एका दृष्टीनें फार भाग्यशाली होते. त्यांना पेशवे चांगले लाभले. त्यांनीं अवघ्या पांच पन्नास वर्षांच्या अमदानींत मराठ्यांचा जरीपटका तोफांचे नगारे घुमवीत घुमवीत अटकेपार नाचवीत नेला. असे भाग्यशाली प्रसंग प्रतापसिंहाच्या राजवटींत झाले नाहींत हें जरी खरें तरी पण त्याची कारकीर्द त्याच्या मानानें चांगली झाली. साहेबानें त्याला शिस्त लाविली आणि तो मार्ग त्यानें शेवटपर्यंत चोखाळला. ठाकठिकीनें राहाणें, जमाबंदीचें काम स्वतः पाहणें, न्यायनिवाडा स्वतः जातीनें देणें, आदा पाहून खर्च करणें, प्रजेच्या कल्याणाचीं कामें करणें, इत्यादि चांगल्या संवयी त्याच्या अंगवळणी पडल्याच होत्या. रोज कोण कोण आले,



कॅ. ग्रँट डफ

आपण कोणाला भेटलों व महत्त्वाचीं कृत्यें कोणकोणतीं झालीं याची टिपणी त्यानें आपल्या दैनंदिनींत केली आहे. हें काम छत्रपतींच्या या वंशजानें केलें हें ठीक आहे; पण यापेक्षां फार मोठ्या कामाची अपेक्षा आपला देश आणि समाज छत्रपतींपासून करतो. कानामागून आलेला हा साहेब कसा बळावला याची छाननी करून त्याला शह देण्याचा प्रयत्न करणें, गेलेलें वैभव पुरुषप्रयत्नांनीं पुन्हा मिळविणें या गोष्टींची अपेक्षा ह्या क्षात्रियकुलावतंस छत्रपतींच्या वंशजांकडून त्यांच्या प्रजाजनांनीं करणें हें स्वाभाविक होतें. पण ह्यांपैकीं त्यांनीं कांहींच केलें नाहीं. असले विचार त्यांच्या स्वप्नींसुद्धां आले नाहींत. 'मराठा तितुका मेळवावा' हा साधाच उपदेश त्यांनीं अंमलांत आणिला असता तरी सुद्धां चांगलें झालें असतें. पण याही बाबतींत प्रकार उलटाच झाला. हिंदुस्थानांतील अठरापगड जात एकमेकांशीं कळवंडत कशी राहील याची चिन्ता साहेबास फार आणि त्याच्या प्रोत्साहनानें प्रतापसिंहाच्या कारकीर्दींत ब्राह्मण-ब्राह्मणेतर, मराठा-मराठेतर वाद चांगलेच बळावले. आणि दुर्दैव असें कीं, त्यास छत्रपति कारण झाले. असो. साताऱ्यास ग्रँटडफ हा रेसिडेन्ट असतांना त्यानें प्रतापसिंहास ' नित्यावृत्त वहीवर लिहावें ' असें सांगून शिस्तवार आयुष्यक्रमाचें असें वळण लावलें. तेव्हांपासून प्रतापसिंह दैनंदिनी लिहूं लागला. अशा तऱ्हेनें प्रतापसिंहाच्या दैनंदिनीला सुरुवात झाली.

प्रतापसिंहाच्या दैनंदिनीचे एकंदर एकवीस भाग आहेत. प्रत्येक भागांत तीनशें पृष्ठें आहेत. रोजच्या सामान्य व्यवहाराची नोंद दरबारचा कारकून करी आणि नंतर महत्त्वाची नोंद स्वतः प्रतापसिंह आपल्या हातांनीं करीत असे. रेसिडेंट आणि गव्हर्नर यांच्याशीं झालेल्या मुलाखती आणि त्या वेळीं केली गेलेली निरनिराळ्या विषयांवरील चर्चा यांची नोंद या दैनंदिनींत प्रामुख्यानें आहे. त्यानंतर कोणी महत्त्वाचा मनुष्य आला व कांहीं वेगळें असें घडलें तर त्याची सुद्धां नोंद करण्यांत आली आहे. या दैनंदिनीस १०–१०–१८१८ रोजीं आलेल्या दसऱ्यापासून सुरुवात होते व ता. २७ सप्टेंबर १८३८ ला संपते. यानंतर बरोबर एक वर्षांनीं प्रतापसिंह गादीवरून खालीं आला. म्हणजे

प्रतापसिंहाची राजा म्हणून गाजलेली कारकीर्द या दैनंदिनींत पाहावयास मिळते.

पेशव्याकडील माणसांचा यत्किंचितही संपर्क प्रतापसिंहास पोचूं नये म्हणून ग्रँटडफनें फारच काळजी घेतली. सातारा शहराच्या कोतवालीवर एक माणसाची नेमणूक करावयाची होती. त्या जागेसाठीं रामसिंग नांवाच्या एका गृहस्थाचें नांव सुचविण्यांत आलें. त्याची लायकी विचारतांच, 'रामसिंग बोलला कीं, लहाणाचा थोर येथें जाहलों, पांच–सात वर्षें चाकरी गोखले याचे जवळ केली.' हें वाक्य ऐकतांच साहेबाचें पित्त खवळलें व 'ग्रांट बोलिले कीं ऐसी माणसें ठेवणें हें चांगलें नाहीं.' झालें, रामसिंग कोतवालीचे कामास नालायक ठरला !

ता. २२–९–१८१९ ला कंपनीसरकार व प्रतापसिंह यांचा परस्परांत तह होऊन त्यावर सह्या झाल्या. त्याचा उल्लेख फार बहारीचा आहे.

'तहावर आमचे हातचे रुजू व त्याप्रमाणें इंग्रजी लिपिची करार रुजू करून नंतर आमचा शिक्का विठोबानी केला. ग्रान्टाचे मोर्तब ग्रान्टानें लाखेचे तहावरचे कागदावर ठोकलें. नंतर ग्रान्ट बोलले कीं लाटाचा तह होऊन येईपर्यंत हाच तह.'

या नंतरचा दसऱ्याचा समारंभ फार थाटाचा झाला त्याचा उल्लेख पाहा.

'भोजने झालीं. यानंतर सीलंगणास स्वारी गेली. इंग्रजाकडील पलटणें पायदल याची फयर झाली. पहिले एकवीस बार तोफेचे व मागाहून एकवीस बार होऊन फयर झाली. नंतर स्वारी वाड्यांत आली. नंतर सर्वांचे नजर नजराणे झाले. सोने सांप्रदायाप्रमाणें देऊन नंतर अन्याबा चितले व तात्या अभ्यंकर व कृष्णराव यास साडेतीन सनगे देऊन ग्रांटाचे हवालीं रुप्याचीं दऊत व नवे मोर्तब देऊन नंतर रात्रौ भोजन जाहल्यावर उछाहानिमित्य ललित झाला.'

'पत्रांत येवनी शब्द लेहू नये महाराष्ट्र शब्द लिहिणे' असाही मराठी भाषेचा स्वाभिमान दर्शविणारा उल्लेख आहे.

ता. ६–३–१८१९ च्या सुमारास एल्फिन्स्टन साताऱ्यास येणार होता तेव्हां बाळाजीपंत नातू महाराजांचा दिवाण विठलपंत महाजनी यास बोलला कीं

" इलपिस्तन येणार त्या महाराजांचे राज्य महाराजांचे स्वाधेन केलें म्हणजे ठीक आहे. विठोबा बोलले की हें घडविणे तुम्हाकडे आहे. ' या वाक्यावरून बाळाजीपंत नातूचें प्रस्थ किती होतें हें लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं.

मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठीं कागदपत्र जमा करण्यास सुरुवात ग्रॅन्टडफनें केली, त्याची हकिगत फारच मनोरम आहे. भाषा परकीय व रीतिरिवाज अगदींच भिन्न, त्यामुळें ग्रॅन्टला त्यांची समजूत करून घेण्यास फारच त्रास झाला. पण हातीं सत्ता असल्याकारणानें तो या कामांत यशस्वी झाला.

या प्रकरणीं ग्रॅन्टनें बलवंत मल्हार चिटणीस यालाच वारंवार बोलावून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. सर्वसत्ताधारी असलेला साहेब आपले कागदपत्र मागतो, त्यांतून कांहीं बऱ्या-वाईट भानगडी निर्माण होण्याचा संभव म्हणून प्रतापसिंह महाराज व बलवंत मल्हार घाबरत होते आणि कागद व माहिती देण्यास खळखळ घालीत होते. तेव्हां बाळाजीपंत नातू त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होता. बाळाजीपंत, बलवंत मल्हार आणि प्रतापसिंह महाराज यांच्यामध्यें ऐतिहासिक कागदपत्रांसंबंधीं बोलणीं चाललीं होतीं त्याचा उल्लेख खालीलप्रमाणें आहे.

' चिटणीस यास पुसिले कीं तुमचे दफ्तरीं आणखी कांहीं (कागद) आहेत ? त्याजवरून बलवंतराव याणीं उत्तर केले कीं, जे होते ते पुण्यांत तुम्हास दाखविले. नकला तुम्ही करून घेतल्यात. हालींहि नकला दिल्या. बखर होती तीहि दिल्हीच आहे. यापरता साधनी आम्हाजवळ नाहीं. त्याजवरून त्याणीं उत्तर केले कीं, आणखी एखादे समईं निघालियास नीट नव्हे. यावर उत्तर केले कीं, नाहीच मग निघतो कशानी. नंतर बालाजीपंत महाराजास बोलले कीं, साहेब कागद पाहून छाप्यांत छापून विलायतेस जाईल. सर्वांस महाराजाचा पराक्रम राज्यें वगैरे जाहीर होईल. याकरिता करितात व ग्रान्टाचे लक्ष्य महाराजाचे ठिकाणीं फार. असा दुसरा साहेब कोणही नाहीं. वारंवार महाराजाची कालजी वाहणे व महाराजांचा बंदोबस्त चांगला व्हावा, आपणास यश यावें हेंच चित्तांत. याजवर महाराजांनी उत्तर केले कीं, कागदपत्रावरी व सनदेवर काये आहे ? आम्ही दोस्ती केली मेलविली त्या अर्थी जे देतील ते

आमचे, अधिक उणे कांहीं म्हणावयाचे नाहीं. तुम्ही हिंदू आहा पाहिजे ते करा. आमचे मनांत अधिक उणे वाटल्यास तुम्हापाशी बोलू. त्यापासी कांहीं बोलावयाचे नाहीं.'

ग्रॅन्टडफच्या या इतिहास-प्रकरणानें प्रतापसिंह बराच त्रस्त झालेला दिसतो. त्यानें बळवंत मल्हारला दिलेल्या सूचनांतून त्याची असाह्यता प्रतीत होते.

'नंतर महाराजांनी चिटणीस यास सांगितलें की जे पुसतील माहितगारी ते बखर दिल्ही या आधारावर धरून बोलावे. जे पूर्वीपासून माहीत आहे ते असे आहे. मग तुमचे लिहिले असेल ते खरें म्हणावे. आग्रह करूं नये. जबरदस्तापुढें आग्रह करून कामाचा नाहीं व आग्रह करून सिद्ध करून फल होते असे नाहीं. होणार ते होईल. व कागद आणखी आहे पुसतील तरी नाहीं म्हणावे. हे दोन जाबसालीने उत्तरे करावी. रिकामा विचार विवंचना घोर करून लभ्ये नाहीं. समयेपरत्वे होय म्हणत असावे.'

इंग्रज हा शास्त्राचा भोक्ता असल्यामुळें तो प्रत्येक गोष्टीच्या मुळाशीं जातो, तिला तर्काची आणि प्रमाणांची कसोटी लावतो. त्याबरोबर पुष्कळशा गोष्टी हिणकस ठरत. त्या संबंधींचा उल्लेख असा आहे कीं, 'नंतरी त्रितीय प्रहरीं कचेरी तावदानांत जाली. मंडली सर्व आली. नंतरी आबा पारसनीस ग्रांट याजकडून त्याणी वर्तमान सांगितलें कीं, जूनी बुकें नाना प्रकारची काढून वाचून दाखविली आणि बोलले जे, आम्हापासी लिहिले आहे यास व चिटणीस याणी बखर लिहून दिलही यास मिलत नाहीं. महाराजाची बढाई करून आहे. लटकें आहे.' तसेंच त्यास माहिती देण्याच्या बाबतींत आंगचुकारपणा होत होता. कागदपत्रांतून कांहीं लफडें उत्पन्न करून साहेब आपल्या उरावर बसेल कीं काय अशी धास्ती छत्रपतींच्या या मंडळीस एकसारखी वाटत असे. कागदपत्र ग्रॅन्टडफजवळ ठेवण्याच्या बाबतींत एकदां चांगलीच खडाजंगी झाली. 'नंतर ग्रान्टाने सांगितले कीं सारे कागद बस्ताच येथें ठेवणे नकला करून घेऊन पाहून नंतर घेऊन जावे. आबा पारसनीस याणीं दहावे घटकेस येत जावे आमचा मुनसी व ते यांणीं चवथे मजल्यावरी बसून जलद तयार करावे किती दिवसास तयार कराल पुसिले. पंधरा दिवस लागतील बोलले. बरे आहे. यावर

फडणिसानी आग्रह केला की, कागदपत्र येथे कशास ठेवावे. पारसनीस आपले घरीं बसून तयार करतील अथवा वाडीयांत करतील मुनसीस सांगावे. त्याजवरून रागास आला. इतका संशय कां ? पाहिजे तरी आम्ही इरबस्त्यावरी मोहर करू अथवा तुम्ही करा. इतके दिवस ठेऊन काये केले व पुढें काये करणार. आम्ही उतरून बुकात छापून विलायतेस पाठवू.' साहेब गरम झालेला पाहतांच कागदांचा बस्ता माघारीं नेण्याची छाती कोणाची होईना. तेव्हां बस्ता तेथेंच ठेवण्यांत आला. नंतर त्या प्रकरणीं कसें वागावें याचें हितगुज सुरू झालें. 'कागदपत्र सारे गुंतले. त्यांत इंग्रज प्रकरणीं राजकारणाचे पूर्वीचे कामदपत्र सारे, पेशव्याचे व इकडील उत्तराच्या नकला वगैरे, आणखी कित्येक कागदपत्र जुने हिंदवी सारे गुंतले. दृष्टि पडावयाचे व न पडावयाचे हे काढून आणावे. त्यास आबा पारसनीस लिहावयास जातात तेव्हा युक्त्या निघतील तितके काढून आणावे ऐसे ठरले.'

या इतिहास-प्रकरणीं सर्वच चर्चा फार मजेदार आहे, ती मुळांतून वाचावी. पण आणखी एक उतारा दिल्यावांचून राहवत नाहीं. बखरीसंबंधीं ग्रॅन्ट विचारतो, 'बखर केली परंतु सारी महाराजांची बढती चांगलीच लिहिले. येखादे वेळेस वाईट चालले आसते तरी लिहिले नाहीं. तेव्हां संशय येतो. सारेंच चांगलें आसतें असें नाहीं. त्याजवर चिटणिसांनीं उत्तर केले कीं, चांगले जाले ते चांगले लिहिले, वाईट जाले ते वाईट लिहिले आहे. संभाजी महाराजाची वर्तणूक चांगली जाली नाहीं. सर्व बुडविलें ते लिहिले आहे. सिवाजी महाराजाची चांगली जाली ती लिहिली आहे. नंतर ग्रँट डफनें महाराजास सांगितले कीं शिवाजीमहाराजांनीं तरवार केली बहुत थोर नांव जाले. आपण अकलेनी थोर नांव करावे. मेहनत फार फार करावी. राज्य आलेवरी होणार नाहीं. थोडे दिवस उरले. मेहनत फार फार करावी. फडणीस चिटणीस मर्जीजोग बोलतील. स्पष्ट बोलणार नाहींत. महाराजानी मनांत आणून वागावे.'

हा ग्रॅन्टडफचा उपदेश प्रतापसिंहास चांगलाच मानवला. 'शिवाजी महाराजानी तरवार केली बहुत थोर नांव झाले' त्याप्रमाणे प्रतापसिंहा तूं आपलें नांव थोर कर पण तरवार गाजवून नव्हे, तो खुळ्याचा मार्ग तूं स्वीकारू नकोस. महाराज, 'आपण अकलेनी थोर नांव करावें !' आणि

त्याकरितां ' आपण मेहनत फार फार करावी ! ' असें साहेब सांगतो. आणि हा त्याचा उपदेश प्रतापसिंह महाराज शेवटपर्यंत अक्षरशः चालवितात. सनदशीर मार्गाचा आद्य पुरस्कर्ता म्हणून प्रतापसिंह महाराजांचीं स्तुतिस्तोत्रें गाणारांनीं खुशाल गावींत पण शस्त्राचा कायदा पास झाल्यानंतर मुडदार हिंदु लोकांनीं अवलंबिलेला हा मार्ग प्रतापसिंहास चोखाळण्याचें कांहीं कारण नव्हतें. त्या ख्यातनाम कुतरओढीच्या सनदशीर मार्गाचें वर्णन त्याच्याच शब्दांत मोठें वाचण्यासारखें आहे. प्रथम 'रसिडेन्टापाशीं बोलूं, ऐकलें तरी ठीक. नाहीं तर गवरनरापाशी बोलू. त्याणी न ऐकल्यास लाटापाशीं बोलू. त्याणी न ऐकल्यास कोर्ट डरठकरजी याजपाशी बोलू. त्याणी न ऐकल्यास पादषा सरकारांत बोलू आणि समजूत देऊं ', सनदशीर मार्गाचे हें ' बोलूं बोलूं ' प्रकरण लाजिरवाणें आणि वीट आणणारें आहे. त्याचा अवलंब गेलीं सवाशें वर्षे चालू होता!

यानंतर एका प्रसंगीं स्वराज्य म्हणजे काय म्हणून विचारण्यांत आलें. तेव्हां ' दरोबस्त आपला अमल झाला त्याला स्वराज्ये म्हणतात— ' स्वराज्य गमावून बसलेल्या या हतभामी लोकांनीं स्वराज्याची व्याख्या मात्र बरोबर सांगितली !

साहेब फार हुशार, त्यानें मराठी राज्यांत वावरणाऱ्या मोठमोठ्या मंडळी-बद्दल स्वतःचें मत बरोबर तयार केलें होतें. महादजी शिंदे, नाना फडणीस वगैरे लोकांना इंग्रज पूर्णपणें ओळखून होता. ते असते तर मराठी राज्याचे हें अवदान मिळालें नसतें व पचलेंही नसतें हें त्यानें हेरलें होतें. महाराज म्हणतात, ' नाना फडणीस म्हादजी सिंद व निजाम अलीखान असे जरी शाहणे तालीवार आणिक फार होते तरी मुल्काचा बंदोबस्त हली कंपनी सरकारप्रमाणें नव्हता. ग्रान्ट बोले हें खरें परंतु ते शाहणेच होते.'

नाना फडणवीसासंबंधीं रेसिडेंट लॉडविक म्हणतो, 'नाना फडणीन्स फार हरामी होता. तो इंग्रजासी संबंध न ठेवण्याविषयीं फार हुशारीनें वागत असे, व तो म्हणत होता की, इंग्रजापाशी लेखांत वगैरे थोडेही गुंतुं नये. कारण त्यांची चाल, थोडेसे सांपडले म्हणजे दाबीत दाबीत व गुंतवीत गुंतवीत साऱ्यावर हात घालीतात. याजकरिता प्रथमच त्यांसी संसर्ग ठेऊं नये आसे म्हणत असे व आमची चालही याप्रोच खरी आहे.'

मराठमंडळांतील प्रमुख व्यक्तिसंबंधींचे हे उद्गार मार्मिक आहेत.

प्रतापसिंहाच्या मनाची ठेवण अमदीं सनातनी वृत्तीची होती. मल्हार रामरावाचा मुलगा वारला व त्याची सून सती गेली, त्या वेळीं सतीची चाल बंद करण्याविषयीं बोलणीं झालीं. तेव्हां ‘सतीच्या आशीर्वादाने माझें राज्य चांलेलें’ असें सांगून त्यानें सतीची चाल बंद करण्यास हरकत घेतली. बायका स्वयंस्फूर्तीनें सती जातात असें त्याचें म्हणणें होतें.

समाजकारण : २४

मराठी साम्राज्याच्या भव्य मंदिरास जातीयतेच्या वाद्रामुळें फार मोठा तडा गेला, आणि हें स्वातंत्र्यमंदिर पार कळसापासून पायापर्यंत तडकलें. त्यास वेळोवेळीं कोणत्याना कोणत्या भावनेच्या लिंपणानें लिंपण्याचें प्रयत्न करण्यांत आले. पण ते फोल ठरले. त्याला पडलेले चिरे आणि तडे कायमचेच राहिले. त्यांचा एकजीव झाला नाहीं. त्या भेगांत डोकावून पाहिलें असतां श्रीशिवाजी महाराजांपासून तों शेवटच्या प्रतापसिंहापर्यंत, इतकेंच काय आज वर्तमान-कालांतील चालू दिवसापर्यंत जातीयतेच्या वादाचा एकच कोलाहल ऐकूं येतो. तो ब्राह्मण, हा अब्राह्मण, तो क्षत्रीय हा अक्षत्रीय, त्याला वेदाधिकार आहे याला नाहीं. यानें पिंड असा ठेवावा व त्यानें तर्पण तसें करावें—वास्तविक या बाबींना इतकें महत्त्व देण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण तें आपल्या आड-मुठेपणामुळें आलें आणि राजकारणाबरोबर समाजकारण पळूं लागलें. त्याचे घातक परिणाम आपणांस भोगावे लागत आहेत.

या वादास सुरुवात झाली ती श्रीशिवाजी महाराजांच्या कारकीर्दींत. शके १५७० म्हणजे इ. स. १६४८च्या सुमारास. सुप्रसिद्ध बाळाजी आवजीस चिटणीशी मिळाली आणि शिवाजी महाराजांच्या कारकीर्दींच्या शेवटास मंत्रवत् उपनयनाचा आग्रह बाळाजी आवजीच्या पुढारीपणाखालीं प्रथम धरला गेला. त्यानें मंत्रवत् उपनयनासंबंधानें शिवाजी महाराजांकडे फिर्याद दाखल

केली. हें काम शिवाजीनें आपला पुत्र संभाजी याजकडे सोंपविलें. संभाजीनें चांद्रसेनीय कायस्थांना हा अधिकार नाहीं कारण ते क्षत्रिय नाहींत असा निकाल दिला. 'कायस्थ धर्मप्रदीप' लिहिणाऱ्या गागाभट्टानें शिष्टाचारानें अमंत्रक उपनयन चांद्रसेनियांना विहित आहे असा आपला अभिप्राय दिला आहे. कायस्थांच्या त्या मागणीला संभाजीने विरोध केला त्याचे घोर परिणाम त्यास व त्यांच्याबरोबर महाराष्ट्रास भोगावे लागले. सर्व कायस्थमंडळ संभाजीच्या विरुद्ध गेलें आणि शिवाजीच्या मृत्यूची बातमी संभाजीस वेळेवर कळली नाहीं. त्याबरोबर उग्र प्रकृति संभाजीचा संताप अनावर झाला आणि मुत्सद्दीमंडळा-विषयीं त्याच्या मनांत भलभलते संशय उत्पन्न झाले. त्याच्या कोपानलांत ब्राह्मण व कायस्थ स्त्रिया आणि पुरुष यांच्या आहुत्या पडल्या. आणि कलुशाखेरीज विश्वासपात्र असा माणूस मिळण्याची पंचाईत पडली. त्याचा परिणाम जसा व्हावयाचा तसाच झाला आणि शत्रूच्या हस्तें संभाजीची हत्त्या झाली.

यानंतरचा मोठा तंटा नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दींत झाला. त्याचा निकाल पेशव्यानें चांद्रसेनीयांविरुद्ध दिला. त्याचा घोर परिणाम त्यालाही भोगावा लागला. नारायणरावाचा खून झाला. यानंतर हा वाद पुन्हां जोरास लागला तो प्रतापसिंहाच्या कारकीर्दींत. आतां सर्वांचेंच भाग्य नाहींसें झालें होतें. स्वातंत्र्य नव्हतें, सत्ता नव्हती. साहेबानें टाकलेला तुकडा खावा आणि कुचाळक्या करीत काळ काढावा एवढाच उद्योग शिल्लक राहिला होता. तेव्हां साहजिकच मंस्ती आली. 'प्रधानजी! राज्याचा बंदोबस्त कसा काय आहे?' म्हणून राजानें विचारावें आणि 'सर्व कांहीं ठीक आहे, सरकार' म्हणून प्रधानजीनें उत्तर द्यावें. हें नाटक करण्यापुरती सत्ता व राज्य या लोकांच्या हातीं होतें. तेव्हां साहजिकच आपआपसांत भांडणें करण्याची दुर्बुद्धी त्यांस झाली.

साहेबाचें भाग्य फार थोर कीं तो भारताचा बादशहा झाला. कारण इंग्लंडचा राजा आणि हिंदुस्थानचा बादशहा ही त्याची बिरुदावली 'यावच्चंद्रदिवाकरौ' टिकविण्यास भारतासारखी दुसरी भूमि नव्हती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार जाति. या चार जातींच्या चौदा आणि चौदांच्या चौदाशें अशा असंख्य उपजातींनीं

तयार झालेला हा समाज म्हणजे साहेबास चरावयास मिळालेलें कुरणच. वर्णाश्रम धर्मसंस्थेच्या राखेखालीं झांकलेले हे निखारे ऐनप्रसंगीं आपल्या अक्कलहुषारीनें फुलवून हिंदुस्थानभर आगीचे लोळ उठविणें आणि त्यांवर आपली स्वार्थाची पोळी भाजून घेणें साहेबास फार सोपें झालें होतें. त्यांतून आम्हीं स्वातंत्र्यहीन झाल्यानंतर तर या जातीयवादास आणखीच तेज चढलें. अस्सल—कमअस्सल, उच्च, नीच, मराठा, कुणबी, रोटीबंद, बेटीबंद वगैरे तटबंदीचे वाद पूर्वी निर्माण होत होते; पण त्या वेळीं या वादांची कोंबडी झुंझविणारा तिऱ्हाइत नव्हता; आणि या वादापासून राजकीय फायदा—तोटा कोणी करून घेत नव्हता. पण प्रतापसिंहाच्या कारकीर्दींत हा वाद सुरू झाला. आणि त्या वेळेपासून स्वार्थाचा धूप टाकून हीं भुतें नाचविण्याचा आपला उद्योग साहेबानें अखंड चालविला होता. ‘ सातारकरांचें राज्य पेशव्यानें लाटलें ’ या महामंत्राचा उपयोग करून ‘ पेशव्यानें लाटलेलें ’ सातारकर छत्रपतींचें अधिराज्य इंग्रजानें उपटलें; आणि सातारकर महाराजांस नामधारी छत्रपति केलें ! आणि प्रसंगानुरूप बडबड मात्र अशी चालू ठेविली कीं, त्यामुळें जातिद्वेष निर्माण होईल !

‘ नंतर श्रेष्ठ ब्राह्मण मेळवून संभावनाप्र।। ब्राह्मणास रु।। १ प्रमाणें देऊन भोजन करून दोन प्रहरीं निद्रा केली. ’ वास्तविक त्या वेळच्या चालीरीति लक्षांत घेतां यांत वावग असें कांहींच नव्हतें. कांहीं सत्पात्र ब्राह्मणांना भोजन व दक्षणा दिली ही साधी गोष्ट पण त्याबद्दल ‘ बाळाजीपंत नातूस व विठोबास ग्रान्ट बोलिले कीं, महाराजापाशीं सारे ब्राह्मण मिळोन पैका ब्राह्मणास देवितात.’ साहेब असेच ब्रह्मद्वेषाचे गुटके महाराजांस अधून मधून देत असे. ‘ ता. ९–१२–१८२० ला विठोबाचें व ग्रान्टाचें बोलणें जाहलें. तीं कलमें तात्या अभ्यंकर व बलवंतराव चिटणीस, व कृष्णराव हे पयेका खातात व कोणाचें म्हाराजाचें म्हणजे काम चांगलें करावेसें नाहीं. पयेका मेलवावा. हे महाराजास ठाऊक आहे किंवा नाहीं ? विठोबा बोले कीं ठाऊक आहे. मग ग्रान्ट बोलले कीं ठाऊक असून महाराज कां चवकसी करून ठेऊ नयेत ? व माझे हुकूमनाम्यांत आहे कीं आसी माणसे महाराजांनीं ठेऊ नये याजकरितां बहुत चौकशी करीत नाहीं. मग ग्रान्ट बालले कीं विठ्ठलपंत तुम्ही

व महाराजाचें काम म्हाराजा करतील; परंतु मग कोणी नाहीं. कृष्णराव ठेवणे नाहीं परंतु हे पुण्याचे लोकास व चितपावनास दाबाकरितां ठेवणे ' बारनेठ बलवंतराव चिटणीस याचे देखत बोलिला की, तात्या अभ्यंकर यास राग भरला की, तुम्ही कृष्णराव आमची याचे तुम्ही सारी मंडली द्वेष करिता, परंतु हें ठीक नाहीं. आम्ही ग्रान्ट आला म्हणजे त्यास सांगू. मग तात्या अभ्यंकर बोलिला की मी चुकलों. नंतर येसोबास बोलावून सांगितले कीं आमची मंडली ग्रांटाचे वाड्यात गेली, परंतु चितपावन राग करून घालवावयाचे बघतात. येसोबा बोलला कीं हें खरे आहे. मग आम्ही बोललो की तुम्ही आमचे मंडलीस सुचवीत जावे व मलाहि सुचवावे. हे ग्रान्टासही सुचवावे.'

'भटजी करवीरकर हे कोकणस्ताचे नादाने फार वागतात व वागणूक एक प्रकारची सबब तिकडे पत्र वगैरे पाठविणे मार्ग नाहीं.'

येथवर दिलेल्या उताऱ्यावरून सातारदरबारीं कोकणस्थांविषयीं कोणत्या प्रकारचा धाक आणि मत्सर धुमसत होता याची चांगलीच कल्पना येते.

महाराष्ट्रांत माजलेल्या जातिद्वेषाचा उगम हा असा आहे. ब्रह्मणावर इतर जाती उठवून त्याला नेस्तनाबूद करण्याचे साहेबाचे प्रयत्न चालू होते. पण त्याबरोबरच आपल्या राज्याची घडी नीट बसविण्यासाठीं म्हणून साहेबास ब्राह्मण पाहिजेही होता. तेव्हां हा बुद्धिजीवी वर्ग हतबल होऊन वैतागून राजकारणाच्या उलाढालीपासून परावृत्त व्हावा व त्यानें आपली नोकरी इमानें-इतबारें करून आपल्या राज्यास स्थैर्य आणावें म्हणून त्याला सरकारी नोकरीचें व मानमान्यतेचें आमिषही दाखविण्यांत येत होतें.

अदालतीचे, जमाबंदीचे, न्यायनिवाड्याचे तसेंच जमीन-महसुलाचे कामासाठीं काम करणाऱ्या लोकांची अडचण पडूं लागली तेव्हां या कामासाठीं कारकून लोक तयार करण्याची एक शाळा काढण्याचें जाहीर झालें. ही शाळा मुंबईस निघणार होती. तेव्हां तेथें शिकण्यासाठीं राहणाऱ्या मुलाची व्यवस्था कशी राहील याचा खुलासा करणाऱ्या पत्रकांतील शेवटचीं दोन कलमें येणेंप्रमाणें होतीं

(३) मुंबईत हरएक असामीचे पोटाचे बेगमीस दर महिना आठ रुपये सरकार खर्च करतील.

(४) मुंबईस जाणार मुलाचे वडिलास हेच खातरजमा आहे की मुलास मुंबईस पाठवणें कडून कांहीं भय नाहीं. सरकार कृपाळु होऊन त्याचे चालचलण चांगली असावयाकरिता, सरकारांतून एक उत्तम जागा राहण्यास योजना केली आहे तेथें कांहीं एक उपद्रव होणार नाहीं व ज्या जातीचे असतील त्यास त्या त्या जातीचे नोकरही ठेऊन देतील. याखेरीज ब्राह्मण वगैरे सदरी हरएक जातीस त्या त्या जातीचे रिवाजाप्रमाणें कपतान जेवरीसाहेब बंदोबस्त राखतील.'

साहेबानें हिंदु लोकांच्या स्वभावाचा फारच सखोल अभ्यास, अध्ययन आणि चिंतन केलें आहे. कोठें बोट ठेविलें असतां तो चिडतो आणि कोठें गोंजारलें असतां तो नेसतेंही सोडून देतो याचा त्यानें बरोबर अभ्यास केला आहे. आम्ही 'धर्ममार्तंड' कोणी धार्मिक बाबतींत ढवळाढवळ केली कीं, डोक्यांत राख घालतों, चिडतों हें त्यास माहीत असल्याकारणानें त्यानें आम्हांस धर्मस्वातंत्र्य दिलें. जो ज्या जातीचा असेल त्यास त्याच्या जातिधर्माप्रमाणे वागतां यईल अशी सर्व तरतूज साहेबानें केली होती.

साहेबाची नोकरी करावयाची नाहीं असा हेका चितपावनांनीं बरींच वष चालविला होता. यासंबंधीं रत्नागिरीकडील डनलॉपनें १८२४ च्या आगस्ट १५ तारखेस केलेल्या रिपोर्टांत असें म्हटलें आहे.

For some years after the transfer of Ratnagiri to the British the Chitpavans were a discontented class. Though every effort was made to give them places, many of the best families from a feeling which deserved respect, refused to take service under the British.

रत्नागिरी जिल्हा ब्रिटिशांनीं आपल्या राज्यांत सामील केला तेव्हां चितपावनांना फार वाईट वाटलें. ' इंग्रजी झाली ' ही गोष्ट त्यांच्या अंतःकरणाला झोंबली. त्यांनीं नोकऱ्या कराव्या म्हणून इंग्रजांनीं जंग जंग पछाडलें; पण कांहीं कांहीं पिळाच्या घराण्यांनीं साहेबाची नोकरी न करण्याचा आपला कृतनिश्चय

अटीतटीनें चालविला. हा त्यांचा बाणा तीस चाळीस वर्षांपेक्षां जास्त दिवस टिकला नाहीं, हा भाग निराळा. पण त्याचा हा अंतर्यामींचा पीळ अभिनंदनीय नाहीं असें कोण म्हणेल ?

यावनी सत्ता आल्यापासून ब्राह्मण व क्षात्रिय या दोघांनीही आपला पवित्रा बदलला होता. 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा—' म्हणून ब्राह्मण पंडितांनीं दाढीवाल्या मोगल बादशहाची स्तुती करण्यास प्रारंभ केला; तर रानावनांत कंदमुळें खाऊन कालक्रमणा करीत, जीभ हासडून प्राण देण्याचा प्रसंग आला तरी बेहत्तर पण यवनापुढें मान वांकविणार म्हणून नाहीं असें म्हणून आपल्या अमाप वैभवाचें आणि अमोल पंचप्राणाचें घोर बलिदान करणाऱ्या राणा प्रतापाच्या वंशजांनीं—रजपुतांनीं आपल्या मुलीबाळी मुसलमानांच्या जनानखान्यांत आपण होऊन आपल्या हातांनीं घालण्यास सुरुवात केली. अशी एकंदर नादान परिस्थिती भोंवताली पिंगा घालीत असतां केवळ मूठभर मावळ्यांच्या जिवावर 'दिल्लीश्वरा'शीं खडा सामना देणारा शिवाजी हा एकटाच वीर छत्रपति झाला, खराखुरा क्षात्रिय झाला; इतकेंच काय पण तो क्षात्रिय कुलावतंसही ठरला. अवघ्या दोनशें वर्षांपूर्वी स्वतः-च्याच वंशांतील एका असामान्य व्यक्तीनें गाजविलेल्या ह्या पुण्यप्रतापाचें अपूर्व तेज डोळ्यासमोर झळकत असतांना प्रतापसिंह महाराजांना आपल्या क्षात्रियत्वाला उजळा देण्याचें कारणच नव्हतें; पण मिळालेल्या रिकामपणाचा त्यांनीं दुरुपयोग केला. उदेपूरच्या राण्यानें क्षात्रियत्वाची स्फूर्ति छत्रपतिपासून घ्यावी असा शिरस्ता छत्रपति शिवाजी महाराजांनीं निर्माण केला पण तसा राबता त्यांच्या वंशजांनीं पुढें चालू ठेविला नाहीं. त्यामुळें पराक्रमशून्य प्रतापसिंह महाराजांस आपलें क्षात्रियत्व सिद्ध करून घेण्यासाठीं चितोडच्या राण्याकडे धांव घ्यावी लागली. तेही तसलेच नादान ! त्यांनीं ह्यांच्या म्हणण्याची री ओढली व आपल्या दप्तरीं दाखल असलेला छत्रपतींचा वंशवृक्ष घेऊन दीपविजय कविराज नांवाचा माणूस रवाना केला. त्याचा उल्लेख—

' अर्जी दते दीपविजय कविराज विनंती ऐसी की हे वंशावली घेऊन छत्रपति राजे याजकडे साताऱ्यास जातो, त्यास साहेबानी कृ (पा) ळू गिराड साहेबास चकती करून द्यावी की राजे यांची भेट करून द्यावी आणि माझी बरदास्त होईल, चकती द्यावयासी आज्ञा व्हावी हे विनंती.

श्री

साहेब आलीशा गौरनर साहेब बहादूर.

यासी उदेपूरकर कुळगुरू उपाध्ये दीपविजये कविराज दुवा सलाम आंकी दरीविला, उदेपुराहून साहेबाची कीर्त आइकून आलो. दरशण घ्यावे ही इच्छा फार आहे. हुकूम होईल त्या वेळेस हाजर होईन, श्रीमनमहाराजछत्रपति याची वंशावळ आहे. भेटी अंती विदित होईल. हे दुवा. मिती आस्विन वा॥ ५ रविवार. ता. ३-१०-१८२२.'

यानंतर आणखी आठ वर्षांनीं म्हणजे १८३० मध्यें हाच दीपविजय पुन्हा इकडे आला त्या वेळेला त्यानें छत्रपतीची वंशावळ आणिली आणि छत्रपतींचे वंशज प्रथम दक्षिणेस केव्हां गेले ती माहिती सांगितली.

' अर्जदास्त ते दीपविज्य कविराज, विनंती ऐसी जे चितोड उदेपूरचे सिशोदे राणे व शाहू छत्रपति भोसले सिशोदे राजे यांचा कुलगुरु वंशावल्या आहों. याचे वडीलराजे चितोड उदेपुराहून निघोन शके ११२६ चे सालीं दक्षण देसी आले, तो वडीलराजे पूर्वीपासून यांची आदि उत्पात्ति वंशावली घेऊन उदेपुराहून आलो आहो. ती साहेबास दाखवावयास मानस आहे; त्यास आज्ञा असावी हे विनंती. '

सिशोदे वंशांतील आपली शाखा आहे असे सिध्द झाल्यानंतर ' ज्ञाती-प्रकर्णीं शास्त्रार्थाचा मार ' काय आहे त्याचा शोध घेण्यासाठीं सिवानंदशास्त्रीस प्रतापसिंहांनीं धाडिलें होतें. तो माहिती घेऊन माघारी येतो त्यासंबंधीं आभार-प्रदर्शक पत्र छत्रपति लिहितात, त्यांत ' उदेपूरचे रजपुतांशी शरीरसंबंध व्हावा.' इकडील मुली तिकडे व तिकडील मुली इकडे देण्याविषयीं प्रतापसिंह छत्रपति म्हणतात, ' शरीरसंबंधाविसी माराचे सहजी भाव शास्त्रीबावापासी बोलण्यांत आला कीं, इकडील शरीर समधीयास कन्या द्यावी व करावी त्यास वाडिलांचे आज्ञेबाहेर काये आहे ! इकडील मंडळीची तिकडे व तिकडील इकडे व्हावे हे मनोदय इकडीलहि आहे. अज्ञा जाली ती नीटच जाली. या देशचे ब्राह्मणाचा द्वेश कर्माविसी आहे. ते नीट करून लिहून कळविता येईल. नंतर तिकडून ति॥येईल तसे करतां येईल. उदेपूरचे विश्वासू ब्राह्मण आश्रित असतील. त्याप्रा

वैदिक कर्म चालवावयाजोगे व मंत्रशास्त्री अनुष्ठानी व जोतिसी मुहूर्त वगैरे सांगणार यैसे इकडून लिहिले. येताच रवाना होय असे जाले पाहिजे.'

यानंतर छत्रपतींनीं राण्याशीं शरीरसंबंध करण्याचें ठरविलें. त्यासाठीं शिवानंदशास्त्र्याबरोबर पत्रें धाडिलीं होतीं. तो वराचा शोध घेऊन आला त्याचा उल्लेख असा:—

' शिवानंदशास्त्री यास पत्रे देऊन पाठविले होते. त्यांची उत्तरे व ब्राम्हण मंडळीची पत्रें घेऊन आले. त्याच्या नकला रसिदंट सोकडे दिल्या व राणाजीच्या तजविरा आणिल्या आहेत त्या दाखविल्या आहेत.

मुलीस नवरे पहावयासी शास्त्री यास सांगितले. त्याणी राणाजीचे भाचे १ व कन्येचे पुत्र १ व येक शरीरसंबंधी येकून तीन नवरे पाहून पत्रिका आणिल्या पौ येकाचे वये लहान व येकाचे पत्रिकेस बनत नाहीं. येक कन्येचा पुत्र आहे त्याची पत्रिका मिळते.

राणाजीच्या नातवास आपली मुलगी देण्याचा घाट प्रतापसिंहानें घातला होता पण तो सिद्धीस गेला नाहीं. उदेपूरच्या राणाजीशीं शरीरसंबंध जोडण्याचा प्रयत्न केल्याबद्दल फारसें वाईट वाटत नाहीं तरीपण आपल्या क्षात्रतेजानें अखिल भारतास दिपविणाऱ्या श्रीशिवाजी महाराजांच्या वंशजानें आपण पहिल्या वर्गाचे बावनकशी क्षत्रिय आहोंत हें सिद्ध करण्याकरितां रजपुतांच्या कपाळाशीं कपाळ घासण्यास सिद्ध व्हावें हें कमीपणाचेंच. सूर्यानें चंद्रापासून तेजाची अपेक्षा करावी तशांतलाच प्रकार ! पण प्रतापसिंहांनीं आपलें क्षत्रियत्वाचें घोडें याच्याहीपेक्षां पुढें दामटलें.

भाऊबंदकी हा आम्हां महाराष्ट्रीयांचा विशेष आहे. आम्ही तिऱ्हाइताच्या गळ्यांत गळे घालूं पण स्वतःचा भाऊ म्हटला कीं त्याचा गळा उतरण्यास कमी करणार नाहीं. या आमच्या स्वभावाप्रमाणें करवीरकर आणि सातारकर या दोन घराण्यांत वैरभाव कायमचाच नांदत होता.

हा वैराग्नि एकसारखा पेटता राहावा म्हणून तो फुलविण्यासाठीं साहेब मोठ्या शिताफीने फुंकर घालीत होता. प्रतापसिंहाच्या मुलीचें लग्न ठरलें व त्याच्या लग्नचिठ्या रवाना करण्याचें काम सुरू झालें. सातारकर छत्रपतींना

साहेबानें सार्वभौमत्वाचे हक्क दिले होते. त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर संस्थानांशीं कांहींही व्यवहार करावयाचा झाला तर तो रेसिडेन्टामार्फत करावयाचा असें कलम असल्या कारणानें या सार्वभौमाच्या लग्नचिठ्या रेसिडेन्टामार्फत रवाना झाल्या. त्यांत त्यानें मखलाशी केली ती बघण्यासारखी आहे.

'लग्नपत्रे डाकेवरून पोहचती करावयाकरिता रसिदंटाकडे उदेपूर व चंदावर व करवीर ही तीन पाठविलीं. त्याज पो। दोन थैल्या इकडून निरोपा प्रो रवाना केल्या. करवीर करा विसी किचे हाते सांगून पाठविले की करवीरकरानी इंग्रजीत लिहिले होते की सातारकर आमचे आप्त नव्हेत. आसें ते लबाड मनष. त्यास कदापि लग्नचिठी महाराजांनीं पाठवू नये असें आमच्या मनास येते. नंतर सरकार मर्जी आसे सांगून पाठविले ॥ १ ॥ ठीक म्हणून सांगितलें व करवीरास पत्र लि॥ होते ती थैली परत घेऊन ठेविली. या प्रो केले."

महाराजांकडून आलेल्या तीन थैल्या तीन ठिकाणीं धाडावयाच्या व मोकळे व्हावयाचें. पण साहेब असें करील तर त्यांत नवल तें कसलें? साहेबानें त्या निमित्तानें करवीरकरासंबंधीं खुसपट निर्माण केलेंच. त्याला करवीरकरांनीं सातारकरांची इंग्रजींत केलेली नालस्ति आठविली. त्यानें त्याची लग्नचिठी मना करण्याचें महत् कृत्य सातारकराकडून करविलें. वास्तविक करवीरकर सातारकराविषयीं कांहींहि बोलले असले तरी मामुली लग्नपत्रिका धाडण्यांत कांहींच बिघडत नव्हतें. पण मग तो साहेब कसला!

'करवीर, नागपूर, हे आपले घराण्यातील, यास पोशाक पा। की काये? भटजी बोलले, करवीरकर हे कोकणस्ताचे नादाने फार वागतात व वागणूक येक प्रकारची, सबब तिकडे पत्र पाठविण वगैरे मार्ग नाहीं. त्यावर बोलले की चालच तशी बेदाच जाला आहे. कोणी येथें आकलकोटाची गोष्ट काढली खासे बोलले ते आपले मंडळीतील नव्हेत. प्रीतभाव व करवीर नीट चाल नाहीं. सबब न पाठविला.' (पान ८८)

अक्कलकोटकर, करवीरकर हे आपले मंडळींतील नव्हेत असें म्हणण्यापर्यंत सातारकर छत्रपतींची मजल गेली व ते त्याप्रमाणें वागलेही. यावरून क्षात्रियत्वाची कल्पना कोणत्या विपरीत सीमेपर्यंत पोंचली होती याची चांगली कल्पना येते.

क्षत्रियत्वाची बढाई मारणाऱ्या लोकांची सातार-दरबारीं चहा होत असे. त्यांस मानाचा मंदिल आणि कांहीं संभावनाही पण मिळत असे.

एक कच्छवा ' जमादार हुजूर दर्शनास आला होता, ××× तो क्षत्रियजातिचा कछवा आहे, त्याणें विनंती केली की आमचे घराण्यापैकी कोणी पुरुष चाकरी करितो कोठेहि गेला तरी सातारा महाराज किंवा उदेपूर राणाजी किंवा कछवा राजा या तिहिखेरीज कोठेच मुजरा जमीनीस हात लावून करावयाचा नाहीं. असा शिरस्ता आहे, व घाराण्यांतील हुकुमही आहे. मी गायकवाडापासी चाकरीस आहे. परंतु ते कुणबी लोक सबब रामराम मात्र करितो, मुजरा करीत नाहीं. आम्हास या लोकानी लाखो रुपये दिल्हे तरी यांची सोयरीक करणार नाहीं. व याणी आम्हा लोकांची मुलगी मागितली असता तरवारिसी प्रसंग पडेल. ×××× सरकारची व आमची ज्ञात येकच आहे. नंतर त्यास विडे दिल्हे, व आपले ज्ञातीचा सबब त्यास ××× सेला पागोटी पंचवीस रुपये प्रमाणे दिल्हे.'

जगाचा आपल्याला विटाळ होऊं नये म्हणून आकाशांत वाळवलेलें सोवळें नेसून पळीनें पावलोपावलीं पाणी शिंपडीत व टुणटुण उड्या मारीत जाणाऱ्या कट्टर शास्त्र्याला लाजवील इतकें प्रतापसिंहाचें सोवळें ज्ञातिप्रेम उचंबळून आलें होतें. गायकवाड व शिंदे या ' ज्ञाती ' च्या भानगडींत बरीच ढवळाढवळ करितांना दिसतात. ' गायकवाड हा कुणबी असून मराठी ज्ञातींतील कांहीं लोकांस पैक्याची लालूच दाखवून फसवून नेहले आणि बाटविणार याजकरितां येथें अवघी मराठमंडळी जमा करून त्यांजप्रमाणें चिमणापा सिर्के कुटरेकर हली गायकवाडचे प्रकर्णास मूल; सबब त्यास सांगितले तुम्ही ज्ञातींत नाहीं. आज साताऱ्या बाहेर जावे. या प्रो सांगून ज्ञातींतून काढून लाविले. आपाजीराव मोहिते याचे चिरंजीव गेले; सबब त्यास ज्ञातिबाहेर म्हणून सांगितलें. × × त्यास सरकारांतून नेमणूक दरसाल २०० रुपये होते ते मना केले. रावजी सिर्के डेरवणकर गेले +++ त्यास सरकारांतून नेमणूक रुपये होते ते मना केले. रावजी मोहिते याचे बंधु गेले +++ त्याची आसामी स्वारांत होती ती

मना केली रुपये ३००. बाबाजी सुर्वे यांस तुरपाचे पागेंत आ। १९२ रुपये सिधासुधा मना केले.'

पैशाच्या मोहाला बळी पडून इतर जातींशीं सोयरिका करणाऱ्या अनेक लोकांच्या असाम्या व तनखे खालसा करण्यांत आले आणि छत्रपतींनीं खड- सावून ' बाकी सारे महाडिक सिरके भो। वगैरे मंडळीस सांगितलें कीं आम्हापाशीं रोजगार मिळावयाचा नाहीं. भीक मागून ज्यास आपली ज्ञात संभाळणे असेल त्यानें साफ बोलावे. ज्यास जाणें असेल त्याणें आज जावे. आटकाव नाहीं.' (पान ६७) ज्ञाति-प्रकरणांत प्रतापसिंह महाराजांनीं बरेंच कडक धोरण पाळिलें होतें. या अव्वल दर्जाच्या सनातनी मराठ्यानें पंचकुळी मराठ्याचा एक ठराव पास केला होता. यांत भोसले, मोहिते, महाडिक, शिर्के, व गुजर ह्या पंचकुळी येतात. शहाजी भोसले यांची आई दीपाबाई ही (फलटण) निंबाळकर घराण्यांतील व थोरले शिवाजी महाराज यांची आई जिजाबाई ही जाधव घराण्यांतील होती. पण भोसल्यांनीं जाधव आणि निंबाळकर या दोन कुळी वगळलेल्या आहेत हें केवढें आश्चर्य!

बाटलेल्या बजाजी निंबाळकराला शुद्ध करून घेऊन त्याला आपला जांवई करणारा उदारात्मा आद्य छत्रपति कोठें व ज्ञातीचें वर्तुळ आकुंचित करण्यांतच क्षात्रियत्व सांठविलें आहे असें मानणारा सनातनी वृत्तीचा छत्रपति प्रतापसिंह कोठें !

प्रतापसिंहाच्या राजवटींत सामाजिक वादांचे भोंवरे कसकसे फिरत होते, त्यांचा वेग दिवसेंदिवस कसा प्राणघातक होत होता याचा प्रत्यय येथवर दिलेल्या हकीगतीवरून सहज येण्यासारखा आहे. आतां समाजांत दोन तट निर्माण झाले. एक ब्राह्मणांचा व एक क्षात्रियांचा. ब्राह्मणांचे पुढारी बाळाजीपंत नातू, संकेश्वर मठाचे शंकराचार्य आणि सांगलीचे चिन्तामणराव पटवर्धन हे होते, तर क्षात्रियांचें पुढारीपण प्रतापसिंह, बळवंतराव सेनापति, बळवंतराव चिटणीस, रंगो बापुजी यांच्याकडे आलें. आतां प्रत्येकास बापजाद्यांच्या नांवा- वर मिळणारा मोठेपणा पाहिजे. तिकडे ब्राह्मणांनीं पळीपंचपात्रीच्या व दर्भाच्या जोरावर लुडबुड करून मोठेपणा मिळविण्याचा सपाटा चालविला तर या

क्षत्रियांनीं जातकुळीचा तलास लावून वेदोक्त प्रकरणीं क्षात्रतेज चमकविण्याची महत्त्वाकांक्षा धरली. अशा तऱ्हेनें एकमेकांचे गळे साफ उतरविणारा हा तिरपा तिडा जोरांत खेंचला जाऊं लागला. आणि दोघांचीं गांठोडीं बुडाखालीं घालून बसणाऱ्या साहेबानें त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केलें.

प्रतापसिंहानें उदेपुराच्या पुरातन क्षत्रिय घराण्यांतून भोंसल्यांची शाखा निर्माण झाली आहे हें सिद्ध केलें. आणि रजपुतांच्या मुली मराठ्यांस व मराठ्यांच्या मुली रजपुतांस देण्याचा घाट घातला. त्यानें स्वतःच्या नांवा-मागें या शहाणपणाचें द्योतक म्हणून एक शेपूट जोडलें आणि स्वतः ' शिसोदे राजे भोंसले ' असें नांव धारण केलें. या त्याच्या कडक जातिनिष्ठ वागणुकीनें पुष्कळसे दुय्यम गणले जाणारे मराठे नाखुष झाले. राजेसाहेबांनीं असा पराक्रम गाजविल्यावर प्रधानजींनाही स्फूर्ति झाली. बलवंत मल्हार व मल्हार रामराव या पितापुत्रांना प्रभूंच्या क्षत्रियत्वाचा अभिमान उत्पन्न झाला. आणि ज्ञाति-प्रकरणीं झालेले अन्याय दूर करण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला. प्रताप-सिंहानें प्रभूंवरील ब्राह्मणांनीं लादलेले आचरणाचे निर्बंध काढले. त्याबरोबर ब्राह्मणमंडळींत मोठी धांदल उडाली. महाराष्ट्रांत ब्राह्मणांचीं मुख्य केंद्रें वाई व पुणें. या ठिकाणीं ब्राह्मणांनीं ' धर्म बुडाला ' ' धर्म बुडाला ' म्हणून मोठा कोलाहल केला. त्याबरोबर चिन्तामणराव पटवर्धन, बाळाजीपंत नातू व संकेश्वर मठाचे शंकराचार्य यांनीं कंबरा बांधल्या आणि ब्राह्मणांच्या तर्फें शंकराचार्यांनीं आज्ञापत्र काढिलें कीं—'कलींत क्षत्रिय नाहींत. शिवाजी महाराज क्षत्रिय नव्हते. प्रतापसिंह महाराजांनीं ' क्षत्रियकुलवतंस ' हें पद धारण करूं नये. आपल्या वाड्यांत वेदोक्त विधीनें कर्में करूं नयेत. ' शंकराचार्यांच्या या तडाकेबंद आज्ञापत्रानें सनदशीर चळवळीचा भोक्ता प्रतापसिंह घाबरला. त्यानें आपली सनदशीर चळवळ सुरू केली व या वेदोक्त प्रकरणाचा निकाल लावण्या-साठीं रेसिडेन्टाच्या परवानगीनें म्हैसूर, धार, उदेपूर, तंजावर, नागपूर वगैरे ठिकाणीं क्षत्रियांस वेदोक्ताचा अधिकार आहे कीं नाहीं याचा शोध घेण्यासाठीं मुद्दाम माणसें पाठविलीं. या प्रश्नाचा शास्त्रीय निर्णय लावण्यासाठीं पंडितांची एक मोठी सभा बोलाविली. या वादविवादप्रसंगीं क्षत्रियांचा पुढारी विठ्ठल सखाराम

ऊर्फ आबा पारसनीस हा होता व ब्राह्मणांचा पुढारी राघवाचार्य गजेंद्रगडकर हा होता. ही सभा चांगलीच गाजली व सभेचा निर्णय क्षात्रियांच्या बाजूचा झाला.

एकदां सभेनें निर्णय दिल्यानंतर तो सर्वांनीं मान्य करावयास पाहिजे होता. पण तसें झालें नाहीं. त्याचें कारण शासनसंस्था भिकार होती. छत्रपति कायदा करून ब्राह्मणास धारेवर धरता तर साहेबानें हात घालून छत्रपतीस समज दिली असती. कारण छत्रपति शाब्दिक सम्राट होते. हातांत सत्ता नव्हती. मनगटांत जोर नव्हता. तेव्हां सभेनें दिलेला निर्णय ब्राह्मणांनीं धाब्यावर बसविला. ते छत्रपतींच्या वाड्यांत वेदोक्त कर्म करीनात. अशा तऱ्हेनें हें प्रकरण चिरडीस लागलें. छत्रपतीही हट्टाला पेटले. त्यांनीं बलवंत मल्हार चिटणीसास आपल्या घरीं यज्ञ करण्यास सांगितलें. हा यज्ञ ब्राह्मणांनीं वेदोक्त पद्धतीनें केलाच पाहिजे असा हुकूम काढिला. ब्राह्मणांनीं हट्टानें या समारंभांत भाग घेतला नाहीं. त्याबरोबर महाराजही चिडले. त्यांनीं ब्राह्मणांस या अपराधाबद्दल कैदखाना दाखविला.

सर्व हिंदुस्थानभर सत्ता गाजविणारा क्षात्रियकुलवतंस छत्रपति प्रतापसिंह असता तर ब्राह्मणांचें पाठाड त्यानें मोकळें केलें असतें व हा वाद मिटविला असता. हें जसें खरें तसेंच इतक्या अलौकिक वैभवाचा तेजस्वी छत्रपति असता तर ब्राह्मणांनींही पण असला हट्ट केला नसता. या सर्व गोष्टींचा ठणठणाट असल्याकारणानें फक्त बेदिली मात्र माजली!

मेलेलें हें मढें उकरून काढून वितंडवाद घालण्याची जरुरी नव्हती. स्वातंत्र्य गमावून बसलेल्या नादान माणसांना कशाचा धर्म आणि कशाची जात! जगांत मनुष्य म्हणून जमण्याची ज्यांची लायकी नाहीं त्यांनीं धर्माधर्माची आणि जातगोताची चांभारचौकशी कशास करावी हेंच कळत नाहीं. पण म्हणतात ना कीं बुडत्याचा पाय खोलींत, तद्वत आतां मराठ्यांची स्थिती झाली होती. त्यांतून हातीं सत्ता नसल्यावर तिस्मारखानी वृत्ती चालत नाहीं. साहेबापुढें नांगी टाकणाऱ्या प्रतापसिंह महाराजांनीं आपलें सनदशीर मार्गाचें व सामोपचाराचें धोरण या बाबतींतही ठेविलें असतें तर फार चांगलें झालें असतें. पण त्यांनीं ब्राह्मणांवरही शिस्त धरली; त्यामुळें तो वर्ग चेवला, आणि त्यांनीं हें प्रकरण धसास लावण्याचें ठरविलें. या प्रकरणीं त्यांना योग्य असा पुढारी मिळाला. मराठ्यांचें राज्य

इंग्रजाचे घशांत नेऊन घालणाऱ्या बाळाजीपंत नातूसारख्या देशद्रोही गृहस्थानें ब्राह्मणांचें नेतृत्व पत्करलें. बाळाजीपंत नातूसही या वेळीं ब्राह्मण्याचा पुळका आला. त्यानें या वादांत प्रमुखपणें भाग घेतला. आर्यधर्माची विजयपताका अखिल विश्वावर फडकविण्यासाठीं संचार करणाऱ्या आद्य शंकराचार्यांच्या पायपोसाची सुद्धां ज्यांना सर येणार नाहीं असले शंकराचार्य त्या वेळीं होते त्यापैकींच संकेश्वराच्या शंकराचार्यांनीं बाळाजीपंत नातूंची साथ केली. त्याचें कारण सातारकर छत्रपतींच्या राज्यांत शंकराचार्यांची पाद्यपूजा व महापूजा नीटपणें वसूल होत नव्हती. पाद्यपूजेचा भूर्दंड सक्तीनें शंकराचार्यांनीं रयतेपासून घेऊं नये असा हुकूम सातारकरांनीं काढिला होता. तसेंच एकदां शंकराचार्य माहुलीस आले असतां छत्रपतीनें त्यांना वाजत गाजत मोठ्या सन्मानानें साताऱ्यास न्यावें व त्यांची पाद्यपूजा करावी अशी इच्छा त्यांनीं प्रगट केली असतां प्रतापसिंहानें त्याला मान्यता दिली नव्हती. त्यामुळें भस्माच्या राखुंडीखालीं हा निखारा रखरखत होता. या वेळीं शंकराचार्यांनीं हें सर्व भांडण विसरून आपल्या स्थितप्रज्ञतेचा उपयोग करून हा वाद मिटवावयास पाहिजे होता; पण त्यांनीं तसें न करतां आज्ञापत्रकें काढिलीं. ब्राह्मणवर्गाचे तिसरे पुढारी म्हणजे सांगलीचे अप्पासाहेब पटवर्धन. त्या वेळच्या संस्थानिकांत आप्पासाहेब पटवर्धन म्हणजे फार मोठें प्रस्थ. एवंगुणविशेष पुढाऱ्यांनीं ब्राह्मणांचा पक्ष धरला होता.

दोन्हीही पक्षांनीं समंजसपणा धारण करून हा घरांतील वाद घरांतच मिटवावयास पाहिजे होता. पण बाळाजीपंत नातूसारखे घरबुडवे लोक जसे ब्राह्मण्य-रक्षणार्थ लाभले, तसे भाईबंदांच्या कत्तली करून शत्रू ‘ दीन ’ ‘ दीन ’ म्हणून उरावर नाचत असतां निंबाळकर, गोखले वगैरेसारखे रणझुंजार ‘ बाबारे राव-बाजीसारखा नादान पुढारी आम्हांस नको. तूं आमचा पुढारी हो आणि शत्रूशीं अटीतटीचा सामना दे, आम्ही तुझ्याभोंवतीं पंचप्राणांचे तट उभारूं पण तुझ्या केसासही धक्का लागूं देणार नाहीं ’ असें म्हणून समरदेवता विधिपूर्वक आमंत्रण देत असतां रणदेवतेचा अपमान करून जे क्षात्रियकुलवतंस राजे व प्रधानजी शत्रूला फितूर होऊन रणांगणांतून पळ काढतात तेच नादान पुढारी क्षात्रियत्व रक्षण करण्यासाठीं लाभल्यानंतर अकलेचे पलिते पाझळले जातील

यांत काय नवल ! वादविवादाच्या सभेनें निकाल दिल्यानंतर, हे ब्राह्मण-क्षत्रियांचें भांडण साहेबाकडे निकालासाठीं नेण्यांत आलें. इ. स. १८३१ च्या मार्चांत सर जॉन मालकम साहेबाचा मुक्काम सातार्‍यास आला असतां दहा हजार धर्ममार्तंड ब्राह्मणांचा घोळका साहेबाभोंवतीं गोळा झाला. आणि ' आमच्या या वादाचा निकाल लावा ' असें म्हणूं लागला. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. त्यानें ' आम्हांस तुमच्या धार्मिक बाबींशीं कर्तव्य नाहीं ' असें उत्तर दिलें. प्रतापसिंहानें ब्राह्मणेतरांच्या वतीनें ह्या प्रश्नासंबंधीं साहेबास विचारलें तेव्हां तेंच उत्तर त्यास मिळालें. त्याबरोबर दोन्ही पक्ष फजीत झाले. या ज्ञातिप्रकरणानें प्रतापसिंहाची कारकीर्द समंध व्यापिली आहे. १८२५ पासून हा वाद सुरू झाला व तो पुढें सारखा चालूच होता. हीं प्रकरणें फार चिघळलीं आणि प्रतापसिंहाच्या राज्यांत ब्राह्मणास व क्षात्रियेतर लोकांस त्रास होतो अशा जोराच्या तक्रारी सुरू झाल्या व त्या इंग्रजाच्या कानावर गेल्या. प्रतापसिंहानें हें प्रकरण आवरतें घ्यावयाचें तें न करतां त्यानें वेदोक्त विधीचा नवीन ग्रंथ तयार करून स. १८३८ त स्वतःस राज्याभिषेक करविला. प्रतापसिंह, बाजीराव, शंकराचार्य वगैरे लोकांची ही धर्ममार्तंडगिरी पाहिली म्हणजे उद्वेग वाटल्यावांचून राहात नाहीं.

राजकारण : २५

राजकारणांत कांहीं एक जरुरी नसतां विनाकारण ढवळाढवळ करून प्रतापसिंह महाराजांनीं उगीचच स्वतःस शत्रू निर्माण करून ठेविले. त्यांतून बाळाजीपंत नातूसारख्या काळसर्पावर पाय देऊन त्यास त्यांनीं दुखविलें. या अपराधाच्या भरीस महाराजांनीं बाळाजीपंत नातूचा आणखी एक अपराध केला होता. तो म्हणजे नातू दिवाणगिरी मागत असतां त्यास ती दिली नाहीं. याबद्दल महाराजांस कोणीही दोष देणार नाहीं. कारण हा त्यांच्या वैयक्तिक हिताहिताचा प्रश्न होता. इंग्रजांशीं जास्त सलगी असणारा माणूस दिवाण असणें म्हणजे नाकापेक्षां मोतीं जड अशांतला भाग झाला असता. कदाचित् बाळाजीपंत नातूस दिवाण न नेमल्याबद्दल त्यास कोणीही धूर्तच म्हणेल. पण अशा दोन्ही तऱ्हेनें दुखावलेला हा सर्प आतां अगदीं शेपटीवर उभा राहून महाराजांवर टिपण साधण्यास सज्ज झाला होता. सातारकर महाराजांविषयीं जोंपर्यंत साताऱ्याच्या इंग्रज रेसिडेंटाचें व मुंबईकर गव्हर्नराचें मत चांगलें होतें, तोंपर्यंत बाळाजीपंत नातू जागच्या जागीं मनगटें चावून होता. त्यास कांहीं करतां येत नव्हतें; पण महाराजांच्या दुर्दैवानें बाळाजीपंत नातूस हवी असलेली संधि चालून आली. मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड क्लेअर यानें जहाजांत पाय ठेवला व जणूं त्याच पावलीं महाराजांचें दुर्दैवही हिंदुस्थानांत आलें. लॉर्ड क्लेअरनंतर रॉबर्ट ग्रँट मुंबईचा गव्हर्नर झाला व साताऱ्यास कर्नल लॉडविक हा रेसिडेंड म्हणून आला; महा-

राजांचें भवितव्य या दोन व्यक्तींच्या हातीं गेलें. महाराजांच्या दुर्दैवास आतां नवे पंख फुटून तें महाराजांवर एखाद्या गिधाडासारखें झडपा घालूं लागलें.

मुंबईचें ग्रँट मेडिकल कॉलेज हें ज्या व्यक्तीच्या नांवानें उभारण्यांत आलें आहे ती व्यक्ति म्हणजे प्रस्तुतचा गव्हर्नर रॉबर्ट ग्रँट ही होय. रॉबर्ट ग्रँट हा येशू ख्रिस्ताचा एकनिष्ठ उपासक असून, आकाशांतील बापाचा प्रेषितामार्फत आलेला शुभसंदेश जगभर फैलावणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, तसेंच ख्रिस्त अनुयायांशिवाय इतर लोकांना छळणें हेंही एक पुण्यकर्मच आहे, अशी त्याची कल्पना होती. त्यानें ख्रिस्तावर केलेलीं स्तोत्रें इंग्लंडांत फार लोकप्रिय आहेत. ग्रँट हा अशा चमत्कारिक मनोवृत्तीचा असल्यामुळें हिंदूंचा द्वेष करी. या धोरणानेंच गव्हर्नर झाल्यावर त्यानें राज्यकारभार करण्यास सुरुवात केली.

सातारकरांच्या सरहद्दींत असणाऱ्या सरदार-जहागिरदारांवर आपली हुकुमत असावी, असें प्रतापसिंह महाराजांस वाटत असे. पण या जहागिरदारांना मात्र छत्रपतींचें वर्चस्व नको होतें. तसेंच साताराच्या छत्रपतीला होतां होईल तों निर्बल व लुळा पांगळा ठेवण्याची अंतस्थ इच्छा एल्फिन्स्टनची होती. त्या धोरणानेंच त्यानें आंखणी करून ठेविली होती. पण एकदम तुमची हुकुमत तुमच्या सरहद्दींतील इनामदार–जहागिरदारांवर चालणार नाहीं, असें महाराजांस स्पष्ट कशाला म्हणा; त्यामुळें महाराज नाखूष होण्याचा संभव होता; म्हणून एल्फिन्स्टननें हा मुद्दा फारच चतुराईनें अगदीं मोघम ठेविला होता. सातारकरांच्या हद्दींत प्रमुख सरदार–जहागिरदार म्हणजे पटवर्धन घराण्यांतील सरदार, पंतप्रतिनिधि, पंतसचिव, वगैरे ब्राह्मण सरदार मंडळी येत, व कांहीं मराठे जहागिरदार येत. साताराचे छत्रपति हे आतां केवळ नामधारी छत्रपति झाले असून सार्वभौमत्वाचे सर्व हक्क कंपनी सरकारकडे गेले होते. तेव्हां हें पाहिल्यावर या सर्व जहागिरदार मंडळींस असें वाटणें अगदीं साहजिक होतें कीं, दोन सासूबाईंच्या तडाक्यांत सांपडण्यापेक्षां कोणा तरी एकाचाच सासुरवास पुरवला. त्यांतून सुद्धां तो सातारकरांचा नको. कारण साताराचे महाराज म्हणजे इंग्रजांच्या हातांतील एक खेळणें. त्यांस ना सत्ता ना मान ! तेव्हां त्यांच्या ताब्यांत जाणें म्हणजे दुहेरी सत्तेचें जूं आपल्यावर लादून घेण्यासारखें होतें. वर्चस्वच पत्करावयाचें

तर तें इंग्रजासारख्या सर्वसत्ताधारी सार्वभौमाचें तरी पत्करावें असें त्यांस वाटे. आणि त्यांत पुष्कळसें तथ्यही होतें. मुंबईच्या गव्हर्नराच्या मनांतून या सर्व जहागिरदारांवर आपली हुकुमत चालावी, त्यांच्यावर सातारकरांचा हक्क चालूं नये असेंच होतें. तें त्याच्या दृष्टीनें सोईचेंच होतें. पण हें करण्यास मुंबई सरकार तरी कोठें स्वतंत्र होतें!

मुंबई सरकारास सुद्धां दोन सत्तांचा सासुरवास होताच. पहिली म्हणजे कलकत्त्याचा ग० ज० व दुसरी म्हणजे खुद्द इंग्लंडांत असणारे कंपनी सरकारच्या डायरेक्टराचें बोर्ड. कलकत्त्याच्या ग० ज०ला येथील परिस्थिति किंवा राजकारण समजावून सांगणें व त्याला आपल्या बाजूला वळवून घेणें हें काम फारसें कठीण नव्हतें. पण लंडन येथील डायरेक्टर्स हिंदुस्थानांतील परिस्थितीपासून फार दूर राहात असल्यामुळें व त्यांचीं मनें स्वतंत्र अशा वातावरणांत वाढत असल्यामुळें, ते जरा सरळ वृत्तीचे असत. याशिवाय त्यांच्यांतील कांहीं मंडळींचें मत सातारकरांविषयीं अत्यंत चांगलें होतें. तेव्हां ते महाराजांचीं गाऱ्हाणीं फारसे आढेवेढे न घेतां ऐकत व न्यायास धरून निकाल देत. सातारकर महाराजांशीं ठरलेल्या तहांच्या शर्तीप्रमाणें त्यांच्या सरहद्दींतील जहागिरदार, इनामदार व सरदार यांच्यावर सातारकरांचा हक्क त्यांनीं मान्य केला होता व तसें त्यांनीं महाराजांस कळविलेंही होतें. पण कोणताही पत्रव्यवहार महाराजांस मुंबईच्या गव्हर्नरामार्फत मिळावयाचा असल्यामुळें व मुंबईचा गव्हर्नर हीं सर्व पत्रें मधल्यामध्येंच दाबून ठेवीत असल्यामुळें महाराजांस हा निर्णय कळला नाहीं.

इ. स. १८३५ मध्यें रॉबर्ट ग्रँट हा उन्हाळ्यांत महाबळेश्वरीं आला असतां प्रतापसिंह महाराजांनीं त्याची दरबारी थाटानें गांठ घेतली व आपल्या सरहद्दींतील जहागिरदार, सरदार आणि संस्थानिक यांच्या सार्वभौमत्वाच्या हक्काबद्दल कंपनी सरकारच्या डायरेक्टरांना कळवून त्याबद्दलचा निकाल शक्यतों लवकर आणण्याबद्दल विनंति केली. तसेंच महाबळेश्वराहून मुंबईस माघारीं जातांना साताऱ्यास एकदां भेट देऊन जाण्याबद्दल आग्रहाचें आमंत्रण दिलें. पण रॉबर्ट ग्रँट हा अत्यंत धार्मिक वृत्तीचा ख्रिस्तभक्त असल्यामुळें त्यास या 'हीदन'ला त्रास देण्यांत पुण्यकर्म वाटे! त्यानें या वेळीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्स,

यांचा निकाल आला असतांना सुद्धां तो शांतपणें खिशांत ठेवून गंभीरपणें उत्तर दिलें, ' महाराज, मी आपलें म्हणणें कंपनी सरकारला कळवितों. त्याबद्दल आपण चिंता करूं नये.' प्रतापसिंह महाराजांनीं सातान्यास येण्याबद्दल आमंत्रण दिलें असतांना सुद्धां त्यानें त्याकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. इ. स. १८३६ पर्यंत प्रतापसिंह महाराजांस ग्रँटनें असेंच बुचकळ्यांत ठेविलें. इतका अवधी लोटल्यामुळें महाराजांस अशी साहजिकच शंका आली कीं, आपलें म्हणणें डायरेक्टरांच्या कानांवर गेलेंच नसावें. पण खरी वस्तुस्थिति मात्र निराळी होती. मुंबईचा गव्हर्नर ग्रँट व त्याचा सेक्रेटरी ओलोबी हे अधिकारावर रुजू होण्यापूर्वींच म्हणजे लॉर्ड क्लेअरच्या अमदानींतच महाराजांच्या जहागिरदारांवरील सार्वभौमत्वाच्या हक्काचा निकाल आला होता. व तो महाराजांस अनुकूलही होता. त्याचे कागदपत्र ग्रँटच्या ताब्यांत केव्हांच आले होते. पण हा निकाल ग्रँटला सम्मत नसल्यामुळें त्यानें तो मधल्यामध्येंच दडपून ठेविला होता !

इ. स. १८३६ पर्यंत छत्रपतींना ग्रँटच्या वर्तनाबद्दल कांहींएक शंका आली नाहीं. पण यापुढें सुद्धां जेव्हां त्याच्याकडून उडवाउडवीचीं उत्तरें येऊं लागलीं, तेव्हां मात्र छत्रपतींना त्याच्या वर्तनाबद्दल शंका वाटूं लागली. आपलें म्हणणें कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना कळविलें जात नाहीं, रॉबर्ट ग्रँटचें मन आपल्याविषयीं शुद्ध नाहीं, तो आपणांस कांहीं तरी उत्तरें देऊन बुचकळ्यांत ठेवीत आहे, असें छत्रपतींच्या मनानें पूर्ण घेतलें. तेव्हां आपलें म्हणणें कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या पुढें सविस्तर मांडण्याकरितां आपल्यातर्फे कोणी वकील अथवा वकीलमंडळ लंडनला धाडावें व या प्रकरणाचा एकदां निकाल लावून घ्यावा असा बेत महाराजांनीं चालविला. ही बातमी गव्हर्नर ग्रँटला कळली तेव्हां मात्र त्याचें धाबें दणाणलें. त्याच्या डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले. आणि केलेलीं पातकें मनःचक्षूंपुढें थैमान घालूं लागलीं. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं महाराजांचा मांडलिकांवरील हक्क मान्य केल्याचें आपण त्यांस कळविलें नाहीं, तसेंच सातारकरांना त्यांनीं धाडलेली रत्नजडीत तलवार आपण मध्येंच गडप केली, अशा तऱ्हेनें महाराजांस आपण फसविलें व कोर्ट ऑफ डायरेक्टरांचा अपमान केला; या सर्व गोष्टी जर लंडनमध्यें डायरे-

क्टरांना कळल्या तर त्यांच्याकडून आपणांस चांगलीच तंबी येईल, आपली चांगलीच नाचक्की होऊन आपणास या घोर अपराधाबद्दल एकादे वेळेस नोकरीवरून सुद्धां दूर व्हावें लागेल, अशी जबरदस्त भीति त्यास वाटूं लागली.

रॉबर्ट ग्रँटनें केलेल्या पापांत त्याचा साथीदार म्हणून काम करणारा त्याचा सेक्रेटरी ओलोबी यासही वाईटपणा येणार होता. तेव्हां ते दोघे महाराजांच्या या नवीन योजनेबद्दल मनांत फार चिडून गेले होते व त्यांतून आपण कसें निसटावें याबद्दल त्या उभयतांच्या मनांत सारखे विचार चालू होते. तेव्हां महाराजांचें आपणांस कांहीं बरेवाईट करतां आल्यास फार चांगलें होईल असले भयंकर विचार त्यांच्या मनांत डोकावूं लागले. महाराजांविरुद्ध कांहीं कारस्थान रचून त्यांस जर गादीवरूनच उचलतां आलें, तर फारच चांगलें असें त्यांस वाटलें व तसलें एकादें भयंकर कारस्थान रचण्याच्या मार्गाला ते लागले. त्या वेळीं सातारचा रेसिडेंट कर्नल लॉडविक हा हरएक बाबतींत रॉबर्ट ग्रँटला मदत करण्यास तयार होता. अशा तऱ्हेनें महाराजांविरुद्ध कुटिल कारस्थान रचण्याची पूर्वतयारी झाली. सातान्यास छत्रपतींविरुद्ध उगीचच कांहीं तरी कंड्या पिकविणारे लोक होते. ते पूर्वींच्या रेसिडेंटांच्या वेळींही अशाच बऱ्यावाईट कंड्या उठवीत. त्यांपैकीं मुख्य अशी असे कीं, सातारचे महाराज इंग्रजांविरुद्ध बंड पुकारण्याच्या तयारींत आहेत ! पण पूर्वींच्या रेसिडेंटांचें चित्त महाराजांविषयीं शुद्ध असल्यामुळें ते या गटारगप्पांवर विश्वास ठेवण्यास तयार नसत. याशिवाय त्यांची छत्रपतींच्या वागणुकीवर सक्त नजर असे. पण कर्नल लॉडविक याचा दृष्टिकोन आतां बदलला असल्यामुळें तो महाराजांचें उणें पडतें केव्हां व आपण त्यांस पकडतों केव्हां याची वाटच पाहात होता.

सातारचे महाराज विलायतेला आपला वकील धाडणार, ही गोष्ट रेसिडेंट व मुंबईचा गव्हर्नर यांना मुळींच नको होती. तेव्हां ती जागच्याजागीं हाणून पाडण्याकरितां म्हणून त्यांनीं एक शक्कल लढविली. ती अशी कीं, आमच्या संमतीशिवाय महाराज विलायतेला वकील धाडीत आहेत, ही गोष्टच मुळीं ते तहनाम्यांतील पांचव्या कलमाविरुद्ध करीत आहेत. असा आक्षेप पाहिल्यानें कर्नल लॉडविकनें घेतला. परंतु पांचव्या कलमाचा अर्थ तो मुद्दामच चुकीचा

करीत होता. पांचव्या कलमांत अशी अट आहे कीं, रेसिडेंटाच्या परवानगी-शिवाय कोणाही परक्याशीं पत्रव्यवहार करावयाचा नाहीं. ' परक्या कोणाशीं ' या शब्दानें कंपनी सरकारचे लंडन येथील डायरेक्टर्स हे सुद्धां परकेच ठरतात, असें लॉडविकचें म्हणणें होतें. पण हें सपशेल चुकीचें होतें. कारण कंपनी सरकारच्या डायरेक्टरांचें मंडळ म्हणजे इंग्रज सरकारची शेवटची निर्णायक शक्ति. तेव्हां रेसिडेंट व मुंबईचा गव्हर्नर यांच्याविरुद्ध जर कांहीं दाद लावून घ्यावयाची असेल तर ती कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांजकडूनच घेतली पाहिजे, हें अगदीं उघड आहे.

तेव्हां कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना परके ठरविण्याचा प्रयत्न अगदीं पोरकट व हास्यास्पद होता. तो त्यांच्या चांगलाच अंगाशीं आला असता. कारण रेसिडेंटाच्या विरुद्ध किंवा गव्हर्नराच्या विरुद्ध कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे राजानें तक्रार केली असती तर कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना उलट आनंदच झाला असता व आपले अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र व निकाल त्यानें मधच्यामध्येंच दाबून ठेविले व राजाचा विश्वासघात केला याबद्दल कोर्ट ऑफ डायरेक्टर्स फारच चिडले असते. त्यांनीं रेसिडेंट व गव्हर्नर यांची चांगलीच खरडपट्टी काढली असती. कर्नल लॉडविकच्या डोक्यांत वरील सर्व गोष्टींचा लख्ख प्रकाश पडला व त्यानें हें पोरकट कृत्य करण्याचें सोडून दिलें.

दुसरें एकादें फंदफितुरीचें कुभांड महाराजांविरुद्ध रचलें तरच आपला निभाव आहे असें त्यास वाटलें. असलें काळेंबेरें कारस्थान यशस्वी तऱ्हेनें तडीस नेणारा एक मनुष्यही त्याच्याजवळ होता. त्यानें यापूर्वी अनेक कारस्थानें फारच चोख तऱ्हेनें तयार केलीं होतीं व त्यांत यशही संपादन केलें होतें. असा हात-खंडा, कपटनीतिनिपुण मनुष्य म्हणजे बाळाजीपंत नातू होता. छत्रपति प्रतापसिंह महाराजांनीं बाळाजीपंत नातूस दुखावला होताच. त्यास त्यांनीं आपली दिवाणगिरी दिली नव्हती व वेदोक्तप्रकरणीं कायस्थांची बाजू घेतली होती म्हणून बाळाजीपंत नातू महाराजांवर सूड घेण्यास अगदीं आतुर होता. तेव्हां त्यास ही संधी आयतीच मिळाली. साताराचा राजा प्रतापसिंह हा इंग्रजाविरुद्ध फंदफितुरी माजविण्याच्या नादांत आहे, तसेंच तो बंडही लवकरच पुकारणार आहे

अशा आशयाच्या कंड्या पूर्वीं धुमसत होत्या. त्यांवरच बाळाजीपंतानें इंग्रजांच्या प्रोत्साहनानें व मदतीनें जोरजोरानें फुंकर घालण्यास सुरुवात केली. आणि त्यांतूनच आगीचा डोंब उसळून महाराजांची दौलत धुळीस मिळाली.

साताराच्या छत्रपतीला पेंचांत धरून खड्ड्यांत टाकण्याकरितां राज्ययंत्र सर्व बाजूंनीं तयार झालें; त्याला फक्त गति देणारी शक्तिच हवी होती व ती बाळाजीपंत नातूनें पुरविली. त्याबरोबर हें राक्षसी यंत्र अत्यंत जोरानें फिरूं लागून अवघ्या तीन वर्षांच्या आंतच त्यानें महाराजांस गादीवरून पार दूर फेंकून दिलें. सातान्यास असणाऱ्या २३ नंबरच्या लष्करी तुकडींतील हिंदी अधिकाऱ्यांना फितूर करून इंग्रजांविरुद्ध बंडाळी करण्यासाठीं चिथावणी देणारा एक मोठा कट साताऱ्यास आहे व या कटाच्या बुडाशीं साताराचे महाराज आहेत, अशी एक बाजारगप्प मुद्दामच उठविली गेली, व ती रेसिडेंटाच्या कानांपर्यंत पोहोंचली. लगेच रेसिडेंट लॉडविकनें तिच्या सत्यासत्यतेचा कांहींएक विचार न करतां (बाकी तो करण्यास त्यास सवड व इच्छाही नव्हती) ही बातमी जशीच्या तशी मुंबईच्या गव्हर्नरच्या कानावर घातली. अशा तऱ्हेनें हें लोण शेवटपर्यंत पोहोंचलें. रॉबर्ट ग्रँटला ही बातमी कळतांच तो आनंदानें डोलूं लागला. त्यानें कर्नल लॉडविकला साताराच्या महाराजांविरुद्ध पुरावा गोळा करण्याबद्दल सुचविलें. कर्नल लॉडविक हाही या कृत्यास फारसा विरोधी नव्हता. त्यानें लगेच बाळाजीपंत नातूमार्फत पुरावा गोळा करण्यास प्रारंभ केला.

कर्नल लॉडविकनें २२ जुलै १८३६ ला मुंबई सरकारचे सेक्रेटरीला एक पत्र धाडिलें. त्यांत प्रतापसिंहाविरुद्ध भयंकर स्वरूपाच्या कागाळ्या केल्या होत्या. त्या पत्रासोबत हिंदी पायदळ पलटण नं. २३ मधील दोघां अंमलदारांच्या जबान्या धाडिल्या होत्या; व त्या जबान्या गव्हर्नरापुढें मांडून ' मी या बाबतींत काय धोरण स्वीकारावें, कोणकोणते उपाय योजावे याबद्दल खुलासेवार पत्र यावें ' असें त्यानें सेक्रेटरीस अत्यंत तांतडीनें विचारलें होतें.

वास्तविक पाहतां साताराच्या महाराजांवर हा जो विश्वासघाताचा व फंदफितुरीचा आरोप करण्यांत आला होता त्यांत कांहीं फारसें तथ्य नव्हतें. हें सर्व कुटिल कारस्थान बाळाजीपंत नातूच्या मार्फत मुद्दाम तयार करण्यांत

आलें होतें. त्यांत महाराजांचा कांहीं एक संबंध नव्हता, असें पुष्कळ इंग्रज अधिकाऱ्यांचें मत होतें. फ्रेंच व पोर्तुगीज सरकारांच्या मदतीनें सर्व हिंदुस्थानभर बंडाचा वणवा पेटवून देण्याचा सातारकर महाराजांचा बेत आहे असा भयंकर आरोप महाराजांवर करण्यांत आला होता. महाराजांचा नाश करण्याकरितां त्यांच्या मागें उभी केलेली विषारी कारस्थानाची ही पार्श्वभूमि तयार करण्यांत बाळाजीपंत नातूचा व मुंबईच्या गव्हर्नरचा पूर्णपणें हात होता. पुढें महाराजांच्या चौकशीचा फार्स करण्यांत आला, त्या वेळीं महाराजांविरुद्ध आणलेल्या साक्षीदारांची उलट तपासणी मुद्दामच करूं दिली नाहीं. त्यामुळें बाळाजीपंत नातूचें नांव कायमचें पडद्याआड राहिलें.

हें सर्व कारस्थान नीट सजून दिसावें म्हणून फारच मोठा खटाटोप करण्यांत आला. या कारस्थानांत पन्नास--साठ माणसें गोंवण्यांत आलीं होतीं. कांहीं मंडळींनीं पोर्तुगीज सरकारशीं संधान बांधिलें, कांहींनीं फ्रेंचांकडे सातारकर महाराजांचें सूत जमविलें व कांहींनीं नागपूरकर भोंसले यांच्याकडे या बंडासाठीं शिष्टाई केली, हें सर्व सिद्ध करण्यासाठीं पत्रांची जा—ये, त्या त्या लोकांना पगारांची व बक्षिसांची खैरात व त्या अर्थाचा पत्रव्यवहार व्यवस्थितपणें निर्माण करण्यांत आला आणि ही सर्व सिद्धता झाल्यावर मग पकडापकडीचें आणि जबरदस्तीनें जाबजबाब घेण्याचें काम सुरू झालें. सेनापति बाळासाहेब याच्यावर वहीम होता; पण त्यास कैद केलें नाहीं. पण खालील मंडळींना अटक करण्यांत आली.

(१) बळवंतराव चिटणीस, (२) गोविंदराव दिवाण, (३) दिनकरराव मोहिते, (४) बापुजी पराडकर, (५) बापुजी नाइक खासकर, (६) रामचंद्राव कारकून, (७) राघोपंत.

वर नमूद केलेल्या आरोपींपैकीं बळवंत मल्हार चिटणिसावर इंग्रज सरकारचा विशेषच दांत दिसतो. कारण त्यानें एल्फिन्स्टनवर विश्वासघाताचा आरोप केला. प्रथम पेशव्यांचें राज्य सातारकरांस देतों असें वचन देऊन पुढें त्यानें सातारकरांना छोटें राज्य दिलें तेव्हां एल्फिन्स्टन आपल्या म्हणण्याप्रमाणें वागला नाहीं असें राजाच्या मनांत भरवून त्यानें महाराजांचें मन इंग्रजांविषयीं कलुषित

केलें. अनेक वर्षेपर्यंत तो अशाच भानगडी करीत होता. हबश्यांशीं संधान बांधून त्यांना इंग्रजांविरुद्ध उठविण्याचा त्याचा बेत होता, असे निरनिराळे आरोप त्याच्यावर होते. यानंतर ज्या माणसांना कंपनी सरकारनें स्वसंरक्षणाखालीं ठेविलें ती मंडळी पुढीलप्रमाणें होती.

(१) आप्पासाहेब महाराज, (२) बुजाबा पराडकर, (३) यशवंतराव फौजदार, (४) पंतप्रतिनिधी, (५) दाजिबा पटवर्धन, (६) एलोजी मोहिते, (७) आबा मारक, (८) आबा पारसनीस.

महाराजांच्या जवळचीं माणसेंही कंपनी सरकारनें वश करून घेतलीं. हें या यादीवरून दिसतें. आप्पासाहेबांस गादी पाहिजेच होती. तो अर्धी वांटणी मागत होताच. त्याचें आयतेंच काम झालें. प्रतापसिंहावर इंग्रजाची इतराजी झाली तर आपणांस गादीवर बसण्याचा व राज्य करण्याचा सुयोग येईल म्हणून तो रेसिडेन्टास सामील झाला. 'प्रतापसिंह महाराज मला पाण्यांत पाहतात, मी इंग्रजांस सामील आहें म्हणून ते माझा द्वेष करतात. माझ्या जिवाला धोका आहे ' अशा कागाळ्या तो करीत होता. तेव्हां त्यास रेसिडेन्टानें आपल्या संरक्षणाखालीं ता. २४–३–१९३९ ला घेतलें.

यानंतर जोधपुरास जाणारा शिवानंदशास्त्री हा सुद्धां मुद्दाम तेथें गेला, नागपूरकर आप्पासाहेबास जोधपुरास ठेवण्यांत आलें होतें त्याच्याशीं संधान बांधण्यासाठीं सातारकर महाराजांनीं त्यास धाडिलें, पोरीच्या लग्नाचें आणि क्षत्रियत्व सिद्ध करण्याचें काम हें सर्व थोतांड होतें, असेंहि ठरविण्यांत आलें. अशा तऱ्हेनें राजावर साग्रसंगीत आरोप लादण्यांत आले. पण त्यांत तथ्यांश नव्हता.

या आरोपांच्या प्रकरणांत तपशिलांचा व व्यक्तींचा संबंध इतका गुंतागुंतीचा झाला आहे कीं, त्याचीं स्पष्टता थोडक्यांत करणें शक्य नाहीं. तसेंच त्याचा प्रत्यक्ष इतिहासास फारसा उपयोग नाहीं. राजाच्या अंगीं गुन्हा लावण्यासाठीं म्हणून शक्य ते सर्व प्रयत्न करण्यांत आले आहेत. सातारकर महाराजांच्या खटल्याची तपशीलवार माहिती द्यावयाची म्हटली तर एक नवीन ग्रंथ लिहावा लागेल. महाराजांवर करण्यांत आलेल्या आरोपांची हकीगत पुढें देण्यांत आली आहे.

———

आरोप : २६

सातारकर महाराजांचे बाबतींत विश्वासघात या शब्दांचा जन्म प्रथम २१ जून १८३६ ला झाला! शब्दस्वरूप धारण करणारें हें अवलक्षणी बाळ उणें पुरें वीस दिवसांचें सुद्धां झालें नसेल तोंच त्यानें कृतीचें रूप धारण केलें. महाराजांच्या मुळावर आलेलें हें पोर एकाद्या स्पर्शजन्य रोगाप्रमाणें वाढीस लागून अवघ्या तीन वर्षांच्या मुदतींत त्यानें सातारकर छत्रपतींना पुरें नेस्तनाबूद केलें. या कारस्थानाच्या कथानकास ११ जुलै १८३६ ला सुरुवात झाली.

या वेळीं साताऱ्यास असलेल्या नं. २३ च्या पायदळ पलटणींत शिवगुलामसिंग नांवाचा एक सुभेदार होता. तो कांहीं कामानिमित्त साताऱ्यास गेला. रस्त्यांतून चालला असतां त्याच्या मागें एक ब्राह्मण रेंगाळत रेंगाळत चालला होता. त्याच्या चालीवरून वा चेहऱ्या-मोहऱ्यावरून असें वाटे कीं, या ब्राह्मणास त्या गुलामसिंगाशीं कांहीं बोलावयाचें आहे. त्या ब्राह्मणाचें नांव अंताजी. शेवटीं अंताजीनें शिवगुलामसिंगाशीं बोलण्यास सुरुवात केलीच. शिवगुलामानें अंताजीचें किंवा अंताजीनें शिवगुलामसिंगाचें यापूर्वी तोंड सुद्धां पाहिलें नव्हतें. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्यानें त्यास लष्करांतील एकाद्या माहितगाराप्रमाणें प्रश्न विचारावयास सुरुवात केली. तुमचा सुभेदार कोण व ॲडजुटंट कोण? हे दोन प्रश्न ऐकतांच शिवगुलामसिंग जरा चमकला व कावऱ्या बावऱ्या नजरेनें त्याकडे पाहूं लागला. आणि या भटास लष्करच्या भाकरी भाजण्याची

काय जरूर, म्हणून त्यास तो जरा जोरांत कांहीं विचारणार तोंच, अंताजीनें 'असें पाहतां काय राव ! कोणाजवळही बोलणार नाहीं अशी शपथ घेत असाल तर तुम्हांला एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगतों.' शपथ मिळतांच त्यानें हकीगत सांगण्यास सुरुवात केली. 'अहो, शिंदे सरकारकडून एक वकील आला असून इंग्रजांना हिंदुस्थानांतून हांकलून देण्यासाठीं सर्व संस्थानें कट करीत आहेत. त्याची बोलाचाली करावयासाठींच हा वकील मुद्दाम आला आहे.' ही गुप्त बातमी अंताजीनें शिवगुलामसिंगास एका बाजूस नेऊन झाडाखालीं सांगितली. यानंतर दोघांचें फारसें बोलणें झालें नाहीं. दोघेही आपआपल्या मार्गाला निघून गेले. अंताजीनें मात्र शिवगुलामसिंगास त्याचें राहण्याचें ठिकाण विचारलें. शिवगुलामसिंगानें त्यास तें दाखविलें. याशिवाय या दिवशीं कांहीं एक झालें नाहीं. अंताजीनें सांगितलेल्या बातमीवर शिवगुलामसिंगाचा काडीइतका विश्वास बसला नाहीं. ही एक उगाचच उठलेली कंडी आहे असें धरून तो चालला. त्यानें या बातमीचा बभ्रा केला नाहीं. सुभेदार, मेजर, ॲडज्युटंट अथवा रेजिमेंटचा कमांडिंग ऑफिसर यांपैकीं कोणासही या बातमीची त्यानें कानगी दिली नाहीं म्हणून अंताजीनें टाकलेली ही ठिणगी जास्त न पेटतां जागच्या जागींच राहिली.

या गोष्टीस एक आठवडा लोटला. सगळीकडे स्थिरस्थावर आहे, कोठेंही कांहीं गडबड दिसत नाहीं, तेव्हां आपण टाकलेल्या ठिणगीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं असें अंताजीस वाटलें. तेव्हां त्यास चैन पडेना. त्यानें पुन्हां शिवगुलामसिंगाच्या घराची वाट सुधारली. त्यानें त्यास त्याच्या राहत्या घरीं गांठिलें. तीच बातमी त्यानें पुन्हां सांगितली. आणि पूर्वींप्रमाणेंच पुन्हां पलटणीचा नेटिव्ह—ॲड्ज्युटंट कोण आहे म्हणून चौकशी करूं लागला. तेव्हां चंद्रसिंग नांवाच्या एका हवालदारासच हा आमच्या पलटणीचा नेटिव्ह ॲडज्युटंट आहे म्हणून शिवगुलामसिंगानें सांगितलें. त्यानें अंताजीची व चंद्रसिंगाची ओळख करून दिली. अंताजीनें चंद्रसिंगासही सर्व देशी संस्थानें इंग्रजांविरुद्ध कट करीत आहेत अशी बातमी सांगितली. तेव्हां शिवगुलामसिंगानें चंद्रसिंगास गोरे ॲड्ज्यूटंट लेफ्टनंट स्टॉक याच्या कानांवर ही बातमी घालण्याकरितां धाडिलें. यानंतर

अंताजीनें पुन्हा असें सांगितलें कीं, गोविंदराव दिवाण यांस सुभेदाराची गांठ घेण्याची इच्छा आहे. त्यांनीं तुम्हांला भेटण्यासाठीं घरीं बोलाविलें आहे.

गोविंदराव दिवाण हा फक्त नामधारी दिवाण होता. त्याचे वडील कांहीं दिवस खाजगी कारभाऱ्याचें काम करीत होते, म्हणून सर्व लोक त्यास गोविंदराव दिवाण म्हणत इतकेंच. पण खुद्द गोविंदरावांचें सातारा दरबारीं कांहीं एक वजन नव्हतें. तो त्यांचा एक सामान्य आश्रित होता.

सुभेदारानें लेफ्टनंट स्टॉकला 'गोविंदराव दिवाणानें आम्हांस भेटण्याकरितां घरीं बोलाविलें आहे' असें सांगितलें; तेव्हां दिवाणाला भेटण्यास तूं जा, जातांना दुसरा सुभेदार गुलजार मिश्र यासही घेऊन जा असें त्यास त्यानें बजाविलें. तेव्हां साहेबाच्या सांगण्याप्रमाणें गुलजार मिश्र व शिवगुलामसिंग हे गोविंदराव दिवाणाच्या भेटीसाठीं निघाले. तों वाटेंत अंताजीची गांठ पडली. तेव्हां अंताजी गुलजार मिश्राबद्दल शंका दाखवूं लागला व त्यास बरोबर नेण्यास जरा कांकूं करूं लागला. त्याबरोबर शिवगुलामसिंगानें गुलजार मिश्र हा माझा जिगरदोस्त आहे, तो दगाबाजी करणार नाहीं, तेव्हां त्यास या कारस्थानांत घेण्यास कांहींच हरकत नाहीं अशी अंताजीची समजूत घातली. तेव्हां तो सुभेदार गुलजार मिश्र यास बरोबर घेण्यास तयार झाला. या दोघांना बरोबर घेऊन तो गोविंदराव दिवाणाच्या राहत्या घरीं त्यास भेटण्यासाठीं गेला. दिवाणाचें घर पलटणीच्या बराकीपासून सरासरी मैलभर असेल. जातांना वाटेंत अंताजीनें या सुभेदारांना सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील सर्व लष्करी ठाणीं इंग्रजांविरुद्ध उठविण्याकरितां जासूद धाडण्यांत आले आहेत. अशा तऱ्हेनें इंग्रजांविरुद्ध सर्व लष्कर उठविण्याची तजवीज जोरांत चालू आहे. अशा गप्पा चालल्या होत्या तोंच ते तिघे दिवाणाचे घराशेजारीं आले. त्याबरोबर अंताजीनें या दोन सुभेदारांना रस्त्यास लागून असलेल्या एका खोलींत बसविलें व आपण दिवाणाच्या शोधार्थ गेला. जरा वेळानें तो माघारीं आला. नंतर या दोघांना घेऊन दिवाणाच्या घरीं जात असतां त्यास रेसिडेंट साहेबाची स्वारी त्याच मार्गानें राजवाड्याकडे जात असतांना दिसली. त्याबरोबर त्या दोन सुभेदारांनीं घाबरल्याचें सोंग केलें. आणि ते घराबाहेर पडले. त्यांच्या

पाठोपाठ अंताजीही आला. मग ते सर्व एका पागेमधून राजवाड्यासमोर आले. तेव्हां त्यांस महाराज व रेसिडेंट हे राजवाड्यासमोर पडलेल्या दोन तोफांचें निरीक्षण करितांना दिसले. थोड्या वेळानंतर रेसिडेंट आपल्या बंगल्याकडे निघून गेला.

रेसिडेंट गेल्यानंतर अंताजी, दोन सुभेदार व एक हवालदार ही सर्व मंडळी गोविंदराव दिवाणाच्या घरीं आली. हवालदारास तळमजल्यावर ठेवून गोविंदराव दिवाण, दोन सुभेदार व अंताजीपंत हे चौथे माडीवर दिवाणखान्यांत गेले. नंतर दिवाणखान्याचें दार लावून घेण्यांत आलें. सुभेदारांची व दिवाणांची ओळख अंताजीनें करून दिली. मवांशीं रेसिडेंटास पाहून सुभेदार घाबरले म्हणून आम्ही घाईघाईनें बाहेर पडलों, असें अंताजीनें सांगितलें. तेव्हां गोविंदराव दिवाण म्हणाला कीं, तसें कांहीं घाबरण्याचें कारण नाहीं. महाराजांचें व रेसिडेंटाचें-आतां इतकें बरें नाहीं. सर्व ठिकाणीं इंग्रजाविरुद्ध लष्कर उठविण्याचा प्रयत्न चालू आहे. तेव्हां या सुभेदारांनीं आपली पलटण फितवावी. समजा, जरी पलटणीला येथून हलविण्यांत आलें तरी सर्व बेत जासुदामार्फत एकमेकांस कळवितां येतील. पण पलटण फितविण्याबद्दल तुम्ही दोघांनीं जोराची खटपट केली पाहिजे. बोलणें इतक्या रंगांत आलें असतां शिंद्यांचे वकील आले आहेत असा निरोप आला! लगेच एक गृहस्थ शिंद्याचे वकील म्हणून आले. त्यांची व सुभेदारांची ओळख करून देण्यांत आली. नंतर दिवाणांनीं सर्वांना विडे दिले व दिवाण निघून गेले. पण जातांना अंताजीस त्यांनीं सांगितलें कीं, दोघां सुभेदारांस घेऊन माझ्या मागोमाग राजवाड्याकडे ये. कारण महाराजांची व सुभेदारांची ओळख करून दिली पाहिजे.

तेव्हां त्या दोघांना घेऊन अंताजी राजवाड्याकडे गेला. सुभेदार व अंताजी हे वाड्यासमोर उभे राहिलेले पाहातांच गोविंदराव दिवाण राजाच्या कानाशीं लागला. तेव्हां राजानें सुभेदाराकडे पाहिलें. दोघांची दृष्टादृष्ट होतांच सुभेदारांनीं दोनदां लवून मुजरा केला. राजानें उलट मुजरा स्वीकारल्याचें चिन्ह म्हणून सलाम केला. यानंतर दोघे सुभेदार आपल्या छावणींत निघून गेले. त्यांनीं घडलेला सर्व प्रकार आपल्या गोऱ्या अधिकाऱ्याच्या कानांवर घातला.

त्यानंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या दोन सुभेदारांच्या वरील गोष्टींसंबंधीं जबान्या घेण्यांत आल्या.

यानंतर तीनच दिवसांनीं म्हणजे २४ जुलै १८३६ ला अंताजी पुन्हां रेजिमेंटच्या छावणींत गेला व सांगूं लागला कीं, 'महाराज तुमच्यावर फार खूष झाले आहेत. त्यांनीं गोविंदराव दिवाणास तुम्हांस एक मोठी मेजवानी देण्यास सांगितली आहे. आपल्या कारस्थानास चांगलाच रंग येणार असें दिसतें. कारण कर्नाटक व महाराष्ट्र या दोन ठिकाणीं लष्कर फितविण्यासाठीं जासूद रवाना झाले. सर्व हिंदी संस्थानिक आपणांस लवकरच मिळणार व युद्धास तोंड लागणार. एवढ्या मोठ्या माऱ्यापुढें टोपीकर काय टिकतो. सुभेदार, यांत आपली फत्ते होणार.' अशीं रसभरित वर्णनें करून अंताजी त्या दिवशीं गेला. यानंतरच्या आठवड्यांत मात्र सुभेदारानें साताऱ्यास जाऊन अंताजीची गांठ पुरुषोत्तम सुगंध्याच्या दुकानीं घेतली. त्या शिपाई गड्यांना इतक्या आर्जवानें अंताजीस भेटण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण गोविंदराव दिवाण व अंताजी यांनीं चालविलेल्या गुप्त कटांत आपण अंतःकरणपूर्वक सामील आहोंत असें त्या उभयतांस वाटावें म्हणून बाह्यात्कारी हा सर्व देखावा करा असें त्यांच्या गोऱ्या अधिकाऱ्यानें त्यांना सांगितलें होतें. म्हणून हीं कळसूत्री बाहुलीं एखाद्या शहाण्यासुर्त्या माणसासारखीं नाचत होतीं.

या दुकानांतील भेटीनंतर अंताजी हा पुन्हां ३१ जुलैला छावणींत गेला व त्यानें त्या सुभेदारांची गांठ घेतली. गोविंदरावानें तुम्हां दोघांना वेषांतर करून राजाच्या भेटीकरितां गुप्त तऱ्हेनें बोलाविलें आहे असें त्यानें त्यांस सांगितलें. ही मुलाखत तारीख ५ ऑगस्ट रोजीं होईल म्हणून अंताजीनें त्यांच्याशीं तारीखही ठरविली. पण पुढें बरेच दिवस अंताजी हा त्यांना भेटण्यास आलाच नाहीं. एके दिवशीं सहजासहजीं अंताजीची व सुभेदाराची गांठ पडली, तेव्हां सुभेदारानें त्याला चांगलाच फैलावर घेतला. ठरल्याप्रमाणें ५ तारखेला आम्ही तुझी कीती तरी वाट पाहिली; अशी दगाबाजी करूं नकोस म्हणून सुभेदारानें अंताजीस बजाविलें. तेव्हां तो म्हणूं लागला कीं, त्या वेळीं फार पाऊस पडत होता. राजेसाहेबांची प्रकृति ठीक नव्हती. उदेपूरहून आलेला एक

वकील मेला. त्यामुळें मला फार त्रास झाला. अशा गप्पा मारून त्यानें वेळ मारून नेली. यानंतर तारीख ८ सप्टेंबर रोजीं अंताजी छावणींत गेला व त्यानें सुभेदार गुलजार मिश्र याची गांठ घेतली व राजानें तुम्हांस भेटीस बोलाविलें आहे, चला; असें म्हणूं लागला. या वेळीं शिवगुलामसिंग लाइनींत नव्हता. तो रेसिडेन्सीमध्यें पाहऱ्यावर होता. त्यास गुलजार मिश्रानें निरोप धाडला. निरोप कळतांच गुलामसिंगानें रेसिडेंट ‘ लॉडव्हिक’ची गांठ घेतली. त्याची या कामा- करितां परवानगी घेऊन तो आला. सूर्यास्ताच्या सुमारास गुलजार मिश्र, शिवगुलामसिंग व अंताजी हे गंध्याच्या दुकानीं आले. पुरुषोत्तम गंध्याचें दुकान खाजगी दिवाणाच्या घराशेजारींच होतें. त्या दुकानांत सुभेदारांना बसवून अंताजी दिवाणाकडे गेला. तो अर्ध्या तासानें परत आला. दिवाणसाहेबांकडे बरीच मंडळी आली आहेत तेव्हां जरा थांबा असें म्हणून त्यांनीं त्यास थांबवून धरिलें. रात्रीं आठचे सुमारास अंताजीनें दोन झुलीवजा अंगरखे आणिले व त्या सुभेदारांवर चढवून त्यांचे चेहरे लवकर ओळखतां येणार नाहींत अशी तजवीज केली. अंताजी त्यांना आपल्याबरोबर घेऊन दिवाणाच्या घरीं गेला. दिवाणाची व त्यांची भेट एका खोलींत दारें लावून एकांतांत झाली. दिवाणानें सुभेदारांना सांगितलें कीं, मी. तुम्हांला राजाच्या भेटीला घेऊन जाईन त्या वेळीं तुम्हीं कांहीं एक कमीजास्ती न बोलतां फक्त एवढेंच बोलावयाचें कीं, महाराज जे हुकूम सांगतील ते आम्ही बजावूं. दिवाण व सुभेदार यांचें हें बोलणें चाललें असतां दुसरा एक इसम आला. हा इसम येतांच आपला कांहीं विश्वास- घात होऊन दगाफटका होणार अशी धास्ती वाटल्याचें बेमालुम सोंग त्या दोघां सुभेदारांनीं केलें. पण त्यांस शांत करून, आलेला इसम हा दुसरा कोणी नसून माजी नागपूरकर राजे भोसले यांचा एक नातलग आहे व तोही याच कामाकरितां आला आहे असें दिवाणानें सांगितलें. यानंतर आलेल्या गृहस्थांनीं एक गोष्ट सांगितली कीं, परदेशी शिपाई फारच चांगले व विश्वासू. आमच्या नागपूरकडे तुमच्या सारख्याच परदेशी शिपायांनीं महाराजांच्या पायांवर हात मारून शपथ घेतली कीं, महाराज आम्ही जिवास जीव देऊं; पण तुम्हांस अंतर देणार नाहीं. आणि मग त्यांनीं महाराजांस चांगलीच मदत केली. राजाला त्यांनीं कैदेंतून

पळून जाण्यास साहाय्य केलें. इतकेंच काय पण ते स्वतः राजाबरोबर पळून गेले. असे परदेशी शिपाई वचनाचे सच्चे. ही हकीगत सांगून तो नागपूरच्या राजाचा नातलग व गोविंदराव दिवाण तेथून निघून दुसऱ्या खोलीकडे गेले. यानंतर दिवाण माघारीं आला. ' राजेसाहेब एकटे आहेत कीं नाहींत हें पाहण्यास मी वाड्यांत जातों तूं लगेच थोड्या वेळानें यांना घेऊन माझ्या मागोमाग ये' असें अंताजीस गोविंदराव दिवाणानें सांगितलें व तो वाड्यांत गेला.

राजवाडा दिवाणाच्या घरापासून एका हांकेच्या अंतरावर होता. तेव्हां अंताजीही लगेच या सुभेदारांना नवीन वेषांत घेऊन राजवाड्याकडे निघाला. तेथें कडेकोड पहारा होता. पण पहारेकऱ्यांनीं कोणत्याही प्रकारें अडविलें नाहीं कीं रोखिलें नाहीं. ही सर्व मंडळी राजवाड्यांत गेली. तेथें दिवाण वाट पाहात उभा होता. सुभेदार तेथें आल्याबरोबर दिवाण त्यांना घेऊन दालनांत गेला. तेथें राजेसाहेब एकटेच हुक्का पीत बसले होते. खोलींत कोणी बाई उभी होती. ही मंडळी आल्याबरोबर ती तेथून गेली.

नंतर महाराज व सुभेदार यांचे मुजरे झाले. महाराजांनीं बोलण्यास सुरुवात केली. वाड्यासमोर तुम्ही मला मुजरा केलात तेव्हांपासून मी तुम्हांस ओळखतों. यानंतर शिवगुलामसिंगानें महाराजांस आपला हुकूम काय आहे म्हणून विचारलें. यावर महाराजांनीं उत्तर दिलें कीं,

१ मुंबईस दंगाधोपा; २ सातारला हैद्राबादेहून कांहीं फौजफांटा येणें; ३ बेळगांवच्या बाजूस तंटाबखेडा होणें; ४ नर्मदेच्या अलीकडे हिंदुस्थानांतून लष्कर येणें या चार गोष्टी झाल्या म्हणजे बंडाची खूण पटली असें समजून तुम्ही आपल्या उद्योगास लागा. कंपनी सरकारनें माझी धनदौलत व राज्य सर्व कांहीं हिरावून घेतलेंही; व माझे कसे हाल मांडले आहेत ते तुम्ही पाहातां आहांतच. कर्नल लॉडव्हिक हा माझी येथून उचलबांगडी करून मला मुंबई, कलकत्ता किंवा इंग्लंड या ठिकाणांपैकीं कोठें तरी नेऊन ठेविणार आहे. तेव्हां तुम्हीं चांगले विश्वासू लोक जमा करून, पलटण फितवून माझ्या बाजूला या. या आणीबाणीच्या वेळीं माझ्या उपयोगी पडा. मी तुम्हांस विसरणार नाहीं, मोठें इनाम देईन.

वरीलप्रमाणें राजेसाहेबांचें भाषण ऐकल्यावर शिवगुलामसिंगानें आपल्या डोक्याचा फेटा काढून राजेसाहेबांसमोर ठेविला आणि तो मोठ्या अदबीनें म्हणूं लागला कीं, 'महाराज आमच्या वरिष्ठाकडे याबद्दल कोणीही दगलबाजी व विश्वासघात करणार नाहीं अशी महाराजांनीं आमची खातरजमा करावी म्हणजे आम्ही आमच्या वचनापासुन तिळभरसुद्धां ढळणार नाहीं. सरकारांनीं निर्धास्त असावें.' यावर या बाबतींत यत्किंचितही काळजी करूं नका असें महाराजांनीं स्वतः जातीनें आश्वासन दिलें. यानंतर सुभेदाराला विडे देऊन निरोप देण्यांत आला व ही भेट संपली. त्यानंतर ते बाहेर पडले व रात्रीं १० वाजल्यानंतर छावणीकडे गेले. दुसरे दिवशीं सकाळीं रात्रीं घडलेल्या सर्व प्रकाराच्या लेखी जबान्या आपल्या समक्ष त्यांच्या गोऱ्या अधिकाऱ्यांनीं घेतल्या !

यानंतर सहाच दिवसांनीं म्हणजे १४ सप्टेंबरला अंताजी पुन्हां छावणींत गेला, आणि सुभेदारांना भेटून म्हणूं लागला कीं, राजेसाहेब तुमच्यावर फार खूष झाले. ते तुम्हांस एक मोठी मेजवानी देणार आहेत. हें ऐकून सुभेदार म्हणाले कीं, आम्हांस मेजवानी वगैरे कांहीं एक नको. महाराजांकडून आम्हांस खुणेदाखल कांहींतरी द्या म्हणजे त्याच्या साहाय्यानें हिंदी पलटणींचे लोक फितविण्यास बरें पडेल. यावर अंताजी म्हणाला कीं, दुसऱ्यास तुम्हांस महाराजांकडून शेलापागोट्याचा नजराणा देववितों. पुढें बरेच दिवस अंताजी व सुभेदार यांच्या गांठीभेटी कांहींच झाल्या नाहींत. नंतर बारा-तेरा दिवसांनीं अंताजीचा तपास करण्यासाठीं सुभेदार व हवालदार चंद्रसिंग गंध्याच्या दुकानीं गेले तेथें चौकशीअंतीं त्यांस असें कळलें कीं, अंताजी आतां आपल्या गांठीभेटीची टाळाटाळ करीत आहे. तेव्हां सुभेदारांनीं मोठ्या प्रयासांनीं अंताजीस गाठलें. त्यामुळें अंताजीचा नाइलाज झाला व त्यानें सुभेदारास असें सांगितलें कीं, उगाच संशयास कारण नको म्हणून तुमची गांठ वारंवार न घेण्याबद्दल राजेसाहेबांनीं व दिवाणांनीं सांगितलें आहे.

यापुढें अंताजी सुभेदारांना भेटण्याची जास्तच टाळाटाळ करूं लागला. तेव्हां त्याचा तपास घेण्यासाठीं म्हणून सुभेदारांनीं गंध्याच्या दुकानीं विचारपूस केली असतां त्यांस असें कळलें कीं, अंताजी वाईस निघून

गेला आहे. यानंतर सुद्धां अंताजी आपणांस भेटण्याचें मुद्दाम टाळतो असें सुभेदाराच्या लक्षांत आल्यावरून त्यांनीं ही गोष्ट आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानांवर घातली. तेव्हां तारीख ३० सप्टेंबरला ले. स्टॉकनें हवालदार चंद्रसिंगास एकट्यासच अंताजीचा शोध घेण्यासाठीं गांवांत धाडलें. हवालदारानें अंताजीची गांठ पडावी म्हणून त्यास पुष्कळ ठिकाणीं शोधिलें. पण तो लवकर सांपडला नाहीं. पण शेवटीं एकदांची अंताजीची व त्याची कशीबशी गांठ पडली. तेव्हां अंताजीनें हवालदारास जरा लांब अशा अडोशाच्या ठिकाणीं नेऊन सांगितलें कीं, महाराजांस सोलापुराहून वाईट निरोप आला आहे. तेव्हां हल्लीं त्यांचें मन स्वस्थ नाहीं. यानंतर दोघांच्या इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पा झाल्या. जातांना अंताजीनें हवालदारास छावणीच्या एका चौकीवर येऊन भेटतों असें सांगितलें. हवालदारानें लगेच दुसऱ्या दिवशीं ठरलेल्या चौकीवर अंताजीची वाट पाहिली; परंतु त्या दिवशीं अंताजी आला नाहीं. तेव्हां त्याचा शोध घेण्यासाठीं हवालदार गंध्याच्या दुकानीं गेला. हवालदारानें त्यास तेथेंच गांठिलें व एकादवेळेस अंताजी पळून जाईल म्हणून हवालदार तेथेंच बसला व त्यानें सुभेदारांस बोलावून घेतलें. सुभेदार तेथें आल्यावर अंताजीच्या व त्याच्या बऱ्याच गप्पा झाल्या. त्यांत इंग्रजाविरुद्ध कसें काय बंड उभारावयाचें, कोठें कशी दंगल माजवावयाची याविषयीं अंताजीनें वाटेल तशा गप्पा झोडल्या. पण सोलापुराहून वाईट बातमी आल्यामुळें महाराज अस्वस्थ आहेत असेंही अंताजीनें सुभेदारास सांगितलें. यानंतर ही भेट खलास झाली. सुभेदार छावणींत गेले. त्यांनीं झाला वृत्तांत गोऱ्या अधिकाऱ्यांना सांगितला. त्याची लगेच जबानी तयार झाली.

शेवटीं ७ ऑक्टोबर रोजीं सुभेदारांनीं अंताजीस कांहीं थापा मारून एक गाय विकावयाची आहे, अगदीं थोडक्यांत मिळेल असें आमिष दाखवून छावणींत आणिलें. तो छावणींत दाखल होतांच सुभेदारांनीं आपल्या गोऱ्या अधिकाऱ्यांना, आम्हांस फितुर करणारा ब्राह्मण आला आहे असा निरोप धाडिला. तेव्हां त्या पलटणीच्या कमांडिंग ऑफिसरच्या हुकुमावरून अंताजीस पकडण्यांत आलें. लगेच गोविंदराव दिवाण, अंताजीचा नातलग

पुरुषोत्तम सुगंधी (दुकानदार) व दिवाणाच्या वाड्यांत विडे वाटणारा हुजऱ्या या तिघांवर पलटण फितुर करण्याचा आरोप आहे, असें महाराजांस कळविण्यांत आलें व लगेच त्या तिघांना गिरफदार केलें. महाराजांनीं या गोष्टीस कोणत्याही तऱ्हेची आडकाठी घेतली नाहीं. अशा तऱ्हेनें या खऱ्या कीं बनावट फंदफितुरीच्या कारस्थानाची कोणत्याही प्रकारची परिसमाप्ति न होतां अशा अर्धवट स्थितींत शेवट झाला. आणि गोविंदराव दिवाण, अंताजी आणि पुरुषोत्तम सुगंधी व विडे देणारा हुजऱ्या हे तुरुंगांत पडले.

२३ नंबराच्या पलटणींतील हिंदी ऑफिसर व शिपाई यांच्यामध्यें फंद-फितुरी करून इंग्रजाची सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न केला हा जो भयंकर स्वरूपाचा आरोप सातारकरांवर करण्यांत आला त्याची हकीगत संक्षेपानें आतांपर्यंत दिली.

वर दिलेली हकीगतही शिवामुठीचे वेळीं सांगितल्या जाणाऱ्या कहाण्यां-पैकीं एकादी कहाणी आहे कीं काय असें वाटतें ! व असेंच कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांना वाटलें असावें. तेव्हां या एका आरोपाच्या जोरावर आपणांस राजाची उचलबांगडी करतां येणार नाहीं अशी त्यांची खात्री झाली आणि या आरोपाच्या जोडीला आणखी कांहीं भयंकर आरोप रचण्याच्या तयारीस इंग्रज लागले. महाराजांच्या बाबतींत त्यांच्यावर दुसरा आरोप असा होता कीं, नागपूरच्या पदच्युत झालेल्या अप्पासाहेब राजे भोंसले यांच्याशीं दळणवळण ठेवून त्याची मदत इंग्रजांविरुद्ध युद्ध करण्यासाठीं मिळविणें. हा आरोप करण्यास इंग्रजांस फारसे कष्ट पडले नाहींत. या नंतरचा तिसरा आरोप म्हणजे गोव्याच्या पोर्तुगीज सरकारशीं गुप्त कारस्थान करणें हा होय. छत्रपतींचा हा तिसरा गुन्हा मात्र अत्यंत भयंकर स्वरूपाचा व गंभीर असा आहे ! कारण या आरोपांत छत्रपतींना गोंवून टाकण्यासाठीं इंग्रजांस फार कष्ट करावे लागले. त्याची हकीगत चित्तवेधक आहे.

साताऱ्यास असलेली २३ नंबरची पलटण महाराजांनीं फितविली तरी एकाच पलटणीच्या जोरावर इंग्रजांची एवढी मोठी बलाढ्य सत्ता उलथून पाडणें शक्य नव्हतें म्हणून महाराजांनीं स्वतःच्या वतीनें इंग्रजांशीं युद्ध

करण्याकरितां आणखीं फौजफाटा जमा केला असें सोंग जगांत चांगलें सजून दिसावें म्हणून इंग्रजांनीं या सोंगाची सजावट चालविली. तरी या नवीन कारस्थानांस चांगला जोर चढेना. कारण, त्या वेळचा रेसिडेंट कर्नल लॉडव्हिक हा या खोट्यानाट्या गोष्टी तयार करण्यास अनुकूल नव्हता. तेव्हां ग्रँन्टनें (मुंबईचा गव्हनर) त्यास रेसिडेंटाच्या जागेवरून कमी करून त्या ठिकाणीं कर्नल ओव्हान्सची नेमणूक केली. हा मनुष्य या कामांत अत्यंत वाकबगार होता. ही नवीन नेमणूक होतांच कारस्थानास रंग चढूं लागला. १५ जून १८३७ ला कर्नल ओव्हान्स रेसिडेंटाच्या जागेवर रुजू झाला. पण त्यापूर्वीं १५ दिवस भाऊ लेले या नांवाच्या एका इसमाचा नातलग पांडुरंगपंत हा आठव्या पायदळ पलटणींतील ले. हार्न यांजकडे गेला व म्हणूं लागला कीं, इंग्रज सरकार जर चांगलें बक्षीस देईल व बातमी देणाराला त्याच्या अपराधाची पूर्णपणें माफी करील तर गोविंदराव दिवाण व प्रतापसिंह महाराज यांनीं इंग्रजांविरुद्ध केलेल्या गुप्त कटाविषयींचा कागदोपत्रीं पुरावा मी इंग्रज सरकारास देववितों. यानंतर पुन्हां पांडुरंगपंत हा त्या पलटणीचा अॅडज्यूटंट कॅ. डचुरॉक याच्याकडे गेला व म्हणूं लागला कीं, कंपनी सरकार एक हजार रुपये रोख विसार म्हणून देत असेल व कागद मिळाल्यानंतर दहा हजार रुपये बक्षीस म्हणून देणार असेल तर भाऊ लेले फंदफितुरीचे सर्व कागदपत्र साहेबाच्या स्वाधीन करण्यास तयार आहे.

वरीलप्रमाणें निरोप धाडल्यानंतर इतका वेळपर्यंत स्वतः बाजूला राहून केवळ निरोपानिरोपी करणारा भाऊ लेले हा जातीनें कॅ. डचूरॉककडे गेला व पांडुरंगपंतांनीं कळविल्याप्रमाणें कंपनी सरकार बक्षीस देण्यास तयार असेल तर फंदफितुरीचा कागदोपत्रीं पुरावा मी स्वतः देण्यास तयार आहें असें म्हणूं लागला. ह्या वेळीं कर्नल लॉडव्हिक हा रेसिडेंट असल्यामुळें त्याला याबाबतींत कांही करावेंसें वाटलें नाहीं. कारण सातान्यास असणाऱ्या २३ व्या पलटणींत राजानें फितुर केला या बनावट आरोपाची रचना करतांना त्यास फारच त्रास झाला व फसल्यासारखें झालें. आणि आतां तर त्याचें आसन डळमळीत झाल्यामुळें तो या बाबतींत उदासीन होता; पण त्याच्यानंतर क. ओव्हान्स हा त्याच्या जागीं येतांच या कारस्थानास जोर चढला. कर्नल ओव्हान्सनें भाऊ लेले यास बोलावून

आणिलें. पहिल्यांदां त्यास विसार म्हणून हजार रुपये देण्याचें ठरविलें. पण कॅ. डचूरॉकनें प्रत्यक्ष पैसे देतांना त्याच्या हातावर १५० रुपयेच टिकविले व त्यानें आणिलेले कागदपत्र चांगले महत्त्वाचे आहेत अशी साहेबाची खात्री झाल्यास त्याला चांगलें बक्षीस देऊं असें सांगितलें व तशा अर्थाचा लेखही लिहून दिला.

ते दीडशें रुपये घेऊन भाऊ लेले कोंकणांत कोठें तरी कागदपत्र आणण्याकरितां गेला. तो जवळ जवळ एक महिन्यानें माघारीं आला व ठरल्याप्रमाणें कागदपत्र मिळणें शक्य नाहीं अशा रडकथा सांगूं लागला. तेव्हां कॅ. डचूरॉक रागावला व त्याला हाकलून देण्याच्या विचारांतच तो होता. पण ओव्हान्सनें त्याला पुन्हां एकदां प्रयत्न करून पहा म्हणून संधी दिली. तेव्हां भाऊ लेल्यानें नागो देवराव याच्या मध्यस्थीनें बाळकोबा केळकराकडून फंदफितुरीचा पत्रव्यवहार मिळविला. नागो देवराव हा बाळकोबा केळकराचा मेव्हणा. हे दोघेही संकेश्वर मठाच्या शंकराचार्यांचे हस्तक होते. नागो देवरावाची कायमची वस्ती गोवें प्रांतांतील पेडणें गांवीं असे. बाळकोबा केळकर मात्र महाबिलंदर होता. तो फंदफितुरीचा पत्रव्यवहार भाऊ लेल्याच्या हवालीं एकदम करीना. तो थापा मारूं लागला व उडवाउडवीचीं उत्तरें देऊं लागला. बाळकोबा म्हणाला कीं, कागदपत्र एका सावकाराकडे ८०० रुपयांस गहाण पडले आहेत, तेव्हां ते सोडविण्याकरितां प्रथम ८०० रुपये रोख मिळाले पाहिजेत. तसेंच त्यानें सातारा प्रांतीं व अन्यत्र केलेल्या गुन्ह्याची त्यास पूर्ण माफी मिळाली पाहिजे. असें होत असेल तर हा पत्रव्यवहार मी रेसिडेंट साहेबाच्या हवालीं करीन.

भाऊ लेले याच्या मध्यस्थीनें हा पत्रव्यवहार रेसिडेंटानें मोठ्या जिकिरीनें मिळविला. बाळकोबास त्यानें केलेल्या अपराधाची माफी दिली. ८०० च्या ऐवजीं ४०० रुपयांस हा व्यवहार ठरला. केलेल्या अपराधाची लेखी माफी व ४०० रुपये रोख हातीं घेतल्यावर बाळकोबानें एका रुमालांत बांधलेल्या ४२ पत्रांचें एक पुडकें व त्याच्याबरोबर महाराजांचे म्हणून कांहीं शिक्के रेसिडेंटाच्या हवालीं केले. एवढा मोठा फंदफितुरीचा पत्रव्यवहार हातीं पडल्यावर छत्रपतींची गठडी वळण्यास काय उशीर ? कर्नल ओव्हान्स व रॉबर्ट ग्रँन्ट आधींच टपून बसले होते व आतां तर त्यांना आयतेंच साधन मिळालें. त्यांनीं छत्रपतींची

उचलबांगडी करण्याची तयारी केली. साताऱ्यास कर्नल ओव्हान्स येऊन दाखल झाल्याबरोबर छत्रपतींनीं स्वतः जातीनें जाऊन त्याची गांठ घेतली व मित्रत्वाच्या नात्यानें वागण्याबद्दल विनंति केली. ओव्हान्स वरकरणीं स्नेहभाव दाखवीत होता. पण त्याच्या अंतःकरणांत मात्र महाराजांविषयीं हलाहल होतें.

आरोपांची छाननी : : २७

सातारच्या महाराजांवर पहिला आरोप असा होता कीं, त्यांनीं २३ नंबरच्या पलटणीस फितूर करून तिला इंग्रजांविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला. महाराजांवर हा आरोप शाबीत करण्यासाठीं गोळा करण्यांत आलेला पुरावा इतका लेचापेंचा व लंगडा आहे कीं, त्याकडे पाहून कायद्याचें विशेषसें ज्ञान नसणारा एकादा साधा माणूस सुद्धां त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडवील. मग कायदे पंडिताची गोष्ट दूरच. कारण या फितुरीच्या कामास पहिल्यांदां सुरुवात झाली ती रस्त्यांत ! तीही अंताजी नांवाच्या एका अनोळखी माणसामार्फत. हा अंताजी काळा का गोरा हें सबंध आयुष्यांत महाराजांनीं पाहिलें नव्हतें. तसेंच या माणसाची इतर माहितीही कोठें आलेली नाहीं. तो एक अगदीं सामान्य पोटभरू मनुष्य. तेव्हां इंग्रज सरकारला उलथून टाकण्यासारखें अत्यंत जोखमीचें व एखादे वेळेस स्वतःच्या जीवावर बेतणारें कारस्थान असल्या एकाद्या लुंग्या सुंग्या माणसाच्या हातीं देण्याइतके महाराज दुधखुळे होते काय ? फंदफितुरीच्या कारस्थानांत एकादा तरी दिवाण हा पाहिजेच ! त्याखेरीज कसलें कारस्थान व कसलें राजकारण. म्हणून या कारस्थानांत एका दिवाणाचें नांव गोंवण्यांत आलें आहे. सदरहू दिवाणाचा खऱ्या म्हणजे राजकारणाच्या दिवाणगिरीशीं संबंध नांवापलीकडे नव्हता. त्याचे वडील दिवाण होते. पण ते दौलतीकडील दिवाण नसून महाराजांचे खाजगी कारभारी होते. म्हणून गोविंदराव दिवाणास

लोक 'दिवाण' म्हणत. त्याचे वडील कालवश होऊन १० वर्षें झालीं होतीं. गोविंदराव स्वतः महाराजांचा खाजगी कारभार पाहत असे. त्याला ८०० रुपये पगार होता. इतकेंच. याशिवाय गोविंदरावाचा तथाकथित राजकारणाशीं कांहीं एक संबंध नव्हता. असें जरी होतें तरी नगास नग या नात्यानें या कपटकार-स्थानांत त्याचें नांव गोंविलें गेलें. खुद्द गोविंदराव दिवाणाच्या तोंडून प्रस्तुत आरोपाबद्दलच्या पुराव्याची जबानी कशी जबरदस्तीनें काढण्यांत आली तें पाहिलें म्हणजे तर हा आरोप अगदीं बनावट होता याची खात्री पटते.

गोविंदराव दिवाणामार्फत कांहीं तरी फंदफितुरीचें कारस्थान चालू आहे अशी शंका कर्नल लॉडविकला आल्याबरोबर किंवा अशी शंका या दिवाणा-विषयीं घेणें श्रेयस्कर आहे असें रेसिडेंटास वाटल्याबरोबर, त्यानें गोविंदरावास गिरफदार केलें. त्यास कांहीं दिवस साताऱ्यास ठेविल्यानंतर त्याची रवानगी पुण्यास केली. मग तेथून त्यास नगरास नेण्यांत आलें. येथें मात्र त्याला कैदी म्हणून ठेविण्यांत आलें. अशा तऱ्हेनें पहिल्यांदां त्याची नुसतीच व्यवस्थळी केली. त्या प्रथम साताऱ्यास त्यास मुद्दामच दारूगोळ्याच्या कोठारांत कोंडून ठेविला. त्या कोठाराच्या बाहेर बंदुकींचा व नंग्या समशेरींचा खडा पहारा होता. अशा तऱ्हेनें तो बिचारा पार भेदरून जावा अशी व्यवस्था केली होती. नंतर नगरला तर त्यास डाके घालणाऱ्या एखाद्या बदमाषाप्रमाणें कैदेंत ठेवून त्याचा मानभंग कर-ण्यांत आला. हे सर्व प्रकार चालू असतां त्याच्यावर आरोप कोणता आहे हें सुद्धां त्यास कळविण्यांत आलें नाहीं. अशा भयंकर तऱ्हेनें गोविंदरावास पाण्याहून वातळ केल्यानंतर त्याच्याकडे त्याचा एक नातलग सखाराम बल्लाळ यास पाठ-विण्यांत आलें. सखाराम बल्लाळनें गोविंदरावाकडे जाऊन तूं एक कबुलीजबाब लिहून देत असलास तर तुला माफी देऊन सोडून देण्याची व्यवस्था करतों असें सांगितलें. सखाराम बल्लाळ हा महाराजांचा धाकटा भाऊ आप्पासाहेब व बाळाजी-पंत नातू यांचा हस्तक होता. त्यास कर्नल ओव्हान्सनें गोविंदराव दिवाणाकडून एक कबुलीजबाब लिहून आण म्हणून समज दिली होती. या हस्तकाला नगर येथें गोविंदराव दिवाणास भेटण्याची परवानगी होती. तेव्हां १७–१८ दिवस तुरुंगांत खेटे घालून सखाराम बल्लाळनें गोविंदरावाचा पिच्छा पुरविला व 'तूं

कबुलीजबाब लिहून दे, तुला सर्व अपराधांची माफी देववितों. तूं घाबरूं नकोस. या जबाबामुळें तुला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाहीं. फक्त या तुझ्या जबानीचा उपयोग महाराजांविरुद्ध करण्यांत येईल इतकेंच. तेव्हां तुला भिण्याचें कांहीं एक कारण नाहीं, तुझ्या जिवाला धक्का बसणार नाहीं, अशी व्यवस्था करण्याचें मी तुला वचन देतों. उगाच कुत्र्याचें मोतानें मरूं नकोस. जबाब दे व मोकळा हो.' असें परोपरीनें सांगून त्याचें मन वळविलें.

बिचारा धाकद्पटशाला कंटाळला व त्यां नरकतुल्य वातावरणांतून स्वतःची मुक्तता करून घेण्याच्या आशेनें इंग्रज म्हणतील तसा कबुलीजबाब लिहून देण्यास तो तयार झाला. त्यानें तारीख २४ ऑगस्ट १८३७ ला एक कबुलीजबाब लिहून दिला. सखाराम बल्लाळाला या कामगिरीबद्दल अप्पासाहेबां-कडून जमीनजुमला बक्षीस देण्यांत आला. जबाब लिहून दिल्याबरोबर कबूल केल्याप्रमाणें त्याची मुक्तता ताबडतोब व्हावयास पाहिजे होती; पण तसें झालें नाहीं. कारण त्याच्या जबाबाचें काम पूर्ण झालें नव्हतें. कर्नल ओव्हान्सला त्याचा उपयोग अद्याप करून घ्यावयाचा होता. साताराच्या राजाची म्हणजे छत्रपतींची उचलबांगडी अद्यापि झाली नव्हती. ती गोष्ट १८३९ मध्यें तडीस गेल्यानंतर गोविंदरावाची सुटका करण्यांत आली. गोविंदराव तुरुंगातून बाहेर आल्याबरोबर सगळीकडे खरा प्रकार सांगत सुटला. दिवाणाचा तोंडी जबाब घेण्याकरितां त्यास कमिशनपुढें उभें करण्यांत आलें. तेव्हांसुद्धां त्यानें लेखी जबाबाविरुद्ध जबानी दिली. नगर येथें तुरुंगांत असतांना जो लेखी जबाब सक्तीनें घेण्यांत आला तो अगदीं त्रोटक स्वरूपाचा होता. तो असा कीं, 'सरकारला कळावें म्हणून मी पुढील जबाब लिहून देतों. अंताजी वाघ यानें पलटणींतील दोन सुभेदार आणिले होते. त्यांना छत्रपती महाराजांच्या भेटीकरितां मी घेऊन गेलों. त्या वेळीं महाराजांनीं दोस्ती ठेविण्याबद्दल त्यांना माझ्या देखत सांगितलें.'

हा अगदीं चारच ओळीचा जबाब त्यानें दिला व हा जबाबसुद्धां कमिशनपुढें टिकून राहिला नाहीं. पोलिस नेहमीं नाना तऱ्हेच्या यमयातनांनीं संशयित आरोपीची छळणूक करून त्याला माफीचा साक्षीदार म्हणून तयार करतात व मग पोलिसास पाहिजे तशा कपोलकल्पित कथा त्याच्या तोंडून ते

वदवून घेतात व भर न्यायसभेंत न्यायदेवतेचा खून करतात. तोच प्रकार तेव्हां झाला. सत्याची चाड असणारा एकादा माफीचा साक्षीदार पोलिसांच्या जांचांची पर्वा न करतां कोर्टामध्येंच खरा प्रकार सांगून टाकतो व पोलिसांच्या पुराव्याचा खेळखंडोबा करतो, तसेंच गोविंदरावानें केलें. कमिशनपुढें साक्षीसाठीं उभें केल्यावर त्यानें पुढीलप्रमाणें जबानी लिहून दिली. 'मी आतां स्वतःच्या इच्छेनें व अक्कलहुषारीनें असें सांगतों कीं, मी सातारकरांचा वंशपरंपरेनें नोकर आहें. माझा बाप दिवाण होता, तो मरण पावून दहा वर्षें झालीं. मी अटकेंत जाईपर्यंत खाजगी दिवाणाचें काम करीत होतों. माझा पगार ८०० रु. होता. साताऱ्यास असलेल्या २३ नंबरच्या पलटणींतील कोणत्याही सुभेदाराची व माझी ओळख नाहीं. कोणीही सुभेदार माझे घरीं भेटण्यास आला नव्हता.' ह्या गोविंदरावाचा जबाब ऐकून कमिशनमधील मंडळी हंसूं लागलीं. तेव्हां त्यांनीं त्याला सुभेदाराच्या जबान्या वाचून दाखविल्या. त्यांनीं फंदफितुरी कशी केली हा सर्व वृत्तान्त पुन्हां एकदां वाचून दाखविला व मग खोदून प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. तेव्हां त्यानें एकच उत्तर दिलें कीं, 'मला यांतील कांहीं एक माहीत नाहीं. हें सर्व बनावट आहे.'

गोविंदरावास कैदेंत ठेवून त्याचे नानातऱ्हेनें हाल करून नंतर त्यास त्यानें न केलेल्या अपराधाची माफी करितों, तुरुंगांतून सोडतों अशी लालूच दाखवून शेवटीं मोठ्या प्रयत्नानें त्याच्याकडून मिळविलेल्या लेखी जबाबाचा असा सोळा आणे बोजवारा कमिशनपुढें वाजला असतां सुद्धां गोविंदरावाचें म्हणणें खोटें व सुभेदाराचें म्हणणें खरें असें कमिशनमधील सभासदांना वाटलें हें केवढें आश्चर्य! अथवा आश्चर्य कसलें! ही इंग्रजांची नियतच!

प्रतापसिंह महाराजांवर करण्यांत आलेला दुसरा भयंकर आरोप म्हणजे त्यांनीं पोर्तुगीज सरकारचे गोवे येथील गव्हर्नर डॉन मॅन्युअल यांच्याशीं गुप्त पत्रव्यवहार केला हा होय. पोर्तुगीज सरकारकडून तीस हजार फौज (१५ हजार पोर्तुगीज व १५ हजार फ्रेंच) इंग्रज सरकारची सत्ता हिंदुस्थानांतून नाहींशी करण्याकरितां मागविली व या कामासंबंधीं पोर्तुगीज सरकारचे व्हाईसरॉय व सातारकर छत्रपती यांच्यामध्यें करारमदार झाले होते, असें इंग्रजांचें म्हणणें

होतें. पण हा आरोप ज्या पत्रांच्या आधारें छत्रपतींवर करण्यांत आला तीं पत्रें एकंदर बेचाळीस आहेत. तीं इंग्रजांनीं कशीं मिळविलीं, तीं मिळविण्याकरितां कोणकोणत्या लटपटी व खटपटी केल्या व कोणाला किती पैसे चारले या प्रकरणाची हकीगत गेल्या प्रकरणीं आलीच आहे. हा सर्व पत्रव्यवहार नागो देवराव, बाळकोबा केळकर यांचे मार्फत मिळविला असें कर्नल ओव्हान्स यांचें म्हणणें होतें. तेव्हां हे दोन इसम काय दर्जाचे होते हें पाहिलें पाहिजे.

नागो देवराव हा वांईचा राहणारा असून तो संकेश्वर मठाच्या शंकराचार्यांचा हस्तक होता. बाळकोबा केळकर हा जातीनें ब्राह्मण पण तो पुंड व दरोडेखोर लोकांच्या टोळीचा म्होरक्या होता. संकेश्वरमठाचे शंकराचार्य जगद्गुरु या नात्यानें सातारा, बेळगांव, गोवें व कोंकणपट्टी या ठिकाणीं संचार करीत व मठासाठीं जगद्गुरु म्हणून दक्षिणा गोळा करीत. १८१८ सालीं पेशव्यांचा पराभव होऊन जिकडे तिकडे 'स्थिरस्थावर' झाल्यावर शंकराचार्य संचारार्थ निघाले. मठासाठीं दक्षिणा गोळा करूं लागले. पण या वेळीं सातारकर छत्रपतींच्या क्षात्रियत्वाबद्दल निघालेल्या वादांत शंकराचार्यांनीं विरुद्ध मत दिलें. म्हणून शंकराचार्यांचें व महाराजांचें वैर नव्हतें. शंकराचार्य संचार करीत असतांना लोकांना आपल्या हस्तकांच्याकडून धाकदपटशहा देतात व दक्षिणा-उकळतात; धाकदपटशानेंही भागलें नाहीं तर जुलूम-जबरदस्तीनें वसूल करतात असा शंकराचार्यांबद्दल बभ्रा ऐकूं येऊं लागल्यामुळें महाराजांनीं खालीलप्रमाणें जाहीरनामा काढला : 'शंकराचार्यांस कोणास कांहीं दक्षिणा देणें असल्यास ती स्वखुषीनें येईल तेवढी द्यावी व शंकराचार्यांनींही या बाबतींत कोणावर सक्ति करूं नये.' या जाहीरनाम्यामुळें शंकराचार्यांस दक्षिणा गोळा करणें अशक्य झालें तेव्हां गोवें, कोंकण, वेंगुर्लें, रत्नागिरी इकडे शंकराचार्यांना नागो देवराव व बाळकोबा केळकर या दोघांचा चांगला उपयोग होई. अशी या दोघांची माहिती आहे. तेव्हां या दोघांकडून इंग्रजांस मिळालेला पत्रव्यवहार हा काय लायकीचा असेल याची कल्पना सहज करतां येईल. तसेंच वेदोक्त प्रकरणीं शंकराचार्य व महाराज यांचें चांगलेंच बिनसलें होतें. बाळाजीपंत नातू म्हणजे शंकराचार्यांच्या बाजूचें

प्रमुख घेंड. नागो देवराव व बाळकोबा केळकर हे तर स्वामींचे हस्तक. तसेंच बाळाजीपंत नातू व इंग्रज यांचे जिव्हाळ्याचे संबंध. या सर्व गोष्टी शेजारीं शेजारीं ठेविल्यावर हें कारस्थान कसें तयार झालें असेल याची सहज कल्पना येईल.

पत्रें देणारासंबंधीं इतकी माहिती सांगितल्यावर आतां प्रत्यक्ष त्या पत्रांकडेच वळूं. सातारचे प्रतापसिंह महाराज व गोव्याचे पोर्तुगिज गव्हर्नर डॉन मॅन्युअल यांच्यामध्यें झालेल्या पत्रव्यवहाराची संख्या ४० होती. या पत्रांपैकीं एकही पत्र खुद्द महाराजांच्या किंवा डॉन मॅन्युअलच्या सहीचें नव्हतें ! छत्रपति प्रतापसिंह महाराजांनीं लिहिलेलीं अशीं एकंदर सात पत्रें पुढें करण्यांत आलीं होतीं. तीं सर्व बाळकोबा केळकराच्या टोळींतील मोरो जोशी नांवाच्या इसमानें लिहिलीं होतीं. याशिवाय डॉन मॅन्युअलकडून आलेल्या पत्रांपैकीं २ पत्रें या मोरोबा जोश्याच्याच हस्ताक्षराचीं आहेत. म्हणजे सातारचे छत्रपति व डॉन मॅन्युअल यांच्या पदरीं हा एकच इसम पत्रें लिहिणारा कारकून होता कीं काय कोण जाणें ? याप्रमाणेंच दाजी व बल्लाळ वैद्य या एकाच इसमानें डॉन मॅन्युअलच्या नांवानें २, महाराजांच्या नांवानें १ अशीं पत्रें लिहिलीं आहेत. हेंही पण वरीलप्रमाणेंच आश्चर्यकारक आहे. हा इसम बाळकोबाच्या टोळींतच होता.

त्याचप्रमाणें नाना फाटक यानें डॉन मॅन्युअलच्या नांवानें ८ पत्रें व छत्रपतींच्यातर्फें एक अशीं पत्रें लिहिलीं आहेत. रावजी कोटनीस व सखाराम यांनीं प्रत्येकीं एक एक पत्र लिहिलें आहे. नारायण चित्रे या गृहस्थानें छत्रपतीचें एक व डॉनचें एक अशीं पत्रें लिहिलीं आहेत. ज्या इसमानें हीं पत्रें आणिलीं त्याच्या सांगण्याप्रमाणें पत्रांचें वर्गीकरण करण्यांत आलें व त्यांचीं नांवें खटल्यांत नोंदविण्यांत आलीं.

यानंतर असा एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो कीं, हा पत्रव्यवहार जो सांपडला तो वास्तविक सातारचे छत्रपति किंवा डॉन मॅन्युअल यांपैकीं कोणाजवळ तरी सांपडावयास पाहिजे होता. पण तसें न होतां तो नागो देवराव यांजवळ सांपडला. बरें तो त्यानें महाराजांजवळून किंवा डॉन मॅन्युअलकडून गफलतीनें पळवून आणिला अशा अर्थाचा कांहीं तरी त्याचा जबाब अथवा पुरावा हवा होता. पण तोही नाहीं. या सर्व कागदपत्रांबरोबर नागो देवरावानें

राजाचे शिक्कामोर्तब म्हणून कांहीं शिक्केही दिले होते. त्या शिक्क्यांचा आतां विचार करूं.

पहिल्यांदां शिक्क्यांचें महत्त्व सांगणें जरूर आहे. या शिक्क्यांना राजकारणी सर्व लिखाणांत राजाच्या सहीची किंमत गणली जाई. तेव्हां हा शिक्कामोर्तब अत्यंत महत्त्वाचा समजत व फारच कडेकोट बंदोबस्त ठेवीत. तरी सुद्धां घटकाभर असें जरी धरून चाललें कीं, छत्रपतींनीं आपले शिक्के प्रस्तुतच्या गुप्त राजकारणासाठीं नागो देवरावाजवळ दिले, तरी या शिक्क्यांच्या बाबतींत हें प्रकरण चांगलेंच अंगाशीं येतें. कारण महाराजांचे म्हणून जे शिक्के पुराव्यांत दाखल केले आहेत ते महाराजांच्या नांवाचे मुळीं नाहींतच. त्या शिक्क्यांवर ' श्री राजा शिवाजी छत्रपती आधार हाति जय वतिनतखार ' असें शब्द आहेत. याशिवाय हा शिक्का आकारानेंही मोठा आहे. शिक्क्यांत उल्लेखिलें जाणारें 'छत्रपती शिवाजी' हें नांव 'स्वराज्य संस्थापक' शिवाजी महाराजांच्या नांवाशीं साम्य दाखविणारें आहे म्हणून त्यांनीं हा शिक्का घूसडून दिला. त्याचा अस्सल शिक्कामोर्तब या पुस्तकांत अन्यत्र चित्रांत दिला आहे. हा शिक्कामोर्तब चारशें रुपयांस खरेदी करण्यांत आला. याशिवाय सातारच्या महाराजांचा म्हणून आणखी एक शिक्कामोर्तब पुराव्यांत दाखल केला आहे. त्याच्याविषयीं सांगावयाचें म्हणजे—तें तर फारच आश्चर्य आहे. कारण गेल्या शिक्क्यांत नांवांचा तरी कांहीं मेळ बसतो. पण हा शिक्का वर उल्लेखिलेल्या शिक्क्यावर ताण करतो. धारवाडचे पोलिटिकल एजंट डन्लॉप यांस हा प्रथम मिळाला. म्हणजे त्यांनीं तो अत्यंत प्रयासानें मिळविला व सातारकर महाराजांचा म्हणून कर्नल ओव्हान्सकडे पाठवून दिला. पण इंग्रज सरकारच्या दुर्दैवानें या शिक्क्यांनें तर फारच बोजवारा उडविला. 'राजा शाहू नरपति हर्षनिधान सदाशिव बाजीराव मुख्य प्रधान' हें ह्या शिक्क्यावर असणारें नांव महाराजांचें नाहीं. त्यांतून थोरल्या शाहू महाराजांचें म्हणावें तर त्यांचा मुख्य प्रधान सदाशिव बाजीराव या नांवाचा कधींच नव्हता. तेव्हां या शिक्क्यांचा व महाराजांचा बादरायणी संबंध देखील लागत नाहीं. याशिवाय हा शिक्का संकेश्वर मठांत तेथील शंकराचार्यांच्या निधनानंतर त्यांच्या राहत्या घरीं जे कांहीं कागदपत्र मिळाले त्यांत होता. असो, हें शिक्क्यांचें कारस्थान

अत्यंत खोटें व कपटकृत्यांनीं भरलेलें आहे. या शिक्क्यांच्या पुराव्यावरून तर असेंच वाटतें कीं, एकदां मनुष्य मत्सरानें पछाडला म्हणजे मग त्याच्या बुद्धीला भ्रम पडतो व तो साध्या गोष्टींत सुद्धां चुका करतो.

प्रस्तुतच्या पत्रांविषयीं सातारकर महाराज व डॉन मॅन्युअल या दोघांना विचारलें असतां त्यांनीं अगदीं चक्क सांगितलें कीं, हीं सर्व पत्रें बनावट आहेत; त्याबद्दल आम्ही जबाबदार नाहीं. या उभयतांकडून असा खडखडीत जबाब आला असतां इंग्रजांनीं कडक शिस्त फक्त छत्रपतींवरच धरिली. कारण छत्रपति हा सर्वस्वीं इंग्रजांच्या कृपाछत्राखालीं जगणारा अगदीं हतबल व निःप्राण असा सामान्य संस्थानिक. तेव्हां त्या बिचाऱ्यावर या बनावट पत्रांच्या आधारानें इंग्रजांशीं बेइमानी केल्याचा आरोप ठेवून त्यास अशी जबरदस्त शिक्षा केली कीं, त्यामुळें बिचाऱ्यास गादीस सुद्धां मुकावें लागलें. सातारकरांच्या बाबतींत असा नरसिंह अवतार धारण करणारें इंग्रज सरकार पोर्तुगीज सरकारापुढें इतकें शेळपट कां होतें यांतच सारी गोम आहे. कारण असें कीं, डॉन मॅन्युअलसारखा एक जबाबदार पोर्तुगीज अधिकारी या राजकारणाच्या भानगडींत पडतो तेव्हां त्यानें केलेल्या या पत्रव्यवहाराच्या बाबतींत इंग्रज सरकारनें त्याच्या वरिष्ठाकडे तक्रार करावयास हवी होती. हा पत्रव्यवहार सामान्य असता तर इंग्रज सरकारचें हें मौनव्रत एकाद् वेळेस क्षम्य ठरलें असतें. पण हा पत्रव्यवहार सत्तेची उलथापालथ करणारा असतांना सुद्धां इंग्रज सरकार एका शब्दानेंही पोर्तुगीज सरकारकडे तक्रार करीत नाहीं किंवा प्रस्तुत कृत्याबद्दल जाब विचारीत नाहीं याचें मोठें आश्चर्य वाटतें.

याच अपराधाबद्दल इकडे सातारकरांस स्वतःच्या राज्यास मुकावें लागतें; इतकेंच काय पण त्या बिचाऱ्याची स्वतःच्या राजधानींतून उचलबांगडी होऊन त्यास काशीस कायमचा बंदिवास पत्करावा लागतो. अशी भयंकर सजा ज्या अपराधाबद्दल इंग्रज देतो त्या अपराधाचा पुरावा जर तितकाच भक्कम आहे असें इंग्रजास वाटतें तर आपणांविरुद्ध बंड पुकारण्याकरितां व आपली सत्ता उलथून लावण्याकरितां तीस हजार फौजेची मदत करण्यास तयार झालेला डॉन मॅन्युअल इंग्रजांनीं तसाच मोकळा खास सोडला नसता. 'आमच्या संस्थानिकास

आमच्याविरुद्ध बंड पुकारण्यासाठीं मदत करीत आहेस म्हणून आम्ही तुझ्यावर मोहीम कां करूं नये' असा एकादा तंबीचा खलिता मुंबईच्या गव्हर्नरानें गोव्याच्या गव्हर्नरास धाडण्यास काय हरकत होती ?—कीं इंग्रज सरकार पोर्तुगीज सरकारचा समाचार घेण्यास समर्थ नव्हतें ? किंवा गोव्याच्या गव्हर्नरचे लिस्बन येथील सरकाराकडे तरी 'तुमचा गोव्याचा गव्हर्नर आमच्याविरुद्ध कांहीं कारस्थान करितो आहे, सबब त्याच्याविषयीं चौकशी करा किंवा या उपद्व्यापी गव्हर्नरास माघारीं बोलवा' अशा तऱ्हेचें कोणतेंही मागणें किंवा बोलणें मुंबईच्या गव्हर्नरानें किंवा लंडन येथील ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरानें पोर्तुगालच्या वरिष्ठ सरकाराकडे करावयास पाहिजे होतें. पण तसें झालें नाहीं. या एकाच गोष्टीवरून अगदीं उघड दिसतें कीं, सातारकरांविरुद्ध उभें केलेलें हें दुसऱ्या आरोपाचें कडच्याळसुद्धां अगदीं बनावट व कोण्याही शाहण्या माणसानें फुंकर घातल्याबरोबर उडून जाण्यासारखें होतें. पार्लमेंटचे एक सभासद मि. ह्यूम यांनीं चौकशी केली तेव्हां डॉन मॅन्युअलनें एकदांच चक्क व खडखडीत जबाब धाडिला कीं, 'हा सर्व पत्रव्यवहार खोटा व बनावट आहे व त्याचा माझ्याशीं कांहीं एक संबंध नाहीं.'

बहुत शर्तीनें सातारकर महाराजांच्या विरुद्ध पुरावा गोळा करणाऱ्या कर्नल ओव्हान्सला असा एक जाहीरनामा मिळाला कीं, ज्या जाहिरनाम्याच्या योगानें हिंदुस्थानांतील सर्व हिंदी फौजेला महाराजांनीं इंग्रज सरकाराविरुद्ध बंड पुकारण्यास चिथविलें ! हा जाहीरनामा सातारकर महाराजांच्या नांवानें कोणी खोटाच तयार केला होता. त्याच्यावर छत्रपतींचे शिक्के उठविले होते व असें करून जणूं काय खरोखरीच छत्रपतींनीं हा जाहिरनामा काढिला आहे असें दाखविण्याचा डाव होता. हा खोटा जाहिरनामा तयार करण्यांत कर्नल ओव्हान्स यास त्याच्या हस्तकांचें साहाय्य होतें. त्यांतील मुख्य बाळाजीपंत नातू हा होता हें सांगावयास नकोच. आपल्याविरुद्ध कांहींतरी कागदोपत्रीं खोटा पुरावा तयार करण्याचें काम चालू आहे, असा संशय येतांच महाराजांनीं मुंबई सरकारला खरा प्रकार ताबडतोब कळविला व माझ्याविरुद्ध तयार होत असलेल्या कागदपत्रांशीं माझा कांहींएक संबंध नाहीं असें स्पष्ट कळविलें. पण हें

पत्र मुंबई सरकाराकडे ओव्हान्सनें धाडिलेंच नाहीं. तें मधल्यामध्येंच दडपून ठेविलें. त्यामुळें योग्य वेळीं तक्रार करून सुद्धां तिचा काडीइतका उपयोग झाला नाहीं. ह्या सर्व हकीगती पुढें कंपनीचे डायरेक्टर्स व शेअरहोल्डर्स यांच्या कानांवर बॅरिस्टर थॉमसन यानें घातल्या. परंतु त्या वेळीं सातारच्या महाराजांची चौकशी संपून त्यांना गादीवरून दूर करण्यांत आलें होतें व त्यांची रवानगी कायमचीच काशीस झाली होती. या गोष्टी चव्हाट्यावर आल्यामुळें महाराजांचा असा कांहींच फायदा झाला नाहीं. पण इतिहासकारांस खरा प्रकार काय होता हें लिहून ठेविण्यास त्याचा चांगला उपयोग झाला आहे. त्या जाहिरनाम्याची हकीगत बॅ. थॉमसननें पुढीलप्रमाणें सांगितली आहे.

सन १८३८ च्या सप्टेंबरमध्यें कर्नल ओव्हान्सच्या हातीं बाळाजीपंत नातू व बाळाजी काशिनाथ किबे यांनीं सातारकर महाराजांची सही व शिक्के असलेला एक जाहिरनामा दिला. हा जाहिरनामा हिंदी सैन्यास उद्देशून होता व सर्व हिंदी लष्करानें इंग्रजांविरुद्ध बंड उभारून त्यांना हिंदुस्थानांतून हांकलून द्यावें म्हणून त्यांत प्रोत्साहन दिलें होतें. परंतु या जाहिरनाम्याच्या सत्यासत्यतेबद्दल कर्नल ओव्हान्सलाच शंका वाटत होती. शिवाय सातारकर महाराजांनीं आपल्याविरुद्ध कागदी खोटानाटा पुरावा गोळा होत आहे, पण त्याच्याशीं आपला कांहीं एक संबंध नाहीं असें कळविलें होतें. तेव्हां आतां महाराजांची ही तक्रार जरी ओव्हान्सनें मधल्यामध्यें दाबून ठेविली होती तरी तो कागद पुराव्यांत दाखल करण्यास तो बिचकूं लागला. तेव्हां हा जाहिरनामा त्यानें बाळाजीपंत नातूजवळच ४।५ महिने ठेवून दिला. आणि महाराजांना पूर्णपणें पेंचांत अडकवून त्यांची गादीवरून उचलबांगडी करण्याचा घाट तडीस जाण्याच्या बेतांत आला, तेव्हां त्यानें या कागदाचा उपयोग करून घेतला.

महाराजांवर आणखी एक आरोप होता तो असा कीं, महाराजांनीं नागपूरचे माजी राजे भोंसले अप्पासाहेब यांच्याशीं दळणवळण ठेवून त्यांजवळ २ लक्ष रुपये मागितले. हा आरोप अगदींच चमत्कारिक व सत्यास सोडून आहे. कारण या वेळीं अप्पासाहेब राजे भोसले यांना सुद्धां गादीवरून पदच्युत करण्यांत आलें होतें, त्यामुळें त्यांची स्थिति फार हलाखीची होती. अशा

वेळीं त्यांच्या जवळ दोन लाख रुपये मागण्याचा मूर्खपणा कोण करील ?

याशिवाय महाराजांवर आणखी एक अत्यंत किळसवाणा व घाणेरडा आरोप करण्यांत आला होता. तो म्हणजे आपला धाकटा भाऊ अण्णासाहेब याची बायको पळवून नेल्याचा ! हा आरोप महाराजांच्या मनास फारच झोंबला. पण वस्तुस्थिति फार निराळी होती. अण्णासाहेब बाहेरख्याली व छंगीभंगी होता. त्यानें पुण्याहून एक रक्षा आणिली होती व तिच्या संगतींत तो दंग असे; आणि बायकोचा इतका छळ करी कीं ती बिचारी जिवाच्या भीतीनें दीराजवळ येऊन राहिली. त्याचा अर्थ लगेच प्रतापसिंहाच्या शत्रूंनीं त्यांना पाहिजे तसा केला. पण या आरोपाचें खंडण क. ब्रिग्जनें लंडनमधील कोर्टापुढें स्पष्टपणें केलें तो म्हणतो, ' हा अत्यंत बदनामी करणारा आरोप सर्वथैव खोटा आहे. हिंदुस्थानांत असतांना माझ्या पाहण्यांत अनेक हिंदु राजे आले पण त्या सर्वांत प्रतापसिंहासारखा सच्छील, सद्वर्तनी पुरुष एकही माझ्या पाहण्यांत आला नाहीं. याच्या अगदीं उलट म्हणजे शहाजीसारखा स्त्रीलंपट मीं पाहिला नाहीं." या क. ब्रिग्जच्या म्हणण्यास रेसिडेन्ट रॉबर्टस्‌नेही पण दुजोरा दिला आणि या आरोपाचा फोलपणा सिद्ध केला.

न्यायाचें थोतांड : २८

महाराजांवर नाना तऱ्हेचे आरोप रचून त्यांना चारीमुंडी चीत करण्याची कंपनी सरकारची तयारी कशी जोरांत चालली होती, आरोपांचे पुरावे गोळा करतांना अथवा तयार करतांना इंग्रजांनीं आपली सदसद्विवेकबुद्धी कशी गुंडाळून बाजूला ठेविली होती, सत्यासत्यतेला तिलांजली देऊन आपल्या सैतानी बुद्धीचा व सत्तेचा मनास मानेल तसा उपयोग करण्याचा कसा चंग बांधला होता हें गेल्या प्रकरणीं महाराजांवरील आरोपांची छाननी करतांना दाखविलेंच आहे.

अखिल मानवजातींत इंग्रजांचा विशेष कांहीं निराळा आहे आणि त्यांनीं या एका गुणाच्या जोरावरच साम्राज्य उपभोगिलें. तो त्यांचा स्वभावविशेष म्हणजे त्यांच्या मनाचें दांभिक औदार्य; व त्यांची न्यायदानपद्धति. इंग्रज एकाद्या गोगलगाईलासुद्धां, आपल्या पायाचा धक्का लागला व तिनें तिचीं निरुपद्रवी शिंगें आपल्या अंगांत झांकून घेऊनही आपल्या अंगास तिनें केवळ शीतस्पर्श केला म्हणून तिला फांसावर चढवतील ! पण हें सर्व ते चुटकीसरसें करावयाचे नाहींत. त्यांत काय आहे ? ही गोगलगाय आपलें काय करणार, धरा आणि चिरडून टाका, असें म्हणून तिला ते चिरडून टाकणार नाहींत. तर तिला शिक्षा करण्यापूर्वीं मोठा न्यायदानाचा दरबार भरवतील; त्यांत चार वकील, चार बॅरिस्टर आपल्या बाजूचे; तर चार वकील, चार बॅरिस्टर त्या गोगलगाईच्या बाजूचे, असा मोठा थाट करून खटला मारे जोरांत चालवून



रंगो बापूजीची स्वाक्षरी



छत्रपति श्री शिवाजी महाराजांची मूळ राजमुद्रा (शिक्का)







– २ –



– ३ –

१,२,३ : छत्रपति प्रतापसिंह यांच्यावरील आरोपाबाबतचा पुरावा म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं पुढें आणलेले बनावट शिक्के

त्याचा डांगोरा सर्व जगभर झाला म्हणजे मग 'पहा बरें आतां आम्ही या दगलबाज व अपराधी गोगलगाईला सुळावर देत आहोंत. हें आम्हांला न्याया-साठीं केलें पाहिजे.' असें म्हणून तिला ते सुळावर देतील. हा या इंग्रजांचा गुणविशेष आहे.

तेवीस नंबराच्या पलटणींतील दोघां सुभेदारांमार्फत पलटण फितविण्याचा आरोप प्रतापसिंह महाराजांवर होता. तो मुंबई सरकारच्या कानावर गेला. त्याबरोबर मुंबई सरकारनें महाराजांची चौकशी करण्याकरितां एक गुप्त कमि-शन नेमिलें. कोणाही गृहस्थास त्याच्यावर करण्यांत येणाऱ्या आरोपांची नीट चौकशी व छाननी करण्यासाठीं व त्यास न्याय देण्यासाठीं म्हणून कमिशन किंवा लवाद नेमण्याचा शिरस्ता आहे. शिवाय अपराधी इसमास आपल्यावर काय आरोप आहेत याची पूर्ण जाणीव देऊन त्यावर त्याचें कांहीं म्हणणें असेल तें स्पष्टपणें मांडण्याची त्याला पूर्ण परवानगी देण्यांत येते. आरोप शाबित करण्याकरितां म्हणून विरुद्ध पक्षाकडून ज्या कांहीं साक्षी पुढें आणण्यांत आल्या असतील त्यांची उलटतपासणी करण्याचाही पण अधिकार आरोपीस किंवा त्याच्यातर्फेच्या वकिलास देण्यांत येतो. लवादांत नेमण्यांत येणारे पंच पूर्वग्रहदूषित नसतील असेच नेमण्यांत येतात. तसेंच ते कायदे जाणणारे असल्यास फारच चांगलें. असें करण्यांत हेतु हाच कीं, कोणाही व्यक्तीस निर्भेळ न्याय मिळावा व कोणावर उगाच कांहीं बालंट रचण्यांत आलें असल्यास त्यांतून त्याची मुक्तता होऊन त्यास उजळ माथ्यानें नांदतां यावें आणि किटाळ रचणाऱ्या मंडळींस अद्दल घडावी. कोणा व्यक्तीकडून खरोखरीच कांहीं अपराध घडला असेल तर त्यासही त्याबद्दल योग्य शासन मिळावें व त्यानें सन्मार्गास लागावें. असा या पंचाईत नेमण्याचा अत्यंत निर्मल व शुद्ध हेतु असतो. पण साहेबाची नीति सर्वच कांहीं न्यारी. तिला वरील सर्व बडेजाव पाहिजे, पण या व्यवस्थेंतील फक्त फायद्याचें कलम मात्र सगळेंच्या सगळें आपल्याकडे यावें अशी त्याची धडपड असते. ही एकच गोष्ट साध्य करण्याकारितां तो आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करतो. साताऱ्याच्या महाराजांस न्याय देण्याकारितां जें कमिशन नेमण्यांत आलें होतें तें वरील कसोटीस उतरणारें नव्हतें.

या कमिशनमध्यें नेमण्यांत आलेल्या तिघां गृहस्थांपैकीं कोणालाही कायद्याचें ज्ञान नव्हतें. तसेंच ते सर्व महाराजांचा द्वेष करणारे होते. यांपैकीं पहिले गृहस्थ म्हणजे बुलोबी. हा कायदेपंडित तर नव्हताच, उलट कंपनी सरकारच्या डायरेक्टरांकडून साताऱ्च्या महाराजांस आलेलीं स्तुतीपर पत्रें, तसेंच त्यांनीं खूष होऊन त्यांच्याकरितां धाडलेली रत्नजडित तलवार मधल्यामधें दडपून ठेवण्याच्या बाबतींत राबर्ट ग्रॅन्टला मदत करणारा होता. या एकाच गोष्टीवरून महाराजांविषयीं त्याचें मन कसें दूषित होतें हें चांगलेंच लक्षांत येतें. यानंतरचे दुसरे गृहस्थ म्हणजे साताऱचे रेसिडेंट लॉडविक. यांची या कमिशनमध्यें नेमणूक म्हणजे फिर्यादीनेंच न्यायाधीश होण्यासारखें विलक्षण होतें. तिसरे गृहस्थ ओव्हान्स. यांचें व महाराजांचें हाडवैर होतें. तेव्हां, या तिघांची नेमणूक म्हणजे पेटलेल्या आगींत तेल ओतण्यासारखेंच. तेव्हां कमिशनमार्फत महाराजांस न्याय मिळावा अशी उत्कट इच्छा असती तर कमिशन फारच निराळें नेमावयास पाहिजे होतें. यामध्यें मोठमोठ्या कायदेपंडितांचा समावेश व्हावयास पाहिजे होता. मुंबई सरकार मनांत आणतें तर त्यास अत्यंत कांटेकोरपणानें न्यायदान देणाऱ्या निःपक्षपाती अशा नुसत्या न्यायाधिशांचें सुद्धां कमिशन नेमतां आलें असतें. आणि असें झालें असतें तर कोणासही इंग्रजाविरुद्ध ओरडण्याचें कारण नव्हतें. पण कमिशन नेहमींच्या पद्धतीस सोडून नेमण्यांत आलें होतें. इतकेंच नव्हे तर कमिशननें उपयोगांत आणलेली न्यायदानाची पद्धत सुद्धां अत्यंत चीड आणणारी व अन्यायाची होती. कायद्याच्या मूलतत्त्वाची पायमल्ली करून सत्यास सप्तपाताळांत गाडण्याचा प्रयत्न त्यानें चालविला होता. खुनी, दरवडेखोर अशा कोणाही माणसावर भरण्यांत येणारा खटला त्याच्या समक्ष चालतो. हा हक्क त्याला देण्यांत येतो. पण जो हक्क एखाद्या बदमाष माणसाला सहज मिळतो तो सामान्य हक्क सुद्धां महाराज म्हणून संबोधल्या जाणाऱ्या सन्मान्य गृहस्थास नाकारण्यांत आला. ह्या कमिशनची चौकशी चालू असतां महाराजांस हजर राहण्याचा हुकूम नव्हता. इतकेंच काय पण त्यांच्यातर्फे कोणाही वकिलास सुद्धां तेथें जाण्याची परवानगी नव्हती. महाराजांस कमिशनचा रिपोर्ट देण्यांत येईल असें नुसतेंच मोघम सांगितलें

होतें. पण तो रिपोर्ट महाराजांनीं पुन्हां पुन्हां मागणी केली असतांनाही देण्यांत आला नाहीं.

आतां कमिशनपुढें आलेल्या साक्षीदारांसंबंधीं. खुद्द कमिशनरांनीं आपल्या रिपोर्टमध्यें असें नमूद करून ठेविलें आहे कीं, या महाराजांवर करण्यांत आलेल्या आरोपासंबंधीं मुख्य साक्षीदार अंताजी हा होय. पण हा गृहस्थ अत्यंत नादान मनुष्य होता. त्याच्या बोलण्यांत बोल नव्हता. तेव्हां त्याच्या बोलण्यावर व साक्षीवर विश्वास ठेवणें मूर्खपणाचें होईल. तसेंच ज्या दोन सुभेदारांना लष्करांत फितुरी माजविण्यासाठीं म्हणून वश केलें असें महाराजावर आरोपिलें आहे, ते दोघेही असेच लफंगे व खोटें बोलणारे आहेत. त्यांनीं शपथेवर गोष्टी गुप्त ठेवण्याचें अभिवचन दिलें होतें. पण तें त्यांनीं केव्हांच पाळलें नाहीं व मनास वाटेल तसें ते भकत सुटले. तेव्हां त्यांच्या साक्षींतही फारसें तथ्य आहे असें नाहीं. गोविंदराव दिवाणानें तर चक्क सांगितलें कीं, हें सर्व कारस्थान बनावट आहे. महाराजांचा त्याच्याशीं काडीइतकाही संबंध नाहीं. अशा तऱ्हेनें सर्व साक्षीदारांची उलट तपासणी केली नसतांना सुद्धां त्यांचा असा बोजवारा कमिशनपुढें उडाला होता. असें असतांना आश्चर्याची गोष्ट अशी कीं, या गुप्त कमिशननें महाराजांवरील आरोप धुवून टाकतां आले नाहींत असें धडधडीत खोटें विधान आपल्या रिपोर्टांत नमूद केलें आहे !

ह्या कमिशनचें काम एकंदर २१ दिवस झालेलें होतें. पण त्यांच्या दुर्दैवानें पुरावा कवडीकिंमतीचाही झाला नाहीं. पुढें आलेल्या आधारावर एखाद्या मांजरास सुद्धां शिक्षा सुनविणें अन्यायाचें झालें असतें. पण हें कमिशन राजास शिक्षा देण्यास उद्युक्त झालें. त्यानें राजास आपल्यावरील गुन्हा नाशाबीत करतां आला नाहीं असा आपला निकाल दिला. असा कमिशनकडून निर्णय आल्यानंतर मुंबई सरकार महाराजांची गय करील अशी कल्पनाच करणें मूर्खपणाचें होतें. कारण ज्या मुंबई सरकारनें एवढें मोठें रामावांचून रामायण रचलें व कपटकारस्थानांचा डोलारा उभा केला तो त्यांतून महाराजांस सोडून देण्याकरितां खासच नव्हे. त्यांनीं टाकलेला हा फांस महाराजांचे प्राण कासावीस करण्याकरितांच होता. सातार्‍याहून कमिशनचें काम संपल्यानंतर वुलोबी व कर्नल ओव्हान्स या दोघांनीं महाराजांची गांठ घेण्या-

इतका सुद्धां मनाचा मोठेपणा दाखविला नाहीं. अशा तऱ्हेनें हा न्यायदानाचा पहिला अंक खलास झाला.

उडदामाजी काळे गोरे काय निवडावे ? अशी जरी स्थिति या कमिशनच्या बाबतींत होती तरी त्यांतल्या त्यांत कर्नल लॉडव्हिक हा कांहीं बरा होता. छत्रपतींवर आपण ही आपत्ति उगीच आणली असें त्यास नंतर वाटूं लागलें. पण त्याच्याविषयीं महाराजांचें मन जें एकदां कलुषित झालें तें कायमचेंच. यानंतर कर्नल लॉडव्हिकनें मात्र छत्रपतींविरुद्ध खोटींनाटीं कारस्थानें करण्याचें सोडून दिलें. पण हें त्याचें धोरण रॉबर्ट ग्रॅन्टला मुळींच पसंत नव्हतें. तेव्हां त्यानें त्याची साताऱ्याहून लवकरच उचलबांगडी केली. आणि त्याच्या जागीं ओव्हान्सची नेमणूक झाली.

महाराजांशीं इंग्रजांचा १८२९ सालीं झालेला मित्रत्वाचा तह लक्षांत घेतां साताऱ्यास रेसिडेंटाच्या जागीं कर्नल ओव्हान्सची नेमणूक म्हणजे त्या तहाचा धडधडीत खून करण्यासारखें होतें. कारण रेसिडेंटानें महाराजांशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागावयाचें व अडीअडचणींच्या प्रसंगीं महाराजांस योग्य तो सल्ला देऊन त्यांस त्या प्रसंगांतून निभावून न्यावयाचें, हें त्या रेसिडेंटांचें एक पवित्र कर्तव्य समजलें जाई. या धोरणानेंच लॉडव्हिकपर्यंत सर्व रेसिडेंट वागत आले. पण कर्नल ओव्हान्सनें या पूर्वापार वहिवाटीस आल्यापासूनच हरताळ फांसण्यास सुरुवात केली. कारण सत्याकरितां सनदशीर मार्गांनीं तिळातिळांनीं आपल्या जीवाचें बलिदान करणारे साताऱचे छत्रपति ओव्हान्स साताऱ्यास येऊन दाखल होतांच त्यास मारे प्रेमानें भेटण्यास गेले आणि मित्रत्वाच्या नात्यानें वागा, म्हणून विनंति करूं लागले. इतक्या प्रेमळपणानें सहकारितेसाठीं पुढें करण्यांत आलेला हात कर्नल ओव्हान्सनें कठोरतेनें बाजूला सारला व महाराजांशीं अत्यंत तुसडेपणाचें वर्तन ठेवण्यास त्यानें सुरुवात केली. इतकेंच काय पण त्यावर कळस असा कीं, त्याच दिवशीं महाराजांस खोड्यांत टाकण्यासाठीं १५० रुपये देऊन कागदपत्र मिळविण्याचा व्यवहार त्यानें केला. एकादा जादुगार ज्याप्रमाणें लोकांच्या डोळ्यांमध्यें धूळ टाकून वाटेल त्या गोष्टी निर्माण करतो तद्वत् कर्नल ओव्हान्सनें महाराजांस जखड करण्याकरितां

कागदोपत्रीं पुराव्याचीं भेंडोळींच्या भेंडोळी निर्माण करण्यास सुरुवात केली.

प्रथम त्यानें महाराजांच्या जिवलग स्नेह्यांस व आश्रितांस भराभर उचलून कारागृहात डांबून टाकिलें. जिकडे तिकडे जुलूमजबरदस्ती करून साताराच्या निर्बल व गरीब लोकांस त्राही भगवान् करून सोडलें. चोहों-बाजूंनीं संगिनी रोंखून गोविंदराव दिवाणाकडून खोटा कबुलीजबाब लिहून घेतला. बाळकोबा केळकरासारख्या दरवडेखोराकडून पुराव्याचे कागदपत्र व शिक्के खरेदी केले. त्यास धारवाडच्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं आणखी मदत केली. अशा तऱ्हेनें महाराजांस कारागृहाच्या भयाण जबड्यांत फेंकून देण्याची कडेकोट तयारी करून कर्नल ओव्हान्स मुंबई सरकारच्या अनुमतीची वाट पाहात बसला. मुंबई सरकार ही गोष्ट करण्यास एका पायावर तयार होतेंच. पण तें ही गोष्ट करण्यास स्वतंत्र नसल्यामुळें त्यास कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलची संमति पाहिजे होती. गोव्याच्या गव्हर्नरांशीं संगनमत करून इंग्रजाविरुद्ध बंड पुकारण्याचा छत्रपतींचा कट, हिंदी फलटणींत फितुर करून त्यांना इंग्रजा-विरुद्ध चेतविण्यासाठीं चालविलेलें कारस्थान व पदच्युत नागपूरकर भोसल्या-कडून या कामासाठीं पैशाची मागणी वगैरे कागाळ्या मुंबईचा गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट यानें कलकत्त्याच्या सरकारास कळविल्या होत्या व तो त्याच्या उत्तराची वाट पाहात होता. पण ग्रॅन्टच्या दुर्दैवानें कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल मात्र सूडाच्या खुमखुमीनें वेडा झाला नव्हता. त्यास थोडा तरी सत्या-सत्यतेचा विवेक होता. त्यानें रॉबर्ट ग्रँटनें धाडलेल्या पुराव्याचा व कागद-पत्रांचा नीट विचार करून महाराजांवर आरोपिलेल्या घटनांची नीट सावधान चित्तानें छाननी करून आपलें मत स्पष्टपणें कळविलें. त्याचा आशय असा: 'गोवे अरबस्तान येथून फौजेची कुमक आणून इंग्रजाविरुद्ध बंड पुकारावयाचें यासंबंधीं तुम्ही धाडलेल्या कागदपत्रांत जो मजकूर आहे तो सर्व पाहून गव्हर्नर जनरलचें असें म्हणणें आहे कीं, तुमच्या खलित्यावरून व कागदपत्रावरून जी कल्पना होते त्यापेक्षां वस्तुस्थिती जरा जास्त संभवनीय असती तरी सुद्धां समोर असलेल्या हकीकती, रचलेले कट व कारस्थानें इतकी चमत्कारिक व असंभाव्य वाटतात कीं, जो कोणी थोडा तरी शुद्धीवर असेल असा कोणीही

मनुष्य त्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीं. एकादा दारुड्या सुद्धां दारूच्या नशेंत असलीं कारस्थानें करणार नाहीं मग महाराजांची गोष्ट कशाला. ते तर चांगले अक्कलवान व हुशार आहेत. तेव्हां महाराजांविरुद्ध चालविलेली चौकशी व पुरावा गोळा करण्याचें काम बंद करून महाराजांस फक्त एकदां इशारा द्यावा. —ता. २ आक्टोबर १८३७.'

वर नमूद केल्याप्रमाणें गव्हर्नर जनरलचें धोरण अगदीं सरळ असें आहे. याच्याही पुढें जाऊन गव्हर्नर जनरल असें म्हणतो कीं नगर येथें कैदेंत कुचंबत असलेल्या गोविंदराव दिवाणाकडून उगाच कबुलीजबाब घेण्याच्या भानगडींत न पडतां त्यास बंधमुक्त करावें. अशा तऱ्हेनें सातारचे महाराज व गोविंदराव दिवाण यांच्यामागचा चौकशीचा भुंगा व कारस्थानांचें लचांड कायमचें बंद करून टाकावें, असें कलकत्त्याच्या गव्हर्नरनें मुंबई सरकारास खडखडीत लिहिलें होतें. पण सातारच्या महाराजांस या कारस्थानाच्या कैचींत पकडण्यास सज्ज झालेल्या मुंबई सरकारनें गव्हर्नर जनरलचें म्हणणें धाब्यावर बसविलें. इंग्रजांच्या विरुद्ध छत्रपतींनीं रचलेल्या कारस्थानाची चौकशी अशा अर्धवट स्थितींत बंद ठेवणें म्हणजे इंग्रज सरकारच्या इभ्रतीस धोका आणण्यासारखें होतें. इतकेंच काय पण असें करण्यानें इंग्रज सरकारची अब्रू साफ धुळीस मिळेल असें सर रॉबर्ड ग्रॅन्टचें मत होतें. तें त्यानें आपल्या 'मिनिटां'त, नमूदही केलें आहे. तो म्हणतो कीं, ता. २ आक्टोबर १८३७ चें हिंदुस्थान सरकारचें पत्र पाहून मला अत्यंत वाईट वाटलें व अचंबाही वाटला. विशेषतः त्यांनीं शेवटल्या परिछेदांत ध्वनित केलेलें धोरण अंमलांत आणणें फारच धोक्याचें आहे. त्यामुळें इंग्रज सरकारच्या इभ्रतीस धक्का लागण्याचा संभव आहे. तेव्हां हें पत्र मिळाल्याचें नमूद करून मी आपलेंच धोरण पुढें चालू ठेवणार.

कोण ही इंग्रज सरकाराच्या इभ्रतीची काळजी ! सर्वसत्ताधारी बिचाऱ्या कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलला इंग्रजांच्या इभ्रतीची कांहींच काळजी नव्हती ! तो या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीविषयीं जणूं अगदींच बेफिकीर होता. सर्व काळजी काय ती मुंबईच्या गव्हर्नरलाच, असा या स्वयंमन्य व फाजील शिष्ट मुंबईच्या गव्हर्नरचा समज असावा किंवा त्यानें आरंभिलेल्या कारस्थानांचा

शेवट लावण्यासाठीं अत्यंत सोयीस्कर अशा या इम्रतीच्या पडद्याआड दडणें ग्रँटला सोयीचें वाटलें असावें. कसेंही असो. मुंबईच्या गव्हर्नरानें आपल्या कुटिल धोरणापासून न ढळण्याचें ठरविलें व हातीं आलेल्या या गव्हर्नर जनरलच्या पत्रावर फक्त दाखल तारीख घालून तें त्यानें दप्तरीं ठेवून दिलें.

यानंतर पुन्हां १६ ऑक्टोबर १८३७ ला गव्हर्नर जनरलच्या सेक्रेटरी-कडून सातारच्या महाराजांची चौकशी बंद ठेवावी, असा हुकूम आला. तरी सुद्धां छत्रपतींची चौकशी बंद न ठेवतां मुंबई सरकारनें त्यांचा पिच्छा पुर-वण्याचें ठरविलें. हिंदुस्थान सरकारचे हुकूम व हुकूमवजा सूचना पार धुडकावून लाविल्या आणि हिंदुस्थान सरकारची सत्ताही पण आपल्या हातीं घेण्यास कमी केलें नाहीं; आणि हा चौकशीचा फार्स व न्यायदानाचें थोतांड शेवटपर्यंत तडीस नेलें. छत्रपतींनीं इंग्रजाशीं बेइमानी केली, तसेंच हिंदी पलटणी फितूर केल्या हा आरोप शाबीत झाल्याचा देखावा करून छत्रपतींची गादीवरून उचलबांगडी करण्याची ग्रँन्ट व ओव्हान्स यांनीं जणूं प्रतिज्ञाच केली होती.

सर रॉबर्ट ग्रँटनें कर्नल ओव्हान्स वगैरे तीन कमिशनरांचें कोर्ट बसवून जी चौकशी केली तींत महाराजांस आपला बचाव किंवा समर्थन करण्यास कोणत्याही तऱ्हेची मोकळीक दिली नाहीं. मुंबईचे बॅरिस्टर आणूं दिले नाहींत किंवा साक्षीदाराच्या उलट तपासण्या घेऊं दिल्या नाहींत. अशा तऱ्हेनें खुल्या दरबारांत उघड चौकशी झाली नाहीं. सर्वत्र पडद्याआड चौकशीचा फार्स उरकण्यांत आला. महाराजांच्या वतीनें जर कोणी कायदेपंडित आले असते तर आपण महाराजांवर जे आरोप शाबीत करूं पाहतों त्यांतील एकही आरोप पुराव्याच्या अभावीं क्षणभरही टिकला नसता, हे सर रॉबर्ट ग्रँट व कर्नल ओव्हान्स अंतर्यामी पूर्णपणें जाणून होते. महाराजांना त्यांच्याविरुद्ध काय आरोप आहेत त्याचें एक लेखी टांचण द्यावयाचें व त्याच्यावर खुद्द त्यांचें काय म्हणणें आहे तें ऐकावयाचें इतकाच काय तो विधी या चौकशींत व्हावयाचा असें सर रॉबर्ट ग्रँटनें ठरविलें होतें. सातारच्या राजांची चौकशी कायदेशीर रीतीनें आरंभिली असती तर त्यानें कमिशनमधील सभासदांबद्दलच हरकत घेतली असती. शिवाय हिंदी संस्थानिक ज्यूरर्स अथवा पंच असावे, तसेंच आपणांस

अपील करण्याचा हक्क असावा असें न्याय्य मागणें राजांनीं केलें असतें. मग मात्र सतरा भानगडी व बारा बलुतीं उत्पन्न झालीं असतीं. तेव्हां या कर्माला भिऊनच सर रॉबर्ट ग्रँटनेंच आपला हा गुप्त चौकशीचा फार्स झटपट उरकून राजाला दोषी ठरविण्याचा सोपा मार्ग काढला.

इंग्रज सरकार उघड चौकशी केल्याशिवाय एखाद्या देशी राजास गादी-वरून दूर करूं शकत नाहीं, त्याचा अधिकार इतका मोठा नाहीं; असा परिपाठ पडल्यास तो इंग्रजांस भविष्यकाळीं धोरण या दृष्टीनें अपायकारक व जाचक होईल तेव्हां ही अडचण नाहींशी करण्याकरितां म्हणून ब्रिटिश सरकार रीतसर चौकशी न करतां कोणाही संस्थानिकास पदच्युत करूं शकतें हें सर रॉबर्ट ग्रॅन्टला दाखवावयाचें होतें. तेव्हां त्यानें अशा अरेरावीनें आणि अत्यंत खुनषी वृत्तीनें महाराजांच्या चौकशीचा फार्स उरकून घेतला. पण त्यांना सातार्‍याहून हांकलून लावण्याची पुण्याई परमेश्वरानें त्याच्या नशिबीं लिहिली नव्हती, कोण जाणे एखाद वेळेस ही पुण्याई त्याच्या पदरांत पडेपर्यंत त्यास सवड मिळती तर तो त्याच्या धर्माप्रमाणें मुक्तही झाला असता! पण दुर्दैव बिचार्‍याचें कीं, ओंठाशीं आलेलें हें जांभूळ तसेंच टाकून परमेश्वराच्या पायीं त्यास जावें लागलें. कारण छत्रपतींना कैद करून त्यांची काशीस रवानगी होण्यापूर्वींच तारीख ९ जुलै १८३८ ला पुण्याजवळ दापोडी गांवीं सर रॉबर्ट ग्रॅन्ट ख्रिस्तवासी झाला.

त्या गांवीं एका बड्या इंग्रज अधिकार्‍याचें एक भूत दिसत असतें, तें बहुधा सर रॉबर्ट ग्रॅन्टचेंच असावें असा अभिप्राय जेम्स डग्लस नांवाच्या गृहस्थानें आपल्या ‘ बॉम्बे ॲन्ड वेस्टर्न इंडिया ’ या पुस्तकांत दिला आहे.

एका माळेचे मणी : २९

प्रतापसिंह महाराजांच्या पवित्र चारित्र्याकडे पाहिलें म्हणजे अंतःकरण दुःखातिशयानें भरून येतें व असें वाटतें कीं, महाराजांनीं असें कोणतें पातक केलें होतें कीं त्यामुळें त्यांस असल्या असह्य यातना सोसण्याचा प्रसंग यावा. बिचारा सत्यासाठीं पंचप्राण पाखडून वरिष्ठ सत्तेशीं भांडला. पण त्यांत त्यास दुर्दैवानें यश आलें नाहीं. इंग्रजांच्या कृपाछत्राखालीं हातीं असलेल्या प्रजेचें पित्याप्रमाणें पालन करणारा सत्त्वधीर आणि दिलदार राजा म्हणून त्यांनीं लौकिक मिळविला; पण हा त्यांचा लांच्छित कीर्तिध्वज सुद्धां फार काल फडकत राहिला नाहीं. कारण शासनसंस्था नीट सुरळीत चालण्यास हातीं सत्ता लागते व ती कायमची टिकवावयाची असेल तर तिला समशेरीचीही जोड पाहिजे. त्या समशेरीचें तेज इतकें दिव्य व तेजस्वी असावें लागतें कीं, त्याकडे वांकड्या नजरेनें पाहणाराची दृष्टीच जागच्या जागीं जळून खाक व्हावी! असें असलें म्हणजे मगच कोठें सत्ता व सामर्थ्य उपभोगितां येतें. पण त्या पराक्रमशाली क्षात्रतेजाचाच महाराजांजवळ अभाव होता. ते वीरवृत्तीला पारखे होते. त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं असणाऱ्या इतर दिव्य गुणांचा मुक्ताहार तेजोहीन दिसत होता. त्यांच्यावर मृत्यूची भयाण छाया पसरली होती.

महाराजांजवळ समशेरीचा जोर नव्हता म्हणून त्यांस वीरांचा मार्ग

सोडून दीनदुबळ्यांचा सनदशीर मार्ग अवलंबावा लागला. ह्या कोर्टांत दाद नाहीं लागत, वरच्या कोर्टांत जा, वरच्या कोर्टांत नाहीं लागत त्याच्या वरच्या कोर्टांत जा असा कुतरओढीचा सनदशीर मार्ग महाराजांनीं स्वीकारिला; पण त्या निरुपद्रवी मार्गांत तरी या मेंढपाळांच्या कळपांतील साळसूद सैतानांनीं महाराजांस कितपत यश मिळूं दिलें तें पाहिलें पाहिजे.

कंपनी सरकारचे मुंबईचे लागेसोगे आपल्या हद्दींत असणाऱ्या संस्थानिक—जहागीरदारांवर आपला ताबा कबूल करीत नाहीं, इतकेंच काय पण आपल्या हातीं असलेल्या राजसत्तेचा सुद्धां नीटपणें उपयोग करून देण्याचा त्यांचा विचार नाहीं; हें जेव्हां महाराजांच्या लक्षांत आलें तेव्हां मुंबई सरकारच्या वरचें जें कलकत्त्याचें कोर्ट व त्याच्याही वर नियंत्रण करणाऱ्या कंपनी सरकारचें इंग्लंडमधील डायरेक्टरांचें कोर्ट त्याकडे आपली दाद आपण लावावी असें महाराजांच्या मनानें घेतलें व ते त्या उद्योगास लागले. प्रथम प्रथम कांहीं वकील मंडळी मुंबईस धाडून तेथील प्रतिष्ठित व इभ्रतदार अशा इंग्रज लोकांच्या कानावर आपणांवर होत असणाऱ्या जुलमाचीं व अन्यायाचीं गाऱ्हाणीं त्यांनीं घातलीं. तीं ऐकून त्या लोकांस मोठा अचंबा वाटला. कारण वस्तुस्थिति तशीच होती. महाराजांचें मागणें म्हणजे फारच चमत्कारिक व हेकेखोर वृत्तीचें होतें अशांतला मुळींच भाग नव्हता. त्यांची मागणी अगदीं न्याय्य होती. छत्रपतींची चौकशी अगदीं उघड उघड व्हावी, त्यांच्याविरुद्ध साक्षी देणारांची जबानी त्यांच्या समक्ष घ्यावी व त्यांची उलटतपासणी घेण्याचा महाराजांना हक्क असावा. हें मागणें म्हणजे मुळींच गैर नव्हतें. कोणाही सरळ वृत्तीच्या माणसास यांत 'कृपा करून' देण्यासारखें काय आहे हेंच कळणार नाहीं. या गोष्टी इतक्या सामान्य आहेत कीं, त्यांचा प्रतिबंध करणें म्हणजे प्रकाश, हवा व पाणी देण्यास बंदी करण्यासारखें आहे. तेव्हां ही राजाची चाललेली कुचंबणा पाहून व त्याच्याविरुद्ध रचण्यांत आलेलीं खोटीं-नाटीं कारस्थानें पाहून पुष्कळ इंग्लिश लोकांना महाराजांविषयीं दया आली. त्यांनीं महाराजांवर होत असणाऱ्या जुलमांची दाद लावण्याचें ठरविलें. त्यांपैकीं प्रमुख मंडळी खालीलप्रमाणें होती. डॉ. मिल्ने—एक्सप्रेसिडेंट ऑफ

दि मेडिकल बोर्ड ऑफ बॉम्बे, कॅप्टन कोगन—ऑफ दि इंडियन नेव्ही, दि एडिटर ऑफ बॉम्बे गॅझेट, आणि मि. म्याक्डोनाल्ड. या मंडळींना महाराजांच्या निरपराधीपणाबद्दल खात्री पटल्यामुळें त्यांनीं मुंबईचा गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रॅन्ट व त्याचा बगलया कर्नल ओव्हान्स यांची चांगलीच हजेरी घेण्यास सुरुवात केली. डॉ. मिल्नेनें तर मुंबई सरकारास व हिंदुस्थान सरकारास पुष्कळच पत्रें व अर्ज महाराजांच्या वतीनें लिहिले. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. तेव्हां आतां एक वकीलमंडळ इंग्लंडास धाडण्याचें ठरलें. कारण हें करण्याशिवाय महाराजांस आतां मार्गच उरला नव्हता.

सातारच्या महाराजांनीं आपल्या वतीनें एकंदर चार मंडळी धाडिली. सयद मीर असफअली, यशवंतराव राजे शिर्के, भगवंतराव विठ्ठल व रंगो बापूजी. सयद मीर हा १८३८ ला मक्केला जाण्याचें निमित्त करून येथून निघाला व त्याच सालाच्या डिसेंबर महिन्यांत इंग्लंडला पोंचला. यशवंतराव आणि भगवंतराव हे विलायतेस जाण्याकरितां १८३९ त निघाले. आणि याच वर्षी सप्टेंबरमध्यें सातारकरांचे सुप्रसिद्ध वकील रंगो बापूजी हे कॅप्टन कोगनच्या बरोबर निघाले. या महापुरुषानें तर महाराजांच्या वतीनें फारच मोठी कामगिरी केली आहे.

महाराजांनीं सयद मीर यांस विलायतेस आपला वकील म्हणून धाडिलें. या एकाच गोष्टीनें हिंदुस्थानांत फार मोठालीं वादळें निर्माण होऊं लागलीं. आपण केलेली दगलबाजी व विश्वासघात आतां चवाठ्यावर येणार व त्याबद्दल आपणांस जाब द्यावा लागणार; इतकेंच काय, पण आपली खरडपट्टी चांगलीच निघणार या धास्तीनें मुंबई सरकारचें धाबें दणाणलें व तें नानातऱ्हेचे चाळे करूं लागलें. समुद्रांत वादळें उत्पन्न होऊन या वकिलांवर संकटें येण्याऐवजीं तीं जमिनीवर निर्माण होऊन महाराजांवर कोसळूं लागलीं. महाराज एका डी. ई. वूलमर या नांवाच्या फ्रेंच गृहस्थाच्या देखरेखीखालीं आपली बाजू विलायतेंत सविस्तरपणें मांडण्याकरितां एक वकीलमंडळ धाडीत असून त्याच्या खर्चाकरितां ५५० पौंड फ्रेंच बोटीवर भरून ह्या वकीलमंडळींच्या प्रवासाची व्यवस्था करण्यांत आली आहे ही बातमी १८३८ च्या नोव्हेंबरमध्यें सरकारास प्रथम रेसिडेंटाकडून कळली. त्याबरोबर मुंबई सरकार या वकीलमंडळींच्या मार्गांत अनंत अडचणी

उत्पन्न करण्याच्या उद्योगास लागलें. कौन्सिलें बसूं लागलीं व हुकुमावर हुकूम सुटूं लागले. सर रॉबर्ट ग्रॅन्टच्या मृत्यूनंतर जेम्स कारनॅक हे गव्हर्नर म्हणून कामावर येईपर्यंतच्या मधल्या कालांत तात्पुरता गव्हर्नर म्हणून मि. प्यारीश हा काम करीत होता. त्यानें असा हुकूम सोडला कीं, सातारच्या महाराजांची चौकशी चालू आहे, तेव्हां त्यांना आपल्या वर्तानें विलायतेस वकीलमंडळ धाडतां येणार नाहीं. या हुकुमानें भागणार नाहीं असें वाटतांच लगेच त्या दिवशीं दुसरा हुकूम सुटला कीं, सातारच्या महाराजांशीं झालेल्या तहाप्रमाणें त्यांस असें मंडळ धाडतांच येणार नाहीं. त्यांना त्यांची दाद लावून घेणेंच असेल तर ती त्यांनीं आमच्या मार्फतच लावून घेतली पाहिजे. या दोन हुकुमानंतर पोलिस मॅजिस्ट्रेट मि. इलियट यांना गव्हर्नराकडून असें फर्माविण्यांत आलें कीं, या विलायतेस जाणाऱ्या वकीलमंडळींना पकडून ताब्यांत घ्यावें. त्या प्रत्येकाचा जाब घ्यावा. विलायतेस ते काय कामानिमित्त चालले आहेत त्याची बारकाईनें चौकशी करावी. त्यांना असा कांहीं धाकदपटशा दाखविण्यांत यावा कीं, त्यांना ते सातारचे महाराज नकोत व त्यांची ती वकीली त्याहून नको आणि विलायतेस जाणें तर नकोच नको असें होऊन जावें, व त्यांनीं आपण होऊन विलायतेस जाण्याचा नाद सोडावा. हेंही करून ते नमले नाहींत तर मॅजिस्ट्रेटनें त्यांच्या-जवळून जामीन म्हणून भली मोठी रक्कम वसूल करावी. या सर्वांवर ताण करणारें असें एक अत्यंत अधमपणाचें कृत्य मुंबई सरकारनें केलें. तें म्हणजे असें कीं, आम्ही सातारकर महाराजांचे वकील आहोंत असा एक मुंबई सरकारच्या सहीशिक्क्याचा लेख त्यांनीं मागितला असतां ही साधी मागणीसुद्धां मुंबई सरकारनें नाकारली. हें करण्यांत मुंबई सरकारचा डाव असा होता कीं ही मंडळी विलायतेस कशीबशी गेली तरी सुद्धां कंपनी सरकार किंवा राणीचें इंग्लंडमधील सरकार यांपैकीं कोणीही त्यांस सातारकर महाराजांचे वकील म्हणून ओळखणार नाहीं व अशा तऱ्हेनें त्यांची फजिती होऊन त्यांस हात हालवीत माघारीं यावें लागेल आणि आपलें काम आयतेंच साधेल.

अशा तऱ्हेनें हुजूरहुकूम सुटले. जाब-जबान्या झाल्या. धाकदपटशांची दमबाजी झाली. पैशाची उकळाउकळी झाली. तहनाम्याच्या कलमांची

उजळणी झाली. शब्दांचे कीस काढणें झालें. व या सर्व अडचणींच्या माऱ्यांतून मोठ्या हिंमतीनें वकीलमंडळी तावून सुलाखून निघाली व ॲडव्होकेट जनरलनें आतां आपणांस त्यांस कोणत्याही सबबीवर थांबविता येणार नाहीं असा खडखडीत जबाब मुंबई सरकारास दिला. या जबाबानें गांगरून जाण्याइतका लेंचापेंचा मुंबईचा गव्हर्नर नव्हता. त्यास यावरही तोड सुचली. त्यांनीं कस्टमच्या कलेक्टराला सांगून ठेवलें कीं, ज्या फ्रेंच बोटीवर हे छत्रपती महाराजांचे वकील प्रवास करणार आहेत त्या बोटीस पुढें प्रवास करण्याचा परवाना देऊं नये. ही सुचना कस्टम कलेक्टरला तोंडींच देण्यांत आली होती. त्याप्रमाणें फ्रेंच बोट बंदरांतून पुढें प्रवासास निघतांना कस्टम्स कलेक्टरानें या बोटीस परवाना देण्याचें साफ नाकारलें. फ्रेंच बोटीच्या कप्तानास असें सांगण्यांत आलें कीं, जोंपर्यंत तुमच्या जहाजांत प्रतापसिंह महाराजांचें वकीलमंडळ आहे तोंपर्यंत प्रवास करण्यास परवानगी मिळणार नाहीं. त्याबरोबर त्या फ्रेंच कप्तानास मोठा प्रश्न पडला व इंग्रज सरकारच्या हद्दींत सांपडल्यामुळें त्याचा नाइलाज झाला. तेव्हां त्यास या वकीलमंडळीस बंदरावर सोडून जाण्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं. तेव्हां त्यानें या वकीलमंडळास मोठ्या नाखुषीनें नकार दिला व तें फ्रेंच जहाज पुढें निघून गेलें. त्यामुळें या वकीलमंडळींनीं प्रवासखर्चाकरितां भरलेले ५५० पौंड फुकट गेले व हा भुर्दंड साताराच्या महाराजांस उगाचच पडला.

ही आठ हजार रुपयांचीं ठोकर बसली, पण इतका त्रास झाला तरी सुद्धां साताऱ्याच्या महाराजांनीं धीर सोडला नाहीं, कीं या वकीलमंडळींनीं कच खाल्ली नाहीं. त्यांनीं दुसऱ्या एका लिव्हरपूलला जाणाऱ्या इंग्लिश जहाजाचें तिकीट काढलें. आतां मात्र कंपनी सरकारची मात्रा येथें लागू पडेना. कारण इंग्लिश बोटीला परवाना न देणें किंवा तिच्या मार्गांत कांहीं भानगडी उपस्थित करणें हें कस्टम कलेक्टराच्या आंवाक्याबाहेरचें होतें. तेव्हां या बोटीनें ही वकीलमंडळी एकदांची इंग्लंडला पोहोंचली. तेथें गेल्यावर तरी आपल्या मागचा हा त्रास संपेल व आपणांस आपली दाद लावून घेतां येईल; आणि

महाराजांचें काम फत्ते झालें म्हणजे आपल्या कष्टाचें चीज होईल अशी त्यांची कल्पना होती. पण ती कल्पनाच ठरली !

हें वकीलमंडळ इंडिया हाऊसमध्यें गेलें. व तेथें, आम्ही सातारच्या महारांजाचे वकील आहोंत, त्यांच्यावर होत असलेल्या जुलमाची व अन्यायांची दाद लावून घेण्याकरितां इतक्या दूर आलों आहोंत, महाराजांवर होत असणारा जुलूम व अन्याय कंपनी सरकारच्या इभ्रतीस व उज्ज्वल किर्तीस कायमचा कलंक फांसणारा आहे, मुंबई सरकार महाराजांवर उगीचच नाहक जुलूम करीत आहे, त्याची दाद लावून घेण्यासाठीं आम्हीं हिंदुस्थान सरकारकडे आटोकाट प्रयत्न केले; पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. तेव्हां कंपनी सरकारास आपल्या अब्रूची कांहीं चाड असेल तर त्यानें आमची दाद लावावी. आमच्याजवळ आमच्या म्हणण्यास कागदोपत्रीं भरपूर पुरावा आहे. असें परो-परीनें सांगितलें. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. या वकीलमंडळीस सातारकर महाराजांचे वकील म्हणून नाकारण्यांत आलें. तेव्हां त्यांचा नाइलाज होऊन त्यांस माघारीं यावें लागलें. हिंदुस्थानांत असलेला गोरा व इंग्लंडचा गोरा यांत कांहीं एक फरक नसून ते सर्व स्वहिताच्या ठिकाणीं अगदीं एक आहेत असें त्यांच्या प्रत्ययास आल्यावांचून राहिलें नाहीं.

तळीराम थंड झाला ! : ३०

सर रॉबर्ट ग्रँट हा ख्रिस्तवासी झाला. साताऱ्च्या महाराजांना पकडबंद करण्याची त्याची उत्कट इच्छा तशीच राहिल्यामुळें बिचाऱ्यास पुण्याजवळील दापोडी या गांवीं भूत होऊन राहावें लागलें. ग्रँटनंतर सर जेम्स रिव्हेट कारनॅक यानें मुंबई सरकारचीं सूत्रें हातीं घेतलीं. कारनॅक हा कंपनी सरकारचा जुना नोकर. केवळ पुराणपुरुषच ! प्रथम यानें कांहीं दिवस कंपनी सरकारच्या लष्करांत हडेलहप्पी केल्यानंतर त्यास मुलकी खात्यांत घेण्यांत आलें व त्याची नेमणूक बडोद्याला असिस्टंट पोलिटिकल एजंटाचे जागीं झाली. गंगाधरशास्त्र्याचा खून पंढरपुरास कसा झाला, तसेंच पेशव्यास युद्ध करण्यास इंग्रजांनीं कसें भाग पाडलें व त्याचा पराभव कसा झाला या सर्व गोष्टी त्यानें प्रत्यक्ष पाहिल्या होत्या. त्या वेळचे कंपनी सरकारचे नोकर आणि त्यांतूनही मुलकी खात्यांतील म्हणजे विचारावयाची सोयच नाहीं. प्रत्येकास चरण्यास रान चिकार. वाटेल तितका हात मारावा. राजे, रजवाडे व संस्थानिक यांस मनास चाहील तसें लुटावें. या सुवर्णभूमींतून कंटाळा येईल इतकी संपत्ति न्यावी आणि विलायतेंत गेल्यावर उरलेल्या आयुष्याचे दिवस एकाद्या नबाबाप्रमाणें काढावेत, असा या कंपनी सरकारच्या नोकरांचा शिरस्ताच. हें सर्व कारनॅकनें केलें होतें. किंबहुना या पांढऱ्या हत्तीनें हिंदुस्थानांत आपलें तारुण्य काढलें होतें, स्वतःच्या सोंडेनें येथील अनेक राजघराण्यांचे कल्पवृक्ष गदगदा हालवून

त्यांचीं पुष्पें-फलें यथेच्छ चापलीं होतीं. अमोलिक नवरत्नांच्या हारांशीं त्यानें नाजूक लीला केल्या होत्या. असा हा मुरब्बी मुत्सद्दी मुंबईस दाखल झाला.

सर जेम्स कारनॅक हा इंग्लंडास असतांना कांहीं दिवस ईस्ट इंडिया कंपनीचा डायरेक्टर तर कांहीं दिवस चेअरमन तर कांहीं दिवस अध्यक्षही होता. छत्रपतींच्या कारभारावर खूष होऊन डायरेक्टरांच्या मंडळानें महाराजांस बक्षीस देण्यासाठीं धाडलेल्या रत्नजडीत समशेरीबरोबर असलेल्या गुणगौरवपर खलित्यावर कारनॅकची ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर मंडळाचा डेप्युटी चेअरमन म्हणून सही आहे. साताऱ्च्या महाराजांवर मुंबई सरकारनें चालविलेल्या अन्यायाची चीड येऊन महाराजांची चौकशी थांबवा अशा अर्थाचें पत्र ता. ७ फेब्रुवारी १८३८ ला धाडलें, त्यावर याच गृहस्थाची चेअरमन म्हणून सही आहे. याशिवाय तुम्ही चेअरमन होता त्या वेळीं महाराजांवरील अन्याय दूर करण्यासाठीं खटपट केली आहांत व आतां तर तुम्हीच गव्हर्नर म्हणून तेथें जात आहांत, तव्हां तुम्ही तरी निदान सातारकर छत्रपतींवर होणारा अन्याय दूर करून ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर मंडळास लागलेलें हें लांच्छन धुवून टाका व ब्रिटिश न्यायदेवतेचें मुख उज्ज्वल करा, असें या गृहस्थास विलायतेच्या डायरेक्टरांनीं सांगितलें होतें. गोरा साहेब विलायतेस असेतोंपर्यंत तो अगदीं साधा व सीध्या वृत्तीचा असतो. त्यास न्याय-अन्याय याची विवेकबुद्धि असते. तो पापभीरू असतो. पण त्यास या हिंदुस्थानाची हवा लागली कीं लगेच त्याच्या मेंदूला जणूं कांहीं विकार होतो व तोच गोरा साहेब नाना तऱ्हेचीं अनन्वित कृत्यें करण्यास तयार होतो. मग त्यास न्यायान्यायाची चाड राहात नाहीं. सूक्तासूक्त विचार उरत नाहींत. इतकेंच काय पण तो साध्या माणुसकी-सही पारखा होतो. असा हा साहेबाच्या बाबतींतिल अनुभव फार जुना आहे. तोच कारनॅकच्या बाबतींत खरा ठरला.

विलायतेस असतांना राजाच्या अंगीं असणाऱ्या गुणांचा चहाता म्हणून खलित्यावर सही करणारा, त्याच्यावरील जुलूम थांबवा म्हणून स्वदस्तुरानें पत्र धाडणारा व हिंदुस्थानांत येतांना डायरेक्टरांनीं पाजलेल्या उपदेशामृताचे घोट गटागट गिळणारा कारनॅक इकडे मुंबईचा गव्हर्नर म्हणून येतांना पाहून कोणा-

सही असें वाटेल कीं, साताऱ्च्या महाराजांची साडेसाती आतां संपली. त्यांना हवा होता तसा मनुष्य आला. हा अंदाज जरी दोन अन् दोन चार किंवा सूर्योदय झाला कीं प्रकाश आला यांसारखा अगदीं खडांन्खडा बरोबर ठरणारा दिसला तरी शहाण्या सुरत्या माणसानें साहेबाबद्दल इतका साधा सुद्धां अंदाज बांधूं नये. साहेबाच्या धोरणाचे रंग कोणीही सांगूं शकणार नाहीं. क्षणांत तो स्वच्छ पांढरा दिसेल, तर क्षणांत तो हिरवा चार दिसेल. आणि केव्हां केव्हां कालकूटाप्रमाणें काळकभिन्नही तो होईल. अशा तऱ्हेनें तो केव्हां आणि कसा पालटेल हें सांगणें केवळ अशक्य !

कारनॅक गव्हर्नर झाला आणि त्यानें महाराजांना सिंहासनावरून खालीं खेंचलें. या दोन गोष्टी होण्याच्या अवधींत अशी कोणती महत्त्वाची घटना घडून आली, किंवा हातीं असा कोणता विश्वसनीय पुरावा कारनॅकला मिळाला कीं त्याच्या योगानें कारनॅकच्या चित्तवृत्तींत इतका जमीन-अस्मानाचा फरक पडावा व त्यानें हें अघोर कृत्य करण्यास उद्युक्त व्हावें ? अशी कोणती गोष्ट कारनॅक यास दाखवितां येईल कीं, जी या दरम्यानच्या काळांत घडली व त्यामुळें महाराज कंपनी सरकारशीं बेइमान ठरले, व त्यामुळें कारनॅकला आपलें मत बदलावें लागलें, आणि त्यास महाराजांना सिंहासनावरून पदच्युत करण्यावांचून गत्यंतरच उरलें नाहीं ?—तर असें कांहींएक नसून कारनॅक हा मुंबईस येऊन दाखल होतांच त्याच्या भोंवतालीं महाराजांच्या सूडासाठीं हपापलेली भूतावळ जमा झाली व त्यानें त्याला इतका भारला कीं, कारनॅकनें आपली बुद्धि त्यांच्याकडे गहाण टाकली ! त्याच्या हाताखालीं काम करणारें मुंबईचें कौन्सिल बांधील तें तोरण व ठरवील तें धोरण अशी स्थिति झाली. कारनॅकच्या मनावर तर मुंबई कौन्सिलची पकड इतकी बसली कीं, तो इंग्लंडला असतांनाचें त्याचें महाराजांविषयींचें मत पार बदलून जाऊन तो मुंबई सरकारच्या कारवायांस बळी पडला. सर जेम्स कारनॅक हा स्वतः जातीनें साताऱ्यास १८३९ च्या ऑगस्टमध्यें गेला व त्यानें छत्रपति प्रतापसिंह महाराजांची ता. २३, २४ व २५ ऑगस्ट या तीन दिवशीं गांठ घेतली. त्या मुलाखतींत त्यानें छत्रपतींस सांगितलें कीं, छत्रपतींनीं पूर्वींच्या तहनाम्याविरुद्ध वर्तन करून इंग्रजांशीं

बेइमानीपणा केला आहे, असें चौकशीअंतीं इंग्रजांस कळून चुकलेलें आहे. त्यामुळें इंग्रज सरकारच्या दोस्तीस व आश्रयास महाराजांना मुकावें लागेल. पण महाराजांचा व कंपनी सरकारचा पूर्वापार स्नेह लक्षांत घेतां महाराजांस एक वेळ दया दाखवावी असा कंपनी सरकारचा इरादा आहे. पण छत्रपतींना ही दया त्यांनीं खालील अटी मान्य केल्यास दाखविण्यांत येईल. त्या अटी अशा :

१. इ. स. १८१९ च्या तहाप्रमाणें अक्षरशः व तंतोतंत वागणें.

२. छत्रपतींचे धाकटे बंधू अप्पासाहेब यांची खाजगी मिळकत पूर्णपणें त्यांच्या हवालीं करणें. त्यांना ठरलेली रक्कम व नेमणूक वेळचे वेळीं देणें.

३. बळवंतराव चिटणिसास त्याच्या नोकरीवरून दूर करणें. ब्रिटिश सरकारच्या परवानगीशिवाय त्यास सातान्यास राहूं न देणें.

ज्या इसमांच्या इस्टेटी, जमीनजुमला व मिळकती यांच्या सुरक्षिततेबद्दल इंग्रज सरकारनें हमी घेतली आहे, त्या इसमांच्या मिळकती, उत्पन्न किंवा इस्टेटी त्यांच्या ताब्यांत देणें किंवा अशा इसमांमध्यें ज्या कोणा जादा इसमांची भरती इंग्रज सरकार पुढें मागें करील त्या सर्वांच्या जीविताला, वित्ताला किंवा मिळकतीला कोणत्याही प्रकारें तोषीस लागणार नाहीं अशी व्यवस्था छत्रपतींनीं करणें.

वरील अटींवर सही करणें म्हणजे आपण इंग्रजांशीं दगलबाजी केली, त्यांचा विश्वासघात केला व फंदफितुरीचें कारस्थान रचलें, पण इंग्रज सरकार मोठें दयावंत असल्यामुळें त्यानें आपण केलेल्या या अधम कृत्यांची आपणास क्षमा केली, असा डांगोरा जगांत पिटला जाणार होता. मित्रांशीं दगलबाजी करणारा पातकी म्हणून सदसद्विवेक बुद्धीच्या विरुद्ध कबुलीजबाब देऊन तिनें अंतःकरणांत पेटविलेला वडवानल सागराच्या गांभीर्यानें गिळून स्वतःवर छत्र-चामरें वारून घेण्यांत व 'गोब्राह्मण प्रतिपालक क्षत्रियकुलवतंस श्रीछत्रपति प्रतापसिंह महाराज शिसोदे, भोसले' म्हणून भालदारांच्या ललकाऱ्या ऐकण्यांत प्रतापसिंहास भूषण वाटेना ! त्यापेक्षां सत्याकरतां इंग्रजांच्या पायाशीं किरिट-कुंडलें काढून ठेवण्याचा, चवऱ्या मोर्चेल व छत्रचामरें या सर्व भाग्यदर्शक राजचिन्हांचें तर्पण करण्याचा, किंबहुना स्वतःचें घोर बलिदान करण्याचा

प्रसंग आला तरी चालेल, त्यास आपण अत्यंत आनंदानें कवटाळूं, सत्यासाठीं टांचा घासून प्राण गेले तरी चिंता नाहीं, जिवाची काहील होऊन रक्ताचा शेवटचा थेंब आटत असतांना सुद्धां मी सत्याकरतां मरत आहे अशी अत्यंत मंगल ललकारी फोडीतच आपण परमेश्वराच्या पायाशीं रुजू व्हावें असें महाराजांच्या मनानें घेतलें ! त्यांनीं या नामुष्कीच्या तहावर सही करण्याचें साफ नाकारलें. लगेच सर जेम्स रिव्हेट कारनॅकनें साताराच्या गादीवरून त्यांची उचलबांगडी ता. ५ सप्टेंबर १८३९ ला केली. मुंबई गव्हर्नराच्या हुकमाप्रमाणें त्यांस कैद करण्यांत येऊन त्यांच्या जागीं त्यांचा हाडवैरी धाकटा भाऊ अप्पासाहेब याला गादीवर बसविल्याबद्दलची ग्वाही साताराचा रेसिडेंट कर्नल ओव्हान्सनें संबंध सातारा शहरभर फिरविली.

'तुला सिंहासनावरून पदच्युत केला असून तूं आमचा कैदी आहेस' असें साताराच्या महाराजांस आपण सांगूं तेव्हां तो चवताळून दंगा करील, गव्हर्नराचा हुकूम धाब्यावर बसवून सैन्याच्या मदतीनें दांडगाई करील अशी धास्ती इंग्रज सत्ताधाऱ्यांना वाटत होती. पण ती त्यांची धास्ती फोल होती ! आपल्याला पदच्युत करणाऱ्या इंग्रजास जेरीस आणावा, गनिमी काव्यानें छापे घालून मराठ्यांचा लांडगेतोडी हिसका त्यास दाखवावा व क्षात्रवृत्तीस अनुसरून देह धारातीर्थीं ठेवावा किंवा विजयी होऊन राज्योपभोग घ्यावा—यांपैकीं कोणताही तेजस्वी विचार महाराजांस सुचणें शक्य नव्हतें ! क्षात्रवृत्तीचा तेजस्वीपणा नाहींसा होऊन ती निष्प्राण, निस्तेज झाली होती व स्वस्थ असावें, जें जें होईल तें तें पाहावें, या नादान वृत्तीचा परिपोष त्यांच्या ठिकाणीं झाला होता. खुद्द प्रतापसिंह महाराज व त्यांचे सेनापती बाळासाहेब हे ४ सप्टेंबरला रात्रीं झोंपीं गेले ते ५ तारखेस निजून उठण्यापूर्वीच चार-साडेचार वाजण्याच्या सुमारास इंग्रज सरकारच्या फौजेच्या स्वाधीन झाले ! इंग्रजांनीं वाड्यास गराडा देऊन महाराजांस व सेनापतीस ते झोंपले असतां मोठ्या शौर्यानें पकडलें व कैद केलें ! या अत्यंत हृदयस्पर्शी प्रसंगाची हकीकत पुढीलप्रमाणें आहे.

४१ व्या पलटणीची एक तुकडी, २१ नंबरच्या नेटिव्ह पायदळाच्या दोन तुकड्या व २५ नंबरच्या पायदळाच्या तीन तुकड्या अशा एकंदर

सहा तुकड्यांस चोवीस तासांच्या आंत पुण्याहून सातान्यास कूच करण्याचा हुकूम झाला. त्याप्रमाणें पुण्याहून ३१ ऑगस्ट १८३९ रोजीं हें लष्कर निघालें व ४ सप्टेंबर रोजीं सातान्यास दाखल झालें. ४ तारखेस रात्रीं म्हणजे उजाडत्या ५ तारखेस पहांटे दोन वाजतां हे शिपाई परेडीला उभे करण्यांत आले. पंचविसाव्या पलटणींतील ग्रिनेडियर शिपाई व थोडे तोफखान्यांतील शिपाई तोफांसह राजवाड्याकडे धाडण्यांत आले. एकवीस नंबरच्या पलटणीच्या शिपायांना सेनापती बाळासाहेब यांच्या वाड्याकडे व अदालतीकडे पाठविण्यांत आलें. सेनापतीचे घोडेस्वार कांहीं गडबड करतील असें वाटत होतें; पण तसें कांहींच झालें नाहीं. सेनापती बाळासाहेब आपल्या वाड्यांत नव्हता. तेव्हां या लष्कराचा मोर्चा राजवाड्याकडे वळविण्यांत आला. राजवाड्याच्या दरवाजाशीं एका रांकेंत हे शिपाई उभे राहिले. या वेळीं चांगली पहांट झाली होती. तांबडें फुटलें होतें. आतां सर्व वाड्यांत गडबड उडाली. नोकर लोक हातांत कंदील घेऊन इकडे तिकडे पळत सुटले. राजानें उठून पळून जाऊं नये म्हणून कर्नल ओव्हान्सनें पूर्ण खबरदारी घेतली होती. रेसिडेंट कर्नल ओव्हान्स व दुसरा एक लष्करी अधिकारी आणि राजाचा सख्खा भाऊ पण हाडवैरी अप्पासाहेब हाही त्यांच्याबरोबर होता. हे तिघेजण वाड्यांत शिरले. प्रतापसिंह निजला होता ती खोली अप्पासाहेबानें दाखविली. त्याबरोबर ओव्हान्सला शिकार पूर्णपणें काबूंत आल्याचा आनंद झाला. बिचारा प्रतापसिंह शयनमंदिरांत मंचकावर बेफिकीर वृत्तीनें झोंपी गेला होता. त्यास त्याच्या गळ्याभोंवतीं पडलेल्या या फांसेपारध्यांच्या सरकफांसाची यत्किंचितही कल्पना नव्हती. ती शत्रूची पहांट होती हें त्याच्या स्वप्नींही नव्हतें !

बाहेर गडबड चालू होती ती जरा जास्त प्रमाणांत ऐकूं येऊं लागल्यामुळें प्रतापसिंहाची झोंप मोडली व काय गडबड आहे म्हणून पाहाण्याकरितां अंगावर एक उपरणें टाकून तो डोळे चोळीत बाहेर आला. आणि जरा किलकिल्या नजरेनें पाहूं लागला तों तापलेल्या तेलाप्रमाणें जळजळत जाणारे पुढील शब्द त्याच्या कानांत शिरले. 'तुला गादीवरून पदच्युत

करण्यांत आलें आहे, तूं आमचा कैदी आहेस ' हे शब्द ऐकून बिचारा जरा चमत्कारिक नजरेनें पाहूं लागला. तों चोंहोंकडे आपल्याभोंवतीं शिपायांनीं संगिनी रोंखलेल्या पाहून त्यास काय वाटलें असेल कोण जाणे ! पुन्हां इतक्यांत महाराजांस सांगण्यांत आलें कीं, ' तुम्ही कांहीं एक गडबड न करतां आमच्या स्वाधीन व्हा. यत्किंचितही जर आपण खळखळ कराल तर आपली खाजगी मालमत्ता जप्त करण्यांत येईल. ' हे सर्व प्रकार चालू असतां सातारचे महाराज आश्चर्यचकित होऊन स्तब्ध उभे होते. ते लगेच कंपनी सरकारच्या स्वाधीन झाले. दुसऱ्या ठिकाणीं सेनापति बाळासाहेब निजला होता त्यासही पकडून आणण्यांत आलें. एक पालखी तयार करण्यांत येऊन तिच्यां-तच दोघांसही कोंबून त्या उभयतांस राजवाड्यांतून बाहेर काढलें. पण आपला धनी, प्रत्यक्ष राजा, त्याजबरोबर पालखींत एके ठिकाणीं बसण्यांत छत्रपतींचा मोठा अपमान होत आहे असें सेनापतीस वाटल्यामुळें त्यानें पालखींतून खालीं उडी टाकिली व तो पायीं अनवाणी स्थितींत सात साडेसात मैल चालत गेला.

' बाजीरावाचा पराभव करून पेशव्यांच्या ताब्यांतील सर्व राज्य तुमच्या हवालीं करूं ' म्हणून गोड गोड थापा मारणाऱ्या इंग्रजांनीं एकाद्या तंट्या भिल्लास, त्याच्या छपून बसण्याच्या ठिकाणीं रात्रीं अपरात्रीं छापा घालून पकडावा, त्याप्रमाणें महाराजांस पकडण्याचा अत्यंत किळसवाणा प्रकार निर्दयपणें केला. बदमाष हे लोकांचे गळे कापतात म्हणून त्यांवर छापा घालणें हें क्षम्य ठरेल. पण ज्यानें विश्वासानें आपल्या मांडीवर मान ठेविली व झोंपीं गेला त्याचा गळा जागच्या जागीं साखरझोंपेंत दाबून टाकण्यांत पुरुषार्थ कोणता ? पण इंग्रजाच्या पुरुषार्थाची व्याख्या निराळी आहे. आणि स्वार्थानें अंध झालेल्या माणसाला नीतीबंधनें तरी कसलीं ? तो आईबाप, बहीणभाऊ व इष्टमित्र हीं सर्व नातीं विसरतो. स्वार्थाचा उन्माद असा भयंकर आहे हेंच खरें.

कर्नल ओव्हान्सनें पहांटेच्या वेळीं साखरझोंप घेत असतां छत्रपतींना अचानकपणें वाड्यास गराडा घालून पकडलें, हा अधमपणा तर खराच; पण सख्ख्या वडील भावास कैद करण्यासाठीं आलेल्या कर्नल ओव्हान्सला वाड्यांतील महाराजांची निजण्याची खोली व इतर वाटा दाखविण्यास तयार झालेल्या

अप्पासाहेबाच्या स्वार्थी अंतःकरणाची कल्पनाच करतां येत नाहीं. कर्नल ओव्हान्स व अप्पासाहेब या दोघांनीं मिळून छत्रपति प्रतापसिंह महाराजांचा कांटा काढला. लगेच त्याच दिवशीं दुपारीं अप्पासाहेबास गादीवर बसविल्याची दवंडी कर्नल ओव्हान्सनें सातारा शहरांत पिटविली. ज्येष्ठ बंधूचें निसंतान करून स्वतःवर नरकतुल्य पारतंत्र्यानें कलंकित झालेलीं छत्रचामरें वारून घेण्याची अघोर तृष्णा शिवाजी महाराजांच्या खास वंशांतील एका व्यक्तीस झालेली आणि त्यानें ती अंमलांत आणलेली पाहून असें वाटूं लागतें कीं, महाराष्ट्रानें असें कोणतें पातक केलें होतें कीं, त्याच्यापायीं सर्व सद्गुणांचा साज चढवून त्यागाच्या भगव्या रंगानें फडकत राहणारा त्या शककर्त्याचा—श्री छत्रपति शिवाजी महाराजांचा—कीर्तिध्वज डागळला जावा ! दिव्य रत्नांची पैदास ज्या सागरांत होते तेथेंच हलाहलही निर्माण होतें हेंच खरें.

गादीवरून पदच्युत केल्यानंतर महाराजांस साताऱ्यापासून पांच—सात मैलांवर असणाऱ्या निंब गांवीं कांहीं दिवस एका गोठ्यांत ठेवण्यांत आलें ! तेथून त्यांची इंग्रजांच्या शिरस्त्याप्रमाणें काशीस रवानगी करण्यांत आली. महाराजांचा हा काशीचा प्रवास म्हणजे अत्यंत खेदजनक प्रकार आहे. महाराजांच्या बरोबर जी मंडळी काशीस गेली त्या मंडळींतील प्रमुख म्हणजे महाराजांचे सेनापती बाळासाहेब हे होते त्याचीही इंग्रज सरकारनें धिंड काढली. बाळासाहेबाचा गुन्हा एकच, तो म्हणजे तो महाराजांचा सेनापती होता हाच फक्त होय. या एका गुन्ह्यापायीं कर्नल ओहान्सन त्यास महाराजांबरोबर हद्दपारीची शिक्षा सुनावली. धन्याबरोबर पडतील ते कष्ट भोगण्याची त्याची तयारी होती. पण सेनापतीचा इतमाम व डामडौल एकदम नाहींसा होऊन कारागृहांत दिवस कंठण्याची पाळी आल्यामुळें बिचाऱ्याच्या मनास जबरदस्त धक्का बसला. या भयंकर स्वरूपाच्या स्थित्यंतरामुळें सेनापतीची शरीरप्रकृती खालावली. त्यास चैन पडेनासें झालें. त्याच्याबरोबर त्याची पत्नीही होती. ती आसन्नप्रसवा होती. अशी एकंदर करुणास्पद स्थिती असतांना सुद्धां ही मंडळी जिवाच्या करारावर मजल दरमजल करीत काशीकडे कूच करीत होती. काशी चार-दोन मुक्कामांवर असेल तोंच आधींच खालावलेल्या प्रकृतींत एवढा मोठा लांब पल्ल्याचा प्रवास

करावा लागल्यानें बाळासाहेबाची प्रकृती फारच बिघडली व रोज क्षीण होत चालली.

सातारचे महाराज व त्यांची मंडळी यांना काशीला नेऊन पोंचविण्याचें काम लेफ्टनंट क्रिस्टॉल या नांवाच्या लष्करी अधिकाऱ्याकडे होतें. क्रिस्टॉल हा फक्त आकारसादृश्यानें मनुष्य होता इतकेंच. त्याची मनःप्रवृत्ति सैतानासही लाजविणारी होती.

सेनापतींची प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें राजघराण्यांतील मंडळींनीं लेफ्टनंट क्रिस्टॉलला सेनापतींच्या प्रकृतीला आराम पडेतोंपर्यंत मुक्काम चार दिवस वाढवा, म्हणजे आमच्यावर मोठे उपकार होतील, सेनापतीच्या प्रकृतीस जरा आराम पडल्याबरोबर लगेच प्रवासास निघण्याची आमची तयारी आहे, अशी विनंती केली. पण ती अमान्य करण्यांत आली. सेनापती आजारी नसून उगाच ढोंग करीत आहे असें ले. क्रिस्टॉलला वाटलें. त्यानें सातारकर मंडळींचें म्हणणें पार फेंटाळून लावलें आणि सर्व मंडळींना कूच करण्याचा हुकूम फर्माविला. प्रवासास निघण्याच्या तयारीनें ले. क्रिस्टॉल आला, तों राजाकडील मंडळी जरा धांदलींत व खिन्न अशी दिसली. सेनापतीच्या राहुटीशीं जरा जास्त गडबड आढळून आली व राजाकडील लोक ले. क्रिस्टॉलला सांगूं लागले कीं, सेनापतींची प्रकृती फारच बिघडली आहे. जरा काळजीच वाटते. त्यांना जागचें हालवत सुद्धां नाहीं, तरी प्रवास थांबवावा. पण या विनंतीचा या पाषाणहृदयी क्रिस्टॉलच्या मनावर कांहींएक परिणाम झाला नाहीं. ही मंडळी कूच करतांना नेहमीं खळखळ करतात, तेव्हां त्यांना रखडत नेलेंच पाहिजे, या लष्करी उद्दामवृत्तीच्या विचारानें त्यानें त्या सेनापतीकडील व राजाकडील मंडळींचें म्हणणें बिलकूल ऐकलें नाहीं. तंबू-राहुटच्या पुढील मुक्कामास पाठवून दिल्या. सेनापती बाळासाहेबास मोठ्या कष्टानें उचलून पालखींत अगदीं अलगद ठेविलें. त्यांस गुरगुटून पांघरूण घालून मंडळी पुढील प्रवासास अतिशय जड अंतःकरणानें निघाली. पुढील मुक्कामाला येऊन थांबली व सेनापतीसाहेबास नीट अदबशीर तऱ्हेनें नेऊन ठेवण्यासाठीं म्हणून पाहातात, तों सेनापतींचें प्राणोत्क्रमण झालेलें आढळलें ! वाटेंत केव्हां आणि कसा प्राण निघून गेला याची मंडळींना कल्पनासुद्धां आली नाहीं. या बातमीनें महाराजांच्या मंडळींत जिकडे तिकडे हाहाःकार

उडाला. आधींच वनवासांत असणाऱ्या महाराजांच्या मंडळींवर ही जणूं आकाशींची कुऱ्हाड कोसळली. सर्वांचीं अंतःकरणें दुःखातिशयानें भडभडून आलीं. मराठ्यांचा सेनापति कुत्र्याच्या मोतीनें मेला. शत्रूचीं हाडें मोडून गडावर भगवा झेंडा चढवून तो फडकतांना पाहात पाहात फत्ते झाली, फत्ते झाली, म्हणून भाग्याची ललकारी ठोकीत परमेश्वराच्या घरीं निघून जाण्याचें वीराचें भाग्य मराठ्यांच्या सेनापतीचे वांट्याला यावयाचें ! पण दुर्दैवानें ह्या सेनापतीचा मृत्यू असा घडवून आणला. बापू गोखले तसा गेला, बाळासाहेब असा गेला ! अशा तऱ्हेनें कालाच्या उदरांत गडप झालेले मराठ्यांचे सरसेनापति आतां हातांत समशेर घेऊन पुन्हां शत्रूशीं झुंजण्यास केव्हां येतील ते येवोत. पण तूर्त हा सेनापती नाहींसा झाला !

ही कहाणी येथें संपली नाहीं. त्या नराधम ले. क्रिस्टॉलचा नीचपणा याच्यांही पुढें आहे. आपल्या उद्दाम वृत्तीस सेनापती बळी दिल्यानंतर तरी या सैतानाचा तळीराम शांत व्हावयास पाहिजे होता. पण एकदां नरमांसाची चटक लागली म्हणजे हिंस्र श्वापदांची भूक तृप्त न होतां एकसारखी वाढतच जाते, त्याप्रमाणें ले. क्रिस्टॉलच्या दुष्ट वृत्तीचा पारा चढत चालला. सेनापतीच्या विधवा स्त्रीस प्रसूतीवेदना होऊं लागल्या, तेव्हां जरा आडोशाच्या ठिकाणीं प्रसूती होऊन बाळंतिणीस जरा आराम वाटेतों प्रवास थांबविण्याबद्दल महाराजांनीं अत्यंत काकुळतीनें विनंती केली. ले. क्रिस्टॉलचें काळीज उलटें होतें. त्याची घडण परमेश्वरानें कांहीं निराळ्याच तऱ्हेनें केली होती. पण छेः ! परमेश्वराच्या नांवानें संबोधिली जाणारी आदिशक्ती असलें काळीज निर्माण करून आपल्या पदरीं पातक घेणार नाहीं. हृदयाचा असा अपूर्व मासला निर्माण करणारी आदिशक्ती सैतानाचीच असली पाहिजे. ले. क्रिस्टॉलच्या अंतःकरणास या विनंतीनें कसलाही पाझर फुटला नाहीं. त्यानें थांबण्याचें साफ नाकारलें. मंडळींची तशीच रखड काढली. त्यानें विश्रांति घेऊंच दिली नाहीं. सेनापतीची विधवा स्त्री बाळंतीण होऊं लागली, तरी त्या चांडाळानें मुक्कामाला थांबण्याचें नाकारलें ! व मग रस्ता चालतांना रस्त्याच्या बाजूला खानदेशांत सांगवी येथें बिचारी बाळंतीण झाली. कोण हा दुर्धर प्रसंग ! सातारकर छत्रपतीच्या सेना-

पतीची ही भार्या; पण आज तिची सर्व सत्ता व वैभव पार लयाला जाऊन भिकारीवर रस्त्याच्या बाजूला एखाद्या कैकाडणीप्रमाणें प्रसूत होण्याचा प्रसंग यावा यापेक्षां निर्घृण दैवाचा दुर्विलास तो कोणता ! प्रस्तुतचा प्रसंग इंग्रजांलाच काय पण अखिल मानवजातीला काळोखी फांसणारा आहे.

हा खडतर प्रवास संपून ही मंडळी काशीस ता. २५-३-१८४०. रोजीं दाखल झाली. प्रतापसिंह या अपमानकारक अवस्थेंत आणखी सात वर्षें जगला. तेथें त्याच्यावर देखरेखीसाठीं कॅ. कारपेन्टर यास नेमिलें होतें. तो सुस्वभावी होता. तेथें महाराजांस दरमहा दहा हजार रुपयांचा तनखा होता. काशीस महाराजांसाठीं नवीन वाडा बांधण्यांत आला व त्याचा खर्च प्रतापसिंहाच्या नेमणुकींतून घेतला.

आपल्यावर होत असणारा अन्याय जगाच्या वेशीवर टांगण्याचा प्रताप-सिंहानें कसोशीनें प्रयत्न केला. इंग्लंडास गेलेल्या वकीलमंडळाकडून फारसें काम झालें नाहीं. परंतु रंगो बापूजीनें जॉर्ज टॉम्प्सन नांवाच्या विद्वान् गृहस्थाच्या साहाय्यानें या प्रकरणीं सारखी झोड उठविली. त्यानें डायरेक्टर्स, प्रोप्रायटर्स आणि बोर्ड ऑफ कंट्रोलर्स यांजकडे वारंवार अर्ज करून जाणत्या व न्याय-प्रिय वजनदार मंडळींस आपलें म्हणणें पटवून दिलें. जॉर्ज टॉम्प्सनें प्रतापसिंहा-कडून पगार घेतला; पण इ. स. १८४० पासून १८४८ पर्यंत आठ वर्षें त्यानें या प्रकरणाचा पिच्छा पुरविला. त्याचीं या विषयावरील भाषणें मोठीं आवेशयुक्त, सडेतोड आणि उद्बोधक आहेत. सातारा प्रकरणाचा तपास करण्यासाठीं तो स्वतः द्वारकानाथ टागोर या गृहस्थाबरोबर ता. १२-१२-१८४२ रोजीं हिंदुस्था-नास आला. एक वर्ष ठिकठिकाणीं फिरून त्यानें निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या गांठी घेतल्या. लांच खाल्ल्याचा आरोप त्यानें मुंबई सरकारावर जाहीरपणें केला व तसें आव्हान दिलें. पण त्याच्यावर कोणी खटला केला नाहीं ! काशीस जाऊन त्यानें प्रतापसिंहाची गांठ घेतली. ही भेट ता. १६-६-१८४३ रोजीं झाली. भेटीचे वेळीं कारपेंटर हजर होता. सर्व बोलणें दुभाष्याभार्फत झालें. या भेटी-संबंधीं टॉम्प्सन म्हणतो, ‘ माझा मुक्काम कारपेंटरच्या बंगल्यावर होता. त्याच

ठिकाणीं ही मुलाखत झाली. तीन तास बोलणें झालें. अत्यंत सत्यनिष्ठेच्या भावनेनें प्रतापसिंह आपली प्रत्येक गोष्ट सांगत होता. त्याची वाणी मोठी तेजस्वी होती. सेनापतीच्या मुलाचें लग्न साताऱ्यास जाऊन उदेपूरच्या घराण्यांतील मुलीशीं करावें एवढीच त्याची तीव्र इच्छा आहे.' या भेटीनंतर इ. स. १८४४ च्या फेब्रुवारींत तो इंग्लंडास परत गेला. आणि पुन्हां सातारा-प्रकरणीं त्यानें झोड उठविली. ओव्हान्सवर लांच खाल्ल्याचे आरोप त्यानें केले. आणि मुंबई सरकारवरही तेच आरोप केले. आणि त्याच्या परिणामांची एक वर्षपर्यंत वाट पाहिली. पण सर्व मामला थंड पाहतांच ता. १९–३–१८४५ रोजीं प्रोप्रायटर्सची सभा भरली त्या वेळीं खणखणीत भाषण करून त्यानें पुन्हां आपणांवर खटला भरण्याचें आव्हान दिलें. ओव्हान्स इंग्लंडास परत आला त्या वेळीं त्याच्याकडे आपल्या भाषणांच्या नकला त्यानें पाठविल्या. त्याच्यावर उघडाउघड आरोप केले. एवंच त्यानें मुंबई सरकारचीं कुटिल कृत्यें चवाठ्यावर आणण्याचा सपाटा चालविला. ता. १८-६-१८४५ ला पुन्हां सभा भरली. त्या वेळीं सभेस हजर राहण्याबद्दल बोलावणें गेलें असतां ओव्हान्स हजर झाला नाहीं. प्रोप्रायटर्स, डायरेक्टर्स यांच्याकडे खटपटी चालू होत्या. त्याप्रमाणेंच पार्लमेंटांतही सातारा प्रकरण यापूर्वींच दोनचार महिने गुदरलें होतें.

ता. २६–२–१८४५ रोजीं कॉमन्स सभेंत अर्ज करण्यांत आला होता. त्यांत ओव्हान्स व नातू यांनीं लांच घेऊन जीं अनन्वित कृत्यें केलीं त्यांची उघड चौकशी व्हावी, बाळाजीपंत नातूनें तर जहागिरदार व इतर लोक यांच्याकडून लक्षावधी रुपयांच्या रकमा लांच म्हणून घेतल्या आहेत व आपल्या बगलबच्च्यांच्या तुंबड्या भरल्या आहेत, नातू व रेसिडेन्सींतील कारकून बाळाजी केशव किबे यांनीं खोटे कागद तयार केले आहेत, इत्यादि प्रकार मुद्यापुराव्यानिशीं पार्लमेंटांत मांडून जॉर्ज टॉम्प्सननें प्रतापसिंहाचा छळ तरी थांबवा अशी कळकळीची विनंति केली. प्रतापसिंहावरील आरोपांचा डोलारा एका बाळाजीपंत नातूच्या ज्या साक्षीवर उभा केला आहे, ती साक्ष गुप्तपणें झाली. त्याची उलट तपासणीही करण्यांत आली नाहीं. राजाचें डोकें ठिकाणावर नाहीं, असा एक-

आरोप राजावर करण्यांत आला आहे. त्यासंबंधीं रेसिडेंट रॉबर्टसन यानें असें म्हटलें आहे कीं, ' कारभाराचीं व न्यायाचीं कामें करण्यांत प्रतापसिंहाइतका हुशार गृहस्थ माझे पाहण्यांत नाहीं. त्याची सत्यनिष्ठा व निर्मळ आचरण हे गुण अनुपम आहेत. ' या सर्व खटपटींचा कांहींएक उपयोग झाला नाहीं ! पार्लमेंटानें हा अर्ज ता. १८-६-१८४५ रोजीं नामंजूर केला.

सर्व गोष्टींचें निसंतान झाल्यानंतर सुद्धां ब्रह्मावर्तास चाललेलें बाजीरावाचें सोंवळें-ओंवळें व ब्राह्मणसंतर्पणें पाहून ज्याप्रमाणें अचंबा वाटतो त्याप्रमाणेंच प्रतापसिंहाचे असे धिंडवडे होऊनही काशीस आल्यानंतर उदेपूरच्या राण्याशीं शरीरसंबंध करण्याचें त्याचें वेड हें सुद्धां मासलेवाईक म्हणून दाखविण्यासारखें आहे ! मरण्यापूर्वीं सात आठ महिने प्रतापसिंहानें सेनापतीचा मुलगा त्रिंबकजी ऊर्फ जंगली महाराज यास ता. २५-१-१८४७ रोजीं दत्तक घेतलें. त्याचें नांव शाहू महाराज असें ठेविलें. त्याच वेळीं बळवंतराव सेनापतीची स्त्री गुणवंताबाई इजला दुसरा मुलगा दत्तक देऊन त्याचें नांव दुर्गासिंग ऊर्फ तात्याबा राजे असें ठेविलें.

प्रतापसिंहाच्या या सर्व खटपटींचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. त्याच्या शत्रुपक्षानें त्यास शेवटीं नेस्तनाबूद केलेंच.

———

माल्टाहून माघारीं : ३१

छत्रपति प्रतापसिंह महाराजांच्या विरुद्ध नानातऱ्हेच्या कारवाया करून व कुटिल कारस्थानें रचून त्याच्या हितशत्रूंनीं जें साधावयाचें होतें तें एकदांचें तीन वर्षांच्या सैतानी प्रयत्नानें साधलें. त्यांची साताऱ्याहून उचलबांगडी करून बनारस येथें रवानगी करण्यांत आली. त्यांच्या मालकीचें जडजवाहीर व जमीन-जुमला वगैरे स्थावर-जंगम मालमत्ता पुष्कळच होती. गादीवरून आपणांस दूर केलें तरी आपली खाजगी मिळकत आपली आपणांस मिळेल असा बिचाऱ्या छत्रपतींचा समज होता. तशी त्यास हमीही पण देण्यांत आली होती. ३० ऑगस्ट १८३९ रोजीं साताऱ्च्या रेसिडेंटला सर जेम्स कारनॅकनें एक पत्र लिहिलें आहे त्याचा आशय असा आहे : ' महाराजांस असें कळवावें कीं, तुम्हांस तुमचा खाजगी खर्च चालविण्यासाठीं साताऱ्च्या खजिन्यांतून कांहीं तनखा तोडून देण्यांत येईल. तसेंच तुम्ही कोणत्याही तऱ्हेची खळखळ न घालतां इंग्रजांच्या स्वाधीन व्हाल तरच तुम्हांस तुमची खाजगी जिनगी बिनतक्रार माघारीं देण्यांत येईल. '

वरीलप्रमाणें कर्नल ओव्हान्सला स्पष्टपणें कळविलें होतें. छत्रपती कोणत्याही तऱ्हेची जिकीर न घालतां अगर प्रतिकार न करतां इंग्रजाचे स्वाधीन झाले होते तरी सुद्धां त्यांची खाजगी मिळकत व जिनगी त्यांच्या हवालीं करण्यांत आली नाहीं. उलट १८५० सालीं या खाजगी जिनगीबद्दल पार्लमेन्टांत प्रश्नोत्तरें झालीं.

तेव्हां बोर्ड ऑफ कंट्रोलचा अध्यक्ष बेल्स यानें निर्लज्जपणें उत्तर दिलें कीं, माजी छत्रपतीला खाजगी मिळकत मिळेल अशी हमी देण्यांत आली नव्हती, अर्थात सातारच्या राजाची सर्व मालमत्ता ब्रिटिश सरकारनें जप्त करून टाकली !

आतां महाराजांनीं धाडलेलें वकिलांचें मंडळ विलायतेला केव्हां निघालें, त्यांत मंडळी कोण कोणती होती व त्यांच्या शिष्टाईचा काय उपयोग झाला, किंबहुना त्यांना तेथें ‘ शिष्ट ’ म्हणून तरी मानण्याचा थोरपणा इंग्रजांनीं दाखविला कीं काय तें पाहावयाचें. मुंबई सरकारनें या मंडळाचे धिंडवडे काढले, त्यांचा एकाद्या दरवडेखोराप्रमाणें ताबा घेतला. जाबजबान्यांचा फार्स केला. धाकदपटशा दाखविला. आणि या सर्व गोंधळांत फ्रेंच जहाजावर ५५० पौंड भरून काढलेलें तिकिट फुकट गेलें. या सर्व आपत्तींना तोंड देऊन हें वकील-मंडळ १८३९ च्या मार्चच्या पंधरा तारखेला ‘रिलायन्स’ नांवाच्या इंग्रज जहाजांतून निघालें. सयद मीर अफजलअली, यशवंतराव राजे शिर्के, भगवंतराव विठ्ठल हे पुढें गेले; परंतु महाराजांची वकिली कसोशीनें करणारा सुप्रसिद्ध वकील रंगो बापूजी मात्र मुंबईसच होता. डॉ. मिल्ने व कॅ. कोगन यांच्या साहाय्यानें तो महाराजांवर होणारा जुलूम दूर करण्याचा प्रयत्न करीत होता, तों ३० ऑगस्ट १८३९ ला महाराजांचें त्यास खालील आशयाचें पत्र आलें :

‘ शिवाजी महाराजांनीं अतुल पराक्रमानें स्वराज्य स्थापन करून हिंदुधर्माचें संरक्षण केलें. मोठमोठ्या मुत्सद्यांनीं व योध्यांनीं आपआपल्या मगदुराप्रमाणें त्याचें आजपर्यंत संरक्षण केलें. पण आतां काळ कठीण आला. कारण कंपनी सरकारचा रेसिडेंट कर्नल ओव्हान्स हा सातार्‍यास आल्यापासून त्याचें चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं. तो आमच्या विरुद्ध नानातर्‍हेच्या कारवाया करीत आहे. बाळाजीपंत नातूला त्यानें मथविला आहे व आमच्या विरुद्ध कपटकारस्थानें चालू आहेत. आम्हांस गादीवरून दूर करण्याचा त्यांचा बेत आहे. या कार्यांत त्यांस यश यावें म्हणून आमचे धाकटे बंधू अप्पासाहेब हेही सामील झाले आहेत. दरबारच्या अधिकारी मंडळींत फूट पडली असून पुष्कळ अधिकारी अप्पासाहेबासच आपला धनी मानूं लागले आहेत. राजघराण्यांतील

माझ्याशीं विश्वासानें वागणारीं माणसें फक्त चारच—तीं म्हणजे माझ्या दोन राण्या, मुलगी व बाळासाहेब सेनापती हीं होत.

'दौलतींतील मोठ मोठे अधिकारी, घोडदळ, पायदळ व तोफखाना वगैरे सर्व चतुरंग सेना बाळाजीपंत नातू व कर्नल ओव्हान्स यांनीं पार फितवून टाकली आहे. केव्हां काय घात होईल याचा नेम नाहीं. आतां येथें आपणांस न्याय मिळण्याची आशा संपली. तेव्हां तुम्ही विलायतेस जाऊन शेवटपर्यंत भांडावें अशी माझी इच्छा आहे. माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. माझ्यावर येऊन कोसळणाऱ्या संकटांमुळें मी फार दिवस जगेन असें वाटत नाहीं. तेव्हां माझ्यानंतर दोन्ही राण्यांना धाक दाखवून किंवा लालूच देऊन माझे हितशत्रू त्यांच्याकडून गादीवरील माझा व माझ्या वंशजांचा हक्क लुबाडून घेतील. तसेंच माझ्यावर होणाऱ्या अन्यायांची दाद लावून घेण्यासाठीं चालविलेल्या प्रयत्नापासून त्यांस परावृत्त करतील. तरी तसें झाल्यास मी तुम्हांस माझ्यासाठीं शेवटपर्यंत भांडण्याची कुलमुखत्यारी देतों. तरी माझ्या शीलास लागलेला हा कलंक धुवून साफ निघेपर्यंत आपण माझ्याकरितां लढत राहावें.

'मला संतान नसल्यामुळें मी मुलगा दत्तक घेणार आहें. सेनापती बाळासाहेबांची पत्नी गरोदर आहे. तेव्हां तिला सुदैवानें पुत्ररत्न झाल्यास फारच नामी. त्यास दत्तक घेईन. पण माझ्या दुर्दैवानें तसें नच झाल्यास दुसऱ्या कोणा जवळच्या मुलास दत्तक घेईन. तरी आपण गादीची शपथ घेतल्याप्रमाणें नोकरी नेकीनें कराल व खाल्लया मिठाला जागाल अशी आशा आहे.'

वर नमूद केलेल्या सूचनांप्रमाणें रंगो बापूजी तंतोतंत वागला, यांत तिळप्राय शंका नाहीं. बारा-चौदा वर्षें विलायतेंत राहून त्यानें नानातऱ्हेच्या आपदा सोसल्या व महाराजांना यश मिळावें म्हणून सनदशीर मार्गानें अप्रतिहतपणें भगीरथ प्रयत्न केले.

रंगो बापूजी हा बलवंत मल्हार चिटणीसाचा जवळचा नातेवाईक. बलवंत मल्हार हा महाराजांचा अत्यंत विश्वासांतील नोकर. या गृहस्थामार्फत बाळाजीपंत व एल्फिन्स्टन या दुकलीनें सातारकर छत्रपतींस कसें फसविलें हें आतां नव्यानें सांगण्याची जरुरी नाहीं! या कामीं खुद्द बलवंत

मल्हारची सुद्धां कमालीची निराशा व फसवणूक झाली. छत्रपतींना पेशव्यांचें राज्य व आपणांस पेशव्यांनीं जप्त केलेलें आपलें उत्पन्न मिळेल म्हणून बिचाऱ्यानें प्राणाची पर्वा न करितां 'कुंपणी' सरकारची नोकरी केली. आणि तिचें गाडें नीट मार्गाला लागल्यावर केल्या चाकरीचा मोबदला त्यानें मागितला. तेव्हां एल्फिन्स्टन व बलवंत मल्हार यांमध्यें झालेली भाषा अविस्मरणीय आहे. बजाविलेल्या चाकरीची भाकरी मागण्यासाठीं जेव्हां बलवंत मल्हार गेला त्या वेळीं एल्फिन्स्टन्, कॅ. ग्रॅन्ट व बाळाजीपंत नातू अशा तीन शहाण्यांचें त्रिकूट बसलें होतें. बलवंत मल्हारनें मागणी करतांच एल्फिन्स्टन बोलला कीं, 'एका चालीनें चालावयाचा आमचा दस्तूर आहे. आम्ही मागील दाखला पुढें चालू करणार. बाजीरावानें ज्यांचें उत्पन्न जप्त केलें असेल त्याचें जप्त करणार, त्यांनीं ज्यांचें चालू केलें असेल त्यांचें चालू करणार!' हें ऐकून बलवंत मल्हार चकित झाला व बोलला कीं, 'बाजीरावानें आमचें उत्पन्न जप्त केलें म्हणून मनांत आणिलें कीं, साहेबाची दोस्ती करावी. त्यांतच आपलें कोटकल्याण आहे; म्हणून बाजीराव गादीवर असतां तीन वर्षें दोस्तीचा शिकस्तीचा प्रयत्न केला. तसेंच महाराज सरकारची व कंपनी सरकारची दोस्ती जमविली. त्या वेळीं बाजीरावास कळतें तर जिताच मारला गेलों असतों. कंपनी सरकारची इमानें इतबारें नोकरी केली. साहेब वचनानेंही गुंतले आहेत. तेव्हां माझें इनाम मला द्या व वचनास जागा.' भोळ्या बिचाऱ्या बलवंत मल्हारास साहेबाची पारख झाली नव्हती. साहेबानें त्यास उत्तर केलें कीं, 'चालतें जप्त करावें व जप्त केलेलें चालवावें असें धोरण बदलून चालणार नाहीं. तुम्ही महाराज सरकारची नोकरी करा. तेच तुमचें उर्जित करतील.' या उत्तरानें बलवंत मल्हारची दारुण निराशा झाली व त्या निराशेंतच दिवस कंठण्याच्या प्रसंग त्यास आला. पुढें त्यानें आपणांस व महाराजांस एल्फिन्स्टननें व बाळाजीपंत नातूनें कसें फसविलें याची सर्व बारीक सारीक हकीगत लिहून मुंबईस महाराजांच्या वतीनें चळवळ करणाऱ्या मिल्नेस दिली. मिल्नेनें ती सर्व ता. २४ मे १८३७ ला प्रसिद्ध केली. त्यामुळें मुंबईचा गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रॅन्ट याच्या नाकास मिरच्या झोंबल्या. 'आमचीं दुष्कृत्यें चवाठ्यावर आणणारा हा कोण आगलाव्या?

त्याचा बंदोबस्त केलाच पाहिजे. ' असें म्हणून ग्रॅन्ट व त्याचें कौन्सिल बलवंत मल्हारच्या मागें लागलें. सातारकर महाराजांच्या मनांत कंपनी सरकारविषयीं गैरसमज व अप्रीति निर्माण करणारा बदमाष म्हणून त्याची साताऱ्याहून उचलबांगडी करण्यांत आली. आणि त्यास पुण्यांत कैदखाना दाखविण्यांत आला. पेशव्यानें आपलें उत्पन्न खालसा केलें म्हणून त्याचा सूड घेण्यासाठीं रचलेलें सर्व कारस्थान त्याच्या अंगावर कोसळलें. साताऱ्च्या छत्रपतींचा मातबर दिवाण, मुरब्बी मुत्सद्दी म्हणून त्यानें आजपर्यंत कमाविलेला सर्व लौकिक मातीस मिळाला व त्यास कैदखान्यांत इंग्रजांचा कैदी म्हणून दिवस कंठण्याचा दुर्धर प्रसंग आला. अशा स्थितींत तो सहा वर्षें होता. त्यांतच बिचाऱ्याचा शेवट झाला. त्यास पोटगी म्हणून खर्चास दररोज एक रुपया मिळत असे.

बलवंत मल्हार चिटणीसानंतर सातारकर छत्रपतींची भिस्त सर्वस्वी रंगो बापूजीवर पडली. महाराजांच्या अपेक्षेबाहेर रंगो बापूजीनें कार्य केलें पण तो फुटक्या नशिबाचा ठरला. त्यानें अतिशय कष्ट व मेहनत केली; पण त्याच्या पदरीं यश मात्र आलें नाहीं. त्याने भगीरथ प्रयत्न करावेत व दैवानें एकामागून एक असे एकसारखे टोले देत असावें अशांतला प्रकार चालला होता. त्यानें आपलीं कामें करतांना हरहुन्नरी केल्या, वेषांतरें केलीं. सातारकर महाराजांचें इंग्रजाशीं व इंग्रजाचें सातारकरांशीं सूत जमविण्यासाठीं पुण्यापासून साताऱ्यापर्यंत तो पायीं रखडला. इंग्रजाचें व सातारकरांचें सूत जमलें. सातारकर गादीवर बसले व त्यांनीं राज्य करण्यास सुरुवात केली. रंगो बापूजीनें ज्या वतनाकरितां इतका खटाटोप केला तें वतन मात्र त्यास मिळालें नाहीं. सातारकरांची बित्तंबातमी इंग्रजास देण्याचें श्रेय रंगो बापूजी व बलवंत मल्हार हे दोघेही आपणांकडे घेतात. सातारकर महाराजांच्या स्वाऱ्या पेशव्यानें वासोट्यावर ठेविल्या असल्याची बातमी इंग्रजास प्रथम आपण दिली असें दोघेही म्हणतात. आपापल्या समजुतीप्रमाणें दोघेंही खरे असतील. ही बातमी साहेबास दिल्याबद्दल साहेबानें रंगो बापूजीस पुन्हां एकदां पांच मोहरा बक्षीस दिल्या. सातारकरांच्या स्वाऱ्या रंगो बापूजीनें पंढरपुरास नेल्या. यानंतर एल्फिन्स्टननें काढलेल्या जाहीरनाम्याची जाहिरात करून जनतेंत कंपनी सरकारबद्दल

विश्वास निर्माण करण्याचे कामीं रंगो बापूजीनें साहेबास मदत केली. रंगो
बापूजीस साहेब बहादुरांचें बोलावणें आलें. 'त्याजवरून मी पुणियाहून निघून
पुणतांब्याचे मुक्कामीं येऊन साहेब बहादूर यांजपाशीं हजर जालों. नंतर
लष्करचे कूच होऊन औरंगाबादेस गेलों. मी बरोबरच होतों.' तेथून बाजी-
रावाचा मुलूख सर करण्याचें ठरलें. आणि लगेच वैजापुराहून एका जाहिरनाम्या-
निशीं त्याची रवानगी करण्यांत आली. त्यास नाशिक प्रांतीं अंमल बस-
विण्याचा हुकूम झाला होता. तो त्यानें त्या जाहिरनाम्याच्या जिवावर मोठ्या
शिताफीनें बसविला. 'ते समईं सिबंदी कोणी मिळेना. व कारकूनही कोणी
न मिळेत. सर्व पेशव्याचे फौजेचा अंदेश घेऊन जमीदार व मोकदम व रयेत
कोणी अनकूळ न होई.' तेव्हां त्यांची नीट समजूत घालून, साहेबाचा थोर-
पणा त्यास सांगून, रयतेचीं मनें वळवून नाशिक प्रांतीं कुंभारी, पाटोदे, सिन्नर
वगैरे ठाणीं त्यानें हस्तगत केलीं; नंतर किल्ले घेण्यास सुरुवात केली. या वेळीं रंगो
बापूजीस मोठा पेंच पडला. हतगड, रामशेज, देहर, बहुला, वाघेडा हे किल्लेही त्यानें
घेतले. नंतर कातनई, गडागड, त्रिंगळवाडी हे तीन किल्ले पेशव्यांचे वेळीं रंगो
बापूजीच्या व्याह्याकडे होते. 'ते किल्ले हस्तगत होईनात तेव्हां वाटेल त्या
रीतीनें त्याची खातराजिमा करून भेटीस म्हणून बोलावून आणून धरून घेऊन
साहेब बहादूर याचेजवळ हजर केलें. आणि तिन्हीं किल्ल्यांवर ठाणीं कायेम
केलीं. या प्रो कितेक किले व महाल लढून व कितेक फूस लावून घेतले.'
याप्रमाणें इंग्रजाचें चांगलें करतांना स्वजनांचें वाटोळें व विश्वासघात करण्यासही
रंगो बापूजीनें मागें पाहिलें नाहीं. इ. स. १८१९–२० चे सुमारास रंगो बापूजीची
प्रकृती बिघडली. त्याचे पाय सुजले व त्यास संधीवात झाला.

इकडे स्थिरस्थावर होऊन महाराजांस राज्याभिषेक झाला. ग्रँट डफच्या नजरे-
खालीं महाराज कारभार पाहूं लागले. रंगो बापूजीच्या प्रकृतीस आराम पडला तेव्हां
त्यानें साहजीकच आपण केलेल्या कामगिरीबद्दल चाफळकर महाराज, चिटणीस व
विठ्ठलपंत फडणीस यांजजवळ गोष्ट काढिली. त्याबरोबर चाफळकर स्वामी बोलले
कीं, 'तूं फार मोठें राजकारण केलें आहेस. तेव्हां त्याबद्दल दहा वर्षेंपर्यंत कोठेंही
वाच्यता करूं नकोस. सगळीकडे स्थिरस्थावर झाल्यावर तुझें काम करूं. महाराजांस

मुखत्यारी मिळण्यास अजून पांच वर्षें अवकाश आहे व त्यानंतर पांच वर्षें सर्व राज्य-कारभार महाराज स्वतः जातीनें पाहतील. व मग तुझें काम त्यांना सांगूं आणि नंतर ते सर्व तुझी तजवीज करतील.' हें स्वामीचें भाषण ऐकून रंगो बापूजी स्वस्थ बसला. पुढें लवकरच कांहीं वर्षांनीं करंज्याच्या बागेस (रंगो बापूजी करंज्याचा राहणारा) मोठ्या साहेबाचा म्हणजे एलिफन्स्टनचा मुक्काम पडला. पण दुर्दैवानें त्या वेळीं रंगो बापूजी तेथें नव्हता. तो पुण्यास होता. तरी त्यास तेथून बलवंत मल्हार चिटणिसांनीं मावारीं आणिलें आणि साहेबाची भेट घेण्याचा विचार त्यांनीं ठरविला. या भेटीच्या वेळीं विठ्ठलपंत फडणीस, आमात्य-पंत, बलवंत मल्हार चिटणीस व बाळाजीपंत नातू ही मंडळी होती. एलिफन्स्टनबरोबर कॅ. ग्रँट डफही होता, त्याच्या समक्ष ही भेट झाली. 'यानें राजकारण मोठें केलें आहे. सबब त्याचा बंदोबस्त करा ' असें रंगो बापूजीविषयीं एलिफन्स्टननें ग्रँट डफला सांगितलें. पण पुढें कोठें माशी शिंकली कोणास ठाऊक ! रंगो बापूजीचें काम झालें नाहीं. बिचारा पुन्हां तसाच रखडत पडला.

पुढें अक्कलकोटास बंड झालें, तेव्हां त्या कामगिरीवर बलवंत मल्हार चिटणिसांनीं रंगो बापूजीस धाडिलें. त्यानें बंडवाल्यांचे कागद पकडले. त्यांत रंगो बापूजीस कैदही भोगण्याचा प्रसंग आला. पण न डगमगतां त्यानें मोठ्या धैर्यानें या संकटांना तोंड दिलें. यांतून मुक्त होऊन बाहेर येतो तों चाफळकर स्वामी व विठ्ठलपंत फडणीस दोघेही निवर्तले. म्हणून त्याचें काम तसेंच लोंबत राहिलें आणि त्याला त्याच्या कामगिरीचा मोबदला मात्र मिळाला नाहीं. तो अत्यंत त्रासांत दिवस काढीत होता. पुढें भावाचें लग्न झालें. त्यामुळें चारपांचशें रुपये कर्ज झालें. तेव्हां जास्तच जिकीर झाली. या अवस्थेंत तो इ. स. १८३१ पर्यंत होता. त्यानें या सर्व हकीगती लिहून कार्तिक शु॥ ९ शके १७५२ रोजीं सातारकर महाराजांकडे एक अर्ज केला. पण त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. यानंतर आठ वर्षांनीं महाराजांनीं त्यास आपला वकील म्हणून विलायतेस धाडिलें. या त्याच्या वकिलीमुळें त्याचें नांव आतां विशेष प्रसिद्धी पावलें. रंगो बापूजी विलायतेस निघाला, तो कॅ. कोगनबरोबर. विलायतेच्या शिष्टमंडळास खर्च पुष्कळच लागणार होता. पण रंगो बापूजीच्या

हिशेबाप्रमाणें तूर्त निदान पन्नास हजार रुपये लागणार असा अंदाज होता. कॅ. कोगनला महाराजांचा खटला चालविण्यासाठीं म्हणून महिना दोन हजार रुपये तनखा ठरला होता व तो एक वर्षाचा आगाऊ द्यावयाचा होता. तेव्हां ते चोवीस हजार रुपये कॅ. कोगनला चुकते करावयाचे होते. म्हणून रंगो बापूजीनें पन्नास हजार रुपये धाडण्याबद्दल साताराच्या महाराजास लिहिलें. पण महाराजांची सध्यांची स्थिती फारशी चांगली नव्हती, म्हणून त्यांस रंगो बापूजीस पैसे धाडणें शक्य नव्हतें. तरी पण कसें बसें करून महाराजांनीं पंचवीस हजार रुपयांच्या हुंड्या धाडल्या व पंचवीस हजार रुपये पुढें गेलेल्या वकीलमंडळींबरोबर आगाऊच दिले होते. तेव्हां एकंदर पन्नास हजार रुपये जेमतेम होत आहेत, तरी तूर्त भागवून घ्या, म्हणून महाराजांनीं रंगो बापूजीस कळविलें. रंगो बापूजीनें परमेश्वरावर हवाला ठेवून एवढ्या छोट्या रकमेंत भागविण्याचें योजिलें. कारण चोवीस हजार कॅ. कोगन यास दिल्यानंतर प्रवासखर्च वजा जातां रंगो बापूजीजवळ दोन हजार रुपये शिल्लक होते. इ. स. १८३९ च्या १२ सप्टेंबरला निघालेला रंगो बापूजी त्या वर्षाच्या शेवटीं शेवटीं विलायतेस पोंचला.

विलायतेस गेल्यानंतर त्यानें आपल्या इतर मंडळींबरोबर कामास सुरुवात केली. पण इंग्लंडचें कंपनी सरकार या सर्वांचें बारसें जेवलें होतें. त्यानें मुळांतच पट उधळून दिला. कंपनी सरकार यांपैकीं कोणाही एकास किंवा या सर्व मंडळींस महाराजाचें वकीलमंडळ म्हणून सरकारी रीत्या मानण्यासच तयार होईना. मग यांच्या रडकथा ऐकतो कोण व सवड कोणास! अशांतच १८३९ साल गेलें. १८४० ही खलास होण्याचा रंग दिसूं लागला. जवळचा पैसा संपला. महाराजांकडून पैसा येईना. रंगो बापूजीनें १२ सप्टेंबर १८३९ ला जहाजावर पाय ठेवला व त्यापूर्वीं बरोबर आठच दिवस ता. ५ सप्टेंबरला छत्रपतींस सिंहासनावरून पदच्युत केलें होतें. त्यांची सर्व जिनगी सरकारजमा करण्यांत आली होती. अशा तऱ्हेनें महाराजच संकटांत असल्यामुळें त्यांस या मंडळींना पैसे धाडणें शक्य नव्हतें. जवळचा पैसा संपला व महाराजांकडूनही येईना. कामाच्या बाबतींत अगदींच निराशा झाली होती. अशा बिकट परिस्थितींत वकीलमंडळ सांपडलें व त्यामुळें अन्नूनें दिवस काढणें कठीण झालें. कारण महाराजांकडून

पैसे येतील या आशेनें सावकारांकडून ऋण काढून बिचारे कसा तरी गुजारा करीत होते. पण महाराजांचें उत्पन्न खालसा झालेलें समजतांच त्यांचें धाबें दणाणलें व पांचावर धारण बसली. या कोंडींतून आपण कसें निसटणार याबद्दल त्यांस फिकीर वाटूं लागली. त्यांतून इंग्लंडची हवा कित्येकांस सोसेना. त्या भरींत भर म्हणून हा मानासिक त्रास. त्यामुळें बऱ्याचजणांच्या प्रकृत्या खालावल्या. सावकारांचे तगादे जोरांत सुरू झालें. तगादे तर भागवतां येईनात. तेव्हां कोणता सावकार केव्हां दिवाणी तुरुंग दाखवील याचा कांहींच नेम लागेना. अशा तऱ्हेनें ही मंडळी विलायतेंत फारच पेंचांत सांपडली. अफजलअल्ली प्रकृतीनें व या संकटानें फारच हैराण झाला. तेव्हां त्यानें १४ सप्टेंबर १८४० ला कंपनी सरकारास खालीलप्रमाणें एक अर्ज केला.

' माझी प्रकृति फारच खालावली आहे. मला येथील हवा सोसत नाहीं. तेव्हां मी परत हिंदुस्थानांत जाऊं इच्छितों. माझी व माझ्या बरोबरच्या मंडळींची फारच चमत्कारिक स्थिति झाली आहे. त्याची आपणांस कल्पना येणार नाहीं. हातीं पैसा नसल्यामुळें येथें दिवस कंठणें फार कठीण झालें आहे. जिवाच्या करारावर कशींबशीं दोन वर्षें काढलीं. या अवधींत माझ्या प्रकृतीवर फारच वाईट परिणाम झाला असून मी येथून गेल्याशिवाय माझी प्रकृती दुरुस्त होणें शक्य नाहीं. तेव्हां मी येथून निघणाऱ्या पहिल्या बोटीनें परत हिंदुस्थानांत जाण्यास तयार आहें. तरी कंपनी सरकारनें कृपाळू होऊन मला ७०० पौंड सातारकर महाराजांच्या नांवें उसने देण्याची कृपा करावी. म्हणजे येथील देणें घेणें फेडून मला माझ्या दोन-तीन मंडळींसह माघारीं जातां येईल. तरी कंपनी सरकारनें मेहेरबानी करून मीं मागितलेली रक्कम शक्यतों लवकर दिल्यास कंपनी सरकारचा मी फार आभारी होईन.' अफजलअल्लीच्या या अर्जास कंपनी सरकारकडून असें उत्तर आलें कीं, ' कंपनी सरकार एकट्या-दुकट्यानें केलेल्या अर्जाचा विचार करण्यास तयार नाहीं. सर्व मंडळी मिळून मागणी केल्यास त्याचा विचार करण्यांत येईल. ' पण या वेळीं इतर मंडळी इंग्लंड सोडण्यास तयार नव्हती. तेव्हां मीर अफजलअल्लीची फारच निराशा झाली. तरी पण त्यानें जॉर्ज हार्बस या गृहस्थाकडून उसनवार पैसे घेऊन हिंदुस्थानचा रस्ता सुधारला.

इंग्लंडांत चळवळ करावयाची ती सनदशीर चळवळ करावयाची, तिचा शिरस्ता ठरलेला. लोकांच्या समोर व्याख्यानें झोडणें, वर्तमानपत्रांतून लेख लिहून प्रसिद्ध करणें व लोकमत आपल्या बाजूला वळविणें. तसेंच शिष्ट-मंडळी धाडून साहेब बहादुरांच्या गांठीभेटी घेणें. असल्या या नादानपणाच्या मार्गाला हिंदुस्थानाच्या वतीनें या वेळेपासून सुरुवात झाली आहे. या सनदशीर प्रयत्नांचा प्रारंभ प्रथम रंगो बापूजीनें केला. या सनदशीर संप्रदायाचा तो जनक आहे असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. त्यानें इंग्लंडांत जनतेपुढें व्याख्यानें दिलीं. मासिकें चालविलीं. या मासिकास सुरुवात जानेवारी १८४० त झाली. छत्रपतींच्या सांपत्तिक मदतीनें 'ब्रिटिश इंडियन ॲडव्होकेट' या नांवाचें मासिक सुरू करण्यांत आलें. छत्रपति महाराज हयात होते तोंपर्यंत तें बिनतक्रार दरमहा निघत होतें. त्याच्यांत कंपनी सरकाराकडून होत असलेले अन्याय जनतेपुढें सडेतोडपणें मांडले जात. या मासिकाची सर्व व्यवस्था झाली होती.

आतां ह्या विलायतेच्या वकीलमंडळींस मात्र तेथें राहणें फारच जाचक होऊं लागलें. कारण विलायतेसारख्या अत्यंत दूरच्या ठिकाणीं वकीलमंडळीस आपल्या गडीमाणसांसुद्धां राहणें फारच खर्चाचें होतें. अगदीं परक्या ठिकाणीं दहा-पंधरा माणसांचा खर्च चालविणें म्हणजे लहानसहान गोष्ट नव्हती. पैसा पाण्यासारखा लागे. इतके दिवस ही मंडळी तेथें छत्रपतींचे वकील म्हणून मोठ्या थाटानें राहात असे. त्यामुळें भोंवतालच्या इतर लोकांवर त्यांचा दबदबा असे. कशीतरी पत संभाळून ते शिशाला तूप लावून दिवस काढीत होते. पण आतां परिस्थिति फारच बदलली. प्रतापसिंह महाराजांना पदच्युत करण्यांत आलें. त्यांची खाजगी जिनगी पैन् पै जप्त करण्यांत आली व ती सरकारजमा सुद्धां झाली. ही बातमी इंग्लंडांत फैलावल्यावर या वकीलमंडळींची घडी पार विसकटली. कारण मूळ आसनच डळमळीत झालें. देवावांचून देव्हारा जसा कवडीमोल त्याप्रमाणें महाराजांच्या अभावीं त्यांचे वकील हतप्रभ झाले. महाराजांचाच इंग्रजानें नायनाट केल्यानें या वकीलमंडळींस फारच कठीण दिवस आले. इतके दिवस आज या सावकारापासून पैसे काढ, उद्यां तो

मारवाडी गांठ व कसे तरी अब्रूनें दिवस काढ असें चाललें होतें. त्यास या बातमीनें चांगलाच खो बसला. सावकारमंडळींची कावकाव सुरू झाली. तगादे भागवितां येईनात व सबबीही सांगतां येईनात. तेव्हां दिवाणी तुरुंगाची कट्यार केंसाला बांधलेल्या नंग्या समशेरीप्रमाणें एकसारखी डोक्यावर लटकूं लागली. केंस केव्हां तुटेल व कपाळमोक्ष केव्हां होईल याचा नेम नव्हता. तेव्हां नाइलाजानें आपणही हिंदुस्थानचा मार्ग स्वीकारावा असा या वकीलमंडळींनीं बेत केला. प्रवासखर्चास पैसे देण्याबद्दल कंपनी सरकारास त्यांनीं अर्ज धाडिला.

आपल्या भोंवतालच्या अत्यंत हृदयस्पर्शी व भयाण परिस्थितीची यथार्थ कल्पना देऊन वकीलमंडळींनीं कंपनी सरकारजवळ चार हजार पौंडाची मागणी केली. कंपनी सरकारास ही मागणी फारशी जड नव्हती. कारण ज्या दुर्दैवी छत्रपतींच्या वतीनें हें वकीलमंडळ भांडत होतें त्याचें राज्य व लाखों रुपयांची खाजगी जिंदगी त्यांनीं लुबाडली होती. या मुद्द्याचा उल्लेखही वकीलमंडळानें अर्जांत केला होता. तसेंच महाराजांवर झालेले अन्याय चव्हाट्यावर आणण्याची चळवळ आपण अजिबात थांबवून सर्वच्या सर्व येथून निघून जाण्यास तयार आहोंत असें वकीलमंडळानें कबूलही केलें होतें.

'आम्ही चळवळ अजिबात सोडून देतों व येथून सर्वजण निघून जातों' या एका वाक्यामुळें कंपनी सरकार या वकीलमंडळीस पैसे येण्यास तयार झालें! कारण या वकीलमंडळाचें इंग्लंडांतील वास्तव्य कंपनी सरकारच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट व घातुक होतें. या वकीलमंडळानें छत्रपतींवर झालेल्या अन्यायांचा डांगोरा एकसारखा पिटण्यास सुरुवात केली होती. त्यामुळें कंपनी सरकारच्या डायरेक्टरांना मुंबई सरकारनें व हिंदुस्थानांतील गोऱ्या अधिकाऱ्यानें केलेलीं अन्यायाचीं कृत्यें झांकतां झांकतां पुरेवाट झाली होती. कारण हरहमेश या वकीलमंडळानें साताऱ्याच्या रेसिडेंटांनीं, मुंबईच्या गव्हर्नरनें व त्याच्या कौन्सिलनें केलेलीं दुष्कृत्यें चव्हाट्यावर मांडावीं व सभांतून प्रश्न विचारावे असा तडाखा सुरू केला होता. त्या सर्व प्रश्नांस गुळगुळीत उत्तरें देतां देतां व कंपनी सरकारची बाजू सांवरतां सांवरतां डायरेक्टरांस ओशाळल्यासारखें होई. तेव्हां हें वकीलमंडळ एकदाचें येथून नाहींसें झाल्यास बरें होईल असें त्यांस साहजिकच

वाटे. आणि आतां वकीलमंडळानें स्वतः होऊन जाण्याची तयारी दाखविल्या-मुळें तर डायरेक्टरांना दुधांत साखर पडल्यासारखें झालें. तेव्हां त्यांनीं आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें म्हणजे वकीलमंडळानें मागितलेली ४,००० पौंडांची रक्कम देण्यांस अत्यंत खळखळ घालून शेवटीं एकदां पैसे दिले. हे सर्व पैसे पुढें सातारच्या खजिन्यांतून वसूल करण्यांत आले, हें सांगणें नलगे!

इ. स. १८४१ त पैसे हातीं येतांच हें वकीलमंडळ तेथून निघालें. याच सालच्या १ जुलैला रंगो बापूजी व यशवंतराव शिर्के हे सॉऊदॅम्प्टन येथून निघणाऱ्या व अलेक्झँड्रियाच्या बाजूनें जाणाऱ्या 'ओरिएन्टल' नांवाच्या जहाजावरून निघाले. तसेंच भवानराव व इतर मंडळी २ जुलैला 'सॅट हेलेना'-वरून केप ऑफ गुडहोपच्या मार्गानें कलकत्त्यास येणाऱ्या 'ब्युसिफलस्' नांवाच्या जहाजांतून निघाली. पण रंगो बापूजी मालटच्यास आला व येथून थेट मुंबई-कडे आपला मोर्चा न वळवितां तो तेथेंच थांबला आणि आपल्या हतभागी महाराजांकडून कांहीं पत्र वगैरे येतें कीं काय याची वाट पाहात राहिला. तों महाराजांचा त्यास इंग्लंडला माघारीं जाण्याबद्दल हुकूम आला व त्याप्रमाणें तो निघालाही.

आम्हांला काय त्याचें ? : ३२

प्रतापसिंह गादीवरून गेला काय व त्याच्या जागीं अप्पासाहेब आला काय, आम्हांस दोघेही सारखेच ! त्यांत कांहीं राज्यक्रांति झाली, एकाची गळचेपी दुसऱ्यानें केली व तो मोठा अन्याय झाला म्हणून प्रजेंत कांहीं गडबड धामधूम—छे नांव नको ! जो तो जागच्या जागीं थंड. उलट " ना विष्णुः पृथ्वीपतिः " म्हणून त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यास आम्ही सदैव तयारच. प्रतापसिंहास मृत्यु काशीस आला म्हणून तोही धन्य व त्याचा भाऊ अप्पासाहेब मरणसमयीं अगदीं शुद्धीवर होता म्हणून तोही धन्य ! दोघेही मोक्षास अधिकारी सारखेच. मग एकानें शत्रूशीं मिलाफ केला व दुसऱ्यानें आपल्या भावास देशोधडीस लाविलें, म्हणून कांहीं वावगें केलें अशांतला मुळींच भाग नाहीं. कारण ' जे राजे, ते फार थोर. त्यांच्या कृती आपल्यासारख्या गरीब रयतेस न कळण्यासारख्या. मोठ्यांचें सगळेंच मोठें ' म्हणून आम्ही आपले नामानिराळे. याचेही स्तुतिपाठ भाटासारखे आळवूं व त्याचेही पोवाडे गाण्यासाठीं डफावर थाप टाकूं. प्रतापसिंह महाराज काशीस निवर्तले त्यासंबंधीं बखरींत उल्लेख असा आहे कीं, ' प्रतापसिंह महाराज हे मोठे पुणे प्राणी. याणीं राज्य करून श्री कासीवास करून पूर्वजन्मीं तप अनुष्ठान बद्रकाश्रमी केलें होतें. त्या स्थळीं पुन्हा गेले. ' आतां शहाजी राजे ऊर्फ अप्पासाहेब यांच्या अंतकाळचें वर्णन खालीलप्रमाणें आहे. ' शहाजी राजे महाराज याणीं संगम माहुली येथें कृष्णा तीरीं दोनशें गाईंचीं

गोप्रदानें ब्राह्मणांस दिलीं. यामुळें अंतकाळसमईं शहाजी राजे महाराज यांजला मोठी सुमरती महान साधूसारखी राहिली होती. जो राजे करणारा राजा त्यापासून कांहीं अनंत तऱ्हेचे दोष घडतात म्हणोन त्यानें आपलें देहाचें सार्थक करण्याकरितां जसें भोजनसमईं पान वाढलें म्हणजे त्याजवर एक पैसा भार तुपाची अन्नसुधी त्याणे तितके अन्न पवित्र होते. त्याचे नांव अन्नसुधी असें म्हणतात. याप्रमाणें शहाजी राजे महाराज याणीं आपले सार्थक करून मोठी कीर्ति केली आणि सर्ग मार्ग चढोन आपण कैलासभवनास गेले.' वरील दोन उतारे वाचले म्हणजे साताराची प्रजा दोन्ही राजांवर कशी सारखीच खूष होती हें स्पष्ट होतें; पण हा दोष आमच्या मनाच्या ठेवणीचा आहे व तिच्यांत जोंपर्यंत फरक होणार नाहीं, तोंपर्यंत आमचें नष्टचर्यही संपणार नाहीं.

पण खरी वस्तुस्थिति मात्र फार निराळी होती. शहाजी राजे ऊर्फ अप्पासाहेब हा पहिल्यापासूनच चंगी भंगी व व्यसनी होता. प्रतापसिंहाचें व इंग्रजाचें जोंपर्यंत सूत होतें तोंपर्यंत सातान्याच्या रेसिडेन्टानें सुद्धां त्याच्याबद्दल वाईट उद्गार काढिले आहेत. पण राजकारण विश्वयोषितेप्रमाणें बहुरंगी व अनेक ढंगी असतें हेंच खरें. तें केव्हां अमावस्येच्या काळ्याकुट्ट अंधारास 'हें पहा पांढरें फटफटीत दुधासारखें चांदणें' असें म्हणून नौबदी वाजवील व अखिल विश्वास अमृतसिंचनानें नवचैतन्य देणाऱ्या औषधीपतीस 'ही पहा अमावस्येच्या काळ्या रात्रीं निघालेली अग्यावेताळाची स्वारी' म्हणून महाध्वनी करील, याचा नेमच नाहीं! कारण ता. ८-१०-१८३३ रोजीं मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड क्लेअर हा साताऱ्यास आला व त्यानें प्रतापसिंहास भेट दिली. त्या वेळची हकीगत त्यानें लिहून ठेविली आहे. त्यांत तो अप्पासाहेबाविषयीं म्हणतो कीं, 'प्रतापसिंहाचा भाऊ अप्पासाहेब जड व निर्बुद्ध दिसतो. त्याच्या तोंडावर तेज कसें तें बिलकुल नाहीं. त्याची अक्कलही बेताचीच असल्यामुळें लोकांस त्याजबद्दल मोठासा आदर वाटत नाहीं. प्रतापसिंहास मुलगा नसल्यामुळें अप्पासाहेब पुढें गादीवर आल्यास मोठा कठीण प्रसंग ओढवेल असें लोकांस वाटतें. त्याऐवजीं लोकांचे डोळे बाळासाहेब सेनापतींकडे लागतात. कारण तो हुशार व तरतरीत आहे.'

हें झालें लॉर्ड क्लेअरचें म्हणणें. आतां ग्रॅन्ट डफ ता. २३–३–१८१९ च्या पत्रांत असें म्हणतो कीं, 'अप्पासाहेब हट्टी व दुर्वृत्त आहे. त्यास वाईट वाईट व्यसनें जडलेलीं आहेत. प्रतापसिंहानें त्यास कितीही शिकविलें तरी त्याच्या खोडया सुटत नाहींत.' अशीं खुद्द इंग्रज अधिकाऱ्यांचीं मतें असतां कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांनीं केवळ राजकारण म्हणून अप्पासाहेबास मुद्दाम गादीवर बसविलें व त्याच्या कपाळीं शेंदूर लाविला.

प्रतापसिंह गादीवर असतांना अप्पासाहेबास प्रत्येक महिन्यास रु. ५,५०० तनखा मिळत असे. ते सर्वच्या सर्व पैसे अप्पासाहेब ख्यालीखुशालींत उडवी. इतकेंच काय पण त्यास ही एवढी मोठी रक्कमही त्यासाठीं पुरत नसे. त्यास कर्जही पुष्कळ झालें होतें. तेव्हां अप्पासाहेबास कर्जमुक्त करण्याकरितां म्हणून प्रताप- सिंहानें एकदां २०,००० रु. रोख दिले होते. पण त्यानें त्याचा उपयोग सावकारास देण्याकरितां केला किंवा नाहीं कोणास ठाऊक. त्यानें पुण्याची एक रक्षा ठेविली होती, तिला खूष करण्याकरितां त्यानें २०,००० रु. दिल्याचा दाखला आहे आणि याच रक्षेच्या नादानें थोरली बायको ताराबाई तारळेकर महाडिक हिला तो नानातऱ्हेनें छळूं लागला. तेव्हां ती नवऱ्याच्या जाचास कंटाळून प्रतापसिंहाकडे राहावयास गेली व प्रतापसिंहाच्या पदच्युतीनंतर एक वर्षानें म्हणजे ता. १३–३–१८४० त रंगमहालाचे वाड्यांत मरण पावली. हें बाळ अशा तऱ्हेनें गुण उधळीत होतें व प्रतापसिंह त्यास सांवरीत होता. त्यानें अप्पासाहेबास अदालतीचें काम पाहण्यास सांगितलें, त्यांतही त्यानें गोंधळ करून ठेविला. तेव्हां त्यावेळचा (इ. स. १८३५) रेसिडेन्ट लॉडविक यानें त्यास अदालतीच्या कामावरून दूर करण्यास सांगितलें, तसेंच त्यानें स्वतः कबूल केलेलें असें १,७५,००० रुपयांपेक्षांही अधिक असलेलें कर्ज वारण्या- करितां त्याचा वार्षिक तनखा कमी करावा असेंही प्रतापसिंहास सुचविलें. इ. स. १८३५ च्या सुरुवातीस अप्पासाहेबानें एक मजेदार उपद्व्याप केला. त्यानें कंपनी सरकारकडे प्रतापसिंहाच्या अर्ध्या राज्याची मागणी केली. पण त्या कामीं त्यास त्या वेळीं यश आलें नाहीं.

अप्पासाहेब दैवाचा शिकंदर यांत मात्र तिळप्राय शंका नाहीं. कारण

' आंधळा मागतो एक डोळा तर परमेश्वर देतो दोन ' अशी स्थिती अप्पासाहेबाची झाली. इ. स. १८३५ मध्यें जी गोष्ट अशक्य वाटत होती तीच गोष्ट अवघ्या चार वर्षांत शक्य व्हावी, प्रतापसिंहाचा नादान भाऊ म्हणून जें कंपनी सरकार त्याच्याविषयीं एकसारखा डांगोरा पिटत होतें त्याच कंपनी सरकारास तोच अप्पासाहेब सातारच्या अर्ध्या गादीसच काय पण सबंध गादीस लायक वाटावा, इतकेंच नव्हे तर त्यास सिंहासनावर बसवावें, हा तरी केवढा चमत्कार ! अशा तऱ्हेनें अप्पासाहेबांच्या नशिबानें उलट खाल्ली. होत्याचें नव्हतें आणि नव्हत्याचें होतें झालें ! अप्पासाहेबाच्या आयुष्यांतील परम भाग्याचें वर्ष म्हणजे इ. स. १८३९. त्यांतूनही मार्च महिना. कारण या महिन्यांतच केव्हां तरी अप्पासाहेबाकडे दोन ब्राह्मण गृहस्थ आले व म्हणूं लागले कीं, मुंबई सरकार प्रतापसिंह महाराजांस राज्यावरून काढणार असून त्यांची मालमत्ताही जप्त करणार आहे. तेव्हां ही आलेली सोन्याची संधी आपण वायां दवडूं नका. आपण जा व रेसिडेन्टास भेटून राज्य आपणांस मिळावें म्हणून खटपट करा. या कार्यांत आपणांस खात्रीनें यश येईल. अप्पासाहेबास त्या ब्राह्मण गृहस्थांच्या आगमनानें व त्यांच्या मधुर भाषणानें अत्यंत आनंद झाला असेल व त्यानें त्यांस बिदागीही पुष्कळ दिली असेल.

एकाद्या कादंबरीच्या काल्पनिक कथानकांत ज्याप्रमाणें त्यांतील नायकानें या कड्यावरून त्या कड्यावर सहज उडी मारावी, शत्रूच्या तडाक्यांतून निसटण्यासाठीं जरा आडोशाच्या बाजूला जातो तों तेथेंच त्यास सर्व संकटांतून पार होण्यासाठीं पंचकल्याणी अरब घोडा नेमका सांपडावा व त्याच्यावर स्वार होऊन तो अटकेपार व्हावा तशांतलाच प्रकार अप्पासाहेबाचा झाला ! अप्पासाहेबानें रेसिडेन्टाकडे केलेल्या कागाळ्यांचा योग्य तो परिणाम झाला. ता. २४–३–१८३९ रोजीं कोंडव्याच्या बागेंत जाण्याचें निमित्त करून अप्पासाहेबानें राजवाडा सोडिला. कोंडव्याच्या बागेंत येतो तों त्यास बाळाजीपंत नातूचा व कर्नल ओव्हान्सचा हस्तक काशिनाथपंत छिबे भेटला. उभयतांची भेट झाल्यावर दोघे मिळून लगेच रेसिडेन्सीकडे निघाले. तेथें जातात तोंच ठरल्याप्रमाणें कर्नल ओव्हान्स व बाळाजीपंत नातू अप्पासाहेबाची वाटच पाहात होते. रेसिडेन्ट

ओव्हान्सनें अप्पासाहेबाच्या स्वागतार्थ एक शामियाना मुद्दाम तयार केला होता. अप्पासाहेब येतांच कंपनी सरकारच्या शिपायांकडून त्यास राजास शोभेशी सलामी देण्यांत आली. नंतर उभयतांच्या भेटी होऊन खलबतें झालीं. लगेच प्रतापसिंहाकडूस कर्नल ओव्हान्सनें अप्पासाहेबाचें सामानसुमान व त्याची दुसरी बायको म्हणजे सगुणाबाई इजला आणविलें. अप्पासाहेब आतां कर्नल ओव्हान्सच्या छायेखालीं राहूं लागला. या धांदलींत कर्नल ओव्हान्सनें त्याजकडून एक कबुलीजबाब घेतला कीं, 'इंग्रज सरकारविरुद्ध बंड पुकारण्याचें कारस्थान प्रतापसिंहानें चालविलें होतें त्यांत मी भाग घेतला होता !'

प्रतापसिंहास गादीवरून खालीं खेचल्यावर अप्पासाहेबास सिंहासनावर बसविण्याच्या उद्योगास इंग्रज लागला. ता. ५-९-३९ ला प्रतापसिंहास पदच्युत केलें. या गोष्टीस पुरे दोन महिनेही झाले नाहींत तोंच म्हणजे ता. १८-११-३९ ला अप्पासाहेबास गादीवर बसविण्याचा समारंभ झाला. इ. स. १८३९ च्या नोव्हेंबरमध्यें महाबळेश्वरास गव्हर्नर सर जेम्स कारनॅक हवा खाण्यासाठीं आला असतां रेसिडेन्ट क. ओव्हान्स त्यास भेटण्यासाठीं गेला. दोघांची मुलाखत झाली. नंतर सातान्याहून खंडेराव मामा शिर्के (प्रतापसिंह व आप्पासाहेब यांचा मामा) व यशवंतराव फौजदार हेही गव्हर्नरास भेटून आले. यानंतर १६ नोव्हेंबरला गव्हर्नरसाहेबांची स्वारी महाबळेश्वराहून सातान्यास दाखल झाली. तेव्हां रेसिडेन्ट क. ओव्हान्स, बाळाजीपंत नातू, खंडेराव मामा शिर्के व यशवंतराव फौजदार हे चौघे गव्हर्नरला एक कोस सामोरे गेले. गव्हर्नरसाहेबांचा मुक्काम रेसिडेन्टाच्या बंगल्यावर झाला. या वेळीं गव्हर्नराबरोबर त्याची बायको, मुलगा, ए. डी. सी. वुलोबी व एक डॉक्टर इतकी मंडळी होती. गव्हर्नरसाहेबांच्या सन्मानार्थ खुशीच्या तोफा डागण्यांत आल्या. यानंतर दुसऱ्या दिवशीं ता. १७-११-१८३९ ला दुपारीं भर बारा वाजतां अप्पासाहेब रेसिडेन्टाच्या बंगल्यावर हजर झाला. नंतर उभयतांच्या गांठीभेटी होऊन अप्पासाहेबानें गव्हर्नरास आपल्या बंगल्यावर पाहुणचारास बोलाविलें. याच वेळीं अप्पासाहेबाची पत्नीही राजशाही थाटानें तेथें आली व लेडी कारनॅकला भेटून तिनें तिलाही आमंत्रण दिलें. नंतर सायंकाळीं चारच्या सुमारास गव्हर्नरसाहेबांच्या स्वाऱ्या

अप्पासाहेबांच्या बंगल्यावर गेल्या. त्या वेळीं अप्पासाहेबानें सामोरें जाऊन मोठ्या सन्मानानें गव्हर्नरास आपल्या बंगल्यांत आणिलें. या समारंभास सर्व सरदार—जहागिरदार हजर होते. गव्हर्नरसाहेबांच्या व त्यांच्या ओळखी करून देण्यांत आल्या. यानंतर अत्तर-गुलाब व पान-सुपारी होऊन हा समारंभ संपला. दुसरे दिवशीं सातारा शहर तोरणें-पताकांनीं श्रृंगारण्याचा व रात्रीं रोषणाई करण्याचा हुकूम अप्पासाहेबानें दिला.

ता. १८-११-१८३९ च्या दिवशीं सातारा शहरांत जिकडे तिकडे मारे धांदल उडाली होती. सर्व शहर तोरणें-पताकांनीं श्रृंगारलें होतें. नागरिकांनीं आपआपलीं घरें सुशोभित केलीं होतीं. सकाळीं आठ वाजतां अप्पासाहेबाची स्वारी निघाली. अग्रभागीं नगारे-नौबदी झडत होत्या. झांजांचा झणझणाट चालू होता. शिंगें आणि कर्णे यांच्या गगनभेदी आवाजांनीं आसमंतांतील भूभाग निनादून गेला होता. त्याच्यामागें कंपनी सरकारचें व सातारकर छत्रपतींचें चतुरंग दळ चाललें होतें. उत्तम तऱ्हेनें सजविलेल्या भरजरी हत्तीवर खुद्द अप्पासाहेब आणि गव्हर्नर या उभयतांच्या स्वाऱ्या मोठ्या थाटानें बसल्या होत्या. हत्ती झुलत झुलत चालला होता. गव्हर्नरसाहेब व शहाजी राजे प्रजाजनांचे मुजरे घेत घेत मार्ग आक्रमीत होते. शेवटीं ही सर्व मिरवणूक मोठ्या थाटानें राजवाड्याशीं आली. तेथें फार मोठा दरबार झाला. अप्पासाहेबास गव्हर्नरनें सिंहासनावर बसविलें व नंतर गव्हर्नर स्वतः त्याच्या सिंहासनासमोर उभा राहिला व त्यानें 'राजेसाहेबां'स सात पोषाख व कांहीं रत्नांचा नजराणा दिला. नवीन तहाची प्रत दिली व समयोचित भाषण केलें. त्यानंतर अप्पासाहेब सिंहासनावरून खालीं उतरला व मग दोघेही एका कोंचावर बसले. अत्तरगुलाब वांटण्यांत आल्यानंतर गव्हर्नरसाहेबांची स्वारी निघाली. त्यास निरोप देण्यासाठीं अप्पासाहेब चार पावलें गेला. नंतर सरदार, जहागिरदार व ब्राह्मण मंडळी यांनीं शहाजी राजांस ऊर्फ अप्पासाहेबांस नजराणे दिले व श्रीफळें अर्पण केलीं. त्या दिवशीं गव्हर्नरसाहेबांस मोठा थाटाचा उपहार देण्यांत आला. अशा तऱ्हेनें जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. साताऱ्यास गेल्या चाळीस वर्षांत चार राज्यारोहण समारंभ झाले ! तीनदां प्रतापसिंहाचे व एकदां अप्पासाहेबाचा. पण हे समारंभ शेवटचेच ठरले.

याप्रमाणें अप्पासाहेब गादीवर बसला. प्रतापसिंहाच्या पदच्युतीनंतर राजवाड्यांत सिला व मोहरा करण्यांत आल्या होत्या त्या सर्व खोलण्यांत येऊन राजवाडा अप्पासाहेबाच्या ताब्यांत देण्यांत आला. प्रतापसिंहानें वीस वर्षांत जमा केलेल्या सर्व जिनगीवर अप्पासाहेब आयता नागोबा होऊन बसला. प्रतापसिंहाबरोबर राजमुद्रा, दरबारी समशेर व मोरचलें गेलीं होतीं. तीं सर्व राजचिन्हें त्याच्यापासून माघारीं आणून अप्पासाहेबाच्या स्वाधीन करण्यांत आलीं.

प्रस्तुतच्या राज्यारोहणासंबंधीं खुद्द गव्हर्नर सर जेम्स कारनॅक असें म्हणतो कीं,'......या वेळीं राजसेना मोठी प्रेक्षणीय दिसत होती. ती सुमारें तीन हजार असावी. हा सर्व समारंभ मोठ्या शिस्तीनें आणि आनंदानें पार पडला असें बाह्यतः तरी वाटत होतें. लोकांस ही राज्यक्रान्ती मान्य असावी असा सर्व देखावा दिसत होता.'

अप्पासाहेब विलासी व शोकी होता. तसेंच त्यास इमारतींची हौस फार होती. इच्छेस येईल तें तडीस नेण्यासारखी आतां त्यास सांपत्तिक स्थिति लाभल्यामुळें त्यानें सुद्धां सातारा शहरांत पुष्कळ सुधारणा केल्या. अप्पासाहेबानें नवा राजवाडा बांधिला. श्री देवीचा सभामंडपही चांगला भव्य असा त्यानें बांधिला आहे. त्यास एकंदर खर्च ५,७५,८६७ रु. लागला. सरकारी मोफत दवाखान्यासाठीं एक इमारत बांधिली. तिचा खर्च ६,००० रु. झाला. नंतर पाऊण लाख रुपये खर्च करून त्यानें सैन्याच्या बराकी बांधिल्या. नऊ हजार रुपये खर्च करून युरोपियन पाहुण्यांच्याकरितां बंगले बांधिले. पांच-सहा हजार रुपये मंदिराच्या जीर्णोद्धारासाठींहि खर्च केले. अशा तऱ्हेनें इमारतींच्या बाबतींत अप्पासाहेबानें नऊ दहा वर्षांच्या कारकीर्दींत चांगली भर टाकिली. साताऱ्च्या इमारतींत देवीचा सभामंडप हा खरोखरीच भव्य व प्रेक्षणीय आहे.

यवतेश्वराचा नळ गणपतीचे देवालयापर्यंत पूर्वींच बांधण्यांत आला होता. तो तेथून पुढें बांधून आणून अप्पासाहेबानें शहरांत पाणी सोडिलें. सखाराम बापूजी फडणीस, सखाराम बल्लाळ महाजनी व खंडेराव राजे शिर्के या लोकांच्या वाड्याशेजारीं हौद बांधिले. तसेंच गुरुवार पेठेंतही एक सार्वजनिक हौद बांधिला आणि शहरांत सर्व प्रमुख ठिकाणीं पाणी खेळविलें. याशिवाय जलमंदिरांत व बागेंत बंगले बांधिले. सातारा ते पुणें या रस्त्यावर कृष्णा व वेणा

या दोन्ही नद्यांवर दोन लाख रुपये खर्च करून मोठे व सुंदर असे पूल बांधिले. सदरहू पुलांचें काम त्या वेळीं दक्षिण हिंदुस्थानांत प्रेक्षणीय समजत.

अप्पासाहेबानें आपल्या राज्यांतील सतीची चाल बंद केली. गरीब लोकांना मोफत औषधपाण्याची व्यवस्था केली. देवी टोंचून घेण्याच्या कामीं लोकांत समज उत्पन्न केली. याशिवाय रस्ते, विहिरी व पूल बांधून प्रवासी लोकांची व्यवस्था केली. त्यानें आपल्या सैन्याची व्यवस्थाही चांगली ठेविली.

शहाजी राजे यांच्या राज्यकारभाराविषयीं बखरकार म्हणतो, 'शहाजी राजाच्या अंगीं ज्ञानचातुर्य, त्यांचें अंतःकरण दयाभूत असोन मोठें अवदार्य होतें. त्यांची निष्ठा कुळस्वामीजवळ फार असोन तसेच दानशूर जडजवाहीर, सोनें, चांदी, हाती व घोडे व कापड वगैरे इमारतीचा मोठा शोक होता. पदरचे मनुष्याकडून अपराध कारणपरत्वें जाहाला तर त्याचें नुकसान करण्याचे उतावीळ नव्हती. असा भिडस्तपणा व धूर्तता फार होती. मुलखातील न्याय, इनसाब, त्याणीं अदालतीचें काम फार दिवस केलें. व इंग्रजी सरकार पसंत होण्याजोगें करून सर्व राजे कारभार आपले जातीनें, अक्कलेनें चालवून इंग्रज सरकारची दोस्ती चांगली ठेविली होती व रयतेस इजा न होता त्यास आबाद चांगली राखिली होती. व फौजेचे कामगारांचा लोकांचा वगैरे पगार दरमहाचे दरमहास ज्याचा त्यास देऊन सर्व लोक हुशार ठेऊन त्याची आवेवस्ता होऊ दिली नाहीं. व प्रतिवर्षी दसऱ्यास पोषाख देणगी लोकास देत होते. त्याणीं राज्यकारभार नऊ वर्षेपर्यंत केला. त्यांची कीर्ति गुणी जनात न वर्णवे.'

अप्पासाहेबानें इंग्रजास कधींही दुखविलें नाहीं. या त्याच्या धोरणाचा इंग्रज लेखक मोठा गौरव करतात. अप्पासाहेबाच्या राज्यकारभारांत प्रमुख व्यक्ति म्हणजे त्याचा मामा खंडेराव मामा शिर्के. अप्पासाहेबानें इंग्रजाशीं मिळतें धोरण ठेवावें म्हणून तो फार काळजी घेई. खंडेरावास प्रतापसिंहानें सुद्धां 'सरलष्कर' असा किताब दिला होता. तो अप्पासाहेबानंतर तीन महिन्यांनीं मेला. त्या वेळीं सातारा दरबारीं प्रमुख असणाऱ्या लोकांची यादी खालील आर्येत आहे.

हर्षे आगटे, महाजनि नृपमातुल खंडरावजी शिरके ।
याविरहित दरबारीं अन्य जनाचा कधीं न पद शिरके ॥

———

कैफियत व निधन : ३३

प्रतापसिंह महाराजांचे सर्व प्रयत्न चालू होते व त्यांस अपयशाच्या ठोकरी एकसारख्या बसत होत्या. तरीपण निराश न होतां त्यांचे प्रयत्न उत्साहपूर्वक सगळीकडे चालू होते. पत्रामागून पत्रें व खलित्यामागून खलिते वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि सत्ताधाऱ्यांना ते धाडित होते. गव्हर्नर, गव्हर्नर जनरल, कोर्ट ऑफ डायरेक्टर्स, कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्स, बोर्ड ऑफ कंट्रोल, पार्लमेंट, प्रिव्हि-कौन्सिल आणि खुद्द राणी सरकार या मालिकेंतील कोणतेंही ठिकाण त्यांनीं सुनें ठेविलें नाहीं. या सर्व ठिकाणीं रंगो बापूजीमार्फत त्यांनीं सातत्यानें व एकसारखा उद्योग चालू ठेविला. प्रत्येक ठिकाणीं त्याचा मानभंग व निराशा होत होती. पण धन्य आहे त्या महात्म्याची कीं, यत्किंचितही कसूर न करतां त्याचे उद्योग अव्याहत चालू होते. त्यानें अनेक आर्जवें केलीं व खलिते लिहिले; पण त्यांतल्या त्यांत ता. २।१२।१८४४ ला केलेला अर्ज फारच सुंदर आहे. तेव्हां तो संक्षेपानें खालीं देत आहोंत.

'आपल्याला एवढ्या मोठ्या प्रदेशाचें अधिराज्य परमेश्वरानें दिलें आहे. आपल्या हातीं अनेक लोकांचें हिताहित करण्याचें अचाट सामर्थ्य आहे, तेव्हां असें करण्यांत परमेश्वराचा कांहीं तरी निर्मल हेतु असावा असा माझा पूर्ण विश्वास आहे व मजला आपल्याकडूनच न्याय मिळेल अशी माझी खात्री आहे. मी आपणांस आतां जी मागणी करणार आहें ती म्हणजे कांहीं असामान्य व

फार मोठी आहे अशांतला मुळींच भाग नाहीं. माझ्यावर करण्यांत आलेल्या अन्यायाची कथा महशूर आहे. परंतु मी परमेश्वरास स्मरून असें सांगतों कीं, माझ्यावर लादण्यांत आलेले आरोप सर्वथैव खोटे व बनावट आहेत. त्यांत सत्याचा अंश काहींइतका नाहीं. अशी खरी वस्तुस्थिति असतांना मला ही शिक्षा विनाकारण भोगण्याचा प्रसंग आला आहे. मी या हालांस फारशी भीक घालतों अंशातला मुळींच भाग नाहीं. पण आपण केलेल्या शिक्षेनें माझा जो जगभर बदलौकिक झाला आहे त्याचेंच मला वाईट वाटतें. यामुळें मी झुरणीस लागून माझा अंत केव्हां होईल याचा नेम नाहीं. तेव्हां मरणापूर्वी माझ्या अब्रूस लागलेला हा कलंक निघावा अशी माझी उत्कट इच्छा आहे. आपल्या देशांत कोणाही सामान्य माणसाची त्याच्या समक्ष चौकशी होऊन मगच त्यास शिक्षा सुनावण्यांत येते. अशा न्यायदानाबद्दल आपल्या इंग्लंड देशाची ख्याती असतांना मलाच तेवढा तो सामान्य हक्क नाकारण्यांत यावा याचा मोठा अचंबा वाटतो. सरकारच्या मनांत माझ्याबद्दल तेढ येण्यास सुरुवात झाली ती फक्त एका प्रश्नावरून. तो प्रश्न म्हणजे माझ्या हद्दींत असणाऱ्या जहागिरदारांवरील माझ्या हक्कांसंबंधींचा. त्याबद्दल भवति न भवति अनेक वर्षें होऊन कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं ता. २४।१२।१८३४ ला माझ्या बाजूनें निकाल दिला. पण त्याची बातमी मात्र मला केव्हांच देण्यांत आली नाहीं. वास्तविक हा प्रश्न उत्पन्न होण्याचें कारणच नव्हतें. पण तहनाम्यांतील कांहीं शब्दांच्या अर्थावरून हा वाद निघाला. तहनामा तयार करणारे एल्फिन्स्टन साहेब अजून हयात आहेत. तेव्हां त्यांसच याबद्दलचा खुलासा प्रत्यक्ष विचारावा. तहनाम्यांतील शब्दांचा अर्थ एल्फिन्स्टनच्या मतें मी म्हणतों तसा होत नसल्यास साहेब देतील तो निकाल मला मान्य आहे. ही माझी मागणी मुंबई सरकारनें कां नाकारावी हें कळत नाहीं. मुंबई सरकारकडे माझी दाद लागेना म्हणून मी 'सय्यद मीर अफजलअल्ली' या गृहस्थास विलायतेस माझी बाजू मांडण्यासाठीं धाडिलें. तेव्हां आपण केलेले अन्याय चव्हाट्यावर येतील म्हणून मुंबई सरकार चिडलें व त्यांनीं माझ्यावर नाना तऱ्हेचे आरोप लादण्यास सुरुवात केली. माझ्यावर करण्यांत येणाऱ्या आरोपांची चौकशी गुप्त कमिशन नेमून त्याच्या मार्फत

केली. त्यावर माझें म्हणणें काय आहे, याचा लेखी जबाब न घेतां कमिशननें असें जाहीर केलें कीं, मला माझ्यावरील आरोपांचें निराकरण करतां आलें नाहीं. न्यायदानाचा फार्स मात्र झाला. याला काय म्हणावें हें मला कळत नाहीं. जहागिरदारांच्या बाबीशिवाय माझ्यावर आणखी कांहीं आरोप आहेत हें मला १८३९ च्या ऑगस्टपर्यंत कांहींच माहीत नव्हतें. ते प्रथम मुंबईचे गव्हर्नर कारनॅक यांच्या मार्फत कळले ते येणेंप्रमाणें:--

१ मी साताऱ्यास असलेल्या हिंदी पलटणींत फितूर केला.

२ पोर्तुगीज सरकारशीं दोन वर्षें कट उभारण्यासाठीं पत्रव्यवहार केला.

३ नागपूरच्या पदच्युत राजाकडे या बंडासाठीं द्रव्यसाहाय्य मागितलें.

हे आरोप मजवर शाबीत झाल्याचें तारीख २३।८।१८३९ ला गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या भेटींत मला सांगितलें. यानंतर विचार करण्यास सुद्धां सवड मिळाली नाहीं. हे अपराध कबूल असल्याचं कबूल करून माफी लिहून द्याल तर तुम्हांस माफी करून तुमचें राज्य तुम्हांकडे चालूं ठेवूं, नाहींतर तुम्हांस राज्यांस मुकावें लागेल, अशी निर्वाणीची मागणी करण्यांत आली.

'या मागणीस रुकार देऊन ज्या गोष्टी मीं स्वप्नांतही केल्या नाहींत, त्याबद्दल फुकाचा खोटेपणा पदरीं घेणें मला आवडलें नाहीं. केवळ सत्यासाठीं मीं माझ्या राज्यावर पाणी सोडलें. माझ्यावर कांहीं एक आरोप शाबीत करतां येणार नाहींत, अशी मुंबई सरकारची खात्री असल्यामुळें तें माझा लेखी जबाब घेण्याच्या किंवा माझी उघड चौकशी करण्याच्या भानगडींत पडलें नाहीं. मुंबई सरकारनें आपल्याला सोईस्कर अशा मार्गानें डाव साधला. मुंबई सरकारच्या कृष्णकृत्यांवर मीं पांघरूण घालूं दिलें नाहीं हाच काय तो माझा अपराध. यामुळेंच त्यांनीं माझा छळ चालविला आहे. जबरदस्तीनें ते मला वांकवतील तसा मी वांकलों नाहीं. त्यांतून माझ्या अंगीं कांहीं गुन्हा असता तर तो मीं मोठ्या आनंदानें कबूल केला असता, पण तसें कांहीं एक नसल्यामुळें मीं गव्हर्नरसाहेबांसमक्ष राज्यावर उदक सोडून अब्रूरक्षणाचा मार्ग स्वीकारला, त्याबद्दल मी कसा दोषी ठरतों हेंच मला कळत नाहीं. माझ्यासारखा प्रसंग जर आपणांवर आला असता तर आपण कोणता मार्ग स्वीकारला असता? टक्कर,

फोर्ब्स, शेपर्ड, कॉटन, साइक्स, रॉबर्टसन, सलिव्हन, शेक्सपियर, लॉडाव्हिक, ब्रिग्ज वगैरे थोर गृहस्थांनीं माझ्यावर करण्यांत आलेले आरोप अगदीं खोटे आहेत असें स्पष्ट शब्दांत आपलें मत कळविलें आहे. तें म्हणतात, 'अब्रूसाठीं सिंहासनावर लाथ मारणारा पुरुष गुन्हेगार खासच नसला पाहिजे. आम्ही इंग्रजांनीं मात्र अन्यायानें त्यांस शिक्षा करून राज्यावरून काढिलें, तेव्हां तें कृत्य त्यांच्या इभ्रतीस कायमचा कलंक लावणारें आहे. तसेंच प्रतापसिंह महाराजांच्या बाणेदार वर्तनानें त्यांच्या उज्ज्वल कीर्तींत भर पडेल.'

'बरें, झालें तें झालें, माझ्यावर करण्यांत आलेला जुलूम व अन्याय यांचें निराकरण करणें आतां शक्य नाहीं. तेव्हां 'गेलें तें गंगेस मिळालें' असें समजून आतां जरी आपणास माझ्यावरील अन्याय दूर करतां आला, तरी तें मी स्वतःचें परम भाग्य समजेन. कारण आजवर जे हाल मीं सोसले त्याबद्दल मला फारसें वाईट वाटत नसून माझ्या इज्जतीस लागलेला डाग धुवून टाकतां येत नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटतें. कंपनी सरकारच्या उद्दाम अधिकाऱ्यांनीं माझ्यावर विनाकारण जुलूम केले, हें आतां जगजाहीर झालें आहे. तरी आतां माझी उघड चौकशी करून माझी अब्रू साफ करावी व परमेश्वरानें आपल्या हातीं दिलेल्या सामर्थ्याचा व सत्तेचा योग्य तो उपयोग करून मला सर्वथा ऋणी करावें, असें माझें आपल्याजवळ शेवटचें व निर्वाणीचें मागणें आहे.'

प्रतापसिंह महाराजांनीं अशी आपली कैफियत दाखल केली; पण मुंबई सरकारचा त्यांच्यावर इतका रोष झाला होता कीं, त्यांनीं ही कैफियत महाराज जिवंत असेंतोंपर्यंत तशीच दडपून ठेविली, तेव्हां अर्थातच तिचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. महाराज या घोर अन्यायाच्या दडपणाखालीं त्रस्त होऊन तारीख १४।१०।१८४७ ला निवर्तले! कायद्यानें प्रस्थापित झालेल्या इंग्रज सरकारच्या सत्तेशीं कायद्याच्याच सर्व कोंडच्या फोडून झुंज घेऊं पाहाणारा हा वीर संपला! कायद्यास आदिदैवत मानणारें इंग्रज सरकार स्वार्थासाठीं त्याच कायद्याची प्रसंगानुसार कशी खेटरांनीं पूजा बांधतें हें प्रतापसिंहानें आमरण केलेल्या प्रयत्नांच्या विफलतेनें सिद्ध झालें.

औट घटकेचा शिराळशेट : ३४

कादंबरीपेक्षांही अद्भुत अशा रोमहर्षक प्रसंगांनीं भरलेल्या या इतिहासाची घटना येथपर्यंत आली. पेशव्यांच्या ताब्यांतील मराठी राज्य आपणांस मिळेल या फोल आशेनें प्रतापसिंहानें इंग्रजांशीं खेळलेल्या राजकारणाच्या जुगारांत स्वतःचें राज्य गमाविण्याचा दुर्धर प्रसंग त्याच्यावर आला. तेजोहीन छत्रपतींचें वकीलमंडळ विलायतेस गेलें, व हात हालवीत माघारीं आलें. रंगो बापूजीनें बारा-चौदा वर्षें विलायतेंत राहून महाराजांस न्याय मिळावा म्हणून भगीरथ प्रयत्न केले; पण ते सर्व वायां गेले. प्रतापसिंहाच्या वतीनें चाललेल्या राजकारणाचा असा खेळखंडोबा चालला होता. पण औट घटकेच्या नामधारी राजेपणाकरितां सख्ख्या भावाचें निसन्तान करणारा अप्पासाहेब मात्र सिंहासनावर आसुरी आनंदांत दंग होता.

सातार—दरबारीं स्वार्थाच्या विस्तवाशीं खेळ खेळण्यांत प्रथम सुरुवात बलवंत मल्हार चिटणीसानें केली. प्रतापसिंह महाराजांनींही त्याचेंच अनुकरण केलें व त्यांचा भाऊ अप्पासाहेब हाही त्याच चाकोरींतून गेला. नारायणरावाच्या खुनानें राघोबानें आपली पेशवेपदाची अघोर तृष्णा तृप्त करण्याचा प्रयत्न केला, पण अशा घातपातांनीं मिळविलेलें पेशवेपद त्यास किती दिवस उपभोगितां आलें, हें अगदीं गेल्याच पिढींतील ताजें उदाहरण लक्षांत घेऊन अप्पासाहेबानें तरी निदान असल्या नीच कृत्यांनीं आपले हात कलंकित करून

द्यावयास नको होते. बरें, ज्या व्यक्तींच्या साहाय्यानें हें घोर कर्म त्यानें केलें, त्यांच्या तरी स्वभावाची व दानतीची कांहीं पारख त्यानें करावयास हवी होती. पण तेंही नाहीं. कारण पेशव्यांची महाराष्ट्रांतून उचलबांगडी करून त्यांच्या ताब्यांतील 'मराठ्यां'चें राज्य प्रतापसिंहाच्या हवालीं करण्याच्या गप्पा मारणाऱ्या टोपीकरांनीं आपल्या सख्ख्या भावाची कशी वासलत लावली त्याचें ताजें उदाहरण डोळ्यांसमोर रात्रंदिवस नाचत असतां आपण पुन्हा त्याच खाईंत उडी द्यावयाची हा केवढा मूर्खपणा ! पण असल्या मासलेवाईक मूर्खपणाचीं उदाहरणें मराठेशाहीच्या अंतकाळीं अनंत झालीं.

छत्रपति प्रतापसिंह महाराजांच्यानंतर कर्नल ओव्हान्स व बाळाजीपंत नातू या उभयतांच्या खटपटीनें अप्पासाहेब गादीवर आला. त्यामुळें त्या दोघांची चांगलीच पोळी पिकली. खुद्द राजाच त्यांच्या ताटाखालचें मांजर झाल्या-कारणानें ते दोघे सर्व कारभार मुखत्यारीनें पाहूं लागले. अप्पासाहेब हा स्वभावतः विलासी असल्यानें स्वतःची चैन चालावी, त्यांत कोणत्याही तऱ्हेनें खंड पडूं नये, एवढेंच काय तें त्याचें पाहणें होतें. राजा, राज्य, त्याचे अधिकार त्याच्या जबाबदाऱ्या असल्या गोष्टी तो जाणत नव्हता. तेव्हां साताराच्या सरहद्दींतील सरदार, जहागिरदार व संस्थानिक यांवर आपला अधिकार असावा कीं नसावा, त्यांत फायदा व तोटा काय आहे, वगैरेसारख्या महत्त्वाच्या बाबींसंबंधीं तो अगदीं उदासीन होता. हे सर्व अधिकार सोडून देण्यास त्याची तयारी होती. याच्या उलट पंतसचिव, पंतप्रतिनिधी, पटवर्धन सरदार, अक्कलकोटकर, जतकर वगैरे इनामदार व जहागिरदार यांवर आपला ताबा असावा अशी प्रतापसिंह महाराजांची योग्य व न्याय्य मागणी होती. वस्तुतः पंतसचिव, पंतप्रतिनिधि, जतकर, अक्कलकोटकर वगैरे मंडळींना मात्र साताराकरांच्या सत्तेखालीं राहण्याची इच्छा नव्हतीच. पण पूर्वापार आपल्या घराण्याच्या अंकित असलेले हे सर्व सरदार, जहागिरदार आपल्या ताब्यांत तसेच असावेत असा प्रतापसिंहाचा हेका व हट्ट होता. तो शेवटपर्यंत त्यानें चालविला. पण दुर्दैवानें त्याचीच राज्यावरून उचलबांगडी करण्यांत आल्या कारणानें हें भांडण त्याच्या बरोबरच नाहींसें झालें होतें. अप्पासाहेब गादीवर येतांच दक्षिणेंतील सर्व सरदार-जहागिरदारांची

सातारकरांच्या सार्वभौमत्वाच्या हक्कांतून मुक्तता झाली. ते सर्व इंग्रज सरकारच्या खास देखरेखीखालील मांडलिक बनले. अशा तऱ्हेनें हा प्रश्न कायमचा सुटला.

सातारच्या सिंहासनावर अप्पासाहेबाची प्राणप्रतिष्ठा होतांच दिवाणगिरीचीं वस्त्रें बाळाजीपंत नातूकडे आलीं. प्रतापसिंहाच्या वेळेपासून सातारची दिवाणगिरी आपणांस मिळावी अशी बाळाजीपंत नातूची जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती; पण त्या वेळीं प्रतापसिंहानें त्याची डाळ न शिजूं दिल्यामुळें तो नाखुष झाला व त्याची साडेसाती प्रतापसिंहाच्या मागें लागली. त्यास क. ओव्हान्सची जोड मिळाल्यामुळें प्रतापसिंहास गादीवरून दूर करण्याचें काम हातोहात तडीस गेलें व आतां अप्पासाहेबाचें—छे, अप्पासाहेबाचें कसलें बाळाजीपंत नातू व कर्नल ओव्हान्स या काळ्या-पांढऱ्या दुकलीचें राज्य साताऱ्यांत सुरू झालें. या दोघांनीं वाटेल तसल्या सुष्ट-दुष्ट उपायांनीं आपलें व आपल्या आप्तेष्टांचें कल्याण साधून घेतलें. या दोघांची कारकीर्द अन्यायाची व जुलमाची झाली. त्यांच्या जुलूमजबरदस्तीस अप्पासाहेब सुद्धां कंटाळला आणि तो या कचांतून सुटण्याची संधी पाहूं लागला. बाळाजीपंत नातूनें दुखविलेला एक गृहस्थ त्याच्या हातीं लागला. त्याचें नांव कृष्णाजी सदाशिव भिडे. हा प्रतापसिंहाच्या विरुद्ध पुरावे गोळा करणाऱ्यांपैकीं होता. पण नातूनें त्याचे कांहीं पैसे बुडविले त्याबरोबर तो त्याच्यावर चिडला आणि त्यानें अप्पासाहेबाच्या सांगण्यावरून मुंबई सरकारकडे एक अर्ज गुदरला. त्यांत त्यानें नातूनें केलेल्या तीस-पसतीस अन्यायांची नांवनिशीवर यादी व माहिती मुद्यापुराव्यानिशीं दिली होती. पण दुर्दैवानें भिड्याचे दोन्हीही गुन्हेगार क. ओव्हान्स व बाळाजीपंत नातू हे मुंबई सरकारच्या बहाल मर्जीतील असल्याकारणानें त्याच्या अर्जाचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. मुंबई सरकारनें भिड्याच्या अर्जास कचऱ्याची पेटी दाखविण्याचें धोरण स्वीकारलें. पण भिडे लेचापेचा नव्हता. मुंबई सरकार आपणांस दाद देत नाहीं असें पाहतांच त्यानें आपला अर्ज कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे गुदरला.

त्या अर्जांत भिड्यानें सरकारास असें आव्हान दिलें होतें कीं, ' कंपनी सरकारनें कर्नल ओव्हान्स व बाळाजीपंत नातू यांची नीट चौकशी करावी व त्यांच्यावर मीं केलेले आरोप खोटे ठरल्यास त्यांनीं खुशाल माझ्यावर अब्रुनुक-

सानीची फिर्याद करावी. त्यांत होईल ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहें. या साठीं मी १,००० रु. रोख सरकारांत जामिनकी म्हणून भरतों. पुण्याच्या कोर्टांत फिर्याद चालू होऊन तिचा निकाल लागेपर्यंत मी तेथें कदाचित् जातीनें हजर राहणार नाहीं अशी शंका सरकारास वाटत असल्यास ५,००० रु. चा जामीन देण्यास मी तयार आहे. तेव्हां माझ्या अर्जाचा विचार व्हावा.' भिड्याच्या या जोरदार अर्जाचा इंग्लंडांत कोर्ट ऑफ डायरेक्टर्सवर योग्य तो परिणाम होऊन त्याच्या अर्जाची चौकशी करा व न्याय द्या असा हुकूम मुंबईच्या गव्हर्नरास आला; पण डायरेक्टरांचे हुकूम धुडकावून आपणांस पाहिजे तसा हिंदी प्रजेचा सूड घेण्याची प्रथा सर रॉबर्ट ग्रॅन्टपासून पडली होती तिचेंच अनुकरण त्या वेळच्या मुंबईच्या गव्हर्नरानें केलें.पण लोकांत तर आपलें करणें अन्यायाचें दिसूं नये म्हणून इंग्रज सरकार नेहमींच पराकाष्ठेची काळजी घेतें. याबाबतींत इंग्रज सरकार इतकें वस्ताद सरकार दुसरें मिळणार नाहीं. तेव्हां त्यानें आतां अशी शक्कल काढिली कीं, भिड्याचा आरोपी बाळाजीपंत नातू हा कंपनी सरकारचा नोकर नसून तो सातारकरांचा दिवाण आहे. तेव्हां तो लांच खात असला व सातारच्या प्रजेवर जुलूम करीत असला तरी त्याची चौकशी करण्याचा अधिकार मुंबई सरकारास नाहीं. ही गोष्ट त्यांच्या अखत्यारी बाहेरची आहे. तेव्हां ही मोठी कायदेशीर अडचण आहे. आणि भिड्यानें क. ओव्हान्सवर केलेले आरोप मात्र मत्सरग्रस्त असावेत, अथवा पदच्युत केलेल्या राज्याच्या हस्तकांनीं त्यास चिथावल्यामुळें त्यानें आपल्या अर्जांत ते मागाहून दडपले असावेत. तेव्हां त्यांच्या विचार करण्याचें कांहींच कारण नाहीं. मुंबई सरकारचा हा कोटिक्रम फार बहारीचा आहे. कारण जें सरकार सातारच्या प्रजेसच काय पण राजास सुद्धां आपल्या इच्छेप्रमाणें नाचवूं शकतें, त्याची कोणत्याही तऱ्हेची चौकशी न करतां त्यास सिंहासनावरून खालीं खेंचूं शकतें व परागंदा करतें, असल्या सामर्थ्यवान् सरकारनें बाळाजीपंत नातूसारख्या सामान्य माणसाची चौकशी करण्याचा अधिकार आपल्यास नाहीं असें म्हणावें म्हणजे मानभावीपणाची कमाल होती. त्यापेक्षां मुंबई सरकार जर असें धडधडीत म्हणतें कीं बाळाजीपंत नातू हा आमच्या मर्जीतला असून त्याला आम्हीं

सातारा दरबारीं दिवाण नेमला आहे, आणि तो जें काय करील त्यास आमची मान्यता आहे, तर मुंबई सरकारचें हें म्हणणें सत्यप्रियतेचें व धडाडीचें असल्यामुळें जनतेनें त्याची पाठच थोपटली असती ! पण तेवढेंही नीतिधैर्य मुंबई सरकारच्या अंगीं नव्हतें आणि त्यानें बाळाजी पंत नातू व ओव्हान्स या उभयतांना वांचविण्यासाठीं निर्लज्जपणा स्वीकारला होता.

बाळाजीपंत इनामदार-जहागिरदार वगैरे लोकांना धाक दाखवून व धमकी देऊन पैसे उकळतो, लोकांचे जमीनजुमले घशांत टाकतो, सातारा दरबारीं नोकर नोकरींवर नेमतांना त्याची लायकी न बघतां आपल्याच वशिल्याचीं तट्टें भरतो असे अनेक आरोप भिडयानें मुद्यापुराव्यानिशीं आपल्या अर्जांत बाळाजीपंतावर केले होते. तसेंच क. ओव्हान्सचींही बरींच कुलंगडीं त्यानें चवाठ्यावर आणिलीं होतीं. प्रतापसिंह महाराजांच्या वतीनें इंग्लंडांत बरीच खळबळ चालू होती. त्याचा फायदा घेऊन क. ओव्हान्सनें अप्पासाहेबास अशी थाप मारली कीं, तुमची बाजू तेथें जनतेपुढें मांडण्याकरितां व प्रतापसिंहानें केलेला राजद्रोह त्याच्यावर शाबीत करण्याकरितां एकादा चांगला कायदेपंडित नेमणें आवश्यक आहे व त्यास तनखा दरमहा रु. १,५०० द्यावा लागेल. या गोष्टीस अप्पासाहेबांची मंजुरी मिळवून तो ते १,५०० रु. दरमहाचे दरमहा आपल्या श्वशुरास लंडनला धाडीत असे, पण दुर्दैवानें पुढें सासरा वारल्यानंतर सुद्धां हा मलिदा तो आपल्या मेहुण्यास अव्याहतपणें चारीत होता. याशिवाय क. ओव्हान्सचीं बायको व मुलें विलायतेस निघालीं, तेव्हां आप्पासाहेबाकडून ५० हजार रुपये किंमतीचा एक कंठा व कित्येक हजारांचें सोनें, नाणें व माणिकमोतीं आपल्या कुटुंबास नजराणा म्हणून त्यानें उपटलीं. या दोनच उदाहरणांवरून क. ओव्हान्स हा साताऱ्च्या राज्यांत कसा चरत होता याची कल्पना येते. याशिवाय हा व बाळाजीपंत नातू हे दोघे कित्येक व्यवहार पातीनें करीत असतीलच. अशा तऱ्हेनें रेसिडेन्ट क. ओव्हान्स व दिवाण बाळाजीपंत नातू या उभयतांनीं संगनमत करून सातारा दरबारचें दिवाळें एकमतानें काढून आपली दिवाळी करण्याचें ठरविलें होतें. त्याच्या या कार्यास मुंबईचा गव्हर्नर सर जॉर्ज ऑथर यानें आपल्या कृतीनें फूस दिल्या कारणानें ते दोघेही निर्धास्त

झाले व त्यांचें खाबूगिरीचें काम अव्याहतपणें चालू राहिलें. बिचारा भिडे जागच्या जागीं मनगटें चावीत स्वस्थ बसला !

बाळाजीपंत नातूची गुंडगिरी इतकी पराकोटीला गेली होती कीं, अप्पासाहेबासारखा अत्यंत ढिलाईनें राज्यकारभार चालविणारा मनुष्य देखील टेकीस आला. त्यानें त्यास ता. २–४–१८४८ रोजीं लांच खाण्याच्या आरोपाबद्दल कामावरून दूर केलें. या वेळीं बाळाजीपंत नातूच्या सर्व गुन्ह्यांवर पांघरूण घालणारा क. ओव्हान्स हा मुदत संपल्यामुळें विलायतेस निघून गेला होता. त्यामुळें नातूस कामावरून दूर करण्याची अप्पासाहेबास छाती झाली. पण ही गोष्ट फार उशिरा घडली. कारण यानंतर तीनच दिवसांनीं ता. ५–४–१८४८ रोजीं अप्पासाहेबाचा अंत झाला ! त्याबरोबर अप्पासाहेबानें घेतलेला दत्तक नामंजूर होऊन साताराचें राज्य खालसा करण्यांत आलें. अशा तऱ्हेनें यानंतर अवघ्या एक-दोन वर्षांत साताराचें राज्यही नाहीसें झालें.

अप्पासाहेबास बरेच दिवस असें वाटे कीं, आपला काल समीप आला; आतां आहों आणि मग नाहीं, तेव्हां पुढची तरतूद केली पाहिजे. त्यांतून आपण निपुत्रिक असल्याकारणानें आपल्या गादीस कोणी वारस नाहीं. ही चिन्ता त्यास एकसारखी छेडीत असे. दत्तक घेण्यावांचून त्यास उपाय नव्हता. तेव्हां दत्तक घेण्याचें ठरलें. पण या दत्तविधानास धर्माच्या संमतीसाठीं भटाच्या दलालीपेक्षां 'गोऱ्या'च्या मान्यतेची फार जरूरी होती. कारण त्याच्या संमतीशिवाय गादीला वारस या दृष्टीनें त्याला कांहींच किंमत राहिली नसती. तेव्हां त्या खटाटोपास प्रारंभ झाला. साताराची गादी खालसा करण्याचा बेत कंपनी सरकारचा होता व त्या दृष्टीनें आतां सर्व राजकारण हालत होतें. अप्पासाहेबानें दत्तक घेण्यासंबंधीं रेसिडेन्टाजवळ गोष्ट काढावी व ती त्यानें या नाहीं त्या कारणानें लांब टाकावी, त्याला फारसें उत्तेजन देऊं नये असें एकसारखें चाललें होतें. या वेळच्या रेसिडेन्ट फ्रियर हा फार चांगला गृहस्थ होता. पण वरिष्ठ सरकारच्या हुकुमास तो बांधला गेल्यानें त्याचा नाइलाज झाला. कंपनी सरकारच्या त्याला तशा सूचना होत्या. कंपनी सरकारची संमति मिळाल्या-

शिवाय आपण दत्तक घेऊं नये, असा त्यानें महाराजांस सल्ला दिला. तेव्हां अप्पासाहेबानें गव्हर्नरसाहेबाकडे त्याप्रमाणें याद्या पाठविल्या. पण मुंबई, कलकत्ता व नंतर लंडन एवढा लांबचा पल्ला गांठून कंपनी सरकारची दत्तक घेण्यास परवानगी येईतोंच अप्पासाहेबाची प्रकृति ढांसळली. त्याचा अंतकाल समीप येऊन ठेपला. तेव्हां रेसिडेन्ट फ्रियर हा महाबळेश्वरास गव्हर्नराची भेट घेण्यासाठीं गेला असतां तो माघारीं येण्याच्या आंतच महाराजांची प्रकृति फारच बिघडल्यामुळें त्याच्या गैरहजेरींतच दत्तविधान उरकून घेणें भाग पडलें.

रेसिडेन्ट नाहीं तर नाहीं, नगास नग या नात्यानें दुसरा एकादा गोरा इसम मिळेल तर त्याच्यादेखत हें दत्तविधान उरकून घ्यावें असें ठरलें व त्या वेळीं सातार्‍यास असणार्‍या डॉ. मरे या एका गोर्‍या इंग्रजादेखत दत्तविधान घडावें म्हणून अप्पासाहेबानें त्यास तांतडीनें बोलाविणें पाठविलें. डॉ. मरे यानें आपल्यादेखत झालेल्या दत्तविधानाची व अप्पासाहेबाचा अंत झाला त्या वेळची हकीगत यथातथ्य वर्णन केली आहे. ती हृदयद्रावक हकीकत पुढीलप्रमाणें आहे.

‘ तारीख ५ एप्रिल १८४८ रोजीं ८ वाजल्यानंतर छत्रपतींकडून तांतडीचा निरोप आला. तेव्हां मी लगेच राजवाड्याकडे जाण्यासाठीं निघालों. तों वाटेंत मला दुसरा जासूद भेटला. त्यानें सांगितलें कीं, महाराज फारच अत्यवस्थ असून त्यांनीं तुमच्या येण्याकडे डोळे लावले आहेत. राजवाड्यांत गेल्याबरोबर फडणीस सामोरे आले व म्हणाले कीं, गेल्या रात्रींपासून महाराजांची प्रकृति फारच बिघडली असून सकाळपासून तर ती फारच क्षीण झाली आहे. राजसाहेबांच्या खोलींत प्रवेश केल्याबरोबर महाराजांच्या चेहर्‍यावर पसरलेली मृत्यूची भयाण छाया मला स्पष्टपणें दिसली. कारण सहा दिवसांपूर्वी मीं त्यांना पाहिलें होतें त्यापेक्षां आतां त्यांच्या चेहर्‍यांत फारच भयंकर असा फरक दिसत होता. ते अत्यंत क्षीण झाले होते व त्यांस श्वास लागला होता. चेहर्‍यावर मृत्यूची अवकळा स्पष्ट दिसत होती व ते लवकरच इहलोकची यात्रा संपविणार असें वाटत होतें. इतकी कठीण अवस्था असतांना सुद्धां ते पूर्णपणें शुद्धीवर होते व मोठ्या कष्टानें बोलत होते. त्यांनीं मला त्यांच्या प्रकृतीसंबंधीं काय वाटतें तें विचारलें. त्यांवर मी म्हणालों कीं ‘ आतां आपली प्रकृति फारच क्षीण झाली

आहे तरी भिण्याचें कारण नाहीं. मागें असेच आपण दोन तीन वेळां जिवा-वरच्या दुखण्यांतून उठलां आहांत. तेव्हां आपणांस लवकरच बरें वाटेल, काळजी करूं नये.' हें ऐकून 'छे! छे! मी या दुखण्यांतून बरा होणार नाहीं' असें ते म्हणाले. यानंतर सरासरी तासाभरानें त्यांच्या प्रकृतीस आराम पडून ११ च्या सुमारास त्यांना चांगली एक डुकली लागणार असें वाटूं लागलें.

'त्यांच्या नातलग मंडळींनीं व नोकरचाकरांनीं त्यांस आदबशीरपणें बिछान्यासकट उचलून आंतल्या बाजूस नेऊन ठेविलें. कांहीं मिनिटें ते अगदीं स्वस्थ होते. पण लगेच फडणीस येऊन मला सांगूं लागले कीं, 'महाराजांनीं आंत बोलाविलें आहे' म्हणून मी आंत जाऊन पाहातों तों महाराजांची प्रकृति जास्तच खालावलेली दिसली. त्यांनीं मला पाहातांच थोडा उठण्याचा प्रयत्न केला. फडणीस व रावसाहेब या दोघांस थांबण्यास सांगून बाकीच्यांना बाहेर जाण्याबद्दल खुणविलें. यानंतर दोन दिवसांपूर्वीं रेसिडेंट फ्रियर साहेबाकडे धाडण्याकरितां तयार केलेल्या याद्या फडणीसांस आणण्यास सांगितल्या. त्या याद्या रावसाहेबानीं माझ्यासमक्ष वाचून दाखविल्या. यादी वाचणें झाल्यावर महाराजांनीं मला बिछान्याजवळ बोलाविलें व यादींत लिहिल्याप्रमाणें माझ्या समक्ष दत्तविधान उरकून घेण्याचा त्यांचा उद्देश त्यांनीं मला कळविला. मुलगा पसंत करून आणण्यासाठीं तास दोन तासांपूर्वीं मंडळी धाडली होती. त्याप्रमाणें मुलगा वाड्यांत आणून ठेविला होता. त्याचें दत्तविधान माझ्यासमोर व्हावें असें त्यांचें म्हणणें होतें.

'या गोष्टीची यत्किंचितही कल्पना नसल्यामुळें मी आश्चर्यचकित झालों आणि दत्तविधानाची इतकी घाई न करतां रेसिडेंट मि. फ्रियर हे साताऱ्यास येईपर्यंत वाट पाहावी व त्यांच्या समक्ष हा विधी उरकावा असें मीं राजे-साहेबांस सुचविलें. महाराज आपल्या गादीस 'वारस' म्हणून मुलगा दत्तक घेत असल्यामुळें या दत्तविधानास राजकीय दृष्ट्या फार महत्त्व होतें. तेव्हां तें रेसिडेंटासमक्ष व्हावयास पाहिजे. तो संध्याकाळपर्यंत येईल तरी दत्तविधान तेथपर्यंत तहकूब करावें असें मी राजांस समजावून सांगितलें, पण ते म्हणाले कीं, माझी प्रकृति फारच बिघडली असून मी आतां संध्याकाळपर्यंत जगणार

नाहीं. तेव्हां दत्तविधान आतांच उरकून घ्यावयास पाहिजे. नाहीं तर फसगत होईल. यावर 'निदान तास दोन तास वाट पाहूं आणि एवढ्या अवधींत आपली प्रकृति फारच बिघडत आहे असें वाटल्यास आपण म्हणतां तसें करूं' असें मी म्हणालों; पण राजेसाहेब म्हणाले कीं, 'अहो, एका क्षणाचा सुद्धां विलंब करूं नका. माझा भरंवसा नाहीं.' राजेसाहेब ऐकत नाहींत असें पाहून मी फडणीस व रावसाहेब यांना रेसिडेंट हजर नसतांना दत्तविधान उरकून घेण्यांत काय धोका आहे, तसेंच मी या गोष्टीस कां कांकूं करतों याचीं कारणें विशद करून सांगितलीं. त्या दोघांना राजेसाहेबांचें मन दत्तविधान लांबणीवर टाकण्यास तयार करा असें सुचविलें. त्यांनीं माझ्या सांगण्याप्रमाणें प्रयत्न केला; पण त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां मीं आपल्या वतीनें त्यांस सांगितलें कीं, दत्तविधान केव्हां करावें हें सांगण्याचा अधिकार नसतांना सुद्धां मीं त्याचें अतिक्रमण केलें, तेव्हां त्याबद्दल मी आपली माफी मागतों. यानंतर त्यांच्या नेहमींच्या गोडव्या स्वभावास अनुसरून ते म्हणाले कीं, 'त्यांत तुमची कांहीं एक चूक नाहीं; तुम्हीं म्हणतां तेंच बरोबर आहे. पण आतां माझा नाइलाज आहे.'

त्यांनीं माझ्या हातांत लेखणी व कागद दिला आणि मी सांगतों त्याचें शब्दशः इंग्रजी भाषांतर कागदावर टिपून घ्या म्हणून विनविलें. तेव्हां मी म्हणालों कीं, रावसाहेब शब्दशः मराठींत टिपून घेतील. त्यावर ते म्हणाले कीं, मी सावकाश एकेक शब्द मराठींत बोलतों. तुम्हीं त्याचें इंग्रजी करून कागदावर टिपून घ्या. यानंतर त्यांनीं मला पुढील मजकूर सावकाशपणें सांगितला.

'रेसिडेंट येईपर्यंत मी जगेन असें मला वाटत नाहीं. म्हणून मी अंबाजी भोंसले शेडगांववाले यांचा मुलगा व्यंकटराव यास दत्तक घेत आहें.' इतकें लिहून झाल्यावर त्यांनीं आपल्या राण्यांना हांक मारली व इतर नोकरांना आणखी कांहीं हुकूम सोडले. राण्यांस कानकोंडें होऊं नये म्हणून मी त्या खोलींतून बाहेर गेलों व आंगण्यात इकडे तिकडे हिंडूं लागलों; परंतु चार दोन मिनिटांतच मला पुन्हां बोलविणें आलें. त्यांनीं मला तेथून न हलण्याविषयीं विनंती केली. तेव्हां त्यांच्या बिछान्याभोंवतीं राण्या, फडणीस, रावसाहेब,

भागुबाईची आई, बहीण, राणीचे वडील आणि दत्तक मुलगा व त्याचा बाप आणि इतर चाळीस पन्नास माणसें बसलीं होतीं. दत्तविधानाच्या समारंभास सुरुवात झाली आणि तो विधि सुमारें १५ मिनिटांतच पार पडला. यानंतर राजेसाहेबांना अंथरुणावर कसेंबसें बसविलें. त्यांच्या डोक्यास पागोटें घालण्यांत आलें. अंगावर एक शाल लपेटण्यांत आली आणि नंतर दत्तक घेतलेल्या मुलानें त्याच्या पायांवर डोकें ठेविलें. त्या मुलाच्या तोंडांत साखर घालण्यांत आली. मलाही पण त्या मुलाच्या तोंडांत साखर घालण्यास सुचविण्यांत आलें. आणखी बऱ्याच मंडळींनीं त्या दत्तक मुलाच्या तोंडांत साखर घातली. यानंतर फडणीसांनीं मुलांचें नांव काय ठेवावयाचें म्हणून विचारलें. तेव्हां शिवाजी, शाहू वगैरे नांवें सुचविण्यांत आलीं. पण दोन तीन मिनिटें शांतपणें विचार करून ' व्यंकट राजे ' असें नांव सुचविलें. नंतर हेंच नांव ठेविल्याचें जाहीर करण्यांत आलें. एवढ्या दगदगीनें महाराजांस थकवा आला तेव्हां माझ्या सांगण्यावरून राजेसाहेबांना विश्रांती मिळण्यासाठीं मी इतर सर्व मंडळींना खोलीबाहेर जाण्यास सांगितलें. नंतर राजेसाहेब मला म्हणाले, ' मी रेसिडेंट साहेबांना ११ कलमांची यादी लिहीली आहे. त्यांतील एक कलम या दत्तविधानाच्या समारंभानें मी आतांच पुरें केलें. बाकीचीं दहा ते पुरी करतील. ' ते माझ्याशीं फार आर्जवानें व ममतेनें वागले म्हणून मी त्यांचे आभार मानले. त्यावर ते म्हणाले कीं, ' मी तुम्हांस सर्व गोष्टी सांगितल्या आहेतच त्या सर्व तुम्ही फ्रियर साहेबांना नीट समजावून सांगा. मृत्यूनंतर फ्रियर साहेब नीट बंदोबस्त ठेवतीलच. त्यांच्याकडून माझ्या प्रजेच्या हिताचे सर्व प्रयत्न होतील.' यानंतर क. ओव्हान्सनें केलेल्या उपकाराबद्दल त्यांना बोलावयाचें होतें, पण शब्द घोटाळूं लागला. यानंतर राजेसाहेब स्वस्थ पडून होते. मी बाजूला अगदीं स्तब्ध बसलों होतों. त्यांनीं पुन्हा माझी चौकशी केली व मी नजरेस पडतांच समाधान व्यक्त केलें. यानंतर माझ्याशी तें एक शब्द सुद्धां बोलले नाहींत. दीडच्या सुमारास महाराज शांत झालें. त्याबरोबर वाड्यांत सगळीकडे रडारड सुरू झाली. '

अप्पासाहेब निवर्तल्याची बातमी डॉक्टर मरेनें महाबळेश्वरास रेसिडेन्ट फ्रियर यास कळविली. त्या बरोबर तो जलदीनें साताऱ्यास आला. एकंदर

देखावा पाहून रेसिडेन्ट फ्रियर यास अत्यंत वाईट वाटलें. मग रंगमहालाकडे जाऊन त्यानें राण्यांचें सांत्वन केलें. नंतर सखाराम बापूजी पंतअमात्य यास अखेरची तयारी करण्यास सांगितलें. तों सर्व तयारी झाली होती म्हणून अप्पासाहेबांच्या शवास पोषाख, शिरपेंच, तुरा लावून पालखींत बसविलें व स्मशानयात्रा निघाली. कृष्णेस पोंचल्यावर, त्याचें दहन झालें. अंत्यविधीस रेसिडेन्ट फ्रियर हजर होता. नंतर दुसऱ्या दिवसापासून अप्पासाहेबाची उत्तरक्रिया सुरू झाली. प्रथम उत्तरक्रियेचा फक्त संकल्प व्यंकोजी राजे यांनीं केला व बाकीचा सर्व विधी चिमणाजी राजे भोसले शेडगांवकर यांनीं केला. दानधर्म वगैरेसाठीं एकंदर खर्च ४५००० रु. झाला. याखेरीज हत्ती, पालखी, घोडा, जमीन वगैरे दानें देण्यांत आलीं.

या प्रसंगीं रेसिडेन्ट सर बारट्ल फ्रियर, बाळाजीपंत नातू, सखाराम बापूजी फडणीस, खंडेराव मामाजी शिर्के, तानाजी राजे शिर्के, मुधोजी राजे महाडिक, लक्ष्मण राजे शिर्के, आबासाहेब मोहिते, टणूकर सखाराम बल्लाळ महाजनी, वासुदेवपंत महाजनी चिटणीस व भवानजी राजे महाडिक, वगैरे मंडळी हजर होती.

दत्तक घेतांना अप्पासाहेबाची कल्पना अशी असेल कीं, आपण घेत असलेला हा दत्तकपुत्र राज्याचा अधिकारी ठरून सातारची गादी आपल्या पश्चात त्याच्याकडे चालेल. पण अप्पासाहेबाची ही कल्पना सत्यसृष्टींत केव्हांच आली नाहीं. अशा तऱ्हेनें शिवाजी महाराजांच्या खास वंशांत चालत आलेलें छत्रपतिपद इ. स. १८४८ त समाप्त झालें.

———

रंगो बापूजी माल्टच्याहून माघारीं इंग्लंडला निघाला असें लिहिणें फार सोपें आहे, पण रंगो बापूजी पुन्हां इंग्लंडला निघाला म्हणजेच त्यानें मोठा आत्मयज्ञ आरंभिला यांत शंका नाहीं. कारण त्या वेळची त्याची इंग्लंडची सफर म्हणजे आतां कित्येक संस्थानिक किंवा धनिक करितात त्यांतली नव्हती. तो तेथें नानातऱ्हेचे सुखोपभोग घेण्यास चालला नव्हता. हें त्याचें जाणें म्हणजे पुन्हां खाईत जाऊन पडण्यासारखें होतें. सातारच्या महाराजांचा वकील म्हणून कोणी विचारीत नव्हतें, पैशाची अडचण तर पांचवीस पुजलेली आणि 'काळा आदमी', 'काळा आदमी' म्हणून असह्य अपमान एकसारखा होत होता. अशा स्थितींत पुन्हां तेच हाल भोगण्यासाठीं तो इंग्लंडला निघाला. त्यानें माल्टच्याहून विलायतेस जातांना आपल्या भावास—रावजीस—एक पत्र लिहिलें आहे. तें सर्वच्या सर्व पत्र फार बहारीचें आहे. त्यांतील शब्दाशब्दांत व अक्षराअक्षरांत स्वामिनिष्ठा, आत्मविश्वास व संकटाशीं तोंड देण्याची धडाडी दृग्गोचर होते. पण तें सर्वच्या सर्व न देतां कांहीं थोडें संक्षेपानें देतों.

'महाराजांनीं आज्ञा केली, ती शिरसावंद्य मानली व विलायतेस जाण्यासाठीं माघारीं फिरलों. पण तेथें जातांना जिवास फार क्लेश होत आहेत. अचुक यश हातीं लागेलसें वाटत नाहीं. वाटेंत अडचणींचे डोंगर उभे आहेत. गांठीं पैसा नसल्यामुळें केव्हां गोळाभर अन्नास आणि घोटभर पाण्यास मोताद

होण्याचा प्रसंग गुदरेल हें सांगतां येत नाहीं. पण या अडचणींचा फांफटपसारा सांगण्यांत काय हंशील! इतकेंच सांगतों कीं, या संकटांना न जुमानतां महाराजांचा हा लढा शेवटपर्यंत लढवीन आणि विजयी झालों तर महाराजांना घेऊन दिमाखानें साताऱ्यास गर्जत जाईन. पण दुर्दैवानें तसें न झालें तर या जिवांत जीव असेतों साताऱ्यांत पाऊस ठेवणार नाहीं. बुद्धी सर्वस्वीं या कार्यार्थ खर्च करीन व हें कार्य तडीस नेईन.'

'गांठीं पैसा नाहीं तेव्हां गोळाभर अन्नास व घोटभर पाण्यास मोताद होण्याचा प्रसंग केव्हां येईल' हें वाक्य वाचल्यावर कोणाही माणसाचें अंतःकरण सद्गदित झाल्यावांचून राहणार नाहीं. इमानेंइतबारें सर्वस्वाचा होम करून धन्याची नोकरी बजावीत असतां चाकरास अन्नापाण्यास महाग होण्याचा प्रसंग यावा यापेक्षां दुर्दैव कोणतें! नोकर सुद्धां कांहीं सामान्य माणसाचा नाहीं तर राजाचा. रंगो बापूजीसारखा नोकर जसा जगाच्या इतिहासांत बिनतोड, तशीच विश्वासानें मैत्री जोडून आपल्या आधीन झालेल्या राजाचा अशा मानभावी वृत्तीनें छळ करणारी ब्रिटिश सत्ता ही पण अपूर्वच!

रंगो बापूजी महाराजांच्या आज्ञेप्रमाणें निघाला व १८४२ च्या सुरुवातीस विलायतेस पोहोंचला. बरोबर त्यानें कंपनीच्या डायरेक्टर्सना छत्रपतींचें एक पत्रही नेलें होतें. त्यांत त्यांनीं आपली बाजू सडेतोडपणें मांडली होती हें आतां नव्यानें सांगण्याची जरुरी नाहीं. पण महाराजांचा रंगो बापूजीविषयींचा मजकूर देतों. 'मी धाडलेल्या वकीलमंडळास विलायतेस माझे वकील म्हणून ओळखण्यांत आलें नाहीं. तसेंच त्यांस अत्यंत वाईट तऱ्हेनें वागविण्यांत आलें. तेव्हां त्यांनें एक शेवटचा सविस्तर अर्ज लिहून त्यांत माझी कैफियत यथातथ्य मांडली व माघारीं जाण्याबद्दल वाटखर्ची मागितली. माझ्या कैफियतीचें त्यांस कांहींच उत्तर देण्यांत आलें नाहीं. वाटखर्ची मात्र देण्याचें कबूल केलें. पैसे मिळतांच मंडळी माघारीं वळली. याची बातमी मला लागली तेव्हां मी माझ्या अत्यंत विश्वासांतील वकीलमंडळाचा पुढारी रंगो बापूजी यास माघारीं इंग्लंडला जाण्यास सांगितलें आहे. तेव्हां रंगो बापूजी हा आतां खुद्द कंपनी सरकारच्या सही-शिक्क्याचा कागदी पुरावा घेऊन येत आहे. तरी आपण त्यास माझा

वकील म्हणून मान्यता द्याल, त्याच्याजवळ असलेल्या पुराव्याची नीट चौकशी कराल, तसेंच त्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें वागवून त्याचा खर्चवेंच चालवाल अशी आशा आहे. कारण माझें राज्य व खाजगी स्थावर जंगम मालमत्ता तुमच्याच स्वाधीन आहे.'

रंगो बापूजीनें हा राजाचा अर्ज कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे धाडिला. त्याचा काहीइतका उपयोग झाला नाहीं. त्यांनीं रंगो बापूजीस ठराविक सांच्याचें उत्तर धाडिलें. तें असें कीं, 'आम्ही तुम्हांला साताऱ्च्या महाराजांचा वकील म्हणून ओळखत नाहीं.' या उत्तरानें रंगो बापूजीची किती तीव्र निराशा झाली असेल, त्याला किती संताप आला असेल याची कल्पनाच होत नाहीं. पण तो असल्या उत्तरांना व निराशांना भीक घालणारा नव्हता. त्यानेंही उलट बाणेदार असेंच उत्तर दिलें, तें असें.

'आपलें उत्तर नेहमींच्या शिरस्त्यास शोभेसेंच आलें. कारण आपण असें उत्तर देणार हें मी जाणून होतों. गेल्याखेपेस मी व माझी इतर वकील-मंडळी येथें आली असतां तुम्हीं हेंच उत्तर आम्हांस दिलें. आतांही तीच लंगडी सबब पुढें करीत आहांत. तेव्हां असल्या लटपटी करण्यापेक्षां असें धड-धडीत सांगा कीं, आम्हीं महाराजांची उचलबांगडी कांहींएक विचारपूस न करतां केली व त्यांस मरेतोंपर्यंत कैदेंत ठेवणार आहोंत. हें सांगणें अधिक सरळपणाचें व धीटाईचें होईल.' याच पत्राचा शेवट त्यानें अत्यंत तेजस्वी तऱ्हेनें केला आहे. तो म्हणतो, 'कोर्ट ऑफ डॉयरेक्टर्स स्वतःस ख्रिस्तधर्मी म्हणवितें व त्या धर्माचा अभिमान बाळगतें. तेव्हां हें जर खरें असेल तर त्यांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, ज्या वेळेस तो शेवटचा दिवस उगवेल व सर्वांस ख्रिस्तासमोर सुष्ट-दुष्ट कृत्यांचा जाब देण्याची पाळी येईल त्या वेळीं त्यांनीं केलेलीं हीं सर्व पापें हातांत डांबराचा बोळा घेऊन त्यांचीं तोंडें काळीं करतील व असें झालें म्हणजे मग त्यांस स्वर्गाचें द्वार कायमच बंद होईल!'

रंगो बापूजीनें इतकें चरफडून लिहिलें, पण त्याचाही कांहींएक उपयोग झाला नाहीं. कारण कोर्ट ऑफ डायरेक्टरर्स जागच्या जागीं थंड होतें. रंगो बापूजी पुरा वस्ताद असल्यामुळें तो डायरेक्टरांच्या या वागणुकीनें नरम पडला

नाहीं. त्यानें अर्जामागून अर्ज लिहिण्याचा खाक्या चालू ठेविला होता; आणि छापखान्याचें दुसरें एक महत्त्वाचें साधनही त्यानें हातीं घेतलें. वर्तमानपत्रांच्या द्वारें महाराजांवर झालेल्या व होत असलेल्या अन्यायांची माहिती तो इंग्लंडच्या जनतेपुढें मांडूं लागला. त्यामुळें आतां जागृती होऊन पार्लमेंटमधील सभासद साताराच्या महाराजांबद्दल प्रश्न विचारूं लागले. तारीख २ जानेवारी १८४३ ला त्यानें डायरेक्टरांना कैफियतवजा एक पत्र लिहिलें होतें. त्यांतील महत्त्वाचा भाग खालीं देत आहोंत.

'इंग्लंड, आयर्लंड, स्कॉटलंड या ठिकाणीं भरणाऱ्या निरनिराळ्या सभांतून महाराजांवर होणाऱ्या जुलुमांची माहिती लोकांना वेळोवेळीं मिळत असल्यामुळें लोकांत त्याबद्दल सहानुभूति उत्पन्न झाली आहे. तेव्हां ते पार्लमेंटांत प्रश्न विचारीत आहेत. सभा भरवीत आहेत व महाराजांना योग्य तो न्याय मिळावा म्हणून खटपट करीत आहेत. तेव्हां महाराजांवर ठेवण्यांत आलेल्या आरोपांची उघड चौकशी होईल त्या वेळीं मी कागदोपत्रीं पुरावा सादर करण्यास तयार आहें. पण हें सर्व होईपर्यंत मला येथें राहणें क्रमप्राप्त आहे.

'महाराजास राज्यावरून पदच्युत केल्यामुळें त्यांची स्थिति आतां फार भयंकर झाली आहे. मला पैसे धाडणें हें त्यांच्या आंवाक्याबाहेरचें होऊन बसलें आहे. तेव्हां महाराज आतां स्वतःच्या पोटास चिमटा घेऊन मला पैसे धाडीत आहेत. मला नुकतेंच पत्र आलें आहे, त्यावरून असें समजतें कीं, मुंबईचे माजी गव्हर्नर सर जेम्स कारनॅक यांनीं दिलेल्या वचनांस हरताळ फांसून मुंबई सरकारनें महाराजांची लक्षावधि रुपयांची खाजगी जिनगी सरकार-जमा केली. तसेंच त्यांना तोडून देण्यांत आलेला तनखाही कमी केला. साताऱ्याहून महाराजांना काशीस नेण्यास लागलेला खर्च कंपनी सरकारनें महाराजांकडून वसूल केला. याहीपेक्षां चमत्कारिक व अपमानकारक गोष्ट अशी कीं, महाराज काशीस पोहोंचल्यानंतर त्यांच्याजवळील सर्व बारक्यासारक्या दागदागिन्यांची नोंद करण्यांत आली असून त्यांपैकीं कोणताही डाग महाराजांस गहाण टाकण्याची परवानगी नाहीं. इतकेंच काय, पण कंपनी सरकार मागेल त्या वेळीं सर्वच्या सर्व दागिने दाखवितां आले पाहिजेत, असा निर्बंध त्यांच्यावर

घालण्यांत आला आहे. अशा तऱ्हेनें महाराजांची सर्व बाजूंनीं अडवणूक चालू आहे. महाराजांस आपला खटला योग्य तऱ्हेनें चालवितां येऊं नये म्हणून शक्य ते बरेवाईट उपाय योजण्यांत येत आहेत. असें जरी आहे तरी सुद्धां महाराजांचा आपल्या येथील इंग्रज लोकांच्या न्यायबुद्धीवर पूर्ण विश्वास आहे, व आपणांकरवीं त्यांस योग्य तो न्याय मिळेल, अशी त्यांची बालंबाल खात्री आहे.'

या अर्जास कंपनीच्या डायरेक्टरांकडून 'आम्ही तुला महाराजांचा वकील म्हणून ओळखत नाहीं,' असें ठराविक सांच्याचें उत्तर आलें. रंगो बापूजी प्रत्येक खेपेस अर्जविनंत्या करी; पण त्यास तींच तींच उत्तरें येत. याबाबतींत कंपनी सरकारचा निगरगट्टपणा अवर्णनीय होता. कंपनी सरकारनें रंगो बापूजीस कोणत्याही प्रकारची किंमत द्यावयाची नाहीं असा ठाम निश्चय केला होता. पण इंग्लंडांत एक कंपनी सरकारच काय तें जिवंत होतें अशांतला प्रकार नव्हता. तेव्हां रंगो बापूजीनें आतां दुहेरी प्रयत्न चालू ठेविले. ते असे कीं, तो कंपनी सरकारच्या प्रत्येक सभेस हजर राहात असे. त्या सभांतून होणारें कामकाज नीट बारकाईनें पाही. त्यानें कोर्ट ऑफ डायरेक्टर्स-मधील कांहीं सत्प्रवृत्त सभासदांच्या ओळखी करून घेण्याचा व त्यांना आपल्या कडे वळवून घेण्याचा प्रयत्न चालविला. त्यास इंग्रजी येत नव्हतें, तरी मोडक्या तोडक्या इंग्रजी-मराठींत भाषण करून हरतऱ्हेनें आपल्या मनांतील आशय डायरेक्टर्सना तो समजावून देई. त्यानें ८ फेब्रुवारी १८४५ त इंडिया हाऊसमध्यें झालेल्या एका जादा सभेंत भाषण करून महाराजांची केविलवाणी स्थिति वर्णन केली. या त्याच्या व्याख्यानासंबंधीं 'British friend of India' या मासिकाच्या मार्च महिन्याच्या अंकांत खालील उद्गार आहेत.

'तीन तीन महिन्यांतून एक एक तास हिंदुस्थानच्या पार्लमेंटची बैठक होते. तीन महिन्यांच्या दीर्घ अवधीनंतर गडगंज एक तासपर्यंत चालणाऱ्या या टोलेजंग हिंदुस्थान पार्लमेंटच्या बैठकींत हिंदी जनतेचें कोटकल्याण कसें करण्यांत येईल याचा गंभीर विचार करण्यांत येतो. असल्या थोतांडी सभा तीन तीन महिन्यांनीं एक एक तास भरवून हिंदुस्थानाच्या जनतेला उगीच चिड-

विण्यांत काय अर्थ आहे. कंपनी सरकारास हिंदु लोकांचा चट्टामट्टाच उडवावयाचा असेल तर तो एकदांच उडवून टाकावा. त्याला सभा आणि पार्लमेंट काय करावयाचीं आहेत. कंपनी सरकारनें हेंही लक्षांत ठेवावें कीं, हिंदी जनता आतां स्वस्थ बसणार नाहीं. तिला तोंड फुटलें असून ती आपलीं गाऱ्हाणीं जगाच्या वेशीवर टांगण्यास तयार झाली आहे. त्याचें प्रत्यंतर परवांच आलें आहे. हिंदुस्थान पार्लमेंटमध्यें सातारकरांचे वकील रंगो बापूजी हे बोलले. त्यांनीं महाराजांवर कंपनी सरकारनें केलेल्या जुलुमांचें वर्णन केलें. तें ऐकिलें म्हणजे कंपनी सरकारचा अधःपात किती झाला आहे याची कल्पना येते.'

पहिल्या-पहिल्यांदां रंगो बापूजीस इंग्लिश येत नव्हतें म्हणून त्यास आपले विचार व्यक्त करतां येत नसत. ही मुख्य अडचण लक्षांत घेऊन त्यानें इंग्लिश शिकण्यास सुरुवात केली व थोड्याच दिवसांत त्या भाषेवर आपले विचार व्यक्त करण्याइतपत प्रभुत्व संपादन केलें. तो मोठमोठ्या सभांतून भाषणें करूं लागला. सातारकरांवर करण्यांत आलेल्या अन्यायांबद्दल पोटांत उसळलेली आग त्यास शब्दानें व्यक्त करतां येऊं लागली. आणि त्याचा उत्कृष्ट परिणाम जनतेवर होऊं लागला. त्याचा उपयोग राजाला न्याय मिळण्याच्या बाबतींत जरी झाला नाहीं तरी कंपनी सरकाराबद्दल जनतेचें मत कलुषित झालें आणि कंपनी सरकारचें सिंहासन डळमळीत होऊन तें केव्हां तरी मातीस मिळणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं.

रंगो बापूजीनें शक्याशक्य सर्व प्रयत्न केले. कंपनी सरकारनें प्रतापसिंह महाराजांवर केलेल्या अन्यायांचा कणन् कण प्रकाशांत आणिला. कायद्याचें कुंपण पार उध्वस्त करून टाकिलें. कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांस नाना तऱ्हेचीं आव्हानें दिलीं. शिव्या-शाप दिले. असें करतांना इंग्रजी भाषेंतील कोणतेही शेलके शब्द त्यानें शिल्लक ठेविले नाहींत. रंगो बापूजीनें आपल्यातर्फे नेमलेला वकील जॉर्ज थाम्पसन हाही मोठा विद्वान् असल्यामुळें त्यानें कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांविरुद्ध अशी झोड उठविली कीं, त्यांस नकोसें होऊन गेलें. कंपनी सरकारनें चालविलेल्या महाराजांवरील अन्यायांच्या योगानें इंग्लंडमधील जनतेचें मत फारच वाईट झालें. रंगो बापूजी व जॉर्ज थॉम्पसन या

उभयतांनीं पांच-सात वर्षें केलेल्या या हाकाटीचा परिणाम म्हणून शेवटीं पार्लमेंटमधील ५० सभासदांचें एक मंडळ महाराजांची चौकशी करण्याकरितां नेमण्यांत आलें. तिचें अध्यक्षपद जॉर्ज वुइल्यम चर्च वॉर्डन ह्या गृहस्थाकडे होतें. पण ही सर्व तयारी होऊन चौकशी होण्यापूर्वींच प्रतापसिंह महाराज निवर्तले व हें मंडळ जागच्याजागींच जिरून गेलें !

प्रतापसिंह महाराजांच्या मृत्यूनें रंगो बापूजीची दारुण निराशा झाली. यानंतर त्याचा दोन हजार रुपयांचा तनखा बंद झाल्यामुळें त्यास विपन्नावस्था आली. तथापि त्यानें आपली चिकाटी सोडली नाहीं. यानंतर सहा वर्षें इंग्लंडांत राहून त्यानें प्रतापसिंहाच्या दत्तकपुत्राच्या नांवानें हा लढा लढविला. पुढें लौकरच प्रतापसिंहाचा भाऊ अप्पासाहेब हाही दिवंगत झाला. त्याचा दत्तकपुत्र नामंजूर करून इंग्रजांनीं सातारची गादी खालसा केली. तरीसुद्धां इंग्रज सरकारच्या मागची रंगो बापूजीची साडेसाती सुटेना. तेव्हां तिच्यांतून मुक्त होण्यासाठीं त्यानें नाना तऱ्हेचे उद्योग चालविले. या कामींही त्यास नातूनें मदत केली. इ. स. १८५० मध्यें बाळाजीपंत नातू काशीयात्रेस गेला असतां प्रतापसिंहाच्या राणीस भेटला व म्हणूं लागला कीं, राज्याचा बदोआ लिहून द्या म्हणजे तुमच्या चरितार्थाची साहेबाकडून उत्तम तऱ्हेची व्यवस्था करून देतों. याच्या आधीं कांहीं दिवस म्हणजे ता. ७-१२-१८४९ ला राणीनें ग. ज. कडे साताऱ्यास माघारीं जाण्याची परवानगी मागितली होती; व हें काम मंजुरीकरितां इंग्लंडमध्यें गेलें आणि या मंडळींस बाहेर ठेवण्याचें आतां कांहीं एक कारण नाहीं असा हुकूम मुंबई सरकारास आला होता. पण त्याची बजावणी मात्र झाली नव्हती. इतक्यांत बाळाजीपंत नातू काशीस गेला आणि राणीस भेटून, म्हणाला कीं, तुम्ही रंगो बापूजीची कड घेतां म्हणून सरकारचा तुमच्यावर राग आहे, सबब त्याच्याशीं संबंध ठेवूं नका. म्हणजे तुमचें सर्व काम मार्गी लागेल. या वेळीं राणीची स्थिति अत्यंत केविलवाणी झाल्यामुळें नाइलाजानें तिनें नातूचें म्हणणें मान्य केलें आणि ता. २४-६-१८५० ला राणीनें राज्याचा बदोआ डलहौसीस लिहून दिला व रंगो बापूजीस परत बोलाविलें. त्यामुळें रंगो बापूजीचा सर्वच आधार तुटला. त्यास आतां कर्जही पुष्कळ झालें होतें. तें निवारण्यास

त्यास तोंड सांपडेना. इंग्लंडांत त्यास कोणी भीक सुद्धां मागूं देईना. त्याचा भाऊ रावजी यानें हिंदुस्थानांत वर्गणी जमविण्याचा प्रयत्न केला त्यास सरकारनें बंदी केली. रंगो बापूजी इंग्लंडांत अजून सुद्धां सातारकर महाराजांचा वकील म्हणून वावरे, हेंच कंपनी सरकारास खपेना. सरकारनें ता. १९-१-१८५३ ला, आम्ही तुम्हांस सातारकरांचा वकील म्हणून ओळखीत नाहीं असें लिहून कळविलें. ह्या पांच-सहा वर्षांच्या अवधींत त्यास १० हजार पौंड कर्ज झालें. अशा तऱ्हेनें तो सर्व बाजूंनीं नाडला गेल्यामुळें १८५४ मध्यें हिंदुस्थानांत परत आला. कंपनी सरकारनें त्याची ब्याद इंग्लंडांतून नाहींशी करण्याकरितां त्यास रु. २५,००० व फुकट तिकीट दिलें होतें.

इंग्लंडहून निघण्यापूर्वीं त्याच्या अनेक इंग्रज स्नेह्यांनीं वर्गणी जमवून नक्षीकाम केलेलें एक सुंदर चांदीचें तबक स्नेहाचें द्योतक म्हणून त्यास नजर केलें. त्यावर जोसेफ, ह्यूम, जॉन ब्राइट, जॉर्ज ब्राइट, जॉर्ज सलिव्हन, जॉन ब्रिक, जनरल रॉबर्टसन्, ग्रँट डफ, जॉन बुल, कॅरोलीन, कोगन, वगैरे बावीस नामांकित इसमांचीं नांवें आहेत. या नांवांवरूनच रंगो बापूजीच्या योग्यतेची साक्ष पटते. तबकावर लेख कोरला आहे तो असा. 'चौदा वर्षें इंग्लंडांत राहून धन्याची एकनिष्ठपणें सेवा करणारे रंगो बापूजी यांस त्यांचे चाहत्यांनीं वर्गणीनें रक्कम जमवून हें तबक नजर दिलें आहे.'

एवढी मोठी कामगिरी करणाऱ्या रंगो बापूजीचा सर्व खटाटोप वायां गेला. त्यानें प्राणघातक संकटें व यातना भोगल्या. खर्चापायीं धन्याचें व आपलें सर्वस्व वेंचलें, तरी नाउमेद न होतां, शेवटचा रामबाण उपाय म्हणून लंडन येथेंच मोडी लिपींत 'प्रतापसिंहावरील आरोपांचें खंडन' हें पुस्तक स्वतः लिहून प्रसिद्ध केलें. तें हल्लीं दुर्मिळ आहे; पण त्याच्या स्नेही मंडळींनीं दिलेलें चांदीचें तबक मात्र पुण्यास रावबहादुर चित्रे यांच्याकडे आहे असें ऐकतों.

रंगो बापूजी मुंबईला परत आला. त्याच्याबरोबर झील नांवाचा एक गोरा साहेब नोकर म्हणून आला होता. प्रथम प्रथम त्यास कंपनी सरकारनें आदरानें वागविलें; आणि त्याची राहण्याची व्यवस्था परळच्या गव्हर्मेंट हाऊसच्या नजीक एका प्रशस्त बंगल्यांत (बहुधा लवजी कॅसल) केली. रंगो बापूजी परत आल्याची बातमी

पसरतांच नागपूर, जबलपूर, कलकत्ता वगैरे ठिकाणचे अनेक लोक रंगो बापूजीस पाहण्यासाठीं येत. लोकांची गर्दी उडाली तेव्हां कंपनी सरकारनें जाहीरनामा काढून सकाळ-संध्याकाळ भेटीच्या वेळा ठरविल्या. त्याप्रमाणें भेटींचें प्रकरण सुरू झालें. जनताजनार्दनाचें हें दर्शन रंगो बापूजी मोठ्या आदरानें नमस्कार करून विनम्रभावानें घेत असे. कांहीं दिवस मुंबईस काढल्यानंतर तो मावळांतील आपल्या कारी गांवीं गेला. त्यानें आपल्याबरोबर बराच मोठा कागदपत्रांचा व ग्रंथांचा संभार आणिला होता. तीन चार खटारे भरून वाचनग्रंथ त्यानें आपल्याबरोबर गांवीं नेले.

विलायतेला एवढा मोठा पराक्रम गाजवून चवदा-पंधरा वर्षांच्या प्रदीर्घ कालानें रंगो बापूजी घरीं आला. पण येथें त्याचा 'सनातन' धर्मानें छळ सुरू केलाच! प्रायश्चित्ताचा लकडा त्याच्या मागें लागला. कारण त्याची बायको कावाई म्हणून होती, ती प्रायश्चित्ताशिवाय त्याचें मुखावलोकन करीना! तेव्हां बिचाऱ्याचा नाइलाज झाला व त्यानें प्रायश्चित्त घेतलें. प्रायश्चित्त घेऊन तो जातींत व घरांत दाखल होतो न होतो तोंच मुंबईला त्याच्याबरोबर नोकर म्हणून आलेला झील साहेब एकाएकीं निवर्तल्याचें वृत्त दाखल झालें. तेव्हां एका क्षणाचाही विलंब न करतां तो तडक मुंबईला आला व झील साहेबाच्या बंगल्यांत घुसून एका कागदाच्या पेटीचा तपास करूं लागला. पेटी सांपडली; पण कागद गेले! या भानगडीनें रंगो बापूजी हवालदिल झाला. मग त्या झील साहेबांत आणि त्याच्या कबजांत असलेल्या कागदाच्या लोखंडी पेटींत रंगो बापूजीचें कोणतें रहस्य सांठविलें होतें कोण जाणें! हा निराशेचा रट्टा खाल्ल्यानंतर रंगो बापूजी पुन्हां आपल्या गांवीं आला व कालक्रमणा करूं लागला.

रंगो बापूजीचें दैव एकंदर खडतर हेंच खरें. आपलें वतन माघारीं मिळविण्यासाठीं त्यानें चालविलेल्या खटपटींचा शेवट मोठा विस्मयजनक झाला. आतां इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचीं पावलें वाजूं लागलीं होतीं. रंगो बापूजीनें त्यांतही धामधूम करण्यास कमी केलें नाहीं. त्यानें प्रथम सातारा जिल्हा स्वतंत्र करण्याचा घाट घातला. रामोशी वगैरे लोकांची संघटना केली. सातारा जिल्ह्यांतील आजही प्रसिद्ध असलेला वाळवें तालुका या लोकांचें मुख्य

केंद्र होतें. प्रथम सरकारी खजिने लुटले जाऊं लागले. उत्तर हिंदुस्थानांत उठावणी होतांच इकडे धडाकून धामधूम करण्याचें ठरलें होतें. यांत सातारचें राजघराणें सामील होतें.

हें चाललें होतें तेव्हां साहेब कांहीं स्वस्थ नव्हता. आतां तर त्याचें राज्य स्थिरावलें होतें व असले किरकोळ बुडबुडे चेपून टाकण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगांत निश्चित आलें होतें. पेशव्यांचें वाटोळें करण्यासाठीं साहेबास रंगो बापूजी व सातारकर छत्रपति लाभले तर रंगो बापूजीचा निकाल लावण्यासाठीं भोरचे पंत-सचिव व कृष्णराव शिंदकर नांवाचा एक कायस्थ सांपडला. त्यांनीं रंगो बापूजीला पकडून देण्याचें ठरविलें होतें. शिंदकराचा व रंगोबाचा स्नेह होता. तेव्हां शिंदकरानें आजारी असल्याचें सोंग केलें व रंगो बापूजीस भेटीस बोलाविलें. रंगो बापूजी आला व बोलाचालीस व इतर गप्पांस रंग आला. तोंच रंगाचा भंग झाला ! गोरे सोजीर आंत आले व त्यांनीं रंगो बापूजीस पकडलें. त्याची रवानगी रत्नागिरीच्या किल्ल्यांत झाली. पुढें कांहीं दिवसांनीं त्यास ग्वाल्हेरीला पाठविण्यांत आलें, तेथें पाहरेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन तो जो निसटला तो कायमचाच ! त्याचें पुढें काय झालें तें कोणासच कळलें नाहीं.

उत्थानाचे प्रयत्न फसले आणि दहशतीनें वचक बसाविण्यासाठीं साहेबानें उग्र स्वरूप धारण केलें. पकडापकडीचा आणि खटपटचे लोक फांसावर चढविण्याचा धूमधडाका सुरू झाला. त्यांत रंगो बापूजीचा पुत्र सीताराम व इतर नातेवाईक यांची आहुती पडली. रंगो बापूजीचे दोन पुतणे दिल्लीकडे सैन्य घेऊन गेले होते. पण त्यांचीही फसगत झाली; उत्थानाचा बींमोड होतांच ज. लेकनें दिल्लीची कत्तल केली, त्यांतून ते निभावले व कोंकणांत आले. आणि राणीच्या माफीचा जाहीरनामा प्रसिद्ध होईपर्यंत दोघांनींही आतोण्याच्या जंगलांत काल काढिला. दोघेही अविवाहित राहिले. पैकीं वामनराव देशपांडे इ. स. १९२६ त मरण पावला. रंगो बापूजीच्या फांसावर लटकलेल्या मुलाचा—सीतारामाचा वंश रोहिड खोऱ्यांत करंजवें गांवीं आजही नांदत आहे असें कळतें.

रंगो बापूजी शरीरानें निमगोरा, बांधेसूद, पाणीदार डोळ्यांचा व तेजस्वी

दिसे. त्यांची उंची मध्यमपैकींच होती. त्याचे वडील तीन गांवचें कुलकर्णपण करीत असत. त्याची पत्नी ८२ वर्षांची होऊन वारली. साताऱ्च्या प्रतापसिंह महाराजांच्या योगानें त्याची कीर्ति दिगंत झाली.

—तथापि दैव फिरलें म्हणजे पुरुषप्रयत्नही विफल ठरतात हेंच खरें काय ?

बाळाजीपंत नातू : ३६

बाजीराव आणि प्रतापसिंह या दोघांना पुरून उरणारी ही व्यक्ति मराठेशाहीच्या अंतकालीं फारच प्रमुखपणें वावरली. बाळाजीपंत नातू हा अत्यंत कर्तबगार आणि हुषार पुरुष होता, यांत तिळप्राय शंका नाहीं. ह्या पुरुषाची कर्तबगारी मराठेशाही कंपनी सरकारच्या घशांत घालण्यासाठीं खर्ची पडली, हें दुर्दैव खरेंच ! ती तशी खर्ची पडली नसती तर फारच चांगलें झालें असतें. बाजीरावाच्या किंवा प्रतापसिंहाच्या कामीं हा आला असता तर इंग्रजांस मराठेशाही सहजासहजीं घशाखालीं उतरवितां आली नसती.

बाळाजीपंत नातू हा वांईजवळील पांचवडचा राहणारा. त्याची स्थिति अत्यंत हलाखीची होती. त्याला अठराविश्वे दारिद्र्यानें पुरें घेरलें होतें. इ. स. १७९२ च्या सुमाराम त्याचे हाल कुत्रा खात नव्हता. त्या वेळीं महादेवशास्त्री नांवाचा एक गृहस्थ हरिपंत तात्या फडके यांस बाळाजीपंतांविषयीं काकुळतीनें लिहितो, 'राजश्री बाळाजीपंत नातू याजला आपण हरकोठें अन्नास लाविलें पाहिजे, म्हणून पूर्वीं आपणांजवळ आम्ही बोललों होतों. त्याजवरी आपण मान्य केलें. मानिले दप्तरी उमेदवारीनें सरकारचें लिहिणें लिहितात. दोन वर्षें जाहालीं, लिहिणार चांगले जाहाले, रामचंद्रपंत ढमढेरे यांस आम्हींहि विचारलें, त्याणीं प्रत्योत्तर दिल्हे कीं, आमचे निशेचे आहेत. श्रम बहुत याणीं केला. कर्जदार लोकांचे बहुत जाहले आहेत. त्याची सोय आपण करून दिल्हि

पाहिजे. तालुके रायगड हा किला सरकारांत नवा घेतला. तेथें असामी कारकुनाच्या होतील × × × यांस तेथें एक असामी आपण करून दिल्ही पाहिजे. यास सर्व भरवसा आपला आहे.'

बाळाजीपंत नातू लेखणीचा फर्डा आणि हुशार होता, हें या उताऱ्यावरून सिद्ध होतें व त्यानें पुढें इंग्रजाच्या वतीनें गाजविलेली कामगिरी हा तर त्याचा उत्कृष्ट पुरावा आहे. वांईचा दुसरा एक इभ्रतदार गृहस्थ गोविंद महादेव साने हा इ. स. १८४१ मध्यें नातूसंबंधानें अशी माहिती देतो कीं, 'माझे चुलत्याजवळ बाळाजीपंत नातू नोकर होता; त्यास माझे चुलते कामासाठीं खंडेराव रास्त्यांकडे पाठवीत. आमचे घरीं दोन वर्षें नोकरी केल्यावर त्यास रास्त्यांनीं आपणांकडे मागून घेतलें. तेव्हां त्याचे जागीं आमचे चुलत्यांनीं नागो देवराव याची नेमणूक केली. या नागो देवरावाचा व नातूचा पुढें स्नेह जमला. नागो देवरावाचा आप्त नीळकंठशास्त्री थत्ते याचे मुलास नातूनें आपली मुलगी दिली. लग्न थाटाचें झालें.' बाळाजीपंत नातू तसा गुणी होता. त्यानें सुतानें स्वर्ग गांठला. सान्यांचा कारकून म्हणून कारणाकारणानें आणि कामानिमित्तानें रास्त्यांच्याकडे जाणाऱ्या या गृहस्थानें त्यांच्यावर आपली छाप इतकी बसविली कीं, पुढें त्यांनीं त्यास आपला कारकून म्हणून नेमलें. कारकुनीचें काम करतांना त्यानें त्यांचा विश्वास आणि लोभ इतका संपादन केला कीं, त्यांनीं त्याची आपल्या पश्चात् आपला मुखत्यार म्हणून नेमणूक केली. तत्संबंधींचा उल्लेख येणेंप्रमाणें आहे. 'खंडेराव रास्ते यांनीं मरते वेळेस मी जवळ नसतां वश्यतनामा (मृत्युपत्र) केला. त्यास मला मुखत्यार लिहून ठेविलें.'

या गोष्टीवरून बाळाजीपंत नातूची इभ्रत काय दर्जाची होती याची चांगलीच कल्पना येते.

एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर पाय टाकावा, दुसरीवरून तिसरीवर उडी मारावी आणि असें करीत करीत भाग्याची सीमान्तरेषा गांठावी त्याप्रमाणें बाळाजीपंत नातूनें केलें. हें होत असतांना भारतवर्षाचें भाग्य लयाला गेलें ही मात्र अत्यंत वाईट गोष्ट झाली. पेटत्या काडीचा उपयोग शीतनिवारणार्थ शेकोटी पेटविण्यासाठीं करतात. तसेंच घराला आग लावण्यासाठींही पण तीच काडी

उपयोगी पडते. हा परिस्थितीचा आणि योजकाच्या योग्यायोग्यतेचा प्रश्न आहे. या वेळीं जबाबदार ठिकाणीं वावरणारे मुत्सद्दी काय किंवा राजे काय हेच नादान होते. त्यांना ठिकठिकाणीं दिसणाऱ्या कर्तबगारीचा आणि तेजाचा झोत देश-कल्याणाकडे कसा वळवावा आणि भारताचें भाग्य कसें उजळावें हेंच समजलें नाहीं. साहेब पांच हजार कोसावरून डोक्यांत मगज व मनगटांत कर्तबगारी घेऊन आला. त्यानें आमचींच साधनें वापरलीं आणि तो भारतवर्षाचा सम्राट झाला.

रास्त्यांच्या कामासाठीं नातू रेसिडेन्सींत जाऊं लागला. त्याबरोबर या चणचणीत आणि तल्लख माणसाची आणि साहेबाची गांठ-भेट व बोलाचाली होऊं लागली. नातूच्या अंगांतील हुशारी पाहून साहेबानें त्यास आपल्या लगामीं लाविलें. त्यावेळीं पुण्याचा रेसिडेंट सर बॅरी क्लोज हा होता. त्याचें व बाळाजीचें बरेंच सूत जमलें. त्याबरोबर त्यानें आपल्या धन्याची—रास्त्यांची थोडीबहुत व्यवस्था क्लोजकडून लावून घेतली. सर बॅरी क्लोजबरोबर तो इ. स. १८१० मध्यें माळव्यांत होता. त्या वेळीं कंपनी सरकारांत त्याचा रुबाब चांगलाच होता. 'कर्नल सर ब्यारो कलुष (क्लोज) याजबरोबर इ. स. १८१० चे सालीं माळव्यांत होतों. तेव्हां पालखी, पंचवीस स्वार, पन्नास माणूस अशा तऱ्हेनें होतों' असें तो स्वतःच लिहितो.

सर बॅरी क्लोजनंतर पुण्याचे रेसिडेन्टाचे जागीं एल्फिन्स्टन आला. त्याबरोबर बाळाजीपंत नातूचें नशीब उजळलें. क्लोज हा रेसिडेन्टाचें काम करीत असतां खुरशेटजी मोदी हा बाजीराव व रेसिडेन्ट यांच्यामध्यें दुभाष्याचें काम करीत असे. पण आतां दुभाष्याची गरजच उरली नाहीं. कारण एल्फिन्स्टनला देशी भाषा येत होत्या. आणि खुरशेटजी मोदीवर त्याची कांहीं कारणानें इतराजी झाली. तेव्हां त्यानें बाळाजीपंत नातूस कामासाठीं आपल्याजवळ घेतलें. यासंबंधानें बाळाजीपंत नातू असें लिहितो कीं, 'अलपिष्टन साहेब मला कामकाजांत बोलावूं लागले तेव्हां बाजीरावानें आपल्याजवळ चाकरीस राहण्याविषयीं मला फार आग्रह केला. थोर थोर लोक बोलण्यास घातले; परंतु मीं कबूल केलें नाहीं. यामुळें बाजीरावाची फार नाखुषी होऊन त्यांनीं फोर्डसाहेबाचे मार्फतीनें अलपिष्टन साहेबास सांगून पाठविलें कीं,

'बाळाजीपंतास तुम्ही आपलेजवळ येऊं देऊं नये.' त्याच वेळेस मी मुलूख सोडून काशीस जात होतों. तेव्हां अलफिष्टन साहेब यानी जामीन देऊन ठेवून घेतलें.'

या वेळीं बाळाजीपंत नातूचा रुबाब फार दांडगा होता. या माणसाची कर्तबगारी रावबाजीपेक्षां एल्फिन्स्टनच्या लक्षांत चांगल्या प्रकारें भरली होती. आणि म्हणूनच त्यानें जामीन देऊन त्यास ठेवून घेतलें. बाळाजीपंतानें आपल्याजवळ चाकरीस राहावें म्हणून बाजीरावानें त्यास अत्यंत गळ घातली होती इतकेंच नव्हे तर त्यास फार मोठा पगारही देऊं केला होता. पण बाळाजीपंतास त्याच्याकडील ती नोकरी व त्यानें देऊं केलेला रु. ५०० चा मुशाहिरा हें सर्वच फोल वाटत होतें. अळवावरील पाण्यासारखें तें क्षणिक आहे हें तो जाणून होता. बाळाजीपंत नातू फार हुशार. त्यानें रावबाजीच्या या मागणीचा उपयोग उत्तम प्रकारें केला. त्यानें ही गोष्ट एल्फिन्स्टनला सांगितली, त्याबरोबर तो तरारला व त्यानें बाळाजीपंतासारखें तरबेज प्यादें हातचें जाऊं न देतां त्यास लगामीं लाविलें आणि तें इरेस घालून त्यानें बाजीरावावर मात केली व मराठ्यांची दौलतच्या दौलत घशांत घातली. एल्फिन्स्टननें बाळाजीपंतास रु. ५०० चा तनखा देऊन कंपनी सरकारच्या नोकरींत ठेविलें. त्या काळांत एवढ्या मोठ्या पगाराचा 'हिंदु अद्मी' म्हणजे कंपनी सरकारांत मोठाच चमत्कार होता. पण बाळाजीपंत नातू हा चमत्कारामागून चमत्कार करून दाखविणारा गृहस्थ आहे हें एल्फिन्स्टन जाणून होता व त्यानें ग. ज. ला तसें कळविलें होतें. बाळाजीपंत हा पेशव्याकडील छोट्या मोठ्या अधिकारी-वर्गाशीं दळणवळण ठेवून कंपनी सरकारच्या वतीनें बोलणें चालणें करण्याचें काम करी. इ. स. १८१५ च्या ऑक्टोबरमध्यें बाळाजीपंतानें मोठेंच घबाड आणलें. त्यानें ३,००० रु.ची लांच चारून पेशव्याच्या गुप्त खलबतखान्यांतील कांहीं कारकुनांना वश केलें व पेशव्याचें गुप्त दफ्तरं कनवटीस लाविलें. कंपनी सरकारच्या लगामीं लागलेले महत्त्वाचे चुगलखोर बरेच होते. या लोकांची वर्णी बहुधा बाळाजीपंत नातूच्या मार्फत लागली असावी. पेशव्याबरोबर नाशिक व पंढरपूर या दोन ठिकाणीं जाणाऱ्या गणेशपंत नांवाच्या इसमास रु. ४०० ता. २ जुलै १८१६ ला

बक्षिसादाखल देण्यांत आले. या गणेशपंताचा पगार महिना ५० रुपये होता. आंग्र्याचा दिवाण बापु भट यास कंपनी सरकारच्या रेसिडेन्टाकडून तनखा जात होता. तसेंच सातारच्या बलवंत मल्हार चिटणीसासही रेसिडेन्टाकडून कांहीं पोंच होत होती. पेशव्याचा नाशिक येथील कारकूनही या देकारांत होता. याशिवाय अमृतरावाचा वकील प्रभाकर बल्लाळ यालाही कंपनी सरकारचा चरिंदा चालू होता. वर उल्लेखिलेल्या मंडळींना एप्रिल १८१७ ला ५०० रु. रोख व पोषाख कंपनी सरकारामार्फत देण्यांत आले. बाळाजीपंत नातूचें फितुरीचें कार्य असें सहस्र करांनीं चालू होतें व बाजीरावाच्या पापाचा घडा एकेक खड्यानें भरत होता.

एल्फिन्स्टनसारखा अद्वितीय व कर्तबगार पुरुष पुण्यास रेसिडेन्टाच्या जागीं दाखल झाला आणि त्यानें आपल्या कर्तृत्वाला राक्षसी वेगानें प्रारंभ केला. अवघ्या आठ-नऊ वर्षांच्या अवधींत त्यानें मराठी राज्याचा चट्टामट्टा करून टाकला. पेशवाईचा नायनाट करण्यासाठीं त्याच्या भात्यांत सांपडलेलीं दोन अमोघ अस्त्रें म्हणजे यशवंतराव घोरपडे सोंडूरकर व बाळाजीपंत नातू. बाळाजीपंत नातूचें आणि एल्फिन्स्टनचें मेतकूट फारच लवकर जमलें. बाजीरावाकडील बातम्यांचा नाना उपायांनीं भेद करून त्या इत्थंभूत एल्फिन्स्टनला कळविण्याचा बाळाजीपंत नातूनें धूमधडाका चालविला. नातूवर एल्फिन्स्टनचा लोभ फार. तो बहुतेक त्याच्याबरोबरच फिरतीवर असे. याच सुमारास सातारकर छत्रपतींचेंही राजकारण जोरांत सुरू झालें. त्याचा मध्यस्थीपणाही बाळाजीपंतानेंच केला. सातारकरांचे निरोप ऐकणें व ते साहेबास कळविणें, तसेंच सातारकरांच्या वतीनें येणाऱ्या माणसांच्या गांठी-भेटी घेणें, त्यांचीं बोलणीं नीट समजावून घेणें, त्यांच्या राजकारणाची एल्फिन्स्टनला कल्पना देणें, अशा तऱ्हेनें उभयतांच्या भेटींत चर्चिल्या जाणाऱ्या गोष्टींची कच्ची तयारी झाल्यानंतर साहेबाचा व राजकारणाचा रंग ढंग पाहून उभयतांच्या गांठी घालून देणें हें काम बाळाजीपंतास करावें लागे. 'बाळाजीपंत नातूंनीं कच्चा मजकूर आम्हास विचारून समजावून घेतला, आणि बडेसाहेबास समजावितों म्हणजे बोलावयास श्रम पडणार नाहींत म्हणून बोलले. नंतर बडेसाहेबास समजावयास गेले.' याप्रमाणें दलालाची भूमिका बाळाजीपंत मोठ्या कुशलतेनें करीत असे.

यानंतर बाजीराव जेव्हां ता. १६–११–१८१७ ला रात्रीं पुण्याहून निघून गेला त्या वेळेस पेशव्यांच्या वाड्यावर इंग्रजांचें निशाण चढविण्याचें काम बाळाजीपंत नातूनें केलें. ही वेळ मोठी चमत्कारिक होती. पेशवा पळाल्यामुळें पुण्यांत भयंकर खळबळ उडाली. लोक हवालदिल झाले. त्यांना आपला जीव धोक्यांत आहे असें वाटूं लागलें. तेव्हां लोकांना धीर देण्याचें व कंपनी सरकारच्या वतीनें शहराचा ताबा घेऊन त्याची नीट व्यवस्था लावण्याचें काम बाळाजीपंतानें मोठ्या धडाडीनें आणि चोख केलें. नगरशेट 'हरेश्वर भाई सावकार याजबरोबर दोन हलकारे देऊ. शेहरांतील सावकार व दुकानदार वाणी उदमीयास ताकीद करविली कीं, दुकाण उघडून कोणी कोठें न जातां स्वस्त असावें. आम्हाकडून शेहरास उपद्रव होणार नाहीं.

यानंतर सरकारी वाड्यांचा ताबा घेण्याचें कामही बाळाजीपंत नातूनेंच केलें. 'सायंकाळीं चार घटका दिवसास दोनशें लोक घेऊन बाळाजीपंत व येक गोरा ऐसे आले, आणि सरकारचे लोक बाहेर काढून देऊन आपले पलटणी लोक ठेवून, बंदोबस्त केला. बुधवारचे वाड्यापाशीं दोन पाहरे ठेविले.' शुक्रवारचे वाड्याची तशीच व्यवस्था लाविली. नंतर शुक्रवारचे वाड्याची मोजदाद बाळाजीपंतानें केली व कुलपें घालून बंदोबस्त केला. 'हजार बाराशें माणुश, बाळाजीपंत नातू याचे विदेमाणें ठेवून शहराचा बंदोबस्त केला.

या राज्यक्रांतींत बाळाजीपंतानें इंग्रजांस चांगलीच मदत केली म्हणून साहेबाचें लक्ष बाळाजीपंतावर विशेष होतें. यानंतर त्याच्या मुलीचें लग्न ठरलें. त्यानें आपली मुलगी नीळकंठशास्त्री याच्या मुलास दिली. तेव्हां त्या शुभ प्रसंगीं मायबाप सरकारचा प्रतिनिधी एल्फिन्स्टन याचा शुभ आशीर्वाद त्यानें आपल्या कार्यास मागितला आहे !

'वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नीळकंठशास्त्री थत्ते याचा पुत्र वर निश्चय करून वैशाख वद्य पंचमीस लग्नातिथीचा निश्चय केला आहे. साहेबाचे कदम मुबारक होऊन कार्य सिधीस जाइ ते जाहले पाहिजे. लोखंड परसास लागल्यावर सोनें होईल की नाहीं ही काळजी लोखंडास राहात नाही. माझे मनांत काय आहे तीं येते वेलेस विनंती केलीच आहे.'

'लोखंड परसास लागल्यावर सोनें होईल का नाही ही काळजी लोखंडास राहात नाही.' हें मोठें गोड व सूचक वाक्य बाळाजीपंत नातूनें आपल्या मुलीच्या लग्नाचे निमित्तानें ता. २१–५–१८१८ ला साहेबास धाडलेल्या या पत्रांत लिहिलें आणि पुढें चार-पांच महिन्यांतच त्या लोखंडाचें सोनें झालें! बाळाजीपंतास त्याच्या कामगिरीवर खुष होऊन एल्फिन्स्टननें पांच गांव इनाम दिले. त्याबद्दल आभारप्रदर्शनाचें पत्र बाळाजीपंतानें ता. २७–९-१८१८ ला लिहिलें, तें असें:—

'दरिविला मेहेरबा पार्टीजर साहेब व राबिंसन साहेब याणीं पाच गावच्या सनदा फिदवीचे नावे तयार करून पाठविल्या. त्या पावोन बहुत संतोष जाहाला. शेवकाकडून इतकी खिजमत जाहाली नसतां इनाम बहुत मिळाले.......... सेवकाचा प्रतिपाल साहेब करीतच आहेत.'

इ. स. १७९२ मध्यें 'बाळाजीपंत नातू याजला आपण हरकोठे अन्नास लाविलें पाहिजे' म्हणून ज्या गृहस्थाबद्दल आर्जवें केलीं जातात तोच अवघ्या २६ वर्षांच्या अवधींत पांच गांवचा इनामदार होता;—तो सुद्धां कष्टाची आणि कर्तबगारीची किंमत न जाणणाऱ्या एखाद्या अनागोंदी रामभरोसे महाराजाकडून नव्हे, तर पै पैची किंमत जाणणाऱ्या इरसाल एल्फिन्स्टन साहेबाकडून! यानंतर बाळाजीपंत नातूवर लक्ष्मीची कृपादृष्टी चांगलीच वळली. सातारकर छत्रपतींची सातारला स्थापना झाली आणि ग्रँट डफची नेमणूक रेसिडेंट म्हणून झाली व त्याच्या हाताखालीं बाळाजीपंत नातूची नेमणूक झाली. त्या वेळीं त्याची तैनात पांचशें रुपये होती. इंग्रजाकडील सरंजाम बाळाजीपंतास बारा हजार रुपये होता. आंगरे याजकडील रुपये दोन हजार, तसेंच पानालकर यांजकडून रुपये पांच हजार, याप्रमाणें मोठमोठाले सरंजाम होते. याशिवाय आणखीही पांचशें रुपयांची नेमणूक त्यास होती. याप्रमाणें बाळाजीपंत नातूचें उत्पन्न सालीना पंचवीस हजारांचें होतें असें दिसतें.

समर्थाघरचें श्वान म्हणून बाळाजीपंतास सर्वच वचकत. त्यांतल्या त्यांत सातारा दरबारचे लोक त्याला भिऊन वागतांना दिसतात. इ. स. १८१९ च्या दसऱ्याच्या दरबार प्रसंगीं पोषाख देण्यासंबंधीं चर्चा झाली. एकदां कंपनी

सरकारनें सातारकरांना मेजवानी व पोषाख दिला. त्या वेळीं सातारकरांचा दिवाण म्हणून विठलपंत महाजनी याला पांच सनगें दिलीं, तेव्हां दसऱ्याचे दरबार-प्रसंगीं इंग्रजाचा दिवाण म्हणून सातारकर महाराजांनीं बाळाजीपंत नातूला पांच सनगांचा पोषाख दिला. हें ग्रँट डफच्या लक्षांत येतांच त्यानें प्रश्न केला कीं, साडेतीन सनग देण्याची चाल असतां तुम्ही पांच सनगांचा पोषाख काय म्हणून दिला ? त्याला उत्तर असें मिळालें कीं, आपण विठलपंत महाजनीस पांचसनगी पोषाख दिला म्हणून आम्ही बाळाजीस त्याप्रमाणें केलें. तेव्हां ग्रँट डफ बोलला कीं, विठलपंत सातारकरांचा दिवाण आहे; पण बाळाजीपंत कंपनी सरकारचा साधा कारकून आहे. तेव्हां त्यास साडेतीन सनगांचा पोषाखच योग्य. साहेब बाळाजीपंताची खरी किंमत सातारकरास सांगत होता. पण त्याचा कारकुनी हिसका सातारकरांच्या चांगला परिचयाचा असल्यामुळें ते त्यास बिचकत होते, भीत होते. सातारकरांचा साहेब बाळाजीपंतच होता. सातारकरांचा दिवाण विठलपंत याला अबदागीर किंवा पालखी, चोपदार, चवरी यांची व्यवस्था व्हावयाची होती. तेव्हां बाळाजीपंतासही तीच व्यवस्था असावी अशी छत्रपतींची इच्छा होती. पण ग्रँटनें त्यास हरकत घेतली.

'ग्रांट बोलले कीं, इंग्रजी चाकरास देऊं नये.'

बाळाजीपंत नातूनें इंग्रजाची सेवा निष्ठेनें केली, तेव्हां स्वामिनिष्ठ म्हणून आम्हां बावळ्या हिंदूंची नीतिमत्ता त्याचा एकाद्वेळेस उदोउदोही करील. पण त्यानें स्वजनांचा द्रोह केला, हें महापातक त्याला एकसारखें छेडीत होतें. त्यामुळें तो इतका घाबरला होता कीं, साताऱ्यास काय किंवा पुण्यास काय त्याला इंग्रजांच्या आश्रयाशिवाय राहणें धोक्याचें वाटत होतें. एल्फिन्स्टन विलायतेस निघाला त्या वेळेस तो साहेबाबरोबर विलायतेस जाण्यास तयार झाला होता. पण एल्फिन्स्टननें त्याला धीर दिला तेव्हां तो येथें राहिला. कारण प्रतापसिंह हा ब्राह्मणांचा किती द्वेष करतो हें इंग्रज जाणून होता.

साहेबाकडील सूत्रें कशीं हालवावींत या कलेंत बाळाजीपंत निष्णात् असल्या कारणानें त्यानें त्या वेळीं लक्षावधी रुपयांची इस्टेट कमाविली. पण हें सर्व चालू असतां त्याच्या मनांत एक शल्य सारखें बोंचत होतें. तें म्हणजे आपण दिवाण

नाहीं! आपण कंपनी सरकारचे कारकून. पण त्याची दिवाणपदाची इच्छा अप्पासाहेबाच्या कारकीर्दींत परिपूर्ण झाली. हें सर्व झालें, पण जनतेंत मात्र त्याच्याइतकी नाचक्की कोणाचीच झाली नाहीं. बाजीरावाच्या कारकिर्दीपासून त्यानें स्वकियांचीं छिंद्रें इंग्रजांस दाखवून पेशवाई बुडविण्यास चांगलाच हातभार लावला. त्यानंतर प्रतापसिंहांच्या कारकीर्दींत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचें भूत थैमान घालूं लागलें, त्याला कारण साहेबाचा स्वार्थ आणि ब्राह्मण-मराठ्यांचा मूर्खपणा. पण या वादांत नातूनें ब्राह्मणांची बाजू धरली व प्रतापसिंहानें ब्राह्मणेतरांची कड घेतली आणि हें भांडण हमरीतुमरीनें लढविलें. त्यामुळें प्रतापसिंहाचा विनाशकाल आला आणि बाळाजीपंत आणखीच अप्रिय झाला. इंग्रज अधिकारी आतां बाळाजीपंतांचें महत्त्व विसरून गेले. त्यामुळें तर त्याच्या फजितीस सीमाच उरली नाहीं. तेव्हां साहेबाच्या आसऱ्यानें प्रत्येकास दमदाटी करणारा बाळाजीपंत नातू आतां बलहीन झाला. त्याला कृतकर्माबद्दल पश्चात्ताप वाटूं लागला. तेव्हां मनाच्या या उद्वेगकारक स्थितींत तो काशीस निघून गेला. तेथें त्यानें पापक्षालनार्थ चतुर्थाश्रम स्वीकारला. मराठी इतिहासाच्या रंगभूमीवर खलनायकाची उत्कृष्ट भूमिका करणाऱ्या बाळाजीपंत नातूचा आत्मा भगवीं वस्त्रें पारिधान केल्या स्थितींतील आपल्या देहापासून ता. २४-६-१८५० रोजीं विमुक्त झाला!

वृक्षहीन वेलींची भेट : ३७

अप्पासाहेबाचा अंत झाला आणि वाड्यांत जी रडारड सुरू झाली ती रड अप्पासाहेबाच्या तीन राण्या व त्याचा दत्तकपुत्र यांच्या मागें कायमचीच लागली. बिचारा अप्पासाहेब मरेपर्यंत कंपनी सरकाराबद्दल कृतज्ञ होता. शेवटच्या क्षणींही साहेबानें केलेल्या उपकाराचें विस्मरण त्यास झालें नव्हतें. अंतकालापर्यंत अंतःकरणाच्या कोंपऱ्यांत लपवून ठेविलेले रे. ओव्हान्ससंबंधींचे कृतज्ञतेचे कांहीं तरी बोल त्यास बोलावयाचे होते. पण त्याचा नाइलाज झाला. वाचाशक्ति जागच्याजागीं थिजली. त्यास इहलोक सोडून जावें लागलें. आपल्या दत्तकपुत्राकडे गादी चालावी अशी त्याची उत्कट व शेवटची इच्छा होती. त्यासाठींच त्यानें शेवटीं इतकी धडपड करून दत्तक घेतला. पण त्याचा कांहीं-एक उपयोग झाला नाहीं. अप्पासाहेब निवर्तल्यानंतर वाड्यांत ठिकठिकाणीं ब्रिटिश सरकारच्या मोहरा झाल्या आणि राज्यकारभारास सुरुवात झाली. रेसि-डेन्ट फ्रियर हा फार चांगला गृहस्थ होता. त्याचे व अप्पासाहेबांचे परस्परसंबंध उत्तम होते. तेव्हां त्यानें आपल्याकडून राजकुटुंबियांची नीट व्यवस्था लाव-ण्याचा प्रयत्न केला. पूर्वीप्रमाणें राजवट चालू झाली. महाराजाचा दिवाण सखाराम बल्लाळ फडणीस याच्या हातांत सर्व सूत्रें गेलीं आणि त्यानें रे. फ्रिय-रच्या सांगण्याप्रमाणें तंतोतंत कारभार हांकण्यास प्रारंभ केला. यामुळें कोणत्याही प्रकारचा घोळ निर्माण न होतां गाडें सुरळीत चालू झालें.

दत्तकाचा निकाल होईपर्यंत रे. फ्रियरनें आपली कारकीर्द मोठ्या भलाईनें चालविली आणि छत्रपतींच्या प्रजेचा दुवा घेतला. महाराजांच्या तिन्ही राण्यांचा मानमरातब योग्य प्रकारें ठेवून त्यांचा योगक्षेम त्यानें दरबारी थाटानें चालविला होता. तसेंच दत्तकपुत्र व्यंकोजी राजे यांचीही बरदास्त राजपुत्रास शोभेशी ठेवण्यांत आली होती. वार्षिक उत्सव, दरबार, दसरा वगैरे सर्व प्रकारें पूर्वपरंपरेप्रमाणें चालू ठेविलें. साताराचा दसरा-दरबार त्या वेळीं प्रसिद्ध होता. तेव्हां अप्पासाहेब वारल्यानंतर येणारा विजयादशमीचा समारंभ करावा कीं नाहीं, स्वारी काढावी कीं काढूं नये म्हणून मोठा प्रश्न पडला होता. पण फ्रियरनें मुंबई सरकारास मुद्दाम लिहून खास परवानगी आणिली आणि दसरा उत्तम प्रकारें साजरा केला. अप्पासाहेब महाराजाच्या सर्व इच्छा कंपनी सरकारनें तडीस न्याव्यात म्हणून रे. फ्रियरनें आपल्याकडून शक्य ती सर्व खटपट केली. अप्पासाहेब कंपनी सरकारला शेवटपर्यंत कृतज्ञ होता. कंपनी सरकारची दोस्ती कायम टिकावी म्हणून तो नेहमीं खस्ता खाई. आपल्या प्रजेस सुद्धां त्यानें कंपनी सरकारशीं राजनिष्ठ राहण्याबद्दलचा आपला शेवटचा संदेश दिला आहे. त्यांची साडेनऊ वर्षांची कारकीर्द फार उत्तम झाली आहे. म्हणून कंपनी सरकारनें आपलें धोरण या बाबतींत उदारपणाचें व न्यायाचें ठेवावें आणि महाराजांच्या सर्व इच्छा फार पाडाव्यात म्हणून रेसिडेन्टनें सुचविलें होतें. रेसिडेन्ट फ्रियरच्या सूचनांचा एकंदर परिणाम त्या वेळचा मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड फॉकलंड याच्या मनावर चांगला झाला. त्यानें रेसिडेन्टचें म्हणणें कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना कळविलें. या सर्व गोष्टींवरून राजघराण्यांतील मंडळींस व सातारकरांच्या प्रजेस असें वाटलें कीं, साताराचें राज्य खालसा न होतां दत्तकाकडे चालेल.

अप्पासाहेबानंतर दोन वर्षेंपर्यंत साताराचा कारभार रेसिडेन्ट फ्रियरच्या देखरेखेखालीं चालू होता. या कालांत दत्तकाच्या प्रकरणीं मुंबई सरकार, हिंदुस्थान सरकार व कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांच्यामध्यें भवति न भवति चालू होती. या संधिकालांत साताऱ्यास अनेक कंड्या उठत. अप्पासाहेबाच्या आधीं पांच—सहा महिने काशीस प्रतापसिंह महाराजही वारल्याकारणानें या गटारगप्पांना अधिकच ऊत आला. प्रतापसिंह महाराजांचा साताराच्या गादीसंबंधांचा खटला

विलायतेंत जोरांत भांडला जात होता, त्याचा प्रतिध्वनि येथें उमटला आणि या भानगडींना साताऱ्यांत चांगलाच रंग चढला. पण या वेळीं रेसिडेन्ट फ्रियर फार कुशलतेनें वागला व त्यानें कोणाचेंच नुकसान होऊं दिलें नाहीं. रेसिडेन्ट फ्रियरनें सातारच्या प्रजेचें प्रेम चांगल्या प्रकारें संपादिलें. त्याच्या लोकप्रियतेचें द्योतक म्हणून साताऱ्यास एक पार त्याच्या नांवानें अजूनही प्रसिद्ध आहे.

ता. १–५–१८५० पर्यंतचा सातारकर मंडळींचा काळ कांहींसा सुखाचा गेला. दत्तक मान्य होणार आणि आपलें राज्य व सर्व व्यवहार कंपनी सरकारच्या कृपाछत्राखालीं पूर्वीप्रमाणें चालू होणार अशी त्यांस आशा होती. पण आतां दत्तक अमान्य करण्याचें ठरलें आणि त्याची अंमलबजावणी सुरू झाली. फ्रियर हा रेसिडेन्ट बदलण्यांत आला होता. आणि रोज नव्या नव्या हुकुमांनीं सातारकर छत्रपतींच्या कुटुंबियांची मुस्कटदाबी करण्याचा उद्योग सुरू झाला होता. एकाद्या माशास पाण्याबाहेर काढावें किंवा एकाद्या तळ्यांतील पाणीच नाहींसें करावें म्हणजे मग आंतील जलचरांची जशी तडफड होते, त्याप्रमाणें त्यांची स्थिति झाली. त्यांचा सर्व बाजूनें कोंडमारा सुरू झाला. त्यांचें राजवैभव काढून घेण्यांत आलें. त्यांस कोणत्याही तऱ्हेचें स्वातंत्र्य उरलें नाहीं. प्रत्येक गोष्टीस परवानगीचा लकडा त्यांच्यामागें लागला. पहिल्या तडाक्याला खाजगींतील एक लक्ष पस्तीस हजारांचा ऐवज जप्त करण्यांत आला. मुख्य पैसा हस्तगत केल्या नंतर वाड्यांत कागदपत्र वगैरे किरकोळ गोष्टी अप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर सील बंद करून ठेविल्या होत्या त्यांच्या मोहरा तोडून त्या राणीसाहेबांच्या हवालीं करण्यांत आल्या. नंतर ता. २ ऑक्टोबर १८५० रोजीं तीन प्रहरीं पन्नास स्वारांनिशीं कमिशनरसाहेब, कॉकसनसाहेब, फोर्टसाहेब व पारसाहेब अशी चार साहेबांची चांडाळचौकडी वाड्यांत दाखल झाली आणि तिनें अप्पासाहे बांच्या तीन राण्यांस धाकदपटशा देण्यास सुरुवात केली. राजकुटुंबाचा तनखा बंद करण्यांत आला आणि अमूक एक ठराविक रक्कम तुम्हांस खर्चासाठीं देण्यांत येईल, वाटल्यास स्वीकारा नाहीं तर फार जड जाईल असें त्यांना सांगण्यांत आलें. तेव्हां उत्तर आलें कीं, ‘ तुम्ही सांगाल त्याप्रमाणें आजपर्यंत वागलों. हल्लीं तुम्ही आमच्या माणसांचा बंदोबस्त वगैरे करीत नाहीं. त्यापेक्षां

नेमणूक घेण्यास कारणही नाहीं. येविशीं भयाची बोलणीं बोलले आणि पान-सुपारी न घेतां निघून गेले. गाडींत बसतेवेळीं बक्षीस सांगितलें कीं सर्व मानकरी उद्ईक द्हा वाजतां बंगल्यास घेऊन येणें.'

साहेबाच्या हुकुमाप्रमाणें वाड्यांतील सर्व मानकरी बंगल्यावर गेले. त्याबरोबर साहेब उसळला. त्यानें जरबेनें बोलण्यास प्रारंभ केला. 'तुम्ही आप्त आहांत तेव्हां यादीवर मुकाट्यानें सही करण्यास सांगावें. त्यांत राजमंडळींचें हित आहे. तसेंच तुम्ही वाड्यांत जाऊं नये. पगार व जेवण मिळणार नाहीं. या मानकरी मंडळींत खाशीं खाशीं माणसें होतीं. शिर्के (आईसाहेब यांचे वडील) भाऊ व अशा १४ असामी होत्या. यानंतर या लोकांना सातारा सोडून जाण्याबद्दल सक्ती करण्यांत आली. कांहीं नोकर माणसांना महिना दीड महिना सक्त तुरुंगांत ठेवण्यांत आलें. अशा तऱ्हेनें साहेबानें उग्र स्वरूप धारण करून सर्व बाजूनें मारा सुरू केल्यानें अप्पासाहेबाच्या तीन राण्या व दत्तक पुत्र घाबरून गेला. त्यांना या संकटांतन मुक्त होण्यास मार्ग दिसेना. इनाम कमिशनच्या अधिकाऱ्यांनीं कागदपत्र लांबविले. त्यामुळें राज्य कां खालसा केलें व असा छळवाद कां आरंभिला आहे याचा त्यांस कांहींज उमज पडेना. या प्रकरणाची दाद लावून घ्यावी म्हणून कांहीं धडपड करावी तर त्यांच्याबद्दल कळकळ बाळगणारीं सर्व माणसें सरकारनें दूर केलीं. त्यामुळें नाइलाज झाला. तेव्हां अप्पासाहेबाच्या कुटुंबियांनीं कंपनी सरकारनें देऊं केलेला महिना रु. ५,००० चा तनखा मान्य केला व आपली या जांचांतून मुक्तता करून घेतली.

खालील मंडळींचा तनखा बंद केला :

(१) तानाजीराजे शिर्के, (२) लक्ष्मणराव राजे शिर्के (३) रघुनाथ-राव शिर्के (४) बहिर्जी राजे शिर्के (५) चिटकोजी राजे शिर्के (६) गोपा-ळजी राजे शिर्के (७) गोविंदराव राजे शिर्के (९) लक्ष्मणजी राजे शिर्के (१०) मुनाजी राजे शिर्के (११) सोनाजी राजे शिर्के.

पुढील लोकांस सातारा शहर सोडून जाण्याचा हुकूम फर्माविला :

(१) सखाराम बल्लाळ महाजनी कारभारी (२) वासुदेव कृष्ण महाजनी चिटणीस (३) बाळ जोशी (४) गणेश चिंतामण महाजनी (५) विष्णु गणेश

महाजनी (६) वामनराव विठ्ठल फडणवीस. (७) पुरुषोत्तम नारायण (८) बाळाजी रघुनाथ (९) रामचंद्र विश्वनाथ (१०) विनायक नीळकंठ (११) पांडू सकपाल हुजऱ्या (१२) महादू शिंदा हुजऱ्या (१३) खंडू शिर्का आणि (१४) संजीना शिर्का.

कंपनी सरकारच्या बहाल मर्जीतील अप्पासाहेब हा निवर्तल्याबरोबर त्याच्या कुटुंबियांची वासलात कशी लाविली गेली हें सांगितल्यानंतर काशीस प्रतापसिंह महाराजांच्या कुटुंबाची काय अवस्था होती तें सांगणें क्रमप्राप्त आहे. तेथें सुद्धां हाच नमुना चालू होता. त्याची कल्पना खालीं दिलेल्या प्रतापसिंहाच्या राणीच्या पत्रावरून येईल.

‘ प्रतापसिंह महाराज निजधामास गेल्यास आज दोन वर्षांपेक्षां जास्त दिवस झाले. तरी कंपनी सरकार माझी कांहींच दाद घेत नाहीं. महाराजांनीं मरणापूर्वीं एकच दिवस म्हणजे ता. १३–१०–१८४७ ला कंपनी सरकारला एक पत्र लिहून त्यांत त्यांस देण्यांत येत असलेला मासिक तनखा आपल्या मुलाच्या नांवानें चालवावा आणि माझी व्यवस्थाही पण पूर्वींप्रमाणेंच आमच्या खटल्याचा निकाल लागेतोंपर्यंत ठेवावी अशी विनंति केली होती.

‘ १८४७ च्या नोव्हेंबरमध्यें सरकारास पुन्हां एकदां मीं पत्रद्वारें स्मरण दिलें. त्याबरोबर पत्र न मिळाल्याचा बहाणा करण्यांत आला व मला मेजर मंक जॉर्ज यांच्यामार्फत तोंडी असें कळविण्यांत आलें कीं, माझा तनखा दरमहा ८०० रुपये, तसेंच माझ्या मुलासाठीं २,५०० रुपये याप्रमाणें ३,३०० रुपये तनखा देण्यांत येईल. हें भाषण ऐकून मीं चकीतच झालें. कारण महाराजांचे वेळीं दहा हजार रुपये तनखा मिळून सुद्धां आमचें कसेंबसें भागत होतें. तेव्हां आतां मिळणाऱ्या ३,३०० रुपयांत माझें कसें भागणार याचा सरकारनेंच विचार करावा ! (प्रतापसिंहाच्या बरोबर साताऱ्याहून १२०० मंडळी गेलीं होती.— तेव्हां राणीचें म्हणणें अक्षरशः खरें होतें.)

‘ माझें हें म्हणणें कंपनी सरकारास कळविण्यांत आलें तेव्हां मला उलट असें सांगण्यांत आलें कीं, तुम्हांस हवा असल्यास ८०० रुपये तनखा घ्या. महाराजांनीं पुष्कळ पैसा सांठवून ठेविला आहे. हा निरोप ऐकून मी स्तंभितच

झालें व मला चीडही आली. तेव्हां मीं सरकारास तोंडींच असें उत्तर दिलें कीं, महाराजांनीं पुष्कळ पैसा ठेविला आहे हा केवळ भ्रम आहे. माझे शत्रू मला कसे छळीत आहेत याची कहाणी आतां महशूर आहे. ती सांगण्याची जरुरी नाहीं. माझ्या वाड्यावर असलेले लोक अशा चमत्कारिक कंड्या उठवितात व असल्या भ्रामक बातम्या सरकारांत देतात. माझ्या मुलींत व माझ्यांत सध्यां तेढ उत्पन्न करण्यांत आली असून मुलीच्या बाजूकडील मंडळी असल्या खोट्या बातम्या सरकारास देत असतील. तरी त्यांनीं त्यावर विश्वास ठेवूं नये. या बाबतींत त्यांस खात्रीच करून द्यावयाची असेल तर मी एका नेसलया वस्त्रानिशीं वाड्याबाहेर जाऊन उभी राहतें व सरकारनें सर्व वाड्याची झडती घेऊन आपली खात्री करावी. त्याला माझी हरकत नाहीं. उगाच साप साप म्हणून भुई बडवूं नये एवढीच विनंति आहे.'

या उत्तराचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं. 'महाराजांच्या उत्तरक्रियेकरितां म्हणून ५० हजार रुपये देण्यांत आले. त्याबरोबरच माझ्या मासिक नेमणुकीचे ८०० रुपये आले होते. मी माझ्या नेमणुकीचे ८०० रुपये नाकारले व ५० हजार रुपये घेऊन महाराजांच्या उत्तरक्रियेकरितां काढलेलें महाजनांचें कर्ज देऊन टाकिलें.'

या अर्जांतच राणीनें साताऱ्यास जाऊन राहण्याची परवानगी मागितली होती. बकासुराप्रमाणें हिंदी संस्थानिकांचीं संस्थानें घशांत टाकणाऱ्या डलहौसीची कारकीर्द या वेळीं चालू होती. तेव्हां राणीच्या या अर्जाची कोणत्या तऱ्हेनें वासलात लागली असेल हें आतां लक्षांत येईल. प्रतापसिंहानें घेतलेला दत्तकपुत्र शाहु यानेंही गव्हर्नर जनरलला खालीलप्रमाणें अर्ज केला होता.

'प्रतापसिंह महाराजांनीं आमच्या हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें मला दत्तक घेतलें आहे. या गोष्टीस आमच्या वंशांत दाखले आहेत. तसेंच प्रतापसिंह महाराजांनीं माझ्या दत्तविधानाची सर्व हकीगत गव्हर्नर जनरलचे एजन्ट येथील त्या वेळचे कारपेन्टर यांच्या मार्फत कंपनी सरकारास कळविली आहे.

'माझ्या दत्तविधानानंतर दोन वर्षांनीं छत्रपति प्रतापसिंह महाराज निधन पावले व लगेच सहा महिन्यांनीं साताऱ्यास राज्य करणारे शहाजी राजे हेही

निवर्तले. तेव्हां कंपनी सरकारनें निर्माण केलेल्या साताऱ्च्या गादीस कोणीही वारस नाहीं म्हणून ती खालसा करण्यांत येत आहे, असा निर्णय दिला. पण मी आतां असें जाहीर करूं इच्छितों कीं, मीं 'साताऱ्च्या गादीस वारस आहें.' मला प्रतापसिंह महाराजांनीं दत्तक घेतलें आहे. याशिवाय महाराजांचा दत्तकपुत्र म्हणून जरी आपणांस माझा हक्क मान्य नसेल तरी चिंता नाही. मी महाराजांचा पुतण्या लागतों. म्हणून साताऱ्च्या गादीवर माझा वारसा हक्क आहे व तो आपण १८१९ च्या तहान्वयें मान्य करावा.

'माझ्या मातोश्रींनेंही आपणांस खाजगी खर्चवेंचासंबंधीं आमचे कसे हाल होत आहेत याची कल्पना देणारें एक पत्र धाडिलें आहे. तरी त्याचा सुद्धां योग्य तो विचार करावा.

'इंग्रज सरकारची न्यायी म्हणून कीर्ति मशहूर आहे, तरी त्या बाबतींत मी आणि माझी आई, आम्ही दोघेंच अपवाद ठरूं नये.'

काशीस राणीवर देखरेख करणारा एजंट त्या वेळपर्यंतचा स्वभावानें गोड व सभ्य होता व त्यास साताऱ्च्या राजाबद्दल सहानुभूति वाटत असल्यामुळें तो वेळच्या वेळीं त्यांचीं पत्रें गव्हर्नर जनरलकडे धाडीत असे. आतां तो बदलून त्या जागीं इरसाल अँग्लो-इंडियन वृत्तीचा स्टुअर्ट नांवाचा एक तिरसट एजन्ट आला होता. त्यास या साताऱ्च्या छोट्या राजाबद्दल व राणीबद्दल थोडासुद्धां आदर वा अनुकंपा वाटत नव्हती. म्हणून त्यानें शाहूचें हें पत्र गव्हनर जनरलकडे धाडण्याचें नाकारलें. तेव्हां शाहूनें स्वतःच तें पत्र गव्हर्नर जनरल डलहौसीकडे धाडिलें; पण त्यास ठरल्याप्रमाणें कचऱ्याची पेटी दाखविण्यांत आली. यानंतर इंग्लंडला या मायलेंकरांनीं आपली हकीगत कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना कळविली तरी त्याचा उपयोग झाला नाहीं.

गव्हर्नर जनरल व कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांच्यामध्यें साताऱ्यासंबंधीं परस्पर पत्रव्यवहार चालू होता. साताऱ्च्या राजासंबंधीं काय धोरण ठेवावयाचें व काय करावयाचें याबद्दल निश्चित असें कांहींच ठरलें नव्हतें. म्हणून कोर्ट ऑफ

डायरेक्टर्स व गव्हर्नर जनरल मुखस्तंभासारखे स्तब्ध होते. हिंदुस्थान सरकारनें कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना पत्र लिहिलें होतें, तें असें:

' राणीनें, आपला तनखा वाढवावा व सातान्यास जाऊन राहण्याची परवानगी द्यावी म्हणून लिहिलें आहे. मुलगा स्वतःस राजा म्हणवितो व तसें त्यानें अर्जांतही लिहिलें आहे व या दोन्ही अर्जांस अजून उत्तरें गेलीं नाहींत. ग. ज. ची स्वारी मुंबईस असतांना त्यांच्या कानांवर या गोष्टी घालण्यांत आल्या होत्या.

'राजपुत्र व त्याची आई यांपैकीं कोणासही सातान्यास जाऊन राहण्याची परवानगी देण्यास मुंबई सरकार तयार नाहीं. हिंदुस्थान सरकारनें सातारच्या दत्तकपुत्रास शोभेसाच तनखा तोडून दिला होता. तसेंच त्याचें राणीच्या संबंधींचेंही धोरण पूर्ण औदार्याचें आहे. राजेसाहेबांची बाकी चुकती करण्याबद्दल आपणांकडून कळविण्यांत आलें त्यावरून आपलें धोरण याबाबतींत उदार आहे; पण तसें करण्याचें आतां कांहींच कारण नाहीं. राज्यावर त्यांचा कांहीं एक हक्क उरत नाहीं.

हिंदुस्थान सरकारनें प्रतापसिंह महाराजांच्या मुलास राजा म्हणून तनखा तोडून देणें फारच धोक्याचें आहे. कारण तसें केल्यास राजपुत्र त्याच्या ताब्यांतील राज्याची मागणी करील; पण तें सर्व राज्य कंपनी सरकारनें खालसा केलें असून त्याच्यावर राजपुत्राचा कोणत्याही तऱ्हेचा हक्क नाहीं आणि याच मुद्यावर राणीसही राणी म्हणून तनखा वाढविण्याचें कारण नाहीं.

' आम्ही राणीस १,२०० रुपये पेन्शन देण्यास तयार आहोंत. तसेंच राणी जिवंत असेंतों मुलांसही पेन्शन देण्यास कांहीं एक हरकत नाहीं.

' राणी व राजपुत्र दोघेंही राजचिन्हें व राज्य यावरील सर्व हक्क सोडून देण्यास तयार असतील तरच त्यांस वरील सवलती द्याव्या अशी हिं. सरकारची शिफारस आहे. '

या पत्रास कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडून खालीलप्रमाणें उत्तर १० जुलै १८५० ला आलें:—

'मागें देऊं केलेला ८०० रुपयांचा तनखा राणी मान्य करीत नसल्या-कारणानें १,२०० रुपये तनखा देण्यांत यावा.

यानंतर राणी व राजपुत्र या उभयतांनीं आपलीं सर्व राजचिन्हें व राज्यावरील हक्क सोडल्यास तुम्हीं त्यांना पत्रीं लिहिलेल्या सवलती देणार असें म्हणतां, पण या बाबतींत आमचें मत असें कीं, त्यांना राजचिन्हें वगैरेंचा त्याग करावयास सांगणें म्हणजे नसत्या गोष्टीस महत्त्व देण्यासारखें आहे. तरी त्यांनीं राज्याचा बदोबा लिहून दिल्यानंतर मग खाजगी तऱ्हेनें ते स्वतःस कांहींही म्हणोत त्याच्याशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. कंपनी सरकारनें मात्र सर्व व्यवहार त्यांस सामान्य गृहस्थ समजून करावा.

'राणीस व राजपुत्रास साताऱ्यास जाऊं देऊं नये असें आपलें मत आहे. पण आम्हांस तसें वाटत नाहीं. त्यांना व त्यांच्या इतर परिवाराला खुशाल साताऱ्यास जाण्याची परवानगी द्यावी. यापुढें त्यांस काशीस ठेवण्यांत कांहींच तथ्य नाहीं.'

अशा अर्थाचें कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचें उत्तर हिं. सरकारास आलें. प्रतापसिंह महाराजांनंतर तीन वर्षें नुसते खलिते जाणें व त्यांचीं उत्तरें येणें यांतच निघून गेलीं. या अवधींत साताऱ्च्या राणीस खर्चासाठीं एक दमडीही देण्यांत आली नाहीं. तेव्हां बिचारी टेंकीस आली. एवढ्या मोठ्या लव्याजम्याचा खर्च चालविणें फार मुष्किलीचें झालें. सावकारांचे तगादे एकसारखे सुरू झाल्या-मुळें राणीस अन्नान्नदशा आली. नवरा मेलेला, जवळ कळकळीनें काम करणारा मनुष्य नाहीं. एक कायतो रंगो बापूजी. पण तो सुद्धां सातासमुद्रापलीकडे इंग्लंडांत. इंग्रज सरकार तर सत्त्व पाहाण्यास विश्वामित्रासारखें हात धुवून पाठीस लागलेलें. तेव्हां या पेंचांतून कसें बाहेर पडावें हेंच त्या बिचारीस समजेना. अशा ऐन आणीबाणीच्या वेळीं बाळाजीपंत नातूची स्वारी हजर झाली. त्यानें राणी व राजकन्या यांच्यामध्यें भांडणें लावून देण्याचा उपक्रम सुरू केला. राज्यकन्येच्या सांगण्यावरून राणीजवळ पैसा भरपूर आहे असें खोटेंच सरकारांत कळविण्यांत आलें. या बातमीनें आधींच उदार हातानें मदत करणारें सरकार जास्तच चेकाळलें! ८०० रुपयांवर पोटगी म्हणून एक पैही मिळणार नाहीं असें उत्तर कंपनी सरकारनें दिलें. सर्व बाजूंनीं अशी केंविलवाणी स्थिती झाली

असतांनासुद्धां प्रतापसिंहाच्या मागें तीन वर्षें तिनें कशीं तरी रेटलीं. पण शेवटीं अगदीं टेंकीस आली व बिचारीस मुठींत नाक धरून इंग्रजांस शरण जाण्याचा प्रसंग आला.

बाळाजीपंत नातूची स्वारी वेळेवर हजर झाली व त्यानें राणीस असें सुचविलें कीं, आपण राज्याचा बदोआ लिहून देण्यास तयार असाल, तसेंच रंगो बापूजीस इंग्लंडमधील सर्व चळवळ सोडून देऊन माघारीं बोलावण्याचा हुकूम कराल तर मी कंपनी सरकाराकडून तुम्हांस तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें नेमणूक करून देईन. उगाच हट्टास पेटून स्वतःचा नाश करून घेऊं नका. हा बाळाजी-पंताचा विचार राणीस निरुपायानें स्वीकारावा लागला. व तिनें राज्याचा बदोआ लिहून दिला, व रंगो बापूजीसही माघारीं बोलाविलें.

यानंतर राणी स्वतःचा तनखा ६० हजार रुपयांचा मागत होती. पण तें सुद्धां कंपनी सरकारनें नाकारलें व सालीना ३० हजार रुपयांची नेमणूक करून देण्यांत आली. यानंतर या सर्व मंडळींस साताऱ्यास जाण्याची परवानगी मिळाली. तेव्हां प्रतापसिंह महाराजांची दुसरी स्त्री माईसाहेब व दत्तकपुत्र शाहू राजे हीं दोघें ता. ३।७।१८५४ रोजीं साताऱ्यास कृष्णातीरीं येऊन दाखल झालीं. तेव्हां साताऱ्याहून कै. अप्पासाहेब ऊर्फ शहाजी राजे यांची स्त्री सगुणाबाई व दत्तकपुत्र व्यंकोजी राजे हे त्यांस सामोरे गेले. नंतर परस्परांच्या भेटी झाल्या व मग साताऱ्यास येऊन स्वाऱ्या जुन्या राजवाड्यांत दाखल झाल्या. अशा तऱ्हेनें या वृक्षहीन वेलींची भेट झाली. त्या वेळीं उभयतां राण्यांस मनस्वी दुःख झालें.

दत्तकांची वासलात : ३८

ब्रिटिश न्यायमंदिरांतून आपणांस न्याय मिळेल, ब्रिटिश न्यायमंदिरांतून आपणांस न्याय मिळेल म्हणून एकसारखी आशा करीत बसलेला प्रतापसिंह मृगजलामागें धांवणाऱ्या हरणाप्रमाणें हताश होऊन मरण पावला. त्याच्यानंतर फक्त सहा महिन्यांनींच राजतृष्णेच्या पायीं सख्ख्या भावाचा घात करणारा अप्पासाहेबही पण दुनियेपार झाला. हे दोघेही बंधू असे दुर्दैवी कीं त्यांच्या पोटीं औरस संतान नव्हतें. प्रतापसिंहानें सेनापति बाळासाहेबाचा मुलगा दत्तक घेतला तर, अप्पासाहेबानेंही पण शेडगांवकर भोंसल्यांपैकीं एक मुलगा दत्तक घेऊन गादीस वारस निर्माण करून ठेवला. मृत माणसाविषयींचे रागलोभ त्याच्या-बरोबरच नाहींसे झाले असें मानून चालणाऱ्या आर्य संस्कृतीचा इंग्रज नव्हता. तो या दोघांही दत्तकांची वासलात लावून सातारचें राज्य घशांत टाकणार होता.

राज्यास कायदेशीर वारस नाहीं आणि दत्तक आम्हांस मान्य नाहीं, या सबबीवर संस्थानें घशांत टाकून आपला राज्यविस्तार वाढविण्याचा नवीन बूट लॉर्ड ऑक्लंड गव्हर्नर जनरल असतांना निघाला होता. या नवीन धोरणासंबंधीं आपआपलीं मतें व प्रांताप्रांतांची माहिती मागविण्यांत आली असतां मुंबईचा गव्हर्नर कारनॅक आपलें मत व प्रांताची माहिती धाडतांना फारच खुश झाला. त्यानें असें नमूद केलें कीं, सातारच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या माजी व विद्यमान

या दोन्ही राजांस औरस पुत्र नाहीं आणि त्यांचीं उतारवयें लक्षांत घेतां त्यांस पुत्र होण्याचा संभव फारच कमी आहे. तेव्हां त्यांच्या पश्चात सातारची गादी आपणांस खालसा करतां येईल. त्यांनीं दोघांनीं हिंदु चालीरीतीप्रमाणें दत्तक घेऊन गादीस वारस निर्माण केलाच तर त्यांचा हक्क मानणें अथवा धुडकावून लावणें हें सर्वस्वीं कंपनी सरकाराच्या अखत्यारींत राहील.' सातारच्या गादी-संबंधीं गव्हर्नरनें मारलेल्या या शेऱ्यावरून सातारची गादी खालसा करण्याकडेच कंपनी सरकारचा कल होता, हें स्पष्ट होतें.

अप्पासाहेबास गादीवर बसवितांना त्याच्याकडून सुद्धां १८१९ चा तह मान्य करून घेण्यांत आला होता; तेव्हां तो तहनामा पाळण्याची जबाबदारी उभयतांवर सारखीच होती. सातारकरानें मात्र तहाच्या अटींप्रमाणें वागावयाचें व कंपनी सरकारनें मात्र तिरस्मारखानी वृत्तीनें चालावयाचें असा त्याचा अर्थ बिलकूल नव्हता. इ. स. १८१९ च्या तहनाम्याचें पहिलेंच कलम असें आहे कीं, 'इंग्रज सरकार सातारचे वंशज वारस यांच्याशीं असा तह करतें कीं—' तेव्हां फक्त प्रतापसिंह व अप्पासाहेब यांच्याशींच इंग्रज तहनाम्यानें बांधले गेले होते जसें मुळींच नाहीं, तर तो करार त्यांनीं त्यांच्या वंशजांशीं सुद्धां केला होता. पण या सर्व गोष्टींना धाब्यावर बसवून सातारचें राज्य गट्ट करण्याचा कृतनिश्चय कंपनी सरकारनें केला आणि त्यानें आपली चाल तशीच चालू ठेविली.

या दत्तक—प्रकरणीं मुख्य तीन मुद्यांवर वाटाघाट चालू होती. (१) शहाजी राजांनीं (अप्पासाहेबानें) ब्रिटिश सरकारच्या संमतिवांचून केलेलें दत्तविधान कायदेशीर मानावें कीं नाहीं. (२) तें कायदेशीर धरलें तर मुंबई सरकारास न्यायाच्या किंवा जरुरीच्या दृष्टीनें तें मान्य करण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं. (३) प्रतापसिंहाच्या दत्तकाचे व शहाजी राजे (अप्पासाहेब) यांच्या दत्तकाचे हक्क काय आहेत. शहाजी राजे ऊर्फ अप्पासाहेब यांनीं केलेलें दत्तविधान त्याच्या खाजगी जिंदगीपुरतें कायदेशीर आहे याबद्दल कोणाही मुत्सद्यांचें दुमत नव्हतें. पण हें दत्तविधान इ. स. १८१९ च्या तहाप्रमाणें

राज्याधिकार चालविण्यास योग्य आहे किंवा नाहीं याबद्दल दुमत होतें. आणि याबद्दल जो तो आपली अक्कल चालवून त्यांतून पळवाटा काढत होता.

त्यांनें घेतलेला दत्तक हा कंपनी सरकारच्या परवानगीनें घेतला नाहीं सबब त्यास मान्यता देऊं नये व गादीस कायदेशीर वारस समजूं नये, ह्या म्हणण्यांत कांहींच अर्थ नव्हता. कारण अप्पासाहेबानें दत्तकाबद्दल परवानगी विचारली असतां त्याचा तांतडीनें विचार हेतुपुरःस्सर झाला नाहीं. शेवटीं सुद्धां फ्रियर साहेबानें दत्तकाची परवानगी आणावी म्हणून अप्पासाहेबानें त्यास महाबळेश्वरीं गव्हर्नराकडे धाडिलें; पण तो माघारीं येण्याच्या आंतच अप्पासाहेब मरणासन्न झाला व त्यास फ्रियरच्या पश्चात दत्तक घेणें भाग पडलें. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतां साहेबानें या गोष्टीची टाळाटाळ मुद्दाम हेतुपुरःस्सर केली असें स्वच्छ दिसतें. तेव्हां हा मुद्दा अगदीं गैरलागू आहे. सत्याची चाड असणारा कोणीही मनुष्य याबद्दल काय म्हणेल याचा नमुना म्हणून सर जॉर्ज क्लार्क यांचें म्हणणें पाहण्यासारखें आहे.

अप्पासाहेबानें केलेलें दत्तविधान कायदेशीर आहे कीं नाहीं याबद्दल सर जॉर्ज क्लार्कना शंकाच येत नाहीं. तें हिंदु कायद्याप्रमाणें व धर्माप्रमाणें ग्राह्य मानून तो दत्तकमुलगा राजाच्या खाजगी जिनगीस पूर्ण वारस आहे असें आपलें मत त्यांनीं ठांसून नमूद केलें आहे. आणि नंतर ते पुढें म्हणतात, ‘ या घराण्यांत पूर्वीं दत्तक घेण्याचा प्रसंग आला तेव्हां परवानगी देण्याघेण्याचा प्रश्नच नव्हता. कारण त्या वेळीं हें राज्य स्वतंत्र होतें. पण आतां तशी परिस्थिति नाहीं. शिवाजी महाराजांचें राज्य पेशव्यांच्या राज्याबरोबरच नाहींसें झालें. आजचें सातारचें राज्य कंपनी सरकारशीं झालेल्या स. १८१९ च्या तहानें अस्तित्वांत आलें आणि त्यावेळीं जो तह झाला त्या तहांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, त्या वेळचे महाराज व त्यांच्या मागून गादीवर येणारा प्रत्येक वारस यांशीं कंपनी सरकार आपला संबंध सलोख्याचा ठेवील. या अटीप्रमाणें कंपनी सरकार महाराजांशीं व त्यांच्या वारसांशीं सलोख्यानें वागण्यास बांधलें गेलें आहे. तेव्हां महाराजांच्या गादीस जो कोणी लायक वारस असेल त्यास मान्यता देणें हें कंपनी सरकारचें कर्तव्य आहे. त्याप्रमाणें सातारचे शहाजी राजे यांनीं दत्तक

घेतला असून तो हिंदु चालीरीतीप्रमाणें व कायद्याप्रमाणें वारस आहे. तेव्हां त्यास कंपनी सरकारनें मान्यता द्यावी हेंच योग्य.

' येथील मांडलिकांनीं दत्तक घेण्यापूर्वीं सार्वभौम सरकारची परवानगी घ्यावी असा दंडक निर्माण करण्यांत सार्वभौम सरकारचा हेतु सोज्ज्वल आहे. तक्तनशीन राजा निपुत्रिक असला तर मागें वारसाबद्दल तंटा अथवा रक्तपात न व्हावा म्हणून सार्वभौम सरकारच्या परवानगीची प्रथा पाडण्यांत आली आहे. तसेंच साताराचे छत्रपति शहाजी राजे ऊर्फ अप्पासाहेब यांच्या पश्चात त्यांचें राज्य सरकारजमा होण्याचा संभव आहे कीं काय याबद्दल कोर्ट ऑफ डायरेक्टर्समध्यें स. १८४० मध्यें चर्चा झाली असतां खुद्द चेअरमननींच असे उद्गार काढिले आहेत कीं, सातारा संस्थान वंशपरंपरागत चालणारें असून महाराजांस दत्तक घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. दत्तक-प्रकरण आज नव्यानें निर्माण झालें आहे असें नाहीं. स. १८२७ सालीं दौलतराव शिंदे वारले त्या वेळीं त्यांनीं दत्तक तर घेतला नाहींच; पण आपल्या मागें आपला वारस कोण असावा याबद्दल साधी इच्छा सुद्धां प्रदर्शित केली नाहीं. असें असतांना सुद्धां त्यांच्या कुटुंबास दत्तकाची परवानगी देण्यांत आली. पंतसचिव, फलटणचे निंबाळकर, जतचे डफळे वगैरे जहागिरदारांना दत्तकाची परवानगी स. १८१९ नंतर देण्यांत आली आहे. परवानग्या देतांना ज्या गोष्टींचा व कारणांचा विचार करण्यांत आला त्या सर्व गोष्टींचा साकल्यानें विचार करतां सातारकर छत्रपतींचा मुद्दा जास्तच जोरानें सिद्ध होतो.

' प्रांतांत शांतता आणि सुव्यवस्था राहावी हा हेतु हीं संस्थानें निर्माण करण्यांत एल्फिन्स्टनचा होता. त्या दृष्टीनें विचार करतां साताऱ्यासारखीं संस्थानें म्हणजे ब्रिटिश सरकारचे मोठाले आधारस्तंभ होत. साताराच्या राज्यासंबंधीं विचार करतां माजी महाराजांच्या वतीनें चळवळ होऊन जो त्रास झाला तो सोडला तर या प्रांतांत शांतता व सुरक्षितता नांदण्यासाठीं सातारकरांचा फारच उपयोग झाला आहे. भोसल्यांच्या घराण्यांत यापूर्वीं कोल्हापूर, त्रावणकोर, आणि सातारा या तिन्ही शाखांत दत्तविधान होऊन राज्य चालू राहिलें आहे. साताराच्या अप्पासाहेबांना औरसपुत्र असता तर हा प्रश्नच निर्माण झाला

नसता. पण दत्तकपुत्र हा सर्व ठिकाणीं औरस पुत्राच्या जागींच मानला जातो तेव्हां त्याच्याकडे औरसपुत्राचे सर्व हक्क चालू राहणें हेंच न्यायाचें आहे.

'आपण ताब्यांत घेतलेले मुलूख जेव्हां पुन्हां जुन्या राजघराण्यांच्या ताब्यांत देण्यांत येतात त्या वेळीं त्यांच्याशीं जे करार होतात ते तर आपण पाळले पाहिजेतच. याशिवाय हे सर्व करार-मदार होतांना आपण त्यांचे जे समज करून दिलेले असतात त्यांस कोणत्याही तऱ्हेचा बाध न येईल अशा तऱ्हेनें वागणें हेंच नीतिदृष्ट्या युक्त आहे. तहांत जर 'निरंतर' शब्द असेल तर त्याच्या वारसाशीं त्याजकडून तसें योग्य कारण घडेपर्यंत तहांतील अटी-प्रमाणें वागणें हेंच ब्रिटिश सरकारचें कर्तव्य आहे. पण शब्दांची ओढाताण करून त्यांतून आपणांस पाहिजे तसा अर्थ निर्माण करणें किंवा तहांतील संदिग्ध-तेचा फायदा घेऊन राज्यें खालसा करणें योग्य होणार नाहीं. सातारचें राज्य खालसा करणें हें आपल्या एकंदर राजकीय कारभाराच्या दृष्टीनें जरी आज फायद्याचें वाटत असलें तरी आपण आपली न्यायदृष्टि शाबूत ठेवणेंच योग्य होईल. डेक्कन आणि दक्षिण मराठा प्रांत या प्रांतांना जोडणारा सातारा प्रांत हा एक महत्त्वाचा दुवा आहे; पण हा दुवा अन्यायानें ताब्यांत घेण्यापेक्षां सातारकर छत्रपतींचा दुवा घेणेंच अधिक न्यायाचें आहे. छत्रपतींकडून कोणत्याही प्रकारची आगळीक न झाल्या कारणानें आपण केलेला तह प्रामाणिकपणें पाळणें हेंच योग्य आहे.

'कंपनी सरकारनें या देशांत केलेल्या अनेक तहांचा जर कोणता गुण-विशेष असेल तर संदिग्धपणा. पण त्याचा फायदा घेऊन आपण जर राज्यें खालसा करण्याचा तडाका सुरू केला तर त्याचे परिणाम भोगण्याचा प्रसंग आपणांवर झाल्यावांचून राहणार नाहीं. पण सातारकरांच्या तहाच्या अटी पाहतां त्यांत संदिग्धपणा कोठेंच नाहीं. त्यांतील अटी अत्यंत स्पष्ट आहेत. त्यांत कांहीं शंका असलीच तर तो तह करणारे मि. एल्फिन्स्टन व ग्रँट डफ यांस विचारून त्या शंकांचें निरसन करून घ्यावें. व हा प्रश्न एकदां कायमचा निकालांत काढावा. हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यासंबंधींचें आपलें धोरण अत्यंत थिल्लर-पणाचें झालें आहे. त्याला कोणताच धरबंद उरलेला नाहीं. तेव्हां संस्थानिकां-

संबंधीं कोणतें धोरण ठेवावें याचा निकाल जाहीरपणें लावावा म्हणजे उभयपक्षीं फार चांगलें होईल; व पुन्हां घोळ निर्माण होणार नाहीं.'

या दत्तक–प्रकरणीं सर जॉर्ज क्लार्क यांचें भाष्यच फक्त न्यायास धरून आहे. बाकीच्या सर्वांनीं या बाबतींत मोठें तर्ककर्कश असें तर्कट रचलें आहे. एकेकांनीं एक हात लांकडाची नऊ हात ढलपी काढिली आहे, तर कांहीं-कांहींनीं आपल्या स्वार्थी अकलेचे तारे तोडले आहेत. त्यांपैकीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचे प्रमुख सभासद लॉर्ड हॉब्हाऊस यांना प्रतापसिंह महाराज निवर्तल्याची बातमी लागली तेव्हां आसुरी आनंद झाला आणि ते म्हणाले कीं, 'सातारचे माजी पदभ्रष्ट महाराज मृत्यु पावले ही इष्टापत्ति अत्यंत योग्य वेळीं घडून आली. कारण सातारच्या गादीवरील विद्यमान महाराजांची प्रकृति ढांसळल्याचें ऐकतों. तेव्हां त्यांचें दरेंवाईट झाल्यास या प्रांताचा कायमचा बंदोबस्त करण्याचा प्रसंग लौकरच येईल. तसें झाल्यास या सातारच्या गादीस दत्तकाची परवानगी देऊं नये, व त्यांचा मुलूख आपल्या राज्यांत सामील करून टाकावा. हें करण्याचें माझ्या हातीं राहील तर ही गोष्ट मी हरप्रयत्नानें घडवून आणीन.'

लॉर्ड हॉब्हाऊसनंतर अनेक वीरांनीं आपल्या लेखण्या व अक्कल या कामीं खर्च केली आहे. मि. रीड व विलोबी यांची पत्रकें पाहण्यासारखीं आहेत. मि. रीड आपल्या पत्रकांत म्हणतात, 'माजी महाराजांना औरस असा वारस कोणीच नसल्याकारणानें हा दत्तकाचा मोठा भानगडीचा प्रश्न निर्माण झाला आहे. बोर्डाच्या सन्माननीय अध्यक्षांनीं असें मत दिलें आहे कीं, मृत्यूपूर्वीं थोडा वेळ महाराजांनीं शेडगांवकर घराण्यांतील जो दत्तक घेतला आहे त्याचा वारसा हक्क मान्य करून त्याकडे गादी चालवावी. पण मला तसें वाटत नाहीं. सार्वभौम सरकारच्या संमतीशिवाय घेतल्या जाणाऱ्या दत्तकास गादीचा वारसा हक्क मिळत नाहीं. या प्रश्नाचा विचार करतांना येथील विशिष्ट परिस्थितीचा विचार प्रामुख्यानें केला पाहिजे. प्रस्तुत घराण्याच्या धार्मिक रूढीप्रमाणें पाहिलें तरी विशिष्ट सत्तेची मंजुरी मिळाल्याशिवाय तें दत्तविधान ग्राह्य मानतां येत नाहीं. एकदां, सार्वभौम सत्तेची मंजुरी पाहिजे हें तत्त्व मान्य केल्यानंतर मग त्या मंजुरीची

नामंजुरीही मान्य करणें क्रमप्राप्त येतें. ज्याला मंजुरी देण्याचा अधिकार आहे त्याला नामंजुरी देण्याचाही पण तितकाच अधिकार आहे. जो बहाली करील तो बडतर्फीही करील. आज हिंदुस्थानांत ब्रिटिशांची सत्ता ही सार्वभौम सत्ता आहे. तिनें केवळ स्वेच्छेनें हें मांडलिक राज्य निर्माण केलें आहे. सातारसारखीं राज्यें किंवा जहागिरी या एका व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या मिराशी मानणें हें योग्य होणार नाहीं. तेव्हां खाजगी जिनगीस लागू असणारा वारसा हक्काचा कायदा या ठिकाणीं लागू करून चालणार नाहीं.

'१८१९ चा तह फक्त प्रतापसिंह महाराजांशींच करण्यांत आला आहे. त्यांच्या पूर्वजांशीं किंवा इतर वंशजांशीं आम्ही कोणत्याही तऱ्हेनें बांधले गेलों नाहीं. महाराजांचे पणजे केळोजी बाबाजी यांच्या नातेवाईकांची तरतूद त्यांत नाहीं. त्यांनीं फार झालें तर 'सातारचे राजे' या शाब्दिक पदवीचा हक्क खुशाल गाजवावा; पण प्रतापसिंहास तोडून दिलेल्या प्रांतांत त्यांना कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं. १८१९ च्या तहानें प्रतापसिंहास दिलेले फायदे व हक्क आपण त्यांच्या बंधूंना दिले इतकेंच. इतर कांहीं जणांचीं दत्तविधानें आपण मंजूर केलीं म्हणून सातारकरांचे दत्तक मान्य केले पाहिजेत या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. शिंदे–होळकरांचे दत्तक आम्हीं मंजूर केले पण कोणत्या परिस्थितींत केले, त्यांना मंजुरी देण्यास कोणतीं कारणें झालीं हें नीटपणें समजण्यास आज साधन नाहीं. या प्रांतांत कांहीं दत्तकांना आपण मंजुरी दिली आणि कांहींना दिली नाहीं. या मंजुरी नामंजुरीला कांहीं अनुस्यूत कारण-परंपरा आहे. तेव्हां प्रत्येक वेळीं दत्तकाला परवानगी द्यावयाची कीं नाहीं हा आपला हक्क आपण अबाधितपणें चालू ठेविला पाहिजे, असें माझें स्पष्ट मत आहे. तसेंच प्रत्येक दत्तकास मंजुरी द्यावयाची असें ठरल्यास मोठाच अनवस्था प्रसंग ओढवेल. किती तरी गोष्टी बदलाव्या लागतील. दक्षिण महाराष्ट्रांत किती तरी जहागिऱ्यांची पुन्हां स्थापना करावी लागेल.

'सातारच्या गादीसंबंधीं आणखी एक गोड सबब पुढें आणण्यांत येते. ती म्हणजे या प्रांतांत शांतता राखण्यास सातारकरांचा उपयोग होईल. पण यांत फारसें स्वारस्य नाहीं. मागें कोल्हापुरास भानगडी झाल्या त्या वेळीं सातार-

करांचा उपयोग झाला हें जरी घटकाभर खरें मानलें तरी कोल्हापूरजवळ असणाऱ्या बेळगांव, धारवाड या जिल्ह्यांतूनही साताऱ्याइतकीच शांतता होती. सातारा हा इंग्रज सरकारच्या राज्यापैकीं एक भाग असता तरी तितकीच शांतता राहिली असती. उलट साताराच्या महाराजांनीं त्यावेळीं धामधूम करण्याचें मनांत आणलें असतें तर तें त्यांना शक्य होतें. ही गोष्ट त्यांना इंग्रज सरकारच्या डोक्यांत धूळ टाकून सफाईदारपणें करतां आली असती. तेव्हां साताराच्या गादीपासून फायदा किंवा तोटा व्हावयाचा या सर्व गोष्टी सातारकरांच्या चांगुलपणावर अवलंबून असणार. तेव्हां हा धोका नाहींसा करण्याचा मोका अनायासें आला असतां तो वायां जाऊं न देण्यांतच शहाणपणा आहे.

'याहीपेक्षां अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, सातारा प्रांत हा दक्षिण महाराष्ट्र व महाराष्ट्र यांच्या मध्यावर असल्या कारणानें त्यास लष्करी महत्त्व फार आहे. साताऱ्यामुळें बेळगांव आणि पुणें या दोन लष्करी ठाण्यांची फारकत उगीचच झाली आहे. शिवाय सरकारी खर्चाची तोंडमिळवणी करण्यासही फार कठीण जातें. ती अडचण हा प्रांत मिळाल्यास दूर होईल. प्रथम राजकीय दृष्टि ठेवुन मग वाटल्यास औदार्य खुशाल गाजवावें. सातारकरांच्या कुटुंबियांवर औदार्याचा वर्षाव करण्याआधीं हजारों कुटुंबांनीं भरलेल्या इतर प्रांतांकडे आपणांस कानाडोळा करून चालणार नाहीं. केवळ पैशाच्या अभावीं आम्हांस सहज करतां येणाऱ्या किती तरी सुधारणा करतां येत नाहींत. तेव्हां या प्रांतांच्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याचा सुप्रसंग आला असतां तो वायां कां घालवावा हेंच आम्हांस कळत नाहीं.'

मि. रीड याच्या पत्रकाचा गोषवारा वर दिला आहे. त्यांतील बाकीच्या सर्व मुद्यांपेक्षां शेवटचा मुद्दाच कंपनी सरकारच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. बाकीचे मुद्दे फारसे महत्त्वाचे नाहींत. मि. विलोबी आपल्या पत्रकांत म्हणतात, 'हिंदी संस्थानें वाटेल तशी दडपशाही करून गिळंकृत करावींत अशा मताचा मी नाहीं. पण माझें एवढेंच म्हणणें आहे कीं, जीं सहजासहजीं कोणत्याही तऱ्हेची खटपट न करतां आपल्या कर्मानें आपल्याला मिळत असतील तीं सोडूं नयेत. माझी अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, इंग्रज लोकांचे

कायदे व संस्था यांचा प्रसार येथें जितका फैलावेल तितका तो येथील लोकांना उपकारक होणार आहे. फक्त येथील लोकांच्या समजुती व व्यवहार यांकडे लक्ष पुरवून त्यांत थोडा फेरफार केला म्हणजे झालें. येथील लोककल्याणच्या दृष्टीनें माझें असें म्हणणें आहे कीं, जेव्हां जेव्हां दत्तकाचा प्रश्न उपस्थित होईल तेव्हां तेव्हां त्याचा फायदा घ्यावा आणि दत्तकास मंजुरी न देतां तीं संस्थानें आपल्या राज्यांत सामील करावींत. सातारच्या महाराजांना दत्तकाचा अधिकार नव्हता असें माझें ठाम मत आहे. तेव्हां हा दत्तक नामंजूर करावा आणि सातारचें राज्य खालसा करावें. शिवाजी महाराजांनीं निर्माण केलेलें स्वराज्य पेशव्यांनीं मागेंच नामशेष केलें. आतां आम्हीं केवळ उपकारबुद्धीनें सातारचें राज्य निर्माण केलें आहे. तेव्हां १८१९ चा तह हाच काय तो आम्हांस बंधनकारक आहे. त्याच्या मागें पेशव्यांनीं त्यांची सत्ता काबीज करण्यापूर्वीं त्यांचे त्यांचे संबंध काय होते व त्यांचे हक्क कोणते होते याचा विचार करण्याचें आम्हांस कांहीं एक कारण नाहीं. १८१९ च्या तहाप्रमाणें सातारचें राज्य प्रतापसिंह महाराज व त्यांचे बंधू यांच्याकडे चालावें एवढेंच फक्त ठरलें होतें. दत्तक पुत्र घेऊन गादी चालविण्याचा त्यांत निर्देश नाहीं.

'माझें हें म्हणणें गादीवर वारसा सांगणाऱ्या दत्तकापुरतें आहे. महाराजांना दत्तक घेतां येत नाहीं असें नाहीं. त्यांनीं खुशाल दत्तक घ्यावा; पण त्याचा वारसा फक्त त्यांच्या खाजगी जिनगीपुरता राहील. त्याचा संबंध गादीशीं कांहीं एक नाहीं. तो गादीला हक्कदार होऊं शकणार नाहीं. १८१९ सालीं बडोद्यास असेंच एक प्रकरण निर्माण झालें होतें. फत्तेसिंग गायकवाड यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीनें दत्तकाची परवानगी मागितली ती तिला देण्यांत आली; पण सदर दत्तकाला गादीची मालकी देण्यांत आली नव्हती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ती गादी मयत राजाच्या भावाला देण्यांत आली. त्यानें बावीस वर्षें राज्य केलें. नंतर ती त्याच्या थोरल्या मुलास देण्यांत आली.

'या प्रकरणीं येथवर मीं माझें मत खुलासेवार मांडलें आहे. सातारा-प्रकरणाचा विचार करतांना राजकीय, लष्करी व आर्थिक अशा तीन दृष्टींनीं

विचार व्हावयास पाहिजे. मग त्यांत कोणाचा कांहींही फायदा अथवा तोटा होवो.'

मि. रीड आणि विलोबी यांचीं पत्रकें वाचल्यानंतर या दत्तक प्रकरणांची कशी वावडी उडविली जात होती याची चांगलीच कल्पना येते. यानंतर हिंदी संस्थानें एकामागून एक अशीं घशांत टाकण्यासाठीं 'डॉक्ट्रिन ऑफ लॅप्स' निर्माण करणारा ग. ज. डलहौसी यानें स्वतःचें असें एक पत्रक काढिलें आहे; पण त्यानें रीड आणि विलोबी यांचेच मुद्दे पुनः जोरांत मांडले आहेत. तेव्हां त्या पत्रकानें जागा अडविण्यांत फारसें स्वारस्य नाहीं. मि. रीड, विलोबी आणि ग. ज. डलहौसी यांनीं हें दत्तक–प्रकरण इतक्या विलक्षण तऱ्हेनें रंगवून विलायतेस धाडिलें कीं, त्याचा निकाल काय लागणार हें सांगण्यास कोणा रमलज्ञाची जरुरीच नव्हती. हें प्रकरण विलायतेंत कोर्ट ऑफ डायरेक्टरांच्या टेबलावर ता. १३ डिसेंबर १८४८ ला पडलें. यानंतर या महत्त्वाच्या प्रश्नावर विचारविनिमय करण्यासाठीं म्हणून या सभासदांना भरपूर वेळ देण्यांत आला व ३ जानेवारी १८४९ ला पुन्हां सभा बोलाविण्यांत आली. तेव्हां हे सर्व धूर्त जमा झाले. नंतर डलहौसीच्या पत्रकांतील मुख्य मुद्दे व त्याच्याबरोबरच रंगो बापूजीचें एक पत्रक सभासदांना वाचून दाखविण्यांत आलें आणि सदर मजकूर डायरेक्टरांना पसंत आहे काय म्हणून प्रश्न विचारला गेला. तेव्हां पूर्वोक्त पत्रकाचा विचार करण्याकरितां एक कमिटी नेमावी असें सभासदांनीं सुचविलें; पण ती सूचना अमान्य झाली. शेवटीं मूळ ठरावावर कडाक्याचा वादविवाद होऊन गुप्त मतदानपद्धतीनें मतें घेतां 'सातारचें राज्य खालसा करावें' असा ठराव पास झाला.

कंपनी सरकारच्या डायरेक्टरांनीं बहुमताच्या जोरावर सातारचें राज्य खालसा करणारा ठराव मंजूर केला; पण त्यांतील बऱ्याच न्यायनिष्ठुर सभासदांना सातारचें राज्य खालसा करणें म्हणजे शुद्ध अन्याय असें वाटत होतें. त्यांनीं आपला मतभेद तितक्याच जळजळीत शब्दांत मांडला. इतकेंच काय, पण आपली भिन्न मतपत्रिका त्या ठरावास जोडण्यासही कमी केलें नाहीं. जॉन

शेपर्ड, मोलव्हिल, काऊल, फील्ड व टकर या पांच सदस्यांनीं आपल्या भिन्न-पतपत्रिका जोडल्या असून त्या फार महत्त्वाच्या आहेत.

सातारचें राज्य खालसा करण्याच्या बाजूनें आणि त्याच्या विरुद्ध बाजूनें जे मुद्दे ब्रिटिश मुत्सद्यांकडून पुढें करण्यांत आले त्यांची कल्पना येण्यास दिलेली हकीगत पुरेशी आहे. या सर्व चर्चा वाचल्या म्हणजे एक गोष्ट मनांत ठाम भरते कीं, सातारचें राज्य खालसा करण्यांत इंग्रजाचा स्वार्थापलीकडे कोणताही हेतु प्रभावी नव्हता.

———

भाग्यहीन राजवंश : ३९

दैव एखाद्याच्यामागें हात धुवून लागलें म्हणजे तें त्यांस एक क्षणाचीसुद्धां उसंत खाऊं देत नाहीं हेंच खरें! कारण सातारचे दोन्ही दत्तकपुत्र व दोन्ही राण्या साताऱ्यास आतां राहात होत्या. पण राज्य व राजवैभव नाहींसें झालें, पंधरा-वीस लक्ष उत्पन्नाच्या मुलुखावर पाणी सोडावें लागलें. राजचिन्हांचा त्याग करावा लागला व कंपनी सरकारनें अत्यंत 'दयाळूपणानें व उदार अंतःकरणानें' देऊं केलेल्या ३०,००० रुपयांचा तनखा मान्य करून स्वतःचा गुजारा करण्याचा कठीण प्रसंग आला. पण हें लाजिरवाणें जिणें सुद्धां त्यांना सुखासमाधानानें काढितां आलें नाहीं. स. १८५४ सालीं हीं दोन्ही कुटुंबें साताऱ्यास राहूं लागलीं व या गोष्टीस दोन-तीन वर्षें होतात न होतात तोंच स. १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धाचा वणवा पेटला. त्या आगीचे लोळ ठिकठिकाणीं निर्माण होऊन ते पिंगा घालूं लागले. त्याची झळ शिवरायांच्या या वंशजांस लागल्यावांचून कशी राहणार ?

१८५७ जूनच्या सुमारास देशांत विशेषतः उत्तर हिंदुस्थानांत जिकडे तिकडे इंग्रजांविरुद्ध उत्थान सुरू झालें. दक्षिणेंत त्या मानानें शांतता होती; पण सातारा जिल्ह्यांत रामोश्यांनीं ठिकठिकाणीं बंड पुकारलें. 'त्यांचे जमाव साताऱ्याच्या शेजारील पाली गांवीं जमतात. त्यांचें नेतृत्व रंगो बापूजींनें स्वीकारलें आहे. त्यांस भोरच्या पंतसचिवाचा पाठिंबा आहे,' अशी भुमका

उठली. ' रंगो बापूजीचा हा कट फार मोठा असून त्याचा विचार यवतेश्वर, महाबळेश्वर आणि सातारा या ठिकाणीं एकदम हल्ले चढवून युरोपियन अधिकाऱ्यांस ठार करावयाचें व खजिना लुटावयाचा आहे. याशिवाय प्रतापसिंहाच्या पुत्रास गादीवर बसविण्याबद्दल रंगो बापूजीस मुंबईच्या गव्हर्नरनें सांगितलें आहे. तसेंच सर्व युरोपियन अधिकाऱ्यांना पकडण्यांत येणार असून जे कोणी रंगो बापूजीनें केलेल्या या नवीन व्यवस्थेप्रमाणें राहण्यास तयार नसतील त्यांस ठार करण्यांत येणार आहे. ' अशाही पण गप्पा उठविण्यांत आल्या. ' या कटवाल्यांचीं मेतकुटें व आपआपसांतील संगनमतें स. १८५७ च्या जानेवारीपासून चालू झालीं; पण सर्वांची एकवाक्यता होईना. बंडास सुरुवात केव्हां करावयाची याचाच नीट निश्चय लागेना. म्हणून हें गाडें असेंच रेंगाळत पडलें. बाकी सर्व जय्यत तयारी होती. बंडवाल्यांच्या म्होरक्यांनीं बेलभंडार उचलून शपथा घेतल्या व दूधभातही खाल्ला. आतां पुन्हां येणारा मोका वायां घालवावयाचा नाहीं असें ठरलें. इतक्यांत अशी बातमी आली कीं, आतां युद्धाची धुमश्चक्री चोहोंकडे चालू होणार. युद्धाचें वातावरण सर्व बाजूंनीं ढगाळलें असून समशेरीची सौदामिनी कडाडणार. पण अशा अगदीं आणीबाणीच्या वेळीं सातान्यास बंडवाल्या लोकांना दारूचा तुटवडा पडला आहे. पण भोरला मात्र दारूगोळा एका कोठारांत भरपूर असून ८०० बंदुकींच्या गोळ्या सांपडल्या आहेत. दोन हजार लोकांचा जमाव झाला असून तुरुंगावर हल्ला करण्यांत येऊन ३०० गुन्हेगारांना पळविण्यांत येणार आहे. या सर्व कटांत भोरच्या पंतसचिवाचें अंग आहे. त्यानें बंडवाल्याचा चांगलाच पुरस्कार केला आहे. '

या गप्पांप्रमाणेंच आणखीही अशा बातम्या पसरल्या होत्या कीं, ' या कटांत साताऱ्चे छत्रपति प्रतापसिंह महाराजांचें कुटुंबही पण सामील आहे. तसेंच इतर संस्थानिकही पण या बंडांत सामिल आहेत. एक दिवस रात्रीं प्रतापसिंहाचा दत्तकमुलगा शाहू व अप्पासाहेबाचा दत्तकमुलगा व्यंकोजी राजे हे दोघेही राजवाड्यासमोर घोड्यावर स्वार होऊन उभे होते व बंडवाल्यांचें पुढारीपण ते स्वीकारणार असेंही पण ठरलें होतें. ६०० रुपये पगारवाला

साताऱ्याचा पोलिस अधिकारी अंताजी राजे शिर्के ऊर्फ बुवासाहेब यास राणीनें पैसे चारून वश करून घेतलें आहे व त्यामुळें बंडाच्या वेळीं पोलिस शिपाई जागच्या जागीं थंड राहणार आहेत; तसेंच ४०,००० रोहिले आणण्याचें ठरलें आहे. यानंतर जास्त चौकशी करितां असेंही आढळून आलें कीं, शहाजी राजाचा म्हणजेच कै. अप्पासाहेबाचा दत्तकपुत्र व्यंकोजी यास इंग्रज सरकाराविरुद्ध चाललेल्या या कटाची माहिती होती; पण त्याचा उच्चार करण्यास त्याची छाती होईना. कारण एखाद् वेळीं प्रतापसिंहाच्या मंडळींचा जय होता तर त्याचें मरण ओढवणार होतें म्हणून तो आपला तटस्थ होता. या कार्यासाठीं भोरपासून खानापूरपर्यंतच्या प्रांतांतून गुप्तपणें करही पण वसूल करण्यांत आला होता. या सर्व कटाची उभारणी मुख्यत: कोल्हापुरास झाली होती. बेळगांवाहून मी हजारों बंडवाले आणतों असें रंगो बापूजी म्हणे. तसेंच कोल्हापूर बंडांत सामील झाल्यावांचून राहणार नाहीं असेंही पण बोलण्यांत येई. या बोलण्यांत बरेंच तथ्य आहे असें शोधाअंतीं लक्षांत आलें होतें. प्रतापसिंहाचा दत्तकपुत्र शाहू राजे याचें बोलणें प्रमाण मानलें तर या सर्व उठावास होळकराची व रंगो बापूजींची चांगलीच मदत होती. तसेंच सन १८५४ त राणी साताऱ्यास आली त्या वेळेपासून ती या युद्धाच्या तयारींत होती. अशा तऱ्हेनें सातारा प्रांत हा इंग्रजांविषयींच्या अप्रीतीनें कांठोकांठ भरला होता. एखाद्याच ठिणगीचा अवकाश कीं भडका उडाला असता. शहाजी राजानें व प्रतापसिंहानें घेतलेले दोन्हीही दत्तक अमान्य करण्यांत आले होते. रेसिडेन्टाच्या परवानगीशिवाय दत्तक घेतल्यामुळें त्यांचा गादीवरील वारसा हक्क मान्य करण्यांत येणार नाहीं असें आपलें धोरण कंपनी सरकारनें जाहीर केलें होतें. त्यामुळें सध्यां महाराष्ट्रांत राज्य करणाऱ्या सर्व संस्थानिकांच्या पोटांत भीतीचा गोळा उठला होता. कारण त्यांपैकीं बहुतेक सर्व निपुत्रिक होते, आणि आपल्यानंतर आपलीं राज्यें खालसा होणार असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. त्यामुळें साहाजिकच सातारकर महाराजांच्या वंशजाबद्दल सर्वांच्याच मनांत सहानुभूति वसत होती. स. १८५४ त राजकुटुंबीय मंडळी साताऱ्यास राहण्यास आल्यानें तर या सहानुभूतीस व प्रेमास नवांकुर फुटले होते.

उत्तर हिंदुस्थानांत सुरू झालेल्या बंडाची बातमी पहिल्यांदां साताऱ्यास आली ती एका ब्राह्मणास आलेल्या पत्रांतून. हें पत्र प्रतापसिंहाच्या राणीस वाचून दाखविण्यांत आलें व ' आपण सत्ताधारी झाल्यावर गरिबावर लक्ष असूं द्या ' अशी त्या ब्राह्मणानें विनंति केली. हें पत्र (नेटिव्ह लायब्ररींत) वाचनालयांत वाचून दाखविण्यांत आलें. नंतर हें पत्र जाळण्यांत येऊन त्या ब्राह्मणास ही बातमी गुप्त ठेवण्याबद्दल बजावण्यांत आलें. या पत्रामुळें एकंदर सातारा शहरांत खळबळ उडाली. या वेळीं या कटास तेज चढण्यास दुसरें एक कारण असें झालें होतें कीं, इंग्लंड आणि रशिया यांच्यामध्यें युद्ध चालू होतें. तेव्हां इंग्लंडहून आल्यापासून रंगो बापूजी एकसारखें असें बडबडत होता कीं, इंग्लंडचा संकटकाळ तीच आपली भाग्यवेळ ! तेव्हां आतां इंग्रज पेंचांत आहे म्हणून सर्व बाजूंनीं उठाव केल्यास आपणांस यश हें खास ठेविलेलें. याशिवाय दक्षिणेंतील असंतुष्ट लोकांचें असें म्हणणें आहे कीं, मराठ्यांच्या साम्राज्याचें आदि ठिकाण सातारा तेव्हां त्याची कंपनी सरकारच्या सत्तेच्या जोखडांतून पहिल्यांदां मुक्तता केली पाहिजे. अशा शेंकडों अफवा उठल्या होत्या.

या सर्वांचा बंदोबस्त करण्यासाठीं म्हणून मग उपाय योजण्यांत आले. पुष्कळशी धरपकड झाली. कोल्हापुरांत बऱ्याच जणांस पकडण्यांत आलें. त्यांतच रंगो बापूजीचा मुलगा हातीं लागला. रंगो बापूजीस पकडण्यासाठीं ५०० रु. इनाम कंपनी सरकारनें लाविलें होतें. पण रंगो बापूजी महावस्ताद. तो जो या वेळेपासून नाहींसा झाला तो कायमचाच. पुन्हां त्याचा सुगावासुद्धां कोठें लागला नाहीं. स. १८५७ जूनच्या शेवटास युरोपियन सैनिकांची एक तुकडी साताऱ्यास आली. त्यानंतर सुमारें १५ दिवस सगळीकडे सामसुम होतें. पण १२ जुलैला एकदम स्फोट झाला. पंढरपूरच्या मामलेदार कचेरीवर व खजिन्यावर हल्ला करण्यांत आला. तसेंच साताऱ्यासही पण थोडी धामधूम झाली. निजामच्या पूर्व बाजूकडील जिल्ह्यांतून थोडा उठाव झाला. पण ही सर्व गडबड फार दिवस टिकली नाहीं. ठिकठिकाणच्या पोलिस अधिकाऱ्यांनींच त्याचा उपशम केला. पंढरपूरचा दंगा शांत करतांना मात्र तेथील मामलेदारासुद्धां चार लोक मारले गेले. बंडखोरांच्या सहा पुढाऱ्यांपैकीं दोन या हल्ल्यांतच मारले गेले.

बाकीच्यांना पकडण्यांत येऊन त्यांच्या दोन अनुयायांसुद्धां त्यांस सातारा शहरीं तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें. आणखी कित्येकांना काळेंपाणी दाखविण्यांत आलें. यानंतर २७ ऑगस्टला बंडांत सामील असणाऱ्या सतरा लोकांची चौकशी करण्यांत आली आणि त्यांच्यावर गुन्हा शाबीत असल्याचें जाहीर करून त्या सर्वांस ता. ८–९–१८५७ रोजीं साताऱ्यास गेंडच्याच्या माळावर फांशीं देण्यांत आलें. या सतरा जणांत रंगो बापूजीचा मुलगा सीताराम व त्याचे इतर नातेवाईकही होते.

छत्रपति प्रतापसिंह महाराजांशीं एकनिष्ठपणें वागणाऱ्या गुप्ते घराण्यांतील मंडळींचीं डोकीं मारण्यांत आलीं व खुद्द छत्रपतींच्या कुटुंबियाची साताऱ्याहून उचलबांगडी झाली. ता. ६-८-१८५७ रोजीं प्रतापसिंहाचा दत्तकपुत्र शाहू, त्याचा चुलता काकासाहेब, दत्तकमाता राजसबाई, जनकमाता गुणवंताबाई व सेनापति दुर्गासिंग वगैरे राजघराण्यांतील प्रमुख मंडळींस अटक करून त्या सर्वांस मुंबईस नेलें व तेथें बुचर बेटावर अलग अलग कोठडीत ठेवण्यांत आलें. एका वर्षानंतर १८५८ च्या मार्च महिन्यांत या सर्वांस कराचीस नेण्यांत आलें. या वेळीं या सर्व मंडळींचा तनखा मासिक ३८० रु. होता. एकमेकांस भेटण्याची बंदी करण्यांत आली होती. सत्तावीस वर्षें अशा तऱ्हेनें रखडल्यानंतर त्यांस १८८५ नंतर सोडून देण्यांत आलें. त्यानंतर हे शाहु महाराज पुण्यास भवानी पेठेंत घ. नं. ५४३ येथें राहात असत व तेथेंच त्यांचा अंत १-६-१८९२ या दिवशीं झाला. अशा तऱ्हेनें दुर्दैवी प्रतापसिंहाचा हा अभागी अंकुर वयाच्या ५२ व्या वर्षीं दग्ध झाला. त्यास होळकरांकडून २८,००० रु. नेमणूक होती. या गृहस्थानें ब्राह्मो-समाजाची दीक्षा घेतली होती व त्याचा अंत्यविधि त्या पंथाच्या पद्धतीप्रमाणेंच झाला.

शहाजी राजे ऊर्फ अप्पासाहेब यांच्या कुटुंबियांची हकीगत सांगावयाची तर तीही पण फार खडतर आहे. स. १८४८ त अप्पासाहेब वारला व त्याचा दत्तक अमान्य करून कंपनी सरकारनें साताराचें राज्य खालसा केलें. त्यानंतर अप्पासाहेबाच्या तीन राण्या—सगुणाबाई, बनूबाई व राधाबाई, व दत्तक मुलगा व्यंकोजी यांचे फार हाल झाले. यांना नांवापुरतेंसुद्धां राजेपण ठेवावयाचें नाहीं

असा कंपनी सरकारचा निर्धार होता. सातारा शहरीं अप्पासाहेबानें लक्षावधी रुपये खर्चून बांधलेले मोठमोठाले राजवाडे आणि इमारती, जलमंदिरें आणि बागा या सर्वांचा आणि त्यांतील सामानसुमानाचा ताबा इंग्रजांनीं घेतला. कांहीं इमारती पाडून टाकल्या, कांहीं विकल्या. अशा तऱ्हेनें इंग्रजांच्या मनास येईल त्याप्रमाणें त्यांची विल्हेवाट लाविण्यांत आली. यानंतर, ही मंडळी बाहेर जात त्या वेळीं त्यांच्या बंदोबस्तासाठीं पोलिस पार्टी देण्यांत येत असे, तेंही पण बंद करण्यांत आलें. नंतर त्यांच्याकडून सर्व प्रकारचे कर वसूल करण्यांत येऊं लागले. अशा तऱ्हेनें या घराण्याचा दर्जा अगदीं सामान्य प्रतीचा करण्यांत आला. १८५७ सालच्या बंडानंतर या मंडळींना प्रथम अहमदाबादेस ठेवण्यांत आलें. नंतर स. १८५९ त त्यांची रवानगी अहमदनगरास करण्यांत आली. तेथेंच व्यंकोजी स. १८६४ त मरण पावला. व्यंकोजीच्या मृत्यूनंतर राणी सगुणाबाईनें दुसरा दत्तक ता. १८-५-१८६५ ला घेतला. यानंतर दहा वर्षांनीं सगुणाबाईसाहेबांनीं ता. १४-३-१८७४ रोजीं सुप्रसिद्ध कायदेपंडित व प्रख्यात विद्वान् विश्वनाथ नारायण मंडलीक यांच्याकडून, साताराचें राज्य परत मिळावें म्हणून व्हिक्टोरिया राणीकडे अपील केलें. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. हें अपील रवाना केल्यानंतर अवघ्या दहाच दिवसांनीं ता. २३-३-१८७४ रोजीं ही वयोवृद्ध राणी दिवंगत झाली. दुसरा दत्तक रामराजा यास दोन मुलें झालीं त्यांचीं नांवें अनुक्रमें शिवाजी ऊर्फ अण्णासाहेब व प्रतापसिंह ऊर्फ भाऊसाहेब हे दोघेही निपुत्रिकच मरण पावले. अण्णासाहेब १९१४ सालीं वारला व भाऊसाहेब १९२५ सालीं निवर्तला. भाऊसाहेब हा फार उदार व मानी पुरुष होता. फर्ग्युसन कॉलेजचे सुविख्यात प्रि. रँ. महाजनी हे साताराचेच असल्याकारणानें श्रीमंत भाऊसाहेबांच्या औदार्याचा त्यांना शिक्षण पुरें करण्याच्या कामीं चांगलाच उपयोग झाला. यानंतर भाऊसाहेबांच्या कुटुंबानें ताराबाईसाहेबांनीं शेडगांवकर घराण्यांतील एक मुलगा ता. २८-५-१९२४ रोजीं दत्तक घेतला व त्याचें नांव शाहूराजे असें ठेविलें. हेच गृहस्थ आतां शिवाजी महाराजांची अस्सल वंशशाखा चालवीत आहेत.

सूचि
